


जातककथासंग्रह

भाग १-२-३

धर्मानंद कोसंबी

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य

जातककथासंग्रह

[बौद्धवाङ्मयांतील जगप्रसिद्ध जातकट्ठकथेतील
निवडक जातकांचे मराठी रूपांतर]

भाग
(१, २, ३)

ग्रंथकार

धर्मानंद कोसंबी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

पुनःप्रकाशन, १९७८, शके (१९००)
पुनर्मुद्रण :— २००७

प्रकाशक :—

रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-२५.

किंमत :— रुपये १३०/-

मुद्रक :—
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे-१.

अनुक्रमणिका

ऋते ज्ञानप्रसारान्न हि राष्ट्रमुक्तिः

❁ ❁ ❁ ❁

"ज्ञानाचा प्रसार हाच राष्ट्राच्या उद्धाराचा
राजमार्ग आहे."

अनुक्रमणिका

निवेदन

ज्ञानदेवांनी सातशे वर्षांपूर्वी भागवत धर्माचा पाया रचला, त्याप्रमाणे बौद्ध धर्माचा पाया आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी रचला आहे. भागवत धर्म हजारो वर्षे ज्ञानदेवांपूर्वी प्रचलित होता, तरी त्याला पुन्हा नवा पाया देणे भाग पडले. त्याचप्रमाणे बौद्ध धर्म दोन हजार वर्षांपेक्षा अधिक कालपर्यंत निम्म्या मानवी जगात प्रचलित असूनही त्याला पुन्हा नवा पाया देण्याचे आवश्यक कार्य धर्मानंदांनी केले आहे. नवा पाया देण्याचे कारण, बौद्ध धर्माला या विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी नव्या युगाच्या प्रेरणांना अनुरूप स्वरूप देणे आवश्यक आहे, हे होय. अद्भूत पौराणिक कथा, कल्पित प्रसंग, आणि पारलौकिक तत्त्वज्ञान यांची शेकडो पुटे मूळच्या विवेकवादी शुद्ध बौद्ध धर्मावर आणि बुद्धचरित्रावर शतकानुशतके चढलेली आहेत, त्यामुळे नव्या युगाच्या प्रेरणांशी सुसंगत असे त्याचे स्वरूप राहिलेले नाही. परंतु बुद्धचरित्राचे व बौद्ध धर्माचे मूळचे शुद्ध स्वरूप या नव्या युगाच्या प्रेरणांशी सुसंगत असेच आहे, असे ध्यानात आल्यामुळे अनेक आधुनिक पश्चिमी पंडितांनी व विशेषतः धर्मानंदांनी ते स्वरूप यशस्वी रीतीने विवेकबुद्धीने शोधून काढण्याचा प्रयत्न केला.

नव्या आधुनिक भारताला अशा मूळच्या शुद्ध स्वरूपातील बौद्ध धर्माची आणि बुद्धचरित्राची नितांत आवश्यकता आहे, कारण बुद्ध व बौद्ध धर्म ही जागतिक संस्कृतीला मिळालेली अलौकिक सर्वोत्तम देणगी असून ही भारताच्या प्राचीन इतिहासातील एक महान घटना आहे. या भूलोकातील मानवी संस्कृती अंतिम व शुद्ध नैतिक तत्त्वावर आधारलेली निर्माण करणे, हे आधुनिक मानवाचे आद्य व परमपवित्र कर्तव्य आहे. हे कर्तव्य बजावण्यात मानवाला अपयश आल्यास विज्ञानाच्या सामर्थ्यावर आधारलेल्या भौतिक संस्कृतीसह मानवजातीचा संसार विलयास जाण्याचा धोकाउत्पन्न झालेला आहे. म्हणून या जगाला तारण्याकरिता बुद्ध व बौद्ध धर्म यांची गरज आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी, की गेल्या बाराशे वर्षात भारतात बौद्ध धर्माला उतरती कळा लागून तो भारतातून नामशेष होत चालला होता. गेल्या दीडशे वर्षात पश्चिमी इतिहाससंशोधकांच्या हे लक्षात आले, की या धर्माचा भारताच्या इतिहासातील धार्मिक, नैतिक, कलात्मक आणि तत्त्वज्ञानात्मक कार्याचा विस्तार हा मोठा होता. बौद्ध भिक्षूची दीक्षा घेतलेले भारतातील साधुसंत हजारो वर्षांपूर्वी धार्मिक व नैतिक प्रेरणा घेऊन अर्ध्यापेक्षा अधिक जगात पसरले आणि त्यांनी नव्या नैतिक संस्कृतीचा संदेश देऊन मानवांना शांतीचा मार्ग दाखविला. पश्चिमी पंडितांनी संशोधन सुरू केल्यानंतर आधुनिक भारतीय पंडितही या प्राचीन इतिहासाच्या संशोधनास प्रवृत्त झाले. त्यांच्यातले अग्रणी म्हणजे आचार्य धर्मानंद होय.

आचार्य धर्मानंदांनी बुद्धचरित्र व बौद्धधर्म यांचा वाङ्ममयीन पाया घातला, त्या पायावर इमारत उभारायचे कार्य थोर दलित नेते डॉ. बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केले. त्यांच्या कार्यास धर्मानंदांचा आधार मिळाला. धर्मानंदांनी लिहून प्रसिद्ध केलेले साहित्य हाच तो आधार होय. विचार हा संस्कृतीचा आधार असतो. धर्मानंदांच्या साहित्यातील विचारांचा गाभा त्रिकालाबाधित व अजरामरही आहे, असे म्हणता येते. परंतु ते काहीसे मागे पडले होते. आंबेडकर यांच्या नव्या आंदोलनाने त्या विचारांना चांगला उजाळा मिळेल. त्या वैचारिक साहित्याच्या पाठीमागे फार मोठा त्याग आहे. त्या त्यागातून त्या साहित्याचे भव्य यश प्रकट झाले आहे. ज्या उच्च विचारांच्या पाठीमागे महान त्याग असतो, ते विचार अधिक प्रभावीपणे दीर्घकालपर्यंत मोठी प्रेरणा देत राहतात. म्हणून असे म्हणता येते की, धर्मानंदांना फार मोठा भविष्यकाळ आहे.

अनुक्रमणिका

धर्मानंदांच्या अपरंपार त्यागाचे आणि भारतात त्यांच्या वेळी अलभ्य असलेल्या बौद्धधर्मविद्येच्या साधनेकरिता आवश्यक असलेल्या अदम्य उत्साहाचे परिणामकारी चित्र त्यांच्या “निवेदन” या आत्मचरित्रात पाहावयास मिळेल. देशी आणि परदेशी भाषांमध्ये आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचे गेल्या दोनशे–अडीचशे वर्षांतील शेकडो नमुने पाहावयास मिळतात. परंतु आत्मचरित्र लेखकाचा आत्मा सर्वांगीणपणे ज्यात व्यक्त झालेला असतो. अशी आत्मचरित्रे हीच खरी आत्मचरित्रे ठरतात. अशा खऱ्याखुऱ्या आत्मचरित्रांमध्ये धर्मानंदांच्या निवेदनाची गणना करता येते. काही आत्मचरित्रे अशी असतात, की त्यांत सबंध आत्मा दिसतच नसतो. याची कारणे दोन : एक तर, जीवनातील वास्तव घटना, अनुभव व प्रवृत्ती यांचे चित्रण करण्यास योग्य असे शब्दसामर्थ्य नसते आणि दुसरे कारण असे की, तसे शब्दसामर्थ्य असले तरी जीवनातील अनेक घटना, अनुभव व प्रवृत्ती मुद्दामहून वाचकाच्या दृष्टीआड करण्याचा प्रयत्न असतो. कारण व्यंगे, दोष, अपराध वा गुन्हे दाखविण्याची लाज वाटते. त्यामुळे अर्धसत्यच पुढे येते आणि त्याचमुळे ते आत्मचरित्र आत्म्यास गमावून बसते. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर हे सर्व मानवांच्या जीवनात असतातच. त्यांच्यावर विजय मिळविण्यात कमीजास्त प्रमाणात अपयशही आलेले असते. जीवनातील यशांचीही ती एक अपरिहार्य अशी बाजू असते. सबंध जीवन म्हणजे आत्मा होय. सबंध आत्म्याचे दर्शन करून देणे, हे आत्मचरित्रलेखकाचे परमपवित्र कर्तव्य असते. कारण सत्यदर्शन ही मानवी जीवनाची मूलभूत गरज आहे. आत्म्याचे एकांगी दर्शन करवून देणारा आत्मचरित्रलेखक हा या परमकर्तव्यापासून च्युत झालेला असतो. अशा परमकर्तव्याला जागणारेही आत्मचरित्रलेखक साहित्याच्या इतिहासात सापडतात. उदा. फ्रेंच राज्यक्रांतीचा विचारप्रवर्तक रूसो याने स्वतःच्या चरित्रात स्वतःची व्यंगे व अपराध खुल्लमखुल्ला सांगण्यास काही कमी केले नाही.

वयाच्या २३–२४ व्या वर्षी धर्मनंदानी बुद्धाच्या शोधाकरिता गृहत्याग केला. त्यावेळी त्यांचे शिक्षण फारसे झालेले नव्हते. मराठीशिवाय, संस्कृत, इंग्लिश किंवा इतर कोणत्याही भाषा येत नव्हत्या. एक छोटेखानी बुद्धचरित्र हाती पडले, ते वाचले आणि बुद्धदर्शनाचा वेध लागला. त्यामुळेच, बौद्ध धर्माच्या अध्ययनार्थ ते बाहेर पडले. गृहस्थिती साधारण गरिबीची होती. बाहेर पडले तेव्हा प्रवासाच्या खर्चाला कमरेला पैसा नव्हता. टक्केटोणपे खात गुरूच्या शोधात हजारो मैल सापडेल त्या वाहनाने वा पायी प्रवास केला. बहुतेक पायी प्रवास अनवाणीच केला. अनेक वेळापाय रक्तबंबाळ झाले, उपास पडले, पुष्कळ वेळा चण्या-चुरमुऱ्यावरच भूक भागवावी लागली; वा उपाशीच राहावे लागले. गोव्याहून पुणे, मुंबई, ग्वालेर, काशी, कलकत्ता, नेपाळ, गया, मद्रास आणि अखेरीस लंका इत्यादी ठिकाणी बौद्ध धर्म विद्येचा गुरु शोधत गेले. वाटेत पुणे आणि काशी येथे संस्कृत शिकले. अखेर श्रीलंकेतील बौद्ध मठात बौद्ध विद्येचे गुरु भेटले. भिक्षुदीक्षा घेतली. तेथे पाली भाषा शिकून बौद्ध धर्माच्या ग्रंथांचे सांगोपांग अध्ययन केले. बौद्ध योगाच्या अभ्यासाकरिता दोनदा ब्रह्मदेशात जाऊन आले. जिवावर अनेक आपत्ती आल्या, परंतु बौद्धधर्माच्या विद्येचा ध्यास वाढतच गेला. पाली भाषेत ज्याप्रमाणे बौद्धधर्माचे अफाट साहित्य आहे, तसेच संस्कृतमध्येही आहे. त्या दोन्ही भाषेतील साहित्यांमध्ये या सात वर्षात धर्मयात्रेत पारंगतता मिळविली. वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत चतुरस्त्र विद्वत्ता संपादन केली.

धर्मानंद कोसंबी यांनी बहुतेक सर्वच लेखन मोकळ्या सरळ अस्सल मराठीत केले आहे. परंतु या संदर्भात असे सांगावेसे वाटते की अलिकडे गेल्या २०–२५ वर्षात मराठी शैलीतील साधी अर्थवाहकता कमी होत चालली आहे. विशेषतः ललित, साहित्यातील शैली नटवी, पसरट व गुंतागुंतीची बनत चालली आहे. कवितांमध्ये याचा प्रत्यय अधिक येतो. ऋजुता, प्रसन्नता, अर्थवाहकता हा दोष ठरेल की काय अशी भीती वाटत आहे. अर्थ गूढ वा अव्यक्त असलेली शैली साहित्य पदवीला भूषवू लागली आहे. याचे एक कारण

अनुक्रमणिका

असे की, विचार आणि प्रत्ययशीलता ही अर्थाला सरळ पोचेनाशी झाली आहेत. धर्मानंदांची लेखनशैली या अवनतीपासून वाचवील, अशी अशा वाटते.

म. रा. सा. सं. मंडळाने प्राचीन ग्रंथमालेत आजवर भरतमुनींचे “भरतनाट्यशास्त्र” (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), विशाखादत्ताचे “मुद्राराक्षसम्', कात्यायनाचे “कात्यायन शुल्बसूत्रे”, पाली भाषेतील “धम्मपदम्”, शाङ्गदेवाचे “संगीत रत्नाकर” भाग १, इत्यादी संस्कृत ग्रंथांची भाषांतरेप्रकाशित केली आहेत. तसेच भरत नाट्यशास्त्र” अध्याय २८, “चार शूल्बसूत्रे” या संस्कृत ग्रंथांची भाषांतरे तसेच कवी हाललिखित“गाथा सप्तशती”, कवी बिहारी लिखित “सतसई” व जयदेवकवी विरचित “गीतगोविंदम्” या भाषांतरित ग्रंथांचे मुद्रण चालू आहे.

बौद्ध धर्म विषयक ग्रंथांचे ज्ञान सामान्य मराठी वाचकांना व्हावे म्हणून कै. धर्मानंद कोसंबी यांच्या मौलिक व दुर्मिळ साहित्याचे पुनर्मुद्रण करण्याचे मंडळाने ठरविले आहे. जातककथा भाग १, २ व ३ चे मंडळाच्या प्राचीन ग्रंथमालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

मुंबई

माघ ३० शके १९००

सोमवार दि. १९ फेब्रुवारी १९७९

लक्ष्मणशास्त्री जोशी

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

निवेदन

फार्सी भाषेचा परिचय महाराष्ट्राला चौदाव्या शतकात झाला व त्यानंतरच्या ऐतिहासिक काळामध्ये ही भाषा महाराष्ट्रात तोलामोलाने वापरली जाऊ लागली. ऐतिहासिक कागदपत्रे, खलीते, दस्ताऐवज आदिंसाठी तिचा वापर होऊ लागला. मुसलमानी अंमलाच्या प्रभावामुळे या भाषेचा प्रभाव मराठी लोकसंस्कृतीवर पडला आणि फार्सी भाषा केवळ ग्रंथ व्यवहारापुरती आणि राज्यव्यवहारापुरती न राहता ती लोकभाषेमध्ये स्थिरावली. बहामनी राज्याचा काल, शिवकाल व पेशवे काल यामध्ये फार्सी मराठीचा अनुबंध दृढ होत गेला. आपल्याला महाराष्ट्राच्या इतिहासाचा धांदोळा घ्यावयाचा असेल, तर फार्सी भाषा कळावी लागेल. आपल्या पूर्वसूरीच्या इतिहासकारांनी फीर्सीचा अभ्यास करून मराठीची मोठीच सेवा केली आहे. आधुनिक काळातील डॉ. यू. म. पठाण हे अशा व्यासंगी अभ्यासकांपैकी एक आहेत. त्यांनी अतिशय परिश्रम घेऊन “फार्सी मराठी अनुबंध” हा ग्रंथ लिहिला. तो आज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला प्रकाशित करण्याचे भाग्य लाभत आहे हा सुयोग होय. या ग्रंथाचे इतिहासकार, संशोधक, संदभार्थी अभ्यासक स्वागत करतील अशी आशा आहे.

(मधु मंगेश कर्णिक)

मुंबई

अध्यक्ष,

दिनांक : ८ ऑगस्ट, २००६.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

प्रस्तावना

पालिवाङ्मयांत जातकट्ठकथा या नांवाचा एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. ह्यांत एकंदर ५४७ कथा आल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं कथांचा समावेश दुसऱ्या विस्तृत कथांत होत असल्यामुळें बाकी सरासरी ५३४ कथा शिल्लक रहातात. सिंहलद्वीपांत, ब्रह्मदेशांत आणि सयामांत जातकट्ठ कथा फारच लोकप्रिय आहेत. परंतु हिंदुस्थानांत—त्यांच्या जन्मभूमींत—त्यांचा परिचय फार थोड्यांना आहे. बुद्धसमकालीन समाजस्थितीवर लिहितांना बंगाली आणि इतर हिंदी तरुण पंडित अलिकडे त्यांचा फार उपयोग करूं लागले आहेत. परंतु त्यांनीं जातकट्ठकथा समग्र वाचल्या असतील असें समजणें चुकीचें आहे. युरोपियन पंडितांनी लिहिलेल्या लेखांच्या आणि तयार केलेल्या अनुक्रमणिकांच्या भांडवलावरच बहुधा आमच्या पंडितांचा व्यापार चालला आहे.

जातकट्ठकथा प्रसिद्धीला आणण्याच्या कामीं ज्यांनीं परिश्रम केले त्यांत व्ही. फॉसबोल (V. Fausboll) ह्या जर्मन पंडिताला अग्रस्थान दिलें पाहिजे. जर्मनी कोठें आणि सिंहलद्वीप कोठें! पण 'किं दूरं व्यवसायिनाम्' ह्या न्यायानें या गृहस्थानें तेथून सिंहली ताडपत्री पुस्तकें गोळा करून त्यांच्या आधारावर, दुसऱ्या कोणाचें साहाय्यनसतां, रोमन अक्षरांनीं जातकट्ठकथा छापण्यास १८७७ सालीं आरंभ केला; व १८९६ सालीं हें काम संपविलें. पूर्व तयारीसाठीं एक दोन वर्षें लागलीं असें गृहीत धरलें तर ह्या कामीं डॉ. फॉसबोल यांनीं आपल्या आयुष्याचीं एकवीस बावीस वर्षें खर्चिलीं असें म्हटलें पाहिजे, मध्यंतरी त्यांना पुष्कळ अडचणी आल्या. परंतु त्यांना न डगमगतां बोधिसत्त्वासारख्या अढळ उत्साहानें हें काम त्यांनीं पार पाडलें. आजला ह्या त्यांच्या जातकट्ठकथेच्या संस्करणाचा युरोपियन व एतद्देशीय विद्वानांना फारच उपयोग होत आहे.

डॉ. फॉसबोलच्या संस्करणाच्याच आधारें ह्या गोष्टी लिहिल्या आहेत. मूळ गोष्टींचें यथार्थ भाषांतर न करतां सार मात्र आणण्याचा प्रयत्नकेला आहे. जातकट्ठकथेंतील मनोरंजक आणि बोधप्रद कथा मुलांमुलींच्या वाचनांत येऊन प्राचीन समाजस्थितींचें त्यांना सहजासहजीं ज्ञान व्हावें, आणि बोधिसत्त्वाच्या सद्‌गुणांच्या अनुकरणानें आत्मोन्नति करतां यावी, या उद्देशानें हें पुस्तक लिहिलें आहे.

बोधिसत्त्व.

बोधि म्हणजे लोककल्याणाच्या तत्त्वानें ज्ञान. त्या ज्ञानासाठीं जो सत्त्व म्हणजे प्राणी सतत प्रयत्न करतो, तो बोधिसत्त्व. शाक्यमुनि गौतमाला बुद्धपद प्राप्त होण्यापूर्वीं पुष्कळ ठिकाणीं बोधिसत्त्व म्हणण्यांत आलें आहे. हळुहळू पूर्वजन्मींहि तो बोधिसत्त्व होता अशी कल्पना अस्तित्वांत आली; आणि त्या काळीं प्रचारांत असलेल्या ह्या कथांना अहिंसात्मक स्वरूप देऊन त्या त्याच्या पूर्वजन्मींच्या कथा समजण्यांत येऊं लागल्या.

दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांति, सत्य, अधिष्ठान, मैत्री व उपेक्षा ह्या दहा पारमितांच्या योगें लोकोद्धारासाठीं बोधिसत्त्व सतत प्रयत्न करून बुद्ध होतो, व मोक्षाला जातो. पारमिता म्हणजे पारंगतता, बीजरूपानें हे दहा गुण सर्व प्राण्यांत आहेतच. परंतु त्यांचा जे विकास करतात, तेच बोधिसत्त्व होतात. मुलांनो, ह्या गुणांचा विकास करून ह्याच जन्मीं तुम्हाला बोधिसत्त्व होतां येणें शक्य आहे; अनेक प्राण्यांचे

अनुक्रमणिका

जन्म घेण्याची गरज नाहीं. तेव्हां अशा सद्‌गुणांची तुम्ही हेळसांड न करितां ह्या पारमिता संपादण्याचा सतत प्रयत्न करा.

१ दानपारमिता

प्रथमतः तुम्ही गोरगरीबांना व आंधळ्यां पांगळ्यांना पै पैसा दानधर्म करा. दानानें तुमच्या मनांत कोमल दया उत्पन्न होऊन तुमची उन्नति करील व तुम्हास बोधिमार्गाच्या पहिल्या पायरीजवळ आणील. लहानपणापासून दानधर्माचा अभ्यास केल्यास तशा प्रसंगी लोककार्याला आपला देह देण्यासहि तुम्हास परवा वाटावयाची नाहीं.

२ शीलपारमिता

तुम्ही दानधर्म पुष्कळ केला; किंबहुना आपला प्राणहि लोककल्याणासाठीं देण्यास तयार झाला; पण तुमचें शील निर्मल नसलें, तर सन्मार्गांत तुमची उन्नति होणार नाहीं. प्राणघातापासून अलिप्त राहणें, खोट्या मार्गानें पैसा न कमावणें, मद्यपानादिक व्यसनापासून दूर राहणें व योग्यकाळापर्यंत ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रमांत एकपत्नीव्रत पाळणें ह्याला शील म्हणतात. जिवावर पाळी आली तरी अशा शीलाचा तुह्मी भंग होऊं देतां कामाचा नये. दानधर्म करणें चांगलें; परंतु त्यायोगें तुमचें शील मलिन होत असलें, तर तो न केलेला बरा. लबाडीनें पैसा मिळवून किंवा चोरी करून मोठा दानधर्म करण्यापेक्षां शील परिशुद्ध ठेवून दिलेला पै पैसा अधिक श्रेयस्कर आहे असें समजा.

३ नैष्कर्म्यपारमिता

तुमचें शील परिपूर्ण होण्यासाठीं तुम्हास एकान्ताची गोडी लागली पाहिजे. एकान्तवासांत बसून प्रथमतः तुमचें शरीर किती अपवित्र पदार्थांनीं भरलें आहे हें पाहण्याचा तुम्ही अभ्यास केला पाहिजे. खाटकाच्या दुकानांत टांगलेले मांसाचे तुकडे, एका बाजूला पडलेली आंतडी, स्मशानांत पडलेलीं माणसांचीं हाडें पाहून तुम्हीं कंटाळतां. पण हे सर्व पदार्थ तुमच्या ह्या अमंगल शरीरांतच आहेत ह्याची तुम्हाला जाणीव आहे काय? जर नाहीं, तर ती करून घेण्याचा तुम्ही सतत प्रयत्न केला पाहिजे. जेथें जेथें मांस, आंतडीं आणि हाडेंतुम्हास पाहावयास सांपडतील, तेथें तेथें तीं नीट रीतीनें पाहून हेच पदार्थ आपल्या देहांत आहेत ह्याचें ध्यान केलें पाहिजे; हे आंतील पदार्थ तुमच्या डोळ्यासमोर उभे राहिले पाहिजेत.

ह्या ध्यानानें शरीराचा वीट येणें संभवनीय आहे. परंतु बुद्धादिक थोर पुरुषांनीं अशा देहाचा किती चांगला उपयोग केला ह्याचें चिंतन केलें असतां तो नष्ट होईल व सत्कार्यांत तुमचें पाऊल पुढें पडेल. ह्यासाठींहि तुम्हाला एकान्त पाहिजे. एकान्ताची गोडी धरणें व त्यांत पूर्णत्व संपादणें यालाच नैष्कर्म्यपारमिता म्हणतात.

४ प्रज्ञापारमिता

एकान्तवासाच्या योगें तुह्मी ज्ञान मिळविण्यास समर्थ झालें पाहिजे. लोकोपयोगी ज्ञान मिळवून तें पूर्णत्वाला नेणें यालाच प्रज्ञापारमिता म्हणतात. तुमच्या वाचनांत येणाऱ्या पुस्तकांत आणि तुमच्या रोजच्या

व्यवसायांत पुष्कळ ज्ञान भरलेलें आहे. पण तें कसें ग्रहण करावें हें जर तुम्हास माहीत नसलें तर त्यापासून फायदा न होतां नुकसान होणार, व तें तुमच्या घाताला कारण होणार. पै पैशाच्या लोभानें जे ज्ञान संपादन करतात, ते एक तर आजन्म कारकुनी किंवा असाच कांहीं पोटाचा धंदा करून असंतुष्टपणें काळ कंठीत असतात; अथवा लबाडीनें आणि चोरीनें पैसा कमावण्यास शिकून आपला सर्वस्वीं घात करून घेतात. अशा लोकांच्या ज्ञानाला प्रज्ञा म्हणत नाहींत, प्रज्ञा म्हणजे लोककल्याणाची तीव्र अपेक्षा धरून मिळविलेलें सात्त्विक ज्ञान. आणि तें मिळविण्यास तुम्हाला लहानपणापासूनच शिकलें पाहिजे.

५ वीर्यपारमिता

वीर्य म्हणजे सत्कर्में करण्याचा उत्साह. त्यांत पारंगत होणें याला वीर्यपारमिता म्हणतात. तुम्ही जर आळशी झालां, तर बोधिसत्व होण्याचें राहूं द्या, पण नुसता पोटापाण्याचा धंदाहि करूं शकणार नाहीं. आळशाला प्रज्ञा कशी मिळणार? आणि त्याचें शील तरी कसें शुद्ध राहील? निजेची आणि गप्पागोष्टींची आवड, व आत्मविश्वासाचा अभाव, या दोन गोष्टीमुळें आळस उत्पन्न होतो. पण लक्ष्यांत ठेवा कीं, हा निजेचा समय नाहीं. तरुणपण जर तुम्हीं निजेंत घालविलें, तर पुढें मोठा पश्चात्ताप करण्याची तुमच्यावर पाळी येईल. गप्पागोष्टी आणि नाटकें तमाशे तुह्माला आवडतात; परंतु त्यांचा परिणाम काय ह्याचा तुम्ही विचार केला नाहीं. ह्या क्षणिक सुखाच्या नादीं लागून तुम्ही मोठ्या सुखाला आंचवत आहां; विद्याभ्यासांत तुमचें पाऊल मागें पडत आहे; व सर्वथैव लोककल्याणाच्या कामीं तुह्मी निरुपयोगी बनत चालला आहां.

आतां तुह्मी ह्मणाल कीं, “आमच्या सारख्या सामान्य माणसाच्या हातून लोककल्याण तें काय होणार? तेव्हां निजेंत, गप्पागोष्टींत किंवानाटकेंतमाशांत मिळणारें अल्पस्वल्प सुख कां सोडा?” अशा रीतीनें स्वतःचा तिरस्कार करणें केव्हांहि योग्य होणार नाहीं. प्राचीन बोधिसत्त्वहि तुमच्या आमच्या पेक्षांहि दुर्बल प्राणी होते. परंतु केवळ आपल्या सदुद्योगानें त्यांनीं बोधि मिळविली. तुह्मी तर सर्वावयवसंपन्न आहां, आणि आपलें हिताहित जाणण्याचें शहाणपण तुमच्या अंगीं आहे. मग असल्या हलक्यासलक्या ख्यालीखुशालींत वेळ न दवडतां आत्मोन्नतीचा उत्साह वाढविणें तुम्हास शक्य नाहीं काय?

६ क्षान्तिपारमिता

उत्साहाबरोबरच क्षमेचा अभ्यास केला नाहीं तर त्याचें त्वरित क्रोधांत परिवर्तन होईल, व त्यायोगें तुम्हास अत्यंत दुःख भोगावें लागेल. कित्येकांना क्रोध आणि उत्साह एकच आहेत असें वाटतें. परंतु तो त्यांचा भ्रम आहे. शूराला कधीं क्रोध येत नसतो, त्याच्या आंगचा उत्साह क्रोधाला तेव्हांच दाबून टाकतो. जो क्रोधाला वश होतो, त्याला शूर म्हणतां यावयाचें नाहीं; कारण शूर अशा दुष्ट मनोविकाराच्या स्वाधीन कसा होईल? म्हणून खरें शौर्य संपादण्यासाठीं तुम्ही क्षान्तीचा अभ्यास केला पाहिजे. जर कोणी मूर्खपणानें आपला अपराध केला तर त्याच्यावर रागवण्यानें त्याहिपेक्षां अधिक मूर्खपणा आपण केला असें होईल. म्हणून अशा प्रसंगीं शान्तपणें त्या माणसाचा दोष आपण दाखवून द्यावा; पण त्यावर कधींहि रागावूं नये, किंवा त्याचा द्वेष करूं नये. राग आपोआप येत असतो; पण क्षमा प्रयत्नानें संपादावी लागते. तिचा तुम्ही लहानपणापासून अभ्यास केला नाहीं तर पुढें तुम्हास सत्कार्यांत यश येणें फार कठीण होईल. म्हणून क्षमा करण्याची संधि तुम्ही फुकट दवडतां कामा नये.

अनुक्रमणिका

७ सत्यपारमिता

क्षांतीला सत्याची जोड दिली नाहीं तर तिचा विपर्यास हांजी हांजींत होईल. मालकापुढें शेंपूट हालवणाऱ्या कुत्र्यांत केवढी क्षमा दिसते बरें! परंतु ती खरी क्षमा नव्हे. तिला लांगूनचालन किंवा हांजी हांजी म्हणतात. तेव्हां क्षमेचा असा विपर्यास होऊं न देण्यासाठीं तुम्हीं सत्यपारमितेचा सतत अभ्यास केला पाहिजे; वाटेल तो प्रसंग येवो सत्पाला सोडून तिळमात्रहि इकडेतिकडे जाणार नाहीं, असा निश्चय केला पाहिजे. माणसानें एक सत्य सोडलें तर इतर शील सांभाळण्यास तो कधींहि समर्थ व्हावयाचा नाहीं; एकान्तवासांत त्यास सुख व्हावयाचें नाहीं; त्याचा उत्साह लोकांना ठकविण्याकामी खर्च होणार, व त्याच्या क्षान्तीचा हांजी हांजी करण्यांत दुरुपयोग होणार तेव्हां उन्नत दशेस जाण्यास सत्याची किती आवश्यकता आहे हें पहा, आणि सत्यानें वागण्यास विसरूं नका.

८ अधिष्ठानपारमिता

अधिष्ठान म्हणजे दृढनिश्चय, आणि त्यांत पारंगतता संपादणें याला अधिष्ठानपारमिता म्हणतात. आपण अमुक वेळीं अमुक काम करण्याचा निश्चय करतों, आणि आळसामुळें किंवा गप्पागोष्टींच्या आवडीमुळें तो मोडतों. आपला बेत वेळोवेळी मोडण्याची सवय अंगवळणी पडली म्हणजे मनुष्य पूर्णपणें अव्यवस्थित होतो, व त्याच्या हातून कोणतेंहि काम पार पाडणें मुष्कील होतें. असा मनुष्य आत्मोन्नति करून जगाचें कल्याण कसें साधूं शकेल? म्हणून लहान सहान कार्यांतहि तुमचे बेत तंतोतंत पाळण्याचा तुम्ही अभ्यास केला पाहिजे. विचारपूर्वक अमुक एक कर्तव्य ठरल्यानंतर त्यांत कितीहि विघ्नें आलीं तरी तें पार पाडण्याचें सामर्थ्य तुम्ही संपादिलें पाहिजे, आणि लहानसहान कार्यांत निश्चयानें वागल्यानें तें तुम्हास सहज संपादतां येण्याजोगें आहे.

९ मैत्रीपारमिता

एखाद्या माणसावर, जातीवर किंवा देशावर प्रेम करणें ह्याला मैत्री न म्हणतां स्नेह म्हणतात. अशा स्नेहानें वैर उद्भवतें. ज्याच्यावर तुम्ही स्नेह करतां त्या माणसासाठी, जातीसाठीं किंवा देशासाठीं वाटेल तें कुकृत्य करण्यास तयार होतां, व त्यायोगें तुमची अवनति होते. स्वदेशप्रेमानें दुसऱ्या देशाला पादाकांत करण्याची हांव धरून युरोपखंडांतील देशांनी आपली कशी दुर्दशा करून घेतली आहे, हें तुम्ही पाहतच आहां. जातीच्या स्नेहानें हिंदुस्थानांतील वरिष्ठ जातीनीं अंत्यजांना खालीं दाबून सर्व देशाला कसें पराधीन करून ठेवलें याचें उदाहरण तुमच्या डोळ्यापुढेंआहेच. व्यक्तिगत स्नेहानें किती खून आणि मारामाऱ्या झाल्या हें इतिहासांत तुम्ही वाचलेंच असेल. तेव्हां प्रेमाचा असा विपर्यास होऊं न देतां तें सार्वत्रिक होईल यासाठीं तुम्ही खबरदारी घेतली पाहिजे. भेदभाव न ठेवतां सर्वांवर सारखें प्रेम करणें ह्यालाच मैत्री म्हणतात.

आमचे हातपाय इत्यादिक अवयव भिन्न आहेत, तरी त्यांची सुखदुःखें एक आहेत. त्याप्रमाणेंच जातिपरत्वें आणि देशपरत्वें मनुष्यजाति भिन्न असली, तरी तिचीं सुखदुःखें एक आहेत. तेव्हां दुसऱ्या जातीला किंवा देशाला खालीं पाडून आपण वर येण्याची जे इच्छा धरतात, ते आपलें आणि परक्याचें दुःख सारखेंच वाढवितात. त्यांच्या अज्ञानामुळें आणि दुरभिमानामुळें जगाच्या दुःखांत पुष्कळ भर पडते.

अनुक्रमणिका

मैत्रीला आरंभ आपल्या आप्तइष्टांपासून होतो. परंतु तिची गति कुंठित करणें मोठें पातक होय. सतत अभ्यासानें सगळ्या जगावर पूर्ण मैत्री करण्याची संवय लावून घेतली पाहिजे. पशुपक्ष्यांदिक प्राणीहि माझेसखे आहेत, ते माझ्यावर प्रेम करतात, व मी त्यांच्यावर करतों, अशी भावना केली पाहिजे. दिवसांतून कांहीं काळ एकान्तांत बसून डोळे मिटून तुम्ही अशी कल्पना करा कीं, हिंदु, शीख, मुसलमान, काळा, गोरा हे सर्व माझे सखे आहेत, हे सर्व माझे बांधव आहेत; त्यांची सुखदुःखें तीं माझीं सुखदुःखें आहेत; त्या सर्वांचें कल्याण होवो! त्यानंतर सर्व जातीचे पशुपक्षी आपले मित्र आहेत अशी कल्पना करा. वाघ तुमच्या मांडीवर निजला आहे असें समजा, व सिंहाला तुम्ही कुरवाळतां अशी कल्पना करा. त्याचप्रमाणें सर्पांसारख्या प्राण्यांवरहि तुम्ही प्रेम करतां व तुमच्यावर ते प्रेम करतात असा विचार करा. याचा परिणाम असा होईल कीं, तुम्ही निर्भय व्हाल, व तुम्हास दुष्ट स्वप्नें पडणार नाहींत.

१० उपेक्षापारमिता

आळशाला किती बोला, त्याची त्याला परवा नसते. कोणाच्या घराला आग लागली किंवा कोणाचें कितीहि नुकसान झालें, तरी त्याची तो परवा बाळगीत नाहीं. अशा स्वभावाला उपेक्षा म्हणत नाहींत; निर्लज्ज्ञता म्हणतात. आपण दुसऱ्याचें कल्याण करण्याचा प्रयत्न केला, आणि त्याकामीं त्यानें आपल्या मूर्खपणास विरोध केला, तर त्याची आपणास उपेक्षा केली पाहिजे. आज नाहीं उद्यां या माणसाला स्वतःचें हित कशांत आहे हें समजेल, अशा विचारानें तुम्ही त्याच्या विरोधाची परवा करतां कामा नये. दारूबाजाला दारूचें व्यसन सोडण्यास तुम्ही उपदेश करूं लागलां, तर तो खात्रीनें तुमचा शत्रू होईल. परंतु अशा प्रसंगीं तुम्ही त्याची उपेक्षा केली पाहिजे, व सौजन्यानें तुमचा प्रयत्न तसाच पुढें चालू ठेवला पाहिजे. मैत्रीनें आणि उत्साहानें लोककल्याणाच्या उद्योगाला तुम्ही लागलां, म्हणजे तुमच्यावर असे अनेक प्रसंग येतील कीं, त्या प्रसंगीं उपेक्षापारमितेचा तुम्हाला फार फार उपयोग होईल, आणि म्हणूनच लहानपणापासून ती संपादण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे.

मुलांनों, ह्या पुस्तकांत संग्रह केलेल्या कथांच्या वाचनानें वरील दहा पारमितांचा अभ्यास करण्याची तुम्हास गोडी लागली, तर माझ्या प्रयत्नाचें सार्थक झालें असें मी समजेन.

* * * *

आजला पांचसहा वर्षें ह्या कथा एका गृहस्थापाशीं तशाच पडून रहिल्या होत्या. त्यांच्या प्रसिद्धीचें सर्व श्रेय श्रीमुनि जिनविजयजी यांस आहे; आणि यासाठीं त्यांचा मी फार आभारी आहे. या भागाचीं प्रुफें पाहण्यांत रा. रंगनाथ दत्तात्रय वाडेकर यांनीं फार मेहनत घेतली; याबद्दल त्यांचाहि मी फार आभारी आहे. छापण्याचें काम त्वरेनें करण्यांत आल्यामुळें, व येथून प्रुफें स्वतः पाहणें शक्य न झाल्यामुळें या पुस्तकांत कांहीं चुका राहून गेल्या. त्यांबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा बाळगतों.

गुजरात पुरातत्त्व मंदिर.
अमदाबाद
संवत्सर प्रतिपदा
ता. ५ एप्रिल १९२४.

धर्मानंद कोसंबी

अनुक्रमणिका

जातककथासंग्रह

भाग १ ला

अनुक्रमणिका

कथेच्या नांवाच्या पुढें दिलेला गोल ( ) कंसांतील आकडा फाऊसबॉलच्या आवृत्तींतील क्रमांकाचा होय.]

अनुक्रमणिका

जातककथासंग्रह

(भाग १, २, ३)

अनुक्रमणिका

जातककथासंग्रह

१. हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागू नये. (१)

([हीच कथा थोड्या भिन्न प्रकारानें दीघनिकायांतील पायासिसुत्तांत सांपडते.] **अपण्णक जातक नं. १**)

प्राचीन काळीं वाराणसीनगरांत ब्रह्मदत्त [दक्षिण हैदराबादच्या राजघराण्यांतील पुरुषांना निजाम म्हणण्याची वहिवाट आहे, त्याप्रमाणें प्राचीन काळीं वाराणसीच्या बहुतेक राजांना ब्रह्मदत्त म्हणत असत असें टीकाकारांचें म्हणणें आहे.] नांवाचा राजा राज्य करीत होता. त्या वेळीं आमचा बोधिसत्त्व एका मोठ्या सावकाराच्या कुळांत जन्माला येऊन वयांत आल्यावर पांचशें गाड्या बरोबर घेऊन परदेशी व्यापाराला जात असे. तो कधीं पूर्वदिशेला जाई, आणि कधीं कधीं पश्चिमदिशेला जाई.

एका वर्षी पावसाळा संपल्यावर आमच्या बोधिसत्त्वानें परदेशीं जाण्याची सर्व सिद्धता केली. त्याच वेळीं दुसरा एक व्यापारी आपल्या पांचशें गाड्या घेऊन त्याच रस्त्यानें जाण्यास तयार झाला होता. त्याला बोधिसत्त्व म्हणाला, “मित्रा, आम्ही दोघे जर एकदम एकाच मार्गानें गेलों, तर आमच्या बैलांना वैरण मिळण्यास अडचण पडेल. आमच्या माणसांनाहि शाकभाजी बरोबर मिळणार नाहीं तेव्हां आमच्यापैकीं एकानें पुढें जावें, व दुसऱ्यानें आठ पंधरा दिवसांनीं मागाहून जावें हें बरें.”

तो दुसरा व्यापारी म्हणाला, “मित्रा, असें जर आहे, तर मीच पुढें जातों. कां कीं माझी सर्व सिद्धता झाली आहे. आतां येथें वाट पहात बसणें मला योग्य वाटत नाहीं.”

बोधिसत्त्वाला ही गोष्ट पसंत पडली. त्या व्यापाऱ्यानें पुढें जावें व बोधिसत्त्वानें पंधरा दिवसांनीं त्याच्या मागाहून जावें असा बेत ठरला. तेव्हां तो व्यापारी आपल्या नोकरांस म्हणाला, “गडे हो, आजच्या आज आम्हीं प्रवासाला निघूं. पुढें जाण्यामुळें आम्हाला पुष्कळ फायदा होणार आहे. आमच्या बैलांना चारापाणी यथेच्छ मिळेल, व आमच्या मालाला दामदुप्पट किंमत येईल.”

पण बोधिसत्त्वाच्या अनुयायांना हा बेत आवडला नाहीं. ते आपल्या मालकाला म्हणाले, “तुम्ही हें भलतेंच काय केलें! आमची सर्व तयारी आगाऊ झाली असतां तुम्ही त्या गृहस्थाला पुढें जाण्यास अनुमति दिली हें काय? आम्हीं जर त्याला न कळवितां मुकट्यानें पुढें गेलों असतों तर आमच्या मालाचा चांगला खप होऊन आपल्या पदरांत पुष्कळ नफा पडला असता.”

बोधिसत्त्व म्हणाला, “तुम्ही म्हणतां अशी गोष्ट घडून आली नसती. मी जर त्याला न कळत पुढें जाण्यासनिघालों असतों, तर त्याला माझा फार राग आला असता, व त्यामुळें आम्हां दोघांमध्यें भयंकर स्पर्धा जुंपली असती. आतां पुढें जाण्यांत विशेष फायदा आहे, असे तुम्हांस वाटतें; परंतु हेंदेखील ठीक नाहीं. पावसाळ्यामुळें नादुरुस्त झालेले रस्ते पुढें जातांना करावे लागतील; नदीपार जाण्यासाठीं उतार शोधून काढावा लागेल; व जंगलांत झरे किंवा विहिरी बुजून गेल्या असतील त्या साफ कराव्या लागतील. जर त्याच्या मालाला चांगली किंमत आली तर एकदां भाव ठरल्यामुळें आम्हालाही त्याच किंमतीनें आमचा माल विकतां येईल. एकंदरीत तो पुढें गेला असतां आम्हाला कोणत्याहि तऱ्हेनें नुकसान नाहीं.”

अनुक्रमणिका

त्या वेळीं जंबुद्वीपामध्यें पांच प्रकाराचीं अरण्यें असत. ज्या अरण्यांत चोरांची वस्ती असे त्याला चोरकांतार असें म्हणत; जेथें हिंस्त्र पशूंची वस्ती असे त्याला व्यालकांतार म्हणत असत; ज्या ठिकाणीं पिण्यालादेखील पाणी मिळत नसे, त्याला निरुदककांतार म्हणत असत; यक्षराक्षसादिकांची जेथें पीडा असे, त्याला अमनुष्यकांतार असें म्हणत; आणि ज्या ठिकाणीं अन्नसामग्री मिळण्याची मारामार पडे त्याला अल्पभक्ष्यकांतार असे म्हणत.

बोधिसत्त्वाच्या मार्गांत जें मोठें जंगल होतें, तेथें पाण्याचा दुष्काळ असल्यामुळें आणि यक्षांची वस्ती असल्यामुळें त्याला निरुदककांतार आणि अमनुष्यकांतार असें म्हणत. बोधिसत्त्वाच्या साथीदारानें आपल्या लोकांसह ह्या जंगलाजवळ आल्यावर पाण्याचीं मोठमोठालीं मडकीं भरून गाड्यावर चढविलीं, आणि तो जंगलांतून पार जाऊं लागला. वारा पुढच्या बाजूचा असल्यामुळें आपणाला धुळीची बाधा होऊं नये या हेतूनें त्या व्यापाऱ्यानें आपली गाडी सर्वांपुढें चालविली होती. एक दोन दिवसांच्या रस्त्यावर गेल्यानंतर उलट दिशेनें एक व्यापारी सफेत बैलाच्या गाडींत बसून आपल्या नोकरांसह येत असलेला त्याच्या पाहण्यांत आला. त्या व्यापाऱ्यानें आणि त्याच्या नोकरांनी स्नान करून गळ्यांत कमलांच्या माळा घातल्या होत्या. त्याला पाहून वाराणसीहून निघालेल्या व्यापारानें आपल्या गाड्या उभ्या करविल्या व आपण खालीं उतरून त्याजजवळ गेला. प्रतिपथानें येणाऱ्या त्या गृहस्थानेंहि आपली गाडी उभी केली व तो खालीं उतरून वाराणसीच्या सार्थवाहाला म्हणाला, “आपण कोठून आलांत व कोणीकडे चाललांत?”

सार्थवाह म्हणाला, “मी वाराणसीहून निघून ह्या जंगलाच्या पलीकडील प्रदेशांत व्यापारासाठीं जात आहे.”

गृहस्थ म्हणाला, “ठीक आहे; पण आपल्या ह्या मागून येणाऱ्या गाड्यांवर मोठमोठालीं मडकीं दिसताहेत तीं कोणत्या पदार्थानें भरलीं आहेत?”

सार्थवाह म्हणाला, “हें जंगल निरुदककांतार आहे असें आमच्या ऐकण्यांत आल्यामुळें आम्हीं हीं मडकीं पाण्यानें भरून बरोबर घेतलीं आहेत.”

तो गृहस्थ मोठ्यानें हंसून म्हणाला, “वः! हें कांहीं तरी भलतेंच तुमच्या ऐकण्यांत आलें. पलीकडे ती हिरवी गार झाडी दिसते की नाहीं, तेथें तुडुंब भरलेला एक मोठा तलाव आहे. त्या भागांत बारमाही पाऊस पडत असल्यामुळें पाण्याची टंचाई अशी कधींच पडत नाहीं. नुकताच तेथें पाऊस पडल्यामुळें आमच्या गाड्यांचीं चाकें चिखलानें भरून गेलीं आहेत तीं पहा. आमचे बैल भिजून गेले आहेत आणि पावसाच्या झडीनें भिजलेलीं आमचीं वस्त्रें अद्यापि वाळून गेलीं नाहींत. आपण हीं पाण्याचीं भांडीगाड्यावर लादून बैलांना विनाकारण त्रास देत आहां! बरें, आतां उशीर झाला. सहजासहजीं गांठ पडल्यामुळें आपला परिचय घडला. पुढें कधीं गांठ पडली तर ओळखदेख असूं द्या म्हणजे झालें.”

सार्थवाह म्हणाला, हें काय विचारतां. आपण ह्या बाजूनें आलांत म्हणून आमचा फार फायदा झाला. दंतकथांवर विश्वास ठेवून आम्ही आमच्या गाड्यांवर हें पाण्याचें ओझें लादून नेत होतों. पण आतां त्याची जरूर राहिली नाहीं. नमस्कार, अशीच मेहेरबानी राहूं द्या.”

अनुक्रमणिका

तो गृहस्थ आपल्या नोकरांसह तेथून निघून गेल्यावर सार्थवाहानें मडक्यांतील पाणी फेंकून देण्यास लाविलें, व तीं मडकीं तेथेंच टाकविलीं. आतां बैलांचें ओझें हलकें झाल्यामुळें गाड्या त्वरेनें चालल्या होत्या. परंतु सारा दिवस मार्ग आक्रमण केल्यावरदेखील पाण्याचा पत्ता लागेना! तेव्हां यक्षांनीं आपणाला आणि आपल्या लोकांना फसविण्यासाठीं अशी युक्ती लढविली असली पाहिजे, ही गोष्ट त्या सार्थवाहाच्या लक्ष्यांत आली. पण "चौरे [चोर पळून गेल्यावर सावध सावध म्हणून ओरडण्यांत काय फायदा! किंवा दिवा विझल्यावर तेल घालून काय उपयोग!!] गते वा किमु सावधानं निर्वाणदीपे किमु तैलदानम्" ह्या म्हणीप्रमाणें संग्रहीं असलेलें पाणी कधींच जमिनींत मुरून गेलें होतें!

त्या सार्थवाहाच्या तांड्यांतील सर्व लोक हताश होऊन गेले, आणि बैलांना मोकळे सोडून गाड्या वर्तुळाकार रचून आपापल्या गाडीखालीं शोकमग्न होऊन बसले. तेव्हां त्यांच्या अंगीं त्राण राहिलें नाहीं अशी त्या धूर्त यक्षाची पक्की खात्री झाली, तेव्हां त्या तांड्यावर तो तुटून पडला; व आपल्या अनुयायांना म्हणाला, "गडे हो, माझी युक्ति सिद्धीला जाणार नाहीं असें तुम्हाला वाटलें होतें परंतु तो सार्थवाह हातचें सोडून पळत्याच्या पाठीं लागणारा असल्यामुळें माझा पाय त्यावर बिनचूक पडला. आज तुम्ही यथेच्छ भोजन करा. अशी पर्वणी पुन्हां येईल कीं नाहीं याची मला शंकाच आहे."

गाड्यांतील सामानसुमान आणि गाड्या तेथेंच टाकून देऊन यक्षांनी सर्व बैलांना आणि माणसांना खाऊन टाकिलें, आणि मोठ्या हर्षानें नाचत उडत ते आपल्या निवासस्थानाला गेले.

त्या मूर्ख सार्थवाहाला वाराणसीहून निघून पंधरवडा झाल्यावर आमचा बोधिसत्त्व आपल्या नोकरांसह वाराणसीहून निघून अनुक्रमें प्रवास करीत करीत त्या जंगलाजवळ आला. तेथें आपल्या सगळ्या लोकांना एकत्र जमवून तो म्हणाला, "गडे हो हें निरुदककांतार असून अमनुष्यकांतारहि आहे. तेव्हां तेथें आम्ही मोठ्या सावधपणानें वागलें पाहिजे. जर वाटेंत तुम्हाला कोणी भलतेंच फळ, मूळ, दाखवील तर तें तुम्हीं खातां कामा नये; अपरिचित शाकभाजीचा तुम्ही आपल्या अन्नात उपयोग करितां कामा नये; किंवा अन्य कोणतीहि विशेष गोष्ट घडून आली, तर ती ताबडतोब मला सांगितल्यावांचून राहतां कामा नये."

बोधिसत्त्वाच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें त्या सर्वांनीं कबूल केलें. बोधिसत्त्व अत्यंत व्यवहारनिपुण असल्यामुळें आपल्या हिताहिताचें ज्ञान त्याला विशेष आहे, असें जाणून त्यांनीं आपला भरिभार त्यावर सोंपविला.

त्या मूर्ख सार्थवाहाला आणि त्याच्या अनुयायांना दुर्बळ करून मारून खाल्ल्यापासून यक्षांना मनुष्यमांसाची विशेष गोडी लागली होती. पूर्वीप्रमाणें त्यांनीं आपलें स्वरूप पालटून ते बोधिसत्त्वाच्या लोकांपुढें आले; आणि जवळ पाण्याचा तलाव आहे इत्यादि वर्तमान त्यांनी सांगितलें. बोधिसत्त्व सर्वांच्या मागल्या गाडीवर बसून चालला होता. पुढें चाललेले त्याचे नोकर धांवतधांवत येऊन त्याला म्हणाले, "धनीसाहेब, आतांच हा एक व्यापारी दुसऱ्या बाजूनें आपल्या नोकरचाकरांसह येत आहे. त्या सर्व लोकांच्या गळ्यांत कमलांच्या माळा आहेत. आणि त्यांच्या गाड्यांचीं चाकें चिखलानें भरलेलीं आहेत. ते सांगतात कीं, पलीकडे जें हिरवेंगार अरण्य दिसतें तेथें एक तलाव आहे व त्या भागांत बारमाही पाऊस पडत असतो, तेव्हां आम्हीं हीं पाण्याचीं भांडीं वाहून नेण्यापेक्षां येथेंच टाकून दिल्यास आमच्या बैलांचें ओझें कमी होईल, व त्या तलावाजवळ आम्हीं लवकरच पोहचूं."

अनुक्रमणिका

बोधिसत्त्व म्हणाला, “गडे हो, तुम्ही माझ्या हुकुमाबाहेर चालूं नका. पाण्याचा थेंब देखील फुकट खर्च होऊं देऊं नका. आतां जवळ पाऊस पडत आहे असें तुम्ही म्हणतां; पण पावसाची हवा एकाच्या तरीअंगाला लागली आहे काय? किंवा आकाशामध्यें एक तरी ढग दिसत आहे काय?”

ते म्हणाले, “आम्हाला ढग दिसत नाहीं; विजेचा कडकडाट ऐकूं येत नाहीं; किंवा आम्हाला थंड हवाहि लागत नाहीं. परंतु ज्या अर्थीं तो सभ्य गृहस्थ आणि त्याचे इतके नोकरचाकर मोठा तलाव असल्याचें सांगत आहेत, एवढेंच नव्हे, तर त्यांपैकी पुष्कळांच्या गळ्यांत कमलांच्या माळा आहेत, त्या अर्थीं त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं.”

बोधिसत्त्व म्हणाला, “पण विश्वास ठेवण्याची एवढी घाई कां करा? आणखी एका योजनाच्या अंतरावर तलाव आहे असें जर तो गृहस्थ सांगत आहे, तर आपण तेथें जाऊन हें पाणी फेंकून देऊं, व पुढें जरूर वाटल्यास त्या तलावाचें पाणी भांड्यांत भरून घेऊं. आजचा दिवस बैलांना थोडा त्रास पडला तरी हरकत नाहीं.”

बोधिसत्त्वाच्या हुकुमाप्रमाणें त्याच्या लोकांनीं पाणी बाहेर टाकिलें नाहीं. त्या सभ्यपुरुषवेषधारी यक्षानें पुष्कळ आग्रह केला; परंतु त्या लोकांची बोधिसत्त्वावरील श्रद्धा ढळली नाहीं. तेथून दुसऱ्या मुक्कामावर गेल्यावर सामानानें लादलेल्या पांचशें गाड्या आणि इतस्ततः पडलेल्या बैलांचे व माणसांचे अस्थिपंजर त्यांना आढळले. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “गडे हो, पहा! हा आमचा मूर्ख सार्थवाह आपल्या लोकांसह नाश पावला! आपल्या जवळील पाणी नवीन पाणी सांपडल्यावांचून यानें जर फेकून दिलें नसतें तर हा आपल्या लोकांसह यक्षांच्या भक्ष्यस्थानीं पडला नसता. हातचें सोडून पळत्याच्या पाठीं लागणाऱ्यांची ही अशीच गत होत असते!”

त्या गाड्यांवरील बहुमोल सामानसुमान आपल्या गाड्यांवर घालून आणि आपल्या गाड्यांवरील अल्पमोल वस्तु तेथेंच टाकून देऊन बोधिसत्व आपल्या लोकांसह सुखरूपपणें त्या कांताराच्या पार गेला, व तेथें मोठा फायदा मिळवून पुनः सुरक्षितपणें वाराणसीला आला.

[मूळ पाली गाथा अशी आहे–
अपण्णकं ठानमेके दुतियं आहु तक्किका।
एतदञ्ञाय मेधावी तं गण्हे यदपण्णकं ॥]
प्रत्यक्ष आर्य वदती स्थान दुजें तार्किकास आवडतें ॥
जाणोनि तत्त्व सूज्ञें सोडुं नये कुशलकर्म जें घडतें ॥१॥

——***——

अनुक्रमणिका

२. प्रयत्नाचें फळ (२)

(वण्णुपथ जातक नं. २)

आमचा बोधिसत्व काशीराष्ट्रामध्यें सार्थवाह कुळांत जन्माला येऊन वयांत आल्यावर आपल्या पित्याचा धंदा करीत असे. एकदां तो व्यापारासाठीं मरुमंडळांतून जात असतां वाटेंत एका साठ योजनें लांबीच्या वाळूच्या मैदानाजवळ आला. ह्या मैदानांतील वाळू इतकी सूक्ष्म होती कीं ती मुठींत देखील रहात नसे. सकाळीं पहिल्या प्रहरानंतर ह्या मैदानांतून प्रवास करण्याची सोय नव्हती. सूर्यकिरणांनीं वाळू संतप्त होऊन जात असल्यामुळें तिच्यावरून माणसाला अगर जनावराला चालत जाणें शक्यच नव्हतें.

बोधिसत्त्वानें ह्या मैदानाजवळ आल्यावर एक वाटाड्या घेतला. हा एक वाळूचा मोठा समुद्रच असल्यामुळें वाटाट्यावाचून तरून जातां आला नसता. तो वाटाड्या पुढच्या गाडींत एका चौरंगावर बसून आकाशांतील ताऱ्यांच्या अनुरोधानें त्या लोकांना रस्ता दाखवीत असे. सर्व रात्र प्रवास करून सूर्योदयाचे वेळीं सर्व गाड्या एका ठिकाणीं वर्तुळाकार ठेवीत असत, व त्यावर तात्पुरता मंडप करून त्या खालीं सगळीं माणसें आणि जनावरे सारा दिवस विश्रांति घेत असत.

याप्रमाणें आमचा बोधिसत्त्व व त्याबरोबर असलेले लोक त्या वालुकाकांतारांतून जात असतां दुसऱ्या टोंकाला आले. आतां जवळचींगांवें एका मुक्कामाच्या पल्ल्यावर राहिलीं होतीं. तेव्हां तो वाटाड्या म्हणाला, “आम्हीं वाळूच्या मैदानांतून गांवाच्या नजीक येऊन पोहोंचलों. आज रात्रीं ह्या मुक्कामाहून निघालों म्हणजे उद्यां सकाळीं आम्हीं एका संपन्न गांवाला जाऊन पोहचूं. आतां पाणी आणि लांकडें बरोबर घेण्याचें कांहीं कारण राहिलें नाही.”

त्या वाटाड्याच्या सांगण्याप्रमाणें बोधिसत्त्वाच्या लोकांनीं सर्पण आणि पाणी तेथेंच टाकून देऊन ते पुढल्या प्रवासाला निघाले.

एक दोन आठवडे वाटाड्याला रात्रीं मुळींच झोंप न मिळाल्यामुळें तो अगदीं थकून गेला होता. मध्यरात्रींच्या सुमारास बसल्या ठिकाणींच त्याला नीज आली, आणि त्याची गाडी भलत्याच मार्गानें वळली हें त्याला समजलें देखील नाहीं. अवशेष रात्र बैल चालत जाऊन पुनः मागल्या मुक्कामावर आले. वाटाड्याच्या गाडीच्या मागोमाग इतर गाड्या चालत असल्यामुळें त्या सर्व तेथें येऊन पोहोंचल्या. अरुणोदयाचे सुमारास वाटाड्या जागा होऊन पाहतो तों त्याला आपण पूर्वीच्याच ठिकाणीं येऊन पोंचल्याचें समजून आलें, आणि तो मोठ्यानें ओरडला. “गाड्या मागें फिरवा. मागें फिरवा.”

त्या मंडळींत फारच गडबड उडून गेली. आपण कोठें पोंचलों, हें कोणास समजेना. वाटाड्याच्या सांगण्याप्रमाणें गाड्या माघाऱ्या वळवण्यांत आल्या. परंतु इतक्यांत सूर्योदय झाला. गाड्या वर्तुळाकार करून त्यावर मंडप घालून ते लोक आपापल्या गाडीच्या खालीं शोकाकुल होऊन पडले! जो तो म्हणाला, “काय हो आम्ही पाणी फेंकून दिलें आणि आतां पाण्यावांचून तळमळून मरण्याची आमच्यावर पाळी आली आहे.”

अनुक्रमणिका

पण बोधिसत्त्वाचा धीर मात्र खचला नाहीं. सकाळच्याच प्रहरीं त्यानें आसपासची जमीन तपासून पाहिली. जवळच्या एका लहानशा झुडपाखालीं त्याच्या पहाण्यांत दूर्वा आल्या. तेव्हां त्यानें असें अनुमान केलें कीं, खालीं असलेल्या पाण्याच्या झऱ्याच्या ओलाव्यानें त्या जिवंत राहिल्या असाव्या. तो आपल्या लोकांजवळ येऊन त्यांना म्हणाला, "गडे हो, आतां निजण्यांत अर्थ नाहीं. आपण जर हताश होऊन पडलों, तर आपणाला मरणोत्तरदेखील सद्गति मिळावयाची नाहीं. मृत्यु यावयाचाच असलातर तो प्रयत्नांतीं येऊं द्या. हताश होऊन मरणें हें शूराला शोभण्यासारखें कृत्य नाहीं. चला! आमच्याजवळ जेवढ्या कुदळी, खोरीं आणि पाट्या असतील तेवढ्या घेऊन आपण त्या पलीकडच्या झुडुपाजवळ खणून पाहूं. तेथें पाणी लागण्याचा संभव आहे."

त्या मनुष्यांनीं त्या झुडुपाजवळ एक मंडप उभारला व त्याखालीं खोदण्यास आरंभ केला. पुष्कळ खोल खड्डा खणण्यांत आला; तथापि पाण्याचा पत्ता लागेना; इतक्यांत एकाची कुदळ जाऊन दगडावर आदळली! तेव्हां त्या साऱ्यांची पूर्ण निराशा झाली! परंतु बोधिसत्त्व मात्र डगमगला नाहीं. तो त्या खड्ड्यांत खालीं उतरला आणि त्या खडकाला त्यानें कान लावून पाहिला. तो खडक इतका पातळ होता कीं, त्याच्या खालून वाहणाऱ्या झऱ्याचा आवाज स्पष्टपणें ऐकूं येत होता. बोधिसत्त्व आपल्या स्वतःच्या नोकरास हांक मारून म्हणाला, "गड्या पहार घेऊन इकडे ये, आणि या दगडावर चार धक्के मार पाहूं कसे. आतां हातपाय गाळून बसण्याची वेळ नव्हे. ऊठ चल लवकर!"

नोकरानें भली मोठी पहार घेऊन त्या दगडावर जोरानें चार पांच प्रहार केले. तेव्हां तो दगड दुभंग होऊन खालच्या झऱ्यांत पडला. झऱ्याचा प्रवाह अडवला गेल्यामुळें पाण्याची धारा एकदम वर उडाली! सगळ्या लोकांनीं स्नान केलें व खाऊनपिऊन ते संतृप्त झाले. बोधिसत्त्वाच्या धीराची जो तो प्रशंसा करूं लागला. पाणी आहे असें दर्शविण्यासाठीं त्या ठिकाणीं एक ध्वज उभारून ते लोक बोधिसत्त्वाबरोबर त्या कांतारांतून सुरक्षितपणें पार पडले.

[मूळ गाथा–
अकिलासुनो वण्णुपथे खणन्ता उदंगणे तत्थ पयं अविन्दुं।
एवं मुनी विरियबलूपपन्नो अकिलासु विन्दे हदयस्स सन्तिं ॥]

वाळूच्या कांतारीं यत्न करुनि लाभलें तयां पाणी ॥
साधु स्वयत्नें मिळवी शांतीची मानसीं तशी खाणी ॥१॥

––∗∗∗––

अनुक्रमणिका

३. लोभाचा परिणाम (३)

(सेरिववाणिज जातक नं. ३)

तैलवाह नदीच्या कांठी आंध्रपूर नांवाचें नगर होतें. तेथें एक प्रख्यात श्रेष्ठी रहात असे. कालांतरानें ह्या श्रेष्ठीच्या घरावर अवदशेची फेरी आली. धनदौलत नष्ट झाली; आणि घरांतील सर्व पुरुषमंडळी मरून गेली, एक भोळसर बाई आणि तिची नात एवढींच काय ती दोन मनुष्यें ह्या श्रेष्ठीचें कुळांत शिल्लक राहिलीं होतीं. आपल्या वाड्याच्या मोडक्यातोडक्या भागांत राहून त्या दोघी बाया मोलमजूरीवर आपला निर्वाह करीत असत.

त्या काळीं आमचा बोधिसत्त्व एका वाण्याच्या कुळांत जन्मला होता. वयांत आल्यावर तो दुसऱ्या एका सेरिवा नांवाच्या फेरीवाल्यावाण्याबरोबर फेरीवाल्याचा धंदा करून आपला निर्वाह करीत असे. एकदां फिरतफिरत तें दोघे आंध्रपुराला आले. तेथें आपसामध्यें स्पर्धा होऊं नये म्हणून त्यांनीं त्या शहरांतील गल्ल्या वांटून घेतल्या. ज्याच्या वांट्याला जे रस्ते आले असतील ते त्यानें फिरून संपविल्यावांचून दुसऱ्यानें त्या रस्त्यांत आपला माल विकण्यासाठीं फिरूं नये, असा त्यांनीं निर्बंध केला. बोधिसत्त्वानें आपल्या वांट्याला आलेल्या रस्त्यांतून फेरी करून पांचशें [कार्षापण हें एकप्रकारचें नाणें असे. सुवर्ण कार्षापण, रौप्य कार्षापण व ताम्र कार्षापण असे त्याचे भेद असत. त्याच्या किंमती खात्रीनें सांगता येत नाहींत. तथापि अनुक्रमें ५ रुपये, १ रुपया व अर्धा आणा अशा असाव्या असा अंदाज करितां येतो. येथें बोधिसत्त्वानें ५०० ताम्र कार्षापणाची विक्री केली असावी; व ह्या गोष्टींत पुढेंहि ताम्र कार्षापणच अभिमत असावा.]कार्षापणांची विक्री केली.

सेरिवा आपल्या हिश्श्याला आलेल्या रस्त्यांतून फेरी करीत असतां वर सांगितलेल्या श्रेष्ठीच्या मोडक्या वाड्यावरून "मणी घ्या, मणी घ्या, नानातऱ्हेचे जिन्नस घ्या," असें मोठ्यानें ओरडत चालला होता. तें ऐकून त्या घरांत राहणारी मुलगी धावत जाऊन आपल्या आजीला म्हणाली, "आजीबाई आजीबाई, हा व्यापारी आमच्या घरावरून चाललाआहे. त्याजकडून कांचेचे मणी किंवा दुसरा एकादा जिन्नस मजसाठीं विकत घे."

आजीबाई म्हणाली, "ली, आम्हाला मिळणाऱ्या मोलमजूरीनें आमचा निर्वाहदेखील नीटपणें होत नाहीं. मग आम्हाला मणी वगैरे जिन्नस घेणें शक्य आहे काय?"

मोडक्यातोडक्या सामानामध्यें एक भलें मोठें ताट पडलें होतें. तें त्या मुलीनें आपल्या आजीजवळ आणून ती म्हणाली, "आजीबाई ह्या ताटाचा आम्हाला मुळींच उपयोग होत नाहीं. मीं आज किती दिवस पाहातें, हें ताट त्या मोडक्या सामानांत पडून राहिलें आहे. हें देऊन तो व्यापारी कांहीं जिन्नस देत असला तर आपण घेऊं."

आजीबाईनें सेरिवा वाण्याला बोलावून आणून एका आसनावर बसावयास सांगितलें, आणि ती त्याला म्हणाली "आर्य, आमच्या घरांत हें जुनें ताट पडून राहिलें आहे. याचा आम्हाला सध्यां कांहीं एक उपयोग होत नाहीं. जर ह्याच्या मोबदला माझ्या मुलीसाठीं एकादि मण्याची माळ द्याल, तर मी हें ताट तुम्हास देईन."

अनुक्रमणिका

सेरिवा वाण्यानें तें ताट हातांत घेतलें. त्याच्या वजनावरूनच तें सोन्याचें असावें अशी त्याला शंका आली? आणि कसोटीला लावून पाहिल्यावर त्याची खात्री झाली. पण त्या बाईला कांही एक समजूं न देतां तो म्हणाला. "हें भिकार ताट येथें कशाला आणिलें! ह्याची किंमत एक पै देखील होणार नाहीं. ह्याच्या मोबदला मण्याची माळ मला कशी देतां येईल? तुम्हा बायकांना अक्कल कशी ती मुळींच नसते. उगाच मला त्रास दिलात."

असे उद्गार काढून आणि तें ताट तेथेंच जमिनीवर फेंकून देऊन सेरिवा त्या वाड्यांतून चालता झाला. वाटेंत तो आपणाशींच म्हणाला "त्या ताटाची खरी किंमत म्हटली म्हणजे एक लाख कार्षापण असली पाहिजे आणि माझ्या सगळ्या मालाची किंमत फार झाली तर तीन चार हजार कार्षापण असूं शकेल. तेव्हां माझा सर्व माल देऊन तें ताट मला मिळालें असतें तरीदेखील माझा पुष्कळच फायदा झाला असता परंतु ज्या अर्थी त्या बाईला त्या ताटाची किंमत माहीत नाहीं, त्या अर्थी मण्याचीएक माळ तरी कां खर्च करा! संध्याकाळच्या वेळीं पुनः येऊन अर्धा कार्षापण किंमतीचे कांही मोडके तोडके कांचेचे मणी देऊन मला तें ताट सहज उपटतां येण्यासारखें आहे. आमच्या व्यापारी लोकांचें हेंच तत्व आहे कीं, जेथें अर्ध्या कार्षापणानें काम होत असेल, तेथें पाउण कार्षापण देखील खर्च करूं नये."

अशा विचारतरंगांत गर्क होऊन सेरिवा त्या गल्लींतून बाहेर पडला. बोधिसत्त्वाच्या हिश्श्याला आलेले सर्व रस्त्यांतून फेरी करून झाल्यावर; तो सेरिवा ज्या गल्ल्यांतून फेरी करून निघाला त्या गल्ल्यांत शिरला. अनुक्रमें तो त्या बाईंच्या वाड्याजवळ आला. तेव्हां तिची नात तिला म्हणाली, "आजीबाई, हा दुसरा एक वाणी ह्या रस्त्यानें जात आहे. त्याला तें ताट देऊन तो कांहीं देत असल्यास पाहूं."

आजीबाई म्हणाली, "मुली, त्या पहिल्या वाण्यानें आमची निर्भर्त्सना केली तेवढी पुरे नाहीं का झाली? आतां पुनः ह्याच्याकडून फजीती करून घ्यावयाची तुझी इच्छा आहे काय?"

मुलगी म्हणाली, "आजीबाई, मुखचर्येवरून हा वाणी पूर्वीच्या वाण्यासारखा कर्कश दिसत नाहीं. आमच्या ताटाची किंमत कवडीची नसली, तरी तो आमच्याशीं सभ्यपणानें वागेल असें मला वाटतें."

आजीनें नातीच्या आग्रहास्तव बोधिसत्वाला हांक मारिली आणि ओसरीवर मांडलेल्या एका आसनावर बसावयास सांगितलें. तो खालीं बसल्यावर ती त्याला म्हणाली, "ह्या जुन्या ताटाची कांहीं तरी किंमत असावी असें मला वाटतें, कांकीं, आमच्या घरीं ज्या काळीं लक्ष्मी पाणी भरीत होती, त्या काळचें हें ताट आहे. पण तुमच्या पूर्वी येथें येऊन गेलेला व्यापारी गृहस्थ याची कांहींच किंमत नाहीं असें म्हणतो. तुम्हीं हें एकवार नीट तपासून पहा, आणि जर याची कांहीं किंमत होत असेल, तर ह्याच्या मोबदला माझ्या मुलीसाठीं एकादा मण्याचा अलंकार द्या."

बोधिसत्वानें तें ताट कसोटीला लावून पाहिलें, आणि तो त्या बाईला म्हणाला, "बाई, ह्या ताटाची किंमत एक लाख कार्षापण आहे, माझ्याजवळ अवघे पांचशें कार्षापण आहेत, आणि माझ्या मालाची किंमत फारझाली तर तीन साडेतीन हजार कार्षापण भरेल. तेव्हां ह्या ताटाच्या मोबदला देण्याजोगें मजपाशीं कांहीं नाहीं."

अनुक्रमणिका

बोधिसत्वाचें सचोटीचें वर्तन पाहून त्या कुलीन स्त्रीला फार संतोष झाला. ती म्हणाली, “व्यापारी लोकांत तुझ्यासारखा प्रामाणिक माणूस विरळा. आम्हीं जर हें ताट बाजारांत विकावयास नेलें तर आमच्या ह्या दारिद्र्यावस्थेंत आमच्यावर चोरीचा आळ येण्याचा संभव आहे. तेव्हां तुला जें कांहीं देणें शक्य असेल तेवढें देऊन हें ताट घेऊन जा. तुझ्या प्रामाणिकपणाच्या वर्तनाबद्दल हें तुला बक्षीस आहे असें आम्हीं समजू.”

बोधिसत्व म्हणाला, “माझ्याजवळ असलेला सर्व माल आणि रोकड रक्कम ह्या ताटाच्या मोबदला मी तुम्हाला देतों, मात्र मला ह्या रकमेपैकीं आठ कार्षापण आणि मालापैकीं माझी तराजू मला द्या.”

त्या बाईला हा सौदा पसंत पडला. बोधिसत्व तें ताट, आपली तराजू आणि आठ कार्षापण घेऊन नदीच्या कांठीं आला, व ते कार्षापण देऊन त्यानें नावाड्याला विलंब न लावतां आपणाला परतीरीं पोंचविण्यास सांगितलें.

इकडे सेरिवा सर्व शहर हिंडल्यावर पुन्हां त्या कुलीन स्त्रीच्या घरीं गेला व तिला म्हणाला, “बाई, तें ताट आण पाहूं. त्या ताटाची जरी कांहींच किंमत नाहीं, तथापि तुझ्यासारख्या थोर घराण्यांतील बाईला वाईट वाटूं देणें मला योग्य वाटलें नाहीं, म्हणून पुनः येथवर येण्याची मीं तसदी घेतली.”

बाई म्हणाली, “वा! वा! तू मोठा धूर्त दिसतोस! जणूं काय आमच्यावर उपकार करण्यासाठींच येथें आला आहेस! पण हें पहा! त्या आमच्या ताटाची किंमत एक लाख होती, आणि त्याच्या मोबदला पांच—आठ कार्षापण किंमतीची एकादी मण्याची माळ देखील देणें तुला कठीण पडलें! म्हणजे जवळ जवळ आमचें ताट तूं फुकटच घेऊं पहात होतास!! परंतु तुझ्या धन्याच्या योग्यतेचा दुसरा एक सज्जन वाणी येथें आला, आणि त्यानें त्या ताटाची खरी किंमत आम्हास सांगितली; व आपणाजवळ होता नव्हता तो सर्व माल आणि पैसा आम्हास देऊन तो तें ताट घेऊन गेला. तूं जर त्या वेळीं आम्हास एकादी मण्याची माळ दिली असतीस, तर त ताट तुलाच मिळालें असतें! पण अति शहाण्याचा बैल रिकामा!”

हें त्या बाईचें भाषण ऐकतांच सेरिवा पिसाळलेल्या कुतऱ्यासारखा उन्मत्त झाला. त्यानें आपला माल व पैसे त्या बाईच्या दरवाज्यांत इतस्ततः फेंकून दिले, व एक भलें मोठें दांडकें घेऊन तो नदीवर धांवला. बोधिसत्व नदीच्या मध्यभागीं पोचला होता त्याला पाहून सेरिवा अत्यंत संतप्त झाला, व ‘नाव परत आणा, नाव मागें आणा’ असें मोठमोठ्यानें ओरडूं लागला. कोणी कांही सांगितलें तरी नाव न फिरवतां आपणाला त्वरेनें परतीरीं पोचविलें पाहिजे, असा बोधिसत्वानें अगाऊच करार केला होता तेव्हां नावाड्यांनीं सेरिवा वाण्याच्या ओरडण्याकडे लक्ष्य न देतां वेगानें नाव पुढें चालविली. सेरिवा ओरडून ओरडून थकला व घरीं येऊन तेथेंच पडला!

[१ मूळ गाथा—
इध चे चे हिनं निराधेसि सद्धम्मस्स नियामतं।
चिरं त्वं अनुतपेस्ससि सेरिवायंऽव वाणिजो ॥]

अतिलोभें धर्मनया मोहुनियां कष्ट फार भोगाल ॥
तो सेरिवा बुडाला, तेविं तुम्हीं शोक सागरीं व्हाल ॥१॥

——✻✻✻——

अनुक्रमणिका

४. अन्यायी अधिकारी. (५)

(तंडुलनालि जातक नं. ५)

वाराणसीमध्यें दुसरा एक ब्रह्मदत्त नांवाचा राजा राज्य करीत होता. त्या वेळीं आमचा बोधिसत्त्व लहान अधिकारावरून बढती, होत होत परदेशांतून येणाऱ्या मालाची किंमत ठरविणारा मुख्य अधिकारी झाला. बोधिसत्त्व मालाची यथायोग्य किंमत ठरवीत असे. पण ब्रह्मदत्ताला तें न आवडल्यामुळें तो बोधिसत्त्वाला एकांत स्थळीं बोलावून आणून म्हणाला 'मित्रा, तुला लहान अधिकारापासून मी ह्या मोठ्या अधिकारावर चढविलें आहे, तें कां हें तुला माहीत आहे काय?"

बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, माझ्या प्रामाणिकपणाचें हें फळ आहे असें मी समजतों. आजपर्यंत ज्या ज्या लोकांशीं माझा संबंध आला त्यांना त्यांना कोणत्याही रीतीनें मजपासून ताप झाला नाहीं; एवढेंच नव्हे, सर्वत्र मी आपल्या प्रजेची यथाशक्ति सेवा केली आहे. माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध देखील दुर्बळांचा मी कैवार घेतला आहे. या माझ्या कामगिरीनें प्रसन्न होऊन श्रीमंतांनीं या अधिकारावर मला आणिलें अशी माझी समजूत आहे."

ब्रह्मदत्त म्हणाला, "तूं माझ्या प्रजेची सेवा केलीस हें ठीक आहे पण तुझा पगार माझ्या तिजोरींतून मिळत असल्यामुळें तूं माझ्या सेवेंत अंतर पडूं देतां कामा नये. कधीं कधीं प्रजेचा आणि राजाचा अर्थ एकच असतो असें नाहीं; आणि राजसेवकांनीं प्रथमतः आपल्या धन्याचा अर्थ साधून सवड झाल्यास इतरांचा साधावा हें योग्य आहे. आज मी तुला या ठिकाणीं बोलावून आणिलें त्याचें कारण हें कीं परदेशांहून येणाऱ्या मालाला खरीखुरी किंमत देऊन तूं जर माल खरेदी करूं लागलास तर माझी तिजोरी थोडक्याच मुदतींत रिकामी पडेल."

बोधिसत्त्व म्हणाला, "पण ह्या बाबतींत मला दुसरें कांही करितां येण्यासारखें आहे असें वाटत नाहीं. सत्य सर्वांत श्रेष्ठ आहे हें सुभाषित आपणाला माहीत आहेच. तेव्हां सत्याचा भंग होऊं न देणें हें मनुष्याचें पहिलें कर्तव्य होय. पण समजा, परदेशांतून आलेल्या मालाची मी भलतीसलती किंमत ठरविली, तर देशोदेशीं आपल्या राज्यपद्धतीची अपकीर्ति होईल, आणि कोणताहि चांगला व्यापारी आपला माल घेऊन ह्या शहरांत येण्यास धजणार नाहीं. प्रामाणिकपणानें परमार्थच साधतो असें नाहीं, परंतु प्रपंचांत देखील प्रामाणिकपणासारखा दुसरा सुखावह मार्ग नाहीं." परंतु त्या लोभी राजाला बोधिसत्त्वाचा प्रामाणिकपणाचा मार्ग आवडला नाहीं. त्यानें त्याला त्या अधिकारावरून दूर केलें, आणि त्याच्या ऐवजीं आपल्या भोंवतीं जमलेल्या तोंडपुजे लोकांपैकी एकाला त्या अधिकारावर नेमविलें. तो गृहस्थ राजाला आवडेल अशा रीतीनें परदेशांतून येणाऱ्या मालाची किंमत ठरवीत असे. तो राजाच्या मर्जीतील असल्याकारणानें त्याविरुद्ध कोणी तक्रार केली नाहीं.

कांहीं काळ गेल्यावर उत्तरेकडील देशांतून एक घोड्यांचा व्यापारी पांचशें उत्तम घोडे घेऊन विकण्यासाठीं वाराणसीला आला. राजाच्या किंमत ठरविणाऱ्या नवीन अधिकाऱ्यानें त्या घोड्यांची किंमत [मूळशब्द तंडुलनाळी असा आहे. नाळी म्हणजे सरासरी पावशेराचें मापटें असावें.]पावशेर तांदूळ ठरविली. त्याप्रमाणें राजानें त्या व्यापाऱ्याला पावशेर तांदूळ देऊन घोडे आपल्या पागेंत बांधण्यास हुकूम केला. गरीब बिचारा व्यापारी ते तांदूळ फडक्यांत बांधून आंसवें गाळीत तेथून चालता झाला.

अनुक्रमणिका

वाटेंत बोधिसत्त्वाची आणि त्याची गांठ पडली. तेव्हां तो बोधिसत्त्वाला म्हणाला, "आजपर्यंत मीं असा कधींहीं नागवलों नाहीं. तुम्ही अधिकारावर असाल अशा समजुतीनें मीं पांचशें निवडक घोडे घेऊन विकावयास आलों. परंतु त्या राजाच्या आवडत्या मूर्ख अधिकाऱ्यानें त्या घोड्यांची अवधी पावशेर तांदूळ किंमत ठरविली! म्हणजे दुसऱ्या अर्थी मला राजरोसपणें नागविलें म्हटलें पाहिजे!

बोधिसत्त्व म्हणाला, "आतां तूं तर नागविलेलाच दिसतोस तथापि मीं सांगतों ती एक युक्ति करून पहा. सुदैवानें तिला यश आल्यास तुला पावशेर तांदूळ घेऊन घरीं जाण्याचा प्रसंग येणार नाहीं. हा नवीन अधिकारी अत्यंत लोभी आहे असें मीं ऐकतों. राजाला जरी तो प्रिय आहे तरी लोकांकडून लांच खाऊन त्यांच्या मालाच्या दामदुप्पट किंमत ठरविण्यास तो मागें पुढें पहात नाहीं. त्याच्या कागाळ्या अद्यापि राजाच्या कानापर्यंत गेल्या नसल्यामुळें आणि लांगूलचालनामध्यें पटाईत असल्यामुळें तो अद्यापि त्या अधिकारावर टिकला आहे. तूं त्याजपाशीं जाऊन त्याला मोठें थोरलें अमिष दाखव पण तो म्हणेल कीं एकवार ठरवलेली किंमत पुनः ठरवितां यावयाची नाहीं. तेव्हां तूं त्याला ह्या पावशेर तांदुळाची किंमत ठरविण्यास सांग. मग तो काय करतो तें पाहूं."

बोधिसत्त्वाच्या सल्ल्याप्रमाणें तो व्यापारी त्या नव्या अधिकाऱ्यापाशीं गेला. आणि त्यानें त्याला मोठ्या बक्षिसाची लालूच दाखवून आपल्या पावशेर तांदुळाची किंमत ठरविण्यास सांगितलें. तेव्हां तो अधिकारी म्हणाला, "ह्या तांदुळाची किंमत राजेसाहेबांच्या हुकुमावांचून ठरवितांयेत नाहीं. परंतु तुम्ही त्यांची परवानगी मिळविली असतां मी तुम्हांला खुष करून सोडीन."

तेव्हां तो व्यापारी राजाजवळ जाऊन राजाला म्हणाला, "महाराज, एवढे अमोलिक तांदूळ आमच्या देशांत मुळींच खपण्यासारखे नाहींत. या तांदुळाबद्दल पांचशें घोडे तर राहूंच द्या, परंतु एकादा मेंढा किंवा बकरादेखील कोणी देणार नाहीं. तेव्हां ह्या तांदुळाची विक्री मला येथेंच करणें भाग आहे आपण याची किंमत ठरवून मला आमच्या देशांत खपण्याजोगा दुसरा एकादा जिन्नस देण्याची मेहेरबानी करावी."

राजानें त्याची विनंति मान्य करून दुसऱ्या दिवशीं दरबारांत त्या तांदुळांची आपल्या नवीन अधिकाऱ्याकडून किंमत ठरविण्यांत यावी असा हुकूम केला. पांचशें घोड्यांची पावशेर तांदूळ किंमत ठरविण्यांत आली, व पुनः त्या पावशेरभर तांदुळाची उद्यां किंमत ठरविण्यांत येणार आहे, ही दरबारी बातमी शहरांत पसरण्यास उशीर लागला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं नवा अधिकारी पावशेर तांदुळाची किंमत काय ठरवितो, हें पाहण्यासाठीं लोकांचे थव्यांचे थवे राजद्वारीं जमले. बोधिसत्त्वहि आपल्या कांहीं मित्रांसह तेथें आला होता.

दरबार भरल्यावर ते तांदुळाचें गाठोडें खाली ठेवून तो व्यापारी राजाला म्हणाला, "महाराज, आपल्या धान्याच्या कोष्ठागारांतून मिळालेले हे तांदूळ आहेत याची यथायोग्य किंमत ठरविण्याची मेहेरबानी व्हावी."

राजानें त्या नव्या अधिकाऱ्याला त्याची किंमत ठरविण्यास सांगितलें, तेव्हां तो तें गाठोडें हातांत घेऊन म्हणाला, "महाराज, हें तांदूळ पांचशें घोड्याच्या किंमतीदाखल ह्या व्यापाऱ्याला देण्यांत आले आहेत, तरी या तांदुळाची किंमत आसपासच्या गांवासह ही वाराणसी नगरी होणार आहे!"

अनुक्रमणिका

पावशेर तांदुळाची ठरवलेली ही किंमत पाहून जमलेल्या लोकसमूहांत एकच हंशा पिकला! कित्येकजण टाळ्या पिटून “आमच्या राजाला योग्य अधिकारी सापडला” असें मोठमोठ्यानें ओरडूं लागले. दुसरे कित्येकजण म्हणाले, “आम्हीं आमची राजधानी अमोलिक समजत होतों. परंतु तिची किंमत पावशेर तांदुळापेक्षां जास्त नाहीं हें आम्हाला आजच समजलें. वाहवा किंमत ठरविणारा!”

राजाला अतिशय लाज वाटली. त्यानें तेथल्यातेथें त्या तोंडपुज्या लोभी अधिकाऱ्याला अधिकारावरून दूर करून पुनः तो अधिकार बोधिसत्त्वाला दिला, व बोधिसत्त्वानें ठरविलेली घोड्यांची योग्य किंमत त्या व्यापाऱ्याला देऊन त्याचें समाधान केलें.

——⁎⁎⁎——

अनुक्रमणिका

५. सुखी संन्याशी. (१०)

(सुखविहारी जातक नं. १०)

एका कालीं बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मण कुलामध्यें जन्मला होता. तो वयांत आल्यावर गृहस्थाश्रमाला कंटाळून परिव्राजक झाला, व हिमालयपर्वतावर राहूं लागला. त्याच्याजवळ तेथें बरीच शिष्यशाखा जमली. एका वर्षाऋतूत तो फिरतफिरत काशीला आला, व तेथील राजाच्या उद्यानांत त्यानें राजाच्या आग्रहास्तव पावसाळ्याचें चार महिने घालविले. पावसाळा संपल्यावर तो आपल्या शिष्यांसह पुनः हिमालयावर जाण्यास सिद्ध झाला.

तेव्हां राजा त्याला म्हणाला, "आतां तुम्ही वृद्ध झाला आहां. हिमालय पर्वताच्या टेकड्यांवरून चढण्या उतरण्यास तुम्हांला अतिशय क्लेश होतील. तेव्हां तुम्हीं येथेंच रहा व आपल्या शिष्यांना हिमालयावरील आश्रमांत पाठवा."

बोधिसत्त्वाला राजाचें म्हणणें पसंत पडलें, आणि आपल्या एका प्रमुख शिष्याबरोबर सर्व परिव्राजकांना हिमालयावरील आश्रमांत पाठवून तो एकटाच त्या उद्यानांत राहूं लागला. काशीच्या राजानें त्याची व्यवस्था चांगली ठेविली.

बोधिसत्त्वाचा तो ज्येष्ठ शिष्य कांहीं काल सर्व परिव्राजकांसह हिमालयावरील आश्रमांत राहिल्यावर आपल्या सतीर्थ्यांना म्हणाला "गुरूला पाहून पुष्कळ दिवस झाले. आतां मी एकटाच जाऊन त्यांचा समाचार घेऊन येतों. तोंपर्यंत तुम्ही एकमतानें वागून आपल्या तपश्चर्येची अभिवृद्धि करा."

तो अनुक्रमें काशीला येऊन आपल्या गुरूला भेटला, व संध्याकाळच्या वेळीं आश्रमाच्या ओसरीवर चटई टाकून विश्रांतीसाठीं पडून राहिला. इतक्यांत काशिराजा बोधिसत्त्वाच्या दर्शनाला तेथें आला. तो आश्रमांत जात असतां त्याला पाहून हा आगंतुक तापस उठला तर नाहींच पण "अहो सुखं, अहो सुखम्" असें उद्गारला. राजाला या यःकश्चित तापसानें आपला योग्य मान न ठेविल्याबद्दल फार वाईट वाटलें. पण बोधिसत्त्वाच्या मर्यादेस्तव आपला राग आवरून तो आश्रमांत शिरला आणि बोधिसत्त्वाला नमस्कार करून एक बाजूस बसला व म्हणाला, "भदंत, आज आपल्या आश्रमांत एक आगंतुक तापस आला आहे असें वाटतें. पण तो खरा तापस नसावा अशी माझी समजूत झाली आहे. हा मनुष्य मीं आश्रमापाशीं पोहोंचलों तरी न उठतां खुशाल चटईवर लोळत होता, व मी जवळ आल्यावर 'अहो सुखं, अहो सुखम्' असें ओरडला. मला वाटतें तो फार आळशी असल्यामुळें आकंठ जेवून निजला असावा, व त्यांतच त्याला स्वर्गसुख वाटत असावें."

बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, आपली गैरसमजूत झाली आहे. हा तापस यथेच्छ खाऊन अजगरासारखा इतस्ततः लोळण्यांत सुख मानणारा मनुष्य नव्हे. पूर्वी तो आपल्यासारखाच उत्तरेकडील एका प्रदेशाचा राजा होता. तें राज्य आपल्या तरुण मुलांच्या स्वाधीन करून तो माझा अनुयायी झाला. हिमालयावर जे माझे शिष्य आहेत त्यांत हाच प्रमुख होय. आजच तो येथें येऊन पोहोंचला. मार्गांत फार श्रम झाल्यामुळें विश्रांतीसाठीं तो जरा ओसरीवर पडला आहे. आतां त्यानें जे उद्गार काढिले त्याचें कारण आपल्या लक्षांत आलें नाहीं. जेव्हां तो आपल्या राजवाड्यांत रहात होता तेव्हां आपल्याप्रमाणेंच त्याचे शिपाई

त्याचें रक्षण करीत असत आणि तो आपल्या जिवाला धोका न पोहोंचावा म्हणून दुसऱ्या लोकांवर सक्त नजर ठेवीत असे. हांजी हांजी करणाऱ्या आणि लांगूलचालन करणाऱ्या लबाड धूर्त लोकांनीं त्याला घेरलें होतें. आपल्या अंतःपुरांतील स्त्रियांवरदेखील विश्वास ठेवणें त्याला इष्ट वाटत नसे. अशा स्थितींत राजसंपत्ति त्याला विषमय वाटली असल्यास नवल नाहीं. अर्थात् राजवाड्यांतील सुखाला कंटाळून त्यानें त्या बंधनागाराचा त्याग केला; आणि तो हिमालयावर माझ्या आश्रमांत येऊन राहिला. आतां जेव्हां त्यानें आपणाला पाहिलें, तेव्हां आपण अशा राजसंपत्तिरूप विपत्तींतून पार पडलों, याची त्याला पुनः एकवार आठवण झाली असावी, व त्यानें "अहो सुखं, अहो सुखम्" हे उद्‌गार काढिले असावे.

राजाला बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून फार आश्चर्य वाटलें; व आपण तापसाविषयीं भलतीच कल्पना केली याबद्दल तो खजील झाला. बाहेर जाऊन त्यानें त्या तापसाला वंदन केलें; आणि त्याला त्याचें वृत्त विचारलें. तापसानें आपण राजवाड्यांतील सुखांना कसे कंटाळत गेलों; पण त्यांची संवय झाल्यामुळें त्यांचा पुढें हिमालय पर्वतावरील आपल्या गुरूच्या मोकळ्या आश्रमांत राहूं लागल्यापासून आपणाला किती सुख वाटलें इत्यादि सर्व वृत्तांत राजाला सांगितला; आणि तो म्हणाला, "महाराज, आज जेव्हां मी हा तुमचा मोठा लवाजमा पाहिला तेव्हां माझ्या राजवाड्यांतील विपत्तीची मला आठवण झाली, व सहजासहजीं 'अहो सुखं, अहो सुखम्" हे उद्‌गार माझ्या तोंडांतून निघाले."

राजा म्हणाला, "भो तापस, आपण मला क्षमा करा. मी राज्यसुखांत दंग झाल्यामुळें आपल्यासारख्या सत्पुरुषांची मला पारख करितां येत नाहीं. ज्यानें त्यानें मला मान द्यावा असें मला वाटतें, व जर कांहीं एखाद्या माणसाकडून स्वतंत्रतेचें वर्तन घडलें तर त्याचा मला ताबडतोब तिटकारा येतो. मघाशीं आपण मला पाहून उठलां नाहीं याबद्दल मला राग आला; आणि त्यामुळें आपल्या उद्‌गारांचा मी भलताच अर्थ केला. आपल्या उदारचरिताचा यापुढें माझ्या आचरणावर इष्ट परिणाम होईल अशी मला आशा आहे."

तापसानें राजाला धर्मन्यायानें राज्य चालविण्याविषयीं उपदेश केला. तेव्हां राजा त्याला वंदन करून निघून गेला.

एक तटस्थ मानसीं । एक सहजची आळशी ॥१॥
दोन्ही दिसती सारखीं । वर्म जाणें तो पारखी ॥२॥
एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोंप ॥३॥
एका सर्वस्वाचा त्याग । एका पोटासाठीं जग ॥४॥
एका भक्ति पोटासाठीं । एका देवासाठीं गांठीं ॥५॥
वर्म पोटीं एका । फळें दोन म्हंणे तुका ॥६॥

(तुकाराम)

——***——

६. उदारधी मृग. (१२)

(निग्रोधमिग जातक नं. १२)

एका काळीं आमचा बोधिसत्त्व मृगकुलांत जन्मला होता. त्याची कांतिसुवर्णासारखी होती; डोळे वज्रमण्यासारखे तेजस्वी होते; शिंगें रजत वर्णाचीं होतीं; तोंड अरुणवर्ण, आणि हातपाय लाक्षारसानें चित्रित केल्यासारखे सुंदर होते. त्याची वालधि चमरमृगाच्या वालधीसारखी शोभिवंत होती, व शरीर जवान घोड्यासारखें सुंदर दिसत होतें. तो आपल्या पांचशें मृगांच्या परिवारासह अरण्यामध्यें राहत होता. त्याला त्याचे लोक न्यग्रोधमृगराज या नांवानें ओळखत असत. त्याच अरण्यामध्यें बोधिसत्त्वाच्या जातीचा दुसरा एक शाख नांवाचा मृग आपल्या मृगगणासह रहात असे.

त्या काळीं काशीच्या राजाला मृगयेची फारच चट लागली होती. तो दररोज शिकारीला जातांना मृगांना वेढण्यासाठीं आपल्या शेतकरी लोकांना घेऊन जात असे. त्यामुळें लोकांची फार हानी होई. शेतांतील कामें अर्धवट रहात असत, व वेळेवर शेताची पेरणी वगैरे न झाल्यामुळें शेतकऱ्यांचें नुकसान होत असे. तेव्हां वाराणसीच्या आसपास राहाणाऱ्या लोकांनीं असा विचार केला कीं, "भलत्याच वेळीं शिकारीला जावें लागल्यामुळें आमची कामें तशींच रहातात, त्यापेक्षां आपण एक मोठें कुरण तयार करून व त्याच्या भोंवतीं एक बळकट कुंपण घालून अरण्यांतून पुष्कळ मृगांना त्या कुंपणांत आणून सोडूं. म्हणजे रोज राजा एखाद्या दुसऱ्या मृगाची शिकार करून मांस खाईल, व आम्हाला शिकारीला नेणार नाहीं."

त्याप्रमाणें त्या लोकांनीं एक मोठें कुंपण तयार केलें, आणि मृगांना पाणी पिण्यासाठीं तेथें एक लहानसा तलाव खोदला. पावसाळ्यानंतर जेव्हां त्या कुंपणांत गवत वाढलें तेव्हां नागरवासी आणि ग्रामवासी सर्व लोक आपापलीं शस्त्रास्त्रें घेऊन मृगांना आणण्यासाठीं अरण्यांत शिरले. तेथें त्यांनीं न्यग्रोध मृगाच्या आणि शाखमृगाच्या स्थानाला वेढा दिला, आणि दांडक्यांनीं झाडें झुडपें बडवून व मोठ्यानें आरडाओरड करून त्या मृगांना तेथून हुसकावून लावलें. परंतु मृगांना पळून जाण्याला दुसरी वाट न ठेवल्यामुळेंत्यांना वाराणसीच्या राजासाठीं नवीन कुंपणांत शिरल्याशिवाय दुसरें गत्यंतर राहिलें नाहीं. ते सगळे मृग त्या कुंपणांत शिरल्यावर रयत लोकांनीं त्या कुंपणाचें फाटक लावून टाकिलें, व राजवाड्यांत जाऊन ते राजाला म्हणाले, "महाराज, आपण आम्हाला घेऊन रोज शिकारीला जात असल्यामुळें आमचें फार नुकसान होत आहे. म्हणून आम्हीं हजारएक मृगांना नवीन कुंपणांत आणून सोडलें आहे. आतां रोज आपणाला जे एक दोन मृग मारावयाचे असतील ते मारून त्यांचें मांस खात जा. पण आम्हांला मात्र शिकारीला जाण्याचा हुकूम करूं नका."

राजाला लोकांचें म्हणणें योग्य वाटलें, व शिकारीला जाण्याबद्दल त्यांच्यावर त्या दिवसापासून सक्ती करण्यात येणार नाहीं असें अभिवचन देऊन त्यानें त्या लोकांना आपापल्या घरीं पाठविलें; आणि तो आपल्या मुख्य स्वयंपाक्यासह त्या कुंपणांत गेला. तेथें न्यग्रोध आणि शाख ह्या दोन मृगांना पाहून तो अत्यंत संतुष्ट झाला, व त्या दोघांना त्यानें अभयदान दिलें. त्या दिवसापासून राजा स्वतः एखाद्या मृगाला मारून घेऊन येत असे किंवा त्याचा मुख्य स्वयंपाकी मृगाला मारून आणीत असे.

परंतु मृग राजाला किंवा त्या सूदाला पाहून इतस्ततः पळत सुटत, व एक मृग मरेपर्यंत चार पांच मृगांना बाण लागून ते घायाळ होत असत; आणि कधीं कधीं त्या जखमांमुळें मरण पावत असत.

बोधिसत्त्वाच्या अनुयायी मृगांनीं ही गोष्ट बोधिसत्त्वाला कळविली, तेव्हां शाखाला बोलावून तो त्याला म्हणाला, "मित्रा, एकासाठीं पुष्कळ मृगांचा नाश होत आहे. दररोज एकाचें मरण तर चुकावयाचें नाहींच, पण एवढ्यासाठीं इतरांचा नाश होऊं न देणें आम्हांस शक्य आहे. आम्हीं राजाला अशी विनंति करू कीं, आजपासून बाणानें मृगाला मारण्यांत येऊं नये. एक जागा तयार करून तेथें एक लांकडाचा ओंडा ठेवण्यांत यावा, व रोज एका मृगानें जाऊन त्या ओंड्यावर आपलें डोकें ठेवून तेथें पडून रहावें; आणि राजानें किंवा राजाच्या सूदानें त्याचे डोकें कापून त्याला तेथून घेऊन जावें."

ही गोष्ट शाखमृगाला पसंत पडली. तेव्हां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "माझा आणि तुझा परिवार सारखाच आहे. अर्थात् एक दिवस माझ्या गणावर पाळी असावी, व एक दिवस तुझ्या गणावर असावी."

ह्याहि गोष्टीला शाखामृग कबूल झाला; व त्या दिवसापासून आळी-पाळीनें एक मृग निश्चित ठिकाणीं पाठविण्याचें ठरलें. दुसऱ्या दिवशीं राजा मृगाला मारण्याकरितां तेथें आला असतां अभयदान मिळालेले हे दोघे मृग पुढें सरसावून राजाला म्हणाले, "महाराज, आपणाला रोज एकाच मृगाचें मांस लागतें, पण त्याच्यासाठीं आमच्या गणांतील पुष्कळ मृग नाश पावतात. एवढ्यासाठीं आजपासून आमच्यावर मेहेरबानी करून आपण एक स्थान निश्चित करा. आमच्यापैकीं रोज एक मृग त्या ठिकाणीं जाऊन तेथें ठेवलेल्या ओंड्यावर आपलें डोकें ठेवून पडून राहील. त्याला आपण एका घावानें ठार मारून तेथून घेऊन जावें. म्हणजे आजकाल बाणाच्या प्रहारानें जे पुष्कळ मृग घायाळ होतात, ते व्हावयाचे नाहींत; व आपणाला मृगामागें चहूंकडे धांवण्याचेहि श्रम पडावयाचे नाहींत."

राजानें त्या मृगांची विनंति मान्य करून त्यांच्या सांगण्याप्रमाणें एक स्थान तयार केलें; व त्या दिवसापासून त्या ठिकाणीं ठेवलेल्या ओंड्यावर डोकें ठेवून निजलेल्या मृगालाच मारून आणावें असा त्यानें आपल्या स्वयंपाक्याला हुकूम केला. कांहीं काळपर्यंत ही व्यवस्था सुरळीत चालली होती.

एके दिवशीं शाखमृगाच्या अनुयायांपैकीं एका गर्भिणी मृगीवर त्या ठिकाणीं जाण्याची पाळी आली. तेव्हां ती शाखाला म्हणाली "महाराज, आजची माझी पाळी दुसऱ्या कोणत्या तरी मृगाला द्या. मी सांप्रत गर्भिणी आहे; आणि प्रसूत झाल्यावर माझें लेकरूं व मी अशीं दोघेंहि पाळीवर जाऊं."

शाख म्हणाला. "बाई असें करण्याचा मला अधिकार पोंचत नाहीं. ज्याच्यावर पाळी आली असेल त्यानेंच त्या ठिकाणीं गेलें पाहिजे. मी जर अन्यायानें वागूं लागलों तर आमच्या समाजांत मोठी अव्यवस्था होईल. तेव्हां मला तुझ्या विनंतीला मान देतां येत नाहीं."

ती मृगी मोठ्या कष्टी अंतःकरणानें न्यग्रोधमृगाजवळ गेली, व त्याला म्हणाली, "महाराज, मी शाखमृगाच्या परिवारापैकीं एक गर्भिणी मृगी आहे. आज राजाच्या अन्नासाठीं देह अर्पण करण्याची माझ्यावर पाळी आली आहे. पाळी दुसऱ्याला देऊन सध्यां मला मोकळें करावें, अशी मी आमच्या पुढाऱ्याला विनंति केली; परंतु त्यानें ती फेंटाळूनलाविली. आतां जर आपल्या मंडळीपैकीं माझ्याऐवजीं एकादा मृग पाठविण्याची मेहेरबानी कराल तर पुढें प्रसूत झाल्यावर तुमच्या समाजावर पाळी येईल त्यावेळीं मी व माझें लेकरूं त्या पाळीचा आनंदानें स्वीकार करूं."

अनुक्रमणिका

बोधिसत्त्व म्हणाला, “बाई, तूं कांहीं काळजी करूं नको. मी तुझ्या पाळीची व्यवस्था करतों. तू चारा खाऊन आणि पाणी पिऊन आनंदानें रहा.”

त्या दिवशीं राजाचा स्वयंपाकी त्या ठिकाणीं येऊन पाहतो, तों अभयदान मिळालेला न्यग्रोधमृगच त्या ओंड्यावर डोकें ठेवून पडला होता. तें आश्चर्य पाहून तो तसाच धांवत राजापाशीं गेला आणि म्हणाला, “महाराज, आज मी मृगाला मारून आणण्यासाठीं रोजच्या ठिकाणी गेलों होतों. तेथें आपण अभयदान दिलेल्या दोन नायक मृगांपैकीं एक जण त्या ओंड्यावर डोकें ठेवून पडलेला आहे! परंतु आपल्या हुकूमावांचून त्याला मला कसा हात लावतां येईल? म्हणून मी तसाच धांवत येथें आलों आहे, आतां आपला हुकूम होईल त्याप्रमाणें करण्यांत येईल.”

राजा त्या स्वयंपाक्याबरोबर स्वतः त्या ठिकाणीं गेला, आणि ओंड्यावर डोकें ठेऊन निजलेल्या न्यग्रोधमृगाला म्हणाला, “मित्रा, मृगराजा, तुला मी अभयदान दिलें असतां तूं या ठिकाणी येऊन कां निजलास?”

“महाराज, मी मृगसंघाचा नायक असल्यामुळें माझ्यावर पाळी येण्याचा संभव नाहीं. परंतु शाखाच्या परिवारापैकी एका गर्भिणी मृगीवर पाळी आली होती. तिनें ती दुसऱ्या मृगाला देण्याची मला विनंति केली. परंतु एकाचें मरण मी दुसऱ्याला कसें द्यावें? तेव्हां तिची पाळी माझ्यावर घेऊन मी येथें पडलों आहे. मला मारिलें असतां आपल्या वचनाचा भंग होईल अशी शंका धरूं नका. कां कीं मीं मजसाठीं मरत नसून गर्भिणी मृगीसाठीं मरण्यास सिद्ध झालों आहें.”

राजा म्हणाला, “मी त्या गर्भिणी मगीलाहि अभय देतों. तूं आतां या ओंड्यावरून ऊठ.”

“पण महाराज, इतर मृगांची वाट काय? गर्भिणी मृगीची पाळी मी घेतली व त्यामुळें तिला अभयदान मिळालें, ही बातमी मृगसंघालालागल्याबरोबर प्रत्येक मृग आपली पाळी चुकविण्यासाठीं मला विनंति करील; व त्या योगें मला वारंवार येथें येऊन आपणाला तसदी द्यावी लागेल! त्यापेक्षां आपण आजच मला मारावें हें बरें!”

राजा म्हणाला “असें असेल तर मी सर्व मृगांना अभय देतों.”

बोधिसत्त्व म्हणाला. “महाराज या उद्यानांतील मृगानांच आपण अभय देतां. पण अरण्यांतील इतर श्वापदांनीं काय करावें? त्यांची गति काय होणार?”

राजानें सर्व प्राण्यांना अभयदान देण्याचें अभिवचन दिल्यावर बोधिसत्त्व त्या ओंड्यावरून उठला, आणि त्यानें राजाला शील राखण्यासाठीं व धर्मानें राज्य करण्यासाठीं उपदेश केला. नंतर राजानें त्या सर्व मृगांना कुरणांतून मोकळें केलें. व ते अरण्यांत आपल्या मूळच्या ठिकाणीं गेले.

तेथें त्या गर्भिणी मृगीला एक सुंदर पुत्र झाला तो लहानपणीं वारंवार शाखमृगाजवळ जात असे. आईला जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां ती त्याला म्हणाली, “बाबारे,

[मूळ गाथा–
निग्रोधमेव सेवेय्य न साखं उपसंवसे ।

अनुक्रमणिका

निग्रोधस्मिं मतं सेय्यो यंचे साखस्मि जीवितं ॥] तुला तुझें कल्याण व्हावें अशी इच्छा असेल तर शाखमृगाचा सहवास न करितां न्यग्रोधाची संगति धर. न्यग्रोधाबरोबर मरणें श्रेयस्कर आहे; पण शाखाबरोबर जगणें श्रेयस्कर नाहीं."

——***——

अनुक्रमणिका

७. जिभेचें बंधन. (१४)

(वातमिग जातक नं. १४)

आमचा बोधिसत्त्व एकदां वाराणसीच्या राजाच्या पट्टराणीच्या पोटीं जन्माला आला आणि बापाच्या मरणानंतर वाराणसीचा राजा झाला. त्याचासंजय नांवाचा एक हुषार माळी (उद्यानपाल) होता. एके दिवशीं राजा त्याला म्हणाला, "संजया, तुझ्या उद्यानामध्यें एकादी आश्चर्यकारक गोष्ट दाखवूं शकशील काय?"

"जर मला लागेल तेवढा मध देण्याचा हुकूम होईल तर मी महाराजांना थोडक्याच दिवसांत एक अपूर्व आश्चर्य दाखवीन."

राजानें आपल्या कोठारांतून संजयाला लागेल तेवढा मध देण्याची आज्ञा केली.

त्या उद्यानामध्यें रोज एक वातमृग येत असे; पण—वातमृगच तो—संजयाचें वारें पडल्याबरोबर बाणासारखा पळत सुटे. संजयानें राजाच्या कोठारांतून मध आणून तो उद्यानांतील गवताला सारविला. हळूंहळूं वातमृगाला त्या गवताची इतकी गोडी लागली कीं, तो संजयाच्या जवळ जाऊन देखील तें गवत खाऊं लागला. कांहीं दिवस लोटल्यावर संजय राजाला म्हणाला, "महाराज, आज तुम्हाला मी उद्यानांतील आश्चर्य दाखविणार आहें. दुपारीं तें पाहण्यासाठीं आपण राजवाड्यांतच रहावें."

नंतर संजय उद्यानांत गेला; आणि तो वातमृग तेथें आल्यावर त्यानें त्यासमोर मध फांसलेलें गवत टाकिलें. तें खाल्ल्यावर राजवाड्याच्या बाजूला कांहीं अंतरावर आणखी गवत टाकिलें. याप्रमाणें हळुहळू त्या मृगाला संजयानें राजवाड्यांत आणून बाहेरचा दरवाजा बंद केला व तो राजाला म्हणाला, "महाराज, वातमृग मनुष्याच्या छायेलादेखील उभा रहात नाहीं, हें आपण जाणतच आहां. असें असतां त्याला मी येथपर्यंत आणून सोडलें हें अपूर्व आश्चर्य नव्हे काय?"

राजा म्हणाला, "वातमृग मनुष्याच्या वाऱ्याला उभा रहात नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु रसतृष्णा मोठी बळकट आहे. आपल्या जिभेला जर हा वातमृग वश झाला नसता तर तो तुझ्या ताब्यांत कधींहि आला नसता. पण जिभेच्या मागें लागल्यामुळें तूं नेशील तिकडे त्याला जाणें भाग पडलें! जिभेचें बंधन बळकट खरें!!"

——***——

अनुक्रमणिका

८. नियमितपणाचा आणि अनियमितपणाचा परिणाम. (१५, १६)

[खारादिय आणि तिपल्लत्थमिग ह्या दोन जातकांच्या आधारें ही गोष्ट लिहिली आहे.]

(खारादिय जातक आणि तिपल्लत्थमिग जातक नं. १५, १६)

एके कालीं बोधिसत्त्व मृगकुलामध्यें जन्मला होता तो मृगमायेंत अत्यंत निपुण होता. त्याच्या दोन बहिणींनीं आपल्या दोन तरुण मुलांना मृगविद्या शिकण्यासाठीं त्याच्या स्वाधीन केलें. पण त्यांपैकीं खारादिया नांवाच्या बहिणीचा मुलगा सात दिवसपर्यंत रोज बोधिसत्वानें बोलावल्या वेळीं त्याजपाशीं आला नाहीं. पण दुसऱ्या बहिणीचा मुलगा तिपल्लत्थ हा मामानें नेमून दिलेल्या वेळीं येऊन विद्या शिकत असे.

खारादियेचा मुलगा शिकण्याची वेळ चुकवून अरण्यांत भटकत फिरे. एके दिवशीं एका पारध्यानें लावलेल्या जाळ्यांत तो सांपडला व मोठ्यानें आरडाओरडा करूं लागला. आईला ही गोष्ट समजली तेव्हां ती धांवत धांवत आपल्या भावाजवळ आली आणि म्हणाली, “दादा, चार उपदेशाच्या गोष्टी सांगून माझ्या मुलाची कशी तरी सुटका करा.”

बोधिसत्त्व म्हणाला, “खारादिये, तुझ्या मुलाला मीं सातदां वेळेवर येण्यासाठीं बजावून सांगितलें असतां तो मजपाशीं आला नाहीं. त्याला स्वैर फिरण्याची खोटी संवय लागल्यामुळें मला त्याचें हित करतां आलें नाहीं व आतां तो पाशांत सांपडल्यावर तेथें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्याला तर पारधी मारणारच. पण त्याजवळ जाऊन माझ्या जिवाला मात्र मी धोक्यांत घातल्यासारखें होईल.”

खारादिया रडत रडत आपल्या मुलाच्या समाचाराला गेली. पण ती जवळ पोहोंचण्यापूर्वींच पारध्यानें त्याला मारून तेथून उचलून नेलें होतें!

कांहीं काल लोटल्यावर तिपल्लत्थ जाळ्यात सांपडला. तेव्हां त्याची आई बोधिसत्त्वाला म्हणाली, “माझ्या मुलाला मी तुझ्या जवळ ठेविलें असतां त्याची ही काय वाट झाली?”

बोधिसत्त्व म्हणाला, “तूं मुळींच घाबरूं नकोस. तुझा मुलगा नियमितपणानें विद्या शिकला आहे. तो शंभर पाशांतूनदेखील मुक्त होऊन येईल. मग ह्या यःकश्चित् पाशाची काय कथा!”

इकडे तो पारधी तेथें येण्यापूर्वी तिपल्लत्थानें आपलें पोट फुगवून, डोळे वटारून आणि हातपाय ताणून मेल्याचें सोंग घेतलें. पारधी तेथें येऊन त्याच्या पोटावर दोनचार टिचक्या मारून व त्याच्या तोंडावाटे निघालेला फेंस पाहून आपणाशींच म्हणाला, “ह्याला जाळ्यांत सांपडून फार वेळ झाला असावा. आतां याचें मांस तयार करण्याला उशीर लागला तर तें बिघडून जाण्याचा संभव आहे. तेव्हां येथेंच मांस कापून टोपलींत भरून घेऊन जावें हें बरें.”

असें बोलून त्यानें तिपल्लत्थाचे पाश मोकळे केले, व तो आपली सुरी साफ करूं लागला. इतक्यांत तिपल्लत्थ उठून उभा राहिला आणि वातवेगानें पळून जाऊन आपल्या आईला भेटला!

——✻✻✻——

अनुक्रमणिका

९. खरें कारण समजलें म्हणजे भांडण मिटतें. (१७)

(मालुत जातक नं. १७)

एकदां बोधिसत्त्व तपस्वी होऊन एका टेंकडीच्या पायथ्याशीं रहात होता. त्या वेळीं त्या पर्वताच्या एका गुहेंत एक सिंह आणि एक वाघ परस्परांशीं स्नेहभावानें वागून वास करीत असत. पण एके दिवशीं थंडीसंबंधानें त्यांचें भांडण जुंपलें. वाघाचें म्हणणें 'थंडी कृष्णपक्षांत वाढत असते' असें होतें. सिंह 'थंडी शुक्लपक्षांतच वाढते' असें म्हणे. त्या दोघांचेंहि भांडण विकोपास जाण्याच्या बेतांत आलें. तेव्हां ते दोघे बोधिसत्त्वाजवळ जाऊन त्याला म्हणाले "भो तापस, आमच्या ह्या भांडणाचा निकाल कर."

बोधिसत्त्व त्यांचें भांडण कशा संबंधानें होतें हें समजावून घेऊन म्हणाला "कृष्णपक्ष असो किंवा शुक्लपक्ष असो, ज्या वेळीं वारा वाहतअसतो त्या वेळीं थंडी वाढत असते. कां कीं थंड वारा हेंच थंडीची अधिक बाधा होण्याचें कारण होय. तेव्हां कांहीं अंशीं आपणां दोघांचें म्हणणें खोटें नाहीं. ह्या भांडणांत कोणाचाहि पराजय झाला नाहीं असें मी समजतों."

बोधिसत्त्वाच्या उपदेशानें त्या दोघांची तुटूं पाहणारीं मनें पुनः मिलाफ पावलीं.

ज्या गोष्टीसंबंधानें वाद होतो तिचें खरें कारण समजलें असतां किती तरी भांडणें मिटतील!

——***——

अनुक्रमणिका

१०. प्राण्याचा वध करून श्राद्ध करणें इष्ट आहे काय! (१८)

(मतकभत्त जातक नं. १८)

वाराणशीमध्यें एकदां एक वेदशास्त्रसंपन्न प्रख्यात ब्राह्मण रहात होता. त्याच्याजवळ वेदाध्ययन करण्यासाठीं पुष्कळ शिष्य रहात असत. वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशीं आपण बाळगलेल्या एका मेंढ्याला आपल्या शिष्यांच्या स्वाधीन करून तो म्हणाला, “मुलांनों, ह्या मेंढ्याला नदीवर नेऊन स्नान घालून पंचांगुलिक [रक्तचंदनांत हात भिजवून पांची बोटें उमटतील अशा रीतीनें जनावरांच्या पाठीवर मारणें ह्याला “पंचांगुलिक” म्हणत असत.] देऊन सजवून आणा. आज याला मारून मी पितरांचें श्राद्ध करणार आहें.”

शिष्यांनीं त्या मेंढ्याला नदीवर नेऊन स्नान वगैरे घालून तांबड्या फुलांच्या मालांनीं सजवून आणि पंचांगुलिक देऊन नदीच्या कांठीं उभें केलें. तेव्हां तो मोठ्यानें हंसला; व नंतर मोठ्यानें रडला. तें पाहून त्या तरुणांना फार आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, तूं पहिल्यानें हंसलास व नंतर रडलास याचें कारण काय?”

मेंढा म्हणाला, “हा प्रश्न तुम्हीं आचार्यासमोर विचारा; म्हणजे मी तुम्हांला याचें उत्तर देईन.”

शिष्यांनीं त्या मेंढ्याला आपल्या आचार्याजवळ नेऊन नदीवर घडलेली सर्व गोष्ट त्याला कळविली. तेव्हां तो त्या मेंढ्याला म्हणाला, “तूं प्रथमतः हंसलास व रडलास याचें कारण काय?”

मेंढा म्हणाला, “भो ब्राह्मण, मी पांचशें जन्मापूर्वी तुझ्या सारखाच मोठा प्रख्यात ब्राह्मण होतों. त्या जन्मीं वडिलांच्या श्राद्धासाठीं मी एकदांच काय तो एक मेंढा मारला होता. त्या कर्मामुळें मला पांचशें खेपा मेंढ्याच्या कुळांत जन्म घेऊन शिरच्छेद करून घ्यावा लागला. पण माझी शेवटची पाळी असल्यामुळें मी आज या पशुयोनींतून मुक्त होणार आहे, अशा विचारानें मला हर्ष झाला, व त्यामुळें माझें हंसें मला आवरतां आलें नाहीं. पण जेव्हां आपली आठवण झाली तेव्हां मला अत्यंत खेद झाला. आपण ह्या जन्मीचे माझे अन्नदाते आहां, पालनकर्ते आहां, पण ह्या कर्मामुळें आपणाला माझ्यासारिखे मेंढ्यांच्या कुळांत पांचशे जन्म घ्यावे लागतील, व त्या प्रत्येक जन्मांत शिरच्छेदाचें दुःख भोगावें लागेल, या विचारानें माझें अंतःकरण कळवळलें, आणि माझा शोक अनावर झाल्यामुळें मला रडूं आलें.”

ब्राह्मण म्हणाला, “शहाण्या मेंढ्या, भिऊं नकोस. मी तुझ्यासारख्या प्राण्याला मारून पशुयोनींत जन्म घेऊं इच्छीत नाहीं. तुझ्या या कळकळीबद्दल मी फार आभारी आहे. आणि आज मी माझ्या शिष्यांसह तुझें रक्षण करीन.” मेंढा म्हणाला, “तू आणि तुझ्या शिष्यांनीं माझें कितीहि रक्षण केलें तरी मी आज मरणापासून मुक्त होणार नाहीं. कां कीं, माझें पापच असें बलवत्तर आहे कीं, शिरच्छेदाचें दुःख भोगल्यावांचून ब्रह्मदेवदेखील त्या पापांतून मला मुक्त करूं शकणार नाहीं!”

ब्राह्मणानें मेंढ्याच्या म्हणण्याकडे लक्ष्य न देतां आपल्या शिष्यांसह त्याच्या रक्षणाचा बंदोबस्त केला. मेंढा गांवाबाहेर एका खडकाच्या बाजूला वाढलेल्या झुडुपाचा पाला खाऊं लागला. इतक्यांत मोठा कडकडाट होऊन त्या शिळेवर वीज पडली. व तिचें एक शकल उडून त्यानें मेंढ्याची मान धडापासून निराळी केली! तें आश्चर्य पहाण्यासाठीं पुष्कळ लोक तेथें जमले.

अनुक्रमणिका

आमचा बोधिसत्त्व या वेळीं तेथें एका वृक्षावर वृक्षदेवता होऊन रहातहोता. तो त्या जमलेल्या लोकांना म्हणाला, “मनुष्यप्राणी इहलोकीं जन्म पावणें दुःखकारक आहे असें जर जाणते, तर त्यांनीं इतर प्राण्याचा वध केला नसता! प्राणघातामुळें किती दुःख भोगावें लागतें हें ह्या मेंढ्याच्या उदाहरणानें स्पष्ट होत आहे!”

बोधिसत्त्वाचा उपदेश ऐकून ते लोक प्राणघातापासून विरत झाले.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

११. हांजीहांजीपणा विषारी आहे! (२१)

(कुरंगमिग जातक नं. २१)

एकदां आमचा बोधिसत्त्व कुरंगमृग कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर अरण्यांत जाऊन तो निरनिराळ्या झाडांची फळें खात असे. एके काळीं एक शिवणीचा वृक्ष फलभारानें विनम्र झाला होता. बोधिसत्त्व त्या वृक्षाखालीं जाऊन वाऱ्यानें पडलेलीं फळें खात असे. पण आमचा बोधिसत्त्व जिव्हालंपट नव्हता. फळें खाण्यापूर्वीं आसपास एखादा पारधी दडून बसला आहे किंवा नाहीं, याची तो नीट छाननी करीत असे; आणि मग निर्वाहापुरतीं फळें खाऊन तेथून निघून जात असे.

एके दिवशीं त्या अरण्यामध्यें फिरणारा पारधी त्या शिवणीच्या वृक्षावर येऊन दडून बसला. बोधिसत्त्व नियमाप्रमाणें एकदम वृक्षाखालीं न येतां कांहीं अंतरावर राहून जवळपास पारधी आहे कीं नाहीं याचें निरीक्षण करूं लागला. वृक्षाखालीं चांगलींफळें पडलीं नसावीं असा विचार करून पारध्यानें कांहीं फळें तोडून बोधिसत्त्व उभा होता त्या बाजूला फेंकलीं. तरी बोधिसत्त्व तेथून हालेना. तेव्हां पारध्यानें आणखीहि फळें बोधिसत्त्वासमोर फैलावण्याचा क्रम चालविला. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला “बाई शिवणी, आज तूं माझी फारच हांजीहांजी चालविली आहेस! रोजच्याप्रमाणें सरळ फळें न पाडितां माझ्या बाजूला दूरवर तूं फळें फेंकीत आहेस!हांजीहांजीपणा विषारी आहे, हें तत्त्व मला माहीत असल्यामुळें मी तुझा दुरूनच त्याग करून दुसऱ्या शिवणीच्या झाडाकडे जातों!”

बोधिसत्त्व तेथूनच पळत सुटला. व्याधानें त्याच्यावर शस्त्र फेंकलें; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं!

——***——

अनुक्रमणिका

१२. कुसंगतीचें फळ. (२६)

(महिलामुख जातक नं. २६)

वाराणसीराजाचा महिलामुख नांवाचा एक मंगल हत्ती होता. राजाचें त्यावर फार प्रेम असे. एके दिवशीं त्याच्या हस्तिशाळेजवळ मध्यरात्रीच्या सुमारास चोर येऊन मसलत करूं लागले. घराची भिंत अमुक तऱ्हेनें फोडावी, कोणी पकडण्याला आलें तर त्याला कसें ठार मारावें, पेट्या, कपाटें, वगैरे कशीं फोंडावीं, त्या वेळीं मनामध्यें दयेचा अंशदेखील असतां कामा नये, अशा प्रकारच्या गोष्टी करून त्या रात्रीं त्या चोरांनीं दरोडा घातला. त्यांना त्यांत यश आल्यामुळें मसलतीला तें ठिकाण शुभप्रद आहे अशी त्यांची समजूत झाली; आणि ते वारंवार रात्रिसमयीं त्या ठिकाणीं मसलत करूं लागले. त्यांच्या भाषणाचा महिलामुख हत्तीवर इतका वाईट परिणाम झाला कीं त्याच्या अंतःकरणातील दयेचा अंश आटून जाऊन त्यानें प्रथमतः जवळ आलेल्या आपल्या माहुताला ठार मारिलें!

महिलामुख पिसाळला हें वर्तमान राजाला तेव्हांच निवेदित करण्यांत आलें. त्या वेळीं आमचा बोधिसत्त्व राजाचा एक अमात्य होता. राजा त्याला म्हणाला, “पंडिता, हस्तिशाळेंत जाऊन मंगल हत्तीच्या वेडाचें खरें कारण शोधून काढ. इतका चांगला हत्ती एकाएकीं वेडावला हें संभवेल तरी कसें?”

बोधिसत्त्वानें हस्तिशाळेंत जाऊन महिलामुखाला तपासून पाहिलें. परंतु त्याच्या शरिराला कांहीं पीडा झाल्याचें चिन्ह दिसून आलें नाहीं. तेव्हां बोधिसत्त्वानें आसपासची जागा तपासून पाहिली. एका कोंपऱ्यांत घरें वगैरे फोडण्याचीं एकदोन शस्त्रें व चोरांनीं टाकून दिलेल्या कांहीं मोडक्या तोडक्या जिनसा त्याच्या पाहण्यांत आल्या. तेव्हां चोरांच्या मसलती ऐकून हा हत्ती बिघडून गेला असावा अशी त्याची खात्री झाली; आणि राजाजवळ जाऊन तो म्हणाला, “महाराज! महिलामुखाला दुसरा कोणताहि रोग झाला नाहीं. त्याच्या जवळपास चोरांनीं चालविलेल्या मसलती ऐकून त्याचें मन बिघडून गेलें आहे व तो उन्मत्त झाला आहे! दुष्ट संगतीचें हें फळ आहे!”

राजा म्हणाला, “पंडिता, पण त्याला सुधारण्याचा कांहीं उपाय आहे किंवा नाहीं?”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज! याला सोपा उपाय आहे. सुशील साधुसंताला बोलावून त्याच्या शाळेंत धर्माविषयीं संभाषण करण्यास सांगावें. म्हणजे तो आपोआप सुधरेल.”

राजानें वाराणसीच्या आसपास राहणाऱ्या कांहीं साधुसंतांना आमंत्रण करून हस्तिशाळेंत धार्मिक संभाषण करण्यास विनंति केली. त्यांनी तेथें बसून मनुष्यानें शीलवान् व्हावें, शांति धरावी, परोपकार करावा, दया वाढवावी इत्यादि गोष्टींची चर्चा केली. ती ऐकून हत्तीचा मद जागच्याजागीं निवाला; व तो पूर्वीपेक्षांहि सौम्य झाला!

राजानें पुनः चोर किंवा धूर्त लोक त्या शाळेंत येणार नाहींत असा बंदोबस्त केला; आणि बोधिसत्त्वाच्या चातुर्याची वाखाणणी करून त्याचा योग्य गौरव केला.

——***——

[अनुक्रमणिका](#)

१३. गरिबी बरी. (३०)

(मुनिक जातक नं. ३०)

वाराणसींत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असतां बोधिसत्त्व एका कुणब्याच्या गाईच्या उदरीं जन्माला आला. त्याचें नांव महालोहित असेंहोतें, व त्याच्या भावाला चुल्ललोहित म्हणत असत. त्या घरची सर्व शेती ह्या दोघांवर अवलंबून असे. पण त्यांना खावयाला कडबा व भुसा ह्यांशिवाय दुसरे उंची पदार्थ मिळत नसत. त्याच कुणब्याच्या घरीं मुनिक नांवाचा एक डुकर होता. त्याची मात्र फार चैन असे. त्याला पेज, भात वगैरे पदार्थ यथास्थित देण्यांत येत असत.

तें पाहून चुल्ललोहित महालोहिताला म्हणाला, “दादा, हा काय बरें अन्याय! आम्हीं ह्या कुटुंबाचीं सर्व शेतें नांगरतों आणि आम्हांला खावयाला फार झालें तर भुसा. पण ह्या मुनिकाची, कांहीं काम न करतां, कशी चैन चालली आहे पहा! सकाळीं उठून पेज भात खाऊन डुरुं डुरुं करीत इकडे तिकडे खुशाल फिरत असतो.”

महालोहित म्हणाला, “बा चुल्ललोहिता, तूं असा उतावळा होऊं नकोस. आमच्या मालकाच्या मुलीचें वर्षसहामहिन्यांत लग्न व्हावयाचें आहे, त्या वेळीं मुनिकाची काय स्थिती होते तें पहा; आणि तोंपर्यंत कडब्याभुशांतच संतोष मान.”

यजमानाच्या मुलीच्या लग्नसमारंभाच्या दिवशीं चुल्ललोहित वडील भावाजवळ त्वरेनें धांवत आला, आणि आश्चर्यचकित मुद्रेनें म्हणाला, “दादा, तुम्हीं जें म्हणत होतां त्याचा आज अनुभव आला. मुनिकाचे हातपाय बांधून तो आरडाओरड करीत असतां यजमानाच्या नोकरांनीं त्याचा गळा अत्यंत प्रखर सुरीनें चिरला व त्याचे तुकडे तुकडें केले.”

महालोहित म्हणाला, “ह्याजसाठीं त्याला पोसण्यांत आलें होतें. रिकामटेकडेपणें जो चैन करतो त्याची अशीच स्थिती होते. श्रम करून खाल्लेला कडबा भुसा चांगला; कारण तें दीर्घायुष्याचें लक्षण होय.”

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

१४. असभ्यतेनें हानि. (३२)

(नच्चजातक नं. ३२)

प्राचीन काळीं प्रथम कल्पांत चतुष्पद प्राण्यांनीं सिंहाला आपला राजा केलें. माशांनीं आनंद नांवाच्या मत्स्याला, व पक्ष्यांनीं सुवर्णराजहंसाला आपला राजा केलें. त्या सुवर्णराजहंसाची एक अत्यंत सुंदर कन्या होती. तिनें बापाच्या सांगण्यावरून असा वर मागितला कीं स्वयंवर करून जो पति योग्य वाटेल तो मी वरीन. त्याप्रमाणें हंस राजानें हिमालयावर पक्ष्यांचा मोठा समुदाय बोलाविला. एका मोठ्या शिलातलावर सर्व पक्षी गोळा झाले. तेव्हां हंसराजा आपल्या मुलीला म्हणाला, "ह्या पक्षिसंघांतून तुला जो नवरा रुचेल, तो निवडून काढ. तिनें मोराला पसंत केलें. तेव्हां सर्व पक्षी त्याजपाशीं येऊन त्याला म्हणाले, "तूं धन्य आहेस. राजकन्येनें एवढ्या पक्षिसंघांतून तुझीच निवड केली ह्याबद्दल तुझें आम्हीं अभिनंदन करतों."

"परंतु ह्यावरून माझें सामर्थ्य तुमच्या लक्षांत येणें शक्य नाहीं. मला नृत्यकला किती चांगली येते हें पहा." असें म्हणून त्या पक्षिसमुदायासमोर आपला पिसारा पसरून मोर नाचूं लागला, व त्यायोगें नागडा उघडा पडला. सुवर्णराज हंसाला लाज वाटली, व तो म्हणाला, "ह्याचा आवाज फार चांगला, पृष्ठभाग सुंदर, वैडूर्य मण्यासारखी मान, आणि लांब पिसारा, परंतु ह्याच्या ह्या निर्लज्ज नाचण्यानें माझ्या मुलीशीं ह्याचा विवाह करण्यास मी तयार नाहीं."

असें म्हणून त्यानें त्याच ठिकाणीं आपल्या भाच्याशीं आपल्या कन्येचा विवाह केला. मोरानें अत्यंत लाजून तेथून पलायन केलें. असभ्यतेमुळें चांगले गुण व्यर्थ गेले!

——***——

अनुक्रमणिका

१५. एकीचें व बेकीचें फळ. (३३)

(सम्मोदमान जातक नं. ३३)

वाराणसींत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असतां बोधिसत्व लावा पक्ष्याच्या कुळांत जन्मून हजारों लाव्यांचा पुढारी होऊन अरण्यांत रहात असे. त्या काळीं एक पारधी त्यांच्या वस्तीच्या जागीं जाऊन एका ठिकाणीं चरणाऱ्या लाव्यांवर जाळें टाकी व त्यांत सांपडलेल्या लाव्यांला बाजारांत विकून आपला निर्वाह करी. एके दिवशीं बोधिसत्व आपल्या समुदायांतीललाव्यांना म्हणाला, "हा पारधी आमच्या ज्ञातिवर्गाचा नाश करीत आहे. ह्याला एकच उपाय आहे तो हा कीं जर तुम्हांपैकीं कोणी त्याच्या जाळ्यांत सांपडलें, तर एकमतानें तें जाळें घेऊन तुम्हीं उडावें, व एकाद्या कांटेरी झुडपावर टाकून त्याच्या खालून निघून जावें."

दुसऱ्या दिवशीं कांहीं लाव्यांवर पारध्यानें जाळें टाकल्याबरोबर, बोधिसत्त्वाच्या उपदेशाप्रमाणें त्यांनीं तें उडवून नेलें, व एका कांटेरी झुडपावर टाकून त्याच्या खालून पळ काढिला. कांट्यांतून जाळें मोकळें करतां करतां पारध्याला सांज झाली, व रिकाम्या हातानेंच घरीं जाण्याचा प्रसंग आला. हा क्रम बरेंच दिवस चालला. तेव्हां त्याची बायको रागावून त्याला म्हणाली. "रोज रोज एक कवडीहि न आणतां घरीं येतां; ह्याच्यावरून असें दिसतें कीं दुसरी कोणीतरी बाई तुम्ही संभाळली असली पाहिजे, व तिच्यासाठीं सर्व पैसा खर्चण्यांत येत असला पाहिजे."

पारधी म्हणाला, "भद्रे, ही तुझी समजूत चुकीची आहे. मला कोणतेंही व्यसन नाहीं पण मी काय करूं? लावे एकजुटीनें जाळें घेऊन जातात व कांटेरी झुडपावर टाकतात; त्या योगें माझा दिवस जाळें सोडविण्यांत जातो, आणि शेवटीं हातीं कांहीं लागत नाहीं. तथापि मी निराश झालों नाहीं. जोंपर्यंत त्यांच्यांत एकी आहे तोंपर्यंत जाळें घेऊन उडून जातील. पण जेव्हां आपसांत भांडूं लागतील, तेव्हां खात्रीनें माझ्या हातीं येतील."

कांहीं दिवसांनी चरावयाला जात असतांना एक लावा दुसऱ्याच्या डोक्यावरून गेला. त्यामुळें दुसऱ्याला राग आला. पहिल्या लाव्यानें क्षमा मागितली. तथापि दुसऱ्यानें तें न ऐकतां भांडण्यास सुरवात केली. होतां होतां सर्व समुदायांत फूट पडली. तेव्हां बोधिसत्त्वानें विचार केला कीं जेथें एकी नाहीं, तेथें सुरक्षितपणा नाहीं. आपण येथून दूर गेलेलें चांगलें. त्या प्रमाणें बोधिसत्त्व आपल्या वचनांत रहाणाऱ्या समुदायाला घेऊन दुसरीकडे निघून गेला. इकडे लाव्यांपैकीं कांहीं जण जेव्हां जाळ्यांत सांपडत तेव्हां तेथेंहि भांडणें करीत, पक्षप्रतिपक्ष करीत; व जाळें उडवून नेण्याचें सामर्थ्य न राहिल्यामुळें पारध्याच्या हातीं जात. अशा रीतीनें पारध्याची चांगली चैन चालली व बायकोची त्याच्यावर फार मर्जी बसली.

——✱✱✱——

अनुक्रमणिका

१६. कलहस्थानीं राहूं नये. (३६)

(सकुण जातक नं. ३६)

एकदां बोधिसत्त्व पक्षाच्या कुळांत जन्मला व वयांत आल्यावर मोठ्या पक्षिसमुदायासह एका विस्तीर्ण वृक्षावर राहूं लागला. एके दिवशीं त्या वृक्षाच्या दोन शाखा परस्परांवर घांसल्या जाऊन त्यांतून धूर निघूं लागला. तेव्हां बोधिसत्त्व पक्षिसमुदायाला म्हणाला, “गडे हो, ज्या वृक्षाच्या आश्रयाला आम्हीं रहात आहों, त्याच्या शाखांतून हा धूर निघत आहे. म्हणजे येथे अनुकम्पेच्या ऐवजीं घर्षण होऊं लागलें आहे. ह्याचा परिणाम असा होणार आहे कीं, ह्या फांद्यांच्या घर्षणानें आग उत्पन्न होऊन सर्व वृक्ष नाश पावणार. म्हणून ह्या स्थानीं न रहातां आपण दुसऱ्या ठिकाणीं जाऊं.”

बोधिसत्त्वाचा उपदेश ज्यांनां रुचला, ते त्याच्याबरोबर आपल्या पोरांबाळांसह दुसरीकडे निघून गेले. पण आपणास शहाणे समजणारे दुसरें होते, ते म्हणाले, “हा थेंबभर पाण्यांत मगर पहातो. अशा प्राण्याच्या उपदेशानें आम्हीं इकडे तिकडे फिरूं लागलों तर आम्हांस सुखशांति कधींच मिळावयाची नाहीं.”

परंतु बोधिसत्त्वानें केलेलें भविष्य खरें झालें. एकाएकीं त्या फांद्यांतून आग निघाली, व त्या वृक्षानें पेट घेतला. तेथें राहिलेले पक्षी अकालीं दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकले नाहींत, व ते आगींत पडून जळून मेले.

——***——

अनुक्रमणिका

१७. वृद्धसेवा. (३७)

([ही गोष्ट चुल्लवग्गांतहि सांपडते.]**तित्तिर जातक. नं. ३७**)

प्राचीन काळीं हिमालय पर्वतावर एक तित्तिर पक्षी, एक वानर व एक हत्ती एका भव्य वडाच्या आश्रयानें रहात असत. परंतु त्यांच्यांत असावें तसें ऐक्य नव्हतें; परस्परांविषयीं अनुकम्पा नव्हती. हा प्रकार तसाचचालणें इष्ट नसल्यामुळें त्यांनीं असा विचार केला कीं, जो आपणांत वडील असेल त्याच्या सल्ल्यानें वागावें. तेव्हां वानर हत्तीला म्हणाला, "काय हो, तुम्ही ह्या वटवृक्षाला किती दिवसांपासून पहातां? हत्ती म्हणाला, "जेव्हां हा वडाचा रोपा अगदीं लहान होता, तेव्हां माझ्या बालपणीं मी त्याला पोटाखालीं घालून वरून जात होतों. पण वानरदादा, तुम्हीं ह्या झाडाला केव्हांपासून ओखळतां?"

वानर म्हणाला, "मी माझ्या लहानपणीं ह्या वडाच्या रोपाच्या अगदीं अग्र-शाखेचीं पानें जमिनीवर उभा राहून तोडीत होतों. तेव्हांपासून ह्या झाडाला मी ओळखतों. पण तित्तिरदादा, तुम्हीं ह्याला किती दिवसांपासून पाहतां?"

तित्तिर म्हणाला, "येथून बऱ्याचशा अंतरावर एक वडाचें झाड होतें. त्याचीं फळें खाऊन मी ह्या ठिकाणी शौचविधि करीत असे. त्यामुळें हें झाड येथें उगवलें; व तेव्हांपासून मी ह्या झाडाला ओळखत आहे."

ह्यावरून तित्तिरपक्षी त्या तिघांत वडील होता हें सिद्ध झालें, व तेव्हांपासून वानर आणि हत्ती तित्तिर पंडिताच्या सल्ल्यानें वागूं लागले. तेणेंकरून त्या तिघांचेंहि त्या ठिकाणीं वास्तव्य फारच संतोषजनक झालें. तित्तिरपंडित आमचा बोधिसत्त्व होता हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

——❋❋❋——

अनुक्रमणिका

१८. शाठ्य सदांच साधत नसतें. (३८)

(बक जातक नं. ३८)

प्राचीनकाळीं बोधिसत्त्व एका सुंदर तलावाच्या काठीं असलेल्या वृक्षावर वृक्षदेवता होऊन रहात होता. त्या काळीं उन्हाळ्याच्या दिवसांत एका लहानशा तलावांतील पाणी आटत चाललें होतें; आणि त्यांत पुष्कळ मासे रहात असत. तेव्हां एक बगळा त्या तळ्याच्या काठीं येऊन चिंताग्रस्त स्थितींत बसला. तें पाहून तळ्यांतील मासे त्याला म्हणाले, "हे आर्य, तूं कशाचा विचार करीत आहेस."

बगळा म्हणाला, "दुसरा कसला? मी तुमच्या संबंधानेंच विचार करीत आहे. ह्या तळ्यांतील पाणी दिवसेंदिवस आटत चाललें आहे; खावयाला मिळण्याची मारामार, व उन्हाळा तर भयंकर! तेव्हां हे बिचारे मासे आतां काय करतील ह्या विचारांत मी पडलों आहे," मासे म्हणाले, "मग ह्यांतून सुटण्याला आम्हांला कोणता उपाय?" बगळा म्हणाला, "जर माझा उपदेश ऐकाल तर तुम्हांपैकीं एकेकाला चोंचींत धरून एका मोठ्या सरोवरांत नेऊन सोडीन."

पण माशांना ही गोष्ट पटेना. ते म्हणाले, "असें कधीं झालें आहे काय? जगाच्या आरंभापासून माशांवर प्रेम करणारा बगळा कोणी पाहिला आहे काय? आमच्यापैकीं एकेकाला दूर नेऊन मारून खाण्याचा तुझा हेतु असला पाहिजे."

बगळा म्हणाला, "माशांस बगळे मारून खातात हें खरें आहे. परंतु विश्वासघाताचें पातक मी कसें करीन. माझ्यावर तुम्हीं विश्वास ठेवून तरी पहा. आतां दुसरा एकादा उत्तम तलाव नाहीं असें तुम्हांस वाटत असेल, तर माझ्याबरोबर तुमच्यापैकीं एकाद्याला पाठवा म्हणजे त्याला मी तो तलाव दाखवून आणतों. तेव्हां तरी तुमची खात्री होईल."

माशांनीं खात्री करून घेण्यासाठीं आपणांपैकीं एका मोठ्या काण्या माशाला त्याजबरोबर पाठविलें. त्यानें त्या माशाला मोठ्या सरोवरांत नेऊन सोडलें, व पुन्हां पूर्वस्थळीं आणून पोहोचविलें. काण्या माशानें आपल्या भाऊबंधांसमोर नवीन तलावाचें रसभरीत वर्णन केलें. तेव्हां सर्व मासे तिकडे जाण्यास उत्सुक होऊन बगळ्यास म्हणाले, "आर्य, आम्हाला नेऊन त्या ठिकाणीं पोहोंचविण्याची मेहरबानी कर."

बगळ्यानें प्रथमतः त्या काण्या माशालाच तिकडे नेलें; व त्याला सरोवर दाखवून एका वृक्षाच्या फांद्यांच्या खांचींत दडपून मारून खाल्लें, व कांटे मुळांत टाकले; आणि पुन्हां माशांजवळ जाऊन, "आपण त्याला सोडून आलों; आतां ज्याची मर्जी असेल त्याला येऊं द्या," असें म्हणून आणखी एका माशाला आणून आणखी पूर्वीप्रमाणेंच त्याची गत केली. ह्याप्रमाणे सर्व माशांना त्यानें मारून खाल्लें. एक तेवढा खेंकडा त्या तळ्यांत शिल्लक राहिला. तेव्हां बगळा त्याला म्हणाला, "बा खेंकड्या, तूं तरी तेथें कशाला राहातोस? बाकी सर्व मासे सुखानें मोठ्या सरोवरांत संचार करीत आहेत. व तूं येथें एकटाच ह्या आटत जाणाऱ्या डबक्यांत बसला आहेस. तेव्हां चल माझ्या बरोबर. मी तुला त्या सुंदर तलावांत नेऊन पोहोचवितों."

खेंकड्यानें विचार केला कीं, "ह्या चोरानें माशांना नेऊन मारून खाल्लें कीं जिवंत सोडलें हें कोणी सांगावें? पण ह्याच्या बरोबर जाऊन त्यांची स्थिती काय झाली, हें पाहण्यास हरकत नाहीं, जर ह्यानें

अनुक्रमणिका

सुखरूपपणें मला पोहोंचविलें तर ठीकच आहे; न पेक्षां माझ्या तावडींतून हा जिवंतपणें निघून जाणार नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे." तो बगळ्यास म्हणाला, "बगळेमामा, माशांना तुम्हीं नेलेंत हें ठीक झालें. परंतु मला कसें न्याल? बगळा म्हणाला, "कसें म्हणजे?" चोंचींत धरून!" खेंकडा म्हणाला, "एकतर तुमच्या चोंचींत मी मावणार नाहीं; व दुसरें असें कीं मी गुळगुळीत असून घट्ट आहें, तेव्हां तुम्हांला मला नीट पकडतां यावयाचें नाहीं. पण माझे हे आंकडे फार सुदृढ आहेत. ह्यानीं जर मी आपल्या मानेला धरून लोंबकळत राहिलों, तर खालीं पडण्याची भीती नाहीं आणि त्या योगें तुम्हीं मला सुरक्षितपणें तिकडे घेऊन जाल."

बगळ्याला ही गोष्ट पसंत पडली. खेंकड्याला आपल्या मानेला लटकावून तो सरोवराजवळ गेला, व त्याला तें सरोवर दाखवून वहिवाटीप्रमाणें आपल्या नेहमींच्या वृक्षाकडे वळला. तेव्हां खेंकडा म्हणाला, "बगळे मामा, सरोवर तर ह्या बाजूला राहिलें, आणि तुम्ही मला येथें कोठें नेता?"

बगळा रागावून म्हणाला, "काय, मोठे आले आहेत कीं नाहीं तुह्मी आमचे भाचे! तुला गळ्याला लटकावून फिरत आहें, म्हणून तूं मला दास समजतोस काय? हा पहा इकडे त्या माशांच्या कांट्यांचा केवढा ढीग पडला आहे! तुझींहि हाडें ह्याच राशीवर पडणार हें पक्कें लक्षांत ठेव."

खेंकडा म्हणाला, "त्या माशांच्या मूर्खपणामुळें, त्यांना मारून खाणें तुला सोपें गेलें. पण आतां प्रसंग खेंकड्याशीं आहे हें तूं विसरूं नकोस. माझ्या आंकड्यांनीं तुझी जी मान पकडली आहे ती उगाच नव्हे. एवीं तेवीं मला जर मरावयाचें आहे तर आपण दोघेहि बरोबरच मरूं. हें पहा, तुझें डोकें कापून कसें खालीं पाडतों ते!" असें म्हणून त्यानें आपल्याआंकड्यांनीं बगळ्याची मानगुटी दाबली. बगळ्याची बोबडी वळली, व डोळे पांढरे होण्याची पाळी आली. तो म्हणाला, "महाराज, माझ्यावर मेहेरबानी करा. मला जीवदान द्या. मी तुम्हांला सुरक्षित तलावांत पोहोंचवून देतों.

खेंकड्यांनें "ठीक आहे" असें उत्तर दिल्यावर बगळ्यानें त्याला नेऊन सरोवराच्या पाण्याच्या कांठीं हळूच चिखलावर ठेवलें. तेव्हां खेंकड्यानें कमळाच्या देंठाप्रमाणें त्याचा गळा कापून टाकला, व पाण्यांत प्रवेश केला. तेव्हां वृक्षदेवतेच्या रूपानें रहाणारा आमघा बोधिसत्त्व म्हणाला. "शठ आपल्या शाठ्यानें सदोदित सुखी होतो असें नाहीं. बकाला जसा खेंकडा भेटला तसा शठाला कोणीतरी भेटतोच."

——***——

अनुक्रमणिका

१९. हलकटाचें बल द्रव्य (३९)

(नंद जातक नं. ३९)

वाराणसी नगरींत ब्रह्मदत्तराजा राज्य करीत असतां बोधिसत्त्व एका गृहस्थाच्या कुळांत जन्मला होता. त्याच्या एका मित्रानें उतारवयांत लग्न केलें होतें; व त्या संबंधापासून त्याला एक मुलगा झाला. तेव्हां त्यानें असा विचार केला कीं, माझी बायको अद्यापि तरुण आहे, व मी जर मरण पावलों तर ती दुसरें लग्न करून घरांत असलेलें द्रव्य त्या नवऱ्याच्या स्वाधीन करण्यास मागें पुढें पहावयाची नाहीं, व त्यायोगें माझ्या मुलाची मोठी हानि होईल. म्हणून त्यानें नंद नांवाच्या आपल्या दासाकडून घरांतील सर्व द्रव्य जंगलांत नेववून एका ठिकाणीं पुरून ठेविलें. व तो नंदाला म्हणाला, "माझा मुलगा वयांत आल्यावर त्याला हें द्रव्य दाखवून दे; व त्याला सोडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं नकोस."

त्यानंतर कांही काळानें तो गृहस्थ मरण पावला. त्याचा मुलगा वयांत आल्यावर आई त्याला म्हणाली, "बाळ, तुझ्या पित्यानें नंद दासाकडून घरांतील द्रव्य कोठेंतरी गाडून ठेविलें आहे. तें नंदाला विचारून उकरून काढ, व त्याचा व्यापारधंद्यांत उपयोग कर."

तेव्हां तो मुलगा नंदाला म्हणाला, "नंद मामा, माझ्या वडिलांनीं पुरून ठेविलेलें कांही द्रव्य आहे काय?" नंदानें "होय" असें उत्तर दिलें. नंतर एके दिवशीं तें द्रव्य घेऊन येण्याच्या उद्देशानें कुदळ, टोपली वगैरे घेऊन ते दोघे जंगलांत गेले. तेथें ज्या जागीं धन पुरून ठेविलें होतें त्या जागीं उभा राहिल्याबरोबर नंद मोठ्या गर्वानें त्या मुलाला म्हणाला, "अरे दासीपुत्रा, ह्या ठिकाणीं धन तुला कोठून मिळणार?"

ह्याप्रमाणें जेव्हां जेव्हां द्रव्य आणण्याच्या हेतूनें ते दोघे अरण्यांत जात व नंद त्या ठिकाणीं उभा राही, तेव्हां तेव्हां तो ह्या तरुण मुलाला अनेक शिव्यागाळी देत असे. तरी नंदाच्या हातीं आपली किल्ली आहे हें जाणून तो मुलगा मोठ्या विचारानें त्याच्या त्या शिव्यागाळी सहन करीत असे. शेवटीं कंटाळून जाऊन तो आपल्या बापाच्या मित्रापाशीं—बोधिसत्त्वापाशीं—गेला; व त्यानें त्याला इत्थंभूत वर्तमान सांगितलें. तेव्हां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "द्रव्य पुरूनठेवलेली जागा सांपडणें कठीण नाहीं. ज्या ठिकाणीं उभा राहून नंद तुला शिव्यागाळी देतो, त्या ठिकाणींच तें धन पुरलेलें असावें. कां कीं, द्रव्याच्या सन्निध्यानें हलकटाला बळ चढतें. पुनरपि जेव्हां त्या ठिकाणीं राहून नंद तुला शिव्या देईल तेव्हां त्याला तेथून ओढून काढ, व तेथें खण म्हणजे तुला तें द्रव्य सांपडेल."

बोधिसत्त्वाच्या सल्ल्याप्रमाणें वागून, त्या तरुणानें तें द्रव्य आपल्या घरीं आणलें व त्याचा सदुपयोग केला.

——***——

अनुक्रमणिका

२०. सत्कर्मे करण्यास भिऊं नये.(४०)

(खदिरंगारजातक नं. ४०)

दुसरा एक ब्रह्मदत्त राजा वाराणशी नगरींत राज्य करीत असतां बोधिसत्त्व तेथल्या महाश्रेष्ठीच्या कुलांत जन्मला. तो मोठ्या परिवारासहवर्तमान वृद्धिंगत होऊन सोळा वर्षे होण्यापूर्वीच सर्व कलाकौशल्यांत निपुण झाला. पुढें कांहीं कालानें पित्याच्या मरणानंतर त्याला वाराणशी नगरींतीलश्रेष्ठीस्थान (मुख्य व्यापाऱ्याची जागा) मिळालें, व त्यानें आपल्या औदार्यानुरूप शहराच्या चारी बाजूस चार, मध्याला एक व आपल्या वाड्याशेजारीं एक अशा गोरगरीबांसाठीं सहा दानशाळा स्थापन केल्या. त्याशिवाय तो शीलाचें रक्षण करीत असे, व उपोसथाच्या दिवशीं उपोसथव्रत पाळीत असे.

एके दिवशीं माध्यान्ह भोजनापूर्वी बोधिसत्त्वाच्या द्वारासमोर एक बुद्ध भिक्षेसाठीं येऊन उभा राहिला. त्याला पाहून बोधिसत्त्व आपल्या आसनावरून उठला व त्याची पूजा करून आपल्या नोकराला त्यानें हांक मारली. नोकरानें 'महाराज काय आज्ञा आहे' असें म्हटल्यावर, बोधिसत्त्व म्हणाला, "आपल्या दारांत उभा असलेल्या आर्यांचें पात्र घेऊन ये."

त्याच क्षणीं मारानें तेथें येऊन ऐंशीं हात लांबीचा जळणाऱ्या कोळशांचा भयंकर खड्डा उत्पन्न केला. प्रत्येक—बुद्धाला भिक्षा मिळूं नये, व श्रेष्ठीच्या पुण्यकर्माला बाध यावा, अशी माराची इच्छा होती; म्हणून त्यानें हा खळगा आपल्या सामर्थ्यानें उत्पन्न केला. भिक्षापात्र आणण्यासाठीं गेलेला मनुष्य खदिरांगार परिंपूरीत अवीचि नरकासारख्या जळजळणाऱ्या त्या खड्ड्याकडे पाहून अत्यंत भयचकित होऊन मागें फिरला. बोधिसत्त्वानें त्याला मागें फिरण्याचें कारण विचारलें तेव्हां तो म्हणाला"धनीसाहेब, आपल्या दरवाजांत भयंकर आगीचा खड्डा उत्पन्न झाला आहे तेथून म्यां कसें जावें?" बोधिसत्त्वानें दुसऱ्या कित्येक नोकरांना प्रत्येक—बुद्धाचें भिक्षापात्र आणण्यास पाठविलें परंतु तो आगीचा खड्डा ओलांडून जाण्याचें एकालाहि धाडस झालें नाहीं. ते सर्व भयभीत होऊन पळाले.

तेव्हां बोधिसत्त्व स्वतः प्रत्येक—बुद्धाचें पात्र आणण्यासाठीं गेला व त्या जळणाऱ्या खड्ड्याच्या कांठावर राहून त्यानें इतस्ततः पाहिलें. अंतराळीं मार उभा होता त्याकडे वळून बोधिसत्त्व म्हणाला, "तूं कोण आहेस?" "मी मार आहें" मारानें उत्तर दिलें. "हा खड्डा तूं उत्पन्न केला आहेस काय?" श्रष्ठीनें विचारिलें. मारानें "होय." असें उत्तर दिल्यावर बोधिसत्त्वानें प्रश्न केला "हा खड्डा तूं कशासाठीं उत्पन्न केलास?" मार म्हणाल, "तुझ्या दानाला अंतराय व्हावा व प्रत्येक बुद्धाला भिक्षा मिळूं नये असा माझा उद्देश आहे." बोधिसत्त्व म्हणाला "या खड्यांतच नव्हे तर भयंकर नरकांत देखील खालीं डोकें आणि वर पाय करून पडण्याला मी तयार आहें, परंतु सत्कृत्यापासून परावृत्त होण्यास मी तयार नाहीं." असें बोलून प्रत्येक बुद्धाकडे वळून बोधिसत्त्व म्हणाला "भदंत, भिक्षेचें ग्रहण केल्यावाचून येथून जाऊं नका." असें बोलून बोधिसत्त्वानें आपल्या हातांत अन्नानें भरलेलें ताट घेतलें, व त्या प्रदीप्त खड्ड्यामध्यें उडी टाकली. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या अग्नीपासून बोधिसत्त्वाला कांहीच बाधा झाली नाहीं. जणूं काय बोधिसत्त्व कमल पुष्पाच्या राशींतूनच चालत गेला, व त्यानें प्रत्येक-बुद्धाचें पात्र अन्नानें भरलें.

अनुक्रमणिका

साधूंना सत्कर्मांच्या आड येणारीं विघ्नें आनंदच देत असतात! आगीच्या खाईं फुलाच्या राशींप्रमाणें वाटतात!!

अनुक्रमणिका

२१. भलत्याच मार्गानें उपजीविका करूं नये. (४२)

(कपोतजातक नं. ४२)

एकदां आमचा बोधिसत्त्व पारव्याच्या कुळांत जन्मला होता. त्याकाळीं वाराणशीनगरवासी लोक पुण्यबुद्धीनें पुष्कळ ठिकाणीं तुसानें भरलेल्या पिशव्या टांगून ठेवीत असत. हेतू एवढाच कीं त्या पिशव्यांत पक्ष्यांनीं आपलीं घरटीं करावीं. वाराणशीच्या महाश्रेष्ठीच्या स्वयंपाक्यानें देखील असली एक पिशवी आपल्या पाकशाळेंत टांगली होती. त्या पिशवींत आमचा बोधिसत्त्व रहात असे.

एके दिवशीं स्वयंपाक्यानें मत्स्यमांसादिक पदार्थ धुवून टाकलेल्या पाण्याच्या गंधानें लुब्ध झालेला एक कावळा आपला प्रवेश त्या पाकशाळेंत कसा होईल या विचारांत पडला, व तेथेंच जवळ बसून राहिला. बोधिसत्त्व नियमाप्रमाणें चरण्यासाठीं जंगलांत जात असतां त्याला त्या कावळ्यानें पाहिलें. व तो मनांत म्हणाला, "या पारव्याची संगती केली असतां श्रेष्ठीच्या महानसांतील मत्स्यमांसादिक पदार्थांचा आस्वाद घेण्यास संधि सांपडेल." दुसऱ्या दिवशीं बोधिसत्त्व बाहेर निघण्या पूर्वींच कावळा तेथें येऊन बसला, व बोधिसत्त्वाच्या मागोमाग जंगलांत शिरला. या कावळ्याच्याकृत्याचा अर्थ न समजल्यामुळें त्याला बोधिसत्त्व ह्मणाला, "कांरे बाबा, तूं माझ्या मागोमाग हिंडत आहेस?" कावळा ह्मणाला, "महाराज, तुमचें आचरण इतकें चांगलें आहे कीं, आजपासून तुमच्याच सेवेंत आयुष्य घालविण्याचा मी निश्चय केला आहे." बोधिसत्त्व म्हणाला, "पण आमचें दोघांचें जुळावें कसें. माझें भक्ष्य निराळें तुझें भक्ष्य निराळें. कावळा म्हणाला "महाराज, तुम्ही ज्यावेळीं आपला चारा शोधण्यासाठीं जाल त्यावेळीं मी देखील तुमच्या बरोबर जाऊन माझ्या पोटाची व्यवस्था करीन." वोधिसत्त्व म्हणाला, "असें असेल तर ठीक आहे. पण माझ्यासारखें तूं देखील मोठ्या सावधगिरीनें वागलें पाहिजे."

याप्रमाणें कावळ्याला उपदेश करून बोधिसत्त्व गवताच्या बीजावर आपली तृप्ति करूं लागला. कावळ्यानें देखील गाईच्या शेणांतील किड्यांवर आपला निर्वाह केला. संध्याकाळीं बोधिसत्त्वाबरोबरच तो त्या पाकशाळेंत आला. तेव्हां स्वयंपाक्यानें तो पारव्याचा मित्र असावा अशी कल्पना करून त्याच्यासाठीं दुसरी एक तुसाची पिशवी टांगून दिली. त्या दिवसापासून ते दोघेजण तेथें राहूं लागले.

एके दिवशीं श्रेष्ठीच्या घरीं पुष्कळ मासे आणि मांस आणलें होतें. स्वयंपाक्यानें तें पाकशाळेंत जिकडे तिकडे लोंबकळत ठेविलें. संध्याकाळीं कावळ्याची दृष्टी जेव्हां त्यावर पडली तेव्हां त्याच्या पोटांत दुखूं लागलें, व त्यावर कसा ताव मारितां येईल या विवंचनेंत त्यानें सारी रात्र घालविली. दुसऱ्या दिवशीं चरावयाला निघण्याच्या वेळेला बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "कावळेबुवा चला आतां; चरावयाला निघण्याची वेळ झाली." कावळा म्हणाला "महाराज, माझ्या पोटांत, दुखत आहे. तेव्हां तुम्हीच जा." बोधिसत्त्व म्हणाला "पण मित्रा, कावळ्याला पोटदुखीचा रोग झाला असें कोणीच ऐकिलें नाहीं; आणि कितीही खाल्लें तरी त्याची तृप्ति होते असेंहि नाहीं. पण मला वाटतें आज तुझी दृष्टी या माशांवर व मांसावर गेल्यामुळें तुझ्या या पोटदुखीला आरंभ झाला असावा. हें मनुष्याचें भक्ष्य आहे, व आमच्यासारख्या आश्रिताचें भक्ष्य नाहीं हें लक्षांत ठेव, आणि अशा पदार्थावर कुदृष्टि न ठेवितां रोजच्याप्रमाणें माझ्याबरोबर चरावयाला चल." कावळा म्हणाला "तुम्ही म्हणतां हें मला कबूल आहे परंतु तुमच्याबरोबरजाणें आज अगदींच अशक्य आहे. पारवा म्हणाला, "असें आहे तर तूं येथेंच रहा. पण निदान लोभाला वश होऊन घातक कर्म करूं नकोस!"

अनुक्रमणिका

बोधिसत्त्व चरण्यासाठीं बाहेर गेल्यावर कावळा स्वयंपाक घरांत काय प्रकार चालला हें हळूच मान वर काढून पहात बसला. स्वयंपाक्यानें सर्व पाकाची सिद्धता करून ठेविली, व तो विश्रांतीसाठीं थोडा वेळ स्वयंपाकघराबाहेर पडला. ही संधी साधून कावळा आपल्या निवासस्थानांतून बाहेर पडला, आणि विचार करूं लागला कीं, मांसाचे लहान तुकडे खावे किंवा एकदम एखादा मोठा तुकडा लांबवावा. शेवटीं, एखादा मोठा तुकडा घेऊन पिशवींत जाऊन बसण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु स्वयंपाक्यानें मांसाचे तुकडे झांकून ठेविले होते त्यावरील झांकण जेव्हां कावळ्यानें खालीं पाडलें तेव्हां स्वयंपाक्याला संशय येऊन तो आंत शिरला. त्यानें कावळ्याचें दुष्ट कृत्य पाहिलें, व तो आपणाशींच म्हणाला, “माझ्या धन्यासाठीं तयार केलेलें पक्वान्न हा दुष्ट कावळा खाऊं पहात आहे! जणूं काय हाच माझा धनी आहे! तेव्हां आतां या खळाला भरपूर प्रायश्चित्त दिल्यावांचून रहातां कामा नये!” त्यानें दारें आणि खिडक्या बंद करून कावळ्याला पकडलें व त्याची पिसें उपटून आल्याच्या रसांत मीठ आणि जिऱ्याची पूड मिसळून त्याच्या अंगाला लेप दिला; आणि त्याला त्या पिशवींत टांकिलें. कावळा अत्यंत पीडित होऊन तेथें तळमळत पडला!

बोधिसत्त्व बाहेरून संध्याकाळी परत आल्यावर त्याची ती अत्यंत हृदयद्रावक दुर्दशा पाहून म्हणाला, “अरे लोभी कावळ्या, तूं माझें वचन न ऐकल्यामुळें या संकटांत पडलास? जो आपल्या हितमित्राचें वचन ऐकत नाहीं, व लोभाला वश होऊन खोट्या मार्गानें आपली उपजीविका करूं पाहतो त्याची गत अशीच होत असते.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

२२. दुष्टाला आश्रय देऊं नये. (४३)

(वेळुक जातक नं. ४३)

एकदां बोधिसत्त्व काशीराष्ट्रामध्यें एका मोठ्या धनाढ्य कुळांत जन्मला होता. वयांत आल्यावर प्रापंचिक सुखें तुच्छ वाटून आणि वैराग्यसुख श्रेष्ठ वाटून त्यानें तापसवेश स्वीकारला व हिमालयाचा मार्ग धरिला. तेथें त्याची फार ख्याती होऊन त्याच्याजवळ पुष्कळ तपस्वी शिष्यभावानें राहूं लागले.

त्या प्रदेशांत एका तपस्व्याच्या आश्रमांत एके दिवशीं एक काळसर्पाचें पिल्लूं रांगत रांगत आलें. त्या तपस्व्याला त्याचें मोठें कौतुक वाटून त्यानें त्या बालसर्पासाठीं एक वेळवाचें नळकांडें तयार केलें, व त्यांत गवत वगैरे घालून त्या पोराची रहाण्याची सोय करून दिली. वेळूच्या नळकांड्यांत रहात असल्यामुळें त्या सापाला वेळुक असें नांव पडलें व त्या तपस्व्याला सर्व तपस्वी थट्टेनें वेळुकपिता असेंम्हणूं लागले.

बोधिसत्त्वाला हें वर्तमान समजल्यावर तो त्या तपस्व्याजवळ गेला, आणि त्यानें त्याच्या या कृत्याचा निषेध केला. तो म्हणाला, "कालसर्पाबरोबर तूं सहवास करितोस हें खरें आहे काय?" तपस्वी म्हणाला, "होय महाराज, ही गोष्ट खरी आहे. माझें त्याच्यावर फार प्रेम आहे." बोधिसत्व म्हणाला, "भलत्यावर प्रेम करून त्याला आश्रय देणें हें मोठें धोक्याचें आहे. या सापाकडून तुझ्या जीविताला अंतराय घडला तर त्यांत मला मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं." त्या तपस्व्याला बोधिसत्वाचा उपदेश रुचला नाहीं. त्यानें त्या सर्पाचा त्याग न करितां खाऊं पिऊं घालून तसाच वाढविण्याचा क्रम चालविला.

एके दिवशीं त्या भागांतील सर्व तपस्वी फळमूलाचा शोध लावण्यासाठीं दूरच्या प्रदेशांत गेले होते. तेथें चांगलीं फळें सांपडल्यामुळें त्यांनीं दोन तीन दिवस मुक्काम केला. पुनः परत आल्यावर वेळुकपित्याला आपल्या वेळुकाची आठवण होऊन तो त्या वेळूच्या नळकांड्याकडे धांवत गेला आणि हात पुढें करून मोठ्या सद्‌गदित स्वरानें म्हणाला, "बाळा, वेळुका, आज दोन दिवस तुझी मीं हेळसांड केली. माझ्या वियोगानें तुला किती तरी दुःख झालें असेल. चल, बाहेर ये. मी तुला खाऊं घालतों." तोभुकेलेला साप अत्यंत चवताळून वेळूच्या नळकांड्यातून बाहेर पडला आणि कडाडून तपस्व्याच्या हाताला चावला! बिचारा तपस्वी शेवटले शब्दहि उच्चारूं शकला नाहीं! तो तेथेंच जमिनीवर पडून प्राणाला मुकला! तें पाहून खळाला आश्रय दिल्याचें हें फळ आहे असें सर्व तपस्वी म्हणूं लागले.

——✳✳✳——

अनुक्रमणिका

२३. शहाणा शत्रू बरा, पण मूर्ख मित्र नको! (४४)

(मकस जातक नं. ४४)

प्राचीनकाळीं काशीराष्ट्रांत एका खेडेगांवीं पुष्कळ सुतार रहात असत. त्यांतील एकजण आपल्या कामांत गढून गेला असतां त्याच्या डोक्यावर एक माशी येऊन बसली, व ती त्याला फार त्रास देऊं लागली. त्याचे दोन्ही हात गुंतल्यामुळें तो जवळ असलेल्या आपल्या तरूण मुलाला म्हणाला “मुला ही माशी मला मघांपासून फार त्रास देत आहे. तिला जरा घालवून दे पाहूं.” मुलगा म्हणाला, “बाबा, जरा थांबा; मी त्या माशीचा एकदम निकालच लावून टाकतों.” असें म्हणून त्यानें जवळ असलेली तीक्ष्ण धारेची कुऱ्हाड उचलली व बापाच्या मागल्या बाजूला जाऊन माशीला मारण्यासाठी त्याच्या डोक्यावर मारिली. माशी उडून गेलीच; पण सुताराच्या डोक्याचीं मात्र दोन शकलें झालीं! तो तत्काळ प्राणास मुकला.

आमचा बोधिसत्त्व त्या काळीं व्यापारी कुलांत जन्मला होता, व आपल्या उद्योगधंद्यासाठीं तो या ठिकाणीं आला होता. या मूर्ख पोराचें हें कृत्य पाहून तो तेथें जमलेल्या सुताराला म्हणला, “बाबानों शहाणा शत्रू पुरवला, परंतु मूर्ख मित्र नको आहे! या मूर्ख पोरानें आपल्या पित्याची कामगिरी बजावीत असतां त्याचाच नाश करून टाकला!”

——✵✵✵——

अनुक्रमणिका

२४. मूर्खावर आपलें काम सोपवूं नये. (४३)

(आरामदूसक जातक नं. ४३)

एका काळीं वाराणसी नगरींत उत्सवाची उद्‌घोषणा करण्यांत आली होती. त्या दिवसापासून सर्व लोकांनीं उत्सवास सुरवात केली. पण राजाच्या बगीच्यांतील माळ्यास आपलें काम टाकून या उत्सवास जातां येईना. पुढें त्याला अशी एक युक्ति सुचली कीं, आपल्या उद्यानांत रहाणाऱ्या वानरांच्या टोळीवर बगीच्याला पाणी देण्याचें काम सोपवून आपण एक दिवस तरी उत्सवाला जावें. तो त्या टोळींतील मुख्य वानराला म्हणाला, “मित्रा या उद्यानापासून मला जसा फायदा आहे तसा तो तुम्हाला देखील आहे. येथील फलपर्णादिक खाऊन तुम्ही आपला निर्वाह करितां. तेव्हां एक दिवस माझें थोडें काम करणें तुमचें कर्तव्य आहे.

तो वानर म्हणाला “आपलें काय काम आहे तें आम्हांस समजावून द्या म्हणजे आम्हाला शक्य असेल तें आम्हीं करूं.”

माळी म्हणाला “तुम्ही या झाडाच्या रोप्यांना आजचा दिवस तेवढें पाणी द्या म्हणजे तेवढ्या अवधींत मी उत्सवाची थोडी मौज पाहून माघारी येतों. तो वानर म्हणाला” ठीक आहे, आम्ही मोठ्या संतोषानें हें काम करितों.

माळी पखाली आणि लांकडाचीं भांडीं वानरांच्या स्वाधीन करून शहरांत गेला. इकडे मुख्य वानर आपल्या टोळींतील वानरांला म्हणाला, “आमच्यावर सोपविलेलें काम आम्हीं मोठ्या शिताफीनें केलें पाहिजे. येथल्या पाण्याचा अपव्यय न करितां तें मोठ्या काटकसरीनें वापरलें पाहिजे, नाहींतर आम्हास आणि बागवानाला पाण्यासाठीं त्रास सोसावा लागेल. तेव्हां तुम्ही झाडाच्या रोपांला पाणी देत असतांना त्यांच्या मुळाच्या प्रमाणानें पाणी देत जा. ज्यांचीं मुळें खोल गेलीं असतील त्यांना जास्ती पाणी द्या व ज्यांचीं उथळ असतील त्यांना कमी द्या.”

वानरांनीं आपल्या पुढाऱ्याच्या आज्ञेप्रमाणें सर्व रोपें उपटून पाहून त्यांच्या मुळांच्या प्रमाणावर त्यांस पाणी दिलें!

या वानरांच्या कृत्यामुळें बिचाऱ्या बागवानाचें किती नुकसान झालें असेल याची कल्पनाच केली पाहिजे! मूर्खावर जो आपल्या कामाचा भार टाकतो त्याची शेवटीं अशीच हानि होते!!

——***——

अनुक्रमणिका

२५. आपल्या सामर्थ्याचा अकालीं उपयोग करूं नये. (४८)

(वेदब्भ जातक नं. ४८)

प्राचीनकाळीं काशीराष्ट्रांतील एका गांवीं एक ब्राह्मण रहात असे. त्याला वैदर्भ नांवाचा एक मंत्र अवगत होता. त्या मंत्राचें सामर्थ्य असें होतें कीं नक्षत्रयोग जाणून त्याचा जप केला असतां आकाशांतून सुवर्णरजतादिक पदार्थांची वृष्टि होत असे. आमचा बोधिसत्त्व या ब्राह्मणाचा शिष्य होता. एके दिवशीं ते दोघे कांहीं कारणानिमित्त चैत्यदेशाला जाण्यासाठीं निघाले. वाटेंत एका जंगलांत त्याला पांचशें चोरांनीं गांठलें.

या चोरांना ओलीस धरणारे चोर असें म्हणत असत. कां कीं जेव्हां त्यांच्या हातीं पिता आणि पुत्र सांपडत तेव्हां हे पुत्राला ठेवून घेऊन पित्याला द्रव्य आणण्यासाठीं घरी पाठवीत असत, ज्येष्ठ आणि कनिष्ठ भाऊ हातीं लागले असतां ज्येष्ठाला घरीं पाठवीत व कनिष्ठाला ओलीस धरून त्यांजकडून द्रव्य मिळवीत असत म्हणून त्यांना ओलीस धरणारे चोर असें म्हणत असत.

या चोरांनीं बोधिसत्त्वाला आणि वैदर्भमंत्रवेत्त्या ब्राह्मणाला जेव्हां पकडलें, तेव्हां गुरूला ओलीस धरून शिष्याला (बोधिसत्त्वाला) द्रव्य आणण्यासाठीं घरीं पाठविलें. जातांना बोधिसत्त्व आपल्या गुरूस एकीकडे नेऊन हळूच म्हणाला, “आज पुष्कळ वर्षांनी आकाशांतून सुवर्णरजतादिकांची वृष्टि आपल्या मंत्रभावानें होईल असा नक्षत्र-योग आला आहे. परंतु आपण या प्रसंगीं आपल्या मंत्राचा बिलकूल उपयोग करूं नये. जर आपण अशा भलत्याच वेळीं मंत्रजप कराल तर आपली आणि या सर्व चोरांची अत्यंत हानि होईल. तेव्हां यांनीं जरी आपणाला थोडाबहुत त्रासदिला तरी तो सहन करा. मी एक दोन दिवसांत पैसे घेऊन परत येईपर्यंत दम धरा.

आपल्या गुरूला याप्रमाणें सांगून बोधिसत्त्व तेथून निघून गेला. सूर्यास्तानंतर चोरांनी ब्राह्मणाचे हातपाय बांधून त्याला खालीं निजविलें. इतक्यांत पूर्व दिशेला अलंकृत करणाऱ्या पूर्णचंद्राचा उदय झाला. ब्राह्मणानें आकाशाकडे पाहिलें, आणि नक्षत्रयोग बरोबर जुळून येत आहे असें जाणून तो आपणाशींच म्हणाला, “या विपत्तींत पडण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं. येऊन जाऊन चोरांला पाहिजे आहे तें धन. आपण जर यांना आताच्या आतां दिलें तर ते मला मोकळें करतील, व मी त्रासांतून मुक्त होईन.” तो चोरांना म्हणाला “चोर हो, माझे हे हाल तुम्ही कां करितां?”

चोर म्हणाले “द्रव्यप्राप्तीवांचून, दुसरा आमचा कोणताही हेतु नाहीं.”

ब्राह्मण म्हणाला, “एवढेंच जर असेल तर मला या बंधनांतून मोकळें करा, व न्हाऊं घालून नूतन वस्त्र परिधान करवून गंध पुष्पांनीं माझें शरीर सजवून मला आसनावर बसवा.”

चोरांनीं त्याच्या सांगण्याप्रमाणें केल्यावर ब्राह्मणानें मंत्रजप करून आकाशाकडे पाहिलें. तत्क्षणीं आकाशांतून सुवर्णरजतादिकांचा पाऊस पडला! चोरांनीं तें द्रव्य गोळा करून आपल्या उपरण्यांनीं गांठोडीं बांधिलीं व तेथून प्रयाण केलें. ब्राह्मणाला त्यांनीं तेथेंच सोडून दिलें.

त्या चोरांला वाटेंत दुसऱ्या पांचशें चोरांनीं गांठलें, व त्यांचीं मोठमोठालीं गोंठोडीं पाहून ते त्यांना म्हणाले, “हें द्रव्य तुम्ही कसें मिळविलें? याचा जर आम्हास वांटा द्याल तरच तुम्हास आम्हीं सोडून देऊं; नाहीं तर सर्वांना येथें ठार करूं.”

द्रव्याचीं गांठोडीं वहाणारे चोर म्हणाले, “बाबांनो, आमच्याशीं लढाई करून आमच्या नाशाला कां प्रवृत्त होतां? हा आमच्या मागोमाग येणारा ब्राह्मण केवळ आकाशाकडे पाहून द्रव्याचा पाऊस पाडूं शकतो! त्यानेंच मंत्रसामर्थ्यानें हें धन आम्हास दिलें आहे.”

तेव्हां त्या रिकाम्या चोरांनीं धनवान चोरांना सोडून देऊन त्यांच्या मागोमाग जाणाऱ्या ब्राह्मणास गांठलें, व ते त्याला म्हणाले “हे ब्राह्मणश्रेष्ठा, मंत्रसामर्थ्याच्या योगानें तूं धनाची वृष्टि करूं शकतोस असें आमच्या व्यवसाय बंधूंनीं आम्हाला सांगितलें आहे. तेव्हा आतां मंत्राचा जप करून द्रव्याचा पाऊस पडेल असें कर.”

ब्राह्मण म्हणाला “चोरहो, मीं तुह्माला मोठ्या खुषीनें द्रव्य दिलें असतें; परंतु या वर्षी नक्षत्राचा योग जुळून येण्याचा संभव दिसत नाहीं. पुढल्या वर्षी जर तुम्हीं मला भेटाल, तर नक्षत्राचा योग पाहून मीं तुमच्यावर सुवर्णादिकांचा पाऊस पाडीन.”

हे ब्राह्मणाचे शब्द ऐकून चोर अत्यंत संतापले, व त्यांनीं तेथेंच त्या ब्राह्मणाचा वध केला. पुढें गेलेल्या चोरांजवळ अवजड गांठोडीं असल्यामुळें ते त्वरेनें जाऊं शकले नाहींत. त्या रिकाम्या चोरांनीं त्यांजवर एकाएकीं घाला घालून सर्वांना ठार मारलें, व सर्व धन हिरावून घेतलें. पुनःया पांचशें चोरांत दोन तट पडून कलहास सुरुवात झाली, व परस्परांत यादवी माजून दोन सोडून बाकी सर्व चोरांचा नाश झाला! शिल्लक राहिलेल्या दोन चोरांनीं असा विचार केला कीं, हें धन घरीं घेऊन जाणें शक्य नाहीं. तेव्हां तें या अरण्यांतच कोठेंतरी लपवून ठेवावें. त्यांनीं तीं सर्व गांठोडीं एका गुहेंत गोळा केलीं व एक नागवी तरवार घेऊन तेथें पहारा करण्यास उभा राहिला. दुसरा जेवण घेऊन येण्यासाठीं गांवांत गेला.

लोभ विनाशाचें मूळ होय. पहारा करणाऱ्या चोरांच्या मनांत असा विचार आला कीं, “हा दुसरा चोर परत आल्यावर मला या धनाचा अर्धा वांटा त्याला द्यावा लागेल त्यापेक्षां तो येथें येतांच जर मीं त्याला ठार केलें तर हें सर्व धन माझ्या एकट्याच्या मालकीचें होईल.” गांवांत गेलेल्या चोरानें विचार केला कीं, “त्या धनाचे दोन भाग होण्यापेक्षां तें सर्व आपणालाच मिळालें तर फार चांगलें” परत येतांना त्यानें आपल्या साथीदारासाठीं आणलेल्या जेवणांत तीव्र विष घातलें. तो जवळ आल्याबरोबर पहारा करणाऱ्या चोरानें त्याचीं दोन शकलें केलीं, व स्वतः तें विषमिश्रित अन्न खाऊन मरण पावला!

बोधिसत्त्व एक दोन दिवसांनीं तेथें आला व त्यानें आपल्या गुरूचें मार्गांत पडलेलें प्रेत पाहिलें. पुढें वाटेंत चोरांचीं प्रेतें आढळलीं. तसाच सुगावा काढीत काढीत तो त्या गुहेच्या द्वाराशीं आला, व तेथें घडलेले प्रकार पाहून त्यानें चोरांची वाट कशी झाली याचें अनुमान केलें, आणि हे उद्गार काढले, “आमच्या आचार्यांनीं आपल्या सामर्थ्याचा अकालीं उपयोग केल्यामुळें ही अनर्थपरंपरा ओढवली! भलत्याच वेळीं सामर्थ्याचा उपयोग करूं नये हा धडा या गोष्टीपासून शिकला पाहिजे.”

बोधिसत्त्वानें तें धन आपल्या घरीं नेलें, व दानधर्म करून सदाचरणानें आयुष्याचा सदुपयोग केला.

[अनुक्रमणिका](#)

२६. विश्वासघातकी राजा. (७३)

(सच्चंकिर जातक नं. ७३)

काशीच्या राजाला एक मुलगा झाला. लहानपणीं तो हूड असल्यामुळें त्याला दुष्टकुमार हेंच नांव पडलें. राजवाड्यांतल्या सर्व नोकरांना तसाच नगरवासी लोकांना तो फार त्रास देत असे. त्यामुळें सर्वांनीं डोळ्यांतील खड्याप्रमाणें किंवा आपणाला खाण्यास आलेल्या पिशाच्याप्रमाणें तो अप्रिय झाला होता. एके दिवशीं तो आपल्या नोकराबरोबर जलक्रीडा करण्यासाठीं नदीवर गेला. त्याचवेळीं एकाएकीं मोठा पाऊस पडण्यास सुरवात झाली. सर्व प्रदेशांत अंधकार पसरला. तेव्हां तो आपल्या नोकराला म्हणाला “मला या वेळीं नदींत उतरण्यास मदत करा” त्यानीं त्याला नदींत नेऊन पूर आला असतां तेथेंच टाकून दिलें, व ते म्हणाले, “असल्या पापी माणसाला येथें सोडून दिलें तर राजाला त्याची बातमी देखील समाजावयाची नाहीं. अरे दरिद्री पोरा, तुझ्या कर्माप्रमाणें तूं जा.” नदीवरून परत आल्यावर त्यांना “आपला मुलगा कोठें आहे” असा प्रश्न केला. तेव्हां ते म्हणाले, “महाराज महामेघामुळें आम्हाला कांहीं दिसेनासें झालें, व आमच्यापूर्वींच नदींतून वर निघून कुमार वाड्यांत आला असावा अशा समजुतीनें आम्हीं मागोमागधांवत धांवत आलों. पण येथें पहातों तों कुमाराचा पत्ता नाहीं.” राजा परिवारासह नदीतीरीं गेला व त्यानें तेथें कुमाराचा पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ! त्याचा मुळींच पत्ता लागला नाहीं.

इकडे तो राजकुमार पुरांत सांपडून वहात चालला असतां नदींतून येणारें एक झाड त्याच्या हातीं आलें. त्याच्यावर बसून मरणाच्या भयानें आरडत ओरडत तो तसाच नदीच्या ओघानें वहात चालला होता. त्याच नदीच्या कांठीं एक सर्प रहात असे. त्याचा पूर्वजन्मींचा इतिहास असा होता कीं, तो एक धनाढ्य व्यापारी होता, व त्यानें चाळीस कोटी कार्षापण जमिनींत पुरून ठेविले होते. त्या धनलोभामुळें या जन्मीं साप होऊन तेथें रहात होता. आणखी एक दुसरा व्यापारी त्याच नदीच्या कांठीं तीस कोटी कार्षापण पुरून ठेवून या जन्मीं उंदीर झाला होता, व तो त्या ठेव्यावर आपलें बीळ करून रहात होता. त्या दोन्ही प्राण्यांच्या बिळांत पाणी शिरल्यामुळें ते बाहेर पडले, व नदीच्या पुरांत सांपडून वहात चालले. राजकुमार बसलेल्या झाडाचा त्यांनांहि आश्रय मिळाला. त्या दोघांनीं त्या झाडाच्या दोन टोंकांवर आरोहण केलें. तिसरा एक पोपट त्याच नदीकाठीं सांवरीच्या झाडावर घरटें करून रहात असे. नदीच्या वेगानें तो वृक्ष उन्मळून नदींत पडला, व बिचाऱ्या पोपटाचें घरटें नदींत बुडालें. पोपट कसाबसा आपल्या घरट्यांतून बाहेर निघाला; पण पाण्यानें पंख भिजल्यामुळें व पाण्यांत गुदमरल्यामुळें त्याला उडतां येईना. राजकुमार बसलेलें झाड वहात येत असतां जीव रक्षणाच्या कामीं त्यालाहि उपयोगीं पडलें. तो एका लहानशा फांदीवर बसून राहिला.

आमचा बोधिसत्त्व त्याकालीं औदिच्य ब्राह्मण कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर प्रपंचांत दोष दिसून आल्यामुळें गृहस्थाश्रम न स्वीकारितां त्यानें अरण्यवास पतकरिला. याच नदीच्या कांठीं तो आपला आश्रम बांधून रहात असे. मध्यरात्रींच्या सुमारास राजपुत्राचा आक्रोश ऐकून बोधिसत्त्वाला त्याची कींव आली, व तो म्हणाला, “हे पुरुषा, तूं रडूं नकोस. मी या संकटांतून तुला पार पाडतों.” बोधिसत्त्व पोहण्यांत अत्यंत पटाईत होता. त्यानें त्या महापुरांत उडी टाकून राजपुत्राला झाडासकट तीरावर आणलें, व पहातो तों त्याला त्या झाडावर असलेले सर्पादिक तीनप्राणी आढळले. राजपुत्राला आणि त्या प्राण्यांला त्यानें आपल्या आश्रमांत नेलें. ते सगळे हवेनें व पावसानें गारठून गेले होते. त्यांच्या अंगीं मुळींच त्राण राहिलें नव्हतें. त्यांतल्या त्यांत राजकुमाराला इतरांइतकी इजा झाली नव्हती म्हणून तापसानें प्रथमतः त्या मुक्या प्राण्यांस आपल्या अग्निकुंडाजवळ नेऊन ठेविलें व नंतर राजकुमाराला आपल्या वस्त्रांनीं पुसून काढून दुसरीं

अनुक्रमणिका

वस्त्रें परिधान करण्यास देऊन आगीजवळ बसविलें. पुढें त्यांच्या अंगीं थोडी ताकत आल्यावर साप, उंदीर आणि पोपट या तिघांना त्यानें थोडें थोडें खाऊं घातलें, व नंतर राजकुमाराला आश्रमांत असलेले फलमूलादिक जिन्नस खावयास दिले. पण हें त्याचें कृत्य राजकुमारास मुळींच आवडलें नाहीं. तो मानंतल्या मनांत म्हणाला, "हा तापस अत्यंत नीच आहे. मी या प्रदेशाच्या राजाचा मुलगा असून माझा समाचार प्रयमतः न घेतां, हा क्षुद्र प्राण्यांची शुश्रूषा करीत आहे. या मूर्खाला माझी योग्यता मुळींच समजत नाहीं. यदाकदाचित् मी वाराणशीचा राजा झालों, तर या जोगड्याचा चांगला समाचार घेतल्यांवांचून राहणार नाहीं."

कांहीं दिवस राजकुमार आणि ते तीन प्राणी बोधिसत्त्वाच्या आश्रमांत राहिले, व पाऊस कमी झाल्यावर आणि अंगी ताकत आल्यावर तेथून आपापल्या ठिकाणीं जावयास निघाले. जातांना सर्प बोधिसत्त्वाला म्हणाला, "तापसमहाराज, तुम्ही माझ्यावर फार मोठा उपकार केला आहे. तो सर्वस्वी जरी मला फेडतां येणें शक्य नाहीं, तथापि मी भिकारी नाहीं. माझ्या बिळाजवळ पूर्वजन्मीं पुरून ठेविलेलें पुष्कळ धन आहे. जर तुम्हाला त्या धनाचा उपयोग होण्यासारखा असेल, तर तुम्ही माझ्या बिळाजवळ येऊन मला हे सर्पा अशी हांक मारा म्हणजे मी तुम्हास ती जागा दाखवून देईन." असें बोलून व आपल्या बिळाची जागा कोणत्या ठिकाणीं हे बोधिसत्त्वाला समजावून देऊन सर्प तेथून निघून गेला.

नंतर उंदीर पुढें येऊन म्हणाला, "महाराज आपले उपकार मी कधींही विसरणार नाहीं. पूर्वजन्मीं ३० कोटी कार्षापण मी गाडून ठेविले आहेत. या धनानें जर तुमच्या उपकाराची थोडीबहुत फेड होण्यासारखी असेल तर तें सर्व मी तुम्हास देण्यास तयार आहें. तुम्ही माझ्या बिळाजवळ येऊन मला उंदीर म्हणून हांक मारा म्हणजे मी तुम्हालामाझा ठेवा दाखवून देईन." असें बोलून व आपला पत्ता बोधिसत्त्वाला सांगून तोहि सर्पाच्या मागोमाग निघून गेला.

तेव्हां पोपट म्हणाला "महाराज, माझ्याजवळ धनद्रव्य कांहीं नाहीं. पण तुम्हाला जर तांदुळांची जरूर लागेल तर माझ्या रहाण्याच्या जागीं येऊन मला पोपटा म्हणून हाक मारा. मी आपल्या जातभाईनां सांगून हिमालयांतून उत्तम साळीचीं कणसें वाटेल तेवढीं तुम्हाला आणून देत जाईन." आपला पत्ता सांगून तोहि तेथून उडून गेलां.

तदनंतर दुष्ट राजकुमार म्हणाला, "भदंत, मी राजा झालों, तर तुम्ही वाराणसीला या. मी तुमची सर्व व्यवस्था लावून देईन. व तुम्हाला मोठ्या सत्कारानें माझ्या राज्यांत ठेऊन घेईन." असें सांगून तोहि आपल्या राजधानीला गेला.

पित्याच्या मरणानंतर या राजकुमाराला गादी मिळाल्याचें वर्तमान बोधिसत्त्वाला समजलें. तेव्हां त्याची आणि त्याजबरोबर सर्प, उंदीर आणि पोपट या सर्वांची परीक्षा पाहण्यासाठीं तो आश्रमांतून निघाला, व प्रथमतः सर्प रहात होता त्या ठिकाणीं आला. सर्पा, म्हणून हाक मारल्याबरोबर बोधिसत्त्वाचा शब्द ओळखून सर्प बिळांतून बाहेर पडला, व नमस्कार करून बोधिसत्त्वाला म्हणाला, "भदंत, या ठिकाणीं चाळीस कोटी कार्षापण आहेत. ते आपल्या सवडीप्रमाणें घेऊन जा."

बोधिसत्त्व म्हणाला, "ठीक आहे. जेव्हां मला गरज पडेल, तेव्हां या गोष्टीचा विचार करितां येईल. सध्यां तूं येथेंच रहा."

अनुक्रमणिका

सर्पाला मागें फिरवून बोधिसत्त्व उंदिराजवळ गेला, व त्याला हाक मारून त्यानें बाहेर आणिलें. सर्पाप्रमाणें उंदिरानेंहि बोधिसत्त्वाचें उत्तम आदरातिथ्य केलें, व आपल्याजवळ असलेलें धन घेऊन जाण्यास विनंति केली. त्याला तेथेंच रहाण्यास सांगून बोधिसत्त्व पोपटाजवळ गेला. बोधिसत्त्वाला पाहून पोपट झाडाच्या अग्रावरून खालीं उतरला व नमस्कार करून म्हणाला, "भदंत, तुम्हाला उत्तम तांदुळाची गरज असेल, तर माझ्या जातभाईंबरोबर हिमालयावर जाऊन मी तेथें आपोआप वाढणाऱ्या साळींचीं कणसें घेऊन येतों."

बोधिसत्त्व म्हणाला, "तुमच्याबरोबर माझ्या आश्रमांत आलेला राजकुमार आतां या राष्ट्राचा राजा झाला आहे. त्याला भेटण्यासाठीं मी जात आहे. सध्यां मला तांदुळाची गरज नाहीं. पुढें पाहतां येईल."

पोपटाचा निरोप घेऊन बोधिसत्त्व वाराणसीला गेला. त्या दिवशीं राजाच्या उद्यानांत राहून दुसऱ्या दिवशीं स्नान वगैरे करून भिक्षेसाठीं नगरांत फिरूं लागला. त्यावेळीं तो दुष्ट राजा हत्तीच्या अंबारींत बसून नगर प्रदक्षिणेला निघाला होता. बोधिसत्त्वाला पाहून त्याचें पित्त खवळलें. तो मनांतल्या मनांत म्हणाला, "हा पाजी तापस खाऊन खाऊन लठ्ठ होण्यासाठीं मजपाशीं आला आहे. त्याला याच्या दुष्टपणाचें प्रायश्चित्त ताबडतोब दिलें पाहिजे नाहीं तर आपण केलेले उपकार लोकांना सांगून तो माझ्याविषयीं त्यांचीं मनें कलुषित करील." आपल्या नोकरांकडे वळून तो म्हणाला, "सेवक हो, हा दुष्ट तापस माझ्यापासून कांहीं तरी लाभ व्हावा म्हणून माझ्यामागें घिरट्या घालीत आहे; पण या भिकारड्याचें तोंड देखील मी पाहूं इच्छित नाहीं. याला येथून एकदम घेऊन जा, व प्रत्येक चौकांत फटके मारून शहराच्या बाहेर नेऊन याचा शिरच्छेद करा."

राजाच्या तोंडांतून शब्द बाहेर पडण्याचा अवकाश–त्या सेवकांनीं कांहीं एक विचार न करितां बोधिसत्त्वाला आपल्या हातांनीं बांधून प्रत्येक चौकांत फटके मारण्यास सुरुवात केली, पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, बोधिसत्त्व आईआई म्हणून न ओरडतां संतोष वृत्तीनें खालील गाथा म्हणत असे–

सच्चं किरेवमाहंसु नरा एकच्चिया इध।
कट्ठं निप्लवितं न त्वेवेकच्चियो नरो॥

(**अर्थ** :—कांहीं शहाणे लोक म्हणत असत कीं, नदींतून लांकडाला तारलेलें चांगलें; पण तशा एखाद्या माणसाला तारणें चांगलें नाहीं. या त्यांच्या म्हणण्याचा प्रत्यय मला आज येत आहे.)

ती ऐकून बोधिसत्त्वाच्या भोंवतीं गोळा झालेले कांहीं शहाणे लोक म्हणाले, "भो तापस, तुझ्या या बोलण्याचें आम्हाला आश्चर्य वाटतें. तुझा आणखी आमच्या राज्याचा कांहीं संबंध आहे काय?"

बोधिसत्त्वानें राजा तरुणपणीं प्रवाहांत सांपडून वहात जात असतां आपण त्याला कसें वांचविलें इत्यादि वर्तमान त्यांस सांगितलें. दुष्ट कुमार लहानपणीं प्रवाहांत सांपडला होता ही गोष्ट नागरिकांना माहीत होती. तेव्हां तपस्व्याचें बोलणें त्यांना पटलें, व ते परस्परांला म्हणाले, "अशा तऱ्हेच्या धैर्यशाली मनुष्याला कांहीं एक दोष नसतां आमचा हा मूर्ख राजा मारूं पहात आहे. अशा कृतघ्न राजाचा आश्रय केल्यानें आमच्या राष्ट्राची वृद्धि कशी होईल. याचक्षणीं त्याला धरून या तापसाच्या ऐवजीं ठार मारणें योग्य होईल." सर्व नागरिक राजाच्या दुर्वर्तनाला कंटाळलेच होते. यावेळीं त्यांचा क्षोभ इतका तीव्र झाला कीं,

त्यांनीं प्रदक्षिणा करणाऱ्या आपल्या राजाला अंबारींतून खालीं ओढून रस्त्यांतच त्याचा वध केला, व बोधिसत्त्वाला बंधनमुक्त करून गादीवर बसविलें. त्यानें राज्याची व्यवस्था धर्मन्यायानें लाविली. तथापि, दुष्ट राजाच्या अव्यवस्थेमुळें राष्ट्रांत पैशाची फार टंचाई पडली होती. पण बोधिसत्त्वाच्या मित्रांनीं– सर्पानें आणि उंदिरानें– आपल्या संग्रहीं असलेलें धन देऊन ती भरून काढिली. त्या दोघांला आणि पोपटाला बोधिसत्त्वानें वाराणसी नगरींत आणून ठेविलें. आपल्याच राजवाड्यांत त्यानें सर्पासाठीं एक सोन्याचें बीळ तयार केलें होतें; उंदिरासाठीं स्फटिकमण्याची गुहा केली होती; व पोपटाला एका सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेविलें होतें. त्या तीनहि प्राण्यांनीं आजन्म बोधिसत्त्वावरील आपलें प्रेम एक रतीभरही कमी केलें नाहीं.

——***——

अनुक्रमणिका

२७. एकी असेल तेथें वास्तव्य करावें. (७४)

(रुक्खधम्म जातक नं. ७४)

चार दिक्पालांपैकीं वैश्रवण आपल्या पुण्यक्षयामुळें देवलोकांतून पतन पावला. त्याच्या जागीं इंद्रानें दुसऱ्या वैश्रवणाची योजना केली. त्यानें सगळ्या देवतांला आपआपल्या इच्छेप्रमाणें वसति करून रहावें असा निरोप पाठविला. आमचा बोधिसत्त्व त्या काळीं हिमालयाच्या पायथ्याशीं रहाणाऱ्या देवतांच्या कुलांत जन्मला होता. त्यानें जवळच्या एका दाट शालवनाचा आश्रय केला, व आपल्या ज्ञातिबांधवांना तेथेंच रहाण्यास उपदेश केला. पण कांहीं जणांना बोधिसत्त्वाचें बोलणें पटलें नाहीं. त्या देवता म्हणाल्या “येथें या अरण्यांत राहिल्यानें लोकांकडून आदरसत्कारपूर्वक मिळणाऱ्या बळीला आम्हीं मुकूं. गांवोगांवीं वडासारखे मोठमोठाले वृक्ष आहेत. तेथें जाऊन आम्हीं निरनिराळ्या झाडांचा आश्रय केला असतां लोकांकडून आमचा गौरव होईल, व अन्नपाण्याची ददात पडणार नाहीं.”

बोधिसत्त्व त्यांचें समाधान करूं शकला नाहीं. त्या निरनिराळ्या गांवीं जाऊन राहिल्या. काही निवडक देवता मात्र त्याच शालवनाचा आश्रय धरून राहिल्या. कांहीं दिवसांनीं भयंकर तुफान होऊन मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडले. व त्यामुळें गांवोगांवीं एकाकीं वृक्षांवर वास करून राहणाऱ्या देवतांचें फार नुकसान झालें. त्या तशा स्थितींत निवासस्थान न मिळाल्यामुळें पुनः बोधिसत्त्व रहात होता त्या ठिकाणीं आल्या, आणि पहातात तों त्या वनाला मुळींच धोका पोहोंचला नव्हता. तेव्हां त्या बोधिसत्त्वाला म्हणाल्या, “आम्हीं मोठमोठ्या वृक्षांचा आश्रय केला होता; पण त्यापैकीं कांहीं समूळ उपटून पडले, कांहींच्या शाखा छिन्नभिन्न झाल्या व दुसरे वृक्ष वर पडल्यामुळें कांहींची फार नासाडी झाली. यामुळें आम्हीं निराश्रित होऊन येथें परत आलों; परंतु तुमच्या या लहान सहान शालवृक्षांनीं भरलेल्या वनाला मुळींच धोका पोहोंचला नाहीं.”

बोधिसत्त्व म्हणाला, “बांधवहो, आमचें हें शालवन जरी मोठ्या वृक्षांनीं मंडित केलें नाहीं, तथापि येथें शालवृक्षांची इतकी दाटी आहे कीं जणूं काय ते एकमेकांच्या हातांत हात घालूनच रहात आहेत. जेथें अशी एकी आहे तेथें मोठमोठाल्या वृक्षांनां जमीनदोस्त करणाऱ्या पराक्रमी वायुवेगाचें तरी काय चालणार आहे! या एकीचें बळ पाहूनच मी या वनाचा आश्रय केला. पण तुम्ही लोभवश होऊन मोठमोठ्या वृक्षांच्या मागें लागला.”

——***——

अनुक्रमणिका

२८. अकिंचनाला भय कोठून. (७६)

(असंकिय जातक नं. ७६)

एकदां आमचा बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर प्रापंचिक सुखें त्याज्य वाटून त्यानें हिमालयावर तपश्चर्या आरंभिली. पुष्कळ काळपर्यंत फलमूलांवर निर्वाह केल्यावर खारट आणि आंबट पदार्थ खाण्यासाठीं लोकवस्तींत जावें या उद्देशानें तो तेथून निघाला. वाटेंत त्याला कारवानांचा तांडा सांपडला. त्यांच्या बरोबरच तो मार्गक्रमण करूं लागला. रात्रीं एका ठिकाणीं मुक्कामाला उतरले असतां त्या व्यापाऱ्यांना लुटण्यासाठीं पुष्कळ चोर जमा होऊन व्यापारी निजल्यावर लुटावें अशा उद्देशानें आसपास दबा धरून राहिले. बोधिसत्त्व एका झाडाखालीं इकडून तिकडे फिरत होता. सगळे व्यापारी झोंपीं गेल्यावर चोर हळू हळू जवळ येऊं लागले. त्यांची चाहूल ऐकून बोधिसत्त्व तसाच फेऱ्या घालीत राहिला. चोर तिकडे वाट पहात बसले होते. हा तपस्वी निजणार व या तांड्याला आम्ही लुटणार, अशा बेतानें चोरांनीं ती सारी रात्र घालविली परंतु आमचा बोधिसत्त्व झोंपीं न जातां सारी रात्र फेऱ्या घालीत जागृत राहिला. पहांटेला चोर आपलीं हत्यारें तेथेंच टाकून पळत सुटले, व जातां जातां मोठ्यानें ओरडून म्हणाले, "निष्काळजी व्यापाऱ्यांनों, हा तपस्वी तुमच्या बरोबर नसता तर आजच तुमचे घडे भरले असते!"

व्यापारी चोरांच्या आरोळ्यांनीं जागे होऊन पहातात तों त्यांना चोरांनीं टांकून दिलेलीं शस्त्रास्त्रें आढळून आलीं. ते बोधिसत्त्वाला म्हणाले, "सारी रात्र चोर तुमच्या आसपास दबा धरून बसले असतां, व ते तुमच्यावर हल्ला करतील असा संभव असतां तुम्ही भिऊन आरडाओरड केली नाहीं हें कसें!"

बोधिसत्त्व म्हणाला, "गृहस्थहो, जेथें संपत्ति आहे तेथें भय आहे. माझ्यासारख्याला भय मुळींच नाहीं, गांवांत किंवा अरण्यांत कोणत्याही प्राण्याची मला भीति वाटत नाहीं. कां कीं, मैत्री आणि करुणा यांची मी सतत भावना करीत असतों."

——***——

अनुक्रमणिका

२९. डामडौलानें यश मिळत नाहीं. (८०)

(भीमसेन जातक नं. ८०)

एकदां आमचा बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मणकुलांत जन्मला होता. लहानपणीं धनुर्विद्येचा त्याला फार नाद असे. वयांत आल्यावर तक्षशिलेला जाऊन एका मोठ्या प्रसिद्ध आचार्यांपाशीं त्यानें युद्धकलेचें आणि वेदाचें उत्तम ज्ञान संपादिलें. बोधिसत्त्व या जन्मीं जरा ठेंगू होता, व पुढल्या बाजूला वांकलेला होता. त्यामुळें त्याला छोटा धनुग्राहपंडित असें म्हणत असत. गुरुगृहीं शिल्पकलेचें अध्ययन करून झाल्यावर त्यानें असा विचार केला कीं, मी जर कोणत्याहि राजापाशीं माझ्या उपजीविकेसाठीं गेलों, तर माझें ठेंगू शरीर पाहून त्या राजाचा विश्वास मजवर बसणार नाहीं, तो म्हणेल कीं, अशा ठेंगू शरीरानें तूं काय पराक्रम करणार आहेस. तेव्हां दुसऱ्या कांहीं उपायानें आपली उपजीविका केली पाहिजे. एके दिवशीं बोधिसत्त्व चांगला एक धट्टाकट्टा मनुष्य मिळविण्याच्या उद्देशानें फिरत असतां त्याला भीमसेन नांवाचा एक कोष्टी आढळला. नांवाप्रमाणेंच त्याचें शरीर होतें. त्याला पाहून बोधिसत्त्व म्हणाला. “तुझे नांव काय?”

कोष्टी म्हणाला, “माझें नांव भीमसेन.”

बोधिसत्त्व म्हणाला, “तुझें नाव व शरीर हीं दोन्हीं इतकीं चांगलीं असतां तूं हा कोष्ट्याचा धंदा कां पतकरलास?”

कोष्टी म्हणाला, “काय करावें! याशिवाय दुसरी कोणतीच कला मला माहीत नाही.”

बोधिसत्त्व म्हणाला, “माझें जर ऐकशील तर उपजीविकेचा उत्तम मार्ग मी तुला दाखवून देईन. या साऱ्या जंबुद्वीपांत माझ्यासारखा धनुर्विद्याकुशल असा दुसरा माणूस नाहीं. परंतु माझ्या या ऱ्हस्व देहामुळें राजद्वारीं जाऊन राजाश्रय मागण्याची मला छाती होत नाहीं. पण तुला पुढें करून राजाजवळ गेलों असतां तुझ्या भक्कम शरीरावर राजाचा तेव्हांच विश्वास बसेल, मला तूं आपला मदतनीस म्हणून ठेवून घे, व आपण स्वतः मोठा धनुर्विद्या निष्णात आहे असें राजाला सांग. प्रसंग पडलाच तर मी आपल्या कौशल्यानें राजाचें समाधान करीन.”

ही गोष्ट भीमसेनाला पसंत पडली. ते दोघे वाराणसीच्या राजाला भेटले. राजानें भीमसेनाच्या शरीरावर प्रसन्न होऊन दरमहा दोन हजार कार्षापण वेतन देऊन आपल्या पदरीं ठेऊन घेतलें.

बोधिसत्त्व भीमसेनाचा मदतनीस म्हणूस राहिला. एके दिवशीं एका दांडग्या वाघानें जंगलांतील रस्ता ओसाड पाडला अशी बातमी आली. तेव्हां राजानें वाघाला मारण्याच्या कामीं भीमसेनाची योजना केली. बिचारा भीमसेन वाघाचें वाघाचें नांव ऐकल्याबरोबर गांगरून गेला! व बोधिसत्त्वाला म्हणाला, “पंडिता, आतां या संकटांतून पार पाडण्यासाठीं तुलाच मजबरोबर गेलें पाहिजे.”

बोधिसत्त्व म्हणाला, “माझ्या जाण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. हें काम तुलाच करितां येण्यासारखें आहे.”

अनुक्रमणिका

भीमसेन म्हणाला, “पण गृहस्था, वाघ पाहिल्याबरोबर माझी गाळण उडून जाईल! आजन्मांत मी वाघाची शिकार केली नाहीं. आणि आतां तूं मला एकटा पाठवून फजिती करूं पाहतोस कीं काय? किंवा माझ्यापेक्षांदेखील तूं भितरा आहेस?”

बोधिसत्त्व म्हणाला, “तुझ्या शंका व्यर्थ आहेत. वाघाची शिकार करणें मोठेंसें काम नाहीं. मी तुला एक लहानशी युक्ति सांगतों. तिच्यायोगें वाघ आपोआप मारला जाईल, व सगळें श्रेय मात्र तुला मिळेल. ज्या अरण्यांत वाघ आहे त्याच्या आसपासचे कांहीं धनुर्ग्राहक लोकांना घेऊन तूं वाघाला मारण्यासाठीं जा, आणि झुडुपांतून वाघ बाहेर पडल्याबरोबर एका झाडाचा आश्रय करून दडून बस. ते ग्रामवासी लोकच त्या वाघाला ठार मारतील. जेव्हां वाघ मेल्याची ओरड होईल तेव्हां जंगलांतील एक बळकट वेल तोडून पुढें हो, व त्या लोकांना म्हण कीं, तुम्हीं हा वाघ कोणाच्या हुकुमानें मारला. मी या वाघाला जिवंत बांधून राजाजवळ नेण्यासाठीं जंगलांत शिरलों असतां तुम्हीं एकाएकीं या वाघाला बाण मारलात, हें योग्य केलें नाहीं. ते लोक घाबरून जाऊन चूक झाल्याबद्दल तुमची क्षमा मागतील. आणि रजाला आपला अपराध न कळविण्याबद्दल तुम्हाला कांहीं पारितोषिकहि देतील.”

बोधिसत्त्वानें शिकविल्याप्रमाणें भीमसेनानें सर्व कांहीं केलें, व वाघ मारल्याचें श्रेय मिळविलें. पुढें अशाच एका अरण्यांत गवा उठला होता. त्यानें तो मार्ग ओस पडला. राजाज्या कानीं लोकांची कागाळी आल्यावर राजानें भीमसेनाची गव्याला मारण्याच्या कामीं नेमणूक केली. तेव्हां पहिल्याच युक्तीनें भीमसेनानें तिकडे लोकांना फसवून व इकडे आपणच गवा मारिला असें सांगून राजाकडून पुनः बक्षिस मिळविलें, व तो गर्वानें इतका फुगून गेला कीं, आपण बोधिसत्त्वापेक्षां पुष्कळ पटीनें शूर आहों असें त्यास वाटूं लागलें. कांहीं काळ लोटल्यावर त्या राज्यावर दुसरा एक राजा स्वारी करून आला. राजानें भीमसेनाची परराज्याचा पराभव करण्यासाठीं सेनापतीच्या जागीं नेमणूक केली. तेव्हां बोधिसत्त्वाला न विचारतां शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन आणि हत्तीच्या अंबारींत बसून सर्व सैन्यासहवर्तमान तो शत्रूवर चाल करून गेला. बोधिसत्त्वाला त्याचें शौर्य माहीत होतें. आजपर्यंत राजाचें आपण अन्न खाल्लें, व या प्रसंगीं राजाला मदत न करितां भीमसेनाच्या भरंवशावर राहिल्यास पुढें काय गती होणार हें तो जाणून होता. म्हणून तो भीमसेनाच्या अवज्ञेला न जुमानितां त्याच्या मागें अंबारींत बसून युद्धभूमीवर गेला. परसेना पाहिल्याबरोबर भीमसेनाला घाम सुटला; शरीर कांपायला लागलें; व तेथल्या तेथेंच त्यानें देहधर्म केला! बोधिसत्त्वानें त्याला सांवरून धरिलें नसतें तर तो हत्तीच्या पाठीवरून खालीच पडला असता. ही त्याची दुर्दशा पाहून बोधिसत्त्व त्याला म्हणाला, “नुकताच तूं मोठ्या शौर्याच्या गोष्टी सांगत होतास! माझी देखील तूं गर्वानें अंध होऊन अवज्ञा केलीस! आणि आतां तुझी अशी दुर्दशा कां व्हावी? तुझ्या बोलण्यांत आणि कृतींत किती फरक आहे बरें!”

भीमसेन म्हणाला, “झालेली गोष्ट होऊन गेली. पण या प्रसंगीं मलाच नव्हे, तर या सर्व सेनेला आणि आमच्या राजाला संकटांतून पार पाडणारा तुजवांचून दुसरा कोणीच नाहीं. आतां माझ्या अपराधाची क्षमा करून आम्हां सर्वांना जीवदान दे.”

बोधिसत्त्वानें त्याला हत्तीवरून खालीं उतरविलें; स्नान वगैरे घालून दुसरे कपडे देवविले; व स्वतः सेनाधिपत्य स्वीकारून तो युद्धाला पुढें सरसांवला. वोधिसत्त्व युद्धकलेंत अत्यंत निपुण असल्यामुळें परराजाचापराभव करण्यास त्याला आयास पडले नाहींत. एवढेच नव्हे, त्यानें त्या राजाला जिवंत पकडून आपल्या राजासमोर नेलें. त्यावेळीं राजाला बोधिसत्त्वाची खरी किंमत समजली. राजानें त्याचा बहुमान

अनुक्रमणिका

केला, व सेनापति पदावर त्याची कायमची नेमणूक केली. बोधिसत्त्व तेव्हांपासून सर्व जंबुद्वीपांत छोटा धनुर्ग्राहपंडित या नांवानें प्रसिद्धीस आला. त्यानें भीमसेनाचा त्याग न करितां मरेपर्यंत त्याला उदरनिर्वाहापुरतें वेतन दिलें.

——***——

अनुक्रमणिका

३०. काडीचा प्रामाणिकपणा. (८९)

(कुहक जातक नं. ८९)

अतीत कालीं एका गांवीं एक जटिल तापस रहात असे. त्याच्या एका गृहस्थ शिष्याच्या घरीं तो वारंवार भिक्षेसाठीं येत असे. त्या गृहस्थानें त्याला जवळच्या जंगलांत एक प्रशस्थ पर्णकुटिका बांधवून दिली होती. त्या गृहस्थाचा त्याच्यावर इतका विश्वास होता कीं त्याला तो जीवन्मुक्त समजत असे. त्या गांवांच्या आसपास बऱ्याच चोऱ्या होऊं लागल्या; तेव्हां गृहस्थानें आपल्याजवळ असलेल्या शंभर मोहरा त्या जटिलाच्या पर्णशाळेंत जाऊन तिसऱ्या कोणाला कळूं न देतां जमिनींत गाडून टाकिल्या; व तो जटिलाला म्हणाला, "भदंत, माझ्याजवळ असलेलें सर्व धन या येथें मीं पुरलें आहे. त्याचा सांभाळ करा."

जटिल म्हणाला "हें तुझें बोलणें योग्य नाहीं. कारण मला दुसऱ्याच्या धनाचा लोभ नाहीं व तुझी माझी मैत्री असल्यामुळें ही गोष्ट दुसऱ्याला कळविणें उचित होणार नाहीं."

जटिलाला नमस्कार करून तो गृहस्थ आपल्या घरीं गेला. कांहीं दिवस गेल्यावर जटिलानें असा विचार केला कीं, "मी या शंभर मोहरा घेऊन दुसऱ्या गांवीं गेलों तर मला सुखानें उपजीविका करतां येईल." त्यानें तें द्रव्य दुसऱ्या एका ठिकाणीं गाडून ठेविलें. व भिक्षेसाठीं तो त्या गृहस्थाच्या घरीं गेला. तेथें गृहस्थानें त्याचें आदरातिथ्य चांगलें करूनत्याला जेवावयास घातलें. भोजनोत्तर जटिल म्हणाला, "मी कांहीं दिवसासाठीं दुसऱ्या एका गांवीं जाणार आहें. चिरकाल एकाच ठिकाणीं राहिल्यामुळें तपस्व्याला त्या ठिकाणाचा लोभ जडतो. पण अशा लोभांत गुरफटून जाणें आम्हा लोकांना योग्य नाहीं. म्हणून कांहीं दिवस स्थानांतर करून मी परत येईन. तोंपर्यंत तुम्ही आपली पर्णशाला संभाळा."

बिचाऱ्या गृहस्थाला आपला गुरु परगांवीं जातो म्हणून फार वाईट वाटलें. तो त्या जटिलाला कांहीं अंतरावर पोंचवून परत घरीं आला.

त्या दिवशीं आमचा बोधिसत्त्व व्यापारासाठीं गांवोगांवीं हिंडत असतां त्या गृहस्थाकडे पाहुणा म्हणून उतरला होता. त्या गृहस्थानें माघारें येऊन बोधिसत्त्वापाशीं आपल्या गुरूची फार वाखाणणी केली. जटिलहि मोठा धूर्त होता. आपल्या मागोमाग जाऊन गृहस्थ आपलें द्रव्य उकरून पाहील, व तें न दिसल्यामुळें आपणाला वाटेंत पकडील असा त्याला संशय आला. आपल्यावरची त्या गृहस्थाची श्रद्धा वाढावी आणि दोन तीन दिवस तरी त्यानें आपल्या द्रव्याच्या वाटेला जाऊं नये अशा उद्देशानें तो पुनः त्या गृहस्थाच्या घरीं गेला. त्याला पाहून गृहस्थ ह्मणाला, "भदंत, आपण इतक्या दुरून परत आलांत हें काय?"

जटिल म्हणाला, "तुमच्या घरची गवताची काडी माझ्या जटेंत अडकून राहिली, ती परत करण्यासाठीं मी येथें आलों आहें."

गृहस्थ म्हणाला, "या यःकश्चित कामासाठीं आपण एवढीं तसदी व्यर्थ घेतली. एका गवताच्या काडीनें आमचें काय होणार आहे? बरें जर आपल्या शीलाचा भंग होईल असें आपणास वाटत असेल तर ती येथेंच फेंकून द्या म्हणजे झालें." जटिलानें गवताची काडी फेंकून दिली, व तो चालता झाला.

अनुक्रमणिका

बोधिसत्त्व त्याचें भाषण ऐकत होता व तापसानें काडी फेकून दिली हा प्रकारहि त्यानें पाहिला. तो (जटिल?) म्हणाला, “हा तपस्वी मोठा लबाड दिसतो. मला अशी शंका येते कीं तुम्ही कांहीं तरी द्रव्य त्याच्या स्वाधीन केलें असावें व तो तें उपटण्याचा प्रयत्न करीत असावा.”

गृहस्थ म्हणाला, “मी शंभर मोहरा याच्या पर्णकुटिकेंत गाडून ठेविल्या आहेत, एवढेंच काय तें. याशिवाय याला मी दुसरें कांहीं दिलें नाहीं.”

बोधिसत्त्व म्हणाला, “तर मग तुम्ही आतांच्या आतां आपल्या मोहरांचा शोध करा आणि जर त्या तेथें सांपडल्या नाहींत तर या लुच्चा तपस्व्यानें त्या लांबवल्या असल्या पाहिजेत असें खास समजा.”

त्या गृहस्थानें जटिलाच्या पर्णकुटिकेंत धांव घेतली, व तो पाहतो तों मोहरा पुरलेल्या ठिकाणांतून नाहींशा झाल्या आहेत. तेव्हां त्यानें त्या जटिलाला दुसऱ्या गांवी जात असतां वाटेंत आडवून पकडून आणलें. तेव्हां बोधिसत्त्वासमोर जटिलानें आपला गुन्हा कबूल केला; व दुसऱ्या ठिकाणीं गाडून ठेविलेल्या मोहरा त्या गृहस्थाच्या स्वाधीन केल्या.

तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “गवताच्या काडीचा प्रामाणिकपणा दाखवीत असतां तूं गोडगोड बोलून त्या गृहस्थाला ठकविलेंस. परंतु शंभर मोहरा चोरण्याला तुला मुळींच लाज वाटली नाहीं! पुनः अशा तऱ्हेचें पापकृत्य करून व वरून दांभिकपणा दाखवून लोकांना फसवूं नकोस.”

गवताच्या काडीबद्दल जे प्रामाणिकपणा दाखवितात त्यांना मोठी चोरी करण्यास लाज वाटणार नाहीं असें खास समजावें.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

३१. निवाडा करण्यांत चातुर्यच पाहिजे. (९२)

(महासार जातक नं. ९२)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं वाराणसीच्या राजाचा अमात्य झाला होता. एके दिवशीं राजा आपल्या अंतःपुरांतील स्त्रियांसह उद्यानक्रीडेसाठीं गेला होता. तेथें तो व त्याच्या स्त्रिया तलावांत स्नान करण्यास गेल्या. त्या स्त्रियांनीं आपापले अलंकार काढून उपवस्त्रांत बांधून दासींच्या स्वाधीन केले; व त्या तलावांत उतरल्या. त्यांतील एक दासी अलंकार खालीं ठेवून इकडे तिकडे पहात बसली होती. कांहीं वेळानें ती डुलक्या घेऊं लागली. त्या उद्यानांत पुष्कळ वानर रहात असत. त्यांतील एका वानरीनें त्या दासीच्या जवळ असलेलें अलंकारांचें गांठोडें पाहिलें व ती दासी बेसावध आहे असें पाहून मर्कटीला गांठोड्यांत काय आहे हें पाहण्याची फार उत्सुकता झाली. खालीं उतरून हळूंच गांठोडें सोडून त्यांतील एक बहुमोलमोत्यांचा हार घेऊन ती मर्कटी तेथून पार पळून गेली, व एका वृक्षाच्या वळचणींत तो हार दडवून ठेवून जणूं काय आपणाला कांहीं माहीत नाहीं असें मिष करून तेथेंच बसून राहिली.

इकंडे दासी जागी होऊन पहाते तो गांठोडें सोडलेलें व मुक्ताहार चोरीस गेलेला! आपल्या जिवावरचें संकट आहे असें जाणून तिनें एकच आरडाओरड केली. इतर दासी व राजस्त्रियाहि तेथें जमा झाल्या व तिला त्यांनीं आरडाओरड करण्यांचें कारण विचारिलें. तेव्हां भयचकित होऊन ती म्हणाली, “माझ्या मागोमाग कोणी मनुष्य येऊन या गांठोड्यांतील हार घेऊन पळून गेला. त्याच्यामागें धांवण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें मी ओरडलें.”

राजाला हें वर्तमान समजल्याबरोबर त्यानें उद्यानपालांना बोलावून चोराचा पत्ता लावण्यास हुकूम केला. ते इतस्ततः पळत सुटले. एक ग्रामवासी मनुष्य त्या उद्यानाजवळील रस्त्यानें चालला होता. पोलीस धांवत सुटलेले पाहून बिचारा घाबरून गेला, व आडवाटेनें पळूं लागला. पोलिसांनीं त्याला ताबडतोब पकडिलें, व यथेच्छ मार दिला. पोलिसांच्या तावडींतून सुटण्याचा दुसरा मार्ग न दिसल्यामुळें त्यानें मुक्ताहार चोरण्याचा गुन्हा कबूल केला, व तो म्हणाला, “मला या मुक्ताहाराची किंमत काय ठाऊक. मी तो नेऊन नगरश्रेष्ठीला दिला.”

पोलिसांनीं चोराला राजासमोर नेलें, व त्यानें तेथेंहि आपला गुन्हा कबूल करून पूर्ववत् हकीकत सांगितली. तेव्हां राजानें नगरश्रेष्ठीला पकडून आणण्याचा हुकूम फर्माविला; व आपल्यासमोर आल्यावर राजा त्याला म्हणाला, “माझ्या राजवाड्यांतला हार तूं क्षुद्र माणसाकडून घेतलास कसा?

श्रेष्ठीला राजाच्या या बोलण्याचा अर्थच समजेना. तो घोटाळ्यांत पडला तेव्हां राजानें त्या गांवढळ मनुष्याकडून सर्व गुन्हा पुनः वदविला. श्रेष्ठीला या संकटांतून पार पडण्याची आशा राहिली नाहीं. आपण हार घेतला नाहीं असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें वाटून तो म्हणाला, “महाराज, या माणसापासून मी मुक्ताहार घेतला खरा. पण तो आपल्या पुरोहिताच्या स्वाधीन तेव्हांच करण्यांत आला.”

राजानें आपल्या नोकरांला पाठवून पुरोहिताला तेथें आणिलें. तो पहिल्यानें घोटाळ्यांत पडला खरा. पण आपल्यासमक्ष श्रेष्ठी हार आपल्या स्वाधीन केला असें म्हणतो, तेव्हा गुन्हा नाकबूल करण्यापासून

कांहीं फायदा होणार नाहीं असें जाणून तो म्हणाला, "महाराज श्रेष्ठीनें मला हार दिला खरा पण तो मजपाशीं राहिला नाहीं. मी तो आपल्या दरबारच्या गवयाला देऊन टाकिला."

झालें! बिचाऱ्या गवयावर पाळी आली! पुरोहितासारखा साक्षीदार असतांना गुन्हा नाकबूल करण्यांत अर्थ काय? त्यानें सांगितलें कीं, "मी पुरोहित महाराजापासून मुक्ताहार घेतला खरा पण तो दरबारच्या दासीला देऊन टाकला."

या चौकशीच्या गडबडींत संध्याकाळ झाली. तेव्हां राजा म्हणाला, "सध्यां या पांच जणांला अटकेंत ठेवा. उद्यां यांची चौकशी करितां येईल."

बोधिसत्त्व राजाच्या जवळच होता. तो म्हणाला, "महाराज, आपण या पांच इसमांला माझ्या स्वाधीन करा. मी या खटल्याची चौकशी करतों."

राजाला बोधिसत्त्वच या कामीं योग्य वाटला, व त्यानें हा खटला निवडण्याचें काम बोधिसत्त्वावर सोंपविलें. बोधिसत्त्वानें या पांचजणांला एका ठिकाणीं अटकेंत ठेविलें व ते काय बोलतात हें ऐकण्यासाठीं त्या स्थानाच्या आसपास आपल्या गुप्त हेरांची योजना केली. रात्रीं सामसूम झाल्यावर श्रेष्ठी या गांवढळ मनुष्याला म्हणाला "अरे मूर्खा, तूं मला साऱ्या जन्मांत कधीं पाहिलें होतेंस काय? मग माझ्याजवळ दागिना दिला असें खोटें कां बोललास?"

"श्रेष्ठी महाराज, माझ्यासारख्या गांवढळ मनुष्यानें चांगला मंचक सुद्धां कधीं पाहिला नाहीं मग मोत्याचा हार कोठून पाहिला असणार! परंतु माराच्या भयानें, व कशीतरी माझी सुटका व्हावी या उद्देशानें मी आपलें नांव सांगितलें. मेहेरबानगीकरून माझ्यावर रागावूं नका."

इतक्यांत पुरोहित श्रेष्ठीला म्हणाला, "अहो महाश्रेष्ठी? तुम्ही माझ्यावर हा भलताच आळ कां म्हणून घातलात?"

श्रेष्ठी म्हणाला, "आम्ही दोघेही वजनदार पडलों तेव्हां एका ठिकाणीं राहिल्यानें दोघांचीहि लवकर सुटका होईल अशा कल्पनेनें मी आपणाला देखील या खटल्यांत ओढलें. याबद्दल क्षमा असावी."

तेव्हां गवई म्हणाला, "पण हे ब्राह्मणा, तूं माझ्याजवळ दागिना कधीं दिलास?"

पुरोहित म्हणाला, "आमच्याजवळ तूं असलास तर आमची करमणूक करूं शकशील व त्यामुळें कैदेंत देखील सुखानें काळ घालवितां येईल म्हणून तुलाहि मीं या माळेंत गोविलें."

दासी म्हणाली, "अहो दुष्ट गवईबुवा, तुमची आणि माझी ओळख तरी आहे काय? मला तुम्ही दागिना दिलात कधीं?"

गवई म्हणाला, "बाई रागावूं नकोस. आम्हा चौघांबरोबर, तूं असलीस म्हणजे आमच्या सेवेंत अंतर पडणार नाहीं. एवढ्याचसाठीं मीं तुझें नांव सांगितलें."

अनुक्रमणिका

बोधिसत्त्वाच्या गुप्त हेरांनीं हा सर्व संवाद ऐकून घेतला, व बोधिसत्वाला कळविला. बोधिसत्वाची हे लोक निरपराधी असल्याबद्दल आगाऊच खात्री होऊन चुकली होती. कां कीं उद्यानाच्या बाहेर असलेल्या माणसाच्या हातीं पहारेकऱ्यांच्या तावडींतून सुटून एखादा दागिना जाणें असंभवनीय होतें. त्यांत बोधिसत्वाला या संवादाचा बळकट पुरावा सांपडला. परंतु चोरीचा थांग लावल्याशिवाय हें वर्तमान राजाला कळविणें इष्ट नव्हतें. तेव्हां बोधिसत्वानें विचाराअंतीं एखाद्या वानरीनें मुक्ताहार चोरला असावा असें अनुमान केलें व दुसरें दिवशीं प्रतीति पाहण्यासाठीं खोटे दागिने करवून ते त्या उद्यानांत आपल्य विश्वासू नोकरांकडून पसरविले. प्रत्येक वानरीनें एकेक दागिना उचलून आपल्या गळ्यांत घातला, व त्या इकडून तिकडून मिरवूं लागल्या. ज्या वानरीला मुक्ताहार सांपडला होता तिनें मात्र त्यांतील मिरवूं लागल्या. ज्या वानरीला मुक्ताहार सांपडला होता तिनें मात्र त्यांतील दागिना घेतला नाहीं. तेव्हां त्या इतर वानरी तिच्याजवळ जाऊन तिला म्हणाल्या, "काय तूं येथें आळशासारखी बसली आहेस. हे पहा आमचे अलंकार!"

ती वानरी स्पर्धेनें म्हणाली, "असले घाणेरडे दागिने घेऊन काय करावयाचे आहेत? मजपाशीं जो दागिना आहे तो पाहिला तर तुम्हांलाअसले भिकारडे दागिने घालून मिरविण्यास लाजच वाटेल." असें म्हणून तिनें वळचणींतून मुक्ताहार बाहेर काढला, व आपल्या गळ्यांत घालून त्या सर्व मर्कटीसमोर मोठ्या डौलानें इकडून तिकडे मिरवूं लागली.

बोधिसत्वानें दागिने घेऊन वानरी काय करतात हें पाहण्यासाठीं आपले हेर तेथें ठेविलेच होते. त्यांनीं मुक्ताहार वानरीच्या गळ्यांत पाहिल्याबरोबर तिला घेरलें. बिचारी मर्कटी त्यांच्या शस्त्रास्त्रांनीं आणि आरडाओरडीनें घाबरून गेली, व तिनें तो हार तेथेंच जमिनीवर फेकून देऊन पळ काढिला. त्या हेरांनीं तो हार बोधिसत्वाकडे नेला, व त्यानें तो राजाला दिला. राजानें सर्व वृत्तांत ऐकून घेऊन बोधिसत्त्वाची फार तारीफ केली व तो म्हणाला, "संग्रामात [मूळ गाथा–
उक्कठ्ठे सूरमिच्छन्ति मन्तीसु अकुतूहलं।
पियं च अन्नपानह्मि अत्थे जाते च पण्डितं ॥] शूराची योजना करावी; मंत्री मंडळांत जो मंत्राचा भेद करणार नाहीं अशाचीच योजना करावी; जेवण्याखाण्यांत आवडत्या माणसांना आमंत्रण करावें; पण अत्यंत कठीण प्रसंगीं शहाण्याचीच योजना करावी असें जें लोक म्हणत असतात तें खोटें नाहीं. आज तुझ्याच पांडित्यानें चोरीचा पत्ता लागून निरपराधी माणसांचा माझ्याकडून छळ झाला नाहीं."

याप्रमाणें बोधिसत्त्वाची स्तुती करून राजानें त्याला मोठें बक्षीस दिलें व आजन्म त्याच्या सल्ल्यानें दानधर्मादिक सत्कृत्यें करून पुष्कळ कीर्ति मिळविली.

——***——

अनुक्रमणिका

३२. नांवाची फारशी किंमत नाहीं. (९७)

(नामसिद्धि जातक नं. ९७)

एका जन्मीं आमचा बोधिसत्त्व तक्षशिला नगरींत प्रसिद्ध आचार्य होऊन पांचशें शिष्यांना वेद पढवीत असे. त्यांतील एकाचें नांव पापक असें होतें. “कायरे पाप्या, इकडे येरे पाप्या” असें लोक त्याला म्हणत असत. त्यामुळें कंटाळून जाऊन तो आपल्या गुरूला म्हणजे बोधिसत्वाला म्हणाला, “गुरुजी, माझें नांव मला अमंगल वाटतें. दुसरें एखादें मला चांगलेसें नांव द्या.”

बोधिसत्व म्हणाला, “येथल्या येथेंच चांगलें नांव घेण्यापेक्षां देशपर्यटन करून एखादें चांगलें नांव पाहून ये, व मला सांग, म्हणजे आम्ही सर्वजण त्याच नांवानें तुला हांक मारीत जाऊं.”

दुसऱ्या दिवशीं पापकानें शिदोरी सज्ज करून दुसऱ्या गांवचा रस्ता धरला. व ज्याच्या त्याच्या नांवाचा अर्थ पहात जाऊं लागला. वाटेंत एका शहराजवळ आला असतां कांहीं लोक प्रेत घेऊन स्मशानयात्रेला चालले होते. तेव्हां पापक म्हणाला, “कायहो इतकी मंडळी कोणीकडे चालली?”

ते लोक म्हणाले, “जीवक नांवाचा आमचा एक दोस्त नुकताच मरण पावला. त्याच्या अंत्यविधीला आम्हीं जात आहों.” “पण कायहो! जीवक मरतो हें कसें?”

“जीवक असो अथवा अजीवक असो, मनुष्य म्हटला कीं तो मरावयाचाच. नांवानें मरण चुकतें असें नाहीं. व्यवहारापुरताच काय तो नांवाचा उपयोग. तूं अगदींच खुळा दिसतोस!” असें त्यांनीं उत्तर दिलें.

बिचारा पापक चांगल्या नांवाचा हा विपर्यास पाहून विस्मित होऊन गेला, व तसाच पुढें जातो तों एका दासीला वेळेवर काम करीत नाहीं, म्हणून तिचे मालक रस्त्यावर चाबकानें मारीत होते. तो त्याला म्हणाला, “या बाईचें नांव काय, व हिला तुम्ही कां मारितां?”

ते म्हणाले, “इचें नांव धनपाली व वेळेवर काम करीत नसल्यामुळें हिला आम्हीं दंड करीत आहों.”

“अहो पण धनपालीवरदुसऱ्याचें काम करण्याचा प्रसंग यावा कसा?”

“अहो तुम्ही हें मूर्खासारखें काय विचारितां? ही जन्माचीच दासी आहे. धनपाली असें नांव ठेविलें म्हणून काय झालें? धनपाली असूं द्या किंवा अधनपाली असूं द्या. दारिद्र्य यावयाचें असलें तर तें आल्यावांचून रहात नाहीं. नांवानें कोणताच कार्यभाग व्हावयाचा नाहीं, तेंकेवळ व्यवहारापुरतें आहे ही गोष्ट तुम्हाला माहीत नसावी, हें मोठें आश्चर्य आहे.”

बिचारा पापक चांगल्या नांवाच्या मंगलत्वाविषयीं जवळ जवळ निराश होऊन तसाच पुढें चालला. शहराच्या बाहेर गेल्यावर कांहीं अंतरावर इकडे तिकडे फिरणारा एक गृहस्थ त्याच्या पाहण्यांत आला. पापकानें त्याला त्याचें नांव विचारिलें, तेव्हां तो म्हणाला, “माझें नांव पंथक (वाटाड्या).”

अनुक्रमणिका

“तर मग तुम्ही या निर्जन प्रदेशांत काय करितां?” मी वाट चुकल्यामुळें इतस्ततः भटकत आहें. मला अद्यापि माझा मार्ग सांपडला नाहीं.”

“पण पंथक (वाटाड्या) वाट चुकतो हें कसें? अहो हें केवळ नांव आहे. वाट चुकण्याचा आणि याचा कांहींच संबंध नाहीं. तुम्हीं नांवावर भरंवसा ठेवणारे वेडगळ मनुष्य दिसतां!”

पापक चांगल्या नांवाच्या गुणांविषयीं पूर्ण निराश झाला व आपलें नांव बदलण्याचा बेत त्यानें रहित केला. तेथून आपल्या गुरूजवळ जाऊन घडलेलें सर्व वर्तमान त्यानें त्याला निवेदन केलें. त्याच्या सोबत्यांनीं पापकानें कोणतें नांव शोधून आणलें आहे असा बोधिसत्त्वाला प्रश्न केला. तेव्हां तो त्याला म्हणाला “जीवक मरतो, धनपालीला दारिद्र्य येतें, व पंथक वाट चुकतो, हें पाहून आमचा पापक चांगल्या नांवाचा थांग लागल्यावाचून परत आला. [मूळ गाथा—

जीवकं च मतं दिस्वा धनपालिं च दुग्गतं।

पन्थकं च मने मूळहं पापको पुनरागतो ॥]” पापकाचें तेंच नांव कायम राहिलें हें निराळें सांगावयास नकोच.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

३३. अतिपांडित्याचा परिणाम. (९८)

(कूटवाणिज जातक नं. ९८)

एकदां बोधिसत्त्व वाराणसी नगरींत वणिजकुलांत जन्मला होता. त्याला पंडित हें नांव ठेवण्यांत आलें. दुसरा एक अतिपंडित नांवाचासमानवयस्क गृहस्थ वाराणसींत रहात होता. वयांत आल्यावर बोधिसत्त्वानें त्याचा भागीदार होऊन उद्योग धंदा करण्यास सुरुवात केली. त्यांत त्या दोघांना बराच फायदा झाला परंतु फायद्याची वांटणी करण्याची वेळ आली, तेव्हां अतिपंडित म्हणाला, "मला दोन हिस्से मिळाले पाहिजेत, व तुला एक हिस्सा मिळाला पाहिजे."

बोधिसत्त्व म्हणाला, "हें कसें! आम्हा दोघांचेंहि भांडवल सारखेंच होतें. दोघांनींहि सारखीच मेहनत केली आहे, मग तुला दोन हिस्से, आणि मला एक हिस्सा काय म्हणून?"

अतिपंडित म्हणाला, "बाबारे, माझ्या नांवाची किंमत केवढी मोठी आहे हें पहा. तूं केवळ पंडित आहेस, आणि मी अतिपंडित आहें; व यासाठींच मला दोन हिस्से मिळणें रास्त आहे."

अतिपंडिताच्या या तर्कवादानें बोधिसत्त्वाचें समाधान झालें नाहीं. तेव्हां अतिपंडितानें त्याची समजूत घालण्याची दुसरी एक युक्ति शोधून काढली. तो म्हणाला "बा पंडिता, तुला जर माझें म्हणणें पटत नसेल तर आपण उद्यां या गांवाजवळ प्रसिद्ध असलेल्या एका वृक्षदेवतेजवळ जाऊं, व तिला आम्हा दोघांचेंहिम्हणणें काय आहे तें कळवूं; आणि ती जसा निवाडा करील त्याप्रमाणें वागूं."

दुसऱ्या दिवशीं अतिपंडितानें आपल्या वृद्ध पित्याला त्या ठरलेल्या ठिकाणीं वृक्षाच्या वळचणींत दडविलें, व त्याला काय काय बोलावें हें आगाऊच शिकवून ठेविलें. नंतर तो व त्याचा मित्र पंडित हे दोघे त्या वृक्षाजवळ जाऊन त्यांनी देवतेची प्रार्थना केली, व आपापलें म्हणणें कळवून निवाडा मागितला. अतिपंडिताच्या पित्यानें स्वर पालटून आपल्या मुलाच्या तर्फे न्याय दिला. तेव्हां बोधिसत्त्व आवेशयुक्त वाणीनें म्हणाला, "ही देवता मोठी लबाड दिसते. हिला या ठिकाणीं राहूं देणें इष्ट नाहीं."

असें बोलून त्यानें आसपास पडलेलीं लांकडें पाचोळा वगैरे गोळा करून त्या वृक्षाभोंवती पसरून त्याला आग लावून दिली. बिचारा अतिपंडिताचा बाप धुरानें गुदमरून गेला, व जळून जाण्याच्या भीतीनें एका फांदीला लोंबकळून त्यानें खालीं उडी टाकिली; आणि तो म्हणाला, "मुलगा पंडित झाला म्हणजे बस्स आहे; पण अतिपंडित नको! माझामुलगा अतिपंडित झाला म्हणून माझ्यावर आज फार भयंकर प्रसंग गुदरला?"

[मूळ गाथा—
साधु खो पंडितो नाम नत्थेव अतिपंडितो।
अतिपंडितेन पुत्तेन मनम्हि उपकूळितो ॥]

ही लबाडी उघडकीस आल्यामुळें अतिपंडिताला नफ्याचा अर्धा हिस्सा देऊन बोधिसत्त्वाशीं तडजोड करणें भाग पडलें.

——***——

अनुक्रमणिका

३४. लोभी ब्राह्मण. (११३)

(सिगाल जातक नं. ११३)

वाराणसींतील लोक उत्सवांत यक्षांना मत्स्यमांसादिकांचा बळी देत असत; व यक्षांना प्रसन्न करण्यासाठीं मातीच्या भांड्यांतून ठिकठिकाणीं दारू ठेवीत असत. अशा एका उत्सवाच्या प्रसंगीं वाराणसीबाहेरील स्मशानांत राहणारा एक कोल्हा मध्यरात्र झाल्यावर गटाराच्या मार्गानें आंत शिरला व बलिकर्मासाठीं ठिकठिकाणीं ठेविलेल्या मत्स्यमांसादिकांवर यथेच्छ ताव मारून त्यानें मातीच्या भांड्यांतील सुरेचें आकंठ पान केलें. त्यामुळें पुनः गटारद्वारें बाहेर पडण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं राहिलें नाहीं. तो एका पुन्नाग वृक्षाच्या झाडींत जाऊन पडला, व सकाळ होईपर्यंत जागा झाला नाहीं. सकाळीं उठून शहरांतून निर्भयपणें बाहेर पडणें शक्य नव्हतें; म्हणून दडत दडत सडकेजवळ येऊन तो लपून बसला. इतक्यांत एक ब्राह्मण त्या मार्गानें नदीवर प्रातःस्नानासाठीं चालला होता. त्याला पाहून कोल्हा म्हणाला, “अहो भटजीबुवा, तुमच्यापाशीं माझें कांहीं काम आहे. जरा एका बाजूला याल तर तें तुम्हाला सांगेन. तुमच्याच फायद्याचें आहे, तेव्हां वेळ फुकट गेल्याबद्दल तुम्हाला वाईट वाटणार नाहीं.” ब्राह्मण त्या जवळ गेल्यावर तो त्याला म्हणाला, “भटजीबुवा, तुमचीं वस्त्रें प्रावरणें पाहून तुम्ही दरिद्रावस्थेनें गांजले आहांत असें वाटतें. तुमची ही स्थिति पाहून मला फार दया आली, व मजपाशीं असलेले दोनशें कार्षापण तुम्हाला दानकरावे असा माझा निश्चय झाला आहे. पण दिवसा ढवळ्या मला तुमच्या बरोबर शहरांतील रस्त्यांतून जातां येणें शक्य नाहीं. तुम्ही जर आपल्या उपरण्यांत गुंडाळून मी सांगितलेल्या ठिकाणीं घेऊन जाल, तर आजच्या आज ते कार्षापण तुमच्या हवालीं करतों.”

त्या लोभी ब्राह्मणाला मद्यपी शृगालाचें म्हणणें खरें वाटलें. व आपल्या उपरण्यांतून त्यानें त्याला गांवाबाहेर स्मशानांत नेलें. तेथें खालीं ठेविल्याबरोबर उपरण्यांत देहधर्म करून शृगालानें जंगलांत पळ काढिला.

त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व त्या ठिकाणीं देवता होऊन रहात असे. हें शृगालाचें कृत्य पाहून तो त्या ब्राह्मणाला म्हणाला “हे ब्राह्मणा, मद्यपी शृगालावर विश्वास ठेवून तूं आपली फजिती करून घेतलीस. याजपाशीं शंभर कवड्याहि मिळावयाच्या नाहींत मग दोनशें ताम्र कार्षापण कोठून असणार?

[मूळ गाथा—
सद्दहसि सिगालस्स सुरापीतस्स ब्राह्मण।
सिप्पिकानं सतं नत्थि कुतो कंससता दुवे॥] आतां तुझें उपरणें धुवून मुकाट्यानें चालता हो, व द्रव्यलोभामुळें पुनः असा फसूं नकोस.”

——✵✵✵——

अनुक्रमणिका

३५. वाईट परिस्थितींत वाढलेला प्राणी. (११९)

(अकालराविजातक नं. ११९)

एका जन्मीं बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मण कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर शास्त्राध्ययन करून वाराणसींत उत्तम आचार्य या नात्यानें तो प्रसिद्धीस आला. त्याजवळ पांचशें शिष्य अध्ययन करीत असत. त्या शिष्यांपाशीं एक वेळेवर आरवणारा कोंबडा होता. त्याच्या आरवण्यानें ते जागे होऊन अध्ययनाला सुरुवात करीत असत. तो कोंबडा कांहीं काळानें मरण पावला. तेव्हां दुसऱ्या कोंबड्याच्या शोधांत त्यांनी बरेच दिवस घालविले. एके दिवशीं त्यांतील एक तरूण विद्यार्थी श्मशानाच्या जवळ लांकडें गोळा करीत असतां त्याला तेथें राहणारा एक दिसण्यात सुंदर असाकोंबडा सांपडला. त्याला आणून त्या विद्यार्थ्यांनीं आपल्या जागेंत ठेविलें व त्याची उत्तम रीतीनें शुश्रूषा चालविली. पण हा कोंबडा भलत्याच वेळीं आरवून त्यांना त्रास देऊं लागला. एखाद्या वेळेस तो मध्यरात्रीच्या सुमारास मोठ्यानें ओरडत सुटे. तेव्हां पहाट झाली असें समजून विद्यार्थिगण जागा होऊन अध्ययनास लागे, व त्यामुळें सकाळीं गुरुजीजवळ पाठ म्हणण्यास सुरुवात केली असतां त्यांचे डोळे निजेनें भरून येत असत. एखादे वेळेस तो सकाळ झाली तरी ओरडत नसे व त्यामुळें विद्यार्थि तसेच बिछान्यावर पडून रहात असत. सकाळीं गुरूजवळ पाठ म्हणण्यास जावें तों यांची मुळींच तयारी झालेली नसे. हा प्रकार होऊं लागला तेव्हां त्यांनीं त्या कोंबड्याला ठार मारिलें, व आचार्याजवळ जाऊन ते म्हणाले, “गुरुजी, कांहीं दिवसांपूर्वी आणलेल्या कोंबड्यानें आम्हाला फार त्रास दिला. आपल्या आरवण्यानें भलत्याच वेळीं जागें करून तो आमच्या अध्ययनांत व्यत्यय आणीत असे.”

आचार्यानें तो कोंबडा कोठें सांपडला वगैरे सर्व माहिती विचारून घेतली, व तो त्यांना म्हणाला, “हा कोंबडा आईबापांशिवाय वाढलेला, आचार्याचा सहवास त्यानें कधींहि केला नाहीं. तेव्हां काल किंवा अकाल तो जाणत नसला तर त्यांत नवल कोणतें? योग्यायोग्य जाणण्यास प्राणी चांगल्या परिस्थितींतच जन्मला असला पाहिजे.”

——✱✱✱——

अनुक्रमणिका

३६. कोणत्याही प्रकारच्या शिक्षणानें मूर्खशहाणा होऊं शकत नाहीं. (१२३)

(नंगलीस जातक नं. १२३)

दुसऱ्या एका जन्मीं बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर तक्षशिला नगरीस जाऊन त्यानें सर्व शास्त्राचें अध्ययन केलें व पुनः वाराणसीला येऊन तेथें आपल्या सद्‌गुणांनीं उत्तम आचार्यांत आपली गणना करून घेतली. त्याच्यापाशीं शिकण्यास्तव पुष्कळ शिष्य रहात असत. त्यांत एक शिष्य आपल्या गुरूच्या सेवेंत अत्यंत तत्पर असे;परंतु जडत्वामुळें शास्त्राध्ययनांत त्याचें पाऊल पुढें पडत नसे. एके दिवशीं आचार्यानें जेवल्यानंतर त्याला आपली पाठ दाबण्यास सांगितली. तें काम आटपून तो जाण्यास निघाला असतां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, “बाळा या खाटेचे पाय वरखालीं झाल्यामुळें ती डळमळते. तेव्हां एका पायाला कांहीं तरी टेका देऊन मग जा.” शिष्याला दुसरा कांहीं टेका न सांपडल्यामुळें खाटेच्या पायाला मांडीचा टेका देऊन त्यानें सर्व रात्र तेथेंच काढिली. सकाळीं जेव्हां आचार्याला ही गोष्ट समजली तेव्हां त्याच्या मनाला ती फार लागली. “हा माझा विद्यार्थी माझ्यावर अत्यंत प्रेम करीत असून माझ्याकडून याचें कांहींच हित होत नाहीं. इतर विद्यार्थी पुढें पुढें जात असून याला अगदीं आरंभीचे पाठ देखील येत नाहींत. याला शिकवण्याला कांहीतरी मार्ग सांपडेल काय?” अशा विचारांत बोधिसत्त्व निमग्न होऊन गेला. व त्यानें मोठ्या कष्टानें एक युक्ति शोधून काढली.

दुसऱ्या दिवशीं त्या विद्यार्थाला जवळ बोलावून बोधिसत्त्व म्हणाला, “बाबारे, तुला शिकविण्यासाठीं मी एक नवीन युक्ति शोधून काढिली आहे. आजपासून तूं तुझा धडा तयार नाहीं केला तरी हरकत नाहीं. परंतु जेथें जेथें जाशील व एखादी नवी वस्तू पाहशील तेथें तेथें त्या वस्तूसंबंधानें नीट विचार कर, व घरीं आल्यावर मी प्रश्न विचारिला असतां तिचें नीट वर्णन कर.”

त्याच दिवशीं दुपारीं तो विद्यार्थी वनांत गेला असतां त्याला एक साप आढळला. घरीं आल्यावर त्यानें हें वर्तमान आपल्या गुरूस कळविलें. तेव्हां आचार्य म्हणाला, “तो साप कसा होता? एखादी उपमा देऊन त्याचें वर्णन कर.” शिष्य म्हणाला, “तो नांगराच्या इसाडासारखा होता.” आचार्याला शिष्यानें केलेल्या उपमेनें फार आनंद झाला. साप नांगराच्या इसाडासारखा असावयाचा तेव्हां शिष्याची अवलोकनशक्ति हळुहळु वृद्धिंगत होत जाईल अशी गुरूला बळकट आशा वाटूं लागली.

कांहीं कालानें शिष्याला अरण्यांत फिरत असतां एक हत्ती आढळला. त्यानें ताबडतोब गुरूला ही गोष्ट सांगितली. तेव्हां गुरूनें हत्ती कसा असतो असा प्रश्न केला. शिष्यानें रोकडा जबाब दिला कीं, नांगराच्या इसाडासारखा. बोधिसत्त्वाला वाटलें कीं, हत्तीची सोंड नांगराच्याइसाडासारखी असते; परंतु मंदबुद्धिमुळें यानें सर्वच हत्ती नांगराच्या इसाडासारखा असतो अशी उपमा केली असावी. विचार करितां करितां हा सुधारल्यावांचून रहाणार नाहीं.

शिष्यानें आपल्या सहाध्यायांबरोबर दुसऱ्या दिवशीं एक ऊंस खाल्ला व घरीं जाऊन ही गोष्ट आपल्या गुरूला सांगितली. बोधिसत्त्वानें ऊंस कसा असतो असा प्रश्न केल्यावर शिष्यानें नांगराच्या इसाडासारखा असतो, असा आपला ठरीव जबाब दिला. उंसाचें आणि नांगराच्या इसाडाचें थोडेसें साम्य आहे असें जाणून बोधिसत्त्व कांहीं न बोलतां उगाच राहिला.

अनुक्रमणिका

एके दिवशीं त्या शिष्याला आणि त्याच्या कांहीं सहाध्यायांला एका घरीं आमंत्रण होतें. त्या गृहस्थानें त्याला दूध, दहीं वगैरे पदार्थ यथेच्छ खाऊं घातले. शिष्यानें ती गोष्ट घरीं येऊन आपल्या गुरूला निवेदन केली. दूध, दहीं कसें असतें असा प्रश्न विचारिल्यावर नांगराच्या इसाडासारखें, असा त्यानें कायमचा जबाब दिला, तेव्हां आमच्या बोधिसत्त्वाची त्याच्या शिक्षणाबद्दल पूर्ण निराशा झाली. तो म्हणाला, “आजपर्यंत मला याची बुद्धि वृद्धिंगत होईल अशी थोडीबहुत आशा वाटत होती पण या मूर्खाला दहीं, दूध आणि नांगराचें इसाड याची सांगड घालण्याला मुळींच दिक्कत वाटत नाही! जणूं काय नांगराच्या इसाडाची उपमा यानें कायमचीच बनवून ठेवली आहे!”

——✵✵✵——

अनुक्रमणिका

३७. परोपकारांचे फळ. (१२४)

(अंबजातक नं. १२४)

एकदां आमचा बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर ऋषिवेषानें तो हिमालयावर रहात असे. तेथें त्याचे पुष्कळ शिष्य होते. एका वर्षी हिमालयावर भयंकर उन्हाळा सुरू झाला व त्यामुळें पाण्याचे झरे वगैरे आटून गेले. मृगादिक प्राण्यांना पाणी मिळण्याची फार अडचण पडूं लागली. तेव्हां बोधिसत्त्वाच्या शिष्यांपैकीं एका तपस्व्यानें एक लांकडाची मोठी दोणी करून तेथील पशूंला पाणी पाजण्यास सुरुवात केली. पण त्यामुळें त्याला फलमुलें आणण्यासाठीं अवकाश मिळेनासा झाला, व उपाशीं पोटींच पशूंना पाणी पाजण्याची पाळी आली. तथापि त्यानें आपला प्रयत्न न सोडतां सर्व श्वापदांची तृप्ति करण्याचा क्रम तसाच पुढें चालविला. तें पाहून पशूंनी “हा तपस्वी आमच्यासाठीं फार कष्ट सहन करितो. तेव्हां याचे उपकार फेडणें अत्यंत आवश्यक आहे.” असा विचार करून सर्वानुमतें हा ठराव पास केला, “आजपासून जो प्राणी येथें पाणी पिण्यास येईल त्यानें रिकामें न येता आपल्या सामर्थ्याप्रमाणें एकतरी मनुष्योपभोगाला योग्य असें फळ घेऊन यावें. रिक्त हस्तें येऊं नये.”

दुसऱ्या दिवसापासून बोधिसत्त्वाच्या आश्रमांत फळांचे नुसते ढीग पडूं लागले. पांचशें तपस्व्यांला दुसऱ्या ठिकाणीं फलमूलांचा शोध करण्यास गेल्यावांचून तेथल्या तेथें आहार मिळूं लागला. व त्यामुळें त्यांच्या तपश्चर्येला मोठी मदत झाली. त्या तपस्व्याच्या कृत्यानें बोधिसत्त्व खूष होऊन आपल्या शिष्यगणाला म्हणाला, “तपस्वी हो, परोपकाराचें हें फल लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आमच्यापैकीं एकानें परोपकारार्थ आपला देह झिजविल्यामुळें आमच्या तपश्चर्येला पुष्कळ मदत झाली आहे. म्हणून परोपकार करण्यास आपण सदोदित झटलें पाहिजे.”

——***——

अनुक्रमणिका

३८. परदेशीं जाऊन डौल मारणें सोपें असतें. (१२५)

(कटाहकजातक नं. १२५)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं वाराणसी नगरींत अत्यंत धनाढ्य श्रेष्ठी झाला होता. वयांत आल्यावर त्याला एक सुस्वरूप मुलगा झाला. त्याच दिवशीं त्याच्या दासीलाहि एक मुलगा झाला. या दासीपुत्राचें नांव कटाहक असें ठेवण्यांत आलें. तो आपल्या धन्याच्या मुलाबरोबरच वाढला. लहान मूल असल्यामुळें त्याला कोणी आडकाठी करीत नसत. पुढें बोधिसत्त्वाच्या मुलाला अक्षर ओळख करून देण्यासाठी एक शिक्षक ठेविला. तेव्हां कटाहक देखील त्या शिक्षकाजवळ जाऊन आपल्या मित्राबरोबर लिहिण्यावाचण्यास शिकला. त्याची हुषारी पाहून पुढें वयांत आल्यावरबोधिसत्त्वानें त्याला आपल्या तिजोरीचा अधिकारी नेमिलें. तें काम तो मोठ्या दक्षतेनें करीत असे. तथापि त्याला अशी शंका आली कीं, "कितीहि झालें तरी मी पडलों दासीपुत्र, माझा लहानसहान दोष देखील सर्वांना मोठा वाटेल; व कदाचित् माझा छळहि करितील आणि पुनः माझ्याकडून दासकर्म करवून घेतील. तेव्हां येथें रहाणें सुरक्षित वाटत नाहीं."

दिवसें दिवस दुसऱ्या कोठेंतरी दूरच्या गांवीं पळून जावें हा कटा—हकाचा विचार दृढ होत गेला. पण परक्या गांवीं निर्वाह कसा करावा याची त्यास पंचाईत पडली. शेवटीं त्यानें एक युक्ति शोधून काढली. ती अशी—"दूरच्या एका लहानशा शहरांत श्रेष्ठीच्या ओळखीचा व्यापारी रहात असे. त्याचा आणि बोधिसत्त्वाचा व्यापारासंबंधानें वारंवार पत्रव्यवहार होत असे. बोधिसत्त्वाच्या तर्फे बहुधा कटाहकच हीं पत्रें लिहीत असे, व त्यांवर बोधिसत्त्वाचा शिक्का मारून तीं रवाना करीत असे. अशाच एका प्रसंगीं त्यानें आपल्या संबंधानें त्या व्यापाऱ्याला पत्र लिहून त्यावर श्रेष्ठीचा शिक्का मारून तें बंद करून आपल्या पदरीं ठेविलें व दोन चार दिवसांनीं वाराणसींतून पळ काढला. त्याच्याजवळ जें द्रव्य होतें तें खर्चून वाटेंत त्यानें आपला निर्वाह चालविला आणि बरेंच दिवस प्रवास करून व्यापारी रहात होता तें शहर गांठलें. व्यापाऱ्यानें 'कोठून आलांत' असा प्रश्न केल्यावर तो म्हणाला, "वाराणसी नगरींतील प्रसिद्ध श्रेष्ठीचा मी पुत्र आहें. माझ्या थोरल्या भावामध्यें आणि मजमध्यें तंटा होऊं नये म्हणून माझ्या पित्यानें मला आपणापाशीं पाठविलें आहे. आपणाला मुलगा नाहीं असें आम्हीं एकतों. तेव्हां आपण माझें पुत्रवत् पालन करून आपल्या कन्येशीं माझा विवाह करून द्याल अशी माझ्या पित्याला दृढ आशा वाटत आहे, व याचसाठीं मला त्यानें हें पत्र दिलें आहे." असें म्हणून कटाहकानें तें पत्र त्या व्यापाऱ्यासमोर टाकिलें. त्यांत हाच मजकूर होता. श्रेष्ठीनें आपला मुलगा बुद्धिमान असून व्यापारांत दक्ष आहे, तेव्हां त्याला आपणाजवळ ठेऊन घेऊन आपला घरजांवई कराल अशी आशा बाळगतों इत्यादि मजकूर लिहिला होता. तो वाचून त्या व्यापाऱ्याला फारच आनंद झाला. एवढ्या मोठ्या सावकाराचा मुलगा आपल्यासारख्या गरीब व्यापाऱ्याचा घरजांवईहोणें मोठें भूषणास्पद आहे. तेव्हां ही आपल्या घरीं लक्ष्मी चालत आली आहे असें त्यास वाटलें; व पहिल्या मुहूर्तावर त्यानें कटाहकाशीं आपल्या कन्येचें लग्न लावून दिलें.

कटाहक जात्या हुषार होता हें वर सांगितलेंच आहे. पण आगंतुक श्रीमंतीमुळें त्याच्या अंगी एक दुर्गुण शिरला होता. तो ज्याच्या त्याच्या अंगावर तोंड टाकीत असे. लहानसहान अपराधहि त्याला सहन होत नसे. भोजनसमयीं स्वयंपाकांत कांहीं कमतरता दिसून आली तर तो आपल्या बायकोवर फार संतापत असे, व त्यामुळें त्या बिचारीला उगाच त्रास सोसावा लागत असे. याशिवाय कटाहकाच्या वर्तनांत म्हणण्यासारखे दुसरे दोष नव्हते.

अनुक्रमणिका

कटाहक पळून गेल्यावर श्रेष्ठीला वर्ष दोन वर्षे त्याचा पत्ता लागला नाहीं. पण पुढें तो व्यापाऱ्याच्या घरीं घरजांवई होऊन रहात आहे ही बातमी त्याला समजली, व तिचा खरेपणा पाहण्यासाठीं त्यानें आपले हेर त्या शहरीं पाठविले. त्यांनी जेव्हां बोधिसत्त्वाला कटाहकाचें इत्यंभूत वर्तमान सांगितले, तेव्हां त्यानें तेथें जाऊन त्याची फजीति करून पुनः आपल्या घरीं आणण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें आपल्याबरोबर मोठा सरंजाम घेऊन तो त्या शहरीं जाण्यास निघाला. तो त्या शहरापासून कांहीं अंतरावर पोहोंचला नाहीं तों त्याच्या आगमनाचें वर्तमान कटाहकाला समजलें, व तो अगदीं घाबरून गेला. श्रेष्ठी या ठिकाणीं आला तर आपली पुरी फजीति होणार हें तो जाणून होता पण येथून दुसऱ्या ठिकाणीं पळून जाणें हें देखील त्याला इष्ट वाटेना. कांहीं काळ कटाहक किंकर्तव्यमूढ होऊन विवंचनेंत पडला. परंतु त्याच्या समयसूचकबुद्धीनें त्याला शेवटीं हात दिला. या नवीन संकटांतून पार पडण्यास त्यानें नवीच युक्ति शोधून काढली. त्या दिवसापासून आपल्या आत्पइष्टांजवळ तो पितृभक्तीचीं मोठमोठालीं वर्णने करूं लागला. तो म्हणाला, "अहो तुमचें हें शहर म्हणजे वाराणसीच्या मानानें नुसतें खेडेगांव आहे. येथील लोकांना रीतरिवाज कांहींच माहीत नाहीं. पितृभक्ति कशी असते हें या गांवढळ लोकांना कसें समजणार. तुम्ही एकदां वाराणसीला जाऊन पहा! आम्हीं तेथें आमच्या वडिलांसमोर कधींहि खालीं बसत नसतों. भोजनसमयीं त्यांची सर्व सेवाकरतों. पिकदाणी लागली तर आणून देतों. एवढेंच नव्हे तर वडील शौचाला जावयास निघाले; तर स्वतः त्यांजबरोबर त्यांच्या उपयोगासाठीं पाणी नेऊन ठेवितों. असलीं कामें आम्ही आमच्या नोकरांवर मुळींच सोंपवित नसतों पण या गांवीं तुम्हाला अशा तऱ्हेनें पितृसेवा करावी ही गोष्ट माहीत तरी आहे काय?"

त्या शहरांतील लोकांनीं वाराणसींत फार दिवस वास्तव्य केलें नसल्यामुळें व तेथील रीतिरिवाजाची माहिती नसल्यामुळें कटाहक सांगेल तें त्यांना प्रमाण होऊन बसलें, व काशीच्या चालीरीतीसंबंधानें त्यांना एकप्रकारचा मोठा आदर वाटला.

महाश्रेष्ठी लवकरच त्या शहरीं पोहोंचणार हें जाणून कटाहक आपल्या सासऱ्याला म्हणाला, "मामाजी, तुम्ही माझ्या पित्याच्या आदरातिथ्याची सर्व तयारी करून ठेवा. मी पित्याच्या भेटीला आमच्या सामर्थ्याप्रमाणें नजराणे घेऊन जातों व मोठ्या गौरवानें त्याला येथें घेऊन येतों. आपले वडील इतके जवळ आले आहेत हें जाणून घरींच बसून राहणें हें वाराणसींतील कुलपुत्रांना अत्यंत अनुचित आहे. तेव्हां मी आजच्या आज माझ्या पित्याच्या भेटीसाठीं जात आहे."

बराच लवाजमा बरोबर घेऊन तो महाश्रेष्ठीच्या दर्शनाला गेला. वाटेंत महाश्रेष्ठी एका ठिकाणीं उतरला होता. तेथें कटाहकानें त्याची भेट घेऊन आपण आणलेले नजराणे दिले. श्रेष्ठीला मोठा चमत्कार वाटला! आपलें नांव ऐकल्याबरोबर कटाहकानें पलायन करावें किंवा गर्भगळीत होऊन जावें, असें असतां हा दासीपुत्र मोठ्या शौर्यानें आपल्याजवळ येऊन नजराणे देतो याचा अर्थ काय? हें त्याला समजेना. श्रेष्ठी या विचारांत गढून गेला असतां स्नानाची वेळ झाली, स्नानाच्यापूर्वी शौचविधीला जाण्याचा श्रेष्ठीचा परिपाठ असे. त्याप्रमाणें श्रेष्ठी आपल्या ठाण्याजवळच्या जंगलांत जाण्यास निघाला. त्यावेळीं कटाहकानें आपल्या लोकांना तेथेंच रहाण्यास सांगितलें, व तो उदकपात्र घेऊन, श्रेष्ठीच्या मागोमाग गेला. वाराणसींतील कुलपुत्र आपल्या पित्याची अनन्यभावें सेवा करीत असतात ही गोष्ट कटाहकाच्या सर्व नोकरांना माहीत असल्यामुळें त्यांना त्याच्या या कृत्यानें मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं. श्रेष्ठी एकांत स्थानीं गेल्यावरकटाहकानें उदकपात्र खालीं ठेऊन त्याच्या पायावर एकदम उडी टाकली; आणि म्हणाला, "महाराज मी जरी आपला दासीपुत्र आहें, तथापि आपल्या मुलासंगेंच माझें आपण पालन केलें आहे. मी केलेले सर्व अपराध क्षमा करून येथें मला मुलाच्या नात्यानें वागविल्यास माझ्यावर अत्यंत उपकार होईल. पण जर तुम्ही माझें कृत्य

अनुक्रमणिका

उघडकीस आणाल तर त्यापासून कोणाचाच फायदा न होतां बिचाऱ्या माझ्या सासऱ्याच्या कुटुंबांत फारच गोंधळ उडून जाईल व त्यामुळें सर्वांना दुःख भोगावें लागेल."

बोधिसत्त्व फार दयाळू होता. त्याचें मन वळविण्यास कटाहकाला मुळीच आयास पडले नाहींत. शेवटीं त्याजकडून आपलें दासीपुत्रत्व उघडकीला न आणण्याबद्दल अभिवचन घेऊन कटाहक तेथून माघारा आला. त्या दिवसापासून तो श्रेष्ठीची दासाप्रमाणें सेवा करीत असे. श्रेष्ठी व्यापाऱ्याच्या घरीं आल्यावर देखील कटाहकानें त्याची सर्वप्रकारें सेवा केली व त्याला प्रसन्न करून घेतलें.

एके दिवशीं कटाहक कांहीं कामानिमित्त बाहेर गेला असतां त्याची बायको बोधिसत्त्वाला भेटली. तेव्हां बोधिसत्त्व तिला म्हणाला, "काय सूनबाई, माझा मुलगा तुम्हाला चांगल्या रीतीनें वागवतोना?" ती म्हणाली, "मामंजी, आपल्या चिरंजीवाचा कोणताही दोष नाहीं, त्यांचें माझ्यावर फार प्रेम आहे. केवळ भोजनप्रसंगीं कधीं कधीं कांहीं पदार्थ वाईट लागला तर ते माझ्यावर संतापत असतात; हाच काय तो त्यांचा दोष आहे." "मुली, माझा मुलगा लहानपणापासून असाच आहे. जेवण्याखाण्यांत त्याच्या फार खोडी असतात पण तूं वाईट वाटूं देऊं नकोस. त्याचें तोंड बंद करण्याचा एक मंत्र मी तुला शिकवून ठेवितों. तो तूं चांगला पाठ करून ठेव व जेव्हां माझा मुलगा तुझ्यावर रागावेल तेव्हां तो म्हणत जा. एक दोनदां या मंत्राचा प्रयोग केला असतां माझ्या मुलाची प्रकृति पाण्यापेक्षांहि थंड होईल हें मी तुला खात्रीनें सांगतो."

श्रेष्ठी कांहीं दिवस त्या व्यापाऱ्याच्या घरीं राहून वाराणसीला जाण्यास निघाला. कटाहक त्याच्याबरोबर बराच दूर अंतरावर गेला. व पुष्कळ नजराणे देऊन त्यानें त्याचा मोठा गौरव केला; आणि मोठ्या आदरानें साष्टांग नमस्कार करून पुनः आपल्या सासऱ्याच्या घरीं आला. या दिवसापासनत्याचा मान अधिकच वाढला. कां कीं, आतां त्याचें दासीपुत्रत्व उघडकीला येण्याचा संभव राहिला नाहीं. त्यामुळें बिचाऱ्या बायकोला भोजन प्रसंगीं अधिक त्रास होऊं लागला. एके दिवशीं आपल्या नवऱ्यासाठीं स्वहस्तानें चांगलें जेवण तयार करून तिनें वाढण्यास सुरुवात केली. पहिलाच पदार्थ कटाहकाला आवडला नाहीं. तो फार संतापला. त्याच्या बायकोला सासऱ्यानें दिलेल्या मंत्राची आठवण झाली व तिनें ताबडतोब त्याचा प्रयोग केला. ती म्हणाली :—

बहुंपि सो विकत्थेय्य अञ्ञं जनपदं गतो।
अन्वागन्त्वान दूसेय्य भुंज भोगे कटाहक॥

अर्थ—दुसऱ्या देशांत जाऊन पुष्कळ बडबड करतां येते. पण परत येऊन तो हें उघडकीस आणील. तेव्हां हे कटाहक मुकाट्यानें मिळालेल्या पदार्थांचा उपभोग घे!

हा मंत्र कानीं पडल्याबरोबर कटाहक घाबरून गेला. श्रेष्ठीनें आपल्या हीनत्वाबद्दल सर्व कांहीं हिला सांगून ठेविलें असलें पाहिजे असें त्याला वाटलें. तेव्हांपासून बायकोवर संतापण्याची त्याची छाती झाली नाहीं. इतकेंच नव्हें तर तो नम्र आणि सालस बनला, व किती वाईट पदार्थ असला तरी त्यामुळें तो कधींहि चिडला नाहीं. जें काहीं मिळेल तेवढ्यानें संतुष्ट राहून आपला वेळ त्यानें सत्कर्मीं खर्च केला.

——✱✱✱——

अनुक्रमणिका

३९. एकाला अपाय तो दुसऱ्याला उपाय. (१२६)

(असिलक्खणजातक नं. १२६)

प्राचीन काळीं वाराणसी नगरींत ब्रह्मदत्त नांवाचा राजा राज्य करीत असतां त्याच्या पदरीं तरवारीची परीक्षा करणारा एक ब्राह्मण रहात असे. याला असिलक्षण पाठक ब्राह्मण असें म्हणत असत. तो एखाद्या लोहारानें राजाच्या उपयोगासाठीं नवीन तलवार आणली असतां तिचा वास घेऊन परीक्षा करीत असे. या त्याच्या कौशल्यामुळें राजानें त्यालातलवारीचा परीक्षक नेमिलें होतें. पण हा अधिकार हातीं आल्यावर तो लोहाराकडून लांच घेऊन वाईट तलवारी चांगल्या ठरवूं लागला, आणि लाच न मिळाला तर चांगल्या तलवारीहि वाईट ठरवू लागला. ज्याला ही गोष्ट माहीत नव्हती अशा एका दूरच्या लोहारानें राजासाठीं उत्तम तलवार करून आणली. पण असिलक्षणपाठकाला लांच न मिळाल्यामुळें ती खोटी ठरली. त्या लोहारानें हा ब्राह्मण लबाड आहे हें तेव्हांच जाणलें, व याची खोड मोडण्यासाठीं त्यानें दुसरी एक अत्यंत तीक्ष्ण धारेची तलवार बनवून ती मिरचीच्या पुडींत चांगली लोळवून म्यानांत घालून दरबारांत आणली. राजानें असिलक्षणपाठकाला तिची परीक्षा करण्याचा हुकूम केला. त्यानें एकदम म्यानांतून काढून तिला आपल्या नाकाजवळ नेलें. मिरचीच्या पुडीच्या वासामुळें त्याला जोरानें शिंका आल्या, व त्यायोगें हात घसरून त्याचें नाक कापलें गेलें! राजानें आपल्या वैद्यांना बोलावून आणून औषधोपचार करविले. व असिलक्षणपाठकाला गूण पडून जखम साफ बरी झाल्यावर एक लाखेचें कृत्रीम नाक करवून त्याच्या नाकावर बेमालूम बसवून देण्यास लाविलें. असिलक्षणपाठक राजाच्या मर्जीतील असल्यामुळें त्याचा गुन्हा उघडकीस आला होता, तथापि त्याला दरबारांतून घालवून देण्यांत आलें नाहीं. तो आपल्या कृत्रीम नासिकेसह राज्यसेवेला तत्पर राहिला.

या राजाला एकुलती एकच कन्या होती. तिचें लहानपणापासून आपल्या आतेभावावर म्हणजे राजाच्या भाच्यावर अत्यंत प्रेम जडलें. राजाला ही गोष्ट इष्टच वाटत होती. आपली कन्या भाच्याला देऊन त्यालाच आपल्यामागें गादीचा वारस करावें असा त्याचा बेत होता. परंतु त्याच्या मंत्र्यांचें असें म्हणणें होतें कीं, राजकन्येला एक बलाढ्य राजा वर मिळाला असतां आपल्या राजाचें हित होईल. त्यामुळें आपल्या आणि त्या राजाच्या राष्ट्रांत निकट हितसंबंध जुळून येऊन परस्परांची परस्परांला मदत होईल. राजाला ही सल्ला विशेष आवडली; व आपला पहिला बेत त्यानें रहित केला. परंतु त्याचा भाचा आणि मुलगी या दोघांमध्यें वृद्धिंगत होत असलेलें प्रेम खच्ची करणें फार कठीण होतें. तथापि निराश न होतां त्यानें त्या दोघांला एकत्र रहाण्याची सक्त मनाई केली. मुलीला राजवाड्यांत ठेऊन भाच्याला दूर दुसरें एक घर बांधून देण्यांत आलें.

नदीच्या प्रवाहाला बांध घातला असतां पाणी तुंबून जाऊन तें कोठून तरी बाहेर पडण्याची मार्गप्रतीक्षा करीत असतें. तद्वत् प्रेमाचीहि स्थिती आहे. त्याला कोणी आडकाठी केली असतां त्याचा जोर वाढत जाऊन तो भल्या किंवा बुऱ्या मार्गानें बाहेर पडल्यावांचून रहात नाहीं. राजकन्या आणखी तिचा भावी पति यांची प्रत्यक्ष गांठ पडत नव्हती. तथापि, अप्रत्यक्ष दासींच्या द्वारें दोघांचीहि भेट कशी जुळवून आणतां येईल या संबंधांनें त्यांचीं खलबतें चालूं होतीं पण त्यांना भेटीचा योग जुळवून आणण्यास युक्ति सांपडली नाहीं.

अनुक्रमणिका

राजदरबारीं एक चाणाक्ष ज्योतिषीणबाई होती. तिच्या कल्पकतेबद्दल सर्वांची खात्री होती. राजाच्या भाच्यानें नजराणे पाठवून व गोड गोड बोलून तिची मर्जी संपादन केली, व आपली आणि राजकन्येची भेट होण्याचा योग जुळवून आणण्याचा कांहीं उपाय शोधून काढण्याविषयीं तिला विनंती केली. त्या धूर्त बाईला यांत कांहीं विशेष अक्कल खर्चण्याचें कारण पडलें नाहीं. तिनें या कामीं जी युक्ति योजिली तिचा यापुढील गोष्टीवरून उलगडा होणारच असल्यामुळें येथें निराळा उल्लेख करीत नाहीं. एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, राजाच्या भाच्याला तिच्या मसलतीनें फार आनंद झाला, व तिनें सांगितलेल्या मार्गांचा अवलंब करण्याचें त्यानें तिला वचन दिलें.

ज्योतिषीणबाईनें आपण अशी युक्ति योजिली आहे हें राजकन्येला आगाऊच सांगून ठेविलें व तदनंतर राजाजवळ जाऊन ती म्हणाली "महाराज, आपल्या कन्येवर एका पिशाच्याची वक्रदृष्टि आहे. ताबडतोब शांति भूतशांति केली नाहीं तर तिच्यावर अनिष्ट संकटें येण्याचा संभव आहे." राजा म्हणाला, "माझ्या एकुलत्या एका मुलीसाठीं मी भूतशांति करण्यास तयार होणार नाहीं, अशी तुमची समजूत आहे काय? जें काय ठरावयाचें असेल तें मला आतांच सांगा. मी सर्व व्यवस्था आजच्याआज करविण्याचा हुकूम देतों."

ज्योतिषीणबाई म्हणाली, "महाराज, राजकन्येला स्मशानांत नेऊन टाका, मंचकावर निजवून त्या मंचकाखालीं एक प्रेत ठेविलें पाहिजे वभूतशांतीचे मंत्र उच्चारून तें भूत त्या प्रेतावर जाईल असा प्रयोग केला पाहिजे."

राजानें ज्योतिषीणबाईच्या म्हणण्याप्रमाणें सर्व व्यवस्था करावी अशी राजवाड्यांतील नोकरांना आज्ञा केली. प्रेत कशा रीतीचें निवडावें हें ज्योतिषीणबाईनें आपल्या हातीं ठेविलें होतें. ठरलेल्या दिवशीं राजाचा भाचा स्मशानाच्या कोपऱ्यांत जेथें हा विधी व्हावयाचा होता तेथें डोक्यावरून पायापर्यंत सर्व शरीर वस्त्रानें गुंडाळून निजला. त्यानें आपले सशस्त्र शिपाई आजुबाजूला झाडींत दडवून ठेविले होते, व आपणाबरोबर मिर्चीच्या पुडीची एक लहानशी डबी ठेविली होती. ज्योतिषीणबाईनें राजकन्येचा मंचक आणून या जिवंत प्रेतावरच ठेवविला; व ती राजवाड्यांतील नोकरांना म्हणाली "संभाळाहो माझा प्रयोगविधी चालला असतां या प्रेतांत राजकन्येवर असलेलें भूत शिरूर तें नाचूं लागेल. व पहिल्यानें जो त्याच्या तावडींत सांपडेल त्याचा प्राण घेईल. या प्रेतांत जिवंतपणा आल्याचें चिन्ह म्हटलें म्हणजे त्याला एक दोन शिंका येतील, व त्या आल्याबरोबर तें उठून धावावयास लागेल. नंतर त्याच बाईनें राजकुमारीला गंधोदकानें स्नान वगैरे घालून यथाविधी त्या मंचकावर निजविलें, व मंत्र म्हणण्यास आरंभ केला. इतक्यांत खालील माणसानें मिरचीची तपकीर ओढली त्याबरोबर त्याला सटासट शिंका येऊं लागल्या. आतां हें प्रेत आमच्यांतील कोणाचा तरी बळी घेणार असें जाणून जो तो पळत सुटला! ज्योतिषीणबाईनें तर सर्वांच्या आधींच पळ काढला! राजाचा भाचा मंचकाच्या बाहेर येऊन राजकन्येला भेटला, व आपल्या सशस्त्र शिपायांसहवर्तमान त्यानें तिला स्वगृहीं नेलें. पुढें राजाच्या कानीं ही बातमी गेली तेव्हां तो आपल्या अमात्यांना म्हणाला, एवीं तेवीं माझा त्यालाच मुलगी देण्याचा बेत होता. मध्यंतरी तो रहीत झाला खरा. पण शेवटीं भाच्यानें स्वतःच तडीला नेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं! आतां त्याच्या या कृत्याबद्दल त्याला दंड न करतां त्याचें यथासांग लग्न करण्याची सर्व तयारी करा."

राजाज्ञेप्रमाणें विवाहमंगलाची सर्व व्यवस्था करण्यांत आली व शुभ मुहूर्तावर राजकन्येचें आणि राजाच्या भाच्याचें लग्न झालें. तेव्हांपासून राजानें सर्व राज्यभार जामातावर टाकून धर्मचिंतनांत

कालक्रमणा करण्यास सुरुवातकेली. असिलक्षणपाठक या तरुण राजाच्या सेवेला पूर्वीप्रमाणें सर्वथैव तत्पर असे. एके दिवशीं राजा उद्यानांत मोकळ्या जागीं बसला असतां असिलक्षणपाठक ब्राह्मण त्याजवळ उभा होता. त्यांचें संभाषण चालूं असल्यामुळें त्याला तेथून दुसरीकडे जातां येईना. पण सूर्याच्या बाजूला त्याचें तोंड असल्यामुळें लाखेचें नाक वितळलें व खालीं पडलें. त्यायोगें त्याला फारच लाज वाटली. तो तोंड खालीं घालून ओशाळा होऊन मुकाट्यानें राहिला. नवीन राजा हा प्रकार पाहून हंसत हंसत त्याला म्हणाला "गुरुजी, विनाकारण लाजूं नका कारण शिंकेमुळें तुमची हानि झाली असली तथापि ती सर्वांनाच अपाय करते असें नाहीं. कां कीं, त्याच शिंकेनें मला राज्यप्राप्ति झाली आहे! एकाचा अपाय तो दुसऱ्याचा उपाय!

——***——

अनुक्रमणिका

४०. दांभिक कोल्हा. (१२९)

(अग्निकजातक नं. १२९)

एका काळीं बोधिसत्त्व उंदराच्या कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर पुष्कळ उंदरांचा राजा होऊन तो अरण्यांत एका गुहेंत रहात असे. त्या अरण्यांत एके दिवशीं गवताला आग लागून ती जिकडे तिकडे पसरली. तींत एक कोल्हा सांपडला. पळावयास दुसरी वाट न सांपडल्यामुळें त्यानें एका झाडाच्या बुंध्याचा आश्रय केला. बुंध्याला डोकें टेंकून तो तेथें मृतप्राय पडून राहिला. जवळपास गवत नसल्यामुळें तो भाजून मेला नाहीं. परंतु त्या दावाग्नीच्या ज्वालांनीं त्याच्या अंगावरील सर्व केस जळून गेले. डोकें बुंध्याला टेकलें असल्यामुळें त्यावर मात्र शेंडीसारखे वर्तुलाकार केस राहिलें. एके दिवशीं पाणी पिण्यास गेला असतां आपली पडछाया पाहून त्याला मोठा चमत्कार वाटला. धार्मिक ब्राह्मणासारखी डोक्यावर तेवढी शेंडी, आणि बाकी आंग गुळगुळीत. तो आपल्याशींच म्हणाला, “शहाणा मनुष्य विपत्तीचा देखील फायदा करून घेतो. आगींनें होरपळून गेल्यामुळें जरी माझें नुकसान झालें आहे, तथापि या शेंडीचा चांगला उपयोग करून घेतां येईल.”

आमच्या बोधिसत्त्वाचें निवासस्थान त्याला माहीत होतें; परंतु त्याच्या गुहेंतील शतमुखी बिळांत त्याचा रिघाव होणें केवळ अशक्य होतें. पण ते लठ्ठ लठ्ठ उंदीर या कड्यावरून त्या कड्यावर उड्यामारीत असतांना पाहून त्याला वारंवार पाणी सुटत असे. या नवीन शेंडीचा फायदा घेऊन आपला कांहीं डाव साधेल तर पहावा या हेतूनें त्यानें बोधिसत्त्वाच्या बिळापासून कांहीं अंतरावर तपश्चर्येला सुरुवात केली. आकाशाकडे पहात दोनच पायांवर उभें रहावें. तोंड वासून सूर्याकडे टकमक बघत बसावें, इत्यादि तपश्चर्येचे प्रकार त्यानें आरंभिले. त्याला पाहून बोधिसत्त्वाला वाटलें कीं हा कोणीतरी मोठा धार्मिक प्राणी असावा. तो कोल्ह्याजवळ जाऊन त्याला म्हणाला, “बाबारे, हें तूं काय चालविलें आहेस? कोल्हा म्हणाला, “आयुष्याचे दिवस प्राण्याच्या हिंसेंत आणि दुसऱ्या अनेक पापकृत्यांत गेल्यामुळें मला दृढतर पश्चात्ताप झाला आहे. आणि त्या कृत्यांच्या परिमार्जनासाठीं घोर तपश्चर्या करण्याचा माझा निश्चय झाला आहे. यापुढें कोणत्याही प्राण्याला न दुखवितां त्यांची सेवा करावी. सर्व प्रकारें त्याच्या उपयोगीं पडावें हेंच माझें व्रत आहे. तुम्हाला जर माझा कांहीं उपयोग झाला तर मीं मला धन्य समजेन!”

मूषकराज म्हणाला, “आम्हाला तुमच्यापासून कांहीं नको आहे. तुम्ही सत्पुरुष आहा तेव्हां तुमच्या सारख्याच्या सहवासानें आमच्यावर फार मोठे उपकार होणार आहेत. तुम्ही या प्रदेशांत राहिलांत म्हणजे आम्हाला तुमचें वारंवार दर्शन होऊन मोठें पुण्य संपादण्याचा मार्ग खुला होईल.”

कोल्हा म्हणाला, “हें सर्व खरें आहे. तथापि माझ्या तपश्चर्येला बळकटी आणण्यासाठीं मी तुमची सेवा करूं इच्छित आहे. लहानपणीं मी गणित शिकलों होतो, त्याचा मला येथें चांगला उपयोग होईल, तुम्ही सर्व उंदीर चरावयाला जात असतांना मी तुमची संख्या मोजीत जाईन व त्याप्रमाणेंच बिळांत जात असतां गणना करून एखादा दुसरा उंदीर हरवला तर आपल्याला कळवीत जाईन.

बोधिसत्त्वाला ही गोष्ट फारच पसंत पडली. उंदराच्या कळपाची यायोगें अभिवृद्धि होईल असें त्यास वाटलें; व कोल्ह्याच्या विनंतीस त्यानें रुकार दिला. तेव्हां कोल्हा म्हणाला, “मी तुमच्या कळपाची गणना

करीतअसतां तुम्हीं सध्यांच्याप्रमाणें झुंडीनें जातां कामा नये. क्रमशः एक एकानें सरळ माझ्या जवळून गेलें पाहिजे.

बोधिसत्त्वानें ही कोल्ह्याची अट संतोषानें कबूल केली.

दुसऱ्या दिवसापासून कोल्ह्याच्या गणनेला सुरुवात झाली. सगळे उंदीर त्याजवळून गेल्यावर शेवटल्या उंदरावर झडप घालून त्याला तो तेथेंच दडपून टाकीत असे व आपल्या पोटाखालीं झाकून ठेऊन इतर दूर गेले म्हणजे मग त्याचा फळाहार करीत असे. बोधिसत्त्वाची आणि त्याच्या कळपांतील उंदीरांची अशी दृढ समजूत होती कीं, कोल्हा मोठा धार्मिक असून तो तपस्व्याप्रमाणें आपला निर्वाह पाण्यावर आणि फलमूलावर करीत आहे. आणि म्हणूनच आपल्या कळपांतील उंदीर कमी होत जातात याचें कारण काय हें समजण्यास त्याना बराच विलंब लागला. परंतु हा प्रकार फार दिवस चालणें शक्य नव्हतें. दिवसेंदिवस कळप क्षीण होत चालला. हे उंदीर गेलें कोठें बरें? हें बोधिसत्त्वाला समजेंना. कोल्ह्याला विचारावें तों तो म्हणे कीं, कळपांतील उंदरांची संख्या बरोबर आहे. सकाळीं संध्याकाळीं गणना करून आपणाला त्यांत कांहीं न्यून आढळून येत नाहीं. परंतु बोधिसत्त्वाला त्याच्या सचोटीची अधिकाधिक शंका येऊं लागली. एके दिवशीं रोजच्याप्रमाणें गणनेच्या वेळीं सर्वांच्या पुढें न जातां तो दडून बसला व सर्व पुढें गेल्यावर आपण हळूंच मागून निघाला. कोल्ह्यानें वहिवाटीप्रमाणें त्यावर झडप घातली. परंतु बोधिसत्त्व अत्यंत सावध असल्यामुळें त्याला झपाट्यासरशीं पकडतां आलें नाहीं. इतक्यांत बोधिसत्त्वानें कोल्ह्याच्या नरडीवर उडी टाकून कडकडून चावा घेतला तेव्हां तो दांभिक कोल्हा वेदनेनें विव्हल होऊन मोठ्यानें आरडूं लागला. तें पाहून बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "हे दुष्ट कोल्ह्या, धर्माच्या पांघरुणाखालीं तूं आमचे गळे कापीत होतास! लोकांना विश्वास दाखवून त्यांचा घात करणें याला धर्म म्हणत नाहींत! याला पाहिजे तर मार्जारव्रत असें म्हणावें! ही तुझी शेंडी धर्मज्ञान संपादण्यासाठीं नसून पोटाची खळी भरण्यासाठीं आहे! या तुझ्या शाठ्याचें आतां प्रायश्चित्त भोग!

कोल्हा तरफडत खालीं पडला असतां बोधिसत्त्वाच्या कळपातील उंदरानीं त्याला तेथेंच ठार केलें.

——✷✷✷——

अनुक्रमणिका

४१. आळसाच्या रोगावर रामबाण उपाय! (१४०)

(कोसियजातक नं. १४०)

एका जन्मीं बोधिसत्व ब्राह्मण कुलांत जन्मला. वयांत आल्यावर चार वेद आणि सर्व शास्त्रें यांत पारंगत होऊन वाराणसी नगरींत पुष्कळ शिष्यांना तो पढवीत असे. त्याचा एक ग्रामवासी शिष्य अध्ययन पुरें झाल्यावर काशींतील एका मुलीशीं विवाह करून तेथेंच घरदार बांधून रहात असे. पण या तरुण ब्राह्मणाची बायको अत्यंत दुष्ट होती. तिच्या बाह्यरूपाविरुद्ध तिचे गुण होते. बिचारा तरुण तिच्या रूपाला भुलून ती जें म्हणेल तें करण्यास तत्पर असे. सकाळीं उठून पोटांत दुखण्याचें निमित्त करून ती बाई अंथरुणावर पडून राही, व नवऱ्यास म्हणे कीं, माझ्यानें काहीं करवत नाहीं. तुम्ही चांगलें जेवण करून घातल्याशिवाय माझी पोटदुखी बरी व्हावयाची नाहीं. बिचाऱ्या नवऱ्यानें घरांतील सगळीं कामें करावीं. एवढेंच नव्हे तर, ती जें म्हणेल तें तिला द्यावें व कधींकधीं आपण अर्ध्याच पोटीं रहावें, असा क्रम चालविला. अर्थात् त्या बाईचा रोग उत्तरोत्तर वाढतच गेला. तिचें शरीर पुष्ट होत होतें! परंतु पोटदुखीला कांहीं गुण पडेना! गरीब बिचारा तरुण तिच्या रोगानें अतिशय कंटाळून गेला. एके दिवशीं बोधिसत्त्वाच्या दर्शनाला गेला असतां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, “कायरे आजकाल तूं कोठें दिसत नाहींस. तुझा चेहरा देखील अगदीं फिक्कट दिसतो. तुझें सर्व कांहीं ठीक चाललें आहेना?”

तो म्हणाला “गुरुजी, मी निरोगी आहे पण माझ्या तरुण बायकोच्या रोगानें मला भंडावून सोडलें आहे! दिवसें दिवस तिचा रोग वाढत जात आहे, त्यामुळें माझ्या जिवाला चैन पडत नाहीं.”

बोधिसत्त्व म्हणाला, “असा तिला रोग तरी कोणता आहे? काय ताप येतो, किंवा अन्न रुचत नाहीं, कीं होतें तरी काय?

तरुण ब्राह्मण म्हणाला, “तिला ताप तर मुळींच नाहीं, अन्न चांगलें खपतें. एवढेंच नव्हें तर रोज नवीन नवीन पक्वान्नें तिला फार आवडतात! तिचा रोग म्हटला म्हणजे तिचें पोट दुखतें. मी घरांत असेपर्यंत कोणतेंहि काम तिच्यानें करवत नाहीं. मी बाहेर जातों तेव्हां ती इकडून तिकडे फिरतअसते असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. कदाचित् बिछान्यांत पडून कंटाळा आल्यामुळें ती तसें करीत असेल! कांहीं असो तिच्या या पोटदुखीनें माझे हाल होत आहेत एवढें खरें.”

बोधिसत्त्वानें बाईला कोणता रोग झाला असावा हें तेव्हांच ताडलें! व तो त्याला म्हणाला, “मी एक या रोगावर उत्तम औषध तयार करून देतों, पण तुझी बायको तें खुषीनें घेईल असें वाटत नाहीं. तिच्यावर जबरदस्ती करावी लागेल. प्रसंग आला तर तिच्यावर चाबकाचे चार तडाखे ओढण्याची तुझी तयारी आहे काय?” तो म्हणाला, “गुरुजी, आपण हें काय विचारितां? आपली आज्ञा मला सर्वथैव वंद्य आहे. तिचा रोग बरा होत असला तर चार सोडून दहा फटके मारले तर त्यांत दोष कोणता?”

बोधिसत्त्वानें गोमुत्रांतून चिराईत वगैरे कडू औषधें उकळून त्यांचा काढा बनविला, व कांहीं वेळपर्यंत तो तांब्यांच्या नव्या भांड्यांत ओतून ठेविला. दुसऱ्या दिवशीं त्या तरुण ब्राह्मणाला बोलावून आणून बोधिसत्त्व म्हणाला, “हा काढा घेऊन जा व तुझ्या बायकोला पाज. बरोबर एक चाबूक घेऊन जाण्यास विसरूं नकोस.”

अनुक्रमणिका

त्यानें तो काढा आपल्या बोयकोला नेऊन दिला. तेव्हां ती त्यावर फार संतापली, व म्हणाली, “मला हें तुमचें भिकारडें औषध पाहिजे कशाला? तुपालोण्यानें जर माझा रोग बरा होत आहे, व मला गुण पडत आहे तर मग विनाकारण काढ्यांत पैसे कां घालवा?”

तो म्हणाला, “पण आजपर्यंत तुपालोण्यावर पुष्कळ पैसे खर्चण्यांत आले. परंतु त्यापासून तुझा रोग साफ बरा झाला नाहीं. आज चांगलें पक्कान्न खावें आणि दुसऱ्या दिवशीं पुनः पोटदुखीला सुरवात व्हावी. आतां आमच्या गुरूनें तयार करून दिलेला काढा घेतल्यांवाचून तुझा रोग बरा होण्याचा संभवच नाहीं.”

त्या खाष्ट बाईनें निरनिराळ्या मार्गानें नवऱ्याची समजूत घालण्याचा बराच प्रयत्न केला. पण त्यानें साफ सांगितलें कीं, “काढा घेतला नाही तर चाबकाचा प्रयोग करून तो घेणें भाग पाडावें लागेल.” निकरावर गोष्ट आली, तेव्हां निरूपायानें तिनें त्या काढ्याचा एक घुटका घेतला. पणत्यायोगें तिचें तोंड वाकडें तिकडें होऊन तिला घेरी आली. थोड्या वेळानें सावध झाल्यावर ती नवऱ्याला म्हणाली, “मला हा काढा घ्यावयास लावूं नका. आजच्या दिवसाची मुदत द्याल, तर माझा रोग आपोआप बरा होईल असें वाटतें.”

तो म्हणाला, “हा काढा असाच ठेऊन देतों व तुझा रोग एक दोन दिवसांत साफ बरा झाला नाहीं तर त्याचा तुझ्यावर पुनः प्रयोग करण्यांत येईल.”

बाईचा रोग तात्काळ बरा झाला! आपल्या नवऱ्याच्या गुरूसमोर आपले डावपेंच चालावयाचे नाहींत असें जाणून पूर्वीचा सर्व खोडसाळपणा तिनें टाकून दिला; व आपल्या नवऱ्याची ती अनन्यभावें सेवा करूं लागळी

——***——

अनुक्रमणिका

४२. दुर्जनाचे प्रत्युपकार. (१३१)

(असंपदानजातक नं. १३१)

प्राचीन काळीं राजगृह नगरींत मगध नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व त्याच राजधानींत महाश्रेष्ठीच्या पदाला पावला होता. त्याला शंखश्रेष्ठी म्हणत असत. वाराणसी नगरींत त्याचा बालमित्र पिलियश्रेष्ठी नांवाचा एक सधन व्यापारी रहात असे. कांहीं कारणानें त्या पिलियश्रेष्ठीवर मोठी आपत्ति येऊन त्याची सर्व धन दौलत बुडाली. तेव्हां तो आपल्या बायकोला बरोबर घेऊन पायीं राजगृहाला आला व शंखश्रेष्ठीला भेटला. शंखश्रेष्ठीनें त्याचा बहुमान केला, आणि आपल्या गृहीं त्याची सर्व प्रकारें बरदास्त ठेविली. अशा स्थितींत वाराणसीहून येथवर चालत येण्याचें कारण काय असा शंखश्रेष्ठीनें प्रश्न केला तेव्हां पिलिय म्हणाला, “मी समूळ बुडालों आहे. माझी धनदौलत माझ्या धनकोंनीं घेतली. दुसरा कोणी मदतगार न राहिल्यामुळें मला तुमची आठवण झाली. व माझ्या कुटुंबासह मी येथवर पायीं चालत आलों.”

शंखश्रेष्ठी म्हणाला, “तुम्ही येथवर येण्याची मेहेरबानी केली हें फार चांगलें झालें. आमच्या बालमैत्रीची कसोटी पाहण्यास तुम्ही मला चांगली संधि दिली.”

याप्रमाणें संभाषण झाल्यावर शंखश्रेष्ठीनें आपली तिजोरी उघडून आंतील द्रव्याचे बरोबर दोन भाग केले व एक भाग पिलियश्रेष्ठीला दिला, व त्याचप्रमाणें आपले दासीदास हत्ती घोडे वगैरे सर्व मालमत्तेचे दोन विभाग करून त्यांतील एक पिलियश्रेष्ठीला दिला, व मोठ्या गौरवानें त्याला वाराणसीला रवाना केलें.

कांहीं वर्षे लोटल्यावर शंखश्रेष्ठीवर अवदशेचा घाला आला. सर्व संपत्ति नाश पावली. राजगृहांत राहण्याला देखील त्याला लाज वाटूं लागली. तेव्हां अर्थातच पिलियश्रेष्ठीची त्याला आठवण झाली. आपल्या बायकोला बरोबर घेऊन पिलियश्रेष्ठीला भेटण्यासाठीं तो वाराणसीला गेला. रात्रीं शहराबाहेरील धर्मशाळेंत उतरून सकाळीं शहरांत प्रवेश करण्यापूर्वी तो आपल्या पत्नीला म्हणाला, “भद्रे, तूं माझ्याबरोबर न येतां येथेंच रहा. तुला रस्त्यांतून पायीं आणल्याबद्दल पिलियश्रेष्ठी माझ्यावर फार रागावणार. पुरुष अनवाणी चालले तरी त्यांना कोणी नांवे ठेवणार नाहीं. परंतु तुझ्यासारख्या कुलीन स्त्रीला भर रस्त्यांतून अनवाणी चालत नेलें असतां लोक नांवें ठेवतील.”

तिला ही गोष्ट पसंत पडली. शंखश्रेष्ठी एकटाच आपल्या मित्राजवळ गेला. पिलियश्रेष्ठीच्या वाड्याच्या दरवाजावर खडा पहारा होता. तेव्हां शंखश्रेष्ठीला आंत जाण्याची मोकळीक नव्हती. त्यानें दरवाजावरून आपण आलों आहों असा निरोप पाठविला, व आपला मित्र आपणाला कडकडून आलिंगन देण्याला येईल अशी कल्पना करीत वाट पहात उभा राहिला. परंतु पिलियानें वर यावें असा जबाब पाठविला. वर जाऊन पाहतों तों पिलीय खुशाल लोडाला टेंकून बसलेला होता! तो तेथूनच शंखश्रेष्ठीला म्हणाला, “काय! कोठें आलांत?” आपणाला बसावयास आसन देखील मांडलेलें नाहीं हें पाहून शंखश्रेष्ठीला अत्यंत विस्मय वाटला! तथापि मोठ्या गंभीरपणें तो म्हणाला, “मित्रा, दैवाची गति विचित्र आहे. माझ्या अफाट संपत्तीचा इतक्या लौकर नाश होईल असें मला स्वप्नांतहि वाटलेंनव्हतें. परंतु आज मी कवडीला महाग होऊन या ठिकाणीं चालत आलों आहे. माझ्या स्त्रीलाहि मी बरोबर आणलें आहे. पण तुम्हाला वाईट वाटेल म्हणून तिला धर्मशाळेंतच ठेऊन आलों आहें.”

अनुक्रमणिका

पिलिय म्हणाला, “पण तुम्हाला उतरण्याला जागा मिळाली कीं नाहीं? जेवण वगैरे झालें आहे कीं नाहीं? आमच्या येथें सध्यां फार अडचण आहे. तेव्हां मला तुमची सोय करतां यावयाची नाहीं आणि तुम्हाला हेंहि समजलें पाहिजे कीं येथें कोणी तुम्हाला आश्रय देईल असें मला वाटत नाहीं.”

बिचारा शंखश्रेष्ठी इतका ओशाळला कीं, त्याच्या तोंडांतून शब्द फुटेना. ज्याच्यावर एवढा मोठा उपकार करून फार वर्षें लोटलीं नाहींत त्याच्याच तोंडून असे उद्‌गार निघावेत हें पाहून तो अगदींच गोंधळून गेला, तथापि, भुकेची पीडा फार कठीण आहे असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्याला भूक लागली होतीच पण तेवढ्यानें कदाचित् त्यानें याचना केली नसती परंतु त्याची साध्वी स्त्री उपाशी होती, व तिची आठवण झाल्याबरोबर त्याचें चित्त थाऱ्यावर येऊन तो पिलियाला म्हणाला, “आम्हाला आपल्या घरी आश्रय मिळत नसला तरी हरकत नाहीं. पण आम्ही दोघींजणें आज सारा दिवस उपाशी आहों तेव्हां आमची दुसरी कांहीं सोय लागेपर्यंत शिधासामग्रीची व्यवस्था होईल तर बरें.”

पिलियाच्या घरीं त्याच दिवशीं हजारों गाड्या भरून भात आलें होतें. भातांतील फोल निराळें काढून तें पेवांत भरून ठेवण्याचें काम चाललें होतें. तो आपल्या एका नोकराला हांक मारून म्हणाला, “या माणसाला त्या फोलांतून एक पायली भरून द्या.”

नोकरानें त्याच्या आज्ञेप्रमाणें एक पायली फोल शंखश्रेष्ठीच्या पदरांत टाकलें. शंखश्रेष्ठी तें घेऊन मुकाट्यानें धर्मशाळेकडे चालता झाला. त्याची बायको आपला पति मोठ्या थाटामाटानें परत येईल अशा मनोराज्यानें वाट पहात राहिली होती. पण शंखश्रेष्ठीला पायींच परत आलेला पाहून तिला फार विषाद झाला. तरी त्याच्या पाठीवर गाठोडें पाहून तिला थोडेसें बरें वाटलें. आज जेवणाचें साहित्य मिळण्याची पंचाईत राहिली नाहीं; बऱ्याच दिवसांनीं सुग्रास अन्न खाऊं असें वाटून तिला बरीच हुषारीआली. ती शंखश्रेष्ठीला म्हणाली, “आर्यपुत्र, तुम्हीं पायींच परत आलां तेव्हां तुमच्या मित्रानें तुमचा योग्य सन्मान केला नसावा; किंवा त्याची तुमची भेट तरी झाली नसावी. कांहीं असो आपणाला आज शिधासामग्री तरी यथास्थित मिळाली पाहिजे असें या तुमच्या गाठोड्यावरून सहज अनुमान करितां येतें.”

शंखश्रेष्ठी म्हणाला, “भद्रे, हें गांठोडें फोलाचें आहे! श्रेष्ठीनें माझें प्रत्युपकार चार शेर फोल देऊन फेडले आहेत! त्यानें पुनः आपल्या घरीं येऊं नये असें बजावून सांगितलें आहे. आतां आम्हाला या शहरांत मजुरीवर निर्वाह करावा लागेल असें वाटतें.”

ती म्हणाली, “मजुरी करण्याला मला लाज किंवा भीति वाटत नाहीं. परंतु त्या कृतघ्न माणसाकडून तुम्ही एक पायली फोल घेऊन आला याची मला फार चीड येते. हें फोल नेऊन पुनः त्याच्या स्वाधीन करा.” असें बोलून तिनें तें गाठोडें नवऱ्याच्या अंगावर टाकलें.

तेव्हां शंखश्रेष्ठी शांतपणें म्हणाला, “भद्रे अशी रागावूं नकोस. तुझ्या इतकीच मला त्या दुष्ट पिलियाची चीड आली; परंतु त्यानें दिलेल्या फोलाचा मी स्वीकार केला नसता तर माझें वर्तन सभ्यपणाचें ठरलें नसतें, व त्या योगें त्याच्याकडून जसा मैत्रीचा भेद झाला तसाच तो माझ्याकडूनहि झाला असता. म्हणून निरुपायास्तव हें फोलाचें गाठोडें मला येथवर आणावें लागलें.”

अनुक्रमणिका

नीच पिलियाच्या अत्यंत कृतघ्नपणानेंहि आपल्या नवऱ्याच्या शांतीचा भंग झाला नाहीं हें पाहून त्या साध्वी स्त्रीला रडूं आलें. तिचा शोक इतका अनावर झाला कीं, तिचा रुदनस्वर धर्मशाळेंवरून जाणाऱ्या लोकांना सहज ऐकूं येऊं लागला. शंखश्रेष्ठीनें पिलियाला दिलेल्या दासांपैकीं एकजण त्या मार्गानें चालला असतां त्यानें धर्मशाळेंत कोणी स्त्री रडत आहे हें ऐकून काय प्रकार आहे हें पाहण्यासाठीं आंत प्रवेश केला आणि पहातो तों आपली पूर्वीची मालकीण रडत असून मालक तिचें समाधान करीत आहे! हें पाहून तो म्हणाला, “धनीसाहेब हा काय प्रकार आहे? हें मला समजत नाहीं. आपण या ठिकाणीं कसें आला व या उतारूंच्या धर्मशाळेंत कां उतरलां?”

शंखश्रेष्ठीच्या पत्नीनें त्याला इत्थंभूत वर्तमान सांगितलें तेव्हां त्या दासाला आपल्या जुन्या मालकाची फार दया आली, व नव्या मालकाचा त्वेष आला. त्यानें आपल्या ओळखीच्या कांहीं गृहस्थांकडे जाऊन आपल्या जुन्या मालकावर आलेल्या प्रसंगाचें यथाभूत वर्णन करून त्यासाठीं त्यानें थोडीबहुत मदत मिळविली व त्याच धर्मशाळेंत कांहीं दिवस त्याची व त्याच्या पत्नीची जेवणाखाण्याची कशी बशी व्यवस्था लावून दिली. पुढें घरीं जाऊन शंखश्रेष्ठीनें पिलियाला दिलेल्या सर्व दासांना त्यानें हें वर्तमान कळविलें व त्यांच्या साहाय्यानें एक मोठा कट उभारला. पिलियश्रेष्ठीचें फार उपयोगी नोकर म्हटले म्हणजे शंखश्रेष्ठीकडून मिळालेले हे दासच होते. त्यांच्या स्वामीभक्तीनेंच पिलियाचीं सर्व कर्मे यथासांग चाललीं होतीं हें त्या दासांना माहीत होतें. त्यांनीं त्या दिवसांपासून पिलियश्रेष्ठीचें काम करण्याचें सोडून दिलें, व इतरांनाहि काम करण्याची मनाई केली. पिलियानें हें वर्तमान ऐकून त्यांच्यावर काठीचा प्रयोग करण्यास सुरुवात केली. तेव्हां त्या सर्वांनीं एकदम वाराणसीच्या राजाकडे जाऊन आपली फिर्याद दाखल केली. या फिर्यादींत पिलियाचा कृतघ्नपणा राजाला पूर्णपणें दिसून आला. शंखश्रेष्ठीची व त्याच्या पत्नीची साक्ष घेण्यांत आली. त्याप्रमाणें इतर नोकरांचीहि या बाबतींत साक्ष झाली.

राजा सर्व प्रकार ऐकून घेऊन पिलियाला म्हणाला, “आजपर्यंत मी तुला मोठा प्रामाणिक माणूस समजत होतों; परंतु तुझा प्रामाणिकपणा वरपांगीं आहे असें या खटल्यामुळें दिसून येत आहे. आतां तुला विचारतों कीं, तुझ्यावर प्रसंग आला तेव्हां तूं या शंखश्रेष्ठीकडून त्याची अर्धी संपत्ती घेऊन आलास कीं, नाहींस?”

पिलियानें ही गोष्ट कबूल केली. तेव्हां राजा म्हणाला, “मग त्याची प्रत्युपकृती एक पायली फोलानें होईल असें तुला वाटलें काय? तूं आमच्याकडून मिळालेल्या मानाला सर्वथैव अपात्र आहेस. तेव्हां तुझी सर्व संपत्ति शंखश्रेष्ठीला देण्याचा हुकूम देतों.”

त्यावर शंखश्रेष्ठी म्हणाला, “महाराज, यानें जरी मला अत्यंत वाईट रीतीनें वागविलें तथापि, त्याच्या संपत्तीचा मी अभिलाष धरीत नाहीं. केवळ मी दिलेली धनदौलत आणि दासी दास त्यानें परत करावें म्हणजे झालें.”

राजानें ताबडतोब शंखश्रेष्ठीची मागणी अमलांत आणण्यास लाविली. ती सर्व दौलत घेऊन शंखश्रेष्ठी राजगृहाला गेला. पिलियश्रेष्ठीजवळ अद्यापि पुष्कळ धनदौलत शिल्लक होती. पण कीर्ति मात्र समूळ नष्ट झाली होती. आणि “मरण कां लोकींच दुष्कीर्ति जें” या कविवचनाप्रमाणें त्याला मरणापेक्षां जीवितच अधिक कंटाळवाणें वाटत होतें.

——***——

अनुक्रमणिका

४३. भांडवलावर डल्ला. (१३६)

(सवण्णजातक नं. १३६)

बोधिसत्त्व एकदां ब्राह्मण कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर एका कुलीन कन्येबरोबर त्याचें लग्न होऊन त्या संबंधापासून त्याला तीन मुली झाल्या; परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, त्या मुलींचीं लग्नकार्यें होईपर्यंत तो जगला नाहीं. मेल्यावर तो हिमालयावरील एका हंसकुलांत जन्मला. त्याच्या पूर्वपुण्याईमुळें मधून मधून त्याला सोन्याची पिसें फुटत असत; आणि पूर्वजन्मीचें स्मरण करण्या इतकेंहि त्याच्या अंगीं सामर्थ्य होतें. तो बराच मोठा झाल्यावर पूर्व जन्मीं आपण कोण होतों याचा विचार करीत बसला; आणि त्याच्या सामर्थ्यानें पूर्व जन्माची त्याला सर्व आठवण झाली. आपल्या पोरक्या मुलींना आणि अनाथ स्त्रीला टाकून कर्मगतीमुळें मरण आलें याचें त्याला क्षणभर दुःख झालें. पण तो आपल्या मनाशींच म्हणाला, "आतां शोक करीत बसण्यांत अर्थ नाहीं. सर्व प्राणी कर्माला वश असल्यामुळें कर्म जी गोष्ट घडवून आणतें तिचा त्यांनीं विषाद मानतां कामा नयें. माझ्या पूर्व जन्मीच्या कुटुंबाची जर विपन्नावस्था असेल, तर मला त्यांना या हंसयोनींत जन्मून देखील थोडीबहुत मदत करतां येण्यासारखी आहे, हें मी माझें मोठें भाग्य समजतों. माझीं पिसें जून झाल्यावर सोन्याचीं बनत असतात; असें एखादें पीस आठचार दिवसांनीं त्यांना दिलें असतां तीं आपला निर्वाह करून सुखानें राहतील."

असा विचार करून तो हंस तेथून उडाला आणि थेट आपल्या पूर्वजन्मींच्या घरीं गेला. त्याला आपल्या पूर्व कुटुंबाची दुर्दशा तेव्हांच दिसून आली. बाई दळण कांडण करून निर्वाह करीत होती, व त्या तिघी मुली मुलांना सांभाळण्याचीं वगैरे कामें करून कसा तरी निर्वाह करीत असत, घराची पूर्वीची सर्व शोभा नष्ट झाली होती ती सर्व स्थिति पाहून हंसाला फार कींव आली व तो त्या मुलींना म्हणाला, "मुलींनो, तुम्ही अत्यंत दुर्गत दिसतां; परंतु तुमची दुर्दशा संपत आली असें समजा. दोन चार दिवसांआड तुम्हांला एकेक सोन्याचें पीस देत जाईन. त्यांवर तुम्हा सर्वांचा निर्वाह होऊन शिवाय थोडा द्रव्यसंचय देखील करितां येईल."

मुली म्हणाल्या, "पण तूं पक्षी असून एवढा मोठा आम्हांवर उपकार करूं पाहतोस याचें आम्हांला मोठें आश्चर्य वाटतें! आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना आणि सोयऱ्याधायऱ्यांना या आमच्या विपन्नस्थितीबद्दल कांहींच वाटत नाहीं; परंतु तुझ्यासारख्या पक्षाला आमची एवढी कींव कां यावी बरें?" हंस म्हणाला, "मी पूर्व जन्मीं तुमचा बाप होतों. कर्मगतीनें या योनींत मी जन्मलों आहे. तथापि पूर्व पुण्याईमुळें माझीं पिसें सोन्याचीं होतात. मला मनुष्यासारखें बोलतां येतें व पूर्वजन्मी मी कसा होतों याचें स्मरण करतां येतें."

हे हंसाचें वृत्त ऐकून त्या मुली चकित झाल्या व आईपाशीं धांवत जाऊन त्यांनीं तें तिला कळविलें. आपणाजवळ थोडेसे शिल्लक असलेले दाणे त्यांनीं त्या हंसाला चारले, व त्याला प्यावयास पाणी दिलें. त्यानें सोन्याचें एक पीस दिलें व तो तेथून उडून गेला. हा क्रम पुष्कळ दिवस चालला होता. एकदोन दिवसा आड हंसानें येऊन सोन्याचें पीस देऊन जावें, व त्यांनीं तें पीस विकून आपला निर्वाह करावा. या योगें त्या कुटुंबाला लवकरच ऊर्जितावस्था आली. मुलींच्या अंगावर दागदागिने दिसूं लागले; परंतु त्या विधवाबाईची एवढ्यानें तृप्ति झाली नाहीं. एकेदिवशीं ती आपल्या मुलींना म्हणाली, "मुलींनो, पशुपक्षादिकांच्या योनींत जन्मलेल्या प्राण्याचा विश्वास मानतां येत नाहीं. आज जरी हा हंस आम्हांला

सोन्याचीं पिसें देत असला, तरी याचें प्रेम असेंच कायम राहील असेंकोणी सांगावें! तेव्हां एके दिवशीं याला पकडून याचीं सर्व पिसें आपण काढून घेऊं."

मुलींना आईची ही मसलत पसंत पडली नाहीं. त्या म्हणाल्या, "हा हंस जरी पक्षाच्या वंशातला आहे तरी पूर्व जन्मींचा तो आमचा पिता आहे. त्यानें आमच्यावर अनंत उपकार केले आहेत, आणि आतां आम्ही त्याला क्रूरपणें कसें वागवावें?"

आई म्हणाली, "काय तरी वेड्या मुली आहेत. आम्हीं जर त्यांचीं पिसें एकदम उपटून घेतलीं, तर त्यांत क्रूरपणा कसला? पशुपक्षादिक प्राण्याला मनुष्यासारख्या वेदना बाधत नसतात. घोड्याला किंवा बैलाला चाबकांनीं मारलें असतां मनुष्यासारखी त्याला इजा होत नसते. यांचीं जर आम्ही पिसें काढून घेतलीं तर थोडक्या अवधींत त्याला पुनः पिसें फुटतील. आम्ही सर्व पिसें काढून घेतल्याबद्दल त्याला वाईट मुळींच वाटणार नाहीं. दाणापाणी देऊन चांगलें संगोपन करूं म्हणजे झालें."

परंतु मुलींचीं मनें आईच्या या उपदेशाला वळलीं नाहींत. त्यांनीं आपल्या पूर्वजन्मीच्या पित्याची यथायोग्य सेवा करण्याचा क्रम तसाच पुढें चालविला.

एके दिवशीं मुली बाहेर गेल्या होत्या. आई एकटीच घरांत होती. इतक्यांत हंस आला तेव्हां ती त्याला म्हणाली, "पूर्वजन्मींचा आमचा निराळा संबंध असल्याकारणानें माझ्या मुलीसमोर तुम्हापाशीं बोलण्याला मला लाज वाटते. पण आज तुम्ही अशा संधीला आलांत हें फार चांगलें झालें. मला तुमचें अंग जरा चांचपडून पाहूं द्याना."

हंस बिचारा रोजच्या जागेवरून खालीं येऊन बसला तेव्हां त्या कर्कश स्त्रीनें जवळ जाऊन त्याची मानगुटी धरली, व त्यांचीं सर्व पिसें लुबाडून घेतलीं. तो वेदनेनें व्याकूळ होऊन तेथेंच निचेष्टित पडला. या बाईनें तीं पिसें लपवून ठेविलीं. इतक्यांत मुली घरीं आल्या. त्यांनीं हंसाची ही दुर्दशा पाहून त्याला जवळ घेतलें, व म्हणाल्या, "तुमची ही दुर्दशा कां झाली?"

हंस म्हणाला "तुमच्या आईला विचारा म्हणजे समजेल."

आईला विचारलें तेव्हां सर्व गोष्ट कळून आली. पुढें पिसें तपासून पहातात तों एक सोडून बाकी सर्व साधीं होतीं. तीं पक्व न झाल्यामुळें सोन्याचीं बनलीं नव्हतीं. या आईच्या कृत्याबद्दल मुलींना किती वाईट वाटत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. त्यांनीं त्या हंसाचें चांगलें सगोपन केलें; परंतु नवीन पिसें फुटून उडण्याचें सामर्थ्य आल्याबरोबर तो तेथून हिमालयावर गेला, आणि तेथेंच कायम राहिला. इकडे मुलींना आणि त्यांच्या आईला भांडवलावर हल्ला केल्याबद्दल अत्यंत दुःख झालें.

——***——

अनुक्रमणिका

४४. एकाला लांच दिला तर दुसरा देतो. (१३७)

(बब्बुजातक नं. १३७)

एका कालीं बोधिसत्त्व पाथरवटाच्या कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर तो आपल्या कुलकर्मानेंच उदरनिर्वाह करीत असे. काशीच्या राष्ट्रांत एका खेडेगांवीं एक मोठा सधन व्यापारी रहात असे. त्यानें हजारों सुवर्णकार्षापण जमिनींत गाडून ठेविले होते. कांहीं काळानें त्या कुटुंबांतील सर्व माणसें एकामागून एक मृत्युमुखीं पडलीं. श्रेष्ठीहि मरून गेला. त्याची बायको त्या द्रव्यस्नेहानें मरणोत्तर उंदरीण होऊन त्या द्रव्यावर बीळ करून राहिली. तो गांव त्या व्यापाऱ्यानेंच वसविला होता. त्याच्या कुटुंबाची ही दशा झाल्यावर गांवावर देखील तोच प्रसंग आला. सर्व गांव साफ ओस पडला. आमचा बोधिसत्त्व आपल्या निर्वाहासाठीं फिरत फिरत त्या ओसाड गांवाच्या जवळ दुसऱ्या एका खेडेगांवीं जाऊन राहिला. तो त्या व्यापाऱ्याच्या मोडक्या घराचे दगड वगैरे घेऊन ते साफसूफ करून दुसऱ्या लोकांना विकून त्यावर आपला निर्वाह करीत असे. उंदरिणीनें त्याला पाहून असा विचार केला कीं, हा मनुष्य फार गरीब दिसतो. दगड फोडून फोडून बिचारा कष्टी होत असतो. माझ्याजवळ असलेल्या या सोन्याच्या नाण्याचा मला कांहींच फायदा होत नाहीं. मी जर याला रोज एकेक कार्षापण दिला तर त्याला त्यापासून फार सुख होईल व तो मलादेखील मदत करू शकेल. असा विचार करून एक कार्षापण तोंडांत धरून ती बोधिसत्त्व दगड फोडीत होता त्या ठिकाणीं गेली. तिला पाहून बोधिसत्त्व म्हणाला, “उंदरीणबाई, तोंडांत सोन्याचें नाणें घेऊन तूं येथें कां आलीस?” ती म्हणाली, “माझ्याजवळ बराच मोठा नाण्याचा संग्रह आहे. त्यांतून मी तुला रोज एकेक कार्षापण देत जाईन. त्या द्रव्यानें तूं आपल्या कुटुंबाचें पोषण कर व मला पोटापुरतें मांस आणून देत जा.”

बोधिसत्त्वाला ही गोष्ट फारच पसंत पडली, व त्याप्रमाणें रोज एक कार्षापण घेऊन उंदरीला तो पोटभर मांस देऊं लागला. एके दिवशीं एका मुंगसानें त्या उंदरीवर हल्ला करून तिची मानगुटी धरली. बिचारी मरणभयानें गलित होऊन गेली. तिच्या तोंडांतून शब्द निघेना. तथापि, मोठ्या धैर्यानें अडखळत अडखळत ती मुंगुसाला म्हणाली, “बाबारे, मला खाऊन तुला काय फायदा होणार!”

मुंगूस ह्मणाला, “हें काय विचारतेस? आजच्या दिवसाचें माझें जेवण होणार आहे आणि याहून दुसरें मला काय पाहिजे आहे?”

ती ह्मणाली, “माझ्या शरिरांतून जेवढें मांस तुला आज मिळणार आहे तेवढें रोजच्या रोज मिळालें असतां तूं मला सोडून देशील काय?”

मुंगूस म्हणाला, “यांत काय संशय. पण खोटें सांगून तूं जर पळून जाशील तर तुझा पुरा सूड उगवीन. बिळांत जाऊन दडून बसलीस तरीदखील तूं माझ्या कचाट्यांतून बचावणार नाहींस. माझ्या या खरतर नखांनी तुझ्या बिळाचा ठाव देखील मला खोदून टाकतां येईल, व असा प्रसंग आल्यास हाल हाल करून मी तुला ठार मारीन.”

दीनवाण्या स्वरानें उंदरीण त्याला म्हणाली, “तात्या, माझ्यावर विश्वास तरी ठेवून पहाना. मी खोटें बोललें तर आणखी एक दोन दिवसांनीं तुम्ही माझा खुशाल प्राण घ्या.”

अनुक्रमणिका

हा संवाद झाल्यावर मुंगुसानें त्याला सोडून दिलें व त्या दिवसापुरती दुसरी कांहीं शिकार साधून आपला निर्वाह केला. पण दुसऱ्या दिवशीं माध्यान्हसमय होण्यापूर्वीच तो उंदरीणबाईच्या बिळाजवळ हजर झाला. बोधिसत्त्वानें सकाळीं आणून दिलेल्या मांसांतील एक भाग देऊन उंदरीनें त्याला संतुष्ट केलें. हा प्रकार बरेच दिवस चालला, तेव्हां दुसऱ्या एकामुंगुसाला हें वर्तमान समजलें व त्यानें उंदरीवर झडप घातली. त्याला देखील मांसाचा वाटा देण्याचें अभिवचन देऊन उंदरीनें आपली सुटका करून घेतली. त्यानें ही गोष्ट आपल्या मित्राला सांगितली तेव्हां त्यानें उंदरीणबाईला पकडण्याची पहिली संधि साधून घेतली, व आपल्याला मांसाचा वाटा देण्याची कबुली घेऊन सोडून दिलें. याप्रमाणें क्रमानें चार मुंगूस उंदरीणबाईच्या मांसाचे वाटेकरी झाले. बोधिसत्त्वानें आणलेलें सर्व मांस त्यांना देऊन बिचाऱ्या उंदरीला अरण्यांतील फलमूलांवर आपली उपजीविका करणें भाग पडलें. ती दिवसेंदिवस अशक्त होत चालली. तें पाहून एके दिवशीं बोधिसत्त्व तिला म्हणाला, “बाई तूं इतकी रोड कां दिसतेस? तुला कांहीं आजार झाला नाहीं ना? मला जर तुझ्या दुर्बलतेचें कारण समजेल तर मी त्यावर माझ्या हांतून होईल तेवढा उपाय करण्यास कसूर करणार नाहीं.”

ती म्हणाली, “तात्या, मला दुसरा कोणताही रोग नाहीं; परंतु तुम्ही आणून दिलेलें मांस माझ्या पोटांत जात नसून शत्रूंच्या पचनीं पडतें. त्यामुळें वन्य पदार्थांवर मोठ्या मुष्किलीनें मला कसा बसा जीव धरून रहावें लागतें. शत्रूवर रोंज नजर पडल्यामुळें माझी मानसिक व्यथा वाढत जाऊन तिचा परिणाम देहावर देखील घडून आला आहे.”

बोधिसत्त्व म्हणाला, “असे तुझे शत्रू तरी कोण? त्याची मला तूं इतके दिवस खबर कां दिली नाहींस?”

तिनें घडलेलें सर्व वर्तमान बोधिसत्त्वाला सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, “या दुष्ट मुंगुसांचा मी ताबडतोब बंदोबस्त करितों. तूं कांहीं भिऊं नकोस. शत्रूंला लांच देऊन मित्र करूं पहाणें ही मोठी चूक होय. अशी जी म्हण आहे तिचा प्रस्तुत प्रकरणीं प्रत्यक्ष अनुभव येत आहे. एक मुंगुसाला तूं लांचानें वळविण्याचा प्रयत्न केलास त्यामुळें तुझ्यावर उपाशीं मरण्याची पाळी आली. आतां या सर्वांचा बंदोबस्त होईपर्यंत मी तुला थोडें अधिक मांस देत जाईन. त्यावर तूं आपला निर्वाह कर, व त्यांनाहि संतुष्ट ठेव. मी त्यावर कांहीं उपाय योजणार आहें अशी त्यांस शंका येऊं देऊं नकोस.”

उंदरीण म्हणाली, “पण तात्या, तुम्ही यांचा बंदोबस्त कसा करणार? हे मुंगूस म्हटले म्हणजे असे लबाड असतात कीं, ते माणसाच्यावाऱ्याला देखील उभे रहावयाचे नाहींत मग तुम्हाला ते कसे पकडतां येतील?”

बोधिसत्त्व म्हणाला, “बाई त्याबद्दल तूं काळजी करूं नकोस. कांहीं दिवस दम धर व मी काय करतों तें पहा.”

बोधिसत्त्वानें त्या बिळाच्या आसपास पडलेले मोठमोठाले दगड तासून त्यांची एक सुंदर गुहा बनविली व तिला काचेचा जाड दरवाजा बसवून तो उंदरीला म्हणाला “बाई, मी तुझ्या अन्नापाण्याची या गुहेंतच व्यवस्था करतों. तूं स्वस्थ आंत बसून रहा व मुंगूस तुझ्याजवळ मांस मागावयास आले तर दरवाज्याच्या आंतून यथेच्छ शिव्या दे. ते तुझा एक केसहि वाकवूं शकणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेव.”

अनुक्रमणिका

बोधिसत्त्वाच्या सांगण्याप्रमाणें उंदरीण मुंगुसांची वाट पहात गुहेच्या दरवाजाच्या आंत बसून राहिली. इतक्यांत नियमाप्रमाणें पहिला मुंगूस येऊन आपला हिस्सा मागूं लागला, तेव्हां ती त्याला म्हणाली, “मूर्खा, माझ्याजवळ तुझ्या बापानें ठेव ठेवण्यास दिली आहे काय? नीचा, तुला जर मांस पाहिजे असेल तर आपल्या पोरांला मारून खा.”

उंदरीचें असलें अपमानकारक भाषण ऐकून मुंगूस अत्यंत संतप्त झाला. त्याचा कोप गगनांत मावेना. दरवाजा खुला आहे असें वाटून त्यानें एकदम तिच्यावर उडी टाकली. पण आड आलेल्या जाड आरशावर तो आदळला, व उरःस्फोट होऊन तेथेंच मरण पावला. त्याच्या जातभाईंनीं मांसाची मागणी केल्याबरोबर उंदरीनें त्यावर शिव्यांची लाखोली वाहिली व ते देखील क्रोधानें संतप्त होऊन गुहेच्या दरवाजावर आदळून मरण पावले. तेव्हांपासून उंदरीची बोधिसत्त्वावर विशेष मर्जी बसली, व जवळ असलेला सर्व ठेवा तिनें त्याच्या स्वाधीन केला. बोधिसत्त्वानेंहि यावज्जीव तिचा मोठ्या ममतेनें संभाळ केला.

——✷✷✷——

अनुक्रमणिका

४५. दांभिक तपस्वी. (१३८)

(गोधजातक नं. १३८)

एका काळीं बोधिसत्त्व घोरपडीच्या कुळांत जन्मला होता. तो एका गांवाजवळ अरण्यांत एक मोठें बीळ पाडून त्यांत रहात असत. त्याच्या बिळाजवळ एक उत्तम तपस्वी पर्णकुटिका बांधून रहात असे. त्याच्या दर्शनाला आसपासच्या गांवांतून पुष्कळ लोक येत असत. आमचा बोधिसत्त्व देखील त्याच्या दर्शनाला दिवसांतून दोन तीन वेळां जात असे व त्याचा धर्मोपदेश ऐकत असे. कांहीं कालानें तो तपस्वी मरण पावला; व त्याच्या जागीं दुसरा एक तपस्वी येऊन त्याच पर्णकुटिकेंत राहूं लागला. याहि तपस्व्याचा उपदेश ऐकण्यासाठीं बोधिसत्त्व वारंवार जात असे.

एका उन्हाळ्यांत अकालवृष्टि झाली व तिजमुळें वारुळांतून पुष्कळशा माशा बाहेर पडल्या. त्या खाण्यासाठीं घोरपडी जिकडे तिकडे हिंडू लागल्या. ग्रामवासी मनुष्यांनीं कांहीं घोरपडी पकडून त्यांच्या मांसावर आपली चैन चालविली. या नवीन आलेल्या तपस्व्याला देखील घोरपडीचें मांस लोकांनीं खाऊं घातलें. तें त्याला फारच आवडलें, व तें कोणच्या प्राण्याचें मांस आहे याची त्यानें चौकशी केली. पण दोन चार दिवसांनीं घोरपडीचें मांस मिळेनासें झालें. तपस्व्याला त्या मांसाची एक प्रकारची फारच चटक लागली. त्याला चैन पडेना. तेव्हां आपल्याजवळ धर्मोपदेश ऐकण्यासाठीं येणाऱ्या घोरपडीचा वध करून दोन दिवस चैन करावी असा त्यानें बेत केला; व गांवांतून मांस शिजविण्यासाठीं भांडें, मीठ, तूप, मसाला वगैरे पदार्थ आणवून आपल्या पर्णकुटिकेंत तयार ठेविले, आणि एक दांडकें काखेंत आपल्या भगव्या वस्त्राखालीं लपवून बोधिसत्त्वाची मार्गप्रतीक्षा करीत मोठ्या गंभीर मुद्रेनें तो पर्णशाळेच्या दाराशीं बसला. सुदैवानें वारा तो बसला होता तिकडून येत असे. जवळ आल्याबरोबर बोधिसत्त्वाला त्याची फाजील गंभीर मुद्रा पाहून एक प्रकारचा संशय आला. इतक्यांत वारा येऊन त्याबरोबर घोरपडीच्या मांसाचा त्याला वास आला. तेव्हां तपस्व्यानें घोरपडीचें मांस खाल्याबद्दल त्याची पक्की खात्री झाली, व त्यानें तपस्व्याला दुरूनच नमस्कार केला. तापसानें आपल्याजवळ येण्याविषयींत्याला पुष्कळ आग्रह केला परंतु अनेक कारणें सांगून बोधिसत्त्वानें जवळ जाण्याचें नाकारलें. तेव्हां आतां हातची शिकार जाते असें वाटून तपस्व्यानें आपलें दांडकें बोधिसत्त्वावर फेंकलें. त्याच्या शेपटीला तेवढा धक्का लागला. बाकी कांही इजा झाली नाहीं. तो दूर उभा राहून म्हणाला, “अरे ढोंग्या, या तुझ्या जटा, अजिनचर्म आणि भगवीं वस्त्रें घेऊन काय करावयाचीं! तुझें अंतःकरण इतकें वाईट आहे कीं, या सर्व पदार्थांनीं तें परिशुद्ध होण्याचा संभव नाहीं. बाहेरून तुझा डामडौल पाहून बिचारे भोळे लोक मात्र फसत आहेत!” असें बोलून बोधिसत्त्व तें बीळ सोडून घोर अरण्यांत निघून गेला.

——***——

अनुक्रमणिका

४६. फळ हातीं आल्यावाचून बोभाटा करूं नये. (१३९)

(उभतोभट्ट जातक नं. १३९)

एका गांवीं एक कोळी रहात असे. तो जवळच्या नदींत गळ घालून मासे पकडून आपला निर्वाह करी. एके दिवशीं आपल्या मुलाला बरोबर घेऊन मासे धरण्यासाठीं तो नदीवर गेला. तेथें त्यानें एका डोहांत गळ टाकल्याबरोबर तो खालीं पाण्यांत कशाला तरी अडकला, व वर काढतां येईना. कोळ्याला वाटलें कीं, गळाला मोठा मासा लागला असावा. मासा हातीं येण्याची वाट न पहातां आपल्या मुलाला पाठवून आपणाला मोठा मासा सांपडणार आहे ही बातमी त्यानें आपल्या बायकोला कळविली. ती मुलानें आणलेली बातमी ऐकून त्या बाईला फार आनंद झाला. परंतु एवढा मोठा मासा घरीं आणल्याबरोबरच शेजारीपाजारी त्याचा वाटा मागतील ही गोष्ट तिला मुळींच आवडली नाहीं. कांहीं तरी युक्ति योजून ताबडतोब शेजाऱ्या पाजाऱ्याशीं भांडण उकरून काढणें तिला इष्ट वाटलें, व त्याप्रमाणें एक ताडपत्र नेसून एका डोळ्यांत काजळ घालून व कुत्र्याला कडेवर घेंऊन ती आपल्या शेजारच्या घरीं गेली.

शेजारीणबाई म्हणाली, "कायग बाई, लुगड्यावरून हें ताडपत्र काय नेसली आहेस! आणि कुत्र्याला कडेवर घेऊन या विचित्र वेषानेंकाय हिंडत आहेस? तुला वेड तर लागलें नाहीं ना! तेव्हां ती चवताळून जाऊन व शिव्यांची लाखोली वाहून शेजारीणबाईला म्हणाली, "थांब, मला वेडी म्हटल्याबद्दल तुझ्यावर मी फिर्याद लावतें." दुसऱ्या कांहीं बायाहि तेथें जमल्या व त्या सर्वांनीं आपणास वेडें म्हटल्याबद्दल कोळ्याच्या बायकोनें गांवच्या वहिवाटदारापाशीं फिर्याद नेली.

इकडे माशाला वर ओढतां येईना म्हणून आपलें धोतर व पांघरूण नदीच्या कांठावर ठेऊन कोळ्यानें केवळ लंगोटी नेसून डोहांत उडी टाकली, व गळाच्या दोरीला धरून माशाचा थांग लावण्यासाठीं तळाला बुडी मारली. तो गळ डोहांत बुडलेल्या एका झाडाच्या बुंध्याला जाऊन अडकला होता. कोळी मासा समजून त्याला मिठी मारण्यास गेला, तों त्या बुंध्याचें एक मूळ याच्या डोळ्यांत शिरून डोळा साफ फुटला. त्या वेदनेनें तळमळत कोळी काठावर आला आणि पाहातो तों धोतर कोणीतरी चोरानें लांबवलेलें! आतां दुसरा कांहीं उपाय नाहीं असें जाणून एका हातानें आपला डोळा दाबून त्यानें तेथून घरचा रस्ता सुधारला. घरीं बायको दिसेना. मुलाला विचारलें असतां ती शेजाऱ्यावर फिर्याद करण्यासाठीं गांवच्या वहिवाटदाराच्या कचेरींत गेली आहे असें समजलें. तेव्हां डोळ्याला पट्टी बांधून व दुसरें जुनेंपुराणें धोतर नेसून तो कचेरीकडे धांवला. तेथें खटल्याचा निकाल होऊन त्याच्या बायकोलाच गुन्हेगार ठरविण्यांत आलें होतें, व दंडाची रक्कम दिल्यावाचून चौकीवरून तिला सोडूं नये असा वहिवाटदारानें हुकूम फर्माविला होता.

आमचा बोधिसत्त्व त्या कालीं त्या गांवांत वृक्षदेवता होऊन रहात असे. हें सर्व प्रकरण पाहून तो त्या कोळ्याला म्हणाला, "बाबारे, वस्तु हातीं आल्याशिवाय बोभाटा केल्याचें हें फळ आहे. तुझा पाण्यांतला प्रयत्न फसला आहे; व जमिनीवर आल्यावर तुझ्या बोभाट्यानें काय परिणाम घडून आला हें तुला दिसून येतच आहे.

[मूळ गाथा–
अक्खी भिन्नो पटो नट्ठो सखिगेहेच भंडनं।
उभतो पदुट्ठो कम्मन्तो उदकम्हि थलम्हिच॥] तुझ्या या उदाहरणानें वस्तु हातीं आल्याशिवाय बोभाटा न करण्याचा धडा लोकांनीं शिकला पाहिजे."

——***——

अनुक्रमणिका

४७. एकाच्या पापाचें फळ सर्व जातभाईंनांभोगावें लागतें. (१४०)

(काकजातक नं. १४०)

एकदां बोधिसत्त्व कावळ्याच्या योनींत जन्मला होता व मोठ्या समुदायासहवर्तमान तो वाराणसीच्या जवळपास रहात होता. एके दिवशीं वाराणसी राजाचा पुरोहित नदीवरून स्नान करून येत होता. वाटेंत नगरद्वाराजवळ तोरणावर दोन कावळे बसले होते. त्यांतील एकजण दुसऱ्याला म्हणाला, “हा पहा, दुष्ट ब्राह्मण उघड्या बोडक्यानीं येत आहे. मला वाटतें कीं, तो या तोरणाच्या खालीं आल्याबरोबर त्याच्या डोक्यावर देहधर्म करावा!”

दुसरा म्हणाला, “बाबारे, असली भलतीच कुकल्पना करूं नकोस. हा ब्राह्मण सामान्य मनुष्य नसून राजाचा पुरोहित आहे. याचाशीं वैर संपादन करणें म्हणजे आपल्या हातानेंच आपला गळा कापून घेण्यासारखें आहे.”

पहिला कावळा म्हणाला, “तुझे हे नुसते कुतर्क आहेत. राजाचा पुरोहित झाला काय किंवा त्याचा बाप झाला काय, आमच्यासारखा उडत्या पाखराचें तो काय करणार? तुला जर भीति वाटत असेल तर तूं येथून खुशाल पळून जा! पण मी याच्या गुळगुळीत डोक्यावर देहधर्म केल्यावांचून येथून निघून जाणार नाहीं.”

त्या दुसऱ्या कावळ्यानें आपल्या मित्रास उपदेश करण्यांत तथ्थ नाहीं असें जाणून तेथून पलायन केलें; परंतु शिल्लक राहिलेल्यानें ब्राह्मण तोरणाखालीं आल्याबरोबर त्याच्या डोक्यावर देहधर्म केला! डोक्यावर एकदम काय पडलें हें पहाण्यासाठीं ब्राह्मणानें वर मान केली. तों का का शब्द करीत वेडें वाकडें तोंड करून जणूं काय याची थट्टाच करीत आहे असा एक कावळा तोरणावर बसलेला याच्या पहाण्यांत आला. आपला अपमान कसाबसा गिळून डोकें धुवून तो आपल्या घरीं आला; परंतु कावळ्याविषयी त्याच्या मनांत अत्यंत द्वेषबुद्धि उद्भवली, व सर्व कावळ्यांचा सूड उगविण्याचा त्यानें निश्चय केला.

एके दिवशीं राजाची एक दासी तांदूळ सडण्याच्या कामांत गुंतली असतां थकून जाऊन तेथेंच झोपीं गेली. इतक्यांत एक एडका येऊन तांदुळ खाऊं लागला. जागी होऊन तिनें त्या एडक्याला घालवून दिले; परंतु तो तांदुळाला इतका लंपट झाला होता कीं, तिची नजर चुकवून त्यानें तांदूळ खाण्याचा आपला क्रम सोडला नाहीं. दासीला त्याचा अत्यंत संताप आला. तिनें स्वयंपाकघरांतून एक जळकें कोलीत आणून एडक्याला न दिसेल अशा ठिकाणीं दडवून ठेविलें, व तो तांदुळ खाण्यास आल्याबरोबर त्याच्यावर प्रहार केला, जळके निखारे अंगावर पडून एडक्याच्या लोकरींनें पेट घेतला, आणि तो आपल्या रक्षणासाठीं इतस्ततः धावूं लागला. जवळच एक राजाच्या हत्तींची पागा होती. व तेथें एक मोठी गवताची गंजी होती. एडका आगीच्या त्रासानें त्या गंजीत शिरला; आणि त्यामुळें ती गंजी देखील पेटली. गंजीची आग पागेवर पडून पागेनें पेट घेतला. हत्तीच्या माहुतांनीं हत्तीचीं बंधनें तोडून त्यांना मोकळें केलें; तथापि कांहीं हत्तींना कातडी भाजल्यामुळें जखमा झाल्या. हें वर्तमान राजाला समजल्यावर राजानें जळलेल्या हत्तीस काय उपाय करावा असा आपल्या पुरोहितास प्रश्न विचारला. तेव्हां तो म्हणाला, “महाराज, कावळ्याची वसा मिळाली असतां हत्तीच्या जखमा लवकर बऱ्या होतील.”

अनुक्रमणिका

राजानें कावळ्यांला मारूनच रबी गोंळा करावी असा हुकूम दिला. जो तो धनुष्यबाण घेऊन कावळ्यांच्या मागें लागला, व हजारों कावळे प्राणास मुकले! तेव्हां शिल्लक राहिलेल्या कावळ्यांना मोठें भय उत्पन्न झालें, व ते सर्वजण बोधिसत्त्वाला शरण गेले. बोधिसत्त्व म्हणाला, “आमच्या एका जातभाईच्या दुराचरणाचें हें फळ आम्हीं भोगीत आहोंत! राजाच्या पुरोहिताचा जर त्यानें अपमान केला नसता तर आज सर्व कावळ्यांवर हा प्रसंग गुदरला नसता. आतां मी माझा जीव धोक्यांत घालून देखील या संकटाचें निरसन होईल तर पहातों.”

असें बोलून तो तेथून उडाला आणि एका खिडकींतून राजसभेंत शिरून राजाच्या सिंहासनाखालीं जाऊन बसला. त्याला पकडण्यासाठीं राजाचे दूत धांवले. पण त्यांना राजा म्हणाला, “माझ्या सिंहासनाचा ज्यानें आश्रय केला त्याच्यावर हल्ला करूं नका. मीं त्याला अभय दिलें आहे.”

हे राजाचे शब्द कानीं पडतांच बोधिसत्त्व सिंहासनाखालून बाहेर आला. आणि राजाला नमस्कार करून म्हणाला, “महाराज, मला एकट्याला आपण अभय दिलें आहे. परंतु माझ्या हजारों ज्ञातिबांधवांची आपल्या आज्ञेनें हानि होत आहे. पुष्कळजण मृत्युमुखीं पडले आहेत, व आम्ही जिवंत असलेले त्यांच्या शोकानें कष्टी झालों आहों.”

राजा म्हणाला, “आमच्या पुरोहितानें कावळ्याच्या वसेनें हत्ती बरे होतील असें सांगितल्यामुळें मी हा हुकूम सोडला.”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, आपल्या पुरोहितानें सूड उगविण्याच्या बुद्धीनें ही गोष्ट आपणास सांगितली. कावळ्याच्या पोटांत वसा कोठून असणार? राजा म्हणाला, “सर्व प्राण्यांच्या मांसांत वसा सांपडते. तर मग कावळ्याच्या मांसांत ती कां नसावी?’

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, आमची कावळ्याची जात मोठी भित्री आहे. सर्व लोकांविषयीं ते साशंक असतात, व त्यामुळें त्यांच्या मांसांत वसा वाढूं शकत नाहीं.”

हें बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून राजा प्रसन्न झाला, व म्हणाला, “मीं आजपासून सर्व कावळ्यांना अभयदान देतों.”

एवढ्यानें बोधिसत्त्वाची तृप्ति झाली नाहीं. त्यानें सर्व प्राण्यांला राजापासून अभयदान मागून घेतलें व तो म्हणाला, “महाराज छंदानें, द्वेषानें, भयानें किंवा मोहानें कोणतेंही कृत्य करीत जाऊं नका. कोणत्याहि कृत्याला आरंभ करण्यापूर्वी नीट विचार करा; कांकीं तुमच्या हातून चूक घडली तर पुष्कळांचे अकल्याण होणार आहे.”

तेव्हांपासून राजा मोठा धार्मिक झाला, व कावळ्याला रोजचा पुष्कळ भात खावयास द्यावा असा त्यानें हुकूम केला.

——***——

अनुक्रमणिका

४८. नीचाची संगती धरूं नये. (१४१)

(गोधजातक नं. १४१)

एका जन्मीं बोधिसत्त्व घोरपडीच्या कुलांत जन्मला होता. त्याच्या मुलाची एका सरड्यावर फार प्रीती जडली. त्यांची मैत्री इतकी दाट झालीकीं, उठल्या सुटल्या बोधिसत्त्वाचा मुलगा सरड्यापाशीं जाऊं लागला. बोधिसत्त्वाच्या निदर्शनास जेव्हां ही गोष्ट आली, तेव्हां तो आपल्या मुलाला म्हणाला, "बाबारे, सरडा म्हटला म्हणजे हीन जातीचा. त्याच्याशीं आमच्या सारख्याचा संबंध अगदींच शोभत नाहीं. पण ही गोष्ट राहूं द्या बाजूला. अशा नीच प्राण्याशीं संगती केली असतां त्याचे परिणाम भयंकर होत असतात. तेव्हां आम्हां सर्वांच्या हितासाठीं तूं त्या हलकटाची संगती सोडून दे."

परंतु बोधिसत्त्वाचा मुलगा आज्ञाधारक नव्हता. बापाचा उपदेश न ऐकतां त्यानें सरड्यावर आपला सर्व विश्वास टाकला; आपल्या बिळाची त्याला सर्व माहिती सांगितली, व त्याच्या सहवासांत तो फार आनंद मानूं लागला. लहान असतांना याचें आणि सरड्याचें मान जवळ जवळ सारखेंच होतें; परंतु दिवसेंदिवस हा सरड्याच्या चौपट दसपट वाढत गेला. तें पाहून सरडा त्याचा मनांतल्या मनांत फार मत्सर करूं लागला. मी आहें तेवढा आहें आणि हा मात्र आयत्या पिठावर रेघा ओढणाऱ्या श्रीमंत बापाच्या पोराप्रमाणें एकसारखा फुगत चालला आहे! असें वाटून सरड्याचें चित्त झुरणीस लागलें. आणखी जेव्हां जेव्हां हा घोरपडीचा पोरगा सरड्याला प्रेमालिंगन देत असे तेव्हां तेव्हां सरड्याची सर्व गात्रें तुटून पडण्याच्या बेतास येत असत. त्या वेळीं तर बाह्यात्कारी सरडा हांसत असे, पण मनांतल्या मनांत त्याला रडूं येई.

एके दिवशीं एक पारधी हातांत कुदळ घेऊन पुष्कळ कुत्र्यांसह वर्तमान घोरपडीची शिकार करण्यासाठीं त्या जंगलांत फिरत होता. त्याला पाहून सरडा म्हणाला, "तुम्ही कुदळ आणि कुत्रे घेऊन कोठें जातां?"

पारधी म्हणाला. "घोरपडीची शिकार करण्यासाठीं मी या जंगलांत आलों आहें."

सरडा म्हणाला, "तुमचे कुत्रे माझ्या वाटेला जाणार नसले तर मी तुम्हाला एक मोठें बीळ दाखवून देतों. तुम्ही पाचोंळा गोळा करून गांवातून आग घेऊन या."

पारध्यानें सरड्याला आश्वासन देऊन पाचोळा गोळा केला व आग आणून सरड्यानें दाखवून दिलेल्या बोधिसत्वाच्या बिळाच्या तोंडावर आगपेटवून व वारा घालून घोरपडी गुदमरून जातील असें केलें. बिचाऱ्या घोरपडी आपला जीव वांचविण्यासाठीं बिळाच्या दुसऱ्या तोंडावाटे बाहेर पडूं लागल्या. कित्येकीला पारध्यानेंच ठार मारलें व कित्येकींला कुत्र्यांनीं पकडलें. बोधिसत्त्व आणि त्याचे कांहीं मित्र मात्र पारध्याच्या आणि त्याच्या कुत्र्याच्या तावडींत सांपडले नाहींत. सगळ्या घोरपडी खलास झाल्या असें वाटून पारधी आपले कुत्रे व मिळालेली शिकार घेऊन घरीं गेला. तेव्हां बोधिसत्त्व बिळाबाहेर येऊन आपल्या मित्रांना म्हणाला, "सखेहो आपण येथें रहाणें सुरक्षित नाहीं. माझ्या मुलांने सरड्याची संगति केली, तेव्हांच आपण येथें न रहातां दुसरीकडे जावयास पाहिजे होतें. कां कीं, कुळांतील एकजणानें दुष्टाची संगति केली म्हणजे त्या सर्व कुळावर संकट ओढवल्यावाचून रहात नाहीं."

अनुक्रमणिका

बोधिसत्त्व आणि त्याचे मित्र त्या प्रदेशांतून दूर जाऊन तेथें राहिले.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

४९. आश्चर्यकारक मरण. (१४२)

(सिगालजातक नं. १४२)

बोधिसत्व एका जन्मीं कोल्ह्याच्या योनींत जन्मला होता. कोल्ह्याच्या मोठ्या समुदायाचा राजा होऊन तो वाराणसी जवळच्या स्मशानांत रहात असे. त्या काळीं वाराणसी नगरांत एक मोठा उत्सव होत असे. त्या उत्सवांत शहरांतील लोक मत्स्यमांसादिक भक्षण करून मोठी चैन करीत असत. एका वर्षी ह्या उत्सवांत कांहीं धूर्त लोक अशा रीतीनें मजा मारीत असतां पहांटेच्या प्रहरीं त्यांच्यासाठीं केलेले मांसाचे पदार्थ खलास झाले. दारू मात्र अद्यापि शिल्लक राहिली होती. पुनः त्यांनीं मांस मागितलें तेव्हां त्यांना त्यांच्या नोकराकडून एक पळीभर देखील मांस नाहीं असें उत्तर मिळालें. त्यावर एक धूर्त म्हणाला, “मी जिवंत असतांना मांस मिळत नाहीं असें कां म्हणतां? मी दोन तासांच्या आंत मांस घेऊन येतो. तुम्ही येथेंच असा.” असें म्हणून तो धूर्त एक मोठा दांडा घेऊन गटाराच्या वाटेनें शहरांतूनबाहेर पडला व स्मशानांत जाऊन मेल्याचें सोंग करून उताणा निजला. बोधिसत्त्वाच्या कळपांतील कोल्हे बोधिसत्त्वाला विचारल्यावाचून कोणतेंहि साहसाचें कृत्य करीत नसत. त्यांनीं या माणसाला पाहिल्याबरोबर तो मेला आहे असे जाणून त्याचें मांस खाण्याची बोधिसत्त्वाजवळ परवानगी मागितली. तेव्हां बोधिसत्त्व तें प्रेत कशाप्रकारचें आहे हें पहाण्यासाठीं त्या ठिकाणीं आला. दांडकें हातांत असलेलें प्रेत त्याच्या पहाण्यांत आलेलें नव्हतें. तेव्हां त्याला यांत कांहींतरी लुच्चेगिरी असावी अशी शंका आली, व हळूंच जाऊन त्यानें तें दांडकें दांतानीं चावून ओढण्याचा प्रयत्न केला; परंतु धूर्तानें बळकट धरलें असल्यामुळें तें त्याला ओढतां येईना. तो दूर जाऊन धूर्ताला म्हणाला, “बाबारे तुझें हें मरण फारच चमत्कारिक दिसतें. तूं जर खरोखरच मेला असतास तर तुझ्या हातांतील दांडा सहज ओढून घेतां आला असता. आतां आम्हाला मारण्याची तुझी युक्ति आमच्या निदर्शनास आल्यामुळें आम्हीं तुझ्या तावडींत सांपडणार नाही.” असें बोलून बोधिसत्त्वानें आपल्या समुदायासह तेथून पळ काढण्यास सुरवात केली. धूर्त उठून त्यांच्या पाठीमागें लागला, आणि हातांतींल दांडा त्यानें त्यांच्या अंगावर फेकला; परंतु कोंणत्याहि कोल्ह्याला इजा न होतां ते सर्व पळून गेले. धूर्त वाकडें तोंड करीत गटाराच्या मार्गानें पुनः शहरांत गेला.

——***——

अनुक्रमणिका

५०. शौर्य स्तुतीवर अवलंबून नसतें. (१४३)

(विरोचनजातक नं. १४३)

एकदां बोधिसत्त्व सिंहयोनींत जन्मून हिमालयावर रहात असे. एके दिवशीं शिकारीस गेला असतां वाटेंत अकस्मात एक कोल्हा त्याला आढळला. सिंहाला पाहिल्याबरोबर त्या कोल्ह्याची बोबडीच वळली. अंगांत कंप भरला व तेथून हातभर देखील हालण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं राहिलें नाहीं. जात्याच धूर्त असल्यामुळें या संकटांतून पार पडण्याची त्यानें अशी एक युक्ति योजिली कीं, आपलें डोकें सिंहाच्या पायावर ठेऊन तो त्याला म्हणाला "मृगराज, मीं आपणाला शरण आलों आहे."

सिंह म्हणाला, "तुला माझ्याजवळ काय मागावयाचें आहे?"

कोल्हा म्हणाला, "मला दुसरें कांहीं नको आहे. केवळ आपल्या चरणाची सेवा करण्यास परवानगी द्या म्हणजे झालें."

सिंह म्हणाला "हरकत नाहीं. तूं माझ्याजवळ रहा, मीं पकडलेल्या शिकारींतून तुला कांहीं भाग देत जाईन."

कोल्ह्याला तरीं हेंच पाहिजे होतें. तो सिंहाजवळ राहून सुखानें आपला उदरनिर्वाह करूं लागला. कांहीं दिवसांनीं सिंह त्याला म्हणाला, "तूं दुसरें कांहीं एक काम न करतां स्वस्थ बसून असतोस हें ठीक नाहीं. शिकार पकडण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगीं नाहीं, हें मला कबूल आहे, परंतु या गुहेच्या आसपास एखादा हत्ती, गवा किंवा, गेंडा आला तर त्याची टेहळणी करून मला खबर देत जा व त्या प्रसंगीं"महाराज, आपला पराक्रम दाखवा" असें मला म्हणत जा म्हणजे मी तात्काळ धावत जाऊन शिकार पकडीन."

या सिंहाच्या हुकुमाप्रमाणें कोल्हा डोंगराच्या पायथ्याशीं शिकार दिसल्याबरोबर गुहेच्या द्वाराशीं येऊन "महाराज, आपल्या तेजाचा प्रकाश पाडा" असें म्हणत असे व सिंह ताबडतोब धावत जाऊन शिकार पकडून आणीत असे. कांहीं काळ गेल्यावर कोल्ह्याची अशी समजूत झाली कीं, सिंह आपल्यापेक्षां फारसा बळकट नसतां केवळ आपल्या स्तुतीच्या जोरावर हत्ती सारख्या मोठ्या प्राण्यावर झडप घालून त्याची शिकार करतो. तो एके दिवशीं सिंहाला म्हणाला, "महाराज, आजपासून आपल्या जिवावर मीं पुष्कळ सुख भोगलें आहे. पण आतां मला यापुढें परपुष्टतेचा कंटाळा आला आहे. "तुम्ही शिकारीची टेहळणी करून मला यापुढें तुझ्या तेजाचा प्रकाश पाड" असें म्हणत जा म्हणजे तुमच्याप्रमाणें गुहेंतून बाहेर पडून मी एकदम शिकार धरून आणीन."

सिंहानें कोल्ह्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तो म्हणाला, "बाबारे, आजपर्यंत हत्तीची शिकार करणारा कोल्हा कोणी पाहिला नाहीं. विनाकारण तूं या भानगडींत पडूं नकोस. मी केलेल्या शिकारीवर निर्वाह करण्याला शरम वाटण्याचें कांहीं कारण नाहीं."

अनुक्रमणिका

सिंहाचा हा उपदेश न ऐकतां कोल्ह्यानें हत्तीवर स्वारी करण्याचा हट्टच धरला. तेव्हां सिंहानें हत्तीची टेहळणी करण्याचें कबूल केलें, व कोल्हा गुहेंत सिंहासारखा बसून राहिला. डोंगराच्या पायथ्याशीं हत्तीला पाहिल्याबरोबर सिंह गुहेच्या द्वाराशीं येऊन म्हणाला, "जंबुक महाराज, आपल्या तेजाचा प्रकाश पाडा!"

कोल्हा सिंहाप्रमाणें मोठ्या डौलानें गुहेंतून बाहेर पडला व धांवत जाऊन त्यानें हत्तीच्या गंडस्थळावर मोठ्या जोरानें उडी टाकली पण तेथें नखें रोवण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तो खालीं पडला. हत्तीनें पुढला पाय त्याच्या डोक्यावर ठेऊन मेंदू बाहेर काढला आणि तो तेथून निघून गेला. कोल्हा परत आला नाहीं असें पाहून सिंह त्याच्या शोधार्थ गेला व त्याची ही दुर्दशा पाहून म्हणाला, "अरे मुर्खा तूं तुझ्या तेजाचा प्रकाश न पाडतां डोक्यांतून मेंदू मात्र बाहेर पाडलास! तुझ्यासारखे स्तुतीच्या बळावर पराक्रम करूं पहाणारे प्राणी अशा रीतीनें मरण पावतात!"

——❋❋❋——

अनुक्रमणिका

५१. दुर्बल देवता. (१४४)

(नंगुट्ठजातक नं. १४४)

एका काळीं आमचा बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मणकुलांत जन्मला होता. त्याच्या जन्म दिवशीं आईबापांनीं जाताग्नि स्थापन केला. पुढें वयांत आल्यावर ते त्याला म्हणाले, “जर गृहस्थाश्रम करून राहण्याची तुझी इच्छा असेल तर तीन वेदांचे अध्ययन करून अग्निहोत्र पालन कर. जर ब्रह्मलोक परायण होण्याची इच्छा असेल तर हा जाताग्नि घेऊन अरण्यांत प्रेवश कर, व तेथें याची पूजा करून ब्रह्मसायुज्यता मिळेल.”

बोधिसत्त्वाला प्रपंचाचा उपव्याप नको होता. त्यानें जाताग्नि घेऊन अरण्यांत प्रवेश केला व तेथें अग्निदेवतेची पूजा करून तो कालक्रमणा करूं लागला. एके दिवशीं अरण्याजवळच्या गांवांत भिक्षेला गेला असतां एका श्रद्धाळू मनुष्यानें अग्निपूजेसाठीं त्याला एक बैल दिला. तो घेऊन बोधिसत्त्व आपल्या आश्रमांत आला; पुढें त्याच्या मनांत असा विचार आला कीं, भगवान अग्निनारायणासाठीं दिलेली ही दक्षणा त्यालाच अर्पण करावी. याचा यज्ञ करून अग्निनारायणाची तृप्ति करावी. पण अग्निनारायणास मीठ मसाल्यावाचून हें मांस आवडणार नाहीं. तेव्हां गांवांतून मीठ वगैरे सर्व पदार्थ आणून मग यज्ञाला सुरुवात करणें इष्ट आहे, असा विचार करून बैलाला अग्निकुंडासमोर खुंटाला बांधून बोधिसत्त्व म्हणाला, “भगवन् अग्निनारायण, हा तुमचा बली आहे. उद्यां मी याला मारून यथासांग गोमेध करणार आहे. इतर पदार्थ जमविण्यासाठीं मी खेड्यांत जात आहें. तोपर्यंत तुम्हीं या तुमच्या बलीचें रक्षण करा.” अशी प्रार्थना करून बोधिसत्त्व जवळच्या खेड्यांत गेला.

इकडे कांहीं व्याध अरण्यांत शिकारीसाठीं फिरत असतां शिकार न सांपडल्यामुळें तहानेनें व्याकूळ होऊन आणि भुकेनें पीडित होऊन आश्रमांतील तपस्व्यापाशीं काहीं फळमुळें खावयास मिळतील या आशेनें बोधिसत्त्वाच्या आश्रमांत आले. तेथें त्यांना बैल व अग्निकुंडांतील अग्नि याशिवाय दुसरें कांहीं आढळलें नाहीं. त्यांनीं त्या बैलाला मारून त्याचें मांस आगीवर भाजून यथेच्छ खाल्लें, आणि शेंपटी व चामडें तेथेंच टाकून देऊन राहिलेलें मांस घेऊन ते निघून गेले. बोधिसत्त्व होमाला लागणारे सर्व पदार्थ घेऊन आश्रमांत आला, आणि पहातो, तों बैलाचें शेंपूट व चामडें एवढेंच काय तें शिल्लक राहिलेलें! तेव्हां अत्यंत विषाद वाटून तो अग्नीला म्हणाला, हे अग्निनारायणा, आजपर्यंत मी तुझी अनन्यभावानें सेवा केली. तूं माझें दैवत व मी तुझा भक्त, परंतु तुझ्यासाठीं आणिलेल्या बैलाचें जर तुला रक्षण करतां आलें नाहीं तर मग तूं माझें—तुझ्या भक्ताचें—रक्षण कसें करशील? म्हणून आजपासून तुझी सेवा करण्याचें मी सोडून देतों.”

बोधिसत्त्वानें अग्निनारायणाला जलसमाधी देऊन अरण्यांत प्रवेश केला.

——***——

५२. निंबाचा रोप. (१४९)

(एकपण्णजातक नं. १४९)

दुसऱ्या एका जन्मीं बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मणकुलांत जन्मला होता. तरुणपणीं कांहीं काल गृहस्थाश्रमाचें सुख भोगल्यावर प्रपंचाला कंटाळून त्यानें हिमालयाची वाट धरली. कांहीं वर्षें हिमालयावर वास केल्यावर खारट आणि आंबट पदार्थ खाण्याच्या उद्देशानें फिरत फिरत तो वाराणसीला आला. रस्त्यांतून भिक्षेसाठीं फिरत असतां त्याची चर्या पाहून वाराणसीचा राजा अत्यंत प्रसन्न झाला आणि आपल्या नोकरांला म्हणाला, "हा तपस्वी मोठा योगी असावा. त्याला घेऊन राजवाड्यांत या. राजाच्या हुकुमाप्रमाणें बोधिसत्त्वाजवळ जाऊन त्या नोकरांनीं त्याला राजवाड्यांत येण्याची विनंति केली. तेव्हां तो म्हणाला, "बाबांनों, मी राजकुलांत जाणारा तापस नव्हे. राजाची गैरसमजूत झाल्यामुळें त्यानें मला बोलाविलें असलें पाहिजे. मी हिमालयावर राहणारा एक प्रवासी तापस आहे."

तें वर्तमान त्या नोकरांनीं आपल्या धन्यास कळविलें. तेव्हां राजा म्हणाला, "माझ्या घरीं येणारा असा दुसरा कोणी तपस्वी नाहीं. ज्या तपस्व्याच्या मागोमाग तुम्ही गेलां त्यालाच मी बोलावतों आहे. मी त्याची चर्या पाहून अत्यंत प्रसन्न झालों आहें असें त्यास सांगा व येथें घेऊन या."

त्याप्रमाणें त्यांनीं बोधिसत्त्वाला मोठ्या आग्रहानें राजवाड्यांत नेलें. बराच वेळ संवाद झाल्यावर राजा म्हणाला, "भदंत, "आपण पुष्कळ वर्षें अरण्यवास केला आहे. आतां आपल्या दर्शनाचा आम्हांला सतत लाभ होईल असें करा."

बोधिसत्त्व म्हणाला, "पण माझ्यासारख्या तपस्व्याला नगरवास आवडणें शक्य नाहीं. पुष्कळ वर्षें अरण्यांत घालविल्यामुळें मला एकांतवासाची आवड लागली आहे."

राजा म्हणाला, "या नगराच्या आसपास माझीं पुष्कळ उद्यानें आहेत. त्यापैकीं एकाद्या उद्यानांत तुम्ही आश्रम बांधून खुशाल रहावें. लोकांकडून कोणत्याहि रीतीने तुम्हाला उपसर्ग पोचणार नाहीं आणि तुमच्या शांततेचा भंग होणार नाहीं, असा मी बंदोबस्त करतों."

राजाचा फारच आग्रह पडल्यामुळें एका रमणीय उद्यानांत आश्रम करून बोधिसत्त्व तेथें धर्मचिंतनांत काळ घालवूं लागला.

वाराणसीच्या राजाला एकुलता एकच मुलगा होता. त्याचे फार लाड करण्यांत आल्यामुळें तो अत्यंत द्वाड झाला होता. वडील माणसांचा तो मुळींच बोज ठेवीत नसे. नोकराचाकरांना तर शिव्या दिल्यावांचून सरळपणें तो कधींहि बोलला नाहीं. या त्याच्या असभ्य वर्तनानें राजा फार कंटाळला. त्यानें पुष्कळ गुरु ठेविले; परंतु मुलगा सुधारला नाहीं. शेवटीं उद्यानांत रहाणाऱ्या बोधिसत्त्वाची त्याला आठवण झाली व त्याजपाशीं जाऊन तो म्हणाला, "भदंत, माझा मुलगा फार वाचाळ निघाला आहे. ज्याच्या त्याच्या अंगावर पिसाळलेल्या कुत्र्यासारखा तो तुटून पडत असतो. परंतु हें त्याचें वर्तन माझ्या कुळाला अत्यंत लांछनास्पद आहे. आपण कांहीं उपदेश करून माझ्या मुलास ताळ्यावर आणाल तर मजवर अनंत उपकार होतील."

अनुक्रमणिका

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, आम्हीं पडलों अरण्यवासी; कधीं अध्यापन करण्याचा आमच्यावर प्रसंग नसतो. तेव्हां आपल्या मुलाला सन्मार्ग दाखविण्याचें काम माझ्या हातून पार पडेल अस मी खात्रीनें सांगू शकत नाहीं. तथापि त्याला एकट्यालाच माझ्या आश्रमांत पाठवून दिल्यास शक्य तेवढा प्रयत्न करून पाहीन.”

बोधिसत्त्वाच्या सांगण्याप्रमाणें राजानें आपल्या पुत्राला आश्रमांत पाठविलें. राजकुमाराचा नोकराचाकराशीं आणि दरबारांतील ब्राह्मणाशींच काय तो संबंध होता. ते सर्वजण आपल्या बापाचे नोकर आहेत या विचारानें तो त्यांना वाटेल तसें वागवीत असे. परंतु येथें बोधिसत्त्वाशीं गांठ होती. राजा देखील याच्यासमोर आपलें डोकें वाकवितो, असें कुमाराच्या ऐकण्यांत आलें होतें; व, त्यामुळें मोठ्या आदरानें आश्रमांत प्रवेश करून व बोधिसत्त्वाला नमस्कार करून पुनः दुसऱ्या दिवशीं येण्यास सांगितलें. त्याच्या सांगण्याप्रमाणें राजकुमार नियमानें आश्रमांत जाऊं लागला.

एके दिवशीं बोधिसत्त्व त्याला बरोबर घेऊन उद्यानांत फिरावयास गेला. तेथें एक निंबाचा रोप उगवला होता. त्याकडे बोट दाखवून बोधिसत्त्व राजकुमाराला म्हणाला, “या झाडाची तुला परीक्षा नाहीं. तेव्हां याचीं दोन चार पानें खाऊन पहा बरें.”

राजकुमारानें ताबडतोब त्या रोपाचीं पानें चालवीं, व तोंड कडू झाल्यामुळें संतापून जाऊन त्यानें तो रोप उपटून टाकला. बोधिसत्त्व म्हणाला, “हें तूं काय केलेंस?”

राजकुमार म्हणाला, “भदंत, असलें हें झाड वाढूं देणें योग्य आहे काय? याचीं दोन तीन पानें चावल्याबरोबर माझें तोंड इतकें कडू झालें कीं, माझ्या सर्व अंगांत जणू काय कडवटपणाच शिरला! तेव्हां अशा झाडाला लहानपणींच उपटून टाकलें असतां लोकांच्या वेदना कमी करण्याचें श्रेय मला मिळणार नाहीं काय?”

बोधिसत्त्व म्हणाला, “हें झाड वृद्धिंगत झालें तर त्याचीं पान आणि फळें लोकांनीं खाल्लींच पाहिजेत अस नाहीं; परंतु तूं जर तुझ्या कडवट स्वभावासह वृद्धिंगत झालास, तर त्याचीं अत्यंत कडू फळें तुझ्या प्रजेला जबरदस्तीनें भोगावीं लागणार नाहींत काय? आणि त्यांनीं जर तुझें आतांच उन्मूलन करून टाकलें तर त्यांना दोष देतां येईल काय? या गोष्टीचा तूं नीट विचार कर आणि आपला स्वभाव गोड करण्याचा प्रयत्न कर. जर तुझा स्वभाव असाच कडू राहिला, तर जशी तूं या निंबाच्या रोपाची वाट लावलीस तशीच काशीराष्ट्रवासी लोक तुझी लावतील हें पक्कें लक्षांत ठेव.”

बोधिसत्त्वाचा हा उपदेश राजकुमाराच्या मनावर इतका बाणला कीं, त्यानें सतत प्रयत्नानें आपल्या सर्व दुष्ट खोडी सोडून देऊन चांगले गुण संपादन केले.

——✻✻✻——

अनुक्रमणिका

५३. मंत्राचा दुरुपयोग. (१५०)

(संजीवजातक नं. १५०)

एका जन्मीं बोधिसत्त्व मोठा पंडित होऊन तक्षशिला येथें पुष्कळ शिष्यांना शास्त्र शिकवीत असे. संजीव नांवाचा त्याचा एक आवडताशिष्य होता; त्याला मृतप्राण्याला जिवंत करण्याचा त्यानें एक मंत्र शिकविला. संजीवाला आपल्या मंत्राचा प्रयोग करून पाहण्याची फार घाई झाली होती. आपल्या सहाध्यायांबरोबर अरण्यांत लांकडें गोळा करण्यास गेला असतां एक मरून पडलेला वाघ त्यानें पाहिला, आणि तो म्हणाला, “गडेहो, गुरूनें शिकविलेल्या मंत्राचा प्रयोग करून मी या वाघाला जिवंत करतों, व मेलेल्या प्राण्याला कसें जिवंत करतां येतें याचें तुम्हाला प्रत्यक्ष उदाहरण दाखवितों.”

ते म्हणाले, “मित्रा, जरा दम धर, आम्ही झाडावर चढून बसतों व तेथून तूं वाघाला कसा उठवितोस ह पाहतों.”

ते झाडावर चढून बसल्यावर संजीवानें मंत्रप्रयोगाला सुरुवात केली, व खडे घेऊन तो वाघाच्या अंगावर फेकूं लागला. मंत्रसमाप्ति झाल्याबरोबर मोठ्यानें किंकाळी फोडून वाघ त्याच्या अंगावर धांवला, आणि त्याला ठार मारून त्याचें प्रेत घेऊन दाट झाडींत पळून गेला, संजीवाच्या सहाध्यायांनीं घडलेली सर्व गोष्ट बोधिसत्त्वाला सांगितली. तेव्हां तो म्हणाला, “मुलांनों, मंत्रप्रयोग करण्याची जो घाई करतो, व वेळ अवेळ न पहातां भलत्याच प्रसंगीं आपल्या सामर्थ्याचा उपयोग करतो त्याची संजीवाप्रमाणेंच गत होत असते! हें लक्षांत ठेवा, आणि आपल्या सामर्थ्याचा योग्य प्रसंगींच उपयोग करीत जा.”

——***——

अनुक्रमणिका

५४. साधुत्वाची महती. (१५१)

(राजोवादजातक नं. १५१)

एकदां बोधिसत्त्व वाराणसीराजाच्या महिषीच्या उदरीं जन्माला आला. वहिवाटीप्रमाणें त्याचें ब्रह्मदत्त हेंच नांव ठेवण्यांत आलें. कालांतरानें तक्षशिलेला जाऊन तो सर्व विद्यांमध्यें पारंगत झाला; व बापाच्या पश्चात् गादीवर बसला. छंद, द्वेष, भय आणि मोह या चार गोष्टींमुळें सत्ताधिकारी लोकांकडून भयंकर अपराध किंवा चुका घडत असतात. परंतु आमचा बोधिसत्त्व या गोष्टींपासून सर्वथैव परावृत्त झाल्या कारणानें त्याच्या हातूनराज्यपद्धतींत कोणतीहि चूक झाली नाहीं. एवढेंच नव्हे सर्वकाळ आपल्या प्रजेच्या हितांत दक्ष असल्यामुळें बोधिसत्त्वाची कारकीर्द प्रजेला फारच सुखकारक झाली. असें सांगतात कीं, बोधिसत्त्व अत्यंत कुशाग्र असल्याकारणानें त्याच्यासमोर खोटा खटला आणण्यास कोणीच धजेनासा झाला; न्यायाधीशहि लांच लुचपत घेऊन भलताच निवाडा देण्यास धजेनासे झाले. तेव्हां वाराणसीच्या राज्यांत न्यायासनें ओस पडण्याच्या बेतांत आलीं. न्यायाधिशांनीं सर्व दिवस न्यायासनावर येऊन बसावें व खटला आणणारा गृहस्थ न सांपडल्यामुळें पुनः घरीं जावें, असा प्रकार सुरू झाला! दिवसेंदिवस बोधिसत्त्वापाशीं एक देखील तक्रार येईनाशी झाली. तेव्हां तो आपणाशींच म्हणाला, "माझ्या कारकीर्दीत राष्ट्रांतून खोटे खटले नष्ट झाले आहेत. सर्वत्र लोक सचोटीनें आणि दक्षतेनें वागत आहेत. ज्याच्या त्याच्या तोंडून माझी स्तुतीच मला ऐकूं येते. पण कदाचित् माझ्या जवळच लोक माझे अवगुण दाखवण्यास घाबरत असतील. मी जर येथून दूरच्या गांवीं गेलों तर तेथें कदाचित् माझे दोष ऐकण्याची मला संधि सांपडेल." असा विचार करून बोधिसत्त्व अज्ञात वेषानें आपल्या रंथांतून काशीराष्ट्राच्या सरहद्दीपर्यंत गेला. वाटेंत गरीब आणि श्रीमंत प्रजेची त्यानें भेट घेतली. त्यांच्याशीं तो मोकळ्या मनानें बोलला. तेहि हा कोण आहे हें ठाऊक नसल्यामुळें त्याच्याशीं सर्व गोष्टी मोकळ्या मनानें बोलले. परंतु ब्रह्मदत्त राजाची गोष्ट निघाल्याबरोबर सर्वजण त्याजविषयीं अत्यंत प्रेम दर्शवीत असत. बोधिसत्त्वानें राजाचे कांहीं दोष असतील अशी शंका घेतली असतां लोक हा कुकल्पना करणारा गृहस्थ आहे, याच्याशीं बोलण्यांत अर्थ नाहीं असें म्हणून उठून जात. किंवा त्याची टवाळी तरी करीत. अर्थात् आपल्या राज्याच्या सरहद्दीपर्यंत बोधिसत्त्वाला आपल्या अंगचा अवगूण दाखविणारा एकहि मनुष्य सांपडला नाहीं.

त्या कालीं कोसल देशाचा राजा मल्लिक नांवानें फार प्रसिद्ध होता. राजकारणांत तो अत्यंत दक्ष असें. आपल्या आसपासचे लोक आपली स्तुती करतात तेव्हां अज्ञात वेषानें आपल्या राष्ट्रांतील लोकांचीं मनें जाणण्याच्या उद्देशानें तोदेखील कोसल राष्ट्रांत फिरत होता. आपल्या राष्ट्राच्या सरहद्दीपर्यंत त्यालाहि कोणी दोषदर्शक सांपडला नाहीं. एका अरण्यमय प्रदेशांतओढ्याच्या कांठी मल्लिक राजाच्या रथाची आणि बोधिसत्त्वाच्या रथाची समोरासमोर गांठ पडली. ओढ्यांतून पलीकडे जाण्याचा रस्ता इतका अरुंद होता कीं, एकदम दोन रथांला जाणें शक्य नव्हतें. तेव्हां मल्लिक राजाचा सारथी म्हणाला, "भो सारथी तुझा रथ बाजूला घे, म्हणजे मीं माझा रथ पुढें हांकतों."

ब्रह्मदत्ताचा सारथी म्हणाला, "परंतु पहिल्यानें तूं तुझा रथ बाजूला घे आणि आम्हांला वाट दे."

त्यावर मल्लिकाचा सारथी संतापून म्हणाला, "तूं मूर्ख दिसतोस, या रथामध्यें कोसलाधिपति मल्लिक राजाची स्वारी बसली आहे. तेव्हां पहिल्यानें पुढें जाण्याचा माझ्या रथाचा हक्क आहे."

अनुक्रमणिका

ब्रह्मदत्ताचा सारथी म्हणाला, “पण माझ्या रथांत त्रिभुवनविश्रुतकीर्ती श्रीब्रह्मदत्तमहाराजांची स्वारी आहे. तेव्हां त्याच्या रथानें पुढें व्हावें हें योग्य नव्हे काय?”

दोघां सारथ्यांचा बराच वेळ संवाद झाला, आपल्या धन्याची जाति, कुल, गोत्र, संपत्ति, वय वगैरे सर्व गोष्टींची त्यांनीं तुलना करून पाहिली. त्या सर्व बाबतींत दोघेहि राजे समानच होते. तेव्हां ब्रह्मदत्त राजाचा सारथी म्हणाला, “आतां आपण आपल्या मालकाच्या शीलाची तुलना करूं. ज्याचें शील श्रेष्ठ दर्जाचें असेल. त्यानें प्रथमतः जावें व इतरानीं त्याला वाट द्यावी. तेव्हां तूं आतां आपल्या मालकाचें शील काय तें सांग.”

कोसल राजाचा सारथी म्हणाला, “आमच्या राजेसाहेबांचे गुण ऐकून तुला मानच खालीं घालावी लागणार आहे; तथापि, तें ऐकण्याची जर तुझी इच्छाच असली तर ऐकून घे. सांगतों.

[मूळ गाथा—
दळ्हं दळ्हस्स खिपति मल्लिको मुदुना मुदुं।
साधुपि साधुना जेति असाधुंपि असाधुना।
एतादिसो अयं राजा मग्गा उय्याहि सारथी॥] आमचा राजा जबरदस्ताला जबरदस्तीनें नरम करतो; मृदूला मृदु उपायांनींच वश करतो; साधूला साधुत्वानेंच वळवतो, व खळाला खोट्या मार्गानेंच जिंकीत असतो. असा हा आमचा धनी आहे. तेव्हां रस्त्यांतून दूर होऊन आमच्या रथाला वाट दे.”

त्यावर ब्रह्मदत्ताचा सारथी म्हणाला, “वाहवारे गुण! आमच्या राष्ट्रांत अशा गोष्टींना आम्ही गुण समजत नसतों. यांना जर गुण म्हणावें तर दोष कोणते? आमच्या राजाचे गुण याहून फारच निराळे आहेत. त्यांतले कांहीं ऐकण्याची तुझी इच्छाच असली तर ऐकून घे.

[मूळ गाथा—
अक्कोधेन जिने कोधं असाधुं साधुना जिने।
जिने कदरियं दानेन सच्चेनालीकवादिनं।
एतादिसो अयं राजा मग्गा उय्याहि सारथी॥] आमचा राजा अक्रोधानें क्रोधास जिंकतो; दुष्टाला साधुत्वानें जिंकतो; कृपणाला दानानें जिंकतो, व खोटें बोलणाऱ्याला सत्यानें जिंकतो. असा हा राजा आहे. तेव्हां आमच्याच रथाला तूं वाट दिली पाहिजे.”

हें त्या सारथ्याचें भाषण ऐकल्याबरोबर मल्लिक राजा रथांतून खालीं उतरला, आणि बोधिसत्त्वाच्या जवळ जाऊन नमस्कार करून म्हणाला, “इतके दिवस माझे दोष दाखवून देणाऱ्या मनुष्याचा मी शोध करीत होतों; परंतु माझ्या राज्यांत एक देखील माणूस माझे दुर्गुण मला दाखवून देऊं शकला नाहीं. आज आपल्या आकस्मिक दर्शनानें माझे दोष मला कळून आल. तेव्हां आपण मला गुरूसारखे वंद्य आहां.”

बोधिसत्त्व म्हणाला, “हा तुमचा दोष नसून परिस्थितीचा दोष आहे. व्यवहारांत सामान्य लोक ‘जशास तसें’ अशा आचरणाला महत्त्व देत असतात. परंतु अशा वर्तनानें जगाच्या सुखांत भर न पडतां दुःख वाढत जाईल, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. खरें म्हणाल तर दुष्टांना साधु उपायांनीं जिंकावें या सारखा दुसरा राजधर्म नाहीं.”

याप्रमाणें बोधिसत्त्वानें मल्लिकाला उपदेश करून वाराणसीचा रस्ता धरला. मल्लिक राजाहि बोधिसत्त्वाला वंदन करून आपल्या राजधानीला गेला.

——***——

अनुक्रमणिका

५५. नीचाशीं लढण्यापेक्षां पराजय बरा. (१५३)

(सूकरजातक नं. १५३)

एका जन्मीं बोधिसत्त्व सिंह होऊन अरण्यांत रहात असे. त्या अरण्यांत एका सरोवराच्या कांठीं आपल्या पर्णकुटिका बांधून पुष्कळ तपस्वीरहात असत. आणि कांहीं ग्रामसूकरहि तेथें रहात असत. एके दिवशीं बोधिसत्त्व हत्तीचें मांस यथेच्छ खाऊन त्या तळ्यावर पाणी पिण्यासाठीं आला. जवळच एक लठ्ठ डुकर चरत होता. त्या लठ्ठ डुकरावर सिंहाची दृष्टी गेली. व तो मनांत म्हणाला, “दुसरी कांहीं शिकार सांपडली नाहीं तर या डुकरावर आपला निर्वाह करतां येईल, तेव्हां याला आपली चाहूल न दाखवितां येथून निघून जावें हें बरें.”

असा विचार करून सिंह पाणी पिऊन आड वाटेनें हळूहळू दडत जाऊं लागला. पण त्याला डुकरानें ओळखलें, आणि मोठ्यानें ओरडून तो डुकर म्हणाला, “कायरे सिंहा, असा भिऊन पळतोस कशाला? तूं जसा चतुष्पाद आहेस, तसा मीहि चतुष्पाद आहे. तेव्हां घाबरून पळून न जातां माझ्याशीं चार हात कर, व आपला पराक्रम दाखीव.”

सिंह म्हणाला, “अरे डुकरा, आज मी तुझ्याशीं युद्ध करूं इच्छित नाहीं. आणखी एका आठवड्यानें आम्हीं येथें भेटूं, व त्या वेळीं द्वंद्वयुद्ध करूं.”

डुकराला ही गोष्ट पसंत पडली. तो घरीं जाऊन आपल्या जातभाईंना म्हणाला, “आज मी मोठा पराक्रम केला आहे! मला पाहून एक सिंह हळूच दडत पळून जात होता. त्याला मी आव्हान केलें! परंतु त्याची तयारी नसल्यामुळें त्यानें एक आठवडा मागून घेतला आहे. आणखी एका आठवड्यानें तो माझ्याबरोबर लढाई करण्यास येणार आहे. सिंहाविषयीं आपल्या जातीला उगाच बाऊ वाटत असतो. इतका जर सिंह बळकट असता, तर युद्धाची तयारी करण्यास त्याला एक आठवडा कां लागला असता? एवढी तयारी करून आला तरी मीं त्याची अशी खोड जिरवतों कीं, त्यानें या अरण्यांत पुनः पाऊल देखील टाकूं नये.”

हें त्या बालिश डुकराचें भाषण ऐकून वृद्ध डुकर म्हणाले, “बाबारे तुझी बडबड आतां पुरे कर. सिंहानें तुला आठवड्याची मुदत दिली हें तुझें भाग्य समज. हत्तीचें मांस खाऊन सिंह तृप्त झाला असेल, आणि आठवडाभर पुरण्यासारखे मांस शिल्लक असेल म्हणून तुला त्यानें एक आठवड्याची मुदत दिली आहे. हत्तीचें गंडस्थळ फोडणाऱ्या सिंहापुढें तुझ्यासारख्या यःकश्चित प्राण्याचें काय चालणार आहे? पण तुझा हा मूर्खपणा तुलाचभोंवणार आहे, असें नाहीं. त्याचा परिणाम आम्हा सर्वांना भोगावा लागेल. सिंह तुला मारीलच. पण तेवढ्यानें त्याची तृप्ति न होतां तो आमचा सर्वांचा नाश करील.

हा हितोपदेश ऐकून तो लठ्ठ डुकर घाबरून गेला. हत्ती त्यानें पाहिला होता. पण हत्तीचें गंडस्थळ एवढासा सिंह फोडून टाकतो ही गोष्ट त्याला माहीत नव्हती. आतां त्या वृद्ध डुकराच्या उपदेशानें त्याचे डोळे उघडले आणि त्याला शरण जाऊन तो म्हणाला, “मीं हें धाडसाचें कृत्य केलें खरें, परंतु यांतून पार पडण्याचा उपाय कोणता? मी आजच येथून पळून जाऊं कीं काय?”

अनुक्रमणिका

ते वृद्ध डुकर म्हणाले, “पळून जाण्यानें या प्रश्नाचा निकाल लागणार नाहीं. सर्व डुकर या आठवड्यांत पोराबाळांना घेऊन दुसरीकडे जाऊं शकणार नाहींत आणि जरी गेले तरी त्यांना गाठून ऋषींच्या शौचकूपांत जाऊन लोळ आणि पुनः सर्व दिवस अंग वाळल्यावर दुसऱ्या दिवशीं तसाच लोळून अंगाला विष्ठेचीं चांगलीं पुटें दे व ठरलेल्या दिवशीं तळ्याच्या कांठीं जाऊन वाऱ्याच्या उलट्या दिशेला रहा. परंतु तेथें जाण्यापूर्वी दंवानें आपलें अंग ओलें करण्यास विसरूं नकोस.”

त्या तरुण डुकरानें वृद्ध डुकराचा उपदेश सव्याज पाळला. दुसरा धंदा न करतां सात दिवसपर्यंत शौचकुपांत लोळून आठव्या दिवशीं पहांटेस दंवानें आपलें अंग भिजवून ठरलेल्या ठिकाणीं आपल्या अंगाचा वारा सिंहावर जाईल अशा बेतानें तो उभ राहिला. सिंह डुकराचें मांस कसें असतें याची रुची घेण्याची आज संधी मिळेल असा विचार करीत त्या स्थळीं आला. पण डुकराच्या अंगाची अशी घाण सुटली होती कीं, त्याच्या आसपास जाणें मुळींच शक्य नव्हतें. तो दूर अंतरावर उभा राहिला. त्याला पाहून मोठ्या शौर्याचा आव आणून डुकर म्हणाला, “कायरे इतका दूर कां उभा राहतोस. असा जवळ ये म्हणजे एकदम युद्धाला सुरुवात करू.”

सिंह म्हणाला, “बाबारे, तूं ही उत्तम युक्ती शोधून काढली आहेस, तुझ्या अंगाचा एवढा दुर्गंध सुटला आहे कीं, तुला पायानें देखील शिवण्यास मी धजणार नाहीं मग तुझ्या अंगाचा चावा घेण्याची गोष्ट बाजूसच राहिली!आतां मी पराजित झालों असें तूं खुशाल म्हण मी आपखुषीनेंच तुला जय देतों. नीचाशीं लढण्यापेक्षां पराजय पतकरलेला बरा!”

असें म्हणून सिंह तेथून निघून गेला आणि हा डुकर बचावल्याबद्दल सर्व डुकरांना आनंद झाला. इतकेंच नव्हे, सिंहाचा पराजय सिंह सर्वांचा फन्ना उडवून देईल. तेव्हां आतां तूं असें कर कीं, या करण्याचें नवीन साधन त्यांच्या हातीं आल्यामुळें त्यांना सिंहाचें भय वाटेनासें झालें.

——✳✳✳——

अनुक्रमणिका

५६. थोराची कृतज्ञता. (१५०)

(गुणजातक नं. १५०)

एका जन्मीं बोधिसत्त्व सिंह होऊन एका टेकडीवर गुहेंत रहात असे. त्या गुहेच्या पायथ्याशीं एक तळें होतें. एके दिवशीं एक मृग त्या तळ्याच्या काठीं गवत खात असतांना सिंहानें पाहिला व टेकडीवरून खालीं उतरून मोठ्या वेगानें त्यानें त्या मृगावर झडप घातली. सिंहाची चाहूलऐकल्याबरोबर मृगानें पळ काढला व त्यामुळें बोधिसत्त्वाची उडी चुकून तो तळ्याच्या कांठच्या चिखलांत रुतला. सात दिवसपर्यंत तो तेथेंच अडकून राहिला. त्या बाजूनें एक कोल्हा पाणी पिण्यासाठीं येत होता. सिंहाला पाहिल्याबरोबर तो पळूं लागला. परंतु सिंह मोठ्यानें ओरडून म्हणाला, “बा कोल्ह्या, असा घाबरून पळून जाऊं नकोस मी चिखलांत रुतून दुःख भोगीत आहें. जर यांतून पार पडण्याचा कांहीं मार्ग असेल तर शोधून काढ.”

कोल्हा म्हणाला, “कदाचित् मला कांही युक्ती सुचली असती. परंतु तुम्हाला जीवदान देणें म्हणजे माझ्या जिवावरच संकट ओढवून घेण्यासारखें आहे. तेव्हां तुम्ही दुसऱ्या कोणाला तरी मदत करण्याला सांगा. घरीं माझीं बायकामुलें वाट पहात असतील. तेव्हां मला लवकर गेलें पाहिजे.

बोधिसत्त्व म्हणाला, “बाबारे तुझा मुद्दा खरा आहे. तथापि, तुला मी सर्वथैव मित्राप्रमाणें वागवीन असें अभिवचन देतों. जर तूं मला या संकटांतून पार पाडलेंस तर तुझे उपकार मी कसा विसरेन.”

कोल्ह्यानें त्याच्या चारी पायांजवळचा चिखल उकरून काढला व तळ्याच्या पाण्यापर्यंत वाट करून पाणी त्या भोंकांत शिरेल असें केलें. तळ्याचें पाणी आंत शिरल्याबरोबर बोधिसत्त्वाच्या पायाखालचा चिखल मऊ झाला आणि त्याला अनायासें बाहेर पडतां आलें. त्या दिवसापासून सिंहाची आणि कोल्ह्याची फार मैत्री जडली. कोल्ह्याला दिल्यावाचून सिंह पकडलेल्या शिकारीचें मांस खात नसे. कांहीं दिवसांनीं तो कोल्ह्याला म्हणाला, “तूं दूर रहात असल्यामुळें तुझी भेट घेण्यास मला त्रास पडतो. जर तूं माझ्या गुहेजवळ येऊन राहशील तर बरें होईल. तुला एखादी सोईस्कर जागा मी देईन.”

कोल्हा म्हणाला, “पण मी विवाहित आहे, तेव्हां माझ्या बायकोची आणि माझी सोय कशी होईल?”

सिंह म्हणाला, “तुम्हां दोघांचीहि व्यवस्था होण्यास अडचण पडणार नाहीं. शिवाय माझी बायको मी शिकारीस गेल्यावर गुहेंत एकटीच असते. तिला तुझ्या बायकोची मदत होईल, आणि आम्हीं सर्वजण मोठ्या गुण्यागोविंदानें राहूं.”

सिंहाच्या सांगण्याप्रमाणें कोल्हा सहकुटुंब येऊन सिंहाच्या शेजारीं एका लहानशा गुहेंत राहिला. सिंह शिकार मारून आणल्यावर प्रथमतः एक वांटा घेऊन कोल्ह्याकडे जात असे, व त्याची आणि त्याच्या बायकोची तृप्ती झाल्यावर मग राहिलेलें मांस आपल्या स्त्रीला देऊन आपण खात असे. कांहीं कालानें कोल्हीला दोन पोरें झालीं व सिंहिणीलाहि दोन पोरें झालीं. तेव्हांपासून सिंहीण कोल्ह्याच्या कुटुंबाचा मत्सर करूं लागली. आपल्या नवऱ्यानें शिकार मारून आणावी व कोल्ह्याच्या कुटुंबानें येथच्छ मांस खाऊन चैन करावी, हें तिला बिलकूल आवडेना. या शिवाय बायकांचा स्वभाव फार संशयी असतो. त्यामुळें तिला असें वाटलें कीं, कदाचित् सिंहाचें प्रेम त्या कोल्हीवर असावें. नाहींतर आपल्या मुलांना मांस देण्यापूर्वी त्यानें तें

तिच्या मुलांना दिलें नसतें. कांहीं असो कोल्हीला तेथून हाकलून द्यावें असा त्या सिंहीणीनें बेत केला. व आपल्या पोरांना पाठवून तिच्या पोरांना त्रास देण्यास सुरुवात केली. कोल्ह्याला घेऊन सिंह शिकारीला गेल्याबरोबर इकडे सिंहाचे पोरगे कोल्ह्याच्या पोरांना भय दाखवीत असत. कोल्हीण सिंहिणीजवळ गाऱ्हाणें घेऊन येत असे. तेव्हां सिंहीण म्हणत असे कीं, येथें राहिली आहेस कशाला? माझीं पोरें जरतुझ्या पोरांना त्रास देतात, तर चालती हो येथून त्यांना घेऊन. त्यांच्या कागाळ्या घेऊन आलीस तर तें मला मुळींच खपणार नाहीं."

कोल्हीला हा ताप फारच असह्य झाला व तिनें ती गोष्ट आपल्या नवऱ्याला कळविली. दुसऱ्या दिवशीं कोल्हा सिंहाला म्हणाला, "महाराज, मी आपला आश्रित आहें. आश्रितावर आश्रयदात्याचा सदोदित हक्क असतो, असा न्याय आहे. जर आपणाला माझें वास्तव्य येथें नको असेल तर आपण हक्कानेंच मला येथून जाण्यास सांगा. ह्मणजे माझ्या कुटुंबाला घेऊन मी ताबडतोब निघून जातों. परंतु आपल्या मुलांकडून आणि कुटुंबाकडून माझ्या बायकामुलांना सतत त्रास होणें हा सरळ मार्ग नव्हे."

सिंहाला खरी गोष्ट काय होती हें मुळींच ठाऊक नव्हतें. परंतु चौकशी अंतीं त्याला सर्व कांहीं समजून आलें. तेव्हां तो सिंहिणीला म्हणाला, "भद्रे, मागें एकदां सात दिवसपर्यंत मी या गुहेंत परत आलों नाहीं हें तुला आठवतें काय?"

सिंहीण म्हणाली, "होय, मला आठवतें. कां कीं त्या वेळीं स्वतःच शिकार करून निर्वाह करण्याचा माझ्यावर प्रसंग आला होता. मला असें वाटलें की, आपण कोठें तरी शिकारीच्या नादानें भडकत गेला असाल."

"नाहीं भद्रे मी भडकलों नाहीं. डोंगरा—खालीं असलेल्या तळ्याच्या कांठीं मी चिखलांत रुतून राहिलों होतों. केवळ लाजेखातर ही गोष्ट मी तुला सांगितली नाहीं. त्या प्रसंगीं या कोल्ह्यानें मोठ्या युक्तीनें मला त्या संकटांतून पार पाडलें. तेव्हांपासून त्याची माझी मैत्री जडली. भद्रे! जरी आपला मित्र आपल्यापेक्षां दुर्बल असला तरी जोंपर्यंत तो मित्रधर्मानें वागत आहे, तोंपर्यंत त्याची अवहेलना करतां कामा नये; तोपर्यंत त्याला आपला बांधव, सखा किंवा मित्र असें म्हणण्यास हरकत नाहीं. जरी हा कोल्हा यःकश्चित प्राणी आहे तरी त्यानें मला प्राणदान दिलें आहे, हें लक्षांत ठेव आणि मनांतील सर्व कुशंका सोडून दे. आपल्या मुलांप्रमाणें त्याच्याहि मुलांवर प्रेम करीत जा, व त्याच्या स्त्रीला आपल्या बहिणीप्रमाणें मानीत जा."

सिंहाचा उपदेश सिंहिणीनें मोठ्या आदरानें पाळला. आणि असें सांगतात कीं, त्या सिंहाच्या आणि कोल्ह्याच्या कुंटुंबाची मैत्री सात पिढ्यांपर्यंत अव्याहत चालली होती.

——***——

अनुक्रमणिका

५७. कांट्यानें काढितात कांटा कीं. (१५८)

(सुहनु– जातक नं. १५८)

एकदां आमचा बोधिसत्त्व वाराणसी राजाचा मुख्यप्रधान झाला होता. तो राजाचीं सर्व कामें पहात असे. त्याला अश्वपरीक्षा फारच चांगली करतां येत असल्यामुळें दुसऱ्या देशांतून घोडे विकावयास आणले असतां तोच त्यांची किंमत ठरवीत असे. राजा जरा धनलोभी होता. बोधिसत्त्वानें ठरविलेली योग्य किंमत त्याला आवडत नसे. एके दिवशीं एक व्यापारी कांहीं घोडे घेऊन वाराणसीला आला. व राजेसाहेबांची भेट घेऊन ते विकत घेण्याची त्यानें विनंति केली. राजानें बोधिसत्त्वाला न सांगतां दुसऱ्या एका हांजी हांजी करणाऱ्या अमात्याला बोलावून त्या घोड्यांची किंमत करण्यास सांगितली. आणि तो म्हणाला, “हें पहा, या घोड्यांची किंमत करण्यापूर्वी आमच्या पागेंत महासोण नांवाचा जो मोठा उनाड घोडा आहे त्याला त्या घोड्यांवर सोडून दे. लाथा वगैरे मारून त्यानें त्या घोड्यांला दुर्बळ केल्यावर मग त्यांची किंमत कर. अमात्य फारच आज्ञाधारक होता. त्यानें महासोणाला त्या घोड्यांवर घातलें आणि त्यांचे हाल करून मग राजाच्या इच्छेप्रमाणें अगदींच थोडी किंमत ठरवली. बिचारा व्यापारी चकित होऊन गेला! पहिला चांगला किंमत ठरवणारा प्रधान जाऊन त्याच्याजागीं हा भलताच माणूस कसा आला याचें त्याला फार फार आश्चर्य वाटलें! परंतु विषाद मानण्यांत कांहींच अर्थ नव्हता. ठरलेली किंमत न घेतां घोडे घेऊन कांहीं फायदा झाला नसता. कारण त्या घोड्यांची इतर ठिकाणीं अधिक किंमत आली असती असें नव्हतें म्हणून मिळालेले पैसे घेऊन तो बोधिसत्त्वापाशीं गेला आणि शोकस्वरानें म्हणाला, “महाराज, आपण योग्य किंमत देत असता, म्हणून इतक्या दुरून घोडे घेऊन आम्ही येथें आलों; परंतु या खेपेला भलत्याच माणसानें आमची फजिती करून टाकिली.”

बोधिसत्त्व सर्व हकीगत ऐकून घेऊन म्हणाला, “तुम्ही विषाद न मानतां परत स्वदेशीं जाऊन दुसरा एक खोडसाळ घोडा मिळत असला तर पहा व त्याला घेऊन येथें या. इकडे महासोणाला घोड्यांवर घालण्यांत आल्याबरोबर तिकडे त्या खोडसाळ घोड्याला सोडून द्या म्हणजे मग काय गंमत होईल ती पाहूं.”

बोधिसत्त्वाच्या सांगण्याप्रमाणें दुसऱ्या खेपेला तो व्यापारी सुहनु नांवाचा एक भयंकर खोडसाळ घोडा बरोबर घेऊन आला. आणि आपल्या इतर घोड्यांना घेऊन राजाला त्यांची किंमत ठरवण्याची त्यानें विनंती केली. वहिवाटीप्रमाणें महासोणाला त्या घोड्यांच्या अंगावर सोडण्यांत आला तेव्हां त्या व्यापाऱ्यानें आपल्या सुहनूला सोडून दिलें. त्या दोघांची गांठ पडल्याबरोबर ते परस्परांचें अंग चाटूं लागले. जणूं काय ते सक्खे भाऊच आहेत असें लोकांना वाटलें! तें पाहून राजा चकित झाला! आणि बोधिसत्त्वाला म्हणाला, “मित्रा, हा आमचा घोडा इतका द्वाड असून त्याचें या आगंतुक घोड्याशीं सख्य कसें जमलें?”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज हा नवीन घोडा आमच्या महासोणापेक्षांहि अधिक द्वाड आहे. तेव्हां त्या दोघांची मैत्री जमली यांत मोठें नवल नाहीं. या व्यापाऱ्यानें काट्यानेंच काटा काढण्याची ही युक्ती योजिली आहे. महाराज, धनलोभाला वश होणें आपल्यासारख्या राज्यपदारूढ पुरुषाला शोभत नाहीं. अशा रीतीनें दूर देशांतून येणाऱ्या व्यापाऱ्यांची जर आपण हानी केली, तर ते आमच्या देशांत येणार नाहींत, आणि त्यामुळें आमच्या देशांत पैदा न होणाऱ्या वस्तूंची किंमत भलतीकडेच जाईल. म्हणून आपल्या फायद्यासाठीं देखील सत्यानें आणि न्यायानें वागणें हें आम्हा सर्वांस हितकारक आहे.”

अनुक्रमणिका

बोधिसत्त्वाचा उपदेश ऐकून राजानें धनलोभ सोडून दिला आणि तेव्हांपासून तो न्यायानें वागूं लागला.

——✳✳✳——

अनुक्रमणिका

५८. तरुणाचा उत्साह. (१६३)

(सुसीम जातक नं. १६३)

प्राचीनकाळीं वाराणसी नगरींत सुसीम नांवाचा राजा राज्य करीत होता. आमचा बोधिसत्त्व त्या राजाच्या पुरोहिताच्या स्त्रीच्या पोटीं जन्मास आला. तो वयांत येण्यापूर्वीच पुरोहित मरण पावला. बोधिसत्त्वाचें अध्ययनसंपलें नव्हतें. बाप वारला तेव्हां त्याचें वय सुमारें सोळा सतरा वर्षांचें होतें. इतक्यांत हत्तींचा सण आला.

हत्तीचा सण म्हणजे त्या दिवशीं हत्तींना घालण्यासाठीं सरदार मानकरी वगैरे लोक नानातऱ्हेचे अलंकार आणीत असत. याशिवाय पुष्कळ वस्तू गोळा करून त्यांनीं हत्तींची पूजा करण्यांत येत असे. आणि पूजाविधी आटपल्यावर तें सर्व साहित्य पुरोहिताला मिळे. वाराणसींतील ब्राह्मणांना पुरोहितालाच सर्व द्रव्य मिळावें, ही गोष्ट आवडत नसे. परंतु वहिवाटीविरुद्ध जाण्याचें त्यांना सामर्थ्य नव्हतें. पुरोहित गेल्यावर राजगृहीं जमून ते राजाला म्हणाले "महाराज, यंदाच्या हत्तीच्या सणांतील सर्व दक्षणा आम्हा सर्वांना मिळाली पाहिजे. कां कीं, पुरोहिताचा मुलगा तरुण असून तो सर्व वेदांत आणि हस्तिसूत्रांत निष्णात नाहीं. तेव्हां जुनी वहिवाट मोडून सर्व ब्राह्मणांला या दक्षिणेचे वाटेकरी करावें, अशी आमची विनंति आहे."

राजाला ही गोष्ट पसंत पडली. व पुढें येणाऱ्या हत्तीच्या सणांतील दक्षिणा सर्व ब्राह्मणांस मिळावी, असा त्यानें निकाल दिला. ही गोष्ट बोधिसत्त्वाच्या आईला समजली, तेव्हां अत्यंत खिन्न होऊन तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. बोधिसत्त्व अध्ययन करून घरीं येऊन पाहतो तों आपली आई शोकमय झालेली त्याला दिसली तेव्हां तो आईला म्हणाला, "तुझ्या शोकाचें कारण काय तें मला सांग. तूं जर शोक सोडून दिला नाहींस तर मी अन्नग्रहण करणार नाहीं."

आई म्हणाली, "बाळा आज माझ्या कानीं एक वाईट बातमी आल्यामुळें माझे मन उद्विग्न झालें आहे. तूं तरुण आहेस अशी संधी साधून गांवांतील ब्राह्मणांनीं आमच्या कुल परंपरेचा हक्क नष्ट करण्याचा खटाटोप चालविला आहे. आणि आमच्या राजानेंहि त्यांच्या प्रयत्नांस आपल्या आज्ञेनें यश दिलें आहे. हत्तीच्या सणांतील सर्व वस्त्रालंकार तुझ्या वाडवडिलांना मिळत असत. परंतु आतां तूं लहान आहेस, व तुझें अध्ययन पुरें झालें नाहीं अशा सबबीवर आमच्या कुलाचा हक्क काढून घेऊन तो वाराणसींतील सर्व ब्राह्मणांला देण्यांत येणार आहे. आम्हांला द्रव्यप्राप्ती होणार नाहीं, याजबद्दल मुळींच वाईट वाटत नाहीं. आमच्या घरीं पुष्कळधन आहे आणि एवढें धन घेऊन तरी ब्राह्मणाला काय करावयाचें आहे? तथापि संधी साधून इतर ब्राह्मण आमच्या कुलाचा हक्क बुडवूं पहात आहेत याचेंच मला राहून राहून वाईट वाटत आहे."

हें आपल्या मातोश्रीचें भाषण ऐकून बोधिसत्त्वाचें प्रसुप्त तेज एकदम जागृत झालें. तो म्हणाला, "आई, आजपर्यंत मी मोठ्या उत्साहानें मुळींच अध्ययन केलें नाहीं. आमच्या घरीं पुष्कळ संपत्ती आहे. आणखी पुष्कळ अध्ययन करून काय करावयाचें अशा वेडगळ समजुतीनें माझें चित्त अध्ययनापेक्षां क्रीडेकडे जास्त लागलें; पण आतां तुला दुःख झालेलें पाहून मला संवेग उत्पन्न झाला आहे आणि हत्तीचा सण येण्यापूर्वी माझें अध्ययन पुरें करण्याचा मी दृढनिश्चय केला आहे. आतां तूं मला एवढेंच सांग कीं, सर्व वेदांत आणि शास्त्रांत पारंगत असा गुरू कोठें सांपडेल?"

अनुक्रमणिका

आई म्हणाली, “बाळा आमच्या या वाराणसींत सर्व ब्राह्मण अर्धकच्चे आहेत. उत्तम पंडित एका तक्षशिला नगरींतच सांपडतात. तुला जर सर्व शास्त्रांत पारंगतता संपादावयाची आहे, तर तेथें जाऊन गुरुगृहीं वास केला पाहिजे.”

त्याच दिवशीं बोधिसत्त्वानें वाटखर्ची बरोबर घेऊन वाराणसींतून प्रयाण केलें व जितक्या लवकर तक्षशिलेला जाणें शक्य होतें तितक्या लवकर तो तेथें जाऊन पोहोंचला. तेथें एका प्रसिद्ध आचार्याच्या घरीं जाऊन त्यानें अध्ययनास सुरुवात केली. परंतु तेथील मंद अभ्यासक्रमानें हत्तीचा सण येण्यापूर्वीच घरीं पोहोंचणें शक्य नव्हतें म्हणून तो आचार्याला म्हणाला, “गुरुजी, या रोजच्या अभ्यासक्रमानें माझें काम भागणार नाहीं. मला निकडीच्या कामासाठीं अध्ययन पुरें करून लवकर घरीं गेलें पाहिजे.”

त्या आचार्यानें बोधिसत्त्वाला निराळें शिकवून त्याच्या अध्यापनाची फार काळजी घेतली, बोधिसत्त्वानेंहि आपल्या आंगच्या हुषारीनें आचार्याला संतुष्ट करून तीन वेदांचें आणि हस्तिसूत्राचें अध्ययन हत्तीचा सण येण्यापूर्वीच पुरें केलें. आणि त्या सणाच्या पूर्व दिवशीं तो आपल्या घरीं येऊन पोहोंचला. हत्तीच्या सणाची सर्व तयारी झालीच होती. दुसऱ्या दिवशीं हस्तिशाळेंत ब्राह्मणसमुदाय जमून होमहवनाला सुरुवात झाली. राजाहि आपल्या अमात्यांसह तेथें आला. इतक्यांत बोधिसत्त्व त्या ठिकाणीं येऊनराजाला म्हणाला, “महाराज, आजच्या सणाची आमच्या कुलांतील कोणीच ब्राह्मण येथें हजर नसतां तयारी चालली आहे हें काय?”

राजा म्हणाला, “बाबारे, तुझ्या कुलांत तूंच काय तो शिल्लक राहिला आहेस आणि तुझें अध्ययन अपुरें असल्यामुळें यंदाची दक्षणा शहरांतील सर्व ब्राह्मणांना वांटून देण्यांत येणार आहे. म्हणून तुझी या ठिकाणीं जरूर पडली नाहीं.”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, माझें अध्ययन पुरें झालें नाहीं ही गोष्ट आपणाला कोणीं सांगितली?” राजा म्हणाला, “हे सर्व ब्राह्मण सांगत आहेत.”

बोधिसत्त्व म्हणाला, “तर मग या ब्राह्मणांनीं पुढें येऊन मला प्रश्न विचारावे किंवा मजबरोबर वेदमंत्र म्हणण्यास आरंभ करावा. आणि जर त्यांतील एक जण देखील मला जिंकू शकला तर आमच्या कुलपरंपरेत चालत आलेली वहिवाट मोडून सर्व दक्षिणा या ब्राह्मणांला द्यावी. पण जर ते हरले, तर त्यांना माझ्याविषयीं विनाकारण गैरसमजूत उत्पन्न केल्याबद्दल योग्य शासन व्हावें.”

वेदाविषयीं आणि हस्तिसूत्राविषयीं त्यांतील एक देखील ब्राह्मण बोधिसत्त्वाला प्रश्न करण्यास धजला नाहीं; तेव्हां बोधिसत्त्वानेंच वेदमंत्र आणि हस्तिसूत्र त्या सभेंत म्हणून दाखविलें. तेव्हां ते सर्व ब्राह्मण या तरुणाची बुद्धि पाहून चकित होऊन गेले! व राजाला भलतीच गोष्ट सांगितल्याबद्दल त्यांनीं त्याची क्षमा मागितली. राजानें पूर्वीची वहिवाट कायम करून सर्व दक्षिणा बोधिसत्त्वाला देवविली. आपल्या कुलाची परंपरा एकुलत्या एका तरुण मुलानें राखल्याबद्दल बोधिसत्त्वाच्या आईला फार आनंद झाला.

——***——

अनुक्रमणिका

५९. नीच बोलावयाला लागला, तर थोर मौन धरतात. (१७२)

(दद्दरजातक नं. १७२)

एका जन्मीं बोधिसत्त्व सिंहाचा राजा होऊन हिमालयावरील एका भव्य गुहेंत रहात असे. एके दिवशीं कांहीं कारणानें आजूबाजूचे सर्व सिंह त्याच्या गुहेच्या अंगणांत गोळा झाले होते. तेथें जमल्यावर वहिवाटीप्रमाणें त्या सर्वांनीं गर्जना करण्यास सुरुवात केली. त्या टेकडीच्या जवळच दुसऱ्या एका टेकडीवर एक कोल्हा रहात होता. त्याला सिंहाची गर्जना आवडली नाहीं. आणि त्यांचें तोंड बंद करण्यासाठीं त्यानें कोल्हेकुईला सुरुवात केली. तो शब्द कानीं पडतांच सर्व सिंह चपापून जागच्याजागीं चुप बसले. सिंहराजाचा पुत्र एकाएकीं स्वस्थ बसलेले पाहून आपल्या पित्यास म्हणाला, “बाबा, हे सगळे सिंह भीतीनें गांगरून गेले आहेत असें वाटतें. पण असा हा कोणता प्राणी बरें कीं, ज्यांचा शब्द ऐकल्याबरोबर ही दशा व्हावी?”

बोधिसत्त्व म्हणाला, “बाळ, तुझी अगदींच उलटी समजूत झाली आहे. हा मोठा प्राणी नसून नीच कोल्हा आहे; आणि त्याच्या कोल्हेकुईबरोबर सिंहगर्जना करणें लज्जास्पद असल्यामुळें माझे ज्ञातिबांधव चुप राहिले आहेत. नीचाबरोबर बोलण्यापेक्षां मौनव्रत चांगलें, हें तूं लक्षांत ठेव.”

——✳✳✳——

अनुक्रमणिका

६०. हलकटाला आश्रय देऊं नये. (१७३)

(मक्कटजातक नं. १७३)

एकदां आमचा बोधिसत्त्व काशीदेशांत एका खेडेगांवीं जन्मला होता. वेदाध्ययन वगैरे झाल्यावर त्यानें विवाह केला. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, एक मुलगा जन्मल्याबरोबर त्याची बायको मरण पावली. तो मुलगा थोडा चालूं बोलूं लागल्यावर त्याला घेऊन बोधिसत्त्व हिमालयावर जाऊन राहिला. तेथें त्यानें एक सुंदर पर्णशाला बांधली, व अग्निहोत्राची उपासना करून तो कालक्रमणा करूं लागला. एके दिवशीं हिमालयावर गारांचा मोठा पाऊस पडला. त्यामुळें एक वानर थंडीनें गारठला, आणि कोठेंतरी आगीजवळ बसण्यास सांपडतें आहे कीं काय याच्या शोधास लागला. बोधिसत्त्वाच्या आश्रमांत होमकुंड जळत असलेलें पाहून त्याला मोठें समाधान वाटलें पण दरवाजावर बोधिसत्त्वाचा मुलगा बसला असल्यामुळें मर्कटाला एकदम आंतघुसण्यास भीति वाटली. तेव्हां त्यानें एक नवी युक्ती शोधून काढली. जवळच्या एका पर्णकुटिकेंत एक तापस रहात होता. थोड्या दिवसांमागें तो मरण पावल्यामुळें त्याची वल्कलें वगैरे तापसवेषाला लागणारे सर्व पदार्थ तेथेंच पडून राहिले होते. तीं वल्कलें परिधान करून आणि कमंडलु वगैरे हातांत घेऊन तो माकड बोधिसत्त्वाच्या आश्रमापाशीं आला. त्याला पाहून बोधिसत्त्वाचा पुत्र धांवत धांवत बोधिसत्त्वापाशीं गेला आणि म्हणाला, “बाबा, एक ठेंगू तापसकुमार आमच्या आश्रमापाशीं आला आहे. त्याचा आपण आदरसत्कार करून आपल्या आश्रमांत ठेऊन घेऊं. आपण फलमूलांसाठीं अरण्यांत गेल्यावर मी येथें एकटाच असतों त्या वेळीं त्याच्या संगतीनें मला बरें वाटेल, आणि आम्हीं दोघेहि बरोबर अध्ययन करूं.”

बोधिसत्त्व आश्रमाबाहेर येऊन पहातो तों तापस वेषधारी मर्कटमहाराजाची स्वारी त्याला दिसली आणि तो म्हणाला, “मुला, हाचना तो तुझा तापसकुमार?”

मुलगा म्हणाला, “होय बाबा, हाच तो तापसकुमार. याची ओळख करून घेण्याला मी उत्सुक झालों आहें.”

बोधिसत्त्व म्हणाला, “बाबारे जरा दम धर. हा तापसकुमार नसून तापसवेषधारी नीच मर्कट आहे. सुशील ब्राह्मणाचें किंवा तापसाचें तोंड याच्यासारखें विचित्र नसतें. याला जर आम्हीं आश्रय दिला, तर आमच्या पर्णकुटिकेची तो नासधूस करून टाकील. तेव्हां याला येथूनच घालवून द्यावें हें बरें.”

असें बोलून बोधिसत्त्वानें अग्निकुंडातील एक कोलीत त्या माकडावर फेंकली. तेव्हां वल्कलें आणि कमंडलु टाकून देऊन माकड खरें स्वरूप प्रकट करून पळून गेला.

——***——

अनुक्रमणिका

६१. खळाला मदत केल्याबद्दल प्रायश्चित्त. (१७४)

(दूभियमक्कटजातक नं. १७४)

दुसऱ्या एका जन्मीं बोधिसत्त्व काशी राष्ट्रांत ब्राह्मणकुलांत जन्मला होता. मोठा झाल्यावर तो कांहीं कामानिमित्त दूरच्या एका गांवीं जाण्यासनिघाला. वाटेंत एक मोठें अरण्य होतें. त्या अरण्यांत एकच फार खोल विहीर होती. विहिरीजवळ जनावरांना पाणी पाजण्यासाठीं एक डोणी ठेविली होती आणि वाटसरू लोक पुण्य संपादण्यासाठीं विहिरीचें पाणी काढून त्या डोणींत भरून ठेवीत असत. परंतु दोन तीन दिवस त्या मार्गानें कोणी वाटसरून गेल्यामुळें डोणी ठणठणीत कोरडी पडली. बोधिसत्त्व त्या विहिरीजवळ जाऊन हातपाय धुऊन व पाणी पिऊन उभा राहिला. इतक्यांत एक तहानेनें तळमळणारा माकड त्याच्या पहाण्यांत आला. बोधिसत्त्वाला त्या माकडाची फार कींव आली, व आपल्या तांब्यानें विहिरींतून पाणी काढून त्यानें ती डोणी भरली. माकड पाणी पिऊन तृप्त जाहला व झाडावर बसून बोधिसत्त्वाकडे वेडें वाकडें तोंड करून पाहूं लागला; तेव्हां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "बा मर्कटा, तुझ्यावर उपकार करण्यासाठीं मी इतके कष्ट सहन केले. या खोल विहिरींतून पाणी काढून तें मी तुला पाजलें आणि आतां तूं अशा प्रकारें माझे उपकार फेडतो आहेस काय?"

बोधिसत्त्व ज्या झाडाखालीं बसला होता, त्यावर उडी मारून माकड म्हणाला, "वेड्या ब्राह्मणा, आमच्या जातींत वेडीं वाकडी तोंडें न करणारा असा तुला कोणी आढळला आहे काय? पण एवढ्यानें तुला संतोष होत नसला तर आणखीं दुसरें कांहीं कांहीं करून तुझे उपकार फेडण्यास मी तयार आहे."

बोधिसत्त्व या नीचाबरोबर संवाद करण्यांत अर्थ नाहीं असे जाणून तेथून जाण्यासाठीं उठून उभा राहिला. इतक्यांत माकडानें झाडावरून त्याच्या उघड्या डोक्यावर देहधर्म केला! बोधिसत्त्व म्हणाला, "नीचाला मदत केल्याबद्दल मला योग्य प्रायश्चित्त मिळालें!" असें बोलून त्या विहिरीवर जाऊन बोधिसत्त्वानें स्नान केलें आणि तेथून निघून गेला.

——✱✱✱——

अनुक्रमणिका

६२. माकडाचा दांभिकपणा. (१७५)

(आदिच्चुपट्ठानजातक नं. १७५)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं तापस होऊन मोठ्या तापसपरिवारासह हिमालयावर रहात असे. वर्षाकाळीं आपल्या परिवारासह तो जवळपासच्या एका मोठ्या गांवाजवळ येत असे, व वर्षाकाल संपल्यावर पुनः हिमालयावर जात असे. एका पावसाळ्यांत एका गांवाजवळ तो आपल्या परिवारासह भाविक लोकांनी बांधून दिलेल्या पर्णशालेंत रहात होता. सकाळच्या प्रहरीं तापसगण भिक्षेला गेल्यावर एक माकड त्या पर्णकुटिकेंत शिरून फार नासधूस करीत असे. अग्निकुंडांत राख टाकावी; पाण्याचा घडा उपडा करावा; कमंडलु फोडून टाकावे, व सरते शेवटीं देहधर्म करून तेथून निघून जावें! अशा रीतीनें त्यानें त्या चातुर्मास्यांत ऋषिगणाला फार त्रास दिला. चातुर्मास्य संपल्यावर बोधिसत्त्व आपल्या परिवारासह हिमालयावर जाण्यास निघाला. तेव्हां ग्रामवासी लोकांनीं मोठा उत्सव करून तापसगणांला महादान दिलें. तें पाहून त्या माकडाला फार मत्सर झाला. तो मनाशींच म्हणाला, “हें जंगलांत राहणारे तपस्वी आहेत. त्यांच्यांत आणि माझ्यांत कांहींच अंतर नसतां लोक यांची पूजा करतात व मी लोकांच्या दाराशीं गेलों असतां दगड मारून मला घालवून देतात. मी जसा फलमूलांवर रहातों, तसे हे तापसलोक फलमूलांवर रहातात. परंतु त्यांच्यासारखें अग्निहोत्रादिकांचें स्तोम मी माजवलें नसल्यामुळें मला त्यांसारखा मान मिळत नसावा!”

असा विचार करून हळुच पर्णशाळेंतून आगीची कोलीत चोरून नेऊन त्यानें उघड्या मैदानांत पंचाग्नि साधनाचें व्रत सुरू केलें. चारी दिशांला चार ठिकाणीं अग्नि पेटवून आणि अंगाला राख फासून तो त्या अग्नीच्या मध्यभागीं सूर्याकडे टक लावून पहात बसला. तापसाची पूजा करण्यासाठीं जे लोक येत असत ते आश्चर्यचकित होऊन म्हणत, “कायहो! सर्व प्राण्यांमध्यें साधू पुरुष आढळतातच. या वानराचें तप पहा! हा यःकश्चित प्राणी असून यानें पंचाग्नि साधनाचें कडकडित व्रत चालविलें आहे!”

याप्रमाणें मर्कटांची स्तुति बोधिसत्त्वाच्या कानापर्यंत गेली. तेव्हां तो त्या लोकांना म्हणाला, “बाबांनों, या माकडाच्या तपश्चर्येला पाहून भल जाऊं नका! याचें चरित्र कसें आहे हें तुम्हांस ठाऊक नाहीं. रोजच्यारोज अग्निशाळेची नासधुस करून यानें आमचे पुष्कळ कमंडलु फोडले आहेत
[१ मूळ गाथा–
नास्स सीलं विजानाथ अनञ्ञाय पसंसथ।
अग्गिहूत्तं च ऊहन्ति तेन भिन्ना कमंडलू॥] ? आतां आम्हीं जाण्याच्या सुमाराला तो तपस्वी बनूं पहात आहे.”

बोधिसत्त्वाचें हें भाषण ऐकून ते आपल्या काठ्या वगैरे उगारून त्या माकडावर धांवले. तेव्हां त्याचें धैर्य गलित होऊन तो तेथून पळून गेला.

——***——

अनुक्रमणिका

६३. वानराचें दूरदर्शित्व. (१७७)

(तिण्डुकजातक नं. १७७)

एका जन्मीं बोधिसत्त्व वानरयोनींत जन्म पावून वयांत आल्यावर एका मोठ्या वानरसमुदायाचा राजा झाला होता. तो अरण्यांत रहात असे, त्याच्याजवळच एक टेंभुर्णीचा मोठा भव्य वृक्ष होता. त्या वृक्षाच्या आसपास वर्षांतून कांहीं दिवस एक गांवच वसत असे व कांहीं दिवस तेथें कोणीहि रहात नसत. जेव्हां तेथें लोकांची वस्ती नसे, तेव्हां बोधिसत्त्व आपल्या परिवारासह जाऊन त्या वृक्षाचीं फळें यथेच्छ खात असे. परंतु एका वर्षी अशी गोष्ट घडली कीं त्या वृक्षाला फळें येण्याची आणि लोकांची वसाहत होण्याची एकच गांठ पडली तेव्हां बोधिसत्त्वाला तेथें जाण्याचें सोडून देणें भाग पडलें. पण त्याच्या कळपांतील वानरांना ही गोष्ट आवडली नाहीं. ते म्हणाले "आम्हीं प्रतिवर्षी त्या झाडाचीं गोड फळें खात आलों आहों. आतां त्यांच्या आसपास माणसांची वस्ती झाली म्हणून फळें खाण्याचें सोडून देणें हा नामर्दपणा आहे. दिवसा लोक माध्यान्हसमयीं निजत असतात, त्यावेळीं हळूच जाऊन आपण फळें खाऊन घेऊं."बोधिसत्त्वानें वानरगणांचें मन वळवण्याचा पुष्कळ खटाटोप केला. परंतु बहुमतापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं तेव्हां त्यानें तेथें जाण्याचा ठराव केला, आणिएकांती सेनक नांवाच्या आपल्या भाच्याला बोलावून आणून तो म्हणाला, "बा सेनका, तूं देखील इतर वानरासारखा फळलोभी आहेस काय?"

सेनक म्हणाला, "आपल्या आज्ञेपुढें मला दुसऱ्या कोणत्याहि वस्तूची चाड वाटत नाहीं. आपण जर सांगाल तर मी केवळ पाणी पिऊन देखील राहीन."

यावर बोधिसत्त्व म्हणाला, "मी या गणाचा राजा असल्यामुळें मला यांच्याबरोबर गेलेंच पाहिजे. जर का मी मागें राहिलों तर मला भ्याड म्हणून हे माझी निंदा करतील; आणि माझ्याविषयीं त्यांची आदरबुद्धि पार नष्ट होईल. म्हणून आज आम्हीं फळें खावयास जाऊं त्यावेळीं तूं मागें रहा, आणि जर आम्हीं संकटांत सांपडलों असें दिसलें, तर मी सांगतों त्या उपायानें आम्हांला त्या संकटांतून सोडव."

बोधिसत्त्वाची आज्ञा सेनकानें मान्य केली. बोधिसत्त्वानें आपण संकटांत सांपडलों तर कोणती युक्ती योजावी या संबंधानें त्याला नीटपणें सर्व कांहीं सांगून ठेविलें. आणि वानर-गणांला घेऊन दुपारच्या प्रहरीं तो त्या वृक्षावर फळें खात बसला. उन्हाळा फार असल्यामुळें सर्व लोक आपापल्या झोपडींत विश्रांती घेत बसले होते; किंवा कांहींजण झोपीं गेले होते. परंतु कांहीं कारणानिमित्त त्यांतील एकजण झोपडीच्या बाहेर आला, आणि पहातो तों टेंभुर्णीचें झाड माकडांनीं भरून गेलेलें! त्यानें सर्व लोकांना उठवून जागें केलें, आणि त्या सर्वांनी शस्त्रास्त्रें घेऊन त्या वृक्षाला वेढा दिला. वानरगणाची पांचावर धारण बसली. ते गयावया करीत बोधिसत्त्वाला म्हणाले, "महाराज, आपली सल्ला आम्हीं मानिली असती तर या संकटांत सांपडलों नसतों. आम्हींच अशा कचाट्यांत सांपडलों असें नाहीं, पण आपणाला देखील आम्ही दुःखांत पाडलें आहे!"

बोधिसत्त्व म्हणाला, "आतां झालेल्या गोष्टीबद्दल खेद करण्यांत अर्थ नाहीं. तुम्ही धीर धरा. माझा भाचा सेनक मागें राहिला आहे. तो आम्हाला या संकटांतून मुक्त करील."

अनुक्रमणिका

बोधिसत्त्वानें धीर दिला नसता, तर ते माकड गर्भगळित होऊन खालीं पडले असते, व प्राणाला मुकले असते.

इकडे सेनक त्या गांवाबाहेर आपल्या जातभाईंची काय वाट होते हें पहात बसला होता. सर्व मर्कटसमुदायाला सशस्त्र मनुष्यांनीं वेढलेलें पाहून त्यानें मामानें शिकवलेली युक्ति अंमलांत आणली. झोंपडींत शिरून तेथें जळत असलेली आगीची कोलीत घेऊन त्यानें दोन चार झोंपड्या पेटवून दिल्या! आग जिकडे तिकडे फैलावत चालल्यामुळें गांवांतील बायकामुलांत एकच हाहाःकार उडाला. माकडांला घेरा घालून राहिलेले लोक आपलीं शस्त्रास्त्रें घेऊन आग लागली होती त्या दिशेनें ती विझवण्याला मदत करण्यासाठीं धावत सुटले, तेव्हां बोधिसत्व आपल्या समुदायासह तेथून कांहीं एक इजा न होतां पळून गेला. सर्व मर्कटगणानें त्याच्या दूरदर्शित्वाची फार तारीफ केली. बोधिसत्त्वानेंहि सेनकानें आपली आज्ञा पाळली म्हणून त्याचा योग्य गौरव केला.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

६४. जन्मभूमीचा फाजील अभिमान. (१७८)

(कच्छपजातक नं. १७८)

बोधिसत्त्व एकदां काशीराष्ट्रांत कुंभाराच्या कुलांत जन्मून थोर झाल्यावर मातीचीं भांडीं करून आपला निर्वाह करीत असे. त्याच्या गांवाजवळ एक मोठें सरोवर होतें. तें उथळ असल्यामुळें त्यांत उन्हाळ्यांत फार पाणी रहात नसे. पावसाळ्यांत नदीला पूर आल्यावर तें तुडुंब भरून जाई. परंतु पूर ओसरून गेल्यावर त्यांतलें पाणी हळु हळु कमी होत जाई व कधीं कधीं तें अगदीं ठणठणीत कोरडें पडत असे. पुराच्या वेळीं त्या सरोवरांत पुष्कळ मासे येत असत. परंतु ज्या वर्षी तें तळें कोरडें पडण्याचा संभव असे त्या वर्षी ते पूर ओसरण्याच्या आधींच नदीला जाऊन मिळत. एका वर्षी पाऊस थोडा पडल्यामुळें सरोवरांत पाणी रहाण्याचा संभव दिसेना. तेव्हां सर्व मत्स्य कच्छप तेथून निघून नदीच्या प्रवाहांत गेले. परंतु एक कांसव तेथेंच राहिला. त्याचे मित्र त्याला म्हणाले, “बाबारे, सर्व मत्स्यजाती तलाव कोरडा पडण्याचें चिन्ह पाहून येथून निघून जात आहेत. मग तुझा एकट्याचा रहाण्याचा हट्ट कां?”

तो म्हणाला, “तुम्हाला तुमच्या जन्मभूमीची मुळींच काळजी नाहीं. उगाच कुशंका मनामध्यें आणून आपल्या जन्मभूमीचा त्याग करण्याला तुम्हाला लाज वाटत नाहीं. मी माझ्या जन्मभूमीची सेवा करीत येथेंच रहाण्याचा निश्चय केला आहे.”

त्याचे मित्र आणि आप्तइष्ट त्याचें मन वळवूं शकले नाहींत. ते त्याला एकट्यालाच तेथें सोडून चालते झाले. दूरदर्शी माशांनीं भविष्य केल्याप्रमाणें त्या वर्षी त्या तळ्यांतील पाणी पार आटून गेलें! बोधिसत्त्व त्याच तळ्यांतील चिखल नेऊन भांडीं करीत असे. कांसवाला पाणी न मिळाल्यामुळें तो चिखलांत रुतून राहिला. बोधिसत्त्व चिखल उकरीत असतां कुदळीचा धक्का लागून त्याचें कवच फुटलें, आणि तो वर येऊन तळमळत पडला. बोधिसत्त्वाला त्याची ही दीनदशा पाहून अत्यंत कींव आली आणि तो म्हणाला, “बा, कांसवा तुझा मी मोठा अपराध केला आहे. तू चिखलांत आहेस, हें न जाणतां त्याच्यावर मी घाव घातला आणि तुझें कवच फोडून टाकलें याबद्दल तूं मला क्षमा कर.”

कासव ह्मणाला, “बा कुंभारा, तुझा यांत कांहींच अपराध नाहीं. येवींतेवीं भक्ष्य न मिळाल्यामुळें मी या चिखलांत प्राणाला मुकलोंच असतों. तूं माझें मरण जवळ आणलेंस येवढेंच काय तें. आपल्या जन्मभूमीचा फाजील अभिमान धरून जे तिला चिकटून बसतात त्यांची हीच गत होते! माझ्या या विपत्तीपासून लोकांनीं शिकण्यासारखा धडा म्हटला ह्मणजे जेथें आपलें पोट भरून सुखानें वास करतां येईल तीच आपली खरी जन्मभूमी समजली पाहिजे. उगाच फाजील अभिमान धरून जातस्थलीं मरून जाणें यांत मुळींच पुरुषार्थ नाहीं.”

हे उद्गार काढून कासवानें तेथेंच प्राण सोडला. बोधिसत्त्वानें घरीं येऊन ती गोष्ट आपल्या ज्ञातिबांधवांस सांगितली

——***——

अनुक्रमणिका

६५. खरें बंधुप्रेम. (१७९)

(असदिसजातक नं. १७९)

वाराणसीच्या राजाला दोन पुत्र होते. थोरल्याचें नांव असदृशकमार, आणि धाकट्याचें नांव ब्रह्मदत्तकुमार असें होते. त्यांत असदृशकुमारहा आमचा बोधिसत्त्व होता. वयाच्या १६ व्या वर्षी त्यानें तक्षशिलेला जाऊन एका प्रसिद्ध आचार्याच्या हाताखालीं तीन वेदांचें आणि अठरा शास्त्रांचें अध्ययन केलें आणि तो परत वाराणसीला आला. त्याचा पिता मरतेवेळीं असदृशकुमाराला राज्य देऊन ब्रह्मदत्ताला युवराज करावें असें प्रधानमंडळाला सांगून मरण पावला. त्याचें उत्तरकार्य आटपल्यावर प्रधानमंडळानें बोधिसत्त्वाला राज्याभिषेक करण्याची सर्व व्यवस्था केली. परंतु बोधिसत्त्व म्हणाला, "मला राज्यकारभाराचा भार नको आहे. शास्त्राध्ययन आणि धनुर्विद्या यांतच मी आनंद मानीत असतों. माझा धाकटा भाऊ सर्व तऱ्हेनें राज्यभार वाहण्याला योग्य आहे आणि राजा होण्याची त्याला फार इच्छाहि आहे. तेव्हां त्यालाच राज्यपदावर बसवावें अशी मी सर्वांना विनंति करतों."

सर्व प्रधानमंडळानें आणि वाराणसीवासी प्रजाजनांनीं बोधिसत्त्वाला राज्यपद स्वीकारण्याविषयीं फार आग्रह केला. परंतु त्यांचा इलाज चालला नाहीं. शेवटीं बोधिसत्त्वाच्या इच्छेप्रमाणें ब्रह्मदत्तालाच त्यांनीं अभिषेक केला. ब्रह्मदत्त आपल्या वडील भावाच्या सल्ल्यानेंच सर्व राज्यकारभार पहात असे. पण हळु हळु राज्यपदाच्या धुंदींत तो सांपडला. हांजी हांजी करणाऱ्या लबाड लोकांची त्याच्या भोंवतीं मालिका जमली. आपल्या धन्याला संतुष्ट करण्यासाठीं ज्याच्या त्याच्या खोट्या नाट्या चुगल्या करण्याचा धंदा त्यांनीं सुरू केला. एकानें तर राजाला असें सांगितलें कीं, वडील भाऊ असदृशकुमार राजाला मारून राज्य बळकावण्याचा कट करीत आहे. झालें! ही गोष्ट निघाल्याबरोबर दुसरा म्हणाला, "मला या संबंधानें मागेंच बातमी लागली होती. परंतु म्हटलें उगाच महाराजांचें आपल्या वडील बंधूविषयीं मन कलुषित कां करा? म्हणून चुप राहिलों."

त्यावर तिसरा म्हणाला, "अहो पण तुमचें हें करणें अगदींच अयोग्य झालें. राजेसाहेब अन्नदाते, त्यांच्या जिवावर जर कोणी उठला—मग तो वडील भाऊ किंवा आजा असो—आम्हीं त्याच्या कटाची बातमी महाराजांना ताबडतोब दिली पाहिजे. पण तुम्ही इतके दिवस मौन धरून बसलां याला काय म्हणावें?"

अशा रीतीनें त्या लुच्च्या लोकांनीं राजाचें मन बिघडवून टाकलें आणि त्यामुळें एके दिवशीं राजानें आपल्या भावास पकडून कैद करण्याचा हुकूम दिला. बोधिसत्त्वाचा एक अत्यंत जिवलग मित्र प्रधानमंडळांत होता. त्यानें ही बातमी त्याला कळवली. अशा लबाड लोकांच्या हातीं लागण्यापेक्षां येथून पलायन केलेलें बरें, असा सुविचार करून बोधिसत्त्व रात्रींच्या रात्रीं वाराणसींतून पळून गेला. तो दूरच्या एका मांडलिक राजापाशीं जाऊन नोकरीस राहिला. त्या राजानें बोधिसत्त्वाचें धनुर्विद्या—कौशल्य पाहून त्याचा फार सन्मान केला, आणि त्याला सदोदित आपल्याजवळ ठेऊन घेतलें.

एके दिवशीं राजा उद्यानक्रीडेसाठीं आपल्या आम्रवनांत गेला होता. तेथें आंब्याच्या झाडाच्या अग्रशाखेवर एक आंबा पिकला होता. तो काठीनें किंवा दगडानें खालीं पाडणें शक्य नव्हतें. कां कीं, तें झाड फार उंच होतें आणि त्याच्या शाखांतून हा पिकलेला आंबा तेवढा दिसत होता. तेव्हां राजानें सर्व धनुर्ग्राहकांना बाण मारून तो आंबा खालीं पाडण्यास सांगितलें. परंतु त्यांतील एकजणदेखील नीट

शरसंधान करून आंबा पाडूं शकला नाहीं. नंतर बोधिसत्त्वाला हें काम सांगितलें. त्यानें अचूक बाण मारून आंबा आणि बाण दोन्ही वरच्यावर झेलून धरले. तें आश्चर्य पाहून राजानें बोधिसत्त्वाचा फार गौरव केला; आणि त्यामुळें त्याची कीर्ति देशों देशीं पसरली.

इकडे असदृशकुमार वाराणसी सोडून दुसरीकडे गेला असें जाणून आसपासचे सात लहान लहान राजे एकवटून वाराणसीवर चाल करून आले. वाराणसींत बोधिसत्त्वासारखा शूर शिपाई आणि दूरदर्शी मुत्सदी नाहीं. तेव्हां आपण क्षणार्धांत ब्रह्मदत्ताला शरण आणूं व त्याच्याकडून भरपूर खंडणी घेऊं असें त्यास वाटलें होतें. परंतु वाराणसीचा कोट फारच बळकट असल्यामुळें त्यांच्या मनोरथाप्रमाणें एकदम तें शहर जिंकतां आलें नाहीं. तेव्हां शहराला वेढा घालून ते तेथेंच राहिले. ब्रह्मदत्तावर हें मोठेंच संकट कोसळलें. आतां त्याला वडील बंधूची आठवण झाली. तो आपल्या हांजी हांजी करणाऱ्या नोकरांना म्हणाला, “तुम्ही खोटें नाटें सांगून माझ्या वडील बंधूला येथून घालवून दिलेंत. परंतु तो जर येथें असता तर आजआम्हांला या संकटापासून रक्षण करिता. आतां देखील आपण त्याजपाशीं एक गुप्त हेर पाठवूं. आमच्यावर आलेलें संकट त्याला समजलें, तर माझे अपराध पोटीं घालून आमच्या मदतीला तो धांवत आल्यावांचून रहाणार नाहीं. त्याचें बंधुप्रेम इतकें अलौकिक आहे कीं, माझ्यासारख्या कृतघ्न भावाच्या दुर्वर्तनानें तें मलिन होणार नाहीं.”

ब्रह्मदत्तानें गुप्त हेर पाठवून वाराणसीच्या वेढ्याचें वर्तमान कळवल्याबरोबर बोधिसत्त्व आपल्या धन्याचे कांहीं निवडक योद्धे बरोबर घेऊन वाराणसीला आला. मी असदृशकुमार आपल्या भावाला मदत करण्यासाठीं आलों आहें अशा तऱ्हेचा मजकूर लिहून तीं पत्रें बाणाला बांधून त्यानें शत्रुसेनेच्या मध्यभागीं पाडलीं. बोधिसत्त्वाचें नांव ऐकिल्याबरोबर त्या सात राजांची सेना फार गडबडून गेली; आणि जो तो जिकडे वाट सांपडेल तिकडे पळूं लागला! एका तासाच्या आंत वाराणसी शहराचा वेढा उठला व मोठ्या जयजयकारानें बोधिसत्त्वानें शहरांत प्रवेश केला. ब्रह्मदत्तानें पुढें येऊन त्याचे पाय घट्ट धरले, आणि केलेल्या अपराधाची क्षमा मागितली. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “तुझ्या दुष्ट सोबत्यांनी तुझें मन बिघडविलें असलें तथापि तूं माझा भाऊ आहेस; आणि म्हणून तुझ्यावरचें माझें प्रेम कधींहि कमी झालें नाहीं. लुच्च्या लोकांच्या तूं नादास लागलास हें पाहून मला मात्र फार वाईट वाटलें. पण आतां तुला वाईट संगतीचें फळ कोणतें हें पक्कें समजून चुकलें आहे, व ह्या पुढें तुझ्या हातून पुन्हां अयोग्य गोष्ट होणार नाहीं अशी मला आशा आहे.”

ब्रह्मदत्तानें आपल्या वडील भावाला मोठ्या आग्रहानें आपल्याजवळ ठेवून घेतलें, आणि तेव्हांपासून त्याच्या सदुपदेशाबाहेर आजन्म पाऊल टाकलें नाहीं.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

६६. लंगडा गुरू. (१८४)

(गिरिदंतजातक नं. १८४)

एका कालीं वाराणसींत साम नांवाचा राजा राज्य करीत होता. आणि आमचा बोधिसत्त्व त्याचा प्रधान होता. राजाला अत्यंत उत्तम घोडाआणून नजर करण्यांत आला. तो जरी उत्तम जातीचा होता तथापि चांगला शिकलेला नव्हता म्हणून गिरिदंत नांवाच्या अश्वशिक्षकाच्या स्वाधीन त्याला करण्यांत आलें. गिरिदंत लंगडा होता, तो घोड्याचा लगाम धरून पुढें चालला असतां लंगडत लंगडत चालत असे. कांही दिवसांनीं घोडाहि लंगडूं लागला. घोड्याच्या पायाला रोग झाला असावा असें वाटून सर्व अश्ववैद्यांला बोलावून परीक्षा करविली. पण चिकित्सेअंती घोड्याला कोणताच रोग नाही असें ठरलें. तेव्हां राजा मोठ्या काळजींत पडला. इतका चांगला घोडा आपणांस मिळाला असून तो थोडक्यांच दिवसांत लंगडा होऊन बसावा याबद्दल राजाला फार वाईट वाटलें. तें पाहून बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, आपण काळजी करूं नका. मी या संबंधानें नीट विचार करून घोड्याच्या रोगाचें कारण शोधून काढतों."

त्या दिवसापासून बोधिसत्त्वानें घोड्याच्या हालचालींवर बारीक नजर ठेविली. गिरिदंत जेव्हां लगाम हातांत धरून पुढें जाऊं लागला, तेव्हां त्याच्या मागोमाग घोडादेखील त्याच्यासारखा लंगडत चालूं लागला. तें पाहिल्याबरोबर बोधिसत्त्वाच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला. तो राजाजवळ जाऊन म्हणाला, "महाराज घोड्याला कोणताही रोग नाही. लंगडे गुरुजी आपणाला चालण्याचें कौशल्य शिकवीत आहेत असें वाटून घोडाहि लंगडत आहे. दुसरा एखादा सर्व अवयवसंपन्न शिक्षक मिळाला असतां हा घोडा लंगडण्याची दुष्ट खोड सोडून देऊन नीट चालूं लागेल."

राजानें बोधिसत्त्वाच्या सल्ल्याप्रमाणें दुसरा शिक्षक ठेविला. तो जातिवंत घोडा नवीन शिक्षकाची चाल पाहून आपणहि नीट चालूं लागला.

——***——

अनुक्रमणिका

६७. सहवासाचें फळ. (१८६)

(दधिवाहन जातक नं. १८६)

एकदां वाराणसींत दधिवाहन नांवाचा राजा राज्य करीत होता; आणि आमचा बोधिसत्त्व त्याचा अमात्य होता. एके दिवशीं मगरांना दूर काढण्यासाठीं गंगेंत जाळीं सोडून त्यांच्या आंत दधिवाहन राजा जलक्रीडा करीत असतां हिमालयावरून एक सर्वोत्कृष्ट आंब्याचें फळ वहात येऊनजाळ्यास अडकलें. राजपुरुषांनीं तें फळ काढून घेऊन राजाला अर्पण केलें. राजाला तें फळ इतकें आवडलें कीं, देवलोकींचा अमृतरस त्यापुढें तुच्छ असावा असें त्याला वाटलें. त्यानें त्या आंब्याची कोय मोठ्या समारंभानें आपल्या उद्यानांत लावली आणि दुधाच्या पाण्यानें तिला वाढविली. कांहीं दिवसांनीं आंब्याचें झाड फोफावून तीन वर्षांच्या आंत त्याला फळें येऊं लागलीं. बीजाप्रमाणेंच तीं फळेंहि अत्यंत मधुर होतीं. राजानें त्या झाडाचा फारच सत्कार चालविला. त्याला साखरेचें खत घालीत असत, आणि दुधानें शिंपीत असत, भोंवतालचें कुंपण मखमालीचें होतें, व त्या भोंवती रोज अत्तराचे दिवे जाळण्यांत येत असत.

दधिवाहन फार मत्सरी होता. आपल्या आंब्यासारखे आंबे दुसऱ्या राजाच्या उद्यानांत पैदा होऊं नयेत यासाठीं तो फार खबरदारी घेत असे. भेटीसाठीं आंबे पाठवतांना एका विषारी काट्यानें कोयीला भोंक पाडून पाठवीत असे. राजे लोक आंब्याचा आस्वाद घेऊन फार संतुष्ट होत आणि कोय पेरून आंब्याचें झाड उगवण्याची वाट पहात. परंतु त्यांची आशा कधींहि सफळ झाली नाहीं. एका राजाला दधिवाहन मत्सरामुळें आंब्याच्या कोयीला भोकें पाडून पाठवतो ही गोष्ट समजली तेव्हां आपल्या हुषार माळ्याला बोलावून आणून तो म्हणाला, “दधिवाहनाला आपल्या आंब्याची फार घमेंड आहे. तूं तेथें जाऊन त्याचा तो आंबा बिघडून जाईल अशी युक्ती करशील काय?”

माळी म्हणाला, “महाराज, आपली आज्ञा असेल तर दोन चार वर्षांचे आंत दधिवाहन राजाचा आंबा बिघडेल असा उपाय मला करतां येईल. पण येथून मला चार वर्षांची रजा मिळाली पाहिजे.”

त्या राजानें माळ्याला मोठ्या आनंदानें रजा दिली. वाराणसीला येऊन दधिवाहनाजवळ तो नोकरीस राहिला. भलत्याच वेळीं फुलें फुलवून दाखवून आणि भलत्याच ऋतूंत झाडांना फळें येतील असे उपाय करून दधिवाहनाला त्यानें प्रसन्न करून घेतलें. तेव्हां दधिवाहनानें जुन्या माळ्याला काढून टाकून मुख्य उद्यानाची सर्व व्यवस्था या नवीन माळ्याच्या हातांत दिली. त्यानें हळु हळु त्या सरस आंब्याच्या आजुबाजूला निंबाचीं आणि दुसरीं कडू जातीचीं झाडें लावून दिलीं आणि त्यांचीचांगली जोपासना केली. दोन चार वर्षांत तीं झाडें भराभर वाढलीं आणि त्यामुळें आंब्याचें फळ कडू झालें. तें पाहून बागवान तेथून पळून गेला. एके दिवशीं दधिवाहन राजा आपल्या अमात्यांसह उद्यानांत इकडे तिकडे फिरत असतां आंब्याच्या झाडाजवळ आला; आणि आपल्या लोकांकडून एक पिकलेला आंबा त्यानें झाडावरून काढून घेतला. पण तोंडांत घातल्याबरोबर तो त्याला इतका कडूं लागला कीं, त्याचा रस त्यानें तेव्हांच थुंकून टाकला, आणि तो बोधिसत्त्वाला म्हणाला, “मित्रा या आंब्याचें असे परिवर्तन कां झालें? साखरेचें खत, दुधानें शिपणें, गंधाच्या दिव्याची पूजा इत्यादि सर्व उपचार चालूं असतां आंब्याचें फळ निंबाच्या पाल्यासारखें कडू कां व्हावें?”

बोधिसत्त्वानें निरीक्षण करून पाहिलें; आणि तो राजाला म्हणाला, “[मूळ गाथा–

अनुक्रमणिका

पुचिमंदपरिवारो अंबो ते दधिवाहन।
मूलं मूलेन संसठ्ठं साखा साखा निसेवरे।
असतं सन्निवासेन तेनम्बो कटुकप्फलो॥] महाराज या आंब्याच्या झाडाला निंबाच्या आणि दुसऱ्या जातीच्या झाडांनीं वेढलें आहे हें तुम्ही पहातच आहां. त्यांच्या शाखा या झाडाच्या शाखेंत मिसळल्या आहेत, त्यांचीं मुळें याच्या मुळाशीं संबद्ध झालीं आहेत आणि त्यामुळें या आंब्याच्या झाडांतील मधुरता जाऊन त्याच्या आंगी कडुपणा आला आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वाईट सहवासाचें हें फळ आहे."

राजानें आजुबाजूचीं कडू जातीचीं झाडें तोडून टाकण्यास हुकूम केला. तीं तोडून त्याचीं मुळें खणून काढण्यांत आलीं. तेव्हां त्या आंब्याच्या झाडाला पूर्ववत् मधुर फळें येऊं लागलीं.

——***——

अनुक्रमणिका

६८. मूर्खाला मौन शोभतें. (१८९)

(सीहचम्मजातक नं. १८९)

एकदां बोधिसत्त्व एका गांवांत शेतकरी होऊन रहात असे. त्या समयीं एक फेरीवाला एका गाढवावर आपलें सामान घालून दारोदारीत्या सामानाची विक्री करून आपला निर्वाह करीत असे. गाढवाला चारा वगैरे देण्यासाठीं पैसे खर्च होऊं नयेत म्हणून त्यानें एक युक्ती योजिली होती. कोठून तरी एक सिंहाचें चामडें पैदा करून त्यानें तो आपल्या गाढवाला आच्छादित असे आणि लोकांच्या शेतांतून सोडून देत असे. गाढव यथेच्छ खाऊन परत आपल्या धन्याजवळ येत असे. हा प्रकार पुष्कळ दिवस चालला होता. एके दिवशीं तो फेरीवाला त्या गाढवाला घेऊन बोधिसत्त्व रहात होता त्या गांवीं आला. गांवाच्या वेशीजवळ गाढवावरील सामान उतरून घेऊन सिंहाच्या चामड्यानें झांकून त्याला त्यानें एका जवाच्या शेतांत सोडून दिलें; आणि तो आपल्या जेवणाच्या तयारीस लागला. इकडे त्या शेताचा राखणदार सिंह आला असें वाटून घाबरून गेला आणि धांवत जाऊन इतर शेतकऱ्यांना त्यानें ही खबर दिली. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “आपण शेतांत जाऊन सिंह कसा असतो तें तरी पाहूं. घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. दूर अंतरावरून वाद्यें शंख वगैरे वाजवल्यावर तो पळून जाईल. कदाचित् आपल्यावर चाल करून आलाच तर आपण दांडक्यांनीं त्याला बडवून काढूं.”

बोधिसत्त्वाला पुढारी करून सर्व गांवकरी त्या शेताजवळ गेले आणि वाद्यें वाजवून, त्यांनीं एकच घोष केला, व मोठमोठ्यानें आरोळ्या ठोकल्या. तो गाढव हा घोष ऐकून फार घाबरला, आणि जातिस्वभावाला अनुसरून ओरडूं लागला. तेव्हां बोधिसत्त्व जमलेल्या लोकांना म्हणाला, “अहो ही सिंहाची किंवा व्याघ्राची आरोळी नव्हे. सिंहाच्या कातड्याखालीं हा हलकट गाढव ओरडत आहे.”

तेव्हां त्या शेतकऱ्यांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याचें तें कातडें काढून घेतलें व त्याला बेदम मार दिला. तो मरणोन्मुख होऊन तेथेंच पडला. पुष्कळ वेळपर्यंत गाढवाची वाट पाहून त्याचा मालक त्याच्या शोधार्थ गेला. तेव्हां त्याला हा गाढव मरण्याच्या वाटेला लागलेला आढळला. ही त्याची दशा पाहून फेरीवाला म्हणाला, “बा गाढवा, या सिंहाच्या चामड्याखालीं पुष्कळ दिवस तूं लोकांचीं शेतें खाल्लीं असतीस; परंतु एका ओरडण्यानें तूं हें आपणावर मरण ओढवून घेतलेंस!”

फेरीवाल्याचें हें भाषण संपतें न संपतें तों गाढवानें प्राण सोडला.

——❋❋❋——

अनुक्रमणिका

६९. साधूच्या सहवासाचें फळ. (१९०)

(सीलानिससंजातक नं. १९०)

काश्यपबुद्धाच्या वेळीं एक श्रद्धावान् उपासक वाराणसींत रहात होता. तो कांहीं कामानिमित्त जहाजांतून परदेशीं जाण्यास निघाला. त्याच जहाजांतून एक न्हावीहि प्रवासास जाणार होता. त्याची बायको या उपासकाला म्हणाली, “महाराज, माझा पती आपल्याच जहाजांतून जात आहे. त्याची आपण वाटेंत काळजी घ्या.”

उपासकानें आपणाकडून होईल तेवढी मदत करीन असें वचन दिलें. आणि ते दोघे जहाजावर चढले. सात दिवसपर्यंत जहाज चांगलें चाललें होतें. परंतु आठव्या दिवशीं भयंकर तुफान होऊन त्याचे तुकडे झाले. उपासक आणि न्हावी एका फळ्याच्या आश्रयानें तरंगत जाऊन एका लहानशा बेटाच्या किनाऱ्यावर पडले. त्या बेटावर फारशी फळफळावळें नव्हतीं. तथापि उपासकानें जीं काहीं कंदमुळें आणि फळें मिळण्यासारखीं होतीं तीं खाऊन आपली उपजीविका चालविली पण न्हाव्याला असलें नीरस जेवण आवडेना. तो पक्ष्याला मारून खाऊं लागला. पक्ष्याचें मांस आगीवर भाजून पाहिल्यानें तें खाण्याविषयीं तो उपासकाला आग्रह करीत असे. परंतु उपासकानें ते कधींहि खाल्लें नाहीं. आपणाला जें कांहीं मिळालें आहे तेवढें पुरें आहे असें म्हणून पक्ष्याचें मांस खाणें तो नाकारीत असे. त्याची अचल श्रद्धा पाहून त्या बेटावर रहाणाऱ्या एक नागराजाला कींव आली, आणि तो त्याला म्हणाला “हे उपासका, तुझ्यासाठीं मी माझ्या देहाची होडी बनवतो. तींत बसन तूं तुला ज्या स्थळीं जावयाचें असेल त्या स्थळीं जा.”

उपासकानें नागराजाचे फार आभार मानले, आणि त्यानें निर्माण केलेल्या होडींत बसून तो न्हाव्याला म्हणाला, “बाबारे, तुला जर मजबरोबर यावयाचें असेल तर चल लवकर ये.”

तेव्हां नागराजा म्हणाला, “या न्हाव्याला या होडींत घेतां येत नाहीं. तो मोठा दुष्ट आहे. त्याच्यासाठीं ही होडी मी निर्माण केली नाहीं.”

उपासक म्हणाला, “तो जरी पापकर्मी आहे तरी तो माझ्याबरोबर आलेला आहे; आणि मी जे कांहीं पुण्य केलें असेल त्याचा वाटा मी त्याला देत आहे.”

न्हावी म्हणाला, “या तुझ्या देणगीचें मी अभिनंदन करतों. आजपर्यंत पुण्याचा मार्ग मी स्वीकारला नाहीं. परंतु तुझी संगति हेंच काय तें पुण्य माझ्या पदरीं आहे; आणि तुझ्या पुण्याचा वाटेकरी करून तूं मला फार ऋणी केलें आहेस.”

नागराजानें त्या न्हाव्यालाहि त्या होडींत येऊं दिलें. तेव्हां समुद्राचें रक्षण करणाऱ्या देवतेनें होडी चालवण्याचें काम आपल्या हातीं घेतलें. त्या बेटावर सांपडणारीं अमोलिक रत्नें उपासकानें आपल्याबरोबर आणलीं. त्या दोघांना सुरक्षितपणें वाराणसीला आणून सोडल्यावर देवता म्हणाली, “श्रद्धा, शील, त्याग इत्यादि गुणांचें हें फळ पहा! या उपासकाच्या आंगीं हे गुण असल्यामुळें नागराजा स्वतः होडी होऊन त्याला घेऊन येथवर आला. मनुष्यानें अशा सत्पुरुषाचाच सहवास करावा. या न्हाव्यानें जर या उपासकाची कास धरली नसती तर समुद्रांतच त्याचा नाश झाला असता!”

अनुक्रमणिका

असें बोलून ती देवता आणि नागराजा तेथून निघून स्वस्थळीं गेलीं. उपासकानें आपण आणलेल्या धनाचे दोन विभाग करून त्यांतील एक न्हाव्याला दिला. साधूच्या संगतीपासून मिळालेला लाभ न्हाव्याला आजन्म पुरला.

——***——

अनुक्रमणिका

७०. पतिव्रता स्त्रीचें तेज. (१९४)

(मणिचोरजातक नं. १९४)

बोधिसत्व काशीराष्ट्रांतील वाराणसी नगराच्या जवळ एका गांवीं जन्मला होता. तो वयांत आल्यावर वाराणसींतील एका अत्यंत सुस्वरूप स्त्रीबरोबर त्याचें लग्न झालें. तिचें नांव सुजाता असें होतें. सुजाता आपल्या पतीच्या आणि सासूसासऱ्यांच्या सेवेत फार दक्ष असे. तिचा उद्योगी आणि मायाळू स्वभाव पाहून बोधिसत्त्व तिच्यावर जीवापाड प्रेम करीत असे. कांहींवर्षे सासुरवास केल्यावर सुजातेला आपल्या आईबांपास भेटण्याची इच्छा झाली. ती बोधिसत्त्वाला म्हणाली, "स्वामी, मला माझ्या आईबापांस आणि नातलगांस पहावें असें वाटतें. आपण जर माझ्याबरोबर याल तर कांहीं दिवस माझ्या वडिलांच्या घरीं राहून परत येऊं."

शेताभाताचें विशेष काम नव्हतें तेव्हां बोधिसत्त्वानें सुजातेला घेऊन चार दिवसांसाठीं सासरीं जाऊन रहाण्याचा बेत केला. त्याच्या घरीं बैलाचा एक टांगा होता. त्यांत सुजातेला बसवून तो वाराणसीच्या नगरद्वारापाशीं आला. तेथें स्नान वगैरे करून त्यानें आणि सुजातेनें जेवण केलें, आणि कपडे बदलून शहरांत प्रवेश केला. त्याच वेळीं वाराणसीला ब्रह्मदत्त राजाची स्वारी नगर प्रदक्षिणेला निघाली होती. राजाला मान देण्यासाठी सुजाता यानांतून खालीं उतरून पायीं चालू लागली. तिला पाहून राजा अत्यंत मोहित झाला आणि तिच्यासंबंधानें चौकशीं करण्यास त्यानें आपले दूत पाठविले. त्या कालीं कोणत्याहि राजाला विवाहित स्त्रीला तिचा पति जिवंत असेपर्यंत जनानखान्यांत नेण्याचा अधिकार नव्हता. राजानें जर या नियमाविरूद्ध वर्तन केलें असतें तर त्याचा ताबडतोब वध करण्यांत आला असता. राजदूतांनीं ती स्त्री विवाहित आह आणि बैलाचा टांगा हांकणारा तिचा पति आहे, हें वर्तमान जेव्हां राजाला कळविलें तेव्हां त्याला अशी युक्ती सुचली कीं, कोणत्याहि निमित्तानें तिच्या नवऱ्याला फाशीं द्यावें आणि मग तिला अंतःपुरांत आणून ठेवावें. आपल्या एका जिव्हाळ्याच्या हुजऱ्याला बोलावून आणून तो म्हणाला "तूं हा माझा चूडामणि नेऊन त्या माणसाच्या टांग्यांत दडवून ठेव."

त्या हुजऱ्यानें धन्याची आज्ञा ताबडतोब अमलांत आणली. तेव्हां राजानें आपला चूडामणि हरवल्याचें मिष करून सगळीं नाकीं बंद करण्याचा हुकूम केला; आणि रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची झडती घेण्यास लावली. नंतर एका हुजऱ्याला पाठवून बोधिसत्त्वाच्या टांग्याचीहि झडती घेण्यांत आली. तेथें चूडामणि सांपडल्यामुळें बोधिसत्त्वाला पकडून राजासमोर उभें करण्यांत आलें. राजानें याचा याचक्षणीं वध करा, असा हुकूम फर्माविला. मारेकरी बोधिसत्त्वाला घेऊन वधस्थानीं जाऊं लागले. तेव्हां सुजातेनें अत्यंत आक्रोश केला. ती म्हणाली, "या पृथ्वीतलावर सत्याचें रक्षण करणाऱ्या कोणी देवता राहिल्या नसाव्या. नाहींतर हा धडधडीत अन्याय घडत असतां, त्यांनीं मौन व्रत धरलें नसतें. आम्हीं इंद्रादिकाच्या सत्याचरणाच्या पुष्कळ गोष्टी ऐकत आलों आहों; परंतु एकतर या गोष्टींत मुळींच तथ्य नसावें अथवा अशा देवताच नष्टप्राय झाल्या असाव्या."

तिच्या नानातऱ्हेनें चाललेल्या विलापानें आणि पातिव्रत्याच्या तेजानें इंद्राचें सिंहासन गरम झालें. इंद्राला याचें कारण काय हें एकाएकीं समजलें नाहीं. परंतु विचाराअंती सुजाता संकटांत पडली असून तिच्या पातिव्रत्याचा भंग होऊं पहात आहे ही गोष्ट त्याला समजून आली, आणि तो एकदम त्या ठिकाणीं आला. त्यावेळीं मारेकऱ्यांनीं बोधिसत्त्वाला लाकडाच्या ओंड्यावर शिर ठेऊन उताणें पाडलें आणि त्यावर

अनुक्रमणिका

कुऱ्हाडीचा प्रहार करण्याच्या बेतांत ते होते. इतक्यांत इंद्रानें राजाला राजवाड्यांतून उचलून आणून त्याचे हातपाय बांधून त्या ठिकाणीं उताणें पाडलें, आणि बोधिसत्त्वाला राजवेष देऊन राजवाड्यांत नेऊन ठेविलें. ही अदलाबदल इतक्या त्वरेंने आणि अदृश्यपणें करण्यांत आली कीं, मारेकऱ्यानीं कुऱ्हाडीच्या घावानें धडावेगळें शिर केल्यावर तें राजाचें आहे असें त्यांस दिसून आलें. त्यांनीं एकच बोभाटा केला; तेव्हां नगरवासी लोकांचा तेथें मोठा जमाव जमला आणि पहातात तों खुद्द ब्रह्मदत्त राजाचेच दोन तुकडे झालेले त्यांना दिसले! पुढें ते सर्व लोक शहरांत गेले, आणि त्यांनीं ह वर्तमान अमात्य वगैरे बड्या अधिकारी लोकांना कळविलें. तेव्हां ते लोक राजांगणांत जमून आतां पुढें कोणाला राज्यपद द्यावें याचा खल करूं लागले. तें पाहून बोधिसत्त्वाला हातीं धरून इंद्र राजवाड्याच्या खिडकीच्या बाहेरील गच्चीवर आला, आणि त्या जमलेल्या बड्या अधिकाऱ्यांस म्हणाला, "लोकहो, मी इंद्र आहें; आणि माझ्या प्रभावानेंच तुमच्या अधार्मिक राजाचा वध झाला आहे. आतां हा मी तुम्हांला नवीन राजा देत आहें. हा आणि याची पत्नी सुजाता हीं दोघें अत्यंत सुशील आहेत. यांची तुम्ही आपल्या आईबापांप्रमाणें शुश्रूषा करा; आणि त्याचप्रमाणें हीं दोघें आपल्या मुलांप्रमाणेंसर्व प्रजेचें पालन करतील. पतिव्रता स्त्रियांला कोणत्याहि मनुष्याकडून ताप झाला—मग तो राजा असो वा साधारण मनुष्य असो—तर त्याचे घडे भरलेच असें समजा. पृथ्वीवरील राजाच्या शिरावर देवता आहेत हें त्यांनीं विसरतां कामा नये. आणि जर दुर्मदानें देवतांची पर्वा न करितां ते लोकांना त्रास देऊं लागले, तर मी स्वतः आपल्या हातानें त्यांची खोड मोडल्यावांचून रहाणार नाहीं."

असें भाषण करून इंद्र तेथेंच अंतर्धान पावला. अधिकारी लोकांनीं मोठ्या समारंभानें वधस्थानातून सुजातेला राजवाड्यांत आणलें आणि सुमुहूर्तावंर तिला आणि बोधिसत्त्वाला राज्यपद देऊन शहरांत मोठा उत्सव केला. आपला अधार्मिक राजा नाश पावला आणि त्याबरोबरच धार्मिक राजाचा लाभ झाला, हें पाहून सर्व प्रजा संतुष्ट झाली.

——***——

अनुक्रमणिका

७१. मैत्रीचा प्रभाव. (२०६)

(कुरुंगमिगजातक नं. २०६)

एकदां बोधिसत्त्व कुरुंगमृग होऊन एका अरण्यांत सरोवराच्या कांठीं रहात होता. तेथेंच एका वृक्षावर एका शतपत्र पक्षानें आपलें घरटें बांधलें होतें; आणि त्या सरोवरांत एक कांसव रहात होता. या तिघांची अत्यंत मैत्री जडली होती. एके दिवशीं एक पारधी त्या सरोवराच्या कांठीं हरणाला पकडण्यासाठीं जाळें पसरून घरीं गेला. रात्रींच्या पहिल्या प्रहरीं बोधिसत्त्व पाणी पिण्यासाठीं जात असतां त्या जाळ्यांत सांपडला; आणि आपण जाळ्यांत सांपडलों हें आपल्या मित्रांस कळविण्यासाठीं तो मोठ्यानें ओरडला. तेव्हां सरोवरांतून कांसव वर आला, व शतपत्र पक्षी आपल्या घरट्यांतून खालीं उतरला. बोधिसत्त्वाची ही दीनदशा पाहून शतपत्र कांसवाला म्हणाला, "पहांट होण्यापूर्वीं जर आमच्या मित्राला या पाशांतून मुक्त केलें नाहीं तर तो पारध्याच्या तावडींत सांपडून प्राणास मुकेल. आतां तूं आपल्या दातांनीं याचे पाश तोडण्यास आरंभ कर, आणि हें काम लवकर आटप."

कांसव म्हणाला, परंतु माझे दांत कांहीं बळकट नाहींत. माझ्या गतीप्रमाणेंच पाश तोडण्याचें कामहि मंदपणें चालेल, आणि इतक्यांत पारधी आला तर माझे सर्व श्रम वांया जातील."

शतपत्र म्हणाला, "पारधी लवकर येईल याबद्दल तूं काळजी करूं नकोस तो अरुणोदयापूर्वीं येणार नाहीं. याबद्दल मी हमी घेतों; आणि त्याला जेवढा उशीर लावतां येईल तेवढा लावण्याचा मी प्रयत्न करतों. पण तूं हे पाश तोडण्याचें काम जारींनें चालव."

कांसवानें एकामागून एक पाश तोडण्यास सुरुवात केली. शतपत्र पारध्याच्या दारांत जाऊन त्याची वाट पहात बसला. पहांट होण्यापूर्वीं पारधी हातांत मोठी सुरी घेऊन तलावाच्या कांठीं जाण्यास निघाला. इतक्यांत शतपत्रानें मोठ्यानें शब्द काढून त्याच्या कपाळावर जोरानें चंचुप्रहार केला. बिचारा पारधी आपणाला मोठा अपशकुन झाला असें वाटून पुनः घरांत शिरून निजला, आणि मनांतल्या मनांत म्हणाला, "आज या अमंगल पक्ष्यानें माझ्यावर टोंच मारून मला अपशकुन केला आहे त्यामुळें शिकार नीट साधेल किंवा नाहीं याची मला काळजी वाटते; तथापि थोड्या वेळानें मागल्या दरवाजांतून निघून जाऊन अपशकुन न होईल असें केलें पाहिजे."

असा विचार करीत तो झोंपी गेला. पुनः अरुणोदयानंतर उठून मागल्या दरवाज्यांतून जाण्याच्या बेतांत होता. पण तेंथेंहि शतपत्रानें मोठ्यानें ओरडून त्याच्या कपाळावर चोंच मारली. पारधी संतापून म्हणाला, "या दुष्ट अमंगल पक्षानें तर माझा पिच्छाच पुरवला आहे! तथापि थोडा उजेड झाल्यावर हा जवळ आल्यास याची चांगली खोड मोडून मग शिकारीच्या शोधार्थ जाईन."

असें म्हणून कांहीं वेळ घरांत बसून नंतर तो सरोवराकडे जाण्यास निघाला. शतपत्रानें त्याच्या पूर्वींच येऊन कांसवाला त्याच्या आगमनाची खबर दिली. कांसवानें सर्व पाश तोडून टाकले होते. एकच काय तो बाकी होता. परंतु त्याला त्यामुळें इतका त्रास झाला कीं, त्याच्या तोंडावाटे रक्ताच्या धारा वहात होत्या आणि अंगांत त्राण न राहिल्यामुळें तो बेशुद्ध होऊन खालीं पडला. इतक्यांत पारधी जवळ येऊन ठेपला. बोधिसत्त्वानेंशिल्लक राहिलेला पाश आपल्या सामर्थ्यानें तोडून टाकून तेथून पलायन केलें. परंतु

बिचारा कांसव पारध्याच्या हातीं लागला. पारध्यानें त्याला आपल्या पिशवींत भरलें, आणि खिन्न मनानें तो घरीं जाण्यास निघाला. आपणाला मुक्त करण्यासाठीं कांसवानें आपला जीव धोक्यांत घातला हें पाहून बोधिसत्त्वाला फार वाईट वाटलें, आणि जीव गेला तरी बेहेत्तर, कांसवाला मुक्त केल्यावांचून राहणार नाहीं असा निश्चय करून तो मागें वळला, आणि पारध्याजवळ कांहीं अंतरावर पोहोंचल्यावर लंगडत लंगडत चालूं लागला. सर्व रात्र पाशांत गुरफटून पडल्यामुळें या हरिणाच्या पायाला इजा झाली असावी, व तो दुर्बल झाला असावा असें वाटून पारध्यानें आपली पिशवी एका झाडाच्या मेढक्याला अडकावून दिली, आणि सुरी घेऊन तो हरिणाच्या मागें लागला. त्याला लोभवून बोधिसत्त्वानें दूरवर नेलें, व दुसऱ्या एका आडवाटेनें पळ काढून मेढक्यावर अडकवलेली पिशवी हळुच खालीं पाडून कांसवाला मुक्त केलें. कांसव तात्काळ पाण्यांत शिरला. शतपत्र वृक्षावरून खालीं उतरला तेव्हां बोधिसत्त्व या दोघांस उद्देशून म्हणाला, "तुम्ही दोघांनीं मिळून मला जीवदान दिलें आहे. तेव्हां तुमचे माझ्यावर फार फार उपकार आहेत. परंतु आतां येथें रहाणें धोक्याचें आहे. पारध्याला ही जागा अवगत झाली आहे. आणि येथें राहिल्यास केव्हांना केव्हां त्याच्या जाळ्यांत सांपडण्याची मला भीति आहे. तेव्हां पारधी येथें पोंचण्यापूर्वींच मी घोर अरण्यांत जाऊन रहातों."

असें म्हणून बोधिसत्त्वानें तेथून पळ काढला. शतपत्रहि उडून गेला. कांसव तर पाण्यांत शिरलाच होता. पारधी धांवत येऊन पहातो, तो पिशवींतील कांसव देखील निघून गेला होता. तुटकें जाळें आणि रिकामी पिशवी घेऊन खालीं मान घालून अत्यंत खिन्न अंतःकरणानें तो आपल्या घरीं गेला. बोधिसत्त्व आणि त्याचे दोघे मित्र घोर अरण्यांतील दुसऱ्या एका तलावाच्या कांठीं वास करून राहिले. त्यांच्यावर आलेल्या या प्रसंगानें त्यांची मैत्री दृढतर झाली, आणि तिजमुळें त्यांचा सारा जन्म सुखानें गेला.

——***——

अनुक्रमणिका

७२. प्रसंगावधान. (२०८)

(सुंसुमारजातक नं. २०८)

बोधिसत्त्व एकदां वानरयोनींत जन्मून गंगेच्या कांठीं एका अरण्यांत रहात होता. गंगेंत एक मोठा मगर रहात असे. त्याची बायको बोधिसत्त्वाला पाहून आपल्या नवऱ्याला म्हणाली, “स्वामी, हा मोठा वानर येथें रहात असतो. यांचें शरीर इतकें सुंदर दिसतें तर त्याचें हृदय किती गोड असेल? मला तुम्ही त्याचें हृदय आणून द्या. हाच मला डोहाळा झाला आहे.”

मगर म्हणाला, “भद्रे, आम्हीं जलचर प्राणी आणि वानर पडला स्थलचर; या झाडावरून त्या झाडावर उड्या मारणारा. तेव्हां त्याचें हृदयमांस आम्हांला कसें मिळेल? तुझा हा डोहाळा तूं सोडून दे, आणि दुसऱ्या कोणत्या तरी पदार्थावर रुचि ठेव.”

मगरीण म्हणाली, “हें कांहीं चालावयाचें नाहीं. जर मला या वानराचें हृदय मिळालें नाहीं तर मी जीव देईन.”

निकरावर गोष्ट आली असें पाहून मगर म्हणाला, “जरा दम धर, थोडा प्रयत्न करून पाहतों. युक्तिप्रयुक्तीनें जर त्याला पकडतां आलें तर त्याचें हृदय तुला मिळेल.”

याप्रमाणें बायकोचें समाधान करून बोधिसत्त्व पाणी पिण्यास गंगेवर आला असतां त्याजजवळ येऊन मगर त्याला म्हणाला, “बा वानरश्रेष्ठा, तूं या फलरहित अरण्यांत कां वास करून आहेस? गंगेच्या पलीकडे आंबे, फणस, निंबे वगैरे फळें इतकीं विपुल आहेत कीं, तुला तेथें श्रमावांचून मोठ्या चैनीनें रहातां येईल.”

बोधिसत्त्व म्हणाला, “पण मगर महाराज तिकडे जावें कसें? गंगा पडली विस्तीर्ण आणि खोल, आणि माझ्यासारख्या स्थलचर प्राण्याला ती तरून जातां येणें शक्य नाहीं.”

मगर म्हणाला, “वा! माझ्यासारखा बळकट जलचर प्राणी तुमचा मित्र असतां तुम्ही हताश कां होता? माझ्या पाठीवर बसा म्हणजे मी तुम्हाला पांच चार पळांत परतीरीं नेऊन पोंचवतों.”

त्याच्या वचनावर विश्वास ठेऊन बोधिसत्त्व त्याच्या पाठीवर बसला. कांहीं अंतरावर गेल्यावर मगर त्याला पाण्यांत बुडवूं लागला. हें काय आहे असा बोधिसत्त्वानें प्रश्न केल्यावर तो म्हणाला, “रे मूर्खा, मीं केवळ परोपकारासाठीं माझ्या पाठीवर तुला वाहून नेत नाहीं. माझ्या स्त्रीला तुझें हृदयमांस खाण्याचे डोहाळे झाले असल्यामुळें तुला मी माझ्या बिळांत नेत आहें.”

आतां प्रसंगावधानावांचून दुसरी गती नाहीं असें जाणून बोधिसत्त्व मगराला म्हणाला, “रे मित्रा, तूं ही गोष्ट मला सांगितलींस हें फार चांगलें झालें नाहींतर माझा नाश होऊन तूं मात्र फसला असतास! शिवाय तुझ्यावर विश्वासघाताचा आरोप आला असता तो निराळाच! आमच्या पोटांत हृदय असतें, तर या

झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत असतांना तें छिन्नविच्छिन्न होऊन गेलें असतें. वानराच्या पोटांत हृदय असतें ही गोष्ट तुला खरी तरी वाटली कशी?"

मगर म्हणाला, "मग तुमचें हृदय तुम्ही कोठें ठेवीत असतां?" बोधिसत्त्वानें फळभारानें नष्ट झालेल्या एका औदुंबर वृक्षाकडे बोट दाखवून म्हणाला, "ती पहा या अरण्यांत असलेल्या वानरांचीं हृदयें त्या झाडांवर लोंबकळत आहेत."तीं औदुंबराचीं परिपक्व फळें पाहून मगराला वानराचें बोलणें खरें वाटलें, आणि तो म्हणाला, "जर मी तुला तीरावर नेलें तर यांतील एखादें हृदय मला देशील काय!"

बोधिसत्त्व म्हणाला. "यांत काय संशय? तुला वानराचें हृदय पाहिजे आहे हें मला आगाऊ समजलें असलें तर येथपर्यंत मला आणण्याची तसदीच तुला पडली नसती! एक सोडून दहा हृदयें तुला तेव्हां देऊन टाकलीं असतीं! आम्हाला त्याचा कांहीं उपयोग होत नसतो. उगाच शोभेंसाठीं आम्हीं तें ठेवीत असतों एवढेंच काय तें!"

मगरानें त्याला तीरावर नेऊन सोडल्यावर तो त्या औदुंबराच्या झाडावर चढून बसला आणि म्हणाला, "अरे मूर्ख मगरा प्राण्यांचीं हृदयें झाडावर लोंबतात यावर तूं श्रद्धा ठेविलीस कशी? तुझ्या देहाच्या प्रमाणानें डोक्यांत मेंदू नसल्यामुळें तुला सहज फसवतां आलें. आतां हीं औदुंबराची फळें घेऊन येथून चालता हो आणि पुनः गंगेच्या पलीकडीलचांगल्या फळांच्या गोष्टी मला सांगू नकोस, मला माझा औदुंबरच श्रष्ठ आहे. असें समज."

जुगारांत हजार कार्षापण घालवल्यासारखें दुःख होऊन मगर आंसवें गाळीत अधोमुखानें तेथून निघून गेला!

——***——

अनुक्रमणिका

७३. अकाल भाषणानें हानि. (२१५)

(कच्छपजातक नं. २१५)

एकदां बोधिसत्त्व वाराणसीराजाच्या अमात्याचें काम करीत असे. राजा जरा फाजील बडबड करणारा होता. संधि साधून त्याची ही खोड मोडण्याचा विचार बोधिसत्त्वाच्या मनांतून होता. परंतु अशी संधि सांपडेना.

हिमालयावरील दोन तरुण हंस एका सरोवरांत येऊन चारा खात असत. तेथें त्यांची व एका कांसवाची मैत्री जडली. एके दिवशीं कासव त्याला म्हणाला, "तुमचा हिमालय प्रदेश कसा काय असतो?"

हंस म्हणाले "हिमालयाची शोभा काय वर्णावी? तेथें सर्व कांहीं विपुल आहे शिवाय पारध्याचें आणि मासे मारणाऱ्या कोळ्याचें भय बाळगावयास नको. आम्हांला तेथें कमतरता आहे म्हणून आम्हीं तेथें येत नसतों. केवळ दूरचे देश पहावे याच हेतूनें प्रथमतः आम्हीं येथें आलों. आतां तुझी दोस्ती जडल्यामुळें तुला भेटण्यासाठीं आम्हीं वारंवार येत असतों."

कांसव म्हणाला, "तर मग मलाच घेऊन तुम्ही तिकडे जाना. मी मंदगति असल्यामुळें मला येथें एखादा कोळी पकडून नेईल अशी भीति वाटते. रात्रंदिवस साशंक वृत्तीनें काळ कंठावा लागतो, तेव्हां मला तेथें नेल्यास माझ्यावर फार उपकार होतील."

हंस म्हणाले, "आम्ही तुला सहज घेऊन जाऊं, परंतु तुला चोंचीनें पकडतां येणें शक्य नाहीं. म्हणून आम्हीं एक दांडकें दोन्ही टोंकाला धरतों, व त्याच्या मध्याला तूं दातानें धर. परंतु या कामीं तुला मोठी सावधगिरी ठेवावी लागेल. आकाशपथांतून वेगानें जात असतां तू जर कांहीबोललास, तर तोंडातून काठी सुटून खालीं पडशील आणि प्राणाला मुकशील."

कांसव म्हणाला, "माझाच नाश करून घेण्याएवढा मी मूर्ख नाहीं. पण तुम्ही मात्र अनुकंपा करून दांडकें निसटून न जाईल अशी खबरदारी घ्या."

हंसांनीं ही गोष्ट कबूल केल्यावर कांसव एका काठीस धरून राहिला व त्या काठीच्या दोन्ही टोंकाला धरून हंस त्याच्यासह आकाशांतून जाऊं लागले. कांसवाला आपणाला हंस वाहून नेतात याबद्दल थोडासा गर्व वाटला. इतक्यांत वाराणसींतील मुलें क्रीडांगणांत जमलीं असतां त्याला पाहून मोठ्यानें ओरडून म्हणालीं "पहा हो पहा! दोन सुंदर हंस या बेट्या ओबड धोबड कांसवाला घेऊन चालले आहेत!"

हें ऐकून कांसवाला फार संताप आला आणि तो म्हणाला, "काय बेटीं द्वाड पोरें"—

पण हें वाक्य संपतें न संपतें तों काठी तोंडांतून सुटल्यामुळें तो गच्चीवर आदळून छिन्नविछिन्न झाला. काय गडबड आहे हें पहाण्यासाठीं राजा बोधिसत्त्वाला आणि इतर अमात्यांला बरोबर घेऊन गच्चीवर गेला आणि घडलेला प्रकार पाहून बोधिसत्त्वाला म्हणाला, "भो पंडित, हंसाच्या तोंडांतून सुटून या कांसवाची अशी दुर्दशा कां व्हावी?"

अनुक्रमणिका

बोधिसत्व म्हणाला, “महाराज, आपणाला हंस वाहून नेतात याबद्दल कांसवाला गर्व झाला असावा, इतक्यांत क्रीडांगणांतील मुलांची ओरड त्याच्या कांनी गेली असावी. त्यांना उत्तर देण्यासाठीं वेळ काळ न पहातां तोंड उघडल्यामुळें काठी तोंडातून सुटून कांसवाची ही गत झाली असली पाहिजे! यापासून आम्हीं असा धडा शिकला पाहिजे कीं, भलत्याच वेळीं संभाषण करून आपला नाश करून घेऊं नये.”

बोधिसत्व आपणाला उद्देशून बोलत आहे असें जाणून राजा त्या दिवसापासून सावध झाला आणि त्यानें अवेळीं भाषण करून आपलें नुकसान करून घेतलें नाहीं.

——***——

अनुक्रमणिका

७४. शठाला महाशठ. (२१८)

(कूटवाणिजजातक नं. २१८)

एकदां एक ग्रामवासी व्यापारी कांहीं कारणानिमित्त परदेशीं जाण्यास निघाला. त्याच्या घरीं प्रपंच नव्हता म्हणून जातांना घरांत दुसऱ्या एकाला ठेवून आपला नांगर वगैरे सर्व शेतीचें सामान त्यानें वाराणशीनगरींत रहाणाऱ्या आपल्या एका मित्राच्या घरीं ठेवून दिले; आणि तो तेथूनच प्रवासाला गेला. बरेच दिवस गेल्यावर शहरांतील गृहस्थाला हा परत येणार नाहीं असें वाटून त्यानें तें सामान विकून टाकलें. परंतु कांहीं महिने लोटल्यावर प्रवासास गेलेला गृहस्थ परत आला, व तें सामान मागूं लागला. तेव्हां नगरवासी व्यापारी म्हणाला. "मित्रा, मला फार वाईट वाटतें. तुझें सर्व सामान उंदीरांनीं खाऊन टाकलें! त्याला मी काय करूं?"

ग्रामवासी मनुष्यानें त्याची ती लबाडी तात्काळ ओळखली आणि सभ्यपणाचा आव आणून तो म्हणाला, "हरकत नाहीं, नांगर वगैरे सामान उंदरांनीं खाल्लें तर त्याला तूं आणि मी काय करणार? घडलेली गोष्ट होऊन गेली. चल आपण लवकर स्नान करून जेवण करूं."

एक दोन दिवस त्याच्या घरीं राहून ग्रामवासी व्यापाऱ्यानें खाऊ वगैरे देऊन त्याच्या लहानग्या मुलाचें फार प्रेम संपादिलें, आणि एके दिवशीं त्याला खांद्यावर घेऊन तो नदीवर स्नान करण्यास गेला. परंतु तेथून त्याला परत न आणतां दुसऱ्या एका मित्राच्या घरीं ठेऊन तेथल्या मंडळींस त्यानें असें सांगितलें कीं, कृपा करून या मुलास कोणाच्या नजरेस न पडूं देतां घरांतच ठेवून घ्या आणि त्याचा चांगला संभाळ करा. त्याला एकटाच आलेला पाहून नगरवासी म्हणाला, "काय! आमच्या मुलाला कोठें ठेवून आलात? काय! नदीवर तर विसरला नाहींत ना?"

ग्रामवासी वेडेंवाकडें तोंड करून म्हणाला, "मित्रा, काय सांगूं मोठ्या दुःखाची गोष्ट घडून आली. मुलाला स्नान घालून पुसून तीरावर बसवलें, आणि मी स्नान करण्यासाठीं पाण्यांत उतरलों. इतक्यांत एक ससाणा येऊन तुझ्या मुलाला घेऊन गेला. आरंभीं आरंभीं नगरवासीव्यापाऱ्याला हा सर्व प्रकार थट्टेचा वाटला परंतु शेवटीं चिडीवर येऊन तो आपल्या ग्रामवासी मित्राला म्हणाला, "तूं अगदींच मूर्ख आहेस; मला फसवण्याचा तुझा हा बेत दिसतो. एवढ्या मोठ्या मुलाला ससाणा घेऊन जाईल ही गोष्ट मठ्ठ डोक्यांच्या माणसाला देखील संभवनीय वाटावयाची नाहीं."

शेवटीं प्रकरण हातघाईवर येऊन नगरवासी व्यापाऱ्यानें ग्रामवासीवर फिर्याद ठोकली. त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व वाराणसींत न्यायाधिशाचें काम करीत होता. त्यानें फिर्यादीचें म्हणणें ऐकून घेऊन प्रतिवादीस बोलावून आणलें, आणि तो म्हणाला, "याच्या मुलाला ससाण्यानें उचलून नेलें असें जें तूं म्हणालास तें खरें आहे काय?"

ग्रामवासी म्हणाला, "होय महाराज, तें खरें आहे. परंतु आपणास मी एक असा प्रश्न विचारितों कीं फाळासकट नांगर उंदीर खात असतात काय?"

अनुक्रमणिका

बोधिसत्वाला हें काय कोडें आहे हें समजेना. तो म्हणाला, “परंतु उलटे सुलटे प्रश्न करून न्यायाधिशाचा वेळ घेणें योग्य नाहीं. नांगराच्या फाळाचा आणि याच्या मुलाचा संबंध काय?”

ग्रामवासी म्हणाला, “महाराज, आपण रागावूं नका. याच्या घरीं मी माझीं शेतीचीं आऊतें ठेऊन देऊन प्रवासाला गेलों; तीं सर्व उंदीरांनीं खाल्लीं, असें याचें म्हणणें आहे. म्हणून मी आपणास हा प्रश्न विचारला.”बोधिसत्त्व नगरवासी व्यापाऱ्याला म्हणाला, “हा सांगतो ही गोष्ट खरी आहे काय?”

त्यानें ती गोष्ट कबूल केली. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “शाबास! ग्रामवासी लोक अडाणी असतात, असें आम्हीं ऐकतों. परंतु या गृहस्थानें तर नगरांतील अत्यंत धूर्त माणसावर ताण केली आहे! ठीक आहे! नांगराचा फाळ जर उंदीर खाऊं शकतात तर मुलाला ससाण्यानें कां नेऊं नये?” नगरवासी गृहस्थाकडे वळून तो म्हणाला, “बाबारे, तूं याचें सामान याला परत कर, तेव्हांच ससाण्यानें नेलेला तुझा मुलगा तुला परत मिळेल! नाहीं तर मला तुझा मुलगा परत देववितां येणार नाहीं.”

हा न्यायाधिशाचा निकाल ऐकून नगरवासी व्यापाऱ्यानें ग्रामवासी व्यापाऱ्याचें सर्व सामान पुनः विकत घेऊन त्याच्या स्वाधीन केलें. ग्रामवासी व्यापाऱ्यानें नगरवासी व्यापाऱ्याचा मुलगा त्याला आणून दिला.

——***——

अनुक्रमणिका

७५. मनुष्यांविषयीं वानराचें मत. (२१९)

(गरहितजातक नं. २१९)

आमचा बोधिसत्त्व एकदां वानरयोनींत जन्मला होता. एका व्याधानें त्याला आपल्या पाशांत पकडून नेऊन वाराणसीच्या राजाला नजर केलें. राजानें त्याला राजवाड्यांत ठेवलें. तो फार नम्रपणें वागत असे; कोणीं जरी चिडविण्याचा प्रयत्न केला तरी तो चिडत नसे. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे सर्व मर्कटचेष्टांपासून तो अलिप्त होता. राजानें त्याच्या या गुणावर प्रसन्न होऊन त्याला राजवाड्यांत मोकळें सोडलें. तथापि तो एखाद्या कोपऱ्यांत बसून राही. हें पाहून राजा त्या व्याधास बोलावून आणून म्हणाला "तूं आणलेल्या या वानरास राजवाड्यांत चैन पडत नाहीं. तो अतिशय सद्गुणी आहे, पण त्याला ही जागा तुरुंगाप्रमाणें वाटत असावी. तेव्हां जेथें याला पकडला होता त्या ठिकाणीं नेऊन सोड."

व्याधानें बोधिसत्त्वाला पूर्वी पकडलेल्या अरण्यांत नेऊन सोडलें. तेव्हां त्याला पाहून कळपांतील सर्व वानर गोळा झाले, व त्यांनीं त्याचें उत्तम स्वागत केलें. नंतर ते त्याला म्हणाले, "आपण या संकटांतून कसें पार पडला?"

बोधिसत्त्वानें घडलेली सर्व हकीगत सांगितल्यावर ते म्हणाले, "तुम्हांला मनुष्यलोकांत मिसळण्याची उत्तम संधि सांपडली. वाराणसी सारख्या सर्व सुधारणेंत पुढें असलेल्या शहरांत त्यांत देखील राजवाड्यांत–रहाण्याला तुम्हांला सांपडलें. तेव्हां तेथील रीत-रिवाजांची कांहीं माहिती सांगाल तर बरें होईल. आम्हांला त्यापासून फार मोठा ज्ञानलाभ होईल."

बोधिसत्त्व म्हणाला, "जर तुम्हांला ऐकण्याची इच्छा असेल तर मी सांगतों. बाकी सांगण्यासारखें कांहींच नाहीं."

त्या वानरगणानें बराच आग्रह केल्यानंतर बोधिसत्त्व एका दगडावर बसून आसपास बसलेल्या वानर समुदायाला म्हणाला, "गडे हो, वाराणसीची आपण फार कीर्ति ऐकत आहों. परंतु 'दुरून डोंगर साजरे' अशांतला प्रकार माझ्या अनुभवास आला. ज्याच्या त्याच्या तोंडून पैसा आणि धन याच्याच काय त्या गोष्टी वाराणसीमध्यें ऐकूं येतात. प्रत्येक मनुष्य आपल्या धनदौलतींत इतका गढून गेलेला असतो कीं दुसऱ्याच्या सुखाचीत्याला बिलकूल परवा नसते. आम्हाला जर एखादा फळसंपन्न वृक्ष आढळला तर आपल्या जातभाईंना घेऊन तेथे जातों आणि त्यांनाहि लाभलेल्या फळांचे वाटेकरी करतों. परंतु हा प्रकार मनुष्यलोकांत आढळून येत नाहीं. एखाद्याला जर उत्तम औषध माहीत असेल, तर लोकांस समजल्यानें त्याची किंमत कमी होईल या भीतीनें मरेपर्यंत तो तें आपल्या मुलालाही कळवीत नाहीं. एखाद्याला जर ठेवा सांपडला तर तो दुसऱ्याला त्याचा उपभोग घेऊं देत नाहीं. एवढेंच नाहीं तर, मेल्याबरोबर देखील साप होऊन त्या ठेव्यावर बसतो. अशी ही मनुष्यलोकांतील उलट चाल आहे. आणखी त्यांची गृहपद्धतीहि फारच चमत्कारिक आहे. एका घरांत दोन दोन माणसें राहतात. इतर माणसें तेथें राहिलीं तर तीं त्यांचीं चाकर नोकर होऊन राहतात! या मुख्य दोन माणसांपैकीं एकाला मिशा नसतात; त्याचे स्तन बरेच मोठे असतात; वेणी फणी करून सर्व देह नाना प्रकारच्या अलंकारांनीं त्यानें मंडित केलेला असतो; आणि त्याची वटवट सदोदित चालूं असते! चाकर नोकरांना त्याचा इतका त्रास असतो कीं, कांही पुसूं नये! या माणसाला मनुष्यलोकांत बायको असें म्हणतात!

[मूळगाथा—
हिरञ्ञं मे सुवण्णं मे एसा रत्तिंदिवं कथा।
दुम्मेघानं मनुस्सानं अरिधम्मं अपस्सतं॥
द्वे द्वे गहपतयो गेहे एको तत्थ अमस्सुको।
लंबत्थनो वेणिकतो अथो अंकितकण्णको।
कीतो धनेन बहुना सो तं वितुदते जनं]॥

वानरसमुदाय एवढें भाषण ऐकल्यावर विटून गेला आणि एकदम ओरडून म्हणाला, “महाराज आतां मनुष्यलोकीचें वर्णन पुरे करा! आम्हाला त्या माणसांच्या वर्तनापासून कांहीं एक बोध घेण्यासारखा नाहीं. आमची पोरेंबाळें अशा रीतीनें वागूं लागतील तर तीं स्वातंत्र्याला आणि परस्परांतील बंधुप्रेमाला मुकतील व आमच्या वानर जातीवर मोठा अनर्थ कोसळेल! असें म्हणून सर्व वानर बोधिसत्त्वासह अरण्यांत निघून गेले आणि त्या पाषाणपृष्ठावर बसून मनुष्याचें विलक्षण वर्तन आपल्या ऐकण्यांत आलें म्हणून त्या पाषाणाला त्यांनीं गर्ह्य—पाषाण असें नांव दिलें!

——***——

अनुक्रमणिका

७६. अधिकाऱ्याचे चार गुण. (२२०)

(धम्मद्धजजातक नं. २२०)

प्राचीन काळीं वाराणसी नगरींत यशपाणी नांवाचा राजा राज्य करीत असे. काळक नांवाचा त्याचा सेनापती होता, आणि आमचा बोधिसत्त्व त्याच्या पुरोहिताचें काम करीत असे. राजा धार्मिक होता; परंतु काळक सेनापती लांच घेऊन न्यायाचा भलताच निवाडा करीत असे. एके दिवशीं एका खटल्यांत काळकानें खोटा निकाल दिला. तेव्हां नुकसान झालेला मनुष्य रडत रडत रस्त्यांतून जाऊं लागला. वाटेंत त्याची आणि बोधिसत्त्वाची गांठ पडली. बोधिसत्त्वानें रडण्याचें कारण विचारल्यावर तो म्हणाला, "साक्षी पुरावा कांहीं एक न घेतां माझ्या शत्रूकडून सनापतीसाहेबांनीं लांच घेऊन माझ्या विरुद्ध निकाल दिला त्यामुळें माझें सर्वस्वी नुकसान झालें आहे. आणि शोक अनावर होऊन मी आसवें गाळीत चाललों आहे."

बोधिसत्व म्हणाला, "तुझा जो कांहीं साक्षी पुरावा असल तो घेऊन तूं आतांच न्यायाधिशाच्या कचेरींत ये, म्हणजे मी तुझ्या खटल्याची पुनःचौकशी करतों. त्याप्रमाणें बोधिसत्त्वानें उभयपक्षाला न्यायकचेरींत बोलावून आणून कायदेशीरपणें खटल्याची चौकशी करून योग्य निकाल दिला. बोधिसत्त्वाचा निकाल सभास्थानांतील लोकांना इतका मानवला कीं, त्यांनीं त्याच्या नांवाचा जयघोष करून त्याला धन्यवाद दिले. ही बातमी शहरांत सर्वतोमुखी झाली. दुसऱ्या दिवशीं बोधिसत्त्व राजदर्शनाला गेला असतां राजा म्हणाला, "बा पंडिता, काल तूं सभास्थानांत योग्य निवाडा दिला अशी बातमी सर्व ठिकाणीं पसरली आहे ती खरी आहे काय?" बोधिसत्त्वानें इत्थंभूत वर्तमान सांगितल्यावर राजा म्हणाला, "काळकासारख्या मोठ्या पदवीच्या माणसानें न्यायाचा चुराडा करावा ही गोष्ट आमच्या राज्याला मोठी लांछनास्पद आहे. यापुढें न्यायसभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून तूंच सर्व खटल्यांत निकाल देत जा. आजपासून काळकाला न्यायसभेंत जाण्याची मी मनाई करतों."

राजानें सांगितल्याप्रमाणें त्या दिवसापासून बोधिसत्त्व न्यायाधिशाचें काम करूं लागला. त्याला तें काम आवडत होतें असें नाहीं. परंतु राजाज्ञेवरून केवळ परोपकारासाठीं तो तें करीत असे; आणि आपल्या हांतून चूक घडूं नये याबद्दल तो फार काळजी घेत असे. अधिकाराची लालसा आणि द्रव्याचा लोभ नसल्यामुळें त्याच निकाल चोख असत, व त्यायोगें सर्व राष्ट्रांतील लोकांना तो अत्यंत पूज्य वाटूं लागला. परंतु त्याची उत्तरोत्तर वाढत चाललेली कीर्ति काळकाच्या डोळ्यांत सलूं लागली आणि त्याच्या नाशाच्या शोधार्थ तो आपली बुद्ध खर्च करूं लागला. एके दिवशीं राजापाशीं जाऊन तो घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला, "महाराज, पुरोहित तुमचा नाश करूं पहात आहे. सगळ्या राष्ट्रांतींल लोकांना वश करून घेण्याची त्यानें खटपट चालविली आहे. राजाला ती गोष्ट खरी वाटली नाहीं. पण राजाचा स्वभाव जरा संशयी होता, आणि हें वर्म काळकाला माहीत होतें. तो म्हणाला, "महाराज, जर आपला माझ्यावर विश्वास नसेल तर शहरांत फिरत असतां आपण त्याच्यावर नजर ठेवा ह्मणजे त्याला लोक कितपत वश आहेत हें तेव्हांच दिसून येईल.

राजाच्या मनांत संशयानें ठाणें घेतल्यामुळ बोधिसत्त्वाच्या हालचालींवर तो स्वतः नजर ठेवूं लागला. त्याला असें आढळून आलें कीं, सर्व लोक बोधिसत्त्वाची तारीफ करीत असून आपणापेक्षांहि त्याजविषयीं त्यांची विशेष पूज्यबुद्धि आहे. अर्थात् ही गोष्ट राजाला समजली नाहीं. आपणापेक्षां पुरोहिताचे देव्हारे जास्त माजणें त्याला अत्यंत अनिष्ट वाटलें. न जाणो लोक आपणावर अप्रसन्न होऊन आपणाला पदच्युत करतील, आणि पुरोहितालाच राज्यावर बसवतील! या शंकेनें त्याचें मन पीडित झालें. तो एकांतांत

काळकाला म्हणाला, "बा काळका, या पुरोहिताचा काटा माझ्या राज्यांतून काढून टाकला पाहिजे, याबद्दल मला शंका राहिली नाहीं. परंतु जर याचा मी एकदम वध केला तर सर्व राष्ट्र माझ्यावर उठेल. तेव्हां कोणत्या युक्तीनें याचा नाश करतां येईल हें मला सांग. खऱ्या राजनीतीचें मर्म तुला ठाऊक असल्यामुळें याप्रसंगीं तुझीच सल्ला मला फार उपयोगी पडेल."

काळक म्हणाला, "महाराज, हें काम अगदींच सोपें आहे. राजाला कोणत्याहि गृहस्थाला दंड करावयाचा असेल तर हजार कारणें शोधूनकाढतां येत असतात. आपण त्याला बोलावून आणून एका रात्रींत एक उत्तम बगीचा तयार करण्यास सांगा. हें काम करतां आलें नाहीं, तर देहान्त शासन करीन अशी धमकी दिली म्हणजे तो आपण होऊनच या राज्यांतून पळून जाईल."

राजाला ही त्याची युक्ती फार पसंत पडली. तो बोधिसत्त्वाला बोलावून आणून म्हणाला, "बा पंडिता, उद्यां सकाळीं एका उत्तम उद्यानांत क्रीडा करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां आजच्या आज सर्व फलपुष्पवृक्षानीं संपन्न असें एक उद्यान तयार कर."

ही राजाज्ञा ऐकून बोधिसत्व मोठ्या काळजींत पडला. घरीं जाऊन भोजन करून विचार करीत अंथरुणावर पडला असतां त्याच्या तेजानें शक्राचें आसन तप्त झालें. शक्र याचें कारण काय तें जाणून एकदम देवलोकांतून बोधिसत्त्वापाशीं आला आणि म्हणाला, "बा सत्पुरुषा तूं चिंतातुर होऊं नकोस. तुझ्या चिंतेचें कारण मला सांग ह्मणजे मी तें तात्काळ दूर करतों."

बोधिसत्त्वानें घडलेलें सर्व वर्तमान इंद्राला निवेदन केलें. इंद्रानें त्याचें समाधान करून त्याच रात्रीं वाराणसीजवळ एक दिव्य उद्यान निर्माण केलें. आणि आपण कोण आहे, हें बोधिसत्त्वाला सांगून तो अंतर्धान पावला. पहाटेस बोधिसत्त्वानें त्या उद्यानाची शोभा स्वतः पाहिली आणि राजसभेच्या प्रसंगीं तेथें जाऊन तो राजाला म्हणाला, "महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें उद्यान तयार आहे. तें पाहून आपणास आवडतें कीं नाहीं हें मला सांगा. राजाला ही गोष्ट विचित्र वाटली. परंतु स्वतः उद्यान पाहिल्यावर त्याचा संशय फिटला. पण बोधिसत्त्वाविषयीं मत्सराग्नि मात्र दुणावला. त्यांत काळकानेंहि आणखी तेल ओतलें. तो म्हणाला, "महाराज, जो माणूस एका रात्रींत नानाविध फल पुष्पांनीं भरलेंलें उद्यान रचूं शकतो तो आपलें राज्य घेण्यास उशीर लावील काय? तेव्हां याचें आतांच निर्मूलन केलेंच पाहिजे. याला एखादी देवता प्रसन्न असावी. तिच्या सहाय्यानें त्यानें हें उद्यान तयार केलें असावें. परंतु एक गोष्ट केली म्हणून देवता सर्वच करील असें नाहीं. कां कीं, एक वर दिल्यानें पुष्कळ वर्षांचें तप समाप्त झालें, असें देवता समजत असतात; आणि भक्तानें दुसरा वर मागितला तर उलट रागावून त्या त्याचाचनाश करितात. तेव्हां आपण जर याला रोज एकेक नवीन गोष्ट निर्माण करण्यास सांगितली आणि तो आपल्या देवतेकडे नवीन वर मागत गेला तर ती देवताच रागावून त्याचा नाश करून टाकील."

काळकाच्या मसलतीप्रमाणें राजानें दुसऱ्या दिवशीं त्या उद्यानांत एक रत्नखचित तलाव बांधण्याचा बोधिसत्त्वाला हुकूम केला. शक्राच्या कृपेनें बोधिसत्त्वानें तो देखील एका रात्रींत बांधून राजाला नजर केला. तेव्हां राजानें एक उद्यानाला साजल अस हस्तिदंती गृह एका रात्रींत बांधण्याचा हुकूम केला. तोहि बोधिसत्त्वानें इंद्राच्या सहाय्यानें अंमलांत आणला. नंतर राजानें एक उत्तम हिरा आणून त्या घरांत ठेवण्यास सांगितलें. हें काम देखील चोवीस तासांच्या आंत करावयाचें होतें. पण इंद्र प्रसन्न असल्यामुळें बोधिसत्त्वाला तें कठीण वाटलें नाहीं. इंद्रानें दिलेला हिरा त्यानें दुसऱ्या दिवशीं सकाळींच राजाला अर्पण केला. राजा

बहुतेक निराशच होऊन गेला. परंतु थोडा धीर देऊन काळक म्हणाला, “महाराज, हताश होण्यांत अर्थ नाहीं, पुरोहिताला प्रसन्न असलेली देवता उद्यान, तलाव वगैरे अचेतन पदार्थ उत्पन्न करूं शकेल. पण एखादा मनुष्य तिला उत्पन्न करतां यावयाचा नाहीं. आपण पुरोहिताला अशी आज्ञा करा कीं, चतुर्गुणी असा एक उद्यानपाल चोवीस तासाच्या आंत आणून द्या. देवतेला ही गोष्ट अशक्य होऊन ती बोधिसत्त्वावर उलटेल किंवा त्याला सोडून पळून तरी जाईल.”

ठरल्याप्रमाणें राजानें दुसऱ्या दिवशीं पुरोहिताला चतुर्गुणी उद्यानपाल आणून द्यावयास सांगितला. बोधिसत्त्वानें घरीं जाऊन शक्राचें स्मरण केलें परंतु शक्र कांही आला नाहीं. तेव्हां अरण्यांत जाऊन बोधिसत्त्व ध्यानस्थ बसला. तेथें शक्र ब्राह्मणरूपानें प्रगट होऊन म्हणाला, “हे मनुष्या तूं या अरण्यांत दुर्दैवी प्राण्यासारखा चिंताग्रस्त होऊन कां बसला आहेस?”

बोधिसत्त्व म्हणाला, “माझ्या राजासाठीं शक्राला प्रसन्न करून घेऊन मी पुष्कळ गोष्टी केल्या परंतु त्याची तृप्ति न होतां तो चतुर्गुण संपन्न उद्यानपाल मागत आहे! असा मनुष्य मी कोठून आणावा?”

शक्र म्हणाला, “तूं घाबरूं नकोस. राजाच्या पदरीं एक हुजऱ्या आहे त्याला उद्यानपाल नेमा असें तूं आपल्या राजाला सांग. म्हणजे हें तुझ्यावरचें संकट निरस्त होईल.”असें म्हणून शक्र तेथेंच अंतर्धान पावला.

दुसऱ्या दिवशीं राजसभेंत जाऊन बोधिसत्त्व राजाला म्हणाला, “महाराज, आपल्या पदरींच चतुर्गुणसंपन्न उद्यानपाल असतां आपण मला असा मनुष्य देण्यास कां सांगतां?”

राजा म्हणाला, “असा मनुष्य येथें कोण आहे बरें?”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज आपल्या पोषाखाच्या कामावर असलेला छत्रपाणी हुजऱ्या अशा तऱ्हेचा मनुष्य आहे. त्याला बोलावून आणून उद्यानपालाचें काम द्या.”

राजानें छत्रपाणीला बोलावून त्याच्या अंगीं कोणते चार गुण आहेत अशी पृच्छा केली. तेव्हां तो म्हणाला, “महाराज, दुसऱ्याचा मत्सर न करणें, मद्यपानापासून निवृत्ति, न्यायकठोरता आणि सर्वांवर समबुद्धि ठेवणें या चार गुणांचा पुष्कळ जन्मीं मी अभ्यास केला आहे. अधिकाऱ्याच्या अंगीं या चार गुणांची फार आवश्यकता आहे. म्हणून मी आपलें कोणतेंहि विश्वासाचें काम करण्यास योग्य आहें.”

हें छत्रपाणीचें भाषण ऐकून राजा प्रसन्न झाला. काळक सेनापतीनें आपल्या मनांत संशय उत्पन्न करून आपणाला भलत्याच मार्गास लावलें याबद्दल त्याला फार फार वाईट वाटलें. काळकाला देहांत शिक्षा देऊन तेव्हांपासून बोधिसत्त्वाच्या सल्ल्यानें त्यानें राज्यकारभार चालविला.

——***——

अनुक्रमणिका

७७. मातृभक्ति. (२२२)

(चूलनंदियजातक नं. २२२)

बोधिसत्त्व एकदां नंदिय नांवाचा वानर होऊन अरण्यांत रहात असे. त्याच्या धाकट्या भावाचें नांव चुल्लनंदिय असें होतें. कांहीं काळानें नंदियाला वानरयूथाचें स्वामित्व मिळालें. वानरगणाला बरोबर घेऊन तो मोठ्या सावधगिरीनें अरण्यांत फिरत असे. पण त्यामुळें त्याच्या वृद्ध आणि अंध आईच्या दर्शनाला त्याला वारंवार जातां येईना. आपल्या कळपांतील वानराकडून तो तिच्यासाठीं फळें वगैरे पाठवीत असे. पण हीं फळें बिचाऱ्या वृद्ध वानरीला न पोंचतां वाटेंतच खलास होत असत! बऱ्याच दिवसांनीं एकदां नंदिय आपल्या आईच्या दर्शनास गेला असतां आई अत्यंत कृश झालेली त्याला आढळली. तेव्हां तो म्हणाला, "आई, तुझी अशी गति का?"

ती म्हणाली, "मुला, मला आज बरेच दिवस पोटभर खाण्यास मिळत नाहीं. माझे हातपाय दुर्बल झाल्यामुळें मला स्वतः झाडांवर चढून फळें, पाला वगैरे खाण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. तुझ्या कळपांतील वानर कधीं कधीं माझ्यासाठीं कांहीं आणून देतात, परंतु ते मला पुरत नाहीं. म्हणून ही माझी अशी दशा झाली आहे."

नंदियाला आपल्या आईचे असे हाल झालेले पाहून अत्यंत उद्वेग झाला. तो ताबडतोब आपल्या कळपांत जाऊन वानर समुदायाला म्हणाला, "भो मर्कट, तुम्ही आजपासून माझ्या भावाला आपल्या कळपाचा पुढारी करा. कां कीं, मी आई जिवंत असेपर्यंत तिच्या सेवेंत दक्ष राहाण्याचा निश्चय केला आहे. तेव्हां माझ्यानें यापुढें पुढारी या नात्यानें आपली सेवा व्हावयाची नाहीं."

वानर समुदायाच्या मतें चुल्लनंदियाला धुरीणत्व देण्याचें ठरलें. परंतु त्यानें तें नाकारलें. तो म्हणाला, "आमची आई आंता फार दिवस जगेल असें वाटत नाहीं. वानरगणाचा राजा होऊन मी चैनींत काळ घालवूं लागलों तर मातृसेवेचें पुण्य माझ्या पदरीं पडणार नाहीं. म्हणून मी देखील माझ्या वडील भावाबरोबर आईची शुश्रूषा करण्याचा निश्चय केला आहे."

वानरांनीं आपणांपैकी दुसरा एक राजा निवडून या दोघांनाहि मोकळें केलें; आणि ते तेव्हांपासून आपल्या आईचा संभाळ स्वतः करू लागले.

त्या काळीं वाराणसींतील एक ब्राह्मण कुमार तक्षशिलेला जाऊन तेथें पाराशर्य नांवाच्या प्रसिद्ध आचार्यापाशीं राहिला आणि द्वादश वर्षें अध्ययन करून सर्व शिल्पांत पारंगत झाला. उदरनिर्वाहासाठीं तो परत वाराणसीला आला. परंतु त्याच्या अंगीं व्यवहार नैपुण्य नसल्यामुळें त्याला धंदा मिळेना. शेवटीं व्याधाचें काम करून त्यानें आपला उदरनिर्वाह चालविला. पूर्व संस्कारामुळे त्याला हा धंदा फार आवडला. आपल्या बायकोचें आणि दोन मुलांचें चांगलें पोषण करून घर दार बांधून त्यानें वाराणसी नगरींतच कायमची वस्ती केली.

एके दिवशीं शिकारीस गेला असतां त्याला कांहींच सांपडलें नाहीं. रिक्त हस्तानें परत जाण्याची त्याच्यावरती पहिलीच पाळी होती. वाटेंत एका वृक्षावर नंदिय, चुल्लनंदिय आणि त्यांची आई हीं तिघेजणें

अनुक्रमणिका

बसलीं होतीं. आपल्या वृद्ध आईला पारधी अपाय करणार नाहीं असें जाणून त्या दोघां वानरांनीं वृक्षाच्या फांद्यांत दडी मारली. व्याधानें मर्कटीला पाहून असा विचार केला कीं, रिकाम्या हातानें घरीं जाऊन बायकोचा कोप करून घेण्यापेक्षां ह्या वृद्ध वानराला मारून नेलेलें बरें; निदान याच्या मांसानें आपल्या मुलांचा तरी निर्वाह होईल. त्यानें केलेलें शरसंधान पाहून नंदिय घाबरून गेला, आणि आपणाशींच म्हणाला, "या क्षणांत मी पुढें सरसावलों नाहीं तर माझी आई प्राणास मुकणार आहे. एका दिवसा पुरतेंहि आईला जीवदान देणें हें महत्पुण्य आहे."असें पुटपुटत तो दडलेल्या ठिकाणांतून आपल्या आईजवळ आला आणि म्हणाला, "बा व्याधा, तूं या माझ्या वृद्ध आणि अंध आईला मारू नकोस. इच्या मांसानें एका माणसाचें देखील पोट भरणार नाहीं. पण मी भरज्वानींत आहें. इच्या ऐवजीं मला मारून नेशील तर तुझ्या सर्व कुटुंबाची तृप्ति होईल. तेव्हां इला जीवदान दे आणि मला मारून ने."

व्याधानें वृद्ध वानरीला जीवदान देण्याचें कबूल करून बोधिसत्त्वाचा तात्काळ प्राण घेतला आणि त्याला आपल्या पिशवींत भरलें, आतां घरीं जाणार इतक्यांत त्याला वाटलें कीं, या म्हातारीला जिवंत ठेऊन तरी काय उपयोग. त्या तरुण वानराच्या मांसाला चांगली किंमत येईल, आणि वानरीचें मांस घरीं उपयोगास आणतां येईल. असा विचार करून पुनः त्यानें तिच्यावर बाण रोखला तें पाहून चुल्लनंदिय ताबडतोब पुढें सरसावला आणि म्हणाला, "बा व्याधा, तूं या म्हातारीला मारूं नकोस. हा मी तिचा लठ्ठ पुत्र आहें. मला मारून इला जीवदान दे."

त्या अत्यंत क्रूर व लुब्ध पारध्यानें त्याचा तर खून केलाच. परंतु तेवढ्यानें तृप्त न होतां त्या वृद्ध वानरीलाहि ठार केलें, आणि मोठ्या प्रफुल्लित मनानें त्यानें आपल्या घरची वाट धरली. अघोर कृत्याचें फल ताबडतोब भोगावें लागतें असें म्हणतात तें खोटें नाहीं. वाराणसी नगराच्या द्वारावर पोंचतो न पोंचतो तोंच घरावर वीज पडून बायको व मुलें जळून मेलीं ही बातमी त्याला समजली. आजपर्यंत शतशः महापातकें करून ज्यांच्यासाठीं त्यानें धनदौलत मिळविली, घर बांधलें आणि अनेक व्यवसाय केले. त्यांचा असा एकाएकीं अंत झालेला पाहून त्याचें मन भ्रमिष्ट झालें! तो तसाच ओरडत घरापाशीं गेला आणि पहातो तों जळकें आढें तेवढें शिल्लक राहिलेलें! आंसवें गाळीत तों त्याच्या खालीं जाऊन उभा राहिला; इतक्यांत तें आढें कडाडा मोडून त्याच्या शिरावर पडलें आणि मोठी जखम झाली. तो मोठमोठ्या किंकाळ्या फोडूं लागला तेव्हां आसपासची मंडळी गोळा झाली. इतक्यांत त्याच्या पायाखालची जमीन दुभंग होऊन हळु हळु त्याला गिळूं लागली. तेव्हां तो म्हणाला, "पाराशर्य आचार्यानें केलेला उपदेश जर मी ऐकला असता, तर माझी अशी गती झाली नसती! गुरुगृह सोडते वेळीं आचार्य मला म्हणाला, "बाबारे ज्याच्यायोगें पश्चात्ताप करण्याची पाळी येते, अस पाप तूं कायावाचामनें करूं नकोस. मनुष्य जीं जीं कर्मे करतो त्या त्या कर्मांचीं तो फळें भोगतो. कल्याणकारक कर्म करणारा चांगले दिवस पहातो आणि पापकारक कर्में करणारा वाईट दिवस पहातो. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें ह्मणजे, जसें जो बीं पेरतो तसें त्याला फळ मिळतें. परंतु हा आचार्याचा उपदेश मला मूर्खाला—" इतक्यांत त्याचें समग्र शरीर पृथ्वीमातेनें गिळून टाकलें! तो सरळ नरकांत जाऊन पडला!!

——***——

अनुक्रमणिका

७८. कुटुंबाविषयीं निष्काळजीपणा. (२२३)

(पुटभत्तजातक नं. २२३)

प्राचीन काळीं वाराणसी नगरींत ब्रह्मदत्त नांवाचा राजा राज्य करीत होता. आपल्या पुत्राविषयीं त्याचें मन साशंकित झालें, आणि त्यानें त्यालासहकुटुंब आपल्या राज्याबाहेर हाकून दिलें. पुढें ब्रह्मदत्त मरण पावल्यावर मुलगा वाराणसीला आला. वाटेंत तो आणि त्याची स्त्री एका धर्मशाळेंत उतरलीं असतां राजपुत्राला एक द्रोणभर भात कोणी आणून दिला. त्याने बायकोची काळजी न करितां तो सर्व आपणच खाल्ला. वाराणसीला पोंचल्यावर लोकांनीं मोठा उत्सव करून त्याला अभिषेक केला. आपल्याबरोबर प्रवासांत दुःख भोगिलेल्या त्या स्त्रीला त्यानें पट्टराणीचें पद दिलें. तथापि तिजविषयीं तो अत्यंत निष्काळजी असे. राजवाड्यांतील इतर माणसांप्रमाणेंच तिलाहि वागविण्यांत येत असे.

आमचा बोधिसत्त्व त्या काळीं या राजाचा एक प्रधान होता. एके दिवशीं राणीची मुलाखत झाली असतां तो तिला म्हणाला, "महाराणीसाहेब, आम्हीं पुष्कळ दिवसांचे या राज्याचे नोकर आहों. परंतु आपणांकडून आम्हाला अद्यापि कांहींच बक्षिस मिळालें नाहीं."

राणी म्हणाली, "पंडितजी, तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे. परंतु माझाच जेथें योग्य बोज रहात नाहीं, तेथें तुमच्यावर उपकार मी कोठून करावे?" याचें कारण विचारलें असतां तिनें उत्तर दिलें, "राजेसाहेब मजविषयीं अत्यंत निष्काळजी आहेत. मी त्यांबरोबर इतके वनवास काढले असतां राजपद हाताला लागणार ही बातमी समजतांच त्यांना माझ्यासंबंधानें मुळींच पर्वा वाटेनाशी झाली. आम्हीं जेव्हां येथें येण्यास निघालों, तेव्हां वाटेंत द्रोणभर भात मिळाला असतां त्यांनीं मला विचारलें देखील नाहीं! आतां मला पट्टराणीपद दिलें आहे खरें, पण माझी आणि येथल्या नोकरांची योग्यता सारखीच आहे."

बोधिसत्त्वाला ही गोष्ट ऐकून सखेद आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, "राणीसाहेब तुम्ही स्वतः ही गोष्ट महाराजासमोर सांगाल काय?" त्यापासून कांहीं भय उपस्थित होईल अशी शंका बाळगूं नका.

राणीनें ती गोष्ट कबूल केली. नंतर बोधिसत्त्व एके दिवशीं राजा आणि राणी एकाच ठिकाणीं बसलीं असतां जवळ येऊन म्हणाला, "महाराणीसाहेब आम्हीं आपल्या पदरचे जुने नोकर आहों पण आपणांला अभिषेक झाल्यापासून बक्षिसाच्या रूपानें आम्हाला कांहींच मिळालें नाहीं."

यावर राणी म्हणाली, "आमचाच जेथें बोज रहात नाहीं, तेथें तुम्हांला आम्हीं काय देणार? वाराणसीला येतांना द्रोणभर भात मिळाला, त्यावेळीं देखील राजेसाहेबांना माझी आठवण झाली नाहीं. मग राज्यकारभाराच्या धांदलींत ती कशी व्हावी?"

बोधिसत्त्व म्हणाला, "राजेसाहेबांची जर इतकी इतराजी आहे तर त्याला चिकटून बसण्यांत अर्थ काय? पट्टराणी होऊन त्या पदाला योग्य असा सरंजाम जर आपणाला मिळत नाहीं तर आपल्या आईबापांच्या घरीं जाऊन मध्यम स्थितींतील स्त्री या नात्यानें स्वस्थ राहिलेलें काय वाईट?"

अनुक्रमणिका

हें बोधिसत्त्वाचें बोलणें ऐकून राजा फारच शरमला. त्यानें आपल्या पत्नीची झालेल्या चुकीबद्दल क्षमा मागून तिचा योग्य गौरव केला.

राजपदावर असलेल्या पुरुषानेंहि कुटुंबाची काळजी घेतली पाहिजे, नाहीं तर कधींना कधीं फजिती झाल्याशिवाय रहात नाहीं.

——⁂——

अनुक्रमणिका

७९. मरण पावलेल्या दुष्टांचें भय. (२४०)

(महापिंगलजातक नं. २४०)

प्राचीन काळीं वाराणसीमध्यें महापिंगल नांवाचा राजा राज्य करीत असे. तो अत्यंत दुष्ट होता. कोणालाहि त्यानें चांगल्या रीतीनें वागविल असें कधींहि घडलें नाहीं. त्याचा मुलगा मात्र अत्यंत सुशील होता. कां कीं, कांहीं पूर्वपुण्याईमुळें आमचा बोधिसत्त्वच पुत्ररूपानें त्याच्या कुळांत जन्माला आला होता. बोधिसत्त्वाला आपल्या पित्याचा स्वभाव आवडत नसे. तथापि निरुपायामुळें बापाला दुष्ट कृत्यांत अडथळा करितां येणें शक्य नव्हतें. कांहीं काळानें महापिंगल मरण पावला. त्यावेळीं काशीराष्ट्रवासी जनानें दुप्पट उत्सव केला; एक महापिंगल मेल्याबद्दल व दुसरा बोधिसत्त्व गादीवर आल्याबद्दल. राज्यलाभ झाल्यावर बोधिसत्त्व पित्याच्या प्रासादांत जाऊन राहिला. तेथून बाहेर पडत असतां तेथील द्वारपाळ रडत होता. तो त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याला वाटलें कीं, हा एवढाच काय तो आपल्या पित्याचा खरा भक्त असावा. कां कीं, पित्याच्या मरणानें सर्व लोकसंतुष्ट झाले असतां हाच काय तो शोक करीत आहे! तेव्हां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, “रे द्वारपाला माझ्या पित्याच्या मरणामुळें शोक झाला आहे असा काय तो तूं एकटाच मनुष्य मला सांपडलास. माझ्या पित्यानें तुझ्यावर असे कोणते उपकार केले होते बरें, कीं ज्यांच्यायोगें तुला त्यांच्या वियोगानें एवढें दुःख होत आहे!”

द्वारपाळ म्हणाला, “महाराज पिंगल राजा येथून जात येत असतांना माझ्या डोक्यावर आठ आठ काठ्या मारीत असे. त्यामुळें मला फार वदना होत असत. नुकताच मी या दुःखांतून मुक्त झालों आहे. परंतु मला अशी भीति वाटतें कीं, आमचा जुना मालक मृत्यूच्या दरबारींहि अशीच दांडगाई करील, आणि यमराजा त्याला तेथून हाकलून देईल; व पूर्वींप्रमाणें माझ्या डोंक्यावर तो काठ्या मारीत बसेल!”

हें त्याचें भाषण ऐकून बोधिसत्त्वाला सखेद आश्चर्य वाटलें! आणि त्या द्वारपाळाचें समाधान करून तो म्हणाला, “माझा पिता आपल्या कर्मांप्रमाणें इहलोकांतून निघून गेला आहे. तो त्याच शरीरानें परत येईल अशी भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. कां कीं त्याचें शरीर सर्व लोकांसमक्ष जाळून भस्म केलें आहे!”

बिचाऱ्या साध्या भोळ्या द्वारपाळाला बोधिसत्त्वाच्या उपदेशानें समाधान वाटलें, आणि त्यानें आपला शोक सोडून दिला.

——***——

अनुक्रमणिका

८०. गोड बोलणारा गारुडी. (२४९)

(सालकजातक नं. २४९)

एका गारुड्यानें सालक नांवाचा एक माकड पोसला होता. तो त्याला सापाबरोबर खेळवून पैसे मिळवित असे. माकडानें कांहीं चूक केल्यास बांबूच्या काठीनें तो त्याला झोडून काढीत असे. एके दिवशीं गारुडी एका बागेंत सालकाला एका झाडास बांधून झोंपी गेला. ही संधी साधून माकडानें बांधलेली दोरी तोडून टाकली आणि तो एका उंच झाडाच्या शेंड्यावर जाऊन बसला. गारुडी जागा होऊनपहातो तों माकड बांधलेल्या ठिकाणाहून निसटून गेलेला! इतस्ततः शोध केल्यावर त्याला तो झाडावर बसलेला आढळला. तेव्हां तो म्हणाला, "बा सालका, तुला मी माझ्या पुत्राप्रमाणें समजतों. माझ्या मागून माझ्या कुळांतील सर्व संपत्ति मी तुलाच देऊन टाकण्याचा बेत केला आहे. तेव्हां मला शोकांत टाकून तूं असा निघून जाऊ नकोंस! ये खालीं उतर! चला आपण घरीं जाऊं!"

सालक तेथूनच म्हणाला, "या तुझ्या गोड शब्दाला मी भुलून जाणार असें तुला वाटतें काय? बांबूच्या काठीचे प्रहार मी विसरलों नाहीं! हें लक्षांत ठेव. मला तुझें धन नको आहे. तुझ्या सर्व संपत्तीपेक्षां स्वतंत्रपणें अरण्यात विहार करणें मला जास्त आवडतें! तेव्हां तूं मुकाट्यानें येथून निघून जा. गोड बोलून मला वश करण्याच्या खटपटीला लागूं नकोस!"

असें बोलून माकडानें तेथून पलायन केलें. गारुडी दुःखित होऊन आपल्या घरीं गेला.

——***——

अनुक्रमणिका

८१. राजपुत्राला गुरूनें केलेला दंड. (२५२)

(तिलमुट्ठीजातक नं. २५२)

प्राचीन काळीं वाराणसीच्या राजानें आपल्या पुत्राला एक हजार कार्षापण देऊन तक्षशिलेला अध्ययन करण्यास पाठविलें. वाराणसी नगरींत शास्त्री पंडित पुष्कळ होते. परंतु दूरदेशीं पाठविल्यानें मुलाचें शिक्षण उत्तम होऊन त्याला चांगली रीत लागेल, अशी राजाची समजूत होती. राजपुत्र मोठ्या परिवारासह तक्षशिलेला जाऊन तेथील सुप्रसिद्ध आचार्यांच्या घरीं विद्याध्ययनासाठीं गेला. त्यावेळीं तो आचार्य आपल्या शिष्यांना पाठ सांगून संपल्यावर घराच्या आवारांत इकडून तिकडे फिरत होता. राजपुत्रानें त्याला पाहिल्याबरोबर पायांतील वहाणा काढून आणि छत्री मिटवून बाजूला ठेविली, व जवळ जाऊन गुरूला नमस्कार करून तो एका बाजूला उभा राहिला. हा प्रवासांतून आलेला आहे असें जाणून आचार्यानेंत्याचें योग्य आतिथ्य केलें. राजकुमाराचें जेवण वगैरे आटपल्यावर थोडी विश्रांती घेऊन तो पुनः गुरूजवळ गेला आणि नमस्कार करून एका बाजूला उभा राहिला. आचार्य म्हणाला, “मुला, तूं कोठून आलास?”

“गुरुजी मी वाराणसीहून आलों.”
“तुझ्या पित्याचें नांव काय?”
“मी वाराणसी राजाचा पुत्र आहें.”
“येथें कां आलास?”

“गुरुजी मी आपल्या पायांपाशीं शास्त्राध्ययन करण्यासाठीं आलों आहे.”

आचार्य म्हणाला, “तूं कांहीं गुरुदक्षिणा बरोबर आणिली आहेस किंवा गुरुसेवा करून अध्ययन करणार आहेस?”

“गुरुजी, मी गुरुदक्षिणा आणिली आहे.”

असें म्हणून एक हजार कार्षापणाची थैली गुरूच्या पायांपाशीं ठेवून राजकुमारानें पुनः गुरूला नमस्कार केला. त्याकाळीं आचार्याला दक्षिणा देऊन शिकणारे आणि आचार्याची सेवा करून शिकणारे असे दोन प्रकारचे शिष्य असत. त्यांना अनुक्रमें आचार्यभागदायक आणि धर्मांतेवासिक असें म्हणत असत. धर्मांतेवासिक दिवसा आचार्याची सेवा करून रात्रीं अध्ययन करीत असत, आणि आचार्यभागदायक वडील मुलाप्रमाणें सगळा दिवस फावल्या वेळीं अध्ययनच करीत असत.

तो आचार्य रोज आपल्या शिष्यांना घेऊन नदीवर स्नानासाठीं जात असे. एके दिवशीं रस्त्यांत एका बाईनें तिळांचीं वरील टरफलें काढून ते वाळत टाकले होते. वाराणसीच्या राजकुमाराला ते स्वच्छ पांढरे तीळ पाहून लाळ सुटली, त्याने हळुच एक मूठ मारून तोंडांत टाकली! म्हातारी हें कृत्य पाहून मुलगा जरा लोभी आहे असें म्हणून चुप राहिली. पुनः दुसरे दिवशीं आणि तिसरे दिवशींहि राजकुमारानें हाच प्रकार केला.

अनुक्रमणिका

तेव्हां म्हातारी क्रोधावेग सहन करण्यास असमर्थ होऊन हा प्रसिद्ध आचार्य आपल्या शिष्याकडून माझे तीळ लुटवितो असें मोठ्यानें ओरडली. आचार्यानें मागें वळून काय घडलें याची चौकशी केली. म्हातारीनें घडलेला सर्व प्रकार निवेदन केला. तेव्हां आचार्य म्हणाला, "बाई तूं याजबद्दलवाईट वाटूं देऊं नकोस. जी काय तुझी हानी झाली असेल तेवढी किंमत तुला देण्यांत येईल."

म्हातारी म्हणाली, "महाराज, एवढ्या तिळांची किंमत घेऊन मला काय करावयाचें? पण हा मुलगा पुनः माझे तीळ खाणार नाहीं याबद्दल खबरदारी घ्या म्हणजे झालें."

आचार्य म्हणाला "आतांच्या आतां त्याला मी शिक्षा करतों."

असें म्हणून आचार्यानें दोघा मुलांकडून त्या राजकुमाराला पकडून आणून त्या ह्मातारीच्या पुढें उभें केलें, आणि त्याच्या पाठीवर जोरानें तीन छड्या ओढिल्या. राजकुमाराचें मन इतकें संतप्त झालें कीं, आचार्याचा सूड कधीं उगवीन असें त्याला होऊन गेलें. उपाय न सांपडल्यामुळें खालीं मान घालून मुकाट्यानें तो गुरुगृहीं चालता झाला. राजपुत्र आपणावर मनांतल्या मनांत रागावला आहे ही गोष्ट आचार्याला देखील समजली. परंतु आपलें कर्तव्य आपण केलें आहे, असें जाणून त्याला त्याची मुळींच पर्वा वाटली नाहीं. कांहीं दिवसांनीं अध्ययन पुरें करून राजकुमार वाराणसीला जाण्यास निघाला त्या प्रसंगीं गुरूची आज्ञा घेण्यास गेला असतां तो गुरूला म्हणाला, "गुरुजी, आपले माझ्यावर फार फार उपकार आहेत. यदा कदाचित वाराणसीचें राज्यपद मला मिळालें तर आपण एकवार वाराणसीला यावें अशी माझी नम्र विनंति आहे."

आचार्य म्हणाला, "परंतु मला येथें पुष्कळ कामें आहेत. पुष्कळ शिष्यांचें अध्ययन मजवर अवलंबून आहे. तेव्हां माझ्यानें वाराणसीपर्यंत जाणें कसें शक्य होईल? तथापि राजकुमारानें फार आग्रह केल्यामुळें राज्यपदारूढ झाल्यावर एकवार तुझी भेट घेईन असें आचार्यानें त्याला वचन दिलें. राजकुमार वाराणसीला गेला तेव्हां वाराणसी राजाला फार आनंद झाला. अनुक्रमानें मुलाची सर्व विद्येंत पारंगतता पाहून संतुष्ट झाला आणि आपल्या अमात्यांना म्हणाला, "माझा मुलगा विद्याविनय संपन्न आहे. त्याला सिंहासनावर बसवून मीं विश्रांती घ्यावी हें मला योग्य आहे. तुम्ही त्याच्या अभिषेकाची तयारी करा."

राजाज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था होऊन कुमाराला राज्यभिषेक करण्यांत आला. सत्ता प्राप्त होऊन कांही दिवस लोटले नाहींत तोंच तरुण राजाला आपल्या गुरूची आठवण झाली. जणूं काय काठीच्या प्रहारानें त्याची पाठ दुखूं लागली. तेव्हां आचार्याला बोलावण्यासाठीं त्यानें दूत पाठविले आणि त्यांना असें सांगितलें कीं, "माझ्या आचार्याला मी आपल्या दर्शनाला अत्यंत उत्कंठित झालों आहे असें सांगा. नुकताच मला राज्यपदाचा लाभ झाला आहे. अशा प्रसंगीं येथें येऊन मला सन्मार्गाचा उपदेश करणें, हें आपलें कर्तव्य आहे."

त्याप्रमाणें दूतांनीं आचार्याला निरोप कळविल्यावर तरुण वयांत राजाला उपदेश करणें आपलें कर्तव्य आहे असें जाणून कांहीं दिवसांसाठीं आचार्य वाराणसीला आला. तेथें पोहोंचल्यावर राजद्वारीं जाऊन तक्षशिलेहून अमुक आचार्य आला आहे असा त्यानें राजाला निरोप पाठविला, राजानें त्याला सभेंत बोलावून नेलें. परंतु त्याला बसावयास आसन न देतां अत्यंत संतप्त होऊन राजा आपल्या अमात्यांना

अनुक्रमणिका

म्हणाला, “भो, या आचार्यानें केलेल्या प्रहारांनीं माझी पाठ जणूं काय अद्यापि ठणकत आहे! हा आपल्या कपाळावर मृत्यु घेऊनच आला असावा! आतां याला जिवंत जाऊं देऊं नका!”

तें तरुण राजांचें भाषण ऐकून आचार्य निर्भयपणें म्हणाला, “चांगलें वळण लावण्यासाठीं जे दंड करितात त्यांचा थोर पुरुष राग मानीत नाहींत. कां कीं, हा दंड दुष्टपणानें केला जात नाहीं. आतां तूं राज्यावर बसून पुष्कळ लोकांना यथान्याय दंड करितोस. तो केवळ सूड उगविण्याच्या बुद्धीनें करीत नाहींस. आणि एवढ्यासाठीं जर तुझी प्रजा तुझ्यावर रागावली तर त्यांना लोक मूर्ख म्हणतील. प्रजेच्या कल्याणासाठीं तूं दंड करीत आहेस. प्रजेंत तंटे बखेडे उपस्थित होऊं नयेत, व सुव्यवस्था रहावी म्हणून तूं दंडाचें अवलंबन करितोस तो न्याय मला लावून पहा. मीं जर माझ्या शिष्यांना योग्य वळण लावण्यासाठीं दंडाचा प्रयोग केला, तर मला कोण दोष लावील! माझ्या फायद्यासाठीं मी तुझ्यावर प्रहार केला नसून तो तुझ्याच फायद्यासाठीं केला होता. समज, मी त्यावेळीं तुला दंड न करितां हंसलों असतों, आणि परस्पर त्या बाईचें समाधान केलें असतें, तर तुझ्या खोडी वाढत गेल्या असत्या; हळूं हळूं तूं लोकांचीं भांडीकुंडीं चोरलीं असतीस आणि त्यामुळें राजपुरुषांच्या हातीं लागून तुला त्यांनीं दंड केला असता; अशा कृत्यांनीं निर्लज्ज बनून तूं मोठा बंडखोर झाला असतास, आणि जर हें तुझें वर्तन तुझ्या पित्याच्या कानीं आलें असतें तर त्यानें तुला कधींहि राज्य दिलें नसतें. म्हणून मी तुझ्या लोभाला मुळांतच खोडून टाकिलें हें योग्य केलें असें समज, आणि माझ्याविषयीं विनाकारण वैरभाव बाळगूं नकोस. राज्यपदावर बसलेल्या माणसानें सूड उगविण्याची बुद्धि न बाळगतां योग्यायोग्यतेचा निस्पृहपणें विचार केला पाहिजे.”

हें आचार्याचें भाषण ऐकून तरुण राजा अत्यंत लज्जित झाला. अमात्यहि म्हणाले, “महाराज, आचार्यानें योग्यवेळीं आपणांस दंड केल्यामुळें या वैभवाचें आपण भागी झालां ही गोष्ट खरी आहे. आचार्यानें योग्य कर्म केलें असेंच आम्हास वाटतें.”

तेव्हां सिंहासनावरून उठून गुरूचे पाय धरून राजा म्हणाला, “महाराज, आपणाला हें सर्व राज्यवैभव मी दान देत आहें. याचें ग्रहण करा.”

आचार्य म्हणाला, “मजसारख्या विद्याव्यासंगी ब्राह्मणाला राज्य घेऊन काय करावयाचें आहे? तूं तरुण आहेस, आणि विद्याविनयानें संपन्न आहेस तेव्हां तूंच हें राज्य कर.”

राजा म्हणाला, “गुरुजी आतां एवढी तरी माझी विनंति मान्य करा. आपण वृद्ध झाला आहां. अध्यापनाचा भार आपणाला सहन होत नाहीं. तेव्हां सहकुटुंब येथें येऊन विश्रांति घेत बसा, व फावल्या वेळांत राज्यकारभारांत मला सल्ला द्या.”

आचार्यानें ही गोष्ट मान्य केली. राजानें त्याचें कुटुंब तक्षशिलेहून वाराणसीला आणविलें आणि त्याला आपला पुरोहित करून त्याच्या उपदेशाप्रमाणें राज्यकारभार चालविला.

——***——

अनुक्रमणिका

८२. ऐहिक उपभोगानें तृप्ति होणें कठीण. (२५८)

(मंधातुजातक नं. २५८)

बुद्ध भगवान श्रावस्तीमध्यें रहात असतां एका भिक्षूला पुनः गृहस्थाश्रमांत शिरून चैन करण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली. त्याच्या बरोबरच्या भिक्षूंला ही गोष्ट समजली तेव्हां त्यांनीं त्याला भगवंताकडे नेलें. भगवान् त्याला म्हणाले, "हे भिक्षू, इहलोकींच्या उपभोगानें मनुष्य आपली तृष्णा शमवील हें संभवत नाहीं. लाभापेक्षां लोभ वाढत जात असतो. तेव्हां सुज्ञ पुरुषांनीं आपल्या तृष्णेचें शमन सद्विचारांनींच केलें पाहिजे. तृष्णेचें शमन उपभोगांनीं होत नाहीं. याचें उदाहरण म्हणून भगवंतानें खालील गोष्ट सांगितली :–

प्रथम कल्पांत महासमंत नांवाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्याचा पुत्र रोज, रोजाचा पुत्र वररोज, वररोजाचा पुत्र कल्याण, कल्याणाचा पुत्र वरकल्याण, वरकल्याणाचा पुत्र उपोसथ आणि उपोसथाचा पुत्र मांधाता. मांधाता सर्व राजांत मोठा दैवशाली राजा होऊन गेला. चक्रवर्ति राजाच्या राज्यांत चक्र, हत्ती, घोडा, मणि, स्त्री, श्रेष्ठी, आणि मुख्य प्रधान अशीं सात रत्नें असतात. त्याच्या प्रभावानें राजवाड्यासमोर अंतरिक्षांमध्यें एक दिव्य चक्र भ्रमत असे. आपल्या सामर्थ्यानें चक्राला फिरवणारा म्हणूनच याला चक्रवर्ती राजा असें म्हणतात. या चक्राच्या जोरावर चक्रवर्ती राजाला वाटेल त्या ठिकाणीं अप्रतिहतपणें जातां येतें; सगळे राजे त्याचें स्वामित्व तात्काळ कबूल करतात. त्याच्या सारखा हत्ती दुसऱ्या ठिकाणीं असूं शकत नाहीं; तो अंगानें सफेत असतो; त्याचा घोडा सर्व घोड्यांत उत्तम असतो. मणि सर्व जवाहिरांत श्रेष्ठ असतो; स्त्री सर्व स्त्रियांत सुस्वरूप आणि सुशील असते; श्रेष्ठी सर्व व्यापारांत सधन असून राजाला वाटेल त्या प्रसंगीं वाटेल तेवढी पैशाची मदत करूं शकतो; आणि त्याचा मुख्य प्रधान सर्व राजकारणी पुरुषांत श्रेष्ठ असून दूरदर्शी जनतेचें कल्याण करण्यांत दक्ष असतो. यांशिवाय चक्रवर्ती राजाच्या अंगीं या चार ऋद्धी असतात; तो सुस्वरूप असतो, दीर्घायुषी असतो, त्याचें शरीर निरोगी असतें, आणि तो सर्व लोकांना प्रिय असतो.

मांधाता राजाला हीं सात रत्नें आणि चार ऋद्धी प्राप्त झाल्या होत्या. एवढेंच नव्हे, तर डाव्या हातावर उजव्या हातानें टाळी मारल्याबरोबर आकाशांतून अशा रत्नांची वृष्टी पाडण्याचें त्याच्या आंगीं सामर्थ्य होतें. चौऱ्याऐशीं हजार वर्षें त्यानें बालपणांतील खेळ खेळण्यांत घालविली. तदनंतर ८४००० वर्षें युवराजपदाचा उपभोग घेतला. आणि नंतर ८४००० वर्षें चक्रवर्ती राजा होऊन सर्व जगाचें राज्य केलें. त्याचें आयुष्य किती होतें त्याची गणना करणें जवळ जवळ अशक्य आहे. चक्रवर्ती होऊन राज्य करीत असतां एके दिवशीं त्यांच्या मनांत 'अतिपरिचयादवज्ञा' या म्हणीप्रमाणें राज्याविषयीं तिरस्कार उद्भवला. येऊन जाऊन तेच उपभोग, तीच सत्ता आणि तीच चैन; त्यांत त्याला सुख वाटेनासें झालें किंबहुना या सर्व गोष्टींचा त्याला वीट आला. राजा कंटाळलेला आहे, असें पाहून अमात्य म्हणाले, "महाराज आपण कोणत्या तरी वस्तुविषयीं उत्सुक दिसतां. येथें आपणाला कांहीं दुःख उपस्थित झालेलें आहे कीं काय?"

मांधाता म्हणाला, "या राज्याचा मला वीट आला आहे. माझें पुण्यबळ एवढें मोठें आहे कीं, त्यासमोर चक्रवर्ती राज्य कःपदार्थ आहे. यापेक्षां श्रेष्ठतर असें दुसरें एखादें राज्य असेल तर मला सांगा."

अमात्य म्हणाले, "महाराज, पृथ्वीवर आतां आपल्यापेक्षां श्रेष्ठं दुसरें राज्यच राहिलें नाहीं! आपण सर्व राजाचे राजे आहां! तेव्हां याहून संपन्नतर राज्यपद कोठून सांपडणार? आतां देवलोकीचें राज्य याहून चांगलें असलें पाहिजे. तेव्हा ते मिळविण्याचा आपण प्रयत्न करा."

अनुक्रमणिका

राजानें आपल्या चक्राच्या सामर्थ्यानें अमात्यांसह एकदम चातुर्महाराजिक देवलोकीं गमन केलें. या देवलोकांत विरूपाक्ष, धृतराष्ट्र, विरूढ आणि वैश्रवण या चार दिग्पाळांचें स्वामित्व असतें. यांना महाराजा असें म्हणतात. त्या महाराजांनीं मांधात्याचें चांगलें आगतस्वागत केलें; आणि देवलोकीं येण्याचें कारण विचारलें. मांधाता म्हणाला, "पृथ्वीच्या राज्यानें मी कंटाळून गेलों आणि तेथील उपभोगांचा मला वीट आला म्हणून माझ्या अमात्यांसह मी येथें आलों आहे."

तें ऐकून त्या चार महाराजांनीं मांधात्याला अभिषेक करून आपल्या देवलोकांचें राज्य समर्पण केलें. हजारों वर्षांनीं त्याहि राज्याचा मांधात्याला कंटाळा आला, आणि तो विरूपाक्षादिक चार राजांला म्हणाला, "या देवलोकापेक्षां रमणीयतर असा दुसरा एखादा देवलोक आहे काय?"

ते म्हणाले, "होय सरकार. या देवलोकापेक्षां तावत्त्रिंशद्देवलोक सुंदरतर आहे. तेथील शोभा अपूर्व आहे. ती येथें कशी पहावयास सांपडेल?"

मांधात्यानें आपलें चक्र वर फेंकून त्याच्या सहाय्यानें अमात्यांसह तावत्त्रिंशद्दवलोकीं गमन केलें. मांधाता आला असें समजतांच इंद्र सामोरा गेला. आणि मोठ्या थाटानें आपल्या वैजयंत प्रासादांत त्याला घेऊन आला व म्हणाला, "महाराज आपल्या देदीप्यमान चक्रासह आपण येथें कां आला?"

मांधाता म्हणाला, "भो शक्र, मनुष्यलोकींच्या आणि चातुर्महाराजिक देवलोकींच्या सर्व उपभोग्य वस्तूंनीं मला कंटाळा आला. अनेक हजार वर्षें या दोन्ही लोकांचें सार्वभौमराज्य मी अनुभविलें; परंतु त्यांत तथ्य दिसून न आल्यामुळें मी या लोकीं राज्योपभोग घेण्यासाठीं आलों आहे."

इंद्रानें आपलें राज्य द्विधा करून एक भाग मांधात्याला दिला. तेव्हांपासून देवलोकीं दोन इंद्र राज्य करूं लागले. कांहीं काळानें मांधात्याला राज्य अर्पण केलेला इंद्र आपल्या पुण्यक्षयानें पतन पावला आणि त्याच्या जागीं दुसरा इंद्र आला. तो मिळालेल्या देवलोकींच्या अर्ध्या राज्यानें संतुष्ट होता. अशा प्रकारें छत्तीस इंद्र उत्पन्न होऊन पतन पावले. तथापि मांधात्याची राज्यतृष्णा शमन पावली नाहीं. स्वर्गाचें अर्ध—राज्य त्याला पुरस वाटेना. शक्राला मारून सर्व राज्य हस्तगत करावें असा त्याचा मनोदय होता. पण इंद्राला कोणत्याही उपायानें मारणें शक्य नव्हतें मात्र अशा दुष्ट मनोवृत्तीमुळें मांधात्याच्या पुण्यरूपी वृक्षाचीं पाळें शिथिल झालीं, आणि तो उन्मळून पडला. पुण्यक्षय झाल्याबरोबर मांधात्याला देवलोकीं वास करितां येणें शक्य नव्हतें. गोफणींतून सुटलेल्या दगडाप्रमाणें तो झटदिशीं पृथ्वीवर आपल्या पूर्वींच्या उद्यानांत येऊन पडला. उद्यानपालानें स्वर्गांतून खालीं पडलेल्या या प्राण्याकडे धांव घेतली, आणि तो म्हणाला, "महाराज दिव्यशरीरधारी असे आपण कोण आहां?"

इतक्यांत त्याचे अमात्यहि देवलोकांतून त्या ठिकाणीं येऊन पडले. मांधाताराजाला या वेळीं मरणांतिक वेदना होत होत्या. आपल्या अमात्यासह मांधाताराजा उद्यानांत येऊन पडला आहे हें वर्तमान उद्यानपालानें त्या काळीं राज्य करणाऱ्या राजाला सांगितलें. तेव्हां तो आपल्या अमात्यांसह उद्यानांत मांधात्याला पहाण्यासाठीं आला. माधाता जगत नाहीं असें पाहून अमात्य म्हणाले, "महाराज, आतां जगाला आपला शेवटला निरोप काय असेल तो सांगा."

अनुक्रमणिका

मांधाता म्हणाला, “हजारों वर्षें मनुष्यलोकींचें, लाखों वर्षें चातुर्महाराजिक देवलोकींचें आणि लाखों वर्षें तावत्त्रिंशद्देवलोकींचें राज्य करून मांधाता राजा अतृप्तच मरण पावला! असें लोकांना सांगा. हाच माझा शेवटला निरोप होय.”

असे उद्‌गार काढून त्यानें प्राण सोडला.

——***——

अनुक्रमणिका

८३. सर्व पोटाचे दूत. (२६०)

(दूतजातक नं. २६०)

वाराणसीच्या ब्रह्मदत्त राजाचें जेवणावर अत्यंत प्रेम होतें. तो नानातऱ्हेच्या पक्वान्नांनीं तृप्त होत होता असें नाहीं. तर तीं पक्वान्नें सर्व लोकांसमोर खाण्यांत त्याला मोठा आनंद वाटत असे. राजवाड्यासमोर मोठा मंडप उभारून त्यांत एका मंचकावर बसून तो जेवीत असे, आणि त्याच वेळीं अमात्य त्यांशीं राज्यकारभारासंबंधानें संभाषण करीत असे. एके दिवशीं एक ब्राह्मण, राजा जेवावयास बसला असतां धांवत पुढें गेला. राजाचे नोकर तलवार उगारून त्यास मारावयास धांवले. परंतु मी दूत आहें, मी दूत आहे, असें तो मोठ्यानें ओरडला. तेव्हां राजा म्हणाला, “दूताला अभयदान असो. त्याला मारूं नका, किंवा पकडूं नका.” (त्या काळीं दूत म्हटला कीं त्याला राज्यसभेंत शिरण्याची मोकळीक असे).

तो ब्राह्मण धावत जाऊन राज्याच्या शेजारीं बसला आणि तेथें दुसऱ्या एका ताटांत वाढून ठेवलेल्या पदार्थांवर ताव मारू लागला. दूत बुभुक्षित असावा असें वाटून राजानें त्याला आणखी पदार्थ वाढण्यास लावले. यथास्थित खाऊन तृप्त झाल्यावर त्याला राजा म्हणाला, “आपण कोणत्या राजाकडून आलांत, आणि कोणत्या उद्देशानें आपल्या राजानें आपणास येथें पाठविलें!”

ब्राह्मण म्हणाला, “महाराज, मी कोणत्याहि राजाचा दूत नसून आपल्या प्रजाजनांपैकीं एक गरीब ब्राह्मण आहें.”

“तर मग मघाशीं तुम्ही दूत दूत असें कां ओरडलां? या मिथ्या भाषणाबद्दल तुम्हाला कडक शिक्षा केली पाहिजे.”

ब्राह्मण म्हणाला, “महाराज, मी खोटें बोललों नाहीं. मी माझ्या पोटाचा दूत आहें. क्षुधित पोटानें प्रेरणा केल्यामुळें मी आपणाजवळ आलों आहें; आणि आपण पोटासाठीं हा एवढा पसारा मांडला आहे तेव्हां आपणाला पोटाची किंमत काय आहे हें माहीतच आहे.”

राजाला त्या ब्राह्मणाचें भाषण ऐकून विस्मय वाटला. परंतु थोडा वेळ विचार करून तो म्हणाला, “भो ब्राह्मण, तूं जें बोललास तें यथार्थ आहे! सर्व लोक पोटाचे दूत आहेतच! त्यांत मी तर अगदींच हलक्या दर्जाचा आहें. कां कीं, केवळ पोटासाठीं मी हा एवढा खटाटोप मांडला आहे. आणि त्यांतच मला आनंद होत आहे! या तुझ्या सुभाषितानें मला जागें केल्याबद्दल मी तुझ्या उदरदेवतेची सदैव तृप्ती होईल अशी व्यवस्था करून देतों.”

असें बोलून राजानें त्या ब्राह्मणाच्या पोटापाण्याची कायमची व्यवस्था करून दिली. आणि तेव्हांपासून जेवणाला अत्यंत महत्त्व देण्याचें सोडून दिलें, व तो प्रजाहिततत्पर झाला.

——***——

अनुक्रमणिका

८४. गोड बोलण्यानें कुरूप प्राणी देखील प्रिय होत असतो. (२६९)

(सुजातजातक नं. २६९)

एकदां आमचा बोधिसत्त्व वाराणसीचा राजा होऊन धर्मन्यायानें राज्य करीत असे. परंतु त्याची आई इतकी तापट असे कीं, ती ज्याच्या त्याच्यावर संतापून शिव्याशाप देत असे. दुसरा एखादा असता तर राजानें त्याचा ताबडतोब निषेध केला असता. परंतु आपल्या आईचा निषेध करणें कठीण काम होतें. एखादे वेळेस तिला असें वाटावयाचें कीं मुलगा राज्यमदानें धुंद होऊन मातृभक्तीला आंचवला आहे! परंतु एके दिवशीं त्याला आईला उपदेश करण्याची एक उत्तम संधी सांपडली. तो व त्याची आई उद्यानांत फिरत असतां कीकी नांवाचा सुंदर पण कर्कश पक्षी मोठ्यानें ओरडला. तेव्हां राजमाता म्हणाली, “काय घाणेरडा पक्षी! यानें माझ्या कानठळ्या बसवून टाकिल्या? द्या याला येथून हाकून.”

राणीच्या तोंडांतून हे शब्द खालीं पडले न पडले तोंच जवळच्या नोकरांनीं त्या पक्षाला दगड मारून तेथून घालवून दिलें. पुढें दुसऱ्या एका आंब्याच्या झाडावर बसून एक कोकिळा सुस्वर गायन करीत होती. तें ऐकून राणीचें चित्त अत्यंत प्रसन्न झालें, आणि ती आपल्या मुलाला म्हणाली, “कायरे, हा पक्षी तुला आवडतो कीं नाहीं.”

राजा म्हणाला, “आईग, हा पक्षी जरी कुरूप आहे. तरी त्याच्या शब्दांत माधुर्य असल्यामुळें तो सर्वांस आवडतो. परंतु मघाशीं आपण पाहिलेला पक्षी सुंदर होता खरा पण त्याच्या कठोर शब्दामुळें तो आम्हाला आवडला नाहीं. यावरून आम्हीं माणसांनीं एक गोष्ट शिकण्यासारखी, ती ही कीं, मधुर भाषणानें आपण कुरूप असलों तरी इतरांस प्रिय होतों; आणि परुष भाषणानें सुरूप असलों तरी अप्रिय होतों. विशेषतः आमच्या सारख्या राजकुलांतील माणसानें गोड बोलण्याची खबरदारी घेतली पाहिजे. सामान्य माणसानें कटुशब्द वापरले तर त्याचे मित्र त्याला तेव्हांच ताळ्यावर आणूं शकतात. परंतु राजकुलांतील माणसांना सर्व जण भीत असल्यामुळें त्यांचे अवगुण दाखवूं देऊं शकत नाहींत, आणि या योगें आमच्या सारख्याच्या अंगीं एखादा दुर्गुण शिरला म्हणजे तो अप्रतिहतपणें सारखा वाढत जातो. म्हणूनच आमचे दुर्गुण दुसरा दाखवून देईल याची वाट न पहातां ते आपल्या आपण शोधून काढून सुधारले पाहिजेत.”

त्या दिवसापासून राणीनें संतापण्याचें हळु हळु कमी करून कांहीं काळानें ती खोड अजीबात सोडून दिली.

——***——

अनुक्रमणिका

८५. दुर्मुख राजा. (२७०)

(उलूकजातक नं. २७०)

प्रथम कल्पांतील मनुष्यांनीं आपणासाठीं एक सुंदर आणि हुषार राजा निवडला; मत्स्यांनीं आनंद नांवाच्या मोठ्या माशाला आपला राजा केलें; आणि चतुष्पादांनीं सिंह राजा निवडला. तेव्हां सर्व पक्षी हिमालयावरील एका मोठ्या शिलातलावर एकत्र जमले आणि आपणांमध्यें एक पक्षिराजा असावा असा त्यांनीं ठराव पास केला. परंतु राजा कोणत्या पक्ष्याला करावें याचा बराच वेळ निकाल लागेना. शेवटीं भवति न भवति होऊन कांहीं पुढाऱ्यांनीं घुबडाला राजा निवडण्याचा विचार केला, आणि त्यांतील एकजण पुढें होऊन म्हणाला, "पक्षिगणहो, या पक्ष्याला आम्हीं आपला राजा निवडीत आहों. जर याच्या विरुद्ध कोणास बोलावयाचें असेल तर त्यानें आगाऊच बोलावें. मी आतां हा आमचा राजा आहे असें त्रिवार उच्चारीन, आणि दर्म्यान जर कोणी कांहीं बोलला नाहीं तर सर्वांना याची निवडणूक मान्य आहे असें गृहीत धरण्यांत येईल."

इतक्यांत एक तरुण कावळा पुढें सरसावून म्हणाला, "बांधवहो, आपण सर्वांनीं घुबडाची निवडणूक केली आहे. पंरतु ती पुरी होण्यापूर्वीच मला या संबंधानें थोडें बोलावें असें वाटतें. जर आपणा सर्वांची परवानगी असेल तर मी या प्रसंगीं चार शब्द बोलतों."

तेव्हां तेथील कांहीं प्रमुख पक्षी म्हणाले, "सोम्य, तुला जें कांहीं बोलावयाचें असेल तें मोकळ्या मनानें बोल. आम्हां सर्वांची तुला परवानगी आहे. तूं जरी तरुण आहेस तरी तरुण पक्षी देखील हुशार असूं शकतात हें तत्त्व आम्हांला मान्य आहे. तेव्हां तुला बोलण्याला आम्हीं आनंदानें परवानगी देतों."

कावळा म्हणाला, "बांधवहो, तुमचें कल्याण होवो! पण आजचे हें तुमचें कृत्य मला आवडत नाहीं. कां कीं, या शुभमंगल प्रसंगीं देखील या घुबडाचें तोंड कसें वेडें वाकडें दिसतें पहा! आणि जर पुढें मागें त्याच्या हातीं सत्ता जाऊन दुसऱ्यावर रागावण्याचा याला प्रसंग आला, तर याचें तोंड किती चमत्कारीक होईल, याची निवळ कल्पनाच केली पाहिजे! म्हणून असा हा दुर्मुखलेला राजा मला मुळींच आवडत नाहीं!"

कावळ्याचें भाषण ऐकून सभेंत एकच गोंधळ उडाला, घुबडाला अभिषेक करूं नये, असेंच बहुतेकांचें मत झालें. तेव्हां घुबड क्रोधाविष्ट होऊन त्या तरुण कावळ्याच्या मागें लागला पण कावळा त्याला सांपडला नाहीं. असें सांगतात कीं, त्या दिवसांपासून कावळ्याचें आणि घुबडांचें वितुष्ट पडलें.

——***——

अनुक्रमणिका

८६. भेसूर प्राण्याचा उपयोग. (२७२)

(व्यग्घजातक नं. २७२)

सरहद्दीजवळील गांवच्या शेजारीं एका जंगलांत वाघ आणि सिंह रहात होते. ते जनावरांला मारून तेथें आणून खात असत. तें पाहून त्या अरण्यांत रहाणारा वनदेव आपल्या मित्राला म्हणाला, “हे दोघे आमच्या या सुंदर अरण्याची हानी करीत आहेत. जनावराला मारून त्यांचे अवशेष भाग येथें टाकून दिल्यामुळें घाण होते व आम्हास त्रास होतो. तेव्हां यांना भय दाखवून येथून घालवून द्यावें हें बरें. असले हिंस्त्र प्राणी आमच्या या सुंदर वनांत नको आहेत.”

त्यावर दुसरा वनदेव म्हणाला, “बा मित्रा, तुझे म्हणणें रास्त नाहीं, या प्राण्याच्या योगें आम्हाला थोडा त्रास होतो ही गोष्ट मला कबूल आहे; परंतु त्यांच्या भेंसूरपणाचा आम्हास फार उपयोग होतो. ते जर येथें नसते तर जवळच्या गांवांतील लोकांनीं हें जंगल पार तोडून खलास केलें असतें! तेव्हां हें जंगल समूळ नष्ट होऊन जाण्यापेक्षां त्याचा कांहीं भाग घाणेरडा झाला तरी पुरवला.”

पहिल्या वनदेवाला ही गोष्ट पसंत पडली नाहीं. त्यानें अक्राळ विक्राळ रूप दाखवून त्या वाघाला आणि सिंहाला तेथून पळवून लावलें. त्याचा परिणाम त्याला लवकरच भोगावा लागला. जंगलांत सिंह प्राणी राहिले नाहींत असें पाहून लाकूडतोड्यांनीं त्यावर हल्ला केला, आणि त्याच्या नाशास सुरुवात केली. तें पाहून पहिल्या वन देवाला फार दुःख झालें. आणि वाघ रहात होता तेथें जाऊन त्याला परत आणण्याची त्यानें फार खटपट केली. परंतु वाघानें आणि सिंहानें त्याचें म्हणणें ऐकलें नाहीं. इकडे लाकूडतोड्यांनीं त्या जंगलाचा समूळ विध्वंस केला व तेथें शेतें तयार केलीं. वनदेवांच्या आश्रयस्थानाचा भंग झाल्यामुळें आपल्या मुलाबाळांना घेऊन आश्रयासाठीं त्यांना भटकत फिरावें लागलें.

तात्पर्य, हिंस्त्र प्राण्यापासून थोडा त्रास होत असला, तरी त्यांचा भेसूरपणा दुष्टापासून आपलें रक्षण करण्यास उपयोगी पडतो, हें विसरतां कामा नये.

——***——

अनुक्रमणिका

८७. क्षमा साधूचें शील. (२७८)

(महिसजातक नं. २७८)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं वनमहिष होऊन अरण्यांत रहात असे. तेथें एक दुष्ट माकड येऊन त्याला फार त्रास देई. त्याच्या कानांत शेंपूट घालून तो गुदगुल्या करी; शिंगाला लोंबकळत राहून आणि तीं हालवून त्याचें कपाळ दुखवी; त्याच्या पाठीवर देहधर्म करी; आणि अशाच अनेक माकडचेष्टांनीं त्याचा पिच्छा पुरवी. परंतु बोधिसत्त्वानें त्याला कांहीं एक अपाय केला नाहीं, एवढेंच नव्हे, त्याच्याविषयीं आपल्या मनांत सूड उगविण्याचा विचार देखील उत्पन्न होऊं दिला नाहीं. पण त्या माकडाचें कृत्य त्या अरण्यांत रहाणाऱ्या वनदेवतेला सहन झालें नाहीं, आणि ती बोधिसत्त्वाला म्हणाली. “भो महिष, अशा या दुष्ट वानराला तूं सलगी दिली आहेस हें मला मुळींच आवडत नाहीं. तूं जें याच्याकडून घडणारें दुःख सहन करतो आहेस त्यापासून तुला फायदा कोणता? मला तर असे वाटतें कीं, तुझ्या या शांतीचा फायदा घेऊन तो तुला दुःख देईलच परंतु तुझ्यासारख्या इतर प्राण्यालाहि दुःख देण्यास त्याला उत्तेजन मिळेल! तेव्हां याला शिंगानें खालीं पाडून पोटावर पाय देऊन याच्या आंतड्या बाहेर काढ! हें काम करणें तुला मुळींच कठीण नाहीं.”

बोधिसत्त्व म्हणाला, “भो देवते, माझ्या अंगीं सामर्थ्य आहे, म्हणून मी जर याचा सूड उगवला, तर माझा मनोरथ सिद्धीस कसा जाईल? आपले दुष्ट मनोविकारांवर जो ताबा चालवतो, तोच खरा शूर होय. तेव्हां हा जो मला दुःख देत आहे तो माझा मित्रच असें मी समजतों. माझें धैर्य आणि सहनशीलपणा तो कसोटीला लावून पहात आहे! आणि हे गुण मी याच्या माकडचेष्टांनीं भंग पावूं देणार नाहीं. आतां माझ्या या कृत्यामुळें तो दुसऱ्या प्राण्यांला त्रास देईल असें तुझें म्हणणें आहे. पण यावर मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, सर्वच प्राणी क्षमाशील असतात असें नाहीं, दुसरा एखादा तापट प्राणी सांपडला म्हणजे याच्या कृत्याचें फळ याला आपोआप मिळेल.”

असें बोलून बोधिसत्त्व त्या अरण्यांतून निघून दुसरीकडे गेला.

कांहीं दिवसांनीं तेथें दुसरा एक वनमहिष आला. माकडानें त्याच्याशींहि दांडगेपणा करण्यास आरंभ केला. पण पहिल्याच दिवशीं त्या महिषानें शिंगानें माकडाला खालीं पाडून पाय देऊन त्याच्या पोटांतील आंतडें बाहेर काढलें!

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

८८. नेत्याशिवाय संघशक्ति उत्पन्न होत नाहीं. (२८३)

(वड्ढकिसूकरजातक नं. २८३)

एका अरण्यांत पुष्कळ डुकर रहात असत. त्यांचा रहाण्याच्या जागेपासून कांहीं अंतरावर एक ढोंगी तपस्वी रहात असे. त्यानें एक वाघाचा बच्चा पाळला होता. तो वयांत आल्यावर तपस्वी त्याला पाठवून डुकरांला मारवून त्यांचें मांस खात असे. प्रत्येक दिवशीं वाघ एक डुकर मारून आणी. तपस्वी त्या डुकराचें उत्तम मांस आपणासाठीं राखून ठेऊन राहिलेलें वाघास देत असें. एके दिवशीं वाघाच्या भयानें डुकर पळत असतां त्यांच्या कळपांतील एक पोर एका खड्डयांत पंडलें. डुकर दुसरीकडे निघून गेलें. त्या रस्त्यानें जंगलांतील झाडें तोडण्यासाठीं एक सुतार जात होता. त्याला तें पोर आढळलें. सुताराला त्याची दया आली आणि घरीं नेऊन त्यानें त्याचें चांगलें संगोपन केलें, तो डुकराचा छावा भराभर वाढला. सुताराला तो इतका प्रिय होता कीं, आपलीं हत्यारें त्याच्या तोंडात देऊन त्याला तो बरोबर घेऊन जात असे. आपली दोरी त्याच्या तोंडांत देऊन त्याला ती धरावयास लावीत असे. डुकरहि मोठा हुषार असल्यामुळें सर्व कामें मोठ्या काळजीनें करी. तो बराच मोठा झाल्यावर सुताराला अशी भीति उत्पन्न झाली कीं, मांसाच्या आशेनें याला कोणीतरी मारून टाकतील, तेव्हां त्यानें त्याला पूर्वीं सांपडलेल्या ठिकाणीं नेऊन सोडण्याचा विचार केला; व एके दिवशीं अरण्यांत लांकडें तोडावयास जात असतां त्याला तेथें नेऊन सोडलें. डुकर इकडे तिकडे हिंडत असतां त्याला आपला जुना कळप आढळला. तेव्हां तो त्याला म्हणाला, “तुम्ही या अरण्यांत काय करितां?”

ते डुकर हा कोणीतरी हेर आहे असें वाटून त्याला म्हणाले, “पण तुझें आमच्याशीं काय काम आहे? तूं येथें कां आलास?”

तो म्हणाला, “मी लहानपणीं याच जंगलांत रहात असें. आतां मला सर्व गोष्टींची नीट आठवण नाहीं. तथापि असें स्मरतें कीं, मीं एकदां एका खड्ड्यांत पडलों. तेथून मला एका दयाळू सुतारानें नेऊन माझें पालनपोषण केलें. त्याला मी फारच आवडत असें. लोकहि मला वर्धकिसूकर (सुताराचा डुकर) असेंच म्हणत. परंतु माझ्या त्या दयाळू पालकानें मला कोणी तरी मारून खातील या भीतीनें पुनः या अरण्यांत आणून सोडलें.”

ही त्याची हकीगत ऐकून वयोवृद्ध डुकरांना एक पोर हरवलें होतें त्याची आठवण झाली, व तोच हा असावा असें त्यांस वाटलें. पण हा सुखाची जागा सोडून येथें आला हें त्यांस आवडलें नाहीं. ते म्हणाले, “तूं जेथें होतास तेथें तुला मरणाची भीति कमी होती. पण येथें आमच्या मागें रोजचेंच मरण लागलें आहे. आतां तरी तूं येथून पळ काढ आणि आपल्या पालकापाशीं जाऊन रहा. आमची ही कशी अवस्था झाली आहे ती पहा! या अरण्यांत चारापाणी विपुल असतां आमच्यांतील एकाच्या तरी अंगावर मांस आहे तर पहा!”

नंतर त्यांनीं त्यांच्या विपत्तीचें सर्व कारण सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, “तुम्ही इतकेजण असतां एकटा वाघ येऊन, मिळेल त्याला मारून नेतो हें ठीक नाहीं. तुमच्यापैकीं दोघेचौघेजण एकदम मरण्याला सिद्ध झाले तर वाघाचा सूड तेव्हांच उगवितां येण्यासारखा आहे.”सर्व डुकर एकदम ओरडून म्हणाले, “चौघे कां वाघाच्या तोंडातून मुक्त होण्याची खात्री असल्यास आम्हीं एकदम पंचवीस असामी मरण्यास तयार आहों!”

अनुक्रमणिका

वर्धकिसूकर म्हणाला, “तर मग आजपासून तुम्ही माझ्या सांगण्याप्रमाणें वागा. मनुष्यजातींत लढाईची तयारी कशी करतात, व्यूह कसे रचतात इत्यादि सर्व कांहीं मी पाहिलें आहे तथापि, त्याच्या सारखे शस्त्रास्त्रांचे प्रयोग करणें आम्हांला शक्य नाहीं. परंतु आमच्याजवळ असलेल्या दांतांचा योग्य उपयोग केला असतां वाघाचा पराभव करणें दुष्कर नाहीं.”

त्याच दिवशीं रात्रीच्या रात्रीं सर्व डुकरांकडून त्यानें एक खंदक तयार करविला आणि त्याच्या बाजूला कांहीं डुकरांना पहारा करण्यास ठेविलें. आळीपाळीनें पहारा करणारे डुकर तो बदलीत असे. डुकरी आणि डुकरांचीं पोरें यांना वाघ येण्याच्या सुमारास मध्यभागीं ठेवून चारी बाजूला चांगल्या बळकट डुकरांना ठेवण्यांत आलें. वाघ आल्यावर त्यांनीं भिऊन पळून जाऊं नये म्हणून धीर देण्यासाठीं वर्धकिसूकर मधून मधून सर्व ठिकाणीं फिरत स्वतः देखरेख ठेवीत असे. ठरल्याप्रमाणें सकाळच्या प्रहरीं डुकरांची शिकार करण्यासाठीं वाघ आला. पण डकरांची ही जय्यत तयारी पाहून तो चपापला. आणि माघारा परत जाऊन आपल्या गुरूच्या आश्रमांत शिरला. वाघाला रिक्तहस्तें आलेला पाहून गुरूला फार वैषम्य वाटलें इतक्यांत वाघ म्हणाला, “गुरुजी, आज डुकरांची तयारी कांहीं विलक्षण दिसते. त्यांनीं जणूं काय माणसासारखाच सर्व बंदोबस्त केला आहे.”

तापस संतापून म्हणाला, “तुझें शौर्य गलित झालें आहे असें दिसतें, नाहींतर डुकर तें काय! आणि त्याला घाबरून तूं वाघाचा बच्चा असून पळत सुटलास हें काय! अशा नामर्दपणानें जगण्यापेक्षां मरणें काय वाईट? तुझ्या नुसत्या गर्जनेनें डुकरांची धुळधाण उडून जाईल. पुनः जाऊन आपलें शौर्य गाजव, आणि एका तरी डुकराला मारून घेऊन ये.”

वाघ फार खजील झाला, आणि माघारें जाऊन खंदकाजवळ पोंचल्यावर त्यानें जोरानें गर्जना केली! पण डुकर पळून न जातां त्यांनींहि मोठमोठाली आरडा ओरड करून वाघाचेंच अनुकरण केलें! वाघ आपली शेंपटीं बडवूं लागला. तेव्हां डुकर देखील आपल्या शेंपट्या बडवूं लागले! तेव्हां वाघ क्रोधायमान होऊन खंदकाजवळ धांवला. खंदकाच्या पलीकडच्या काठावर उभा असलेल्या वर्धकिसूकरावर त्यानें उडी टाकली. पण खंदक बराच रुंद असल्यामुळें त्याची उडी नीट पडली नाहीं. वर्धकिसूकरानें त्याला आपल्या दातांनीं धक्का मारून खंदकांत पाडलें. वाघ उताणा खंदकाच्या तळाशीं जाऊन पडला. त्या बरोबर डुकरानें त्याजवर उडी टाकून त्याच्या आंतड्या आपल्या दातांनीं बाहेर काढल्या. सर्व डुकरांना वाघाचा नाश झाल्याबद्दल फार आनंद झाला. पण वाघाचा गुरू अद्यापि बाकी आहे. हें त्याला माहीत होतें. ते वर्धकिसूकराला म्हणाले, “तुझ्या शौर्यानें वाघाचा नाश झाला आहे. पण या वाघाचा प्रवर्तक अद्यापि जिवंत आहे, आणि आणखी दहा वाघांला शिकवून आमच्या अंगावर सोडून देण्यास तो समर्थ आहे. त्याच्या सारखा धूर्त मनुष्य विरळा. तेव्हां तो जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत आम्हांला या अरण्यांत सुख व्हावयाचें नाहीं.”

वर्धकिसूकर म्हणाला, “तर मग आतांच जाऊन आपण त्याच्या आश्रमाला वेढा देऊं आणि त्याचा नाश करूं.”

सर्व डुकर आपणावर धांवून येतात, असें पाहून त्या दुष्ट तपस्व्यानें आश्रमांतून पळ काढला! पण वर्धकिसूकरानें निरनिराळ्या ठिकाणीं डुकरांला पाठवून, त्याच्या वाटा पूर्वींच आडवून ठेविल्या होत्या. तो घाबरून जाऊन एका उदुंबर वृक्षावर चढला. डुकर वृक्षाभोंवतीं जमले. पण पुढें काय करावें हें त्यांना

अनुक्रमणिका

समजेना. कांहीं जण निराश होऊन म्हणाले, “आम्हीं याला पकडण्याची एवढी खटपट केली, पण ती व्यर्थ गेली! हा आतां आमच्या हातीं कसचा लागतो!”

वर्धकिसूकर म्हणाला, “गडे हो, आपलें धैर्य सोडूं नका. जर आपण एकजुटीनें काम केलें, तर वृक्षासकट या तपस्व्याला खालीं आणण्याचें आमच्या अंगीं सामर्थ्य आहे. आमच्या कळपांत म्हातारे कोतारे असतील त्यांना पाणी आणून वृक्षाच्या मुळांत शिंपू द्या व माझ्यासारखे ज्यांचे दांत प्रखर असतील त्यांना या झाडाचीं पाळें उकरून काढूं द्या.”

बोधिसत्त्वाच्या आज्ञेप्रमाणें सर्व डुकरांनीं काम करून तें झाड खालीं पाडलें, आणि त्या दुष्ट तपस्व्याचा तात्काळ प्राण घेतला! त्याच ठिकाणीं त्यांनीं बोधिसत्त्वाला राज्याभिषेक करून सर्व डुकरांचें स्वामित्त्व समर्पण केलें. त्या वनांत रहाणारी वनदेवता डुकरांचें संघसामर्थ्य पाहून मोठ्यानें म्हणाली, “धन्य संघशक्ती! आणि जे सामग्र्यानें वागतात तेहि धन्य होत! केवळ संघशक्तीच्या जोरावर या डुकरांनीं वाघाचा संहार करून आपणांस संकटापासून सोडविलें!”

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

८९. पक्वान्नापेक्षां साधें जेवण चांगलें. (२८६)

(सालूकजातक नं. २८६)

एका शेतकऱ्याच्या घरीं महालोहित आणि त्याचा धाकटा भाऊ चुल्ललोहित असे दोन बैल होते; व एक सालूक नांवाचा डुकर होता. त्या डुकराला यथास्थित खाण्यापिण्यास देण्यांत येई, तें पाहून चुल्ललोहित आपल्या वडील भावास म्हणाला, "दादा, आम्हीं या कुटुबांत पुष्कळ मेहनत करून धान्य वगैरे पैदा करतों, पण आमच्या वांट्याला शेवटीं कडबा आणि भुसाच येत असतो! पण हा पहा सालूक, कसा घरजांवयासारखा खुशाल मजा मारीत आहे! खावें, प्यावें इकडून तिकडे फिरावें! या शिवाय याला दुसरें कांहीं काम आहे तर पहा!"

त्यावर महालोहित म्हणाला, "बाबारे, उगाच असंतुष्ट होऊं नकोस आमच्या वांट्यांला जें कांहीं आलें आहे तें पुष्कळ आहे. सारा दिवस मेहनत करून थकल्यावर कडबा देखील गोड लागतो. आतां सालूकाचा एवढा मान कां होतो हें तुला लवकरच समजेल! जेव्हां आपल्या धन्याच्या घरीं मंगलकार्य होईल तेव्हां तुला असें दिसून येईल कीं, भुसा आणि कडबा खाण्यांतच सुख आहे, पण सालूकाची चैन नको! कांहीं अंशीं चैन करणें हें दीर्घायुषी होण्याचे लक्षण नव्हे!"

कांहीं दिवसांनीं त्या शेतकऱ्याच्या घरीं विवाहकार्य उपस्थित झालें; बरीच पाहुणीमंडळी गोळा झाली. दुसऱ्या दिवशीं मालकाच्या नोकरांनीं सालूकाचे हातपाय आणि तोड बांधून गळ्यावर सुरीचा प्रयोग चालविला! सालूक मोठमोठ्यानें ओरडूं लागला. चुल्ललोहित तें पाहून महालोहिताला म्हणाला, "दादा, तुम्ही म्हणत होतां तें यथार्थ आहे! कां कीं, हा चैन करणारा सालूक अल्पायुषी होऊन प्राणास मुकला; पण आम्हीं कडबा आणि भुसा खाऊन रहाणार अद्यापि जिवंत आहोंत; आणि पुढेंहि आमच्या वाटेस बहुधा कोणीहि जाणार नाहीं."

——***——

अनुक्रमणिका

९०. राजाची कृतज्ञता. (३०२)

(महाअस्सारोह जातक नं. ३०२)

एकदां बोधिसत्त्व वाराणसीचा राजा होऊन धर्मन्यायानें राज्य करीत असे. एके वेळीं त्याच्या राज्यांतील सरहद्दीवरील प्रांतांत मोठी बंडाळी झाली. तिचें शमन करण्यासाठीं राजा स्वतः गेला; परंतु एका लढाईत तो पराजित होऊन आपल्या घोड्यावरून पळत सुटला, आणि एका खेडेगांवात आला. तेथें पुष्कळ शेतकऱ्यांजवळ त्यानें आश्रय मागितला पण त्याला नुसतें उभें रहाण्यास देखील कोणी जागा देईना. शेवटीं एका शेतकऱ्याच्या घरीं जाऊन तो मोठ्या दीनवाण्या स्वरानें म्हणाला, “मी आज दोन तीन दिवस उपाशीं आहें, आणि माझा घोडा तर तहानेनें आणि भुकेनें व्याकूळ झाला आहे. मला आजच्या दिवसापुरता आश्रय द्याल तर मी आपला फार आभारी होईन.”

शेतकरी म्हणाला, “आपण जर आमच्या विरुद्ध बंड करणाऱ्या इसमांपैकीं नसाल तर आमच्या घरीं दोन दिवस खुशाल रहा.”

राजा म्हणाला, “मी वाराणसी राजाचाच नोकर असून त्याच्याच सैन्याबरोबर येथवर आलों आहें.”

तें ऐकून शेतकऱ्यानें त्याच्या घोड्याचा लगाम धरून त्यास खालीं उतरण्यास सांगितलें, आणि घोडा बाजूला नेऊन एका झाडास बांधला नंतर आपल्या बायकोकडून पाणी आणून या नवीन पाहुण्याचे पाय धुतले, व आपल्या घरीं असलेली भाजीभाकरी त्याला खावयास घालून एका बिछान्यावर विश्रांति घेण्याची विनंति केली. एवढें झाल्यावर त्याच्या घोड्याचें सामान वगैरे काढून त्याला खरारा केला आणि दाणापाणी देऊन त्याच्या पुढ्यांत चांगली ताजी वैरण टाकली. या रीतीनें त्या शेतकऱ्याच्या घरीं राजाचा दोन तीन दिवस उत्तम पाहुणचार राखण्यांत आला. शेतकऱ्याचा निरोप घेऊन जातेवेळीं राजा म्हणाला, “मी आमच्या महाराजाच्या मर्जीतला एक योद्धा आहे. मला थोरला घोडेस्वार असें म्हणतात. यदाकदाचित् तुमच्यावर कांहीं खटला वगैरे होऊन राजद्वारीं जाण्याचा प्रसंग आला, तर तुम्ही प्रथमतः मला येऊन भेटा म्हणजे आमच्या महाराजाला सांगून मी तुमचें काम करून देईन.”

शेतकऱ्यानें त्याचे आभार मानिले. तेव्हां राजा तेथून निघून गेला, आणि आपल्या सैन्याला जाऊन मिळाला. पुढें वाराणसीहून सैन्याची यथास्थित मदत येऊन पोहोंचल्यावर राजानें बंडखोरांचा पराभव करून त्यांना वठणीस आणलें; आणि आपल्या सैन्यासहवर्तमान तो वाराणसीला गेला. तेथें त्यानें नगरद्वारपाळांला बोलावून आणून असें सांगितलें कीं, “जर एखादा शेतकरी येऊन तुम्हाला थोरल्या घोडेस्वाराचे घर विचारील तर त्याला थेट माझ्या घरीं घेऊन या.”

बरेच दिवस शेतकरी कोणत्या तरी निमित्तानें वाराणसीला येईल व थोरल्या घोडेस्वाराची चौकशी करील अशी राजास आशा वाटत होती. परंतु वर्ष दोन वर्षें शेतकरी वाराणसीला मुळींच गेला नाहीं. कां कीं, त्याचें कोणाशींहि भांडण नसल्यामुळें सरकार दरबारांत जाण्याचा त्यावर प्रसंग नसे, आणि आपलें शेताचें काम सोडून उगाच चैनीसाठीं वाराणसीसारख्या दूरच्या शहरीं जाणें त्याला मुळींच आवडत नसे. त्याला आपल्यापाशीं आणण्याचा राजानें असा एक उपाय योजिला कीं, त्याच्या गांवावर एकदम दुप्पट कर वाढविला, तरी शेतकरी येईना. तेव्हां आणखीहि कर वाढविण्यांत आला. गांवांतील शेतकरी गोळा होऊन

या शेतकऱ्याला म्हणाले, “आसपासच्या गांवावर मूळचाच कर असून आमच्याच गांवावर एकसारखा कर वाढत आहे; याला तूंच कारण आहेस. तो घोडेस्वार आला कीं नाहीं, तो राजाचा नोकर होता कीं शत्रु होता हें आम्हाला काय माहीत. आणि त्याला जर आम्ही आमच्या गांवीं आश्रय दिला नसता तर आज आमच्यावर हा प्रसंग ओढवला नसता. आतां वाडवडिलांनी वसवलेला हा गांव सोडून मुलाबाळांना घेऊन दुसऱ्या कोठें तरी जाण्याची आमच्यावर पाळी येऊन राहिली आहे.”

त्यावर शेतकऱ्यानें उत्तर दिलें. “गडे हो, त्याच्या चेहऱ्यावरून तो घोडेस्वार लुच्चा नव्हता असें मी खात्रीनें सांगू शकतों. राजाची कांहीं तरी गैरसमजूत होऊन हा घोटाळा उपस्थित झाला असावा. आतां मी वाराणसीला जाऊन त्या घोडेस्वाराला भेटतों आणि आम्हा सर्वांची राजाच्या दरबारीं दाद लागेल अशी खटपट करतों. पण त्याला कांहीं भेट घेऊन जाणें इष्ट आहे. माझ्या घरीं मी कांहीं खाण्यापिण्याचे पदार्थ तयार करतों; परंतु गांवांतून वर्गणी गोळा करून त्याच्यासाठीं एक धोतरजोडा आणि त्याच्या बायकोसाठीं एक लुगडें घेऊन द्या. म्हणजे मी ताबडतोब वाराणसीला निघतों.

गांवकऱ्यांनीं दुसऱ्याच दिवशीं एक गांवठी धोतरजोडा आणि लुगडें त्याच्या स्वाधीन केलें आणि तो त्याच दिवशीं वाराणसीस जाण्यास निघाला.

अनुक्रमें वाराणसीच्या वेशीवर येऊन पोहोंचल्यावर तेथील नगररक्षकापाशीं त्यानें थोरल्या घोडेस्वाराची चौकशी केली. जमादारानें राजाज्ञेप्रमाणें त्याला ताबडतोब नेऊन उभे केलें. शेतकऱ्याला राजासमोर-गेल्यावर अद्यापि हा गृहस्थ राजा आहे, ही गोष्ट माहीत नव्हती. त्याला पाहिल्याबरोबर राजानें आसनावरून खाली उतरून आलिंगन दिलें, आणि राणीकडून पाणी मागवून त्याचे पाय आपण स्वतः धुतले; व त्याला सुग्रास भोजन खावयास घालून मोठ्या पलंगावर आणि उत्तम बिछान्यावर निजविलें. थोडी विश्रांति घेंऊन उठल्यावर शेतकऱ्यानें आपल्या पडशींतून खाऊ, धोतरजोडा आणि लुगडें बाहेर काढिलें; आणि तो राजाला म्हणाला, “मित्रा हा धोतरजोडा तुझ्यासाठीं आणला आहे; हे लुगडें तुझ्या बायकोसाठीं आणि हा खाऊ तुझ्या मुलांसाठीं आहे.”

राजानें तो धोतरजोडा फाडून त्यांतील एक धोतर परिधान कलें, आणि उपवस्त्रादाखल एक खांद्यावर घेतलें. तसेंच तें लुगडें आपल्या राणीला नेसावयास लावलें; आणि खाऊ थोडा आपण खाऊन देवाच्या प्रसादाप्रमाणें थोडाथोडा राजवाड्यांतील सर्व लोकांना वांटून दिला! शेतकऱ्यानें आपली फिर्याद पुढें मांडल्यावर राजा म्हणाला, “त्या वेळेला मी राजा आहे. असें सांगणें फार धोक्याचें होतें. म्हणून मी आपलें नांव गुप्त ठेविलें; आतां तुला मी खरी गोष्ट सांगतों कीं, मी थोरला घोडेस्वार नसून काशीराष्ट्राचा राजा आहे; केवळ तुला येथें आणण्यासाठींच तुझ्या गांवावर कर वाढविण्यांत आला आहे. परंतु हा कर वसूल करण्यांत येणार नाहीं. एवढेंच नव्हे तर, मूळचा कर जर वसूल करण्यांत आला असेल तर तोदेखील गांवकऱ्यांना परत करण्यांत येईल व यापुढें तुमच्या गांवावर कोणत्याही प्रकारें कर लादण्यांत येणार नाहीं. मात्र तूं या पुढें माझ्याच जवळ राहिलें पाहिजे.”

त्यावर शेतकरी म्हणाला, “महाराज, आम्हां शेतकऱ्यांना राजवाड्यांत सुख कसें होईल? आमची रोजची भाजी भाकरीच आम्हांला गोड लागते. तेव्हां मला माझ्या गांवीं जाऊन राहण्याची परवानगी द्या.”

अनुक्रमणिका

राजानें मोठ्या गौरवानें त्या शेतकऱ्याला त्याच्या गांवीं पाठवून दिलें. या यःकश्चित् मनुष्याचा झालेला गौरव पाहून पुष्कळ अमात्यांच्या पोटांत दुखूं लागलें. त्यांनीं युवराजाकडे अशी तक्रार केली कीं, राजा भलत्याच माणसाची पूजा करतो. तेव्हां तो लोकांस अप्रिय होईल. युवराजानें ही गोष्ट राजाजवळ काढिली तेव्हां तो म्हणाला, "बाबारे, या माणसानें मला जीवदान दिलें आहे. त्याच्यावर मी थोडाबहुत उपकार केला असतां तुम्हा सर्वांना वाईट का वाटावें?"

——***——

अनुक्रमणिका

९१. ठेंच लागल्यावर तरी शहाणें व्हावें. (३०४)

(दद्दरजातक नं. ३०४)

प्राचीन काळीं हिमालय पर्वतावर दद्दर नांवाच्या टेकडीखालीं नागांची मोठी वस्ती होती. त्यांच्या राजाला महादद्दर आणि चुल्लदद्दर असे दोन पुत्र होते. पैकीं पहिला आमचा बोधिसत्त्व होता. चुल्लदद्दर मोठा तापट असे. भलत्या भलत्याच्या अंगावर तुटून पडून तो मारामारी करी. त्याचा गुन्हा असह्य होऊन बापानें त्याला आपल्या राज्यांतून हाकून देण्याचा हुकूम फर्माविला. परंतु, बोधिसत्त्वानें विनंति करून बापाकडून त्याला क्षमा करविली. असा प्रकार दोन तीनदां घडून आला. चवथ्या वेळीं बोधिसत्त्व बापाजवळ क्षमा मागण्यास गेला तेव्हां नागराजा म्हणाला, “तूं त्याला क्षमा करण्यास सांगतोस म्हणून दिवसेंदिवस तो अधिकाधिक बिघडत चालला आहे. अर्थात् तूं त्याच्या गुन्ह्याला उत्तेजन देण्यास कारण झाला आहेस. म्हणून या खेपेस त्या बरोबर तुलाहि मी दंड करतों. दोघे माझ्या राज्यांतून बाहेर जाऊन वाराणसी बाहेर कचरा फेंकण्याच्या जागीं तीन वर्षें रहा; आणि या अवधींत चुल्लदद्दराचें वर्तन सुधारलें तरच परत या.”

त्यावर महादद्दर उत्तर देई, “बाबारे या तुझ्या तापटपणामुळें आम्हां दोघांवरही देशत्यागाचें संकट ओढवलें आहे. आतां पुनः तोच दुर्गुण अंतःकरणांत वाढूं दिलास, तर पुढें काय विघ्नपरंपरा ओढवेल हें सांगतां येत नाहीं! आम्हीं अज्ञांतवासांत आहों, हें लक्षांत ठेव आणि यःकश्चित् मुलांनीं किंवा इतर प्राण्यांनीं अपमान केला तरी तो सहन कर. ठेंच लागल्यावर तरी शहाणा हो!”

चुल्लदद्दरानें वडील भावाचें सांगणें ऐकलें आणि पोरासोराकडून घडणारी अवज्ञा मुकाट्यानें सहन केली. तीन वर्षें झाल्यावर चुल्लदद्दराचें वर्तन चांगलें सुधारलें आहे असें जाणून नागराजानें त्यांना पुनः आपल्या राज्यांत बोलावून नेलें.

——***——

अनुक्रमणिका

९२. शीलाची परीक्षा. (३०५)

(सीलवीमंसनजातक नं. ३०५)

एका काळीं बोधिसत्त्व वाराणसींत एका प्रसिद्ध आचार्यापाशीं शास्त्राध्ययन करीत असे. त्या आचार्याची एकुलती एक मुलगी वयांत आली होती. तिला आपल्या शिष्यांपैकीं एकाला द्यावी असा आचार्यांचा बेत होता. पण तो अमलांत आणण्यापूर्वी आपल्या शिष्याचें शील कसोटीस लावून पहावें; आणि त्यांत जो उत्तम ठरेल त्यालाच मुलगी द्यावी. असा विचार करून एके दिवशीं तो आपल्या शिष्यांला म्हणाला, “मुलांनो मी माझ्या एकुलत्या एक मुलीचें लग्न करूं इच्छित आहें. या मंगल समयीं तुम्ही मला मदत केली पाहिजे. ती अशी कीं, प्रत्येकानें आपापल्या घरातूंन एकेक वस्तू चोरून आणावी, आणि ती माझ्या स्वाधीन करावी. परंतु तुम्ही चोरी करतांना जर कोणी पाहील तर त्या वस्तूचा मी स्वीकार करणार नाहीं. तेव्हां कोणीहि प्राणी पहाणार नाहीं, अशा ठिकाणींच चोरी करून लग्नाच्या उपयोगी पडणारें सामान घेऊन या.”

सगळ्या शिष्यांनीं आपापल्या घरांतून कोणाला न कळत कोणी दागिना, तर कोणी कपडा, तर कोणी पैसे, अशा निरनिराळ्या वस्तू सवडीप्रमाणें चोरून आणून गुरूच्या हवालीं केल्या. गुरूनें जी वस्तू ज्या शिष्यानें आणली त्या वस्तूवर त्याच्या नांवाची चिठी बांधून ती आपल्या कोठींत निराळी ठेवून दिली. सर्वांनी यथाशक्ति पदार्थ आणले, पण बोधिसत्त्वानें कोणतीच वस्तू आणली नाहीं. तेव्हां आचार्य म्हणाला, “माझ्या सर्व शिष्यानीं यथाशक्ति कोणता ना कोणता पदार्थ आणला आहे. पण तूं मात्र कांहीं एक आणलें नाहींस! किंबहुना आणण्याचा प्रयत्न देखील केला नाहींस! मला वाटतें तूं या सर्व शिष्यांत अत्यंत आळशी आहेस!”

बोधिसत्त्व म्हणाला, “गुरुजी, आपली आज्ञा न पाळण्याच्या हेतूनें किंवा आळसानें मी कांहीं प्रयत्न केला नाहीं असें नव्हे पण आपल्या हुकुमाप्रमाणें वागणें केवळ अशक्य आहे म्हणून मी खटपट केली नाहीं.”

आचार्यानें असें कां? असा प्रश्न केल्यावर बोधिसत्त्व म्हणाला, “गुरुमहाराज, ज्या ठिकाणीं पहाणार नाहीं अशाच जागीं चोरी करून आणा अशी आपली आज्ञा आहे पण अशी जागा भूमंडळावर कशी सांपडेल? अरण्यांत वनदेवता आपलें कृत्य पहात असतात. अशा ठिकाणीं एकांत आहे अशी मूर्ख माणसाचीच काय ती समजूत असते! आणि जेथें वनदेवता नाहींत अशा स्थळीं आपला अंतरात्माच आपलें कृत्य पहात असतो! अर्थात् एकांत स्थळ सांपडणार कसें? जेथें इतर प्राणी नसतात, त्या स्थळीं आपण स्वतः असल्यामुळें त्याला एकांतस्थळ म्हणतां येत नाहीं.”हें बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून आचार्य त्यावर फार प्रसन्न झाला आणि म्हणाला, “बा मुला, तुम्हा सर्वांचें शील कसोटीला लावण्यासाठीं मी ही युक्ति योजिली होती. माझ्या शिक्षणाचें खरें रहस्य तुलाच समजलें असें म्हटलें पाहिजे. इतर विद्यार्थ्यांना तें समजलें असतें, तर त्यांनीं माझ्या बोलण्याचा विचार न करितां चोरून वस्तू आणल्या नसत्या!”

याप्रमाणें बोधिसत्त्वाची तारीफ करून आचार्यानें आपल्या मुलीशीं त्याचा विवाह लावून दिला. आणि इतर शिष्यांनीं आणलेल्या वस्तू ज्याच्या त्यास परत करून तो म्हणाला, “मुलांनों आपल्या गुरूनें किंवा वडिलांनीं जरी कांहीं सांगितलें तरी त्याचा नीट विचार केल्याशिवाय आपण कार्याला प्रवृत्त होतां कामा नये. दुसऱ्याच्या विचारानेंच चालणारा मनुष्य फसल्याशिवाय रहात नाहीं. म्हणून तुमच्याच बुद्धीनें तुमच्या शीलाचें रक्षण करा.”——***——

अनुक्रमणिका

९३. हीं कशाचीं फळें! (३०६)

(सुजातजातक नं. ३०६)

एका राजानें एका सुस्वरूप माळ्याच्या मुलीशीं लग्न केलें होतें. राणी होण्यापूर्वी ती टोपलींत बोरें घेऊन विकावयास जात असे. पण राणी झाल्यावर तिचा थाटमाट फारच वाढला. जणूं काय ती स्वर्गांतून खालीं उतरली होती! एके दिवशीं रंगमहालांत बसून राजा बोरें खात होता इतक्यांत ही राजाची आवडती राणी तेथें आली आणि राजाला पाहून म्हणाली, “हां, ताटामध्यें कशाचीं फळें आहेत? याचा आकार वाटोळा दिसतो. पण तीं कोणत्या झाडाचीं आहेत तें सांगतां येत नाहीं!”हे राणीचे लाडके बोल ऐकून राजाला फार संताप आला; आणि तो म्हणाला “प्रिये पूर्वीं चिंध्या नेसून हींच फळें वेंचण्यांत तुझा सारा जन्म गेला आहे! असें असून इतक्या अल्पावधींत तुला फळांचा विसर पडला! तेव्हां राजभोगांनीं तुझी दृष्टी अंध झाली असली पाहिजे! हलकट माणसाला राजोपभोग जिरत नसतात, अशी जी म्हण आहे, ती खोटी नाहीं! आतां या तुझ्या रोगावर चांगला उपाय म्हटला म्हणजे पुनः तुझ्या बापाच्या घरीं पाठवून तुला माळ्याचें काम करावयास लावणें हा होय!”राजा आपल्या नोकरांकडे वळून म्हणाला, “अरे हिला ईच्या आईच्या घरीं नेऊन सोडा आणि तेथें तिला पूर्वींप्रमाणें माळणीचें काम करूं द्या!”

त्या वेळीं राजाचा अमात्य आमचा बोधिसत्त्व तेथें जवळच उभा होता. तो राजाला म्हणाला, “अज्ञ माणसाच्या हातून चुका घडणें साहजिक आहे. राजसंपत्ती मिळाल्यानें साधारण माणसें बिघडून जातात, यांत कांहीं संशय नाहीं. तथापि आपण उदार असल्यामुळें इला एकवार क्षमा करणें योग्य आहे. यापुढें तिच्या हातून असा प्रमाद होणार नाहीं अशी मला आशा आहे.”

बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून राजाचा क्रोध शमन पावला आणि त्यानें राणीच्या मूर्खपणाबद्दल तिला क्षमा केली.

——***——

अनुक्रमणिका

९४. हिंस्त्र प्राण्याची कृतज्ञता. (३०८)

(जबसकुणजातक नं. ३०८)

एके दिवशीं मांस खात असतां एका सिंहाच्या घशांत हाड अडकलें; तें कांहीं केल्या निघेना. सिंह वेदनांनीं पीडित होऊन मोठमोठ्यानें आरडूं ओरडूं लागला. गळा सुजून मोठा झाला. अशा स्थितींत एक चिमुकला पक्षी त्याला पाहून त्याच्याजवळ जाऊन ह्मणाला "भो मृगराज, तूं असा विव्हळ कां झाला आहेस?"

सिंह म्हणाला, "बाबारे, तुला माझ्या दुःखाची कहाणी सांगून काय उपयोग? माझ्या घशांत हाड अडकल्यामुळें माझ्यानें बोलवत देखील नाहीं. मग खाण्याची गोष्ट बाजूला राहिली!"

पक्षी म्हणाला, "तुम्ही जर मला अभयदान द्याल, तर मी तुमच्या घशांत अडकलेलें हाड आतांच काढून टाकीन."

सिंहानें त्याचे फार आभार मानिले आणि त्याला हाड काढण्यास सांगितलें. पक्षी मोठा हुशार होता. न जाणों आपण तोंडांत शिरल्यावर हा आपणाला तेथेंच दाबून टाकील! अशी भीति वाटून त्यानें सिंहाच्या खालच्या आणि वरच्या जबड्याच्या दरम्यान एक तेवढ्या बेताची काठी उभी करून ठेवली; आणि घशांत शिरून आपल्या चोचीनें तें हाड आडवें पाडलें; तेव्हां तें आपोआपच बाहेर निघालें. पुनः पक्षानें सिंहाच्या जबड्यांमधील काठी काढून तेथून उड्डाण केलें.

दुसऱ्या दिवशीं सिंहानें एका वनमहिषाची शिकार केली, आणि तो त्याच ठिकाणीं बसून त्यांचे मांस खाऊं लागला. पक्षीहि सिंहाच्या समाचाराला तेथें आला होता, तो त्याला म्हणाला, "भो महाराज, आपली प्रकृति साफ बरी झाली असें दिसतें."

त्यावर सिंह म्हणाला, "बरी झाली म्हणूनच आज शिकार करून ही मेजवानी चालली आहे!"

पक्षी म्हणाला, "अशा प्रसंगीं तुम्ही मला विसरणार नाहीं अशी माझी खात्री आहे. कां कीं, कालच मीं तुमच्यावर मोठा उपकार केला आहे."

सिंह म्हणाला, "पण त्या उपकाराचें बक्षिसहि मी तुला कालच देऊन टाकलें आहें!"

पक्षी म्हणाला, "तें कोणतें बरें."

सिंह म्हणाला, "हें पहा, मी सर्वथैव प्राण्याची हिंसा करून आपलें पोट भरणारा प्राणी असून तुला माझ्या तोंडांतून जिवंत जाऊं दिलें, हे तुझ्यावर मोठेच उपकार नाहींत काय? आणखी माझ्याजवळ निराळें बक्षीस मागतोस हा तुझा मोठाच अपराध होय!"

पक्षी म्हणाला, “आपण म्हणतां ही गोष्ट अगदीं खरी आहे! ज्या प्राण्यावर उपकार केला असतां अपकार होण्याचा संभव असतो, ज्याला मित्रधर्म काय हें ठाऊक नसतें, अशा प्राण्यापासून प्रत्युपकाराची अपेक्षा न करितां मुकाट्यानें निघून जावें हें बरें!!”

असे उद्‌गार काढून पक्षी तेथून उडून गेला.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

९५. मांगाचा धार्मिकपणा. (३०९)

(छवकजातक नं. ३०९)

एका जन्मीं बोधिसत्त्व चांडाळ कुलांत जन्म घेऊन वयांत आल्यावर आपल्या कुटुंबाचें यथाशक्ति सन्मार्गानें पालनपोषण करीत असे. त्याच्या बायकोला भलत्याच ऋतूंत आंबे खाण्याचे डोहाळे झाले. नवऱ्याला आंबे आणण्याविषयीं तिनें फारच आग्रह केला, नव्हे, हट्ट धरला. पण त्या ऋतूंत आंबे मिळावे कसे? बोधिसत्त्वानें तिची पुष्कळ समजूत घातली. दुसरें कांहीं आंबट फळ खाऊन आपले डोहाळे भागव असें त्यानें तिला सांगितलें, पण ती कांहीं केल्या ऐकेना. त्या वेळीं वाराणसी राजाच्या उद्यानांत त्या ऋतूंत देखील आंब्याला फळें येत असत. निदान लोकांच्या ऐकण्यांत तरी अशी गप्प होती. आपल्या भार्येला वांचविण्यासाठीं बोधिसत्त्वानें जिवाची पर्वा न करितां त्या उद्यानांत रात्रीं प्रवेश केला. आंब्यांचा शोध करण्यांत ती रात्र घालविली. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्याच्या हातीं एकहि आंबा लागला नाहीं! पहाटेला माळी लोक उठून जिकडे तिकडे पाणी वगैरे शिंपूं लागले. तेव्हा उद्यानांतून पळून जाणें धोक्याचें वाटून बोधिसत्त्व एका मोठ्या आंब्याच्या झाडावर दडून बसला. वाराणसीचा राजा आपल्या पुरोहिताला बरोबर घेऊन त्या झाडाखालीं येत असे आणि पुरोहिताकडून मंत्र शिकत असे. परंतु आपण एका उच्चासनावर बसून पुरोहिताला तो जमिनींवरच बसवीत असे! त्या दिवशीं हा प्रकार बोधिसत्त्वाला असह्य वाटून मंत्राध्ययन चाललें असतां त्यानेंएका आंब्याच्या फांदीला लोंबकळून राजा आणि पुरोहित यांच्या मध्यभागीं उडी टाकिली! आणि तो म्हणाला, “महाराज मी नष्ट झाल्यासारखाच आहे! पण तुमचा आणि पुरोहिताचा हा प्रकार पाहून मला फार वाईट वाटतें.”राजा म्हणाला “असें कां?”“महाराज, आपण दोघेहि धर्म जाणत नाहीं. गुरूला खालीं बसवून आपण अध्ययन करणें हा शिष्याचा धर्म नव्हे. आणि खाली बसून उच्चासनावर बसलेल्या शिष्याला पाठ सांगणें हा गुरूचा धर्म नव्हें! तेव्हां आपण दोघेहि पतित आहां असें मला वाटतें.”

तें बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून पुरोहित म्हणाला, “अरे, तू मोठी धर्माची गोष्ट सांगत आहेस. परंतु राजाच्या घरीं सुग्रास भोजन मला मिळत असल्याकारणानें या ऋषिप्रणीत धर्माची मला मातबरी वाटत नाहीं!”

बोधिसत्त्व म्हणाला, “अशा अधर्मानें पोटाची खळी भरण्यापेक्षां प्रव्रज्या होऊन भिक्षेचें अवलंबन केलेलें बरें! राजाच्याच घरीं अन्न शिजतें आहे, आणि इतरांच्या घरीं शिजत नाहीं, असें नाहीं. तेव्हां हा नरकाला जाण्याचा मार्ग सोडून देऊन तेथून बाहेर पड! नीचपणानें आणि अधर्मानें मिळविलेल्या धनद्रव्याला आणि कीर्तीला धिःकार असो!”

हें बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून राजा प्रसन्न झाला आणि म्हणाला, “हे मुनष्या तुझी जात कोण?”बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज मी मांग आहे.”

राजा म्हणाला, “जर तूं उच्च कुळांतला असतास, तर तुला आज मी मोठ्या पदवीस चढविलें असतें. तथापि तुझी योग्यता मोठी असल्याकारणानें मी तुला नगररक्षकाच्या पदावर नेमतों. दिवसा जरी मी राजा असलों तरी रात्रीं तुझीच ह्या नगरांत सत्ता राहील.”

अनुक्रमणिका

असें म्हणून राजानें त्याच्या गळ्यांत तांबड्या फुलांची माळ घातली आणि त्याला ताबडतोब कोतवालाची जागा दिली. तेव्हांपासून कोतवाल तांबड्या फुलांची माळ घालीत असत.

भाग पहिला समाप्त.

——***——

अनुक्रमणिका

जातककथासंग्रह

भाग दुसरा

अनुक्रमणिका

१०४. निंबदेवतेचा दूरदर्शीपणा. (३११)

(पुचिमंद जातक नं. ३११)

प्राचीन काळीं चोराला निंबाच्या लाकडाच्या सुळावर देण्याची वहिवाट असे. एके दिवशीं एक चोर गांवांत चोरी करून पहांटेला गांवाबाहेरील एका निंबाच्या झाडाखालीं येऊन निजला. त्याला गाढ झोंप लागल्यामुळें तो सूर्योदयापर्यंत तसाच निजून राहिला असता; परंतु त्या झाडावर राहणारी देवता त्याला जागें करून म्हणाली, “अरे मूर्ख चोरा, चोरी करून येथें निजून कां राहिलास. तुझ्यामागें गांवांतील लोक लागले असतील, आणि ते जर या ठिकाणीं आले तर तुला पकडून ठार मारतील.”

चोर गडबडून उठून चोरीचा माल घेऊन पळत सुटला! तें पाहून जवळच्या पिंपळावर रहाणारी अश्वत्थ देवता निंबदेवतेला म्हणाली, “बाईग, या चोरानें वाईट कर्म केलें असून त्याला जर लोकांनीं पकडलें, तर तुझें त्यांत काय गेलें? त्याला येथून उठवून घालवून देण्याची उठाठेव करण्याचें काय प्रयोजन?”

निंबदेवता म्हणाली, “बाई, अश्वत्थ देवते, तूं यांतलें मर्म जाणत नाहींस! या चोराला जर लोकांनीं पकडलें, तर त्याला सुळावर देण्यासाठीं लोक माझ्या या झाडाचा संहार करतील अशी मला भीति वाटते! कां कीं, चोराला पकडून निंबाच्या लांकडाच्या सुळावर चढविण्याची या देशांत वहिवाट आहे.”

हें त्या देवतेचें संभाषण संपलें नाहीं तोंच गांवांतील लोक चोराचा पाठलाग करीत त्या ठिकाणीं आले, आणि तेथें पडलेल्या कांहीं वस्तू पाहून चोर येथेंच निजला असावा, अशी त्यांस शंका आली, व ते म्हणाले, जर हा चोर येथें सांपडला असता, तर याच निंबाच्या झाडाचा सूळ करून त्यावर त्याला चढविलें असतें.”

असें परस्परांशीं बोलून ते तेथून निघून गेले. हें त्यांचें भाषण ऐकून अश्वत्थदेवता म्हणाली, “बाई निंबदेवते, तूं मोठी दूरदर्शी आहेस. हा चोर जर येथेंच निजून राहिला असता, तर त्याच्या बरोबरच तुझ्या या झाडाच्या जिवावरहि कठीण प्रसंग आला असता! तेव्हां तुझा हा दूरदर्शीपणा अत्यंत स्तुत्य होय.”

——***——

अनुक्रमणिका

१०५. सशाचा आत्मयज्ञ. (३१६)

(ससजातक नं. ३१६)

एकदां आमचा बोधिसत्त्व सशाच्या कुळांत जन्मला होता. तो वयांत आल्यावर आपला कळप सोडून एका शांत प्रदेशांत पर्वताच्या पायथ्याशीं रहात असे. तो प्रदेश फारच रमणीय होता. जवळच एक नदी मंदगतीनें वहात होती; आणि बाजूला एक खेडेगांव होता. तेथें आमच्या या शशपंडिताप्रमाणेंच एकांताची आवड धरणारे तिसरे तीन प्राणी होते, एक मर्कट, एक कोल्हा व एक ऊद. पण त्या सर्वांत आमचा बोधिसत्त्वच विशेष शहाणा होता, आणि त्याच्याच सल्ल्यानें बाकी तिघे प्राणी चालत असत. शशपंडित त्यांना वारंवार उपदेश करीत असे. दान, शील इत्यादि गोष्टींपासून फायदे तो त्यांच्या नजरेस आणून देई.

एके दिवशीं आकाशांतील ताऱ्यांकडे पाहून बोधिसत्त्व आपल्या मित्रांला म्हणाला, “गडे हो, उद्या पौर्णिमेचा उपोसथ आहे. या दिवशीं आपण वेळेवर जेवण करून धर्मचिंतनांत काळ घालवूं या. सगळ्यांना ही गोष्ट पसंत पडली. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं ऊद आपले भक्ष्य मिळविण्यासाठीं नदीतीरावर फिरत असतां त्याला नदीतीरावर एका कोळ्यानें मारून टाकलेले रोहित मत्स्य सांपडले. त्यानें मालकाचा इतस्ततः शोध केला. परंतु कोणीच तेथें दिसून न आल्यामुळें हे बिनवारशी मासे असावे असें वाटून त्यानें ते आपल्या राहण्याच्या बिळांत आणून ठेविले; आणि दुपारीं वेळेवर खाईन असा विचार करून तो धर्मचिंतन करीत स्वस्थ बसला. कोल्ह्यालाहि जवळच्या शेतांत एका शेतकऱ्यानें टाकून दिलेलें दह्यानें भरलेलें भांडे व कांहीं भाजलेलें मांस सांपडलें. तें घेऊन त्यानें आपल्या घरांत आणून ठेविलें, आणि तोहि धर्मविचारांत मग्न होऊन बसला. माकडानें आपल्या दुपारच्या फराळासाठीं कांहीं पिकलेले आंबे गोळा करून ठेविले. पण आमचा शशपंडित दुपार झाल्यावर दूर्वा खाऊन आपला उदरनिर्वाह करीन अशा बेतानें स्वस्थ बसून राहिला.

इंद्राला या चार प्राण्यांची तपश्चर्या पाहून फार आश्चर्य वाटलें. आणि त्यांची कसोटी पहाण्यासाठीं ब्राह्मण वेषानें तो त्या अरण्यांत प्रगट झाला. प्रथमतः उदाजवळ जाऊन तो म्हणाला, “बा उदा, मी या अरण्यांत उपोसथ व्रत पाळण्याच्या उद्देशानें आलों आहे. परंतु मजपाशीं शिधासामग्री कांहीं नाहीं, आणि आतां खेडेगावांत जाऊन भिक्षा मागण्याला हि अवकाश राहिला नाहीं. तेव्हां जर मला कांहीं खाण्यासाठीं देशील, तर मी तुझे उपकार मानून उपोसथव्रत पाळीन.”ऊद म्हणाला, “हे ब्राह्मणा, मजपाशीं नदीच्या कांठीं सांपडलेले सात रोहित मत्स्य आहेत. ते भाजनू खाऊन या अरण्यांत खुशाल धर्मचिंतनांत काळ घालीव.”

इंद्र म्हणाला, “मी इतक्यांत काष्ठें वगैरे गोळा करून घेऊन येतों. तोपर्यंत ते मासे तसेंच राहूं द्या.”

असें बोलून इंद्र कोल्ह्यापाशीं गेला आणि त्याजवळहि कांहीं खावयास मागूं लागला. तेव्हां कोल्हा म्हणाला, “हे ब्राम्हणा, शेतकऱ्यानें जवळच्या शेतांत टाकून दिलेलें आंबट दह्याचें भांडें आणि घोरपडीचें मांस मला सांपडलें तें मी येथें आणून ठेविलें आहे. या पदार्थावर आपला निर्वाह करून आजचा दिवस तूं खुशाल येथें रहा.”

जरा वेळानें येतों असें सांगून इंद्र तेथून माकडाजवळ गेला आणि त्याजवळ कांही खाण्याचा पदार्थ मागूं लागला. तेव्हां माकड म्हणाला, “भो ब्राह्मणा, उत्तम पिकलेले आंबे आणून मी येथें ठेविले आहेत. जवळ नदीचें स्वच्छ आणि गार पाणी वहात आहे. व या झाडाची सावली फार घनदाट आहे. या सर्वांचा उपभोग घेऊन तूं आजचा दिवस येथेंच धर्मचिंतनांत घालीव.”

त्यालाही कांहीं वेळानें येतों असें सांगून इंद्र सशाकडे गेला आणि कांही भोज्य पदार्थ असेल तर तो देण्याविषयीं त्यानें नम्रपणें याचना केली तेव्हां ससा म्हणाला, “ब्राह्मण महाराज, आपण येथें अग्नि प्रदीप्त करा म्हणजे तुम्हाला खाण्याला योग्य अशी एकच योग्य वस्तू मजपाशीं आहे ती मी अर्पण करतों.”

इंद्रानें शुष्क काष्ठें गोळा करून आपल्या प्रभावानें तेथें अग्नि उत्पन्न केला. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज सशापाशीं तीळ किंवा तांदुळ कोठून असणार? अथवा दुसरा एखादा खाद्य पदार्थ तरी माझ्यासारख्या दुर्बळ प्राण्यानें कोठून आणावा? आतां आपल्या उपयोगीं पडणारा असा माझा देहच काय तो मजपाशीं आहें! मनुष्याला सशाचें मांस फार आवडतें असें आम्ही ऐकतों. तेव्हां या अग्नीनें भाजलेल्या माझ्या शरीरांतील मांस खाऊन आपण तृप्त व्हा! आणि येथें धर्मचिंतनात आपला काळ घालवा!”

असें म्हणून बोधिसत्त्वानें आपल्या लवेंत अडकलेले बारीकसारीक प्राणी निघून जावे व त्यांचा आपल्या बरोबर नाश होऊं नये म्हणून आपलें अंग त्रिवार झाडलें, आणि इंद्रानें उत्पन्न केलेल्या अग्नींत मोठ्या आनंदानें उडी टाकली! सशपंडिताचें हें दानशौर्य पाहून इंद्र अत्यंत चकित झाला! त्याच्या प्रभावानें सशाला अग्नीची बाधा मुळींच झाली नाहीं. त्याला बाहेर काढून आपल्या हातावर घेऊन इंद्र म्हणाला, “तुझ्यासारखा दानशूर मला कोणी आढळला नाहीं. तुझें स्मारक चिरकाल रहावें म्हणून तुझें चित्र मी आज रात्रीं पूर्ण चंद्रावर काढून ठेवितों त्या रात्रीं इंद्रानें एक डोंगर पिळून त्याचा रस काढला आणि त्या रसानें पूर्णचंद्रावर सशाचें सुंदर चित्र काढलें. चंद्र दूर अंतरावर असल्यामुळें आम्हांला तें चित्र नीट दिसत नाहीं. तथापि शसपंडिताच्या दानशौर्याची ती खूण आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

यःकश्चित् प्राण्याच्या या औदार्यापासून मनुष्यांनीं परोपकारासाठीं आत्मयज्ञ करण्याचा धडा शिकावयास नको काय?

——***——

अनुक्रमणिका

१०६. गेल्याचा शोक वृथा. (३१७)

(मतरोदकजातक नं. ३१७)

एकदां आमचा बोधिसत्त्व एका मोठ्या श्रीमंत व्यापाऱ्याच्या कुळांत जन्मला होता. लहानपणींच त्याचा बाप निवर्तल्यामुळें सर्व कुटुंबाचा भार त्याच्या वडील भावावर पडला. बोधिसत्त्व वयांत आल्यावरहि आपल्या वडील भावाच्याच आश्रयानें रहात असे. कांहीं काळानें एकाएकीं त्याचा वडील भाऊ मरण पावला. तेव्हां सर्व नातेवाईक मंडळी गोळा होऊन मोठ्या मोठ्यानें आक्रोश करूं लागलीं. परंतु बोधिसत्त्व मोठा विचारी असल्याकारणानें शोकापासून दूर राहिला. तेव्हां त्याचे नातलग म्हणाले कीं, भावाची सर्व सत्ता आपल्या हातीं आल्यामुळें याला आनंद झाला असावा. म्हणून हा रडत नाहीं किंवा शोक करीत नाहीं. तें ऐकून बोधिसत्त्व म्हणाला, “गेल्याचा शोक करून कांहीं निष्पन्न झालें असतें तर मीहि तुमचें अनुकरण केलें असतें. मेलेला माणूस परत येत नाहीं. किंवा आपल्या शोकानें त्याला सद्‌गती मिळते असें नाहीं. तेव्हां त्याजबद्दल आक्रोश करून आपल्या जीवाला पीडा देण्यांत कोणता अर्थ बरें? आणखी मी तुम्हाला असे विचारतों कीं, जर तुम्ही माझ्या भावाबद्दल शोक करितां तर मजबद्दल आणि तुम्हा परस्परांबद्दलही कां करीत नाहीं? कां कीं, आम्ही सर्वजण मरणारच आहोंत. मेलेल्या माणसाबद्दल जर शोक करावयाचा तर जे मरणार आहेत त्याजबद्दल अधिकच शोक केला पाहिजे. असें असतां तुम्ही केवळ एकट्याच माझ्या मृत भावाला उद्देशून रडत आहां हें आश्चर्य नव्हें काय? अशा प्रसंगीं शोकाचा आपल्या मनावर पगडा बसवूं न देणें हें सुज्ञ माणसाचें कर्तव्य आहे. आणि त्याबद्दल जरी अडाणी लोकांनीं दोष दिला तरी त्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.”

या प्रमाणें बोधिसत्त्वानें आपल्या उपदेशानें नातलगांना शोकापासून मुक्त केलें.

——✱✱✱——

अनुक्रमणिका

१०७. बोलण्या सारखें चालावें. (३२०).

(सच्चजातक नं. ३२०)

वाराणसीच्या राजाची आपल्या वडील मुलावर अवकृपा झाल्यामुळें त्याला राज्यांतून घालवून देण्यांत आलें. तो आपल्या पत्नीसह सरहद्दीवरील एका गांवीं जाऊन राहिला. कांहीं काळानें त्याचा बाप मरण पावला तेव्हां प्रधानमंडळानें राज्य स्वीकारण्याविषयीं त्याला आमंत्रण केलें. भार्येसह वर्तमान वाराणसीला येत असतां वाटेंत एका टेंकडीकडे पाहून त्याची पत्नी त्याला म्हणाली, “आर्यपुत्र, जर ही टेंकडी सोन्याची झाली तर तुम्ही काय द्याल?”राजपुत्र म्हणाला, “तुला मी यांतील कांहीं एक देणार नाहीं. लोकहिताचीं पुष्कळ कामें करण्यासारखीं आहेत.”

त्याच्या पत्नीला या बोलण्याचा अत्यंत विषाद वाटला. पुढे वाराणसीला आल्यावर राजपुत्राला राज्याभिषेक करण्यांत आला. त्यानें आपल्या धर्मपत्नीला पट्टराणी केलें. महाराणीची पदवी मिळाली होती. तथापि, तिनें राजाजवळ कोणत्याहि उपभोग्य वस्तूची याचना केली नाहीं. राजा काल्पनिक लाभांतून कांहीं देण्याला तयार नाहीं तर मग खऱ्या संपत्तींतून तो काय देईल, असें वाटून आपली विनाकारण फजिती करून घेऊं नये म्हणून राणीनें असलेल्या स्थितींत आनंद मानला. आमचा बोधिसत्त्व त्या राजाचा एक अमात्य होता. महाराणीची ही दीनस्थिति पाहून तो तिला म्हणाला, “राणीसाहेब आपल्या योग्यतेप्रमाणें आपला थाटमाट कां ठेवीत नाहीं?”

राणी म्हणाली, “बा पंडिता, तुला याचें इंगीत माहित नाहीं. राजेसाहेबाबरोबर मी येत असतां वाटेंतील टेंकडी सोन्याची झाली तर मला काय द्याल असा मी त्यांना प्रश्‍न केला. पण त्यांनीं ठोक जबाब दिला कीं, तुला त्यांपैकीं कांही एक मिळावयाचें नाहीं. “वचने किं दरिद्रता’ या न्यायानें राजेसाहेबाकडून नुसता काल्पनिक त्यागदेखील घडला नाहीं, “मग आतां त्यांच्याकडून खरा त्याग कसा घडेल?”

बोधिसत्त्व म्हणाला, “एके दिवशीं आपल्यासमक्ष महाराजापाशीं मी आपणाला कांहीं अधिक नेमणूक करून द्यावी अशी गोष्ट काढतों. त्यावेळीं आपण सोन्याच्या टेंकडीची गोष्ट सांगा.”

राणीला ही गोष्ट पसंत पडली. बोधिसत्त्वानें संधि साधून राजापाशीं राणीसाहेबाला त्यांच्या योग्यतेप्रमाणें योग्य नेमणूक करून देण्याची गोष्ट काढली. तेव्हां राणी म्हणाली, “महाराजांनीं वाटेंत काल्पनिक सोन्याची टेंकडीदेखील मला देण्याचें नाकारलें; तर मग आतां त्यांच्या हातीं आलेल्या खऱ्याखुऱ्या वस्तूंतून ते मला काय देतील?”

राजा म्हणाला, “काल्पनिक असो वा खरें असो जें आपणाला देणें शक्य असेल तेवढेंच देण्याचें आपण अभिवचन दिलें पाहिजे. बोलण्यासारखें चालावें असा माझा बाणा आहे. ती टेंकडी सोन्याची झाली असती, तर तुला देतां आली असती काय? जर नाहीं तर खुशाल घेऊन जा असें म्हणण्यांत काय अर्थ?”

राणी म्हणाली, “महाराज, आपण धन्य आहां, कां कीं, अत्यंत दरिद्रावस्थेंत सांपडला होतां तरीदेखील आपली सत्यनिष्ठा ढळली नाहीं. “बोले तैसा चाले”हा बाणा आपण सोडला नाहीं.”

अनुक्रमणिका

त्यावर बोधिसत्त्व म्हणाला, “महाराणीसाहेब आपणाला खरी धर्मपत्नी असेंच म्हटलें पाहिजे, कां कीं, राजेसाहेब विपद्ग्रस्त झाले होते तरी तुम्ही त्यांस सोडलें नाहीं; आणि संपत्काळीं त्यांजपाशीं आपला बडेजाव वाढविण्याविषयीं कधीं याचना केली नाहीं. असलेल्या स्थितींत संतोषानें वागून त्यांना आपण सर्वथैव सुखी करण्याचा प्रयत्न केला आहें. हें जाणून महाराजही आपली विचारल्यावांचून योग्य संभावना करतील अशी मला आशा आहे.”

बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून राजानें राणीच्या सर्व उणीवा भरून काढल्या आणि तिनें विचारल्यावांचून तिचा योग्य आदरसत्कार व्हावा असा बंदोबस्त केला.

——***——

अनुक्रमणिका

१०८. मूर्खाला उपदेश केल्याचें फळ. (३२१)

(कुटिदूसक जातक नं. ३२१)

हिमालयावर एकदां एक माकड पावसांत भिजून थंडीनें कुडकुडत एका झाडाखालीं बसला होता. त्या वृक्षावर घरटें बांधून रहाणारा पक्षी त्याला म्हणाला, “मनुष्यासारखे तुझे हातपाय आहेत आणि डोकेंही मनुष्यासारखें दिसतें आहे. तर मग चांगलें घरटें न बांधतां तूं पावसांत कुडकुडत कां बसलास?”

त्यावर वानर म्हणाला, “मनुष्यासारखे हातपाय वगैरे माझे अवयव आहेत खरे. परंतु मनुष्याजवळ जी एक बुद्धि नांवाची वस्तु आहे, ती मजपाशीं नाहीं.”

तो पक्षी म्हणाला, “ज्याच्या चित्ताला स्थिरता नाहीं आणि दुसऱ्याचा द्रोह करण्यांत ज्याचा काळ जातो व ज्याच्या अंगीं सद्‌गुण वास करीत नाहींत त्याला सुख कसें प्राप्त होईल? म्हणून असला दुष्ट स्वभाव सोडून देऊन सद्‌गुणांचें संपादन कर, आणि तुझ्या अंगीं शीतोष्णापासून निवारण करण्यासाठीं कुटी बांधण्यांचें सामर्थ्य येईल.”

माकडाला पक्ष्याच्या उपदेशाचा फार राग आला आणि तो म्हणाला, “घरट्यांत बसून मोठ्या उपदेशाच्या गोष्टी सांगतोस काय? याबद्दल तुला मी योग्य प्रायश्चित्त देतों. माकड असें बोलून झाडावर चढला, आणि त्यानें पक्ष्याचें घरटें मोडून टाकलें! दुष्टाला उपदेश केल्याचा हा परिणाम आहे, असें म्हणत पक्षी तेथून उडून गेला.

——***——

अनुक्रमणिका

१०९. पराचा कावळा. (३२२)

(दद्‌भाजातक नं. ३२२)

प्राचीन काळीं पश्चिम समुद्रतीरावर एका वनांत एक ससा रहात असे. त्या वनांत ताडाचीं आणि बेलाचीं झाडें पुष्कळ होतीं. बरेच दिवस सशाच्या मनांत असा विचार चालला होता कीं, जर धरणीकंप होऊन या प्रदेशाचा संहार झाला तर आपण जावें कोठें? एके दिवशीं तो एका तरुण ताडवृक्षाखालीं बसला असतां वरून एक बेलाचें फळ त्या ताडाच्या पानावर पडलें, आणि त्या योगें मोठा आवाज झाला. तेव्हां सशाला खात्रीनें धरणीकंप होतो असें वाटून तो पळत सुटला. त्याचें पळण्याचें कारण काय आहे, हें समजण्यासाठीं दुसरा एक ससा पळतोस कां, पळतोस कां असें म्हणत त्याच्या मागें लागला. पहिला ससा मागें न वळतां म्हणाला, “गड्या काय विचारतोस? येथें भयंकर धरणीकंप होत आहे!”

तेव्हां तोहि ससा पळत सुटला. पुढें सशाचा एक मोठा कळप त्यास आढळला, त्यांनीं ही बातमी ऐकल्याबरोबर तेहि पळत सुटले. व्याघ्र, वनमहिष, मृग, सिंह इत्यादि वनांत रहाणारे प्राणी ही बातमी ऐकून सैरावरा धावूं लागले. त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व सिंहयोनींत जन्मून त्या अरण्यांत रहात होता. तो पळत सुटलेलें हे श्वापदसैन्य पाहून पर्वतावरून धांवत धांवत पायथ्याशीं आला आणि त्यांच्यासमोर उभा राहून त्रिवार सिंहनाद करिता झाला. सिंहाची गर्जना ऐकून सर्व प्राणी चपापले आणि त्या ठिकाणींच उभे राहिले. तेव्हां तो त्यांना म्हणाला, “तुम्ही भीतीनें व्यग्र झालेल्या प्राण्यासारखे सैरावैरा कां पळतां?”

त्याला पळणाऱ्या सिंहानीं उत्तर दिलें, “या ठिकाणीं धरणीकंप होत आहे; असें आम्ही ऐकतों.”

“हें तुम्हांला कोणी सांगितलें?”

ते म्हणाले, “हत्ती सांगत आहेत.”हत्तीला विचारलें, तर त्यांना वाघांकडून बातमी मिळाली असें त्यांनीं उत्तर दिलें. वाघांना विचारलें, तर हरणांकडून — असें होतां होतां शेवटीं बोधिसत्त्वानें ज्या सशाकडून ही बातमी पसरली त्याला शोधून काढलें; आणि तो म्हणाला, “बा सशा भूकंप होतो आहे हें तुला कसें समजलें?”

ससा म्हणाला, “महाराज, मी एका तरुण ताडवृक्षाखाली धरणीकंप होऊल अशा विचारांत गुंग झालों असतां एकाएकी मोठा आवाज झाला. त्यावरून पृथ्वी दुभंग होऊन कांही तरी भयंकर अपघात होणार आहे असें वाटून मी पळत सुटलों.”

बोधिसत्त्व म्हणाला, “तूं ती जागा मला दाखवशील काय?”

ससा म्हणाला, “पण महाराज, तेथें जाण्याचें धैर्य मला मुळींच व्हाबयाचें नाहीं.”

पण बोधिसत्त्वानें धीर देऊन त्याला आपल्या पाठीवर बसविलें, आणि त्या ठिकाणीं नेलें. तेथें बेलाचें एक मोठें फळ त्या ताडवृक्षाच्या खालीं पडलें होतें तें पाहून बोधिसत्त्व सशाला म्हणाला, “अरे, हें

अनुक्रमणिका

फळ ह्या ताडाच्या पानावर आदळल्यामुळें आवाज झाला, आणि त्यायोगें तुझ्या कल्पनाशक्तीला तीव्र गती मिळून खात्रीनें धरणीकंप होतो अशी तुझी समजूत झाली.”

पुनः परत श्वापद्‌गणाजवळ येऊन बोधिसत्त्वानें त्यांची समजूत पाडली, आणि ससा बसलेली जागा दाखवून त्यांची खात्री पटवून दिली.

पराचा कावळा होतो असें म्हणतात तो असा!

——***——

अनुक्रमणिका

११०. एका ब्राह्मणाचा भलताच ग्रह. (३२४)

(चम्मसाटक जातक नं. ३२४)

प्राचीन काळीं वाराणसींत चर्मशाटक नांवाचा एक ब्राह्मण रहात असे. तो मानाला फार हपापलेला होता. एके दिवशीं रस्त्यांतून चालला असतां एक मदोन्मत्त एडका त्याच्यासमोर आला; आणि त्यावर टक्कर मारण्यासाठीं त्यानें मान खालीं घातली. तें पाहून ब्राह्मण म्हणाला, “अहो! या जनावरालादेखील किती शहाणपण आहे पहा! हा माझ्यासारख्या सच्छील ब्राह्मणाला मान देण्यास उत्सुक दिसतो! माणसालांच कमी अक्कल असते, असें म्हटलें पाहिजे! हें ब्राह्मणाचे शब्द ऐकून जवळचा दुकानदार म्हणाला, “भो ब्राह्मण! थोड्याशा पूजेनें भुलून जाऊं नकोस! आणि भलताच ग्रह करून घेऊं नकोस! एडक्यानें जी खालीं मान घातली आहे ती तुझी पूजा करण्यासाठीं नसून तुझ्यावर चांगली जोराची टक्कर देण्यासाठीं होय! तेव्हां लवकर येथून निघून जा.”

पण ह्या ब्राह्मणानें त्या दुकानदाराचें म्हणणें ऐकलें नाहीं, व तो तेथेंच उभा राहिला. एडक्यानें त्यावर अशी जोराची टक्कर मारली कीं, त्यायोगें तो गरंगळत गटारांत पडला! त्याच्या बरगड्या मोडल्या, होमाचें साहित्य जिकडे तिकडे पसरलें, कमंडलू फुटून गेला, आणि जखमेंतून रक्त वाहूं लागलें. तेव्हां मोठ्यानें उसासा टाकून ब्राह्मण म्हणाला, “मानाला हपापलेला मनुष्य असाच फजीत पावतो!”

——***——

अनुक्रमणिका

१११. राजपुत्राची युक्ति. (३३६)

(ब्रम्हाच्छत्त जातक नं. ३३६)

एकदां वाराणसीच्या राजानें कोसल देशाच्या राजावर स्वारी करून त्याला रणांगणांत ठार मारिलें, आणि त्याचें सर्व वित्त हरण करून तें वाराणसीला आणून तें मोठमोठ्या भांड्यांत भरून आपल्या बागेंत ठेविलें, या लढाईच्या धामधुमींत कोसल राजाचा तरुण कुमार अज्ञातक वेषानें आपल्या राजधानींतून तक्षशिलेला पळून गेला. तेथें त्यानें एका प्रसिद्ध आचार्यापाशीं वेदशास्त्रांचें अध्ययन केलें. सर्व विद्यांत प्रवीण झाल्यावर गुरूची आज्ञा घेऊन तो स्वदेशी येण्यास निघाला. परंतु वाटेंत त्यास कांहीं परिव्राजक भेटले. त्या लोकांपाशीं कांहीं शिल्पकला असली तर तीहि शिकावी या उद्देशानें तो त्यांच्या पंथांत शिरला आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर पांचशें परिव्राजकाचा गुरू होऊन बसला. नंतर तो आपल्या शिष्यांना म्हणाला, “आपण वाराणसीकडे जाऊन जनपदसंचार करूं.”

परंतु ते म्हणाले, “वाराणसींतील लोक मोठे हुषार आहेत. ते नाना प्रश्न विचारून आमची फजिती करतील.”

राजकुमार म्हणाला, “त्याबद्दल तुम्ही भिऊं नका. तुमचा पुढारी ह्या नात्यानें सर्व प्रश्नांचीं उत्तरें मीच देत जाईन.”

असें सांगून आपल्या परिवारासह फिरत फिरत अनुक्रमें तो वाराणसीला येऊन पोहोंचला. तेथें या तरुण परिव्राजकाची सर्व लोकांत कीर्ति पसरण्यास विलंब लागला नाहीं. हळूहळू राजाच्या कानापर्यंत त्याची तारीफ पोहोंचली. तेव्हां राजानें त्याला आपल्या राजवाड्यांत बोलावून नेऊन त्याचा बहुमान केला. पुढें राजाची आणि त्याची विशेष मैत्री जडली. तेव्हां राजाचे सर्व गुणावगुण त्याला चांगले समजले. राजा जरा धनलोभी होता. त्यानें या तरुण परिव्राजकाला मंत्रतंत्राच्या साह्यानें धन उत्पादन करितां येईल कीं काय असा एकांतीं प्रश्न केला. तेव्हां तो राजाला म्हणाला, “महाराज, नवीन धन उत्पादन करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. तथापि असलेलें धन द्विगुणित चतुर्गुणित करितां येईल अशी मंत्रविद्या मी जाणत आहे.”

त्यावर राजा म्हणाला, “कोसल राजाकडून मी पुष्कळ धन हिसकावून आणलें आहे, व गुप्तपणें तें माझ्या बागांत पुरून ठेविल आहे. तें तुम्ही आपल्या मंत्राच्या सामर्थ्यानें जितकें वाढवितां येईल. तितकें वाढवा; म्हणजे प्रसंग आला असतां त्याचा मला फार उपयोग होईल.”

असें बोलून राजानें त्याला धन पुरून ठेविलेली जागा दाखविली, व त्या ठिकाणीं मंत्रविद्येचा प्रयोग करून धन वाढविण्याची विनंती केली, तेव्हां त्या परिव्राजकानें आपल्या पांचशें शिष्यांसह येऊन त्या ठिकाणी ठाणें दिलें, आणि एका मोठ्या हवनास सुरुवात केली. राजाला होमहवनादी प्रकार पाहून फार आनंद झाला आणि लवकरच आपण अफाट संपत्तीचा मालक होईन असें तो मनांतल्या मनांत मांडे खाऊं लागला.

अनुक्रमणिका

इकडे परिव्राजकानें हवनद्रव्यें घालण्यासाठीं कांहीं चामड्याच्या पिशव्या शिवून घेतल्या, आणि एके दिवशीं राजाला तो म्हणाला, “महाराज, हवनाची परिसमाप्ती होत आली आहे. आतां एकच काम बाकी राहिलें आहे. एथून दूरच्या एका अरण्यांतून कांहीं औषधींची मुळें आणून अभिमंत्रण करून त्यांचा आपण पुरून ठेविलेल्या बरण्यांवर प्रयोग केला पाहिजे. परंतु आम्ही माघारे येईपर्यंत तुम्ही कोणत्याही मनुष्याला बागांत जाण्याची परवानगी देऊं नका. कां कीं, आम्हीं तेथें तयार केलेल्या कुंड्याचा वगैरे विध्वंस झाला असतां आमच्या श्रमांचें साफल्य व्हावयाचें नाहीं. मी माझ्या शिष्यांसह वर्तमान त्या वनस्पतीच्या शोधासाठीं जातों आणि दहा दिवसांच्या आंत येथें परत येतों.”

राजानें त्याच्या सांगण्याप्रमाणें उद्यानाबाहेर पहारा ठेऊन सर्व बंदोबस्त केला.

तरुण परिव्राजक आपल्या शिष्यांना घेऊन एके रात्रीं शुभ मुहूर्तावर औषधीच्या शोधास जाण्यास निघाला. आणि तो शिष्यांस म्हणाला, “मित्र हो, मी कोण आहें, याची आजपर्यंत तुम्हाला जाणीव नव्हती. आतां मी खरी गोष्ट सांगतों. कोसल देशाच्या राजाचा मी पुत्र आहे. माझ्या बापाला ठार मारून या राजानें आमच्या कुलांतील सर्व द्रव्य हरण करून या ठिकाणीं गाडून ठेविलें आहे. या राजाचा त्या धनावर कोणत्याहि प्रकारें हक्क नसून तें सर्व माझें आहे. आणि जातांना तें घेऊन जाण्यास आम्हांला कोणतीच दिक्कत वाटण्याचें कारण नाहीं.”

असा उपदेश करून जेवढीं सोन्याचीं नाणीं होतीं. तेवढीं चामड्याच्या पिशव्यांत भरून त्यानें त्या पिशव्या शिष्यांच्या खांद्यावर दिल्या आणि तेथून प्रयाण केलें, व एका आठवड्यात कोसल देशाची राजधानी श्रावस्ती नगरी गांठली. तेथें जाऊन आपल्या बापाला अनुकूल असलेल्या लोकांना त्यानें वश करून घेतलें; आणि त्यांच्या सहाय्यानें काशीच्या राजानें नेमलेल्या अधिकाऱ्यांवर हल्ला करून त्यांचा पाडाव केला. बरोबर आणलेल्या द्रव्याच्या जोरावर त्यानें मोठी सेना उभारली व काशीराजाकडून होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यास तो तयार होऊन राहिला. इकडे काशीराजानें तरुण परिव्राजकाची पुष्कळ दिवस वाट पाहिली, आणि शेंवटी उद्यानांत जाऊन आपल्या द्रव्याच्या बरण्या उघडून पाहिल्या. परंतु त्या सर्वांत एकही नाणें शिल्लक नसून त्या नुसत्या गवतानें भरलेल्या आढळल्या! तेव्हां राजाला एकदम धक्का बसून तो वेड्यासारखा “गवत! गवत!”असें बरळत सुटला. त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व त्याचा अमात्य होता. राजाची अशी विपरीत स्थिती झालेली ऐकून तो धांवत उद्यानांत गेला आणि म्हणाला, “महाराज गवत, गवत असें म्हणून आपण आक्रोश कां करितां? कोणीं आपलें गवत नेलें आहे, किंवा आपणांस गवत घेऊन काय करावयाचें आहे?”

राजा म्हणाला, “हे पंडिता! येथें एक तरूण परिव्राजक येऊन राहिला होता, हें तुला माहीत आहेच. त्यानें माझ्या या बरण्यांत गवत भरून ठेऊन त्यांत असलेलें सर्व द्रव्य पळवून नेलें!”

तें ऐकून बोधिसत्त्व म्हणाला, “मंत्रतंत्राच्या बळानें कोणाला तरी फायदा होतच असतो! थोडक्यांत जास्ती मिळावयाचें असलें म्हणजे गवत ठेऊन द्रव्य घेऊन गेलें पाहिजे!”

राजा आपली लोभी वृत्ति बोधिसत्त्वाला समजली असावी असें वाटून मनांत वरमला, आणि म्हणाला, “परंतु जे सुशील परिव्राजक असतात ते अशी गोष्ट करीत नाहींत. पण असा दांभिक तपस्वी मला कोठून सांपडला कोण जाणें.”

अनुक्रमणिका

बोधिसत्त्वानें राजाचें समाधान करून त्याला राजवाड्यांत नेलें. पुढें कोसल राजाच्या तरूण पुत्रानें उद्यानांतील द्रव्यबळावर कोसल देशाचें राज्य आपल्यापासून हिरावून घेतलें. असें समजल्यावर राजाला आपल्या लोभी वृत्तीबद्दल किती वाईट वाटलें असेल, आणि कसा पश्चात्ताप झाला असेल. याची नुसती कल्पनाच केली पाहिजे!

——***——

अनुक्रमणिका

११२. मोराला न पाहिल्यामुळें कावळ्याचा गौरव करण्यांत आला. (३३९)

(बावेरूजातक नं. ३३९)

प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील नावाडी लोक आपल्या जहाजांवर एक पाळींव कावळा ठेवीत असत. त्याला दिशाकाक असें म्हणत. जहाज कोणत्या दिशेकडे गेलें आणि जमीन किती दूर राहिली हें न समजून नावाडी घोटाळ्यांत पडले असतां या कावळ्याला सोडून देत असत. तो आकाशांत उंच जाऊन आसपास जमीन दिसली तर ज्या दिशेला जमीन असेल त्या दिशेकडे प्रयाण करी. नावाडी त्या बाजूला जहाज हाकारून जमीन गांठीत असत. त्या वेळीं असा एक कावळा बरोबर घेऊन कांहीं नावाडी आपल्या जहाजांतून व्यापारासाठीं बावेरू नांवाच्या एका राष्ट्राला गेले. त्या राष्ट्रांत पक्षी मुळींच नव्हते. तेथील लोकांनीं या कावळ्याला पाहून त्याचें मोठें कौतुक केलें आणि ते नावाड्यांना म्हणाले, "असा सुंदर पक्षी आम्ही कधीं पाहिला नाहीं. तुम्ही आमच्या देशांत व्यापार करण्यासाठीं आलां आहांत तेव्हां हा पक्षी आम्हांला नजराण्या दाखल द्या."

पण नावाड्यांनीं तो मोठा उपयोगी आहे असें सांगून त्याला देण्याचें नाकारलें. शेवटीं त्याची किंमत वाढवत वाढवत त्या लोकांनीं शंभर कार्षापणापर्यंत नेली. तेव्हां स्वदेशी परत गेल्यावर वाटेल तेवढे कावळे मिळतील असा विचार करून नावाड्यांनीं शंभर कार्षापणांला तो कावळा बावेरूवासी लोकांना देऊन टाकला. त्यांनीं कावळ्यासाठीं एक मोठा सोन्याचा पिंजरा तयार करुन त्यांत त्या कावळ्याला ठेवून त्याची फारच बडदास्त ठेविली. उत्तम अन्न त्याला देण्यांत येत असे, आणि केवळ त्याच्या दर्शनासाठीं दूरदूरचे लोक येत असत.

नावाड्यांनीं बावेरू राष्ट्रांत पक्षांची उणीव जाणून दुसऱ्या खेपेला एक उत्तम मोर बरोबर नेला. तो चिटकी वाजवल्याबरोबर नाचत असे, आणि मधूर शब्द काढीत असे. या पक्ष्याला पाहिल्याबरोबर बावेरूंतील श्रीमंत लोकांच्या त्यावर उड्या पडल्या. नावाड्यांनीं त्याची किंमत भलतीकडेच वाढवून एक हजार कार्षापण घेऊन त्याला देऊन टाकलें. हा सुशिक्षित मयूर सापडल्याबरोबर बावेरूंतील लोकांनीं कावळ्याला सोन्याच्या पिंजऱ्यांतून हाकून लाविलें. आणि त्या दिवसापासून मोराची महती वाढविली. कावळा पिंजऱ्यातून मोकळा झाल्याबरोबर उकिरड्यावर जाऊन तेथील गलिच्छ पदार्थांवर ताव मारूं लागला! तेव्हां त्या लोकांना त्याची खरी किंमत समजून आली.

——***——

अनुक्रमणिका

११३. देव प्रसन्न असले तर राक्षसांची पर्वा बाळगावयास नको. (३४७)

(अयकूट जातक नं. ३४७)

एकदां बोधिसत्व वाराणसीच्या राजकुलांत जन्माला येऊन वयांत आल्यावर आपल्या पित्याच्या मरणानंतर वाराणसीचा राजा झाला. तो धर्मन्यायानें राज्यकारभार चालवीत असे. त्यावेळीं लोकांचा भूतपिशाच्चावर फार विश्वास असे व पुष्कळ प्राण्यांचा वध करून ते भूतपिशाच्चाला बळी दान देत असत. बोधिसत्वाला प्राणिहिंसा मुळींच आवडली नाहीं. त्यानें राज्यकारभार हातीं आल्याबरोबर यक्ष–राक्षसादिकांसाठीं प्राण्यांचा वध करून बलिकर्म करूं नये असा जाहिरनामा लाविला. लोकांना राजाज्ञेंप्रमाणें बलिकर्म सोडून देणें भाग पडलें. तेव्हां सर्व यक्षराक्षसादिक भूतगण क्षुब्ध होऊन गेलें. आणि त्यांनीं एकत्र जमून राजाचा वध करण्यासाठीं एका भयानक राक्षसाला पाठविलें. तो हातांत एक अग्नितप्त लोखंडी गदा घेऊन दुपारच्या प्रहरीं बोधिसत्वाच्या वाड्यांत शिरला आणि त्याच्या मंचकाजवळ अंतरिक्षांत उभा राहिला. तो प्रकार पाहून इंद्र तत्क्षणीं त्या ठिकाणीं अवतरला आणि गुप्त रूपानें तेथें राक्षसाच्या शिरावर उभा राहिला. तो राक्षसाला मात्र दिसत होता; आणि बोधिसत्त्वाला राक्षस तेवढा दिसत होता; बोधिसत्व त्याला भिऊन न जातां म्हणाला, "हे पुरुषा तूं यक्ष राक्षस, पिशाच किंवा देवता यांपैकीं कोण आहेस? ही तप्त गदा घेऊन माझें रक्षण करण्यासाठी येथें संचार करीत आहेस किंवा मला मारण्यासाठीं येथें आला आहेस हे मला सांग."

त्यावर तो राक्षस म्हणाला, "महाराज, सर्व यक्षराक्षसादिकांचें तुमच्याविषयीं फार वाईट मत झालें आहे. तुम्ही बलिदान बंद केल्यामुळें आम्ही सर्वजण तुमच्यावर रागवलों आहों; आणि तुमच्या वधाचें काम माझ्या सर्व बांधवांनीं माझ्यावर सोंपविलें आहे. परंतु माझ्या मार्गांत एक मोठी अडचण आहे ती ही कीं, देवांचें तुमच्याविषयीं चांगलें मत आहे, आणि साक्षात् इंद्र तुमच्या रक्षणासाठीं येथें संचार करीत आहे. तेव्हां तुमच्या शरीराला अपाय केला असतां इंद्राच्या तावडींतून सुटून सुखरूपपणें परत जाणें शक्य नाहीं. म्हणून मी कर्तव्यमूढ होऊन या ठिकाणीं उभा राहिलों आहें."

राजा म्हणाला, "जर माझ्याविषयीं देवांचें मत चांगलें असून साक्षात् इंद्र माझें रक्षण करीत आहे तर यक्षराक्षसादि सर्व पिशाच्चगणाला वाटेल तेवढा आक्रोश करूं द्या! किंवा माझ्याविरुद्ध वाटेल तेवढे कट उभारूं द्या! त्यांच्या मताची किंवा भेडावण्याची मला मुळींच परवा नाहीं! मनुष्यानें सज्जनाचें मत आपल्या संबंधानें काय आहे एवढें पाहिलें म्हणजे दुर्जन आपल्या संबंधानें काय म्हणतात याचा विचार करावयास नको.

शक्रानें त्या यक्षाला तेथून घालवून देऊन बोधिसत्त्वाला दर्शन दिलें; आणि त्याची स्तुती करून तो देव लोकाला जाता झाला.

——***——

अनुक्रमणिका

११४. शोकापासून निवृत्त करण्याचा उपाय. (३५२)

(सुजातजातक नं. ३५२)

एकदां आमचा बोधिसत्त्व एका शेतकऱ्याच्या कुळांत जन्मला होता. बापाचा तो एकुलता एक मुलगा असल्यामुळें त्याच्यावर घरांतील सर्व माणसांचें अत्यंत प्रेम असे. तो सुजात या नांवानें सर्व गांवांत प्रसिद्ध होता. सुजात सोळा वर्षांचा झाला नाहीं, तोंच त्याचा आजा मरण पावला. व त्यामुळें त्यांच्या बापाला अत्यंत शोक झाला. आज्याचें दहन करून त्याचे शरीरावशेष सुजाताच्या बापानें आपल्या शेतांत पुरले, व त्यावर एक थडगें बांधलें. सकाळीं संध्याकाळीं तेथें जाऊन तो शोक करीत असे, व त्यामुळें त्याला आपला व्यवहार पहाण्यास सवड सांपडत नसे, आणि दिवसेंदिवस त्याच्या शरीरावर शोकाचा परिणाम स्पष्ट दिसूं लागला. सुजाताला आपल्या पित्याच्या वर्तनाबद्दल फार वाईट वाटलें, आणि त्याला कसें सुधारावें या विवंचनेंत तो पडला. अशा स्थितींत असतां गांवाबाहेर एक बैल मरून पडलेला त्याला आढळला. तेव्हां एक पाण्याचें भांडें आणि एक दोन गवताच्या पेंढ्या घेऊन तो त्या बैलाजवळ गेला आणि त्याला कुरवाळून म्हणाला, “बा बैला, उठ. हें पाणी पी, व हें गवत खा.”

अशा रीतीनें बैलाशीं चाललेलें सुजाताचें बोलणें तिकडून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनीं ऐकलें आणि त्याला तेथें शोकाकुल होऊन बसलेला पाहून ते म्हणाले, “बा सुजाता, तूं आमच्या गांवांतील मुलांत शहाणा मुलगा आहेस अशी आमची समजूत होती; परंतु हा काय मूर्खपणा चालविला आहेस! मेलेल्या बैलाला गवत पाणी देऊन उठावयास काय सांगतोस! चल आमच्याबरोबर घरीं.”

पण सुजातानें त्यांचें बोलणें न ऐकतां बैलाला पाणी पी, आणि गवत खा, असें बोलून गोंजारण्याचा व तो उठत नाहीं याबद्दल शोक करण्याचा प्रकार तसाच चालू ठेवला. शेतकऱ्यांनीं जाऊन त्याच्या बापाला मुलाला वेड लागलें आहे व तो मेलेल्या बैलाशीं असें असें बरळत बसला आहे. वगैरे सर्व वर्तमान सांगितलें. तें कानीं पडतांच त्याचा पितृशोक मावळला व पुत्रशोकाचा उदय झाला. बाप गेला तो कांहीं परत येत नाहीं, परंतु जिवंत असलेल्या मुलाची अशी दशा झाली, हें ऐकून त्याची कंबर पुरी खचली. बिचारा तसाच धांवत धांवत मुलाजवळ गेला आणि त्याला म्हणाला, “बाळा! हा प्रकार तूं काय चालवला आहेस? मेलेल्या बैलाला पाणी देऊन आणि गवत घालून जिवंत कसें करितां येईल? तूं येवढा शहाणा असून तुला ही अक्कल असूं नये काय? तुझ्यावर प्रपंचाचा कांहींच भार पडला नसतां तूं एकाएकीं असा वेडा कसा झालास?”

सुजात म्हणाला, “बाबा, मी वेडा आहे कीं, तुम्ही वेडे आहां हें मला पहिल्यानें सांगा.”

त्यावर त्याचा पिता अत्यंत निराश होऊन म्हणाला, “अरेरे, तूं अगदींच बिघडलास असें दिसतें. माझा तूं आजन्मांत असा उपमर्द केला नाहींस. पण आज स्वतः वेडगळपणा करीत असंता मलाच वेडा म्हणावयास लागलास!”

सुजात म्हणाला, “पण बाबा असे रागावूं नका. या बैलाचे डोळे, पाय, शेपटी, तोंड, नाक इत्यादी सर्व अवयव जशाचे तसे आहेत. कावळ्यांनीं किंवा कुत्र्यांनीं त्याला कोठेंही जखम केलेली नाहीं. तेव्हां हा बैल पाणी वगैरे पाजलें असतां उठून उभा राहील अशी मला आशा वाटते. पण आमच्या आजोबाला जाळून त्याच्या अस्थी तुम्ही थडग्यांत पुरून ठेवल्या, व त्या थडग्याजवळ जाऊन सकाळ संध्याकाळ शोक करीत

असतां तो कां? आजोबाच्या जळक्या अस्थींतून ते पुनः अवतरतील असें तुम्हांस वाटत आहे काय? सबंध शरीर कायम असलेल्या बैलाबद्दल शोक करणारा मी वेडा, कीं ज्याला केवळ जळलेल्या अस्थी शिल्लक राहिल्या आहेत अशा आमच्या आजोबाबद्दल शोक करणारे तुम्ही वेडे, हें मला प्रथमतः सांगा."

हें सुजाताचें शहाणपणाचें बोलणें ऐकून त्याचा पिता चकित झाला, व म्हणाला, "बाबारे, मीच तुझ्यापेक्षां जास्त वेडा आहे, यांत शंका नाहीं! मृत मनुष्याबद्दल शोक करणें व्यर्थ आहे हें दाखविण्यासाठीं तूं जो उपाय केला तो स्तुत्य आहे; आणि आजपासून माझ्या पित्याचा शोक सोडून देऊन मी माझ्या कर्तव्याला लागेन. तुझ्यासारखा पुत्र आमच्या कुलांत जन्मला याचें मला भूषण वाटतें."

——***——

अनुक्रमणिका

११५. क्षुद्र प्राण्याचेंहि वैर संपादन करूं नये. (३५७)

(लटुकिक जातक नं. ३५७)

एक चिमणी हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या महाअरण्यांत लहानशा झुडुपावर आपलें घरटें बांधून रहात होती. आमचा बोधिसत्त्व त्यावेळीं हत्तीच्या योनींत जन्मला असून वयांत आल्यावर हत्तींच्या प्रचंड कळपाचा राजा झाला होता. एके दिवशीं सर्व कळपाला घेऊन तो त्या झुडुपापाशीं आला, व तें आक्रमण करून जाण्याच्या बेतांत होता, इतक्यांत चिमणी घरट्यांतून बाहेर येऊन त्याला प्रणिपात करून म्हणाली, "महाराज तुम्हांला मी साष्टांग प्रणीपात करितें. या लहानशा झुडुपावर माझें घरटें आहे व त्यांत ज्यांना अद्यापि पंख फुटले नाहीत अशी माझीं लहान लहान पोरें आहेत. म्हणून महाराज या झुडुपाचा चुराडा करूं नका. माझ्या मुलाला जीवदान देऊन मला जन्मभर आपलें ऋणी करून ठेवा."

गजराज म्हणाला, "चिमणी बाई, तुम्ही निःशंक असा. तुमच्या घरट्याला किंवा पिलांला मी मुळींच धक्का लावून देणार नाहीं."

असें म्हणून तें झुडुप आपल्या पोटाखालीं राहिल अशा बेताने बोधिसत्त्व त्यावर उभा राहिला, व आपल्या सर्व यूथाला त्यानें पुढें जाण्याचा हुकुम केला. हत्तींनी आजूबाजूचे मोठाले वृक्षहि तोडून मोडून उध्वस्त केले. तथापि गजराज झुडुपावर उभा असल्यामुळें त्याला मुळींच धक्का लागला नाहीं. सगळा कळप तेथून गेल्यावर बोधिसत्त्व चिमणीला म्हणाला, "बाई ग, तुझ्या पिलांचें माझ्या कळपापासून मीं रक्षण केलें आहे. परंतु माझ्या कळपांतून बाहेर पडलेला असा एक दुष्ट हत्ती या अरण्यांत फिरत आहे. तो तुझ्या पिलांचा नाश करील अशी मला भीती वाटते. तेव्हां तूं लवकर आपल्या पिलांना घेऊन दुसरीकडे जा."

असें सांगून बोधिसत्त्व आपल्या कळपाच्या मागोमाग तेथून निघून गेला. चिमणीनें असा विचार केला कीं, "हत्ती किती जरी वाईट असला तरी तो माझ्या पिलांचा संहार कां करणार? या अरण्यांत झाडपाला विपुल असतां एवढ्याशा झुडुपांपासून त्याला काय फायदा होणार? तो एथें आलाच तर त्यालाहि आपल्या रक्षणाबद्दल नम्रपणें विनंती करावी म्हणजे झालें."

तो दुष्ट हत्ती कांहीं दिवसांनीं त्या ठिकाणीं आला. तेव्हां चिमणीनें त्याची फार स्तुति करून आपल्या पोरांचे रक्षण करावें अशी त्याला विनंती केली. परंतु त्या दुष्ट हत्तीनें तिची अवहेलना करून त्या झुडुपावर हल्ला केला आणि तो तिला म्हणाला, "तुझ्यावर यःकश्चित् प्राणी माझ्याजवळ याचना करण्यास देखील योग्य नाहीं! असें असतां तूं माझ्याशीं फारच सलगी केलीस या तुझ्या अपराधाबद्दल झुडुपांसहित तुझें हें घरटें मी पायाखालीं तुडवून टाकतों. तूं जरी माझ्या तडाख्यांतून पळून दूर गेली आहेस तथापि, घरट्याचा नाश केल्यानें पुनः हत्तीसारख्या बलाढ्य प्राण्याशीं अतिप्रसंग करुं नये याची तुला चांगली आठवण राहिल."

असें बोलून हत्तीनें त्या झुडुपाचा आणि चिमणीच्या घरट्याचा चुराडा करून टाकला. तेव्हां चिमणी त्याला म्हणाली, "तूं जरी बलाढ्य प्राणी आहेस, तरी या तुझ्या दुष्ट कृत्याबद्दल मी तुझा सूड उगवीनच उगवीन. बलाचा दुरुपयोग केला तर त्याचा परिणाम काय होतो हें तुला लवकरच समजून येईल."

हत्ती चिमणीच्या बोलण्याकडे लक्ष न देतां तिची कुचेष्टा करीत तेथून पुढें गेला. चिमणी रात्रंदिवस हत्तीचा सूड कसा उगवावा या विवंचनेत पडली होती. इतक्यांत एका मेलेल्या प्राण्याचे डोळे टोंचून टोंचून

अनुक्रमणिका

खात असलेला कावळा तिच्या पहाण्यात आला. जवळ जाऊन त्याला ती म्हणाली, "काकराज, या मेलेल्या प्राण्याचे डोळे फोडण्यांत काय पुरुषार्थ आहे? तुमच्या अंगीं सामर्थ्य असेल तर जिवंत प्राण्यांचे डोळे उपटण्याचा तुम्ही पराक्रम करून दाखवला पाहिजे."

कावळा म्हणाला, "बाई ग, हा तुझा निव्वळ वेडेपणा आहे. मेलेले प्राणी आम्हां कावळ्यांचें भक्ष्य आहे. परंतु जिवंत प्राण्याचे डोळे फोडून त्यास अंध करण्यांत कोणता पुरुषार्थ? चिमणी म्हणाली, "काकमहाराज, आपण जर विनाकारण दुसऱ्या प्राण्याला अंध केलें तर तें मोठें पाप होय. परंतु दुसऱ्या एका बलाढ्य प्राण्यानें आपला छळ चालविला असतां त्याला अंध बनवणें याला कोणी दोष देऊं शकेल काय?"

कावळा म्हणाला, "पण आपण जर दुसऱ्याच्या वाटेला गेलों नाहीं तर दुसरा आपला छळ कां म्हणून करील?"

चिमणी म्हणाली, "महाराज, आपण व मी पक्ष्यांच्या जातीचीं आहोंत. मी आपणापेक्षां दुर्बळ आहें, आणि म्हणूनच माझी कींव आपणास आली पाहिजे. गेल्या कांहीं दिवसांमागें एका दांडग्या हत्तीनें माझ्या घरट्याचा आणि पोरांचा चुराडा करून टाकिला. माझा कैवार घेऊन या कृत्याचा सूड उगविणें हें तुमचें कर्तव्य नव्हे काय?"

कावळा म्हणाला, "हत्तीसारख्या प्रचंड प्राण्याशीं आमचें काय चालणार?"

चिमणी म्हणाली, "तेंच मी मघाशीं आपणांस सांगितलें आहे. त्याच्याशीं मल्लयुद्ध करण्याचें आपलें काम नाहीं. तो जेथून जात असेल त्या मार्गांत एखाद्या झाडावर लपून बसून जवळ आला कीं नेमका त्याचा एक डोळा फोडून टाकावयाचा, पुनः दुसऱ्या एका ठिकाणीं दडून बसून दुसऱ्या डोळ्यावर झडप घालून चंचुप्रहारानें तोहि फोडून टाकावयाचा. एवढें केलें म्हणजे त्याला योग्य शिक्षा झाली असें होईल."

कावळ्यानें चिमणीचें म्हणणें मान्य करुन संधी साधून हत्तीला अंध करून सोडलें. परंतु एवढ्यानें चिमणीचें समाधान झालें नाहीं. ती एका गोमाशीजवळ येऊन तिला आपली हकीगत कळवून म्हणाली, "या दुष्ट हत्तीच्या फुटलेल्या डोळ्यांत तूं अंडी घाल."

गोमाशीनें चिमणीच्या सांगण्याप्रमाणें हत्तीच्या डोळ्यांत अंडीं घातलीं, व त्यामुळें दोन्ही डोळ्यांत किडे होऊन हत्तीच्या डोळ्यांत भयंकर वेदना होऊं लागल्या. तो सैरावैरा अरण्यांत धावंत सुटला. झाडाचा पाला त्याला खावयास मिळे, परंतु पाणी कोठें आहे हें दिसेना. आपल्या घ्राणेंद्रियानें पाण्याचा थांग काढीत तो फिरत होता. इतक्यांत चिमणीनें एका बेडकाची दोस्ती संपादन करुन त्याला अशी विनंती केली कीं, त्यानें जवळच्या टेकडीवर जाऊन मोठ्यानें शब्द करावा. हत्तीला तेथें पाणी असेल असें वाटून हत्ती तेथें आल्यावर पुनः त्यानें एका भयंकर कड्याखालीं उतरून तेथें शब्द करावा. बेडकानें चिमणीचें सांगणें ऐकून टेकडीवर जाऊन ओरडण्यास सुरुवात केली. तेव्हां तो अंध हत्ती पाण्याचा थांग लावण्यासाठीं त्या टेंकडीवर चढला. पुनः बेडूक एका प्रचंड कड्याखालीं उतरून तेथें ओरडला. तेव्हां हत्ती त्या दिशेला चालला असतां कड्यावरून खालीं कोसळला व त्याचीं हाडें मोडून मरणांतिक वेदनांनीं पीडित होऊन तो तेथें पडला. तेव्हां चिमणी त्या ठिकाणीं येऊन त्याला म्हणाली, "हे द्वाड हत्ती, आतां मी कोण आहे हें पाहण्यास तुझे डोळे राहिले नाहींत. पण तुझे कान शाबूत असल्यामुळें माझ्या शब्दावरून तूं मला

ओळखशील. कांहीं दिवसांमागें मदोन्मत्त होऊन ज्या लहानशा प्राण्याचें घरटें पिल्लांसकट तूं पायाखालीं तुडविलेंस तोच प्राणी—तीच चिमणी—मी आहें. तुझा मी पूर्णपणें सूड उगवला आहे. या तुझ्या अधःपतनाला कारण मी झालें आहे.”

असें बोलून तिनें त्याला कसें कड्यावरून खालीं पाडलें हें सर्व इत्थंभूत सांगितलें. तेव्हां हत्ती म्हणाला, “मी जर आमच्या कळपांत असतों, तर आमच्या गजराजानें अशा प्रकारचें दुराचरण मला करूं दिलें नसतें. परंतु बळमदानें फुगून जाऊन मी माझा कळप सोडून दिला. आणि, त्याच बळाच्या दर्पामुळें मी हालअपेष्टा पावून आतां मृत्यूच्या मुखांत शिरत आहे! कोणत्याहि प्राण्यानें आपल्या बळाच्या किंवा सत्तेच्या जोरावर क्षुद्र प्राण्याचा उपमर्द करूं नये हें माझ्या गोष्टीपासून शिकण्यासारखें आहे.”असे उद्‌गार काढून हत्तीनें प्राण सोडला.

——***——

अनुक्रमणिका

११६. शत्रु लहान म्हणून त्याचें कौतुक करूं नये (३७०)

(पलासजातक नं. ३७०)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं सुवर्णहंस होऊन हिमालयावर रहात असे. तो ज्यावेळीं चरावयास जात असे त्यावेळीं वाटेंत एका पलाश वृक्षाखाली विश्रांतीसाठीं बसत असे. रोजच्या संवयीमुळें त्या पळसाच्या झाडावर त्याचें फार प्रेम बसलें. एके दिवशीं एका पक्ष्यानें वडाचीं फळें खाऊन त्या पळसाच्या झाडाच्या दोन फांद्यांमध्यें देहधर्म केला. पावसाळ्यांत त्या ठिकाणीं वडाचा रोप रुजून आला. त्याचीं तीं कोमल पानें पाहून पलाशदेवता मोठें कौतुक करूं लागली. हंस जेव्हां त्या ठिकाणीं विश्रांतीसाठीं आला तेव्हां त्यालादेखील तिनें या वडाच्या नवीन रोपाचें मोठें कौतुक सांगितलें. तेव्हां हंस पलाशदेवतेला म्हणाला, "बाई ग, याचें तूं कौतुक करूं नकोस. तूं या ठिकाणींच स्थिर असल्यामुळे वडाचें झाड कसें असतें याची तुला कल्पना नाहीं. याला जर वाढूं दिलेंस तर हा वृक्ष तुझें समूळ निर्मूलन करून टाकील, व मग तुला आपल्या प्रेमाचा भयंकर पश्चात्ताप करावा लागेल."

पलाशदेवता म्हणाली, "तें कांहीं असो. सध्यां तरी मला याजपासून कांहींच त्रास होत नाहीं. बिचाऱ्यानें माझा आश्रय केला असल्यामुळें त्याच्यावर माझें मातृवत् प्रेम जडलें आहे. तेव्हां त्याचें उच्चाटण मी कसें करावें?"

हंस म्हणाला, "मला जें काय वाटलें तें मी तुला सांगितलें आहे. यावर तुझी मर्जी. तथापि आणखी एकवार सांगतों कीं, या रोपाची वृद्धि तझ्या नाशाला कारण होईल."

असें बोलून हंस पलाशाची मैत्री सोडून दुसरीकडे चालता झाला.

इकडे हळूहळू वडाचा रोप वाढत गेला, व त्याने त्या पलाशाच्या झाडाला म्हणजे पलाशदेवतेच्या निवासस्थानाला पूर्णपणें ग्रासून टाकलें! तेव्हां पलाशदेवता म्हणाली, "हंस जें सांगत होता तें खोटें नाहीं. जो वृद्धि पावत असतां आपल्या आश्रयदात्यांचाच नाश करून टाकतो, त्याला आश्रय देणें आणि त्यावर प्रेम करणें सर्वथैव अनिष्ट होय."

——***——

अनुक्रमणिका

११७. वैरानें वैर शमत नाहीं (३७१)

(दीघीतिकोसल जातक [ही गोष्ट महावग्गांत सांपडते.] नं. ३७१)

प्राचीनकाळीं ब्रह्मदत्त नांवाचा राजा वाराणसींत राज्य करीत होता. त्यानें कोसल देशाचा दीघीती नांवाच्या राजावर मोठ्या सैन्यासहवर्तमान हल्ला केला. तेव्हां दीघीति आपला पराजय खात्रीनें होणार आहे असें जाणून आपल्या पट्टराणीला घेऊन गुप्तवेषानें राजधानींतून पळून गेला. ब्रह्मदत्तानें त्याचें राज्य खालसा केलें, व त्याची सर्व धनदौलत लुटून नेली. दीघीति राजा परिव्राजक वेषानें वाराणसीला येऊन एका कुंभाराच्या घरीं राहिला. तेथें त्याची पत्नी गरोदर होऊन तिला असे डोहाळे झाले कीं, सूर्योदयाच्या वेळीं सन्नद्ध झालेली चंतुरंगिनी सेना पहावी व तलवारी धुवून त्यांचें पाणी प्यावें. परंतु तिला सैन्य दाखवावें कसें, व तलवारीचें पाणी कोठून आणून द्यावें या विवंचनेंत दीघीति पडला. वाराणसी राजाच्या पुरोहिताची आणि त्याची मैत्री होती. एके दिवशीं पुरोहिताला त्यानेंबायकोच्या डोहाळ्याची गोष्ट सहज सांगितली. तेव्हां पुरोहित म्हणाला, "आपल्या पत्नीला घेऊन येथें या. तिला पाहण्याची माझी इच्छा आहे,"आणि जेव्हां दीघीतिनें आपल्या राणीला तेथें आणलें तेव्हां तिला पाहून पुरोहित उद्‌गारला, "तिच्या उदरीं भावी कोसल राजा जन्माला येणार आहे!"आणि तो तिला म्हणाला, "देवी, तू आनंदित हो! तुझे डोहाळे पुरे होतील."

नंतर पुरोहित ब्रह्मदत्ताजवळ जाऊन त्याला म्हणाला, "महाराज, उदयीक उत्तम ग्रहयोग आहे. अशा प्रसंगीं आपली सर्व सेना संनद्ध करून सैनिकांनीं एका सुंदर भांड्यांतील पाण्यानें आपल्या तरवारी धुवाव्या अशी आज्ञा करा. त्यायोगें आमच्या राज्याला फार फायदा होईल."

राजानें पुरोहिताच्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या दिवशीं सूर्योदयाच्या वेळीं सर्व व्यवस्था केली व पुरोहितानें दीघीतिच्या राणीला गुप्त ठिकाणीं ठेऊन संनद्ध सेना दाखविली, व तलवारी ज्या भांड्यांत धुतल्या होत्या त्यांतील पाणी पाजलें. नवमास पूर्ण झाल्यावर कोसल राज्ञी सुंदर पुत्र प्रसवली. पुरोहित ब्राह्मणाच्या मार्फतीनें त्या मुलाचें शिक्षण उत्तम रीतीनें झालें. तथापि दीघीतीला अशी भीति पडली कीं, जर काशीराजाला आम्ही येथें रहातों असें कळून आलें तर तो एका क्षणांत आम्हा सर्वांचा शिरच्छेद करील. म्हणून आपल्या मुलाला त्यानें पुरोहित ब्राह्मणाच्या ओळखीनें वाराणसी बाहेरील एके खेडेगांवी पाठवून दिलें.

दीघीतीचा हजाम काशीच्या राजाच्या आश्रयास येऊन राहिला होता. त्यानें आपल्या नव्या धन्याची मर्जी संपादण्यासाठीं दीघीती वाराणसींत अज्ञात वेषानें राहतो अशी चुगली केली. राजानें ताबडतोब दीघीतीला आणि त्याच्या राणीला पकडून आणिलें व शहरातून त्यांची धिंड काढून नगराबाहेर नेऊन शिरच्छेद करावा असा हुकूम फर्माविला. त्याच दिवशीं त्याचा मुलगा – दीर्घायुकुमार खेडेगांवांतून आईबापांच्या दर्शनासाठीं वाराणसीला आला होता. वाटेंतच आपल्या आईबापाला मागल्या हातांनीं बांधून त्यांचें मुंडन करून धिंड काढण्यात येत आहे, हें त्याच्या पहाण्यांत आलें. तो हळुहळु त्यांच्या मागोमाग जाऊं लागला. तेव्हां दीघीती म्हणाला, "हे दीर्घायु, तुझी दृष्टी आकुंचित करूं नकोस किंवा अतिशय ताणूं नकोस, वैरानें वैरं शमत नाहीं, परंतु मैत्रीनेंच वैर शमन पावतें. हें लक्षांत ठेव."

हे दीघीतीचे शब्द ऐकून राजपुरुष म्हणाले, "हा दीघीति कोसलराजा वेडा झाला असें दिसतें!"दीर्घायु कोण, आणखी हा त्याला असा कां उपदेश करतो, याचा आम्हांला तर कांही अर्थ समजत नाहीं!"

दीघीति म्हणाला, "बाबांनो, तुम्ही मला खुशाल वेडा म्हणा! परंतु जो शहाणा असेल तो माझ्या बोलण्याचा अर्थ समजेल."

दीघीतीनें वरील वाक्य आणखी दोन वार उच्चारलें. तथापि राजपुरुषांला त्याचा अर्थ न समजल्यामुळें त्याला वेड लागलें असावें असें त्यांचें ठाम मत झालें. शेवटीं शहराबाहेर नेऊन दीघीतीचा आणि त्याच्या राणीचा त्यांनीं शिरच्छेद केला व त्या दोघांचे शरीरावयव चारी दीशांला फेंकून तेथें पहारा ठेऊन ते परत आले. हें सर्व कृत्य पाहून दीर्घायुकुमार वाराणसी नगरांत आला; आणि बरीच दारू विकत घेऊन त्यानें ती आपल्या पितरांच्या शरीरावयांवर पहारा करणाऱ्या शिपायांस पाजली. ते बेशुद्ध पडले असें पाहून दीर्घायूनें काष्टें गोळा करून पितरांच्या शरीराला अग्नी दिला, व त्या चितेला त्रिवार प्रदक्षिणा केली. हा प्रकार काशिराजानें आपल्या प्रासादाच्या गच्चीवरून पाहिला, आणि तो मनांतल्या मनांत म्हणाला, "हा कोणीतरी कोसलराजाचा नातलग असावा. अरेरे! एवढा बंदोबस्त केला असतां मला असा कोणीतरी मनुष्य आहे हें पहारेकऱ्यांनीं कळवूं नये हें मोठेंच आश्चर्य होय! यानें माझा घात केला नाहीं म्हणजे झालें!"

इकडे दीर्घायु आपल्या पितरांचें उत्तरकार्य आटपून अरण्यांत शिरला, व तेथें यथेच्छ रडून त्यानें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. नंतर स्नान करून शोकाचा मागमूसहि राहूं न देतां तो पुनः वाराणसींत शिरला आणि हस्तिशाळेंत जाऊन तेथील अधिकाऱ्यांला म्हणाला, "महाराज, माझ्या मनांतून माहुताची कला शिकण्याची फार इच्छा आहे. आपण मेहेरबानगी करून मला येथें ठेऊन घ्याल काय?"

माहुताच्या मुख्यानें दीघार्यूला हस्तिशाळेंत ठेऊन घेतलें. तो पहांटेला उठून वीणा वाजवीत असे, व मंजुळ स्वरानें गायन करीत असे. एके दिवशीं ब्रह्मदत्त राजानें पहांटेस जागा होऊन त्याचें गायन ऐकिलें, व तो आपल्या हुजऱ्यास म्हणाला, "हस्तिशाळेंत सुंदर विणा वाजवून सुस्वर गायन कोण करितो बरें?"

हुजऱ्यानें राजाला माहुताच्या आचार्यानें एक तरुण मुलगा ठेविला आहे व तो गात असतो इत्यादि वर्तमान सांगितलें. तेव्हां ब्रह्मदत्तानें ताबडतोब दीर्घायूला बोलावून नेऊन विणा वाजवून गावयास सांगितलें. दीर्घायूनें त्याची आज्ञा शिरसा मान्य करून आपल्या विण्याच्या मदतीनें सुंदर गायन केलें. तेव्हां काशिराजा त्यावर अत्यंत प्रसन्न होऊन म्हणाला, "मुला, तूं आजपासून माझ्याजवळ रहा, व मला गाऊन वगैरे दाखीव."

त्या दिवसापासून दीर्घायुराजकुमार काशीराजाजवळ राहिला, व आपल्या उत्तम गुणांनीं आणि विनम्र स्वभावानें त्यानें अल्पावधींतच राजाची पूर्ण मर्जी संपादन केली. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे दीर्घायुकुमार राजाचा अत्यंत विश्वासू नोकर बनला.

एके दिवशीं काशीराजा दीर्घायूला बरोबर घेऊन आपल्या इतर नोकरांसहवर्तमान शिकारीला गेला. राजाचा रथ दीर्घायूच हाकीत होता. शिकारीच्या निमित्तानें दीर्घायूने रथ भलत्याच ठिकाणीं नेला. काशीराजा थकून गेल्यामुळें दीर्घायूला म्हणाला, "मुला, आतां रथ सोड. मला थोडी विश्रांती घेऊं दे."

अनुक्रमणिका

तो खालीं उतरून दीर्घायूच्या मांडीवर डोकें ठेऊन झोंपीं गेला. राजाला गाढ झोंप लागली हें पाहून दीर्घायूच्या मनांत जुनें वैर जागृत झालें. आपल्या आईबापांला ठार मारणारा वैरी आपल्या मांडीवर डोकें ठेऊन स्वस्त झोंपीं गेला आहे, आणि या वेळीं याचा शिरच्छेद करण्यास याचीच तलवार उपयोगी पडणार आहे, हें पाहून दीर्घायूला त्याचा तात्काळ सूड उगवावा असें वाटलें. परंतु बापानें शेवटीं काढलेल्या उद्गारांची त्याला आठवण झाली; आणि "हे दीर्घायूकुमार! वैरानें वैर शमत नाहीं, परंतु मैत्रीनेंच वैर शमन पावतें."हे शब्द तो आपल्याशींच पुटपुटला. सूड उगवण्याची आलेली उत्तम संधी आणि बापानें केलेला उपदेश या दोन गोष्टींवर त्याचें मन आळीपाळीनें एकसारखें उड्या मारूं लागलें. शेवटीं राजाचा सूड उगवण्यासाठीं त्यानें म्यानांतून तलवार बाहेर देखील काढली. इतक्यांत राजा खडबडून जागा झाला, आणि साशंक दृष्टीनें इकडे तिकडे पाहूं लागला. तेव्हां दीर्घायुकुमार त्याला म्हणाला, "महाराज, आपण घाबरून गेल्यासारखे दिसतां तें कां?"

राजा म्हणाला, "मुला, मीं माझ्या स्वप्नांत कोसलराजाच्या तरूण मुलाला पाहिलें. माझ्या मानेवर त्यानें तलवार ठेविली होती असें मला वाटलें. त्या योगें मी एकाएकीं दचकून जागा झालों!"

दीर्घायु डाव्या हातानें राजाचे केस घट्ट धरून आणि उजव्या हातानें तलवार वर उगारून म्हणाला, "महाराज! ज्याच्याबद्दल आपणास दुष्ट स्वप्नें पडत आहेत तोच कोसल राजाचा मुलगा मी आहे, आणि माझ्या आईबापांचा सूड उगवण्यास मी आतां सज्ज झालों आहें!"

ब्रह्मदत्त राजा अगदीं कावरा बावरा होऊन गेला आणि तसाच दीर्घायूच्या पायावर पालथा पडून म्हणाला, "बा दीर्घायू, मला जीवितदान दे!"

दीर्घायु म्हणाला, "आपणाला जीवितदान देणारा मी कोण? माझ्या वडिलांचा प्राणघात करून आपण माझाहि प्राण घेण्याची वाट पहात आहां! तेव्हां प्रथमतः मलाच आपण जीवदान द्या."

राजा म्हणाला, "बा दीर्घायु, तूं मला जीवदान दे आणि मी तुला जीवदान देतों."तेव्हां त्या दोघांनीं हातांत हात घालून परस्पराशीं मैत्रीनें वागण्याची शपथ घेतली; आणि राजा रथांत बसून दीर्घायूसह परत आपल्या परिवारांत येऊन मिळाला; व सर्व लवाजम्यासह वाराणसीला आला. तेथें मोठा दरबार भरवून तो आपल्या अमात्यांला म्हणाला, "जर दीघीतिराजाच्या कुमाराला तुम्ही पाहिलें तर त्याला काय शिक्षा कराल?"

कांहींजण म्हणाले, "आम्हीं त्याचे हातपाय तोडून टाकूं;"तर कांहींजण म्हणाले, "आम्हीं त्याला ठार मारूं."

त्यावर राजा म्हणाला, "हा माझ्या शेजारीं कोसलराजाचा एकुलताएक पुत्र बसला आहे! परंतु याला कोणत्याहि प्रकारें तुम्ही इजा करतां कामा नये. कां कीं, यानें मला जीवनदान दिलें आहे."

दीर्घायूकडे वळून राजा म्हणाला, "बा, दीर्घायू, वैरानें वैर शमन पावत नाहीं परंतु मैत्रीनेंच वैर शमतें असें तुझा पिता मरणसमयीं दोन तीनदां म्हणाला तें कां?"

अनुक्रमणिका

दीर्घायू म्हणाला, "महाराज, पित्यानें हा मला उपदेश केला होता. मी पित्याच्या मागोमाग जात असतां मला पाहून त्यानें हे उद्गार काढले. याचा अर्थ एवढाच कीं, मी आपला सूड उगविण्याच्या नादाला लागूं नये. मी जर आपला सूड उगवला असता तर पुनः आपल्या अमात्यांनी किंवा आपल्या संततीनें माझा सूड उगविला असता, आणि अशा रीतीनें आमचें वैर चिरकाल चाललें असतें. माझ्या पित्यानें केलेल्या उपदेशामुळेंच मला आत्मसंयमन करतां आलें. आणि शेंवटीं एकातंवास साधून आपली व माझी मैत्री दृढ करण्याची मला सुसंधी सांपडली."

राजा दीर्घायूवर अत्यंत प्रसन्न झाला, आणि आपल्या मुलीशीं विवाह लावून देऊन त्यानें पुनः दीर्घायूला कोसल देशाच्या गादीवर बसविलें व जी कांहीं त्याच्या बापाची संपत्ति लुटून आणिली होती ती त्याची त्याला परत केली.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

११८. पात्रापात्रीं उपदेश व त्याचीं फळें. (३७६)

(अवारिय जातक नं. ३७६)

एकदां बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मून तरुणपणीं सर्व शिल्पांत पारंगत झाला; व प्रपंचाला कंटाळून त्यानें तापसवेषानें हिमालयाचा मार्ग धरिला. कांहीं काळ तेथें राहिल्यावर तो वाराणसीला आला. वाराणसीचा राजा त्याचे स्वार्थत्यागादि अनेक सद्‌गुण पाहून प्रसन्न झाला आणि मोठ्या आग्रहानें त्यानें आपल्या उद्यानांत बोधिसत्त्वाला ठेऊन घेतलें. बोधिसत्त्व राजाला वारंवार असा उपदेश करीत असे कीं, “महाराज, कोणावर रागावूं नकोस. कोणावर रागावूं नकोस. जो राजा दुसरा रागावला असतां स्वतः रागवत नाहीं तोच सर्व राष्ट्राला पूज्य होतो. अरण्यांत किंवा नगरांत, जलीं किंवा स्थलीं माझा तुला हाच उपदेश आहे कीं, तूं कोणावर देखील रागावूं नकोस.”

बोधिसत्त्वाच्या उपदेशानें राजा फारच सात्विक झाला; व त्या योगें सर्व प्रजेची त्यावर अत्यंत भक्ति जडली. आपणाला तपस्व्याच्या उपदेशानें एवढा फायदा झालेला पाहून राजाला त्याच्या ऋणांतून कसें मुक्त व्हावें हेंच सुचेना. शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, बोधिसत्त्वाला एका मोठ्या गांवची जहागीर देऊन टाकावी व राजसंन्याशासारखी त्याची मोठी बरदास्त ठेवावी. आपला मनोदय जेव्हां राजानें बोधिसत्त्वाला कळविला तेव्हां तो म्हणाला, “महाराज, तपस्व्यांनीं श्रीमंत व्हावे ही मोठी विडंबना होय. मी द्रव्यार्जन करण्यास समर्थ असतां तपस्वी झालों याचें कारण हेंच कीं, प्रपंचतृष्णेनें मला घेरून टाकूं नये, म्हणून मी तुला एवढेंच सांगतों कीं, मला पुनः प्रपंचपाशांत गोंवण्याचा प्रयत्न करूं नकोस.”

राजानें बोधिसत्त्वाच्या इच्छेप्रमाणें त्याला जहागीर देण्याचें तहकूब केलें, व पूर्वींप्रमाणेंच आपल्या उद्यानांत त्याच्या मर्जीप्रमाणें रहाण्यास सांगितलें. परंतु राजाच्या तोंडून बोधिसत्त्वाची फार स्तुति होऊं लागल्या कारणानें दरबारांतील लोक खुशीनें म्हणा, किंवा नाखुषीनें म्हणा, बोधिसत्त्वाच्या दर्शनाला येऊं लागले. जो तो राजासमोर बोधिसत्त्वाची स्तुतीच करूं लागला. उद्देश हाच कीं, राजेसाहेबांची कशी तरी मर्जी संपादन करावी. पण आमच्या बोधिसत्त्वाला अशा प्रकारची स्तुति आणि हांजीहांजी मुळींच आवडत नसे. त्याला या गोष्टीचाच नव्हे तर वाराणसीच्या आसपास देखील रहाण्याचा तिटकारा आला, आणि राजा आपल्या गमनाला अंतराय करील म्हणून त्याला न सांगतां केवळ उद्यानपालकाला सांगून तो एकटाच यात्रेला निघाला. कांहीं अंतरावर गेल्यावर गंगेच्या पार जाण्यासाठीं त्याला एक तरी लागली. तेथल्या नावाड्याचें नाव अवार्य असें होतें. अवार्यानें बोधिसत्त्वाला फारशी तक्रार न करितां परतीराला नेलें. परंतु तेथें गेल्यावर तो द्रव्य मागूं लागला. तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, “बा नाविका, तुला या तुझ्या धंद्यात व इतरत्र उपयोगी पडेल असें धन देतों तें ग्रहण कर.”

नावाडी आशाभूत होऊन घाईघाईनें म्हणाला, “द्या तर मग.”

बोधिसत्त्व म्हणाला, “बाबारे, तुला जें कांहीं वेतन मागावयाचें असेल तें उतारू परतीरावर असतानांच मागत जा. कांकीं, तेथें उतारूंना या तीराला येण्याविषयीं फार उत्सुकता असते. परंतु इच्छित स्थळीं पोंचल्यावर त्यांचें मन बदलतें व त्यामुळें कलहाला मात्र वाव मिळतो. म्हणून पैसे घेतल्याशिवाय कोणत्याहि उतारूला नांवेंत बसूं देऊं नकोस.”

अनुक्रमणिका

नावाडी बोधिसत्त्वाचा हा उपदेश ऐकून फार संतापला आणि म्हणाला, “हेंच काय तुम्ही देणार आहांत तें? हें मला नको आहे. नुसते शब्द घेऊन काय करावयाचें?”

त्यावर बोधिसत्त्व म्हणाला, “एवढ्यानें तुझी तृप्ती होत नसली तर आणखी एक अत्यंत उपयुक्त वस्तू तुला देतों, ती घे. या वस्तूचा तुला सर्व ठिकाणीं उपयोग होण्यासारखा आहे. गांवांत किंवा जंगलांत जळीं किंवा स्थळीं तूं कोणावर रागावूं नकोस आणि माझा हा उपदेश कधींहि विसरूं नकोस. माझ्याजवळ देण्यासारखें म्हटलें म्हणजे एवढेंच धन आहे.”

नावाडी म्हणाला, “असलें भिकारडें धन घेऊन तूं नावेंत का बसलास? असल्या गप्पा सांगणार आहे असें जर मला तूं पूर्वींच सांगितलें असतें तर मी तुला कशाला माझ्या होडींत बसूं दिलें असतें? पण तुझ्यासारख्या लुच्चा जोगड्याला फुकट जाऊं देणें मोठा अन्याय होय.”

असें म्हणून त्यानें बोधिसत्त्वाला खालीं पाडलें व तो त्याच्या उरावर बसला. इतक्यांत नवमास पूर्ण झालेली नावाड्याची गरोदर स्त्री तंटा कसला चालला आहे हें पाहण्यासाठीं तेथें आली. बोधिसत्त्वाला तिनें ओळखलें आणि आपल्या नवऱ्याला मिठी मारून ती म्हणाली, “हा जोगी राजाचा गुरू आहे. याला तुम्ही मारूं नका. राजाला हें वर्तमान समजलें असतां तो तुम्हाला भयंकर शासन करील.”

नावाडी म्हणाला, “आला आहे राजाचा गुरू! लबाडाजवळ एक कवडी देखील नाहीं! आणि म्हणे मोठा राजाचा गुरु! तूं देखील मोठी लबाड दिसतेस. नाहींतर या जोगड्याचा पक्षपात घेऊन माझ्याशीं कां भांडावयाला आली असतीस?”

असें म्हणून बोधिसत्त्वाला सोडून देऊन तो आपल्या बायकोच्या अंगावर धावला आणि तिच्या उरावर त्यानें जोरानें लाथ मारिली. तेथल्या तेथेंच गर्भपात होउन ती स्त्री तात्काल मरण पावली. तेव्हा लोकांनीं अवार्याला पकडून राजपुरुषांच्या हवालीं केलें. राजानें त्याला योग्य शासन केलें; आणि बोधिसत्त्वाला बोलावून आणून तो म्हणाला, “आचार्य, तुम्ही मला न कळवितां येथून कां गेलांत? व वाटेंत या भलत्याच संकटांत कां पडलांत?”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, उद्यानपालाला मी सांगून ठेविलेंच होतें. माझ्या जाण्यासंबंधानें मी जर तुझ्याशीं बोललों असतों तर माझ्या मार्गांत तूं पुष्कळ विघ्नें आणलीं असतीं. तेव्हां तुला न कळवितां गेलों हें चांगलेंच झालें. परंतु उपदेशाला पात्र कोण व अपात्र कोण याची जाणीव नसल्यामुळें वाटेंत माझी आणि बिचाऱ्या अवार्य नावाड्याची दुर्दशा झाली. तुला जसा मी उपदेश करीत असें, तसाच या नावाड्यालाहि त्याच्या कल्याणाचा उपदेश केला. परंतु त्यामुळें झालें काय माझ्या थोबाडींत बसली, नावाड्याची बायको मरण पावली, व बिचारा नावाडी कैदेंत पडला! तेव्हां माणसानें उपदेश करण्याला पात्रापात्र ओळखणें किती जरूर आहे बरें! सत्पात्रीं उपदेश केला असतां त्याला चांगलें फळ येतें, आणि असत्पात्रीं केला असतां त्याला वाईट फळ येतें, हें या माझ्या गोष्टीवरून सिद्ध होत आहे.”

——✻✻✻——

अनुक्रमणिका

११९. शीलावांचून वेदविद्या व्यर्थ (३७७)

(सेतकेतुजातक नं. ३७७)

आमचा बोधिसत्त्व एकदां प्रसिद्ध आचार्य होऊन पुष्कळ शिष्य पढवीत होता. त्याचा अग्रशिष्य श्वेतकेतु हा एके दिवशीं स्नान करून येत असतां वाटेंत त्याला एक चांडाळ जातीचा मनुष्य भेटला. चांडाळाच्या अंगाचा वारा आपल्या अंगावर येऊं नये व त्याची सावली आपणावर पडूं नये म्हणून श्वेतकेतु मोठ्यानें ओरडून म्हणाला, "मूर्ख चांडाळा! रस्त्यांतून दूर हो! मी ब्राह्मण असून तुझ्या अंगाचा वारा माझ्यावर येतां कामा नये, हें तुला माहीत नाही काय?"

चांडाळ म्हणाला, "तूं जर ब्राह्मण आहेस तर मी सांगतों त्या प्रश्नांची उत्तरें दे."

असें बोलून चांडाळानें श्वेतकेतूला निरनिराळे प्रश्न विचारले; परंतु श्वेतकेतु त्यांचीं उत्तरें देऊं शकला नाहीं. तेव्हां चांडाळानें त्याला आपल्या दोन्ही पायांच्या मधून बाजूला सारलें, आणि तो तेथून निघून गेला. चांडाळानें केलेल्या अपमानानें श्वेतकेतु अत्यंत क्रोधायमान झाला. परंतु चांडाळाचें दमन करण्याचें त्याला सामर्थ्य नसल्या कारणानें आपल्या गुरूजवळ जाऊन चांडाळाला शिव्याशाप देण्यास सुरवात केली. तेव्हां आचार्य म्हणाला, "बा श्वेतकेतु, या बाबतींत तुझाच मोठा अन्याय झाला आहे. मार्गांत उभा रहाणाऱ्या चांडाळाचा उपमर्द करण्याचा तुला अधिकार कसा पोहोंचतो? शिवाय तो चांडाळ तुझ्यापेक्षां अधिक बुद्धिमान दिसतो. मग त्याच्याशीं स्पर्धा करून आपली फजिती करून घेण्यांत अर्थ कोणता? तूं वादविवाद करण्यांत आपला काल न घालवितां मुकाट्यानें घरीं यावयाचें होतें कीं नाही? बरें, आतां तरी शांत हो आणि शिव्याशाप घालून आपल्याच शीलाचा भंग करून घेऊं नकोस. गुरूंच्या या उपदेशानें श्वेतकेतु थंडावला; परंतु तेथें रहाण्यास त्याला फार लाज वाटली. आपण जेथें विद्यार्थ्यांत श्रेष्ठ म्हणून मिरवलों तेथेंच चांडाळाकडून आपली अशी फजिती व्हावी, व आचार्यानेंहि आपलाच अपराध ठरवावा हें त्या अत्यंत मानी तरुणाला कसें रुचेल? त्यानें ताबडतोब गुरुगृह सोडून प्रयाण केलें. व पुढें तक्षशिलेला जाऊन आपलें अध्ययन पुरें केलें, आणि लोकांमध्यें आपली पूजा व्हावी या उद्देशानें त्यानें संन्यास ग्रहण केला. बरेच शिष्य गोळा करून पुनः तो वाराणसीला आला आणि तेथें शहराबाहेर उतरला. राजानें त्याचा योग्य आदरसत्कार करून तापसगणासह त्याला रहाण्यासाठीं आपलें एक उत्तम उद्यान दिलें, व एके दिवशीं संध्याकाळीं आपण भेटीस येणार आहें असा त्यास निरोप पाठविला. राजा भेटीस येणार आहे हें समजल्याबरोबर श्वेतकेतूनें तपश्चर्येचें मोठेंच अवडंबर माजविलें. आपल्या शिष्यांपैकीं कांहींना पाय झाडांना बांधून लोमकळत ठेविलें; कांहींना पंचाग्निव्रत साधन करावयास लाविलें; कांहीं हात वर करून तपश्चर्या करीत बसले; आणि आपण स्वतः एक पुस्तक घेऊन पुष्कळ शिष्यांस भोंवती गोळा करून त्याचा अर्थ सांगत बसला. इतक्यांत आपल्या अमात्यांसह राजा त्या ठिकाणीं येऊन पोहोंचला. त्या अमात्यांपैकीं एकजण आमचा बोधिसत्त्व होता. त्याला राजा म्हणाला, "नानातऱ्हेची तपश्चर्या करीत बसलेले हे तापस कोण आहेत? आणि या त्यांच्या अवडंबराचा काय उपयोग? या त्यांच्या कृत्यानीं ते अपायापासून मुक्त होतील काय?

बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, जर माणसाचें शील शुद्ध नसेल तर त्यानें तपश्चर्येचें कितीहि ढोंग माजविलें किंवा विद्येचें मोठें प्रदर्शन मांडलें तरी त्यापासून तिळमात्र फायदा व्हावयाचा नाहीं."

अनुक्रमणिका

हें राजाचें आणि बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून श्वेतकेतूस चीड आली, आणि तो म्हणाला, “तुमच्या म्हणण्याप्रमाणें सदाचरणावांचून मुक्ति नाहीं. मग सर्व वेदांचें अध्ययन करणारा देखील मोक्षाला जावयाचा नाहीं, आणि असें झालें म्हणजे वेदांचें अध्ययन निष्फळ ठरेल.”

बोधिसत्त्व म्हणाला, “वेदांचें अध्ययन निष्फळ आहे असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. वेदांच्या अध्ययनानें लोकांत आपलें स्तोम माजतें; परंतु सदाचरणानेंच मोक्ष मिळतो. कीर्ति पाहिजे असली तर वेदांचें अध्ययन करावें पण मोक्ष पाहिजे असला तर शीलच संपादावें.”

याप्रमाणें बोधिसत्त्वानें शीलवांचून तपश्चर्या आणि वेदाध्ययन व्यर्थ आहे हें सिद्ध करून दाखविलें. तेव्हां राजानें श्वेतकेतूचा दांभिकपणा ओळखला, आणि त्याला आणि त्याच्या शिष्यांना गृहस्थाश्रम देऊन आपल्या नोकरींत ठेऊन घेतलें.

——***——

अनुक्रमणिका

१२०. सर्वांची सारखी संभावना करणारा पर्वत. (३७९)

(नेरुजातक नं. ३७९)

आमचा बोधिसत्त्व एकदां हंस होऊन आपल्या धाकट्या भावासह दूरदूरच्या प्रदेशांत चारा शोधण्यासाठीं जात असे. ते दोघे एके समयीं मेरुपर्वतावर गेले. त्या पर्वताचा असा गुण असे कीं, त्याच्यावर वास करणाऱ्या सर्व प्राण्यांची कांति सुवर्णाची होत असे. बोधिसत्व आणि त्याचा भाऊ तेथें गेल्याबरोबर त्यांचीहि अंगकांति सोन्याची दिसूं लागली. दुसरे प्राणीहि सोन्याचेच दिसत होते. तें पाहून धाकटा भाऊ बोधिसत्त्वाला म्हणाला, "दादा, हें काय आश्चर्य आहे? येथें सर्वच प्राणी सोन्याचे दिसत आहेत! बोधिसत्त्व म्हणाला, "बाबारे, या पर्वताची ही थोरवी आहे. जो कोणी याचा आश्रय करतो त्याची कांति तो येथें असेपर्यंत सोन्याची होत असते."

"पण दादा, असला हा सर्वांना सारख्या रीतीनें वागविणारा पर्वत मला मुळींच आवडत नाहीं. कावळे कोल्हे इत्यादि नीच प्राणी आणि सिंहव्याघ्रादिक समर्थ प्राणी यांचा जेथें सारखाच मान राखला जातो, त्या स्थळाचा आश्रय करणें मला योग्य वाटत नाहीं. म्हणून आपण येथून निघून जाऊं."

बोधिसत्त्व म्हणाला, "तूं म्हणतोस ही गोष्ट खरी आहे. ज्या दरबारांत हुजऱ्याचा आणि पंडिताचा सारखाच मान असतो त्या दरबारचा शहाण्यानें आश्रय करूं नये असें सुभाषित आहेच. तेव्हां हा जरी सर्व पर्वतांचा राजा आहे, आणि ह्याची योग्यता मोठी आहे तथापि सर्व प्राण्यांना सोन्याचें बनवणें हा कांहीं याचा गुण म्हणतां येत नाहीं."

असें बोलून बोधिसत्त्व आपल्या भावासह तेथून उडून गेला.

——❋❋❋——

अनुक्रमणिका

१२१. लक्ष्मी आणि अवदसा (३८२)

(सिरिकालकण्णिजातक नं. ३८२)

हिमालय पर्वतावर अनवतप्त नांवाचें एक प्रसिद्ध सरोवर आहे. त्या सरोवरावर स्नान करण्यासाठीं प्राचीन काळीं निरनिराळे घाट असत. ऋषी एका घाटावर स्नान करीत असत. देवता दुसऱ्या घाटावर स्नान करीत असत. बुद्ध प्रत्येकबुद्ध वगैरे आपापल्या घाटांवर स्नान करीत असत. एके दिवशीं चार [यांना पालिभाषेंत चत्तारो महाराजा व त्यांच्या हाताखालील देवतांना चातुम्महाराजिक देवता म्हणतात.]दिक्पाळांपैकीं धृतराष्ट्र महाराजाची मुलगी श्री व विरूपाक्षमहाराजाची अवदसा, या दोघी जणी त्या सरोवरावर स्नानासाठीं एकाच वेळीं आल्या. तेव्हां प्रथमतः कोणी स्नान करावें या संबंधानें त्या दोघींमध्यें वाद उपस्थित झाला. अवदसा म्हणाली, “माझा स्नान करण्याचा पहिला हक्क आहे. कांकीं जगांतील बहुजन माझ्या बाजूचे आहेत.”

लक्ष्मी म्हणाली, “असें जरी आहे तथापि सगळे सूज्ञ लोक माझ्या बाजूचे आहेत. त्याअर्थी माझाच हक्क या घाटावर अधिक पोहोंचतो.”

अशा रीतीनें त्यांचा वाद होऊन त्या परस्परांचें समाधान करूं शकल्या नाहींत. तेव्हां त्यांनीं ती फिर्याद आपल्या वडिलांकडे नेली. आपल्याच ह्या मुली, आणि आपणच हा न्याय कसा करावा. असें म्हणून त्यांनीं विरूढ व वैश्रवण या दोन दिग्पाळांवर यांचा निवाडा करण्याचें काम सोपविलें. ते म्हणाले, “धृतराष्ट्र आणि विरूपाक्ष हे आमचेच सखे आहेत. त्यांचा आणि आमचा हुद्दा एकच आहे. तेव्हां त्यांच्या मुलींच्या खटल्याचा निकाल आम्ही कसा लावावा.”

असें म्हणून त्या दोघांना घेऊन ते थेट इंद्राजवळ गेले, आणि त्यांच्या खटल्याचा निकाल करण्यासाठीं त्यांनीं इंद्राला विनंती केली. आपल्याच दिग्पाळांच्या या मुली आहेत, आणि दोघींपैकीं एकीच्या तर्फेनें न्याय दिला तरी दुसरीला वाईट वाटण्याचा संभव आहे असें जाणून इंद्रानें परस्पर न्याय करण्याची एक युक्ति योजिली. त्या काळीं वाराणसींत एक शुचिपरिवार नांवाचा सज्जन व्यापारी रहात असे. त्याला हें नांव पडण्याचें कारण असें होतें कीं, त्याचे चाकर नोकरहि सुशील असत. प्राणघात करावयाचा नाहीं, व्यभिचार, मद्यपान आणि असत्य भाषण करावयाचें नाहीं इत्यादि शीलांचे नियम तो सहपरिवार मोठ्या मनोभावानें पाळीत असे. त्याच्या घरीं त्यानें आपल्याच खोलीच्या शेजारीं एक सुशोभित खोली तयार केली होती, व तेथें एक अभिनव मंचक ठेविला होता. हेतु हा कीं, जर कोणी आपल्यापेक्षां शीलानें आणि योग्यतेनें मोठा गृहस्थ आपल्या घरीं आला तरच तो पलंग त्याच्या उपयोगासाठी द्यावा. ही गोष्ट इंद्राला माहीत होती. तो श्री आणि अवदसा या दोघींना म्हणाला, “वाराणसींतील शुचिपरिवार श्रेष्ठीच्या घरीं ज्याच्यावर कोणीच बसला नाहीं, असा एक मंचक आहे. त्यावर तुमच्यापैकीं जी बसूं शकेल, तिचाच हक्क अनवतप्त सरोवरांत प्रथमतः स्नान करण्याचा आहे असें समजा, आणि पुनः हा खटला घेऊन आमच्याकडे येऊं नका.”

हा निकाल ऐकल्याबरोबर गोफणींतून सुटलेल्या दगडाप्रमाणें अवदसा सूं करून झटदिशीं खालीं उतरली, आणि श्रेष्ठी बसला होता त्या खोलींत खिडकीवाटें शिरून अंतराळीं उभी राहिली. तिला पाहून श्रेष्ठी म्हणाला, “तूं नीलवर्णाच्या रश्मी अंगांतून सोडणारी व नीलवस्त्र परिधान करणारी नीलवर्णी स्त्री कोण आहेस बरें?”

अनुक्रमणिका

अवदसा म्हणाली, “विरूपाक्ष दिग्पाळाची मी कन्या आहें. मला काली किंवा अवदसा असें म्हणतात. केवळ तुझ्या घरीं थोडावेळ विश्रांति घेण्यासाठीं अवकाश मिळावा म्हणून आलें आहें.”

शुचिपरिवार श्रेष्ठी म्हणाला, “परंतु मला एवढें सांग कीं, तुला कशा प्रकारच्या मनुष्याच्या घरीं राहणें आवडतें?”

अवदसा म्हणाली, “परनिंदक, विनाकारण स्पर्धा करणारा, मत्सरी आणि शठ अशा मनुष्यावर माझें फार प्रेम असतें. कां कीं, तो जें जें मिळवितो तें तो लवकरच घालवितो. वारंवार रागावणारा, दीर्घद्वेषी, चहाडखोर, भांडणें उपस्थित करणारा, खोटें बोलणारा आणि शिवीगाळी करणारा अशा मनुष्यावर माझी फार फार भक्ति असते. आज उद्यां असें म्हणून जो आपलें काम लांबणीवर टाकतो. बरें, काम करण्याची कोणी आठवण दिली तर त्यावर रागावतो आणि आपल्या हिताच्या गोष्टीची अवहेलना करितो असा गर्विष्ठ मनुष्य आपल्या सर्व मित्रांपासून भ्रष्ट होतो, आणि म्हणूनच तो मला फार आवडतो. अशा मनुष्याच्या घरीं मीं सुखानें वास करितें.”

शुचिपरिवार म्हणाला, “बाई काली, माझ्या अंगीं किंवा माझ्या कुटुंबाच्या अंगीं असे गुण नाहीं आहेत. तेव्हां येथें तुला आश्रय मिळणें शक्य नाहीं. तूं दुसऱ्या शहरांत किंवा राजधानींत निवासस्थान पहा.”

अवदसा म्हणाली, “आपल्या या बोलण्यानें माझी फारच निराशा झाली आहे. जेथें संपत्ति फार असते तेथें माझी अशी निराशा कधींहि झाली नाहीं. एकदां मनुष्याच्या घरीं धनदौलत आली म्हणजे माझ्या आवडीचे सर्व गुण एका मागून एक त्याच्या अंगीं शिरतात, व माझी त्याच्या घरीं फेरी होऊन यथेच्छ चैन चालते.”

असें बोलून काली तेथून निघून गेली. इतक्यांत श्री देवता तेथें येऊन उभी राहिली. तिला पाहून श्रेष्ठी म्हणाला, “असा हा दिव्यवर्णधारिणी स्त्री तूं कोण आहेस? तुझ्या अंगांतून निघणारीं पीतवर्ण किरणें पाहून मला विस्मय होत आहे. तेव्हां तुझी प्रवृत्ति मला सांग.”

लक्ष्मी म्हणाली, “धृतराष्ट्र दिग्पाळाची मी कन्या आहे, आणि मला श्री किंवा लक्ष्मी असें म्हणत असतात. थोडका वेळ विश्रांति घेण्यासाठी मी आपल्या घरीं आलें आहें. आपण आश्रय द्याल तर मी आभारी होईन.”

श्रेष्ठी म्हणाला, “पण तूं कशा प्रकारच्या माणसाच्या घरीं रहातेस तें मला सांग. म्हणजे तुझ्या योग्यायोग्यतेचा विचार करुन आश्रयस्थान देईन.”

लक्ष्मी म्हणाली, “शीत आणि उष्ण, वारा आणि पाऊस, आणि डांस साप वगैरे त्रासदायक प्राणी यांची जो पर्वा करीत नाहीं, भूक आणि तहान सहन करून आपल्या कर्तव्यांत जो सर्वदा दक्ष असतो, व वेळोवेळीं आपलीं कामें करुन हानि होऊं देत नाहीं, तो मनुष्य मला प्रिय आहे. त्याच्या घरीं रहाणें मला फार आवडतें. जो क्रोधवश होत नाही, मित्रांवर प्रेम करितो, दानधर्म करितो, शीलसंपन्न असतो, दुसऱ्याला ठकवीत नाहीं, सरळपणानें वागतो, लोकांना मदत करितो, व मृदु भाषणानें त्यांना वश करितो, आणि मोठ्या पदवीला चढला तरी नम्रता सोडीत नाही, अशा मनुष्याच्या घरीं मला फारच आनंद होतो. जो

अनुक्रमणिका

मित्रांवर, अमित्रांवर, थोरांवर, लहानांवर आणि समानांवर, हित करणाऱ्यांवर आणि अहित करणाऱ्यांवर, एकांतांत किंवा लोकांतांत सारखेंच प्रेम करितो, व त्यांचें हित करण्यास दक्ष असतो, कधीं कोणाला दुखवून बोलत नाहीं, त्यावर मी जिवंतपणीं प्रसन्न असतेंच. परंतु तो मेल्यावर देखील त्याच्यावरची माझी मर्जी कमी होत नाहीं. सत्कार संपत्ति, थोरवी इत्यादिकांच्या लाभानें ज्याला गर्व चढतो अशा मूर्खाला मी पायखान्याप्रमाणें अल्पावधींतच सोडून जात्यें."

हें श्री देवतेचें भाषण ऐकून श्रेष्ठी म्हणाला, "तर मग श्री देवतेची किंवा अवदसेची मर्जी संपादन करणें हें ज्याच्या त्याच्या हातीं आहे असें म्हटलें पाहिजे. सामान्य लोकांत अशी समजूत आहे कीं, लक्ष्मीची किंवा अवदसेची फेरी आपोआप होत असते. त्याला कांहीं प्रयत्न करावा लागत नाहीं. माझी समजूत या विरुद्धच होती, आणि तुझ्या भाषणानें ती आज दृढतर झाली आहे. आतां माझ्या घरीं हा नवीन मंचक आणि बिछाना तयार आहे. त्यावर तूं सुखानें विश्रांती घे."लक्ष्मीनें तेथें विश्रांती घेऊन कालीची भेंट घेतली, आणि अनवतप्त सरोवरांत प्रथम स्नान करण्याचा आपला हक्क शाबीत केला.

——⁂——

अनुक्रमणिका

१२२. विद्वानेव प्रजानाति विद्वज्ज्ञनपरिश्रमम्. (३८७)

(सूचिजातक नं. ३८७)

आमचा बोधिसत्त्व एकदां लोहाराच्या कुळांत जन्मला होता. तरुणपणीं आपल्या कलेंत तो अत्यंत दक्ष झाला. परंतु खेडेगावीं राहून ओबडधोबड आउतें तयार करून पोटभरणें त्याला आवडेना. काशिराष्ट्रांत प्रसिद्ध लोहारांचा एक गांव असे. त्या गांवीं सर्व तऱ्हेचीं उत्तम शस्त्रास्त्रें बनत असत, व तेथूनच तीं काशीच्या आसपासच्या राष्ट्रांत पाठविण्यांत येत असत. बोधिसत्त्वानें एक उत्तम सुई तयार केली; व त्या गावीं जाऊन 'कोणाला सुई पाहिजे आहे काय' असें बोलत तो रस्त्यांतून फिरूं लागला. परंतु त्याला कोणींच बोलावलें नाहीं. तरी पण आपल्या सुईचें नानाप्रकारें वर्णन करित तो तसाच पुढें चालला. तेथल्या लोहारांच्या मुख्याच्या घरावरून चालला असतां त्याची मुलगी बाहेर येऊन बोधिसत्त्वाला म्हणाली, "बाबारे! हा तूं काय वेडेपणा चालविला आहेस? सुया, गळ वगैरे सर्व लोखंडी सामान येथेंच तयार होऊन गावोंगावीं जात असतें. या लोहारांच्या गांवीं कोण घेणार बरें?"

बोधिसत्त्व म्हणाला, "बाई ग, आपल्या शिल्पाचें ज्याला प्रदर्शन करावयाचें असेल त्यानें तें योग्य ठिकाणींच केलें पाहिजे. सुईची पारख लोहारांच्या गावींच व्हावयाची, आणि येथील मुख्य लोहारानें जर ही माझी सुई पाहिली तर तो माझा योग्य गौरव केल्यावांचून रहाणार नाहीं."

हें बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून ती तरुण मुलगी आपल्या बापाच्या कारखान्यांत धांवत गेली, आणि तिनें त्याला ही हकीगत सांगितली. तेव्हां मुख्य लोहारानें बोधिसत्त्वाला कारखान्यांत बोलावून नेलें. तेथें त्यानें आपली सुई सर्व लोहारांना दाखविली. ती पाहून बोधिसत्त्वाच्या शिल्पाचें सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटलें. मुख्य लोहारानें आपली एकुलती एक मुलगी बोधिसत्त्वाला देऊन त्याला आपला घरजावई केलें; व वृद्धापकाळ संनिध आल्यावर आपली मुख्य लोहाराची जागा त्यालाच देऊन टाकिली. बोधिसत्त्वानें त्या गावंच्या लोहारकामाची कीर्ति द्विगुणित केली.

तात्पर्य विद्वानाच्याच गांवीं विद्वत्तेचें चीज होतें.

——***——

अनुक्रमणिका

१२३. मैत्रींतच स्वार्थ आहे. (३८९)

(सुवर्णकक्कटकजातक नं. ३८९)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मी मगध राष्ट्रांतील ब्राह्मण ग्रामांत जन्मला होता. त्या गावचे सर्व ब्राह्मण आपला निर्वाह शेतीवर करीत असत. बोधिसत्त्व वयांत आल्यावर तोच धंदा करूं लागला. एके दिवशीं पहांटेला उठून तो आपल्या शेतांत गेला. शेताच्या सीमेवर एक लहानसें डबकें होतें. त्यांतलें पाणी बहुधा आटत नसे. पण तेथें मासे वगैरे रहात नसत. तेवढा एक खेंकडा मात्र पावसाच्या पुरानें तेथें आला व पुढें पुराचें पाणी ओसरून गेल्यावर त्याच डबक्यांत राहिला. बोधिसत्त्व त्या डबक्यांत तोंड धुण्यासाठीं गेला असतां त्याला हा खेंकडा आढळला. खावयास कांहीं न मिळाल्यामुळें खेंकडा अत्यंत दुर्बळ झाला होता. बोधिसत्त्वाला त्याची कींव आली, व त्यानें तोंड वगैरे धुवून त्या खेंकड्याला आपल्या उपवस्त्रांत बांधून शेतांत नेलें, आणि तेथें आपल्या जवळ असलेलें कांहीं फराळाचें खावयास घालून पुनः त्याला आणून त्या डबक्यांत सोडलें. याप्रमाणें रोज बोधिसत्त्व त्या खेंकड्याला कांहीं तरी खाण्याचा पदार्थ आणून देत असे. परंतु त्या डबक्यांतील पाणी हळू हळू आटत जाऊं लागलें. तेव्हां आपणाला कोणी तरी मारून खाईल अशी खेंकड्याला भीति पडली, व आपणाला नदींत नेऊन सोडण्याबद्दल बोधिसत्त्वाला त्यानें विनंती केली. नदी जरा दूर असल्याकारणानें आपलें काम सोडून ताबडतोब तिकडे जातां येणें बोधिसत्त्वाला शक्य नव्हतें. तो म्हणाला, "बा खेंकड्या, तूं जरा दम धर. या डबक्यांत तूं रहात आहेस अशी कोणाला शंका देखील नाहीं. आणखी दोन चार रोजांत शेतांतील काम संपल्याबरोबर मी तुला नेऊन नदींत सोडतों."

त्या शेताजवळच एक कावळा आपलें घरटें बांधून रहात असे. त्याच्या बायकोला जिवंत माणसाचे डोळे खाण्याचा डोहळा झाला. तेव्हां ती कावळ्याला म्हणाली, "आमच्या या घरट्याजवळच्या शेतांत येणाऱ्या तरुण ब्राह्मणाचे डोळे खाण्याचा डोहळा मला झाला आहे, तो पूर्ण करा."

कावळ्यानें तिची समजूत घालण्याचा फार फार प्रयत्न केला; पण तें कांहीं जमेना. शेवटीं तो म्हणाला, "बरें, या कामीं कांहीं युक्ति असली तर सांग."

ती म्हणाली, "येथें आसपास एक कृष्णसर्प रहात असतो, त्याची सेवा करून त्याला तुम्ही वश करून घ्या, व हा ब्राह्मण शेतांत आल्याबरोबर त्याला दंश करावयास लावा. आणि त्यानें असें केलें म्हणजे ब्राह्मण भूमीवर पडेल. इतक्यांत त्याचा प्राण जाण्यापूर्वी तुम्ही त्याचे दोन्ही डोळे उपटून घेऊन या."कावळ्याला ही मसलत पसंत पडली, व त्यानें दोन दिवसांतच कृष्णसर्पाला प्रसन्न करून घेतलें. बोधिसत्त्वाच्या पायवाटेवर कृष्णसर्प दडून बसला, व कावळा जवळच्या झाडावर बसून बोधिसत्त्व खालीं पडण्याची वाट पहात बसला.

त्या दिवशीं बोधिसत्त्व खेंकड्याला घेऊन आपल्या शेतांतून नदीवर जाण्यास निघाला. इतक्यांत त्या कृष्णसर्पानें त्याला दंश केला. बोधिसत्त्व खालीं पडला, व त्याच्या छातीवर उपरण्यांत गुंडाळलेला तो खेंकडा पडला. बोधिसत्त्व खालीं पडला कसा हें पहाण्यासाठीं खेंकडा हळूच उपरण्यांतून बाहेर निघाला तोंच कावळा येऊन तेथें बसला. या कावळ्याचेंच हें कृत्य असेल असें जाणून आपल्या आंकड्यांत खेंकड्यानें कावळ्याची मानगुटी घट्ट धरली. तेव्हां कावळा का का करून मोठ्यानें ओरडून सापाला

म्हणाला, “मित्रा, या भयंकर प्राण्यानें मला धरलें आहे! याला दोन शिंगें असून हाडासारखी घट्ट कातडी आहे? तेव्हां धांवत येऊन मला या संकटांतून सोडव!”

सापानें आपल्या मित्राचे शब्द ऐकून मोठी फणा केली आणि फुत्कार टाकीत खेंकड्याच्या अंगावर धांव घेतली. पण खेंकड्यानें दुसऱ्या आंकड्यांत त्याचीही मानगुटी चिरडली. तेव्हां गयावया करून तो म्हणाला, “हें काय आश्चर्य आहे बरें! खेंकडे कावळ्याचें किंवा सापाचें मांस खात नाहींत. मग तूं आम्हा दोघांना कां पकडलेंस?”

खेंकडा म्हणाला, “माझ्या मित्राच्या नाशाला तुम्ही दोघेही कारण आहांत असें मला वाटतें. म्हणून मी तुम्हांला पकडलें आहे.”

साप म्हणाला, “पण हा मनुष्य मेला तर त्यांत तुझें काय गेलें?”

खेंकडा म्हणाला, “यानें माझ्यावर पुष्कळ उपकार केले आहेत. एवढेंच नव्हे तर आज तो मला घेऊन पाण्यांत सोडण्यासाठीं जात होता. जर मी याचे प्राण वांचविले नाहींत तर माझीहि धडगत दिसत नाहीं. कांकीं, मी माझ्या मंद गतीनें पाणी गांठीपर्यंत कोणी तरी पकडून मला पचनी पाडील. तेव्हां मित्राला साहाय्य करणें यांतच कर्तव्य आणि स्वार्थ आहे.”

तें ऐकून सर्प त्याला म्हणाला, “असें जर आहे, तर आम्हां दोघांना सोडून दे. मी याच्या शरीरांत भिनत चाललेलें विष पुनरपि आकर्षून घेतों. त्वरा कर! जर आणखी कांहीं वेळ जाऊं दिला, तर विष ओढून घेणें अशक्य होईल.”

खेंकड्यानें सापाला सोडून दिलें; आणि तो म्हणाला, “माझ्या मित्राला पूर्वीप्रमाणें निरोगी पाहिल्याशिवाय मी या कावळ्याला सोडावयाचा नाहीं. तूं याचें विष समूळ ओढून घेऊन याला बरा कर, आणि मग मी तुझ्या मित्राला मुक्त करितों. कावळ्यावर आणि सर्पावर विश्वासण्याएवढा मी मूर्ख नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव.”

तेव्हां निरुपायानें सापानें बोधिसत्त्वाच्या अंगांतील विष आकर्षून घेतलें, व त्याला पूर्वीप्रमाणें निरोगी केलें; आणि तो तेथून पळत सुटला. इकडे खेंकड्याने कावळाच या सर्व कटाचें मूळ असें जाणून त्याची मान कापून खालीं पाडली. तें पाहून कावळ्याच्या बायकोनें तेथून पलायन केलें. सापानें तर तो प्रांत देखील वर्ज्य केला. बोधिसत्त्वानें खेंकड्याला नेऊन त्याच्या इच्छेप्रमाणें नदींत सोडलें.

——***——

अनुक्रमणिका

१२४. शुद्ध वस्त्राला डाग शोभत नाहीं. (३९२)

[हीच गोष्ट वनसंयुत्तांत सांपडते. तेथें ही एका भिक्षूची म्हणून दिली आहे.]

(भिसपुप्फजातक नं. ३९२)

एका जन्मीं बोधिसत्त्व ब्राह्मण होऊन वयांत आल्यावर परिव्राजकवेषानें अरण्यांत वास करीत असें. तेथें एका तलावांत सुंदर कमळें उत्पन्न होतअसत. एके दिवशीं एक जटिल तापस त्या तलावांत स्नानासाठीं आला होता. त्यानें कमलिनी मुळासकट उपटून टाकिल्या व पुष्कळ कमळें तोडून त्यांची माला करून गळ्यांत घालून चालता झाला. त्यावेळीं बोधिसत्त्वहि स्नानासाठीं तेथें आला होता. तो मनांत म्हणाला, "काय हा अधम तपस्वी! या सुंदर कमळांची त्यानें कशी नासाडी करून टाकिली बरें! आहा! किती तरी सुशोभित कमळें हीं! आणि यांच्या शोभेला अनुरूप सुगंधहि असला पाहिजे."

असे उद्‌गार काढून तो त्या सरोवरांत उतरला आणि एक कमळ वांकवून हळूच त्याचा वास घेऊं लागला. तें त्याचें कृत्य पाहून तलावाच्या कांठीं रहाणारी वनदेवता त्याला म्हणाली, "भो परिव्राजक, हें तूं काय चालविलें आहेस? हें कमळ तुला कोणीहि न देतां याचा तूं वास घेत आहेस, ही एक प्रकारची चोरी नव्हे काय? मी तर तुला सुगंधाचा चोर असें म्हणत्यें!"

बोधिसत्त्वाला देवतेचें भाषण ऐकून फारच विस्मय वाटला आणि तो म्हणाला, "नुक्त्याच आलेल्या जटिलानें कमलिनी उपटून टाकिल्या, कमळें तोडून नेलीं, आणि सर्व प्रकारें या तलावाच्या शोभेची हानि केली. असें असतांहि तूं त्याला एक शब्द देखील बोलली नाहींस! परंतु मला मात्र उपदेश करावयास पुढें सरसावलीस हें मोठें आश्चर्य नव्हे काय?"

देवता म्हणाली, "तुला त्या जटिलाचा इतिहास माहित नाहीं. पापकर्मांनीं याचें अंतःकरण इतकें मलिन झालें आहे कीं, या त्याच्या यःकश्चित् कृत्यानें त्यावर आणखी डाग पडण्यास जागा राहिली नाहीं. मुलांना संभाळणाऱ्या दाईचें लुगडें जसें घाणेरडें असतें तसा तो घाणेरडा आहे. त्याला म्यां काय सांगावें? परंतु तुला उपदेश करणें योग्य आहे असें मला वाटतें. कांकीं, तुझें वर्तन शुद्ध आहे. आणि त्यावर या अत्यल्प पापकर्माचा डाग शोभत नाहीं. जो मनुष्य आजन्म सदाचरण करितो त्यावर केसाएवढा देखील दुराचरणाचा डाग पडलेला एकदम लोकाच्या नजरेस येतो. म्हणून तुला सावध करण्यासाठीं आणि अशा लहानसहान पापांपासून निवृत्त करण्यासाठीं मी उपदेश करीत आहें."

हें त्या देवतेचें भाषण ऐकून बोधिसत्त्व फारच ओशाळला आणि म्हणाला, "भो वनदेवते! मला ओळखून माझा दोष तूं वेळींच दाखवून दिला आहेस. तेव्हां माझी तुला अशी विनंति आहे कीं; पुनः माझ्या हातून असें कृत्य घडलें तर मला सांगत जा."

देवता म्हणाली, "भो प्रव्रजित! मी कांहीं तुझी दासी नाहीं किंवा वेतन घेऊन काम करणारी मोलकरीणहि नाहीं, तेव्हां तुझ्या बरोबर फिरत राहून तुझे दोष दाखवण्याचें मला काय प्रयोजन बरें? जेणें करून सद्‌गतीला जाशील असा मार्ग तुझ्या तुंवाच शोधून काढला पाहिजे. दुसरा तुला उपदेश करील आणि सन्मार्गाला लावील याची वाट पहात बसूं नकोस!"

अनुक्रमणिका

बोधिसत्त्वानें देवतेचे आभार मानल्यावर ती तेथेंच अंतर्धान पावली. आपल्या शुद्धाचरणावर पापाचा डाग पडूं नये या बद्दल बोधिसत्त्वानें आमरण फार काळजी घेतली.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

१२५. परपुष्ट कावळा आणि स्वतंत्र लावा. (३९४)

(वत्तकजातक नं. ३९४)

बोधिसत्त्व एका जन्मीं लावापक्षी होऊन अरण्यामध्यें यथेच्छ संचार करीत असे. एके दिवशीं तो उडत उडत वाराणसीला आला. तेथें एक परपुष्ट कावळा त्याला पाहून म्हणाला, "बा पक्ष्या, तूं येथें कोठून आला आहेस?"

बोधिसत्त्व म्हणाला, "मी अरण्यवासी लावापक्षी आहे. सहज उडत उडत या नगराजवळ येऊन ठेपलों आहे. पण कावळेदादा, मी तुम्हाला असें विचारतों कीं, येथें झाडें वगैरे फारशीं दिसत नाहींत, मग तुमचा निर्वाह कशावर चालतो बरें?"

कावळा म्हणाला, "अरे लाव्या, तूं तर अगदीं मूर्ख दिसतोस. येथें आमची यथेच्छ चैन चालते. आज कोणाच्या घरी पिंडप्रदान तर कोणाच्या घरीं ब्राह्मणभोजन असें येथें चाललेलें असतें. आणि जेव्हां अशी मेजवानी मिळत नसते, तेव्हां हळूच कोणाच्या तरी घरांत शिरून मत्स्यमांसादिक पदार्थ पळवून नेण्यास आम्ही कमी करीत नसतों."

लावा म्हणाला, "पण कावळेदादा, इतकी तुमची चैन चालली असून तुम्ही असे रोड कां दिसतां बरें?"

कावळा म्हणाला, "हा वेड्या, हें काय विचारतोस? आम्हांला जरी खावयास यथेच्छ मिळतें तरी राजाच्या दरबारांतील मनुष्याप्रमाणें आमची वृत्ति सदोदित साशंकित असते. एखाद्यानें पिंडप्रदान करून पिंड टाकून दिले असले तथापि ते खाण्यास आम्हाला फार भीति वाटते. न जाणो, एखादा द्वाड पोरगा दगड घेऊन आम्हांस मारण्यासाठीं बसला असला तर! मग आम्ही लोकांच्या घरांत शिरतों त्यावेळीं आमचें चित्त किती उद्विग्न असतें याची नुसती कल्पना केली पाहिजे! अशा परिस्थितींत आमच्या अंगावर मांस कसें यावें? पण मी तुला असें विचारतों कीं, जंगलांतील झाडपाल्यावर निर्वाह करणारा तूं इतका लठ्ठ कसा दिसतोस?"

लावा म्हणाला, "याचें कारण हेंच कीं, आम्ही स्वतंत्रपणें रहातों. परपिंडावर किंवा दुसऱ्याच्या घरांत शिरून निर्वाह करण्याची आम्हांला संवय नाहीं. जें कांहीं भोजनसमयीं मिळेल त्यावर आम्ही तृप्त असतों. दुसऱ्याच्या वस्तूवर कुदृष्टि आम्ही कधीं ठेवीत नसतों. अर्थात आम्ही निर्भयपणें रहातों, व त्यायोगें आमचें अंतःकरण सदोदित शांत असतें. खाल्लेलें अन्न अंगास लागल्यामुळें आमचें शरीर स्थूल होणें साहजिकच आहे."

कावळा म्हणाला, "तुम्ही लावे खरोखरच धन्य आहां. परंतु आम्हांला परपिंडावर पोसण्याची लागलेली संवय सुटून तुमच्या सारखें स्वतंत्र रहातां कसें येईल?"

हें कावळ्याचें भाषण ऐकून लावा "तुमचें सुग्रास अन्न तुम्हांलाच शाश्वत होवो"असें म्हणून अरण्यांत उडून गेला.

अनुक्रमणिका

१२६. खरा राजधर्म. (४०७)

(महाकपिजातक नं. ४०७)

आमचा बोधिसत्त्व कपियोनींत जन्मून वयांत आल्यावर मोठ्या वानरसमुदायांचा राजा होऊन हिमालयाच्या पायथ्याशीं गंगेच्या तीरावर महाअरण्यांत रहात असे. तेथें गंगेच्या तीरावर एक भव्य आम्रवृक्ष होता. त्याचीं फळें इतकीं गोड असत कीं, त्याला मनुष्यलोकींचें अमृत म्हटलें असतां अतिशयोक्ति व्हावयाची नाहीं. बोधिसत्त्व आपल्या वानरगणांसह तेथें येऊन त्या वृक्षाचीं पक्व फळें खाववून सर्वांना तृप्त करित असे. त्या झाडाची एक शाखा गंगेवर वांकली होती, व तिला झालेलीं फळें गंगेंत पडण्याचा संभव होता. असें एखादें फळ वहात जाऊन मनुष्यांच्या हातीं लागलें तर ते शोध करीत तेथें येतील व आपणाला तेथून हालवून देतील अशा धोरणानें बोधिसत्त्व त्या फांदीचीं कोवळींच फळें काढून खावयास सांगत असे. इतकी खबरदारी घेतली तरी एके वर्षी त्या फांदीला मुंग्यांच्या घरट्यांत झालेलें एक फळ चुकून राहिलें, व तें पिकून गंगेंत पडलें. वाराणसीचा राजा जलक्रीडा करण्यांसाठीं गंगेंत [मगरानें पकडूं नये म्हणून गंगेत जाळीं घालून जागा निर्धास्त करीत असत व तेथें राजे लोक जलक्रीडा करीत.] जाळी घालून आपल्या स्त्रीमंडळासह स्नानाला गेला असतां तें फळ येऊन त्या जाळ्यास अडकलें. नावाड्यांनीं तें काढून क्रीडा समाप्त झाल्यावर राजाला अर्पण केलें. राजानें एक तुकडा आपण खाऊन त्याचे लहान लहान तुकडे आपल्या स्त्रीमंडळाला वांटून दिले. त्या सर्वांना ते फारच आवडलें. राजानें तर दुसऱ्याच दिवशीं स्वतः होडींतून जाऊन त्या वृक्षाचा शोध लावण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें पुष्कळ नावा तयार करून भोजनाची वगैरे सर्व सामग्री घेऊन मोठ्या सैन्यासह-वर्तमान तो निघाला. बऱ्याच दिवसांनीं त्या आम्रवृक्षाखालीं राजाच्या नौका येऊन थडकल्या, व त्याचीं रसाळ फळें चाखून राजा आणि सैनिक अत्यंत मुदित झाले. त्या रात्रीं त्यांनीं त्या झाडाखालींच तळ दिला. बोधिसत्त्व आपल्या रोजच्या नियमाप्रमाणें मध्यरात्रीच्या सुमारास वानरगणाला घेऊन झाडावर आला. सर्व वानर इकडून तिकडे उड्या मारून फळें खाऊंलागले. त्या गडबडीनें राजा जागा झाला, व त्यानें आपल्या सर्व सैनिकांस जागे केलें. एवढा मोठा वानरसमुदाय पाहून राजा म्हणाला, "यांना जर या अरण्यांत राहूं दिलें तर या वृक्षाचीं फळें तुम्हांला कधींहि मिळणार नाहींत. एका दिवसांत सर्व फळांचा हे दुष्ट वानर फडशा पाडतील. तेव्हां आतां आपापलीं धनुष्यें सज्ज करून यांना चारी बाजूंला वेढा द्या, व उद्यां सकाळ झाल्यावर यांतील एकहि वानर जिवंत ठेऊं नका."

सैनिकांनीं जमिनीवर तिन्ही बाजूंनीं वेढा दिला व गंगेच्या बाजूला होड्या ओळीनें रचून ठेऊन त्यांवर शरसंधाननिष्णात धनुर्धर ठेविले. आपणाला वेढलेलें पाहून वानरसमुदाय थरथर कांपूं लागला. कित्येकांची बोबडीच वळून गेली. कित्येक राजाला, तर कित्येक आपल्या कर्माला आणि कित्येक बोधिसत्त्वाला दोष देऊं लागले. पण बोधिसत्त्व निर्भयपणें म्हणाला, "बाबांनो, तुम्ही घाबरूं नका. संकट जरी फार मोठें आहे तरी माझ्या प्रज्ञेनें आणि बाहुबळानें मी तुम्हाला यांतून पार पाडीन."

असें म्हणून त्यानें गंगेच्या परतीरीं असलेल्या वेताच्या बेटावर उडी टांकिली, व आपल्या सुदृढ दातांनी त्यांतील अत्यंत उंच वेत्रलता तोडून तिचें एक टोंक त्या बाजूला असलेल्या एका झाडाच्या फांदीला घट्ट बांधून टांकिलें, व दुसरें एक टोंक आपल्या कमरेला बांधून पुनः आम्रवृक्षावर उडी टांकिली. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ती वेताची काठी आम्रवृक्षाच्या फांदीपर्यंत पुरण्याजोगी नव्हती. पुढल्या दोन पायांनीं आंब्याची फांदी धरून व मागल्या दोन पायांत वेताची काठी धरून बोधिसत्त्व अंतराळीं लोंबत राहिला, आणि

अनुक्रमणिका

म्हणाला, “आतां वानरगण हो! हाच तुमच्यासाठीं मी सेतु तयार केला आहे. त्वरा करा! आणि एका मागून एक सर्वजण या सेतूवरून निघून जा.”

पण त्यांतील कांहीं सत्त्वशील वानर म्हणाले, “महाराज, आपण आमचे राजे अहां, आणि आपली पाठ तुडवीत आम्ही कसें जावें?”

बोधिसत्त्व म्हणाला, “आपल्या प्रजेचें रक्षण करणें हें राजाचें कर्तव्य आहे, आणि अशा समयीं तुम्ही विवंचनेंत पडलां तर तुमचा आणि माझा येथेंच नाश होणार आहे.”

तेव्हां बोधिसत्त्वाच्या आज्ञेप्रमाणें सर्व वानरगण त्याच्या पाठीवरून गंगापार गेले. आणि त्यायोगें बोधिसत्त्वाची छाती फुटून गेली. तो बेशुद्ध होऊन तेथेंच लोमकळत राहिला. सकाळीं राजाला सगळे वानर तेथून पळून गेल्याचें दिसून आलें व हें झालें कसें याचा विचार चालला असतां बोधिसत्त्व वेताच्या आणि आंब्याच्या फांदीच्या दरम्यान लोमकळत असलेला दिसला. हें अद्वितीय आश्चर्य पाहून राजा अत्यंत चकित झाला! आणि धनुर्ग्राहकांला म्हणाला, “या वानराच्या खालीं एक जाळें धरावयास सांगा, व याला कांहींएक इजा होऊं न देतां बाणांनीं वेताची काठी आणि झाडाची फांदी तोडून खालीं पाडा.”

राजाच्या आज्ञेप्रमाणें चार होडींच्या डोलकाठ्यांला एक मोठें जाळें बांधून कुशल धनुर्ग्राहकांनीं बोधिसत्त्वाच्या हातांतील फांदी आणि पायांतील वेताची काठी एकदम तोडून त्याला अचुक त्या जाळ्यांत पाडलें, व उचलून राजाजवळ नेलें. त्याला आपल्यासमोर बसवून राजा म्हणाला, “तुझें साहस पाहून मला फार आश्चर्य वाटतें. वानरगणाला तारण्यासाठीं तूं आपल्या शरीराचा सेतु केलास, आणि भयंकर कष्ट सहन केलेस, याचें कारण काय बरें? हे वानर तुझे कोण आहेत? आणि तूं त्यांचा कोण?”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज! मी त्यांचा राजा आहें, आणि ते माझे अनुयायी होत. मनुष्यलोकीं राजाचे अधिकार निराळे समजले जातात. लोकांकडून करभार वसूल करून राजानें आपली यथेच्छ चैन करावी. सैन्याच्या जोरावर परराज्यांवर हल्ले करावे आणि आपली राज्यतृष्णा भागवावी इत्यादिक कामांमध्यें तुम्ही राजेलोक दक्ष असतां. पण आम्ही राजाचें कर्तव्य निराळें समजतों. आपले प्राण देखील खर्ची घालून अनुयायांना सुखी करावें, हाच आमचा धर्म होय, आणि म्हणूनच मी वेत आणि फांदी यांच्या दरम्यान भयंकर वेदना सहन करून लोंबत राहिलों. माझे अनुयायी सुखानें परतीरीं जात असलेले पाहून माझ्या वेदनांनीं मला दुःख न होतां सुख झालें; माझ्या बंधनानें मला त्रास न होतां आनंद झाला. कांकीं, ज्यां च्या सुखासाठीं मी त्यांचा नेता झालों तें माझें कर्तव्य बजावण्याला मला उत्तम संधी सांपडली. आतां आम्हां जनावरांपासून तुम्हांला कांहीं शिकावयाचें असेल तर तें हेंच आहे कीं, आपल्या प्रजेच्या सुखासाठीं राजानें आपले प्राणदेखील बळी देण्यास तत्पर असलें पाहिजे. ही एकच गोष्ट तुम्ही मजपासून शिका. त्यांत तुमचें आणि तुमच्या प्रजेचें खरें कल्याण आहे.”

असे उद्गार तोंडावाटें निघाले नाहींत तोंच बोधिसत्त्वाच्या शरीरांत प्राणांतिक वेदना सुरू झाल्या. तथापि त्या शांतपणें सहन करून बोधिसत्त्वानें समाधानानें प्राण सोडले. राजानें त्या कपिराजाची उत्तरक्रिया सार्वभौम राजाला साजेल अशी केली, व त्याच्या अस्थी घेऊन तो वाराणसीला आला. तेथें त्या अस्थींवर मोठा स्तूप बांधून राजानें त्याच्या पूजेसाठीं योग्य नेमणूक करून दिली; व या प्रमाणें बोधिसत्त्वाच्या शरीरावशेषांचा मोठा गौरव केला.

अनुक्रमणिका

१२७. बलिष्ठाचा न्याय. (४२६)

(दीपिजातक नं. ४२६)

एका अरण्यांत एक वाघ रहात असे. एके दिवशीं शिकारीस निघाला असतां वाटेंत त्याला एक बकरी आढळली. तिला पाहून ही चांगली शिकार आहे असें वाटून तो तेथेंच दबून बसला. वाघावर नजर पडल्याबरोबर बकरीची पांचावर धारण बसली. पण लाडिगोडीनें कसें तरी याच्या हातून निसटून जावें असा विचार करून दुरूनच ती त्याला म्हणाली, “वाघमामा, आपली तब्येंत कशी काय आहे? माझ्या आईनेंहि आपला समाचार विचारला आहे.”

ही लबाड बकरी मामा मामा म्हणून मला ठकवावयास पहात आहे असें जाणून वाघ तिला म्हणाला, “हा दुष्ट बकरे! माझ्या शेपटीवर पाय देऊन मामा मामा म्हणून मला ठकवूं पहात आहेस काय? माझ्या शेपटीवर पाय दिलेल्या प्राण्याला मी जिवंत सोडीन असें तुला कसें वाटलें?”

बकरी म्हणाली, “तूं माझ्यासमोर बसला असून मी थेट तुझ्या समोरून आलें, असें असतां तुझ्या शेपटीवर पाय दिला, हें कसें संभवेल?”

त्यावर वाघ मोठ्या डौलानें म्हणाला, “हें तुला काय ठाऊक आहे? माझें शेपूट सर्व पृथ्वीवर पसरलें आहे, आणि तें तुडविल्यावांचून एक पाऊल देखील टाकणें तुला कसें शक्य होईल?”

या दुष्टाला गोड बोलून वळविण्यांत अर्थ नाहीं असें जाणून बकरी म्हणाली, “ही गोष्ट खरी आहे. मी माझ्या आईबापांकडून असें ऐकत होतें कीं, खलाचें शेपूट फार लांब असतें आणि म्हणूनच तें न दुखवण्यासाठीं आकाशमार्गानें येथें आलें.”

त्यावर वाघ गुरगुरून म्हणाला, “तूं जेव्हां आकाशांतून उडत चाललीस तेव्हां तुला पाहून सगळे मृग इतस्ततः पळून गेले, आणि त्यामुळें मला आज उपाशी रहाण्याची पाळी आली आहे!”आतां तुला मारून खाल्ल्यांवाचून मला दुसरा मार्गच राहिला नाहीं!

हे शब्द ऐकून बिचाऱ्या बकरीची बोबडीच वळली! वाघानें तिला तात्काळ मारून खाल्लें. मृदु वचनानें दुष्टाला वळवूं पहाणें ही मोठी चूक होय. कांकीं, त्याचा न्याय कांहीं निराळाच असतो.

——***——

अनुक्रमणिका

१२८. धूर्त कोल्हा आणि शहाणी बकरी. (४३७)

(पूतिमंसजातक नं. ४३७)

हिमालयाच्या पायथ्याशीं पूतिमांस नांवाचा कोल्हा वेणी नावाच्या आपल्या बायकोसह एकां गुहेंत रहात असे. जवळच्या खेडेगांवीं एका धनगरापाशीं पुष्कळ मेंढ्या होत्या. त्या चरावयास पूतिमांस रहात होता तेथें येत असत. परंतु त्यांबरोबर धनगर आणि त्याचे कुतरे असल्यामुळें एखाद्या कोंकराला पळविण्याची त्याची छाती होत नसे. तथापि मेंढराला पाहून त्याच्या तोंडाला वारंवार पाणी सुटत असे. एके दिवशीं तो आपल्या बायकोला म्हणाला, “वेणी, आमच्या आसपास हीं मेंढरें खुशाल चरत असून त्यांतील एकदेखील आम्हांला मारून खातां येऊं नये ही मोठ्या शरमेची गोष्ट होय!”

वेणी म्हणाली, “युक्तिप्रयुक्तीनें यांतील एखांद्या मेंढीला येथें आणतां येण्यासारखें आहे. परंतु ती जवळ आली तर तुम्ही तिला पकडूं शकाल काय?’

कोल्हा म्हणाला, “धनगराचे कुतरे नसते तर मी या मेंढरांना एकामागून एक कधींच मारून खाल्लें असतें. पण या कुतऱ्यांना पाहिल्याबराबर माझी गाळणच उडून जाते.”

वेणी म्हणाली, “याला आपण अशी एक युक्ती करूं कीं, एका मेंढीची दोस्ती करून तुम्ही मेला असें सांगून तिला या गुहेंत घेऊन येतें. पण ती जवळ आली म्हणजे तिच्यावर झडप घालून तुम्ही तिला धरा म्हणजे झालें.”

कोल्ह्याला ही आपल्या बायकोची युक्ति फारच पसंत पडली. वेणीनें कुत्र्यांची दृष्टी चुकवून झाडाच्या आड चरणाऱ्या एका मेंढीची बरीच मैत्री संपादन केली. त्या डोंगरावर चरावयास गेल्यावर मेंढी देखील एकटीच जाऊन कोल्हीला तेथें भेटत असे. एके दिवशीं कोल्ही त्या ठिकाणीं रडत रडत येऊन बकरीला म्हणाली, “आज माझा पति एकाएकीं मरण पावला! त्यामुळें मला अत्यंत दुःख होत आहे. माझ्यानें त्या गुहेकडे पहावतहि नाहीं. तूं येऊन जर थोडावेळ मला धीर देशील तर मी कसेंबसें त्याच्या प्रेताचें उत्तरकार्य करीन.”

मेंढीला कोल्हीचे शब्द खरे वाटले, व ती तिजबरोबर गुहेकडे गेली. परंतु मेंढी फार सावध असल्यामुळें ती कोल्हीच्या मागोमाग जाऊं लागली. कोल्ही तिला पुढें जाण्याचा आग्रह करी. पण आपणास वाट ठाऊक नाहीं असें म्हणून ती मागेंच राहिली. गुहेच्या कांहीं अंतरावर यांची चाहूल ऐकिल्याबरोबर मेल्याचें सोंग घेऊन पडलेला कोल्हा मेंढी आली किंवा आपली बायको एकटीच आली, हें जाणण्यासाठीं वर डोकें काढून हळूच पाहूं लागला. त्यानें वर डोकें उचलेलें पाहून मेंढीने मागल्या पायींच पळ काढला. इतक्यांत कोल्ही त्याच्या जवळ येऊन ठेपली. तो फार संतापून म्हणाला, “वेणी! तूं कितीतरी वेडी आहेस? मेंढीची गोष्ट सांगून मला येथें मृताचें सोंग घेऊन निजावयास सांगितलेंस आणि आतां पहातों तर तूं एकटीस परत आलीस!”

अनुक्रमणिका

वेणी म्हणाली, "मला वाटतें की तुम्हीच मोठे वेडे आहांत! मेल्याचें सोंग घेऊन निजले असतां तुम्ही भलत्याच वेळीं डोकें वर कां काढलें? भलत्याच वेळीं जो उठतो त्याच्या हातची शिकार जाते हें तुम्हास माहीत नाहीं काय?"

कोल्हा जरा ओशाळला, आणि म्हणाला, "हातची शिकार गेली खरी! पण आतां दुसरी कांहीं युक्ति योजून मेंढीला येथें आणतां येईल काय?"

कोल्ही म्हणाली, "पुनः एकवार तिला येथें आणतां येईल असें मला वाटतें. पण त्याप्रसंगीं तरी सावध राहून तुम्ही आपलें कार्य साधलें पाहिजे."

असें म्हणून ती धांवत धांवत मेंढीजवळ गेली आणि म्हणाली, "सखे तुझ्या येण्यामुळें माझ्यावर अत्यंत उपकार झाले आहेत. तुझी दृष्टी आमच्या गुहेवर पडते न पडते तोंच माझ्या स्वामीच्या शरीरांत चैतन्य आलें. तेव्हां तुझा पायगुण फारच उत्तम आहे असें मी समजतें; तर पुनः एकवार येऊन जर तूं आपल्या पायाची धूळ आमच्या घरीं झाडशील तर माझ्यावर अनंत उपकार होतील. माझा पति साफ बरा होऊन आम्ही सुखानें नांदूं."

मेंढीनें या खेपेला तिचें कारस्थान ओळखलें आणि ती म्हणाली, "कोल्हीणबाई, आतां आपल्या घरीं यावयाचें म्हणजे मला एकटीला जाणें योग्य नाहीं. माझ्या परिवारासह मी पाहिजे तर तुझ्या बरोबर येत्यें."

कोल्ही म्हणाली, "पण बाई, असा तुझा परिवार तरी कोणता?"

मेंढी म्हणाली, "मालिय, चतुराक्ष, पिंगिय आणि जंबुक हे माझ्या धन्याचे चार बलाढ्य कुतरे आहेत. त्यांना बरोबर घेऊन मी तुझ्या घरीं येतें. एका निमित्ताने त्यांनाहि तुझी सुंदर गुहा पहावयास सांपडेल."

हे बकरीचे शब्द कानीं पडतांच कोल्ही गांगरून गेली, आणि म्हणाली, "बाई, तुला मी त्रास देऊं इच्छित नाहीं. केवळ तुझा आशीर्वाद असला म्हणजे पुरे झाले. एवढ्यानें माझा स्वामी बरा होईल, अशी आशा आहे. मात्र कुत्र्यांना आमची गुहा दाखवूं न देण्याची मेहेरबानगी कर म्हणजे झालें."

असें बोलून ती दुष्ट कोल्ही आपल्या नवऱ्याकडे धांवत गेली आणि म्हणाली, "तुम्हाला काय सांगावें. वांवास चुकलेला गांवास चुकतो म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्या मेंढीला येथें आल्याबरोबर पकडलें असतें, तर आमच्या मागची संकटपरंपरा टळून पोटभर खावयास मिळालें असतें. पण आतां ती म्हणते कीं, तिच्या धन्याच्या कुत्र्यांला घेऊन ही गुहा पहावयास येईन. आम्ही ताबडतोब येथून पळालों तरच आमची धडगत दिसते!"

कुतरे येतात असें ऐकल्याबरोबर पूतिमांसानें वेणीला घेऊन पलायन केलें आणि पुनः त्या स्थळाकडे ढुंकून देखील पाहिलें नाहीं.

भाग दुसरा समाप्त

——***——

अनुक्रमणिका

जातककथासंग्रह

भाग तिसरा

अनुक्रमणिका

१२९. निस्पृहाचा वर. (४४०)

(कण्हजातक नं. ४४०)

बोधिसत्त्व एका जन्मीं ब्राह्मणकुलांत जन्मला होता. जात्या तो जरा शामवर्ण असल्यामुळें त्याला कृष्ण हें नांव ठेवण्यांत आलें. कृष्ण लहानपणापासून अतिशय चलाख होता. ब्राह्मणानें त्याला तक्षशिलेला पाठवून सर्व विद्यांत पारंगत केलें. व तो पुनः घरीं आल्यावर त्याचा विवाह केला. परंतु बोधिसत्त्वाचें चित्त संसारांत रमलें नाहीं. आईबाप निवर्तल्यावर सर्व संपत्ती याचकांस वाटून देऊन तपस्विवेषानें तो हिमालयपर्वतावर जाऊन राहिला.

अरण्यवासांत काळ घालवित असतां तो आंबट आणि खारट पदार्थ खाण्याकरितां देखील गावांत येत नसे. माध्यान्हसमयीं जीं कांहीं फळेंमुळें मिळत असत त्यावर निर्वाह करून तो संतोषानें रहात असे. त्याच्या तपाच्या तेजानें इंद्राचें काश्मिरी पाषाणांचें सिंहासन तप्त झालें. आपणाला या स्थानापासून कोण भ्रष्ट करूं पहात आहे या विवंचनेनें इंद्रानें जगाचें सूक्ष्म निरीक्षण केलें. तेव्हां बोधिसत्त्वाच्या तपश्चर्येचा हा प्रभाव आहे असें त्यास दिसून आले. तो तात्काल देवलोकीं अंतर्धान पावला आणि बोधिसत्त्वासमोर येऊन उभा राहिला व म्हणाला, “हा असा कृष्णवर्ण तापसी कोण बरें? याचा वर्णच काळा आहे असें नाहीं तर याचें भोजन देखील कृष्णच आहे आणि याचे निवासस्थान देखील कृष्णच दिसतें. सर्वतोपरी याचें आचरण मला आवडत नाहीं.”

हा इंद्र आहे हें बोधिसत्त्वानें तेव्हांच जाणलें आणि त्याच्या त्या उपरोधिक भाषणाला हें उत्तर दिलें. “हे इंद्रा, केवळ त्वचेच्या काळसरपणानें मनुष्य काळा होत नसतो. कां कीं, अंतःकरणाच्या शुद्धतेनें ब्राह्मण होत असतो. ज्या मनुष्याचीं कर्मे पापकारक असतात आणि त्यामुळें ज्याचें चित्त काळें झालेलें असतें तोच मनुष्य काळा होय.”

इंद्राला बोधिसत्त्वाच्या भाषणानें फार संतोष झाला आणि तो म्हणाला, “भो ब्राह्मणा, तुझ्या सुभाषितानें मी प्रसन्न झालों आहे. आणि तूं जो वर मागशील तो देण्यास मी तयार आहे.”

बोधिसत्त्व म्हणाला, “हे देवराज, जर मला वर देण्याची तुमची इच्छा असेल तर क्रोध, द्वेष, लोभ आणि स्नेह या चार विकारांपासून मी सर्वथैव अलिप्त राहीन हाच मला वर द्या.”

देवता प्रसन्न झाली असतां भक्तलोक संपत्ती, अधिकार, पांडित्य इत्यादिक वर मागत असतात. परंतु हा निस्पृह तपस्वी दुसराच कांहीं वर मागत आहे हें पाहून चकित होऊन इंद्र म्हणाला, “क्रोध, द्वेष, लोभ आणि स्नेह मनुष्यस्वभावाशीं संबद्ध झालेले आहेत. यांत कोणाला कांहीं विपरीत आहे असें वाटत नाहीं. मग तुला या मनोवृत्तींमध्यें कोणते दोष आढळले बरें?”

बोधिसत्त्व म्हणाला, “क्रोध उत्पन्न होतांना अग्निकणाप्रमाणें लहान असतो खरा, परंतु तो अवकाश सांपडला म्हणजे सारखा वाढत जातो आणि ज्याच्या आश्रयानें वाढतो त्यालाच खाऊन टाकतो. म्हणून अशा क्रोधापासून मुक्त रहाण्याची माझी इच्छा आहे. द्वेष हा क्रोधाचा भाऊ आहे. ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादि सर्व जातींमध्यें या द्वेषाचीं बीजें आपोआप रुजतात आणि त्या द्वेषापासून क्रोध उत्पन्न होऊन माणसाची

अनुक्रमणिका

भयंकर हानि होत असते. राष्ट्रा-राष्ट्रांतील विवाद, भावां-भावांतील तंटे, मायलेकांचें वितुष्ट किंवा पितापुत्रांची भांडणें हीं सर्व द्वेषमूलकच नव्हेत काय? हा द्वेषवैरी माझ्या शरीरांतून निघून गेला तर मी खरा सुखी असें मी समजेन. लोभ हें सर्व पापांचें मूळ आहे. लोभामुळें मनुष्य चोरी करण्यास प्रवृत्त होतो. लुटालुट, दुसऱ्याच्या राष्ट्रावर नाहक हल्ले, व्यापारांत फसवणूक इत्यादि सर्व अनर्थपरंपरा या लोभाच्यामुळें उद्भवते. म्हणून हा भयंकर रोग माझ्या अंतःकरणांतून नष्ट व्हावा ही माझी प्रार्थना आहे. स्नेह क्रोधलोभां इतका भयंकर नाही. तथापि, तो मनुष्यजातीचा शत्रूच म्हटला पाहिजे. आपला आप्त कुकर्मी असला तर स्नेहामुळें त्याचे अवगुण झांकण्याचा आपण प्रयत्न करतों त्याची तरफदारी करून इतरांशीं भांडण्यास आपण प्रवृत्त होतों. एवढेंच नव्हे तर केवळ अशा स्नेहापायीं कर्तव्याकर्तव्यांचा आम्हासं विचार रहात नाहीं. म्हणून व्यक्तिविषयक स्नेह माझ्या मनांतून नष्ट करावा अशी मी आपणास विनंति करितों."

इंद्र बोधिसत्त्वाच्या या विवेचनानें अधिकच संतुष्ट झाला आणि म्हणाला, "तुझ्या या सुभाषितावर प्रसन्न होऊन आणखीहि एक वर मी तुला देतों."

बोधिसत्त्व म्हणाला, "जर आपली दुसरा वर देण्याची इच्छा असेल तर तो असा द्या कीं, या अरण्यांत निरोगी होऊन मी सुखानें रहावें. माझ्या तपश्चर्येंत विघ्नें येऊं नयेत."

इंद्र हाहि वर देऊन म्हणाला, "तूं निस्पृहांला साजेल असेच वर मागितलेस याबद्दल मी तुला तिसराहि वर देऊं इच्छितों."

बोधिसत्त्व म्हणाला, "असें असेल तर मला असा वर द्या कीं, माझ्यापासून कोणत्याहि प्राण्याच्या शरीराला किंवा मनाला कशाहि प्रकारें इजा होऊं नये."

इंद्रानें हाहि वर देऊन बोधिसत्त्वाची फार स्तुति केली आणि आपण किती जरी वर दिले तरी निस्पृह लोक धनादिकाची याचना करणार नाहींत असें जाणून आणखी वर देण्याच्या भरीस न पडतां तो तेथेंच अंतर्धान पावला.

——***——

अनुक्रमणिका

१३०. लोकापवादाचें भय. (४४४)

(कण्हदीपायनजातक नं. ४४४)

मांडव्य आणि कृष्णद्वैपायन हे दोघे ऋषी फलमूलांवर निर्वाह करून रहात असत. कांहीं कालानें खारट आणि आंबट पदार्थांचें सेवन करण्यासाठीं ते कौशांबीला आले. तेथें द्वैपायनाचा मांडव्य नांवाचा एक गृहस्थ लहानपणचा मित्र होता. त्यानें या दोघांलाहि एक पर्णशाला बांधून देऊन त्यांचा चांगला आदर-सत्कार ठेविला. बराच काळ या दोघां ऋषींनी कौशांबींत घालविला आणि आपल्या मित्राचा निरोप घेऊन यात्रेसाठीं तेथून प्रयाण केलें. फिरत फिरत ते दोघे वाराणसीला आले. तेथेंहि लोकांनीं त्यांचा योग्य गौरव केला व गांवाबाहेर त्यांस एक पर्णकुटी बांधवून दिली. कांहीं दिवस तेथें राहून कृष्णाद्वैपायन परत कौशांबीला गेला. पण मांडव्य ऋषि तेथेंच राहिला.

एके दिवशीं वाराणसींतील एका घरीं चोरी झाली. चोर गटाराच्या वाटेनें पळून गेले. लोक त्यांचा पाठलाग करीत मांडव्याच्या कुटीजवळ आले. सर्व सामान घेऊन पळून जाणें शक्य नसल्यामुळें चोरांनीं तें मांडव्य ऋषीच्या कुटींत टाकून देऊन पळ काढिला. लोकांनीं कुटीला वेढा दिला व सर्व सामान जप्त केलें. हा तपस्वी दिवसा तपश्चर्या करून रात्री चोरी करतो अशी सर्वांची समजूत होऊन त्यांनीं त्याला पकडून राजाकडे नेले. राजा आपला अंतःपुरांत दंग झाला असल्यामुळें त्याला सर्व खटल्याची सुनावणी करून घेण्यास सवड नव्हती. त्यानें एकदम हुकूम दिला कीं, या तपस्व्याला निंबाच्या सुळावर चढवावें. राजपुरुषांनीं निंबाचा सूळ आणला. तो ऋषीला लागूं पडेना. दुसरे लोखंडाचे वगैरे पुष्कळ सूळ लावून पाहिले. पण त्यांनींहि त्याला कांहीं इजा होईना. तेव्हां पुढें काय करावें अशा विवंचनेंत ते पडले.

मांडव्य ऋषीला पूर्वजन्माचें स्मरण करण्यांचे सामर्थ्य होतें. कोणत्या पापानें हा आळ आपणावर आला आणि सुळावर जाण्याची पाळी आली हें तो अंतर्ज्ञानानें पाहूं लागला. तेव्हां आपण कांचनवृक्षाच्या काठीचा बारीक सूळ करून एका माशीला टोंचला होता. ही गोष्ट त्याच्या स्मरणांत आली. आणि त्या पापापासून आपण मुक्त होणार नाहीं असें जाणून तो म्हणाला, “हे राजपुरुषहो, तुम्हाला जर मला सुळावर द्यावयाचेंच असेल तर कांचनवृक्षाचा सूळ तयार करून आणा. मग तुमचा कार्यभाग सिद्धीस जाईल. त्याच्या सांगण्याप्रमाणें राजपुरुषांनी त्याला कांचनवृक्षाच्या सुळावर चढविलें. कृष्णद्वैपायन मित्राचा समाचार पुष्कळ दिवस कळला नाही म्हणून कौशांबीहून वाराणसीला आला. तेथें मांडव्याला सुळावर दिल्याची बातमी लागल्यामुळें तो त्या ठिकाणीं आला. मांडव्यऋषीला सुळापासून म्हणण्यासारखी मुळींच इजा झाली नव्हती. त्याला पाहून द्वैपायन म्हणाला, “बा मित्रा, तुला प्राणांतिक वेदना होत नाहींत ना?”

मांडव्य म्हणाला, “मी जसें एखाद्या वृक्षाच्या फांदीवर बसावें तसा या सुळावर बसून राहिलों आहे.”

द्वैपायन म्हणाला, “पण ज्या राजानें तुला फाशी देवविलें, व ज्या माणसांनी तुला फाशी दिलें, आणि जे येथें बसून तुझ्यावर पहारा करीत आहेत त्या सर्वांला शाप देण्याची बुद्धि तुला झाली नाहीं ना?”

मांडव्य म्हणाला, “मित्रा द्वैपायना, माझ्या हृदयांत क्रोध-सर्पाचा अंगुष्ठमात्र प्रवेश झाला नाहीं. कां कीं, मला सुळावर चढविण्याचा हुकूम देणाऱ्या राजावर, सुळावर चढविणाऱ्या माणसांवर आणि पहारा करणाऱ्या पहारेकऱ्यांवर माझ्या अंतःकरणांत मैत्री जागृत राहिली आहे.

अनुक्रमणिका

द्वैपायनाचा आणि मांडव्याचा संवाद ऐकून पहारेकऱ्यांना एक प्रकारची भीति आणि आदरबुद्धि वाटली. आमच्या राजानें गैरसमजुतीनें भलत्याच माणसाला दंड केला अशी त्यांची खात्री झाली आणि राजाला त्यांनीं हें सर्व वृत्त निवेदिलें. राजा स्वतः त्या ठिकाणीं आला व मांडव्याला साष्टांग दंडवत घालून त्याची त्यानें क्षमा मागितली व सूळ बाहेर काढण्यास एकदम आज्ञा केली. पण कांहीं केल्या सूळ बाहेर निघेना. मांडव्य म्हणाला, "महाराज, सूळ बाहेर काढण्याच्या खटपटीनें मला फार त्रास होतो. तेव्हां बाहेरचा भाग तेवढा कापून टाका म्हणजे झालें."सुळाचा बाहेरचा भाग कापून टाकण्यात आला. मांडव्याच्या उदरांत कांहीं भाग राहिला खरा, पण त्यापासून त्याला कांहीं इजा झाली नाहीं. तेव्हांपासून त्याला लोक अणिमांडव्य म्हणूं लागले.

राजानें आपल्याच उद्यानांत उत्तम पर्णकुटिका बांधून मांडव्याला आणि द्वैपायनाला तेथें ठेऊन घेतलें. परंतु द्वैपायनला कौशांबीच्या जवळपास रहाणें फार आवडत असे. म्हणून तो काशीराजाचा आणि मांडव्याचा निरोप घेऊन कौशांबीला गेला. त्याला पाहिल्याबरोबर मांडव्यगृहस्थानें त्याची योग्य पूजा करून पर्णकुटी झाडून साफसूफ केली आणि आपल्या पत्नीच्या मदतीनें तेथें पाण्याची वगैरे व्यवस्था चालविली. द्वैपायनऋषी पर्णकुटिकेंत जाऊन बसल्यावर मांडव्यहि त्याला नमस्कार करून एका बाजूला बसला व द्वैपायनानें वाराणसीला घडलेली सर्व गोष्ट इत्थंभूत सांगण्यास सुरुवात केली.

बाहेरच्या बाजूला यज्ञदत्त नांवाचा मांडव्याचा मुलगा चेंडू घेऊन खेळत होता. त्याचा तो चेंडू उडून एका तृणाच्छादित बिळांत पडला. तो काढण्यासाठीं हात घातला असतां तेथें रहाणाऱ्या भयंकर कृष्णसर्पानें यज्ञदत्ताच्या हाताला जोरानें दंश केला. कांहीं पळांत यज्ञदत्ताच्या अंगांत विष चढून तो गतप्राण होऊन पडला. त्याची ओरडाओरड ऐकून मांडव्य त्याची बायको आणि द्वैपायनऋषी तेथें आले. पण यज्ञदत्ताला जिवंत करण्याला सत्यक्रियेवांचून दुसरा इलाज नाहीं असें मांडव्यास दिसून आलें आणि तो म्हणाला, "भो ऋषिसत्तम, या मुलाला उठविण्यास आतां औषधोपाय चालण्यासारखा नाहीं. तेव्हां आपण सत्यक्रिया करा आणि याला जीवदान द्या."

द्वैपायन यज्ञदत्ताच्या मस्तकावर हात ठेऊन म्हणाला, "आज पन्नास वर्षें मी ब्रह्मचर्य पाळीत आहे, परंतु त्यांपैकीं पहिला आठवडाभरच मी तें आनंदानें पाळलें. त्यानंतरचें ब्रह्मचर्य केवळ जबरदस्तीचें होय. या माझ्या सत्यवचनानें यज्ञदत्ताचें विष उतरून तो जिवंत होवो."द्वैपायनाच्या सत्यक्रियेनें यज्ञदत्ताचा श्वासोच्छ्वास सुरू झाला व तो हालचाल करूं लागला. तेव्हां द्वैपायन मांडव्याला म्हणाला, "मित्रा, तूंहि पण आतां सत्यक्रिया कर म्हणजे हा चांगला बरा होईल."तेव्हां मांडव्य आपल्या मुलाच्या मस्तकावर हात ठेऊन म्हणाला, "मी मोठा दाता आहे अशी सर्वत्र प्रसिद्धी आहे. परंतु संतोषानें मी कधींहि एक पैदेखिल कोणाला दान केलेली नाहीं आणि संतोषानें मी देत नाहीं हेंहिपण कोणाला समजून आलें नाहीं. या माझ्या सत्यवचनानें यज्ञदत्ताचें विष उतरून तो जिवंत होवो."बापाच्या सत्यक्रियेच्या बळानें यज्ञदत्त उठून बसला. परंतु त्याला उभें राहतां येईना. हें पाहून मांडव्य आपल्या भार्येस म्हणाला, "भद्रे, तूं देखील आतां सत्यक्रिया कर, म्हणजे आमचा आवडता यज्ञदत्त साफ बरा होईल."ती यज्ञदत्ताच्या डोक्यावर हात ठेवून म्हणाली, "बाळा, तुला चावणारा कृष्णसर्प आणि तुझा पिता या दोघांमध्यें मला माझ्या आयुष्यांत कधींहि फरक वाटला नाहीं. आणि या माझ्या सत्यवचनानें तुझें विष उतरून तूं साफ बरा हो."

यज्ञदत्त उठून उभा राहिला. आंगांतलें सर्व विष उतरून जमिनींत शिरलें. तिघांनाहि फार आनंद झाला. पण मांडव्य द्वैपायनाला म्हणाला, "प्रपंचाला कंटाळून ऋषिलोक संसार सोडून जातात असें आम्ही

अनुक्रमणिका

ऐकतों. आणि यदाकदाचित् त्यांचें चित्त अरण्यांत रमलें नाहीं तर ते पुनः गृहस्थाश्रम स्वीकारून रहातात. परंतु आज पन्नास वर्षें तुम्ही ब्रह्मचर्य आचरण करित आहांत तें कां?"

द्वैपायन म्हणाला, "श्रद्धापूर्वक घरांतून निघून ऋषिवेष स्विकारिला आणि तो सोडून देऊन पुनः गृहस्थाश्रम केला असें म्हणून लोक माझी निंदा करतील, याचें चित्त चंचल आहे असें ते म्हणतील. या लोकापवादाच्या भयानें आज पन्नास वर्षें इच्छा नसतांना देखिल मी ब्रह्मचर्याचे पालन करीत आहें. पण मला हें सांग कीं, तुला आम्ही सर्वजन मोठा दाता असें समजतों. तूं इच्छा नसतांना दान देत आहेस ही गोष्ट मला केवळ तुझ्या या सत्यक्रियेवरून कळून आली. आतां तुला मी असें विचारतों कीं, मनांत नसून दान देण्यापासून तुला काय फायदा आहे?"

मांडव्य म्हणाला, "भो ऋषि, माझ्या पूर्वजांनी याचकाचा मनोभंग कधींहि केला नाहीं. आमचें घर म्हटलें म्हणजे दिनानाथांची पाणपोईच आहे असें गणलें जात असे. आणि हें कुलव्रत जर मी सोडून दिलें असतें तर लोकांनीं मला कुलांगार असें म्हटलें असतें. या लोकापवादाच्या भयानें मनांत नसतांना देखिल मी आजपर्यंत वरपांगीं मोठ्या खुषीनें दान देत आलों."

तो आपल्या पत्नीकडे वळून म्हणाला, "पण भद्रे, तुझें माझ्यावर अत्यंत प्रेम आहे असें मी समजत होतों. तुझ्या अप्रीतीबद्दल मला कधींहि शंका आली नाहीं. इतकीं वर्षें तूं मनांतून माझा द्वेष करीत असतां वरपांगीं माझ्यावर निस्सीम प्रेम कां दाखविलेंस?"ती म्हणाली, "मी जर पत्निधर्मानें वागलें नसतें तर उभयकुळाला बट्टा लागला असता. आणि तेणेंकरून लोकांनीं मला नावें ठेविलीं असतीं. या लोकापवादाच्या भयानें तुमच्यावर प्रेम नसतांहि मी तुमच्या सेवेंत अंतर पडूं दिलें नाहीं."

एवढा संवाद झाल्यावर मांडव्य द्वैपायनाला म्हणाला, "आपण नाखुषीनें ब्रह्मचर्य आचरण करितां हें ठिक नाहीं. आम्ही दाते लोक आपणाला सत्पुरुष समजून दान देत असतों. परंतु आपलें अंतःकरण जर शुद्ध नाहीं तर आमच्या दानापासून आम्हांला काय फलप्राप्ति होणार आहे?"

द्वैपायनानें आपली चूक कबूल केली आणि तो मांडव्याला म्हणाला, "मित्रा, नाखुशीनें दान देण्यांत तुझीहि पण मोठी चूक होत आहे. मनांत नसून जें सत्कर्म आम्हीं करतों त्यापासून व्हावी तशी फलप्राप्ती होत नाहीं. आतां यापुढें तरी मनःपूर्वक दानधर्म करीत जा."त्याजप्रमाणें द्वैपायनानें मांडव्याच्या पत्नीलाहि सदुपदेश केला आणि त्या दिवसापासून तीं सर्वजणें आपापले धर्म मनःपूर्वक पाळूं लागलीं.

——***——

अनुक्रमणिका

१३१. खरें मंगल. (४५३)

(महामंगलजातक नं. ४५३)

एकदां बोधिसत्त्व रक्षित नांवाचा प्रसिद्ध तपस्वी होऊन मोठ्या शिष्यसमुदायासह हिमालयावरील एका आश्रमांत रहात असे. कांहीं काळानें पावसाळा संपल्यानंतर त्याचे शिष्य त्याला म्हणाले, “गुरुजी, पुष्कळ वर्षें आम्ही या अरण्यांत वास करून आहों. आतां आमच्या आरोग्यासाठीं आंबट आणि खारट पदार्थ सेवन करण्यास्तव आम्ही मध्यदेशांत जाऊं.”

रक्षित म्हणाला, “माझी येथून जाण्याची इच्छा नाही. डोंगराचे कडे चढण्याची आणि दूरचा रस्ता आक्रमून जाण्याची मला ताकद राहिली नाहीं. तेव्हां तुम्हीच मध्यदेशांत जाऊन प्रवास करून या.”ते गुरूची आज्ञा घेऊन फिरत फिरत वाराणसीला आले. तेथें राजानें त्याचा चांगला आदर-सत्कार करून त्यांना आपल्या उद्यानांत ठेऊन घेतलें.

एके दिवशीं वाराणसींतील संथागारांत मंगलासंबंधानें प्रश्न निघाला. कोणीं लग्नकार्याच्या आरंभी वाद्य वाजविणें मंगलकारक आहे असें म्हणाले. कोणाचें मत असें पडलें कीं, अमुक अमुक मंत्र म्हणणें हें त्या त्या प्रसंगीं मंगलकारक होय. दुसरे कोणी आप्त मित्र इत्यादिकांपासून आपणाला सुख व्हावयाचें असलें तर अमुक अमुक मंत्राचा अशा अशा प्रकारें जप करावा म्हणजे कार्यसिद्धि होते असें म्हणाले. पण त्यांपैकीं कोणाचेंहि मत सर्वसंमत झालें नाही. शेवटी आपण सर्वजन राजाला विचारूं व तो ज्या गोष्टी मंगलकारक आहेत असें सांगेल त्यांचा स्वीकार करूं असा त्या सर्वांनी ठराव केला.

परंतु राजानें त्यांस असें सांगितलें कीं, या गोष्टींत माझी चांगली गति नाहीं. धर्मप्रतिपादन करणें हें ऋषीचें काम होय. तेव्हां तुम्हीं जाऊन माझ्या उद्यानांत रहात असणाऱ्या तपस्व्यांना हा प्रश्न विचारा आणि तें सांगतील त्याप्रमाणें वागा. परंतु ऋषी देखील त्यांची शंका दूर करूं शकले नाहींत. राजाला बोलावून आणून ते म्हणाले, “महाराज, लोकांमध्यें विवाहकार्यादिकाच्या प्रसंगीं मंगलकृत्यें करण्याचा व मंगलस्तोत्रें म्हणण्याचा परिपाठ आहे, परंतु यांपैकीं कोणतीं चांगलीं व कोणतीं वाईट हें आम्ही सांगूं शकत नाहीं. आमचे आचारवर्य हिमालयावर रहात असतात. तेच या प्रश्नाचें उत्तर देऊं शकतील.”

राजा म्हणाला, “भदंत, हिमालय फार दूर पडला आणि तेथें जाण्याचा मार्गहि बिकट. मला येथें अनेक कामें असल्यामुळें तेथें जातां येत नाहीं. तेव्हां मेहेरबानगी करून आपणच जाऊन आचार्याला हा प्रश्न विचारा व तो जीं मंगलें योग्य आहेत असें सांगेल तीं मुखोद्‌गत करून येथें येऊन आम्हांला पढवा.”

तपस्व्यांनीं राजाचें म्हणणें पसंत केलें व प्रवास करीत पुनरपि ते आपल्या आश्रमांत आले. रक्षिताचार्याचें दर्शन घेऊन घडलेलें इत्थंभूत वर्तमान त्यांनीं त्याला निवेदन केलें.

तेव्हां रक्षित तपस्वी म्हणाले, “बाबांनों, मध्यप्रदेशांत लोक जीं मंगलें करीत आहेत तीं खरीं मंगलें नव्हेत. विवाहसमयीं सर्वच लोक स्तोत्रें म्हणतात आणि कर्दळी, पर्णघट इत्यादिकांची स्थापना करून मंगलविधी करतात. परंतु त्यामुळें सर्व विवाहकार्यें सुखप्रद होतात काय? कित्येक विवाहानंतर अल्पावधींतच विधवा होतात. कित्येकांला नवऱ्याकडून आणि सासूसासऱ्यांकडून जाच होतो. तर कित्येक

अनुक्रमणिका

अल्पवयांतच भयंकर रोगानें पछाडिल्या जाऊन मृत्युमुखांत पडतात. अशाच तऱ्हेचीं इतर मंगलेंहि होत. त्यांचें सर्वदैव फळ येतेंच असें नाहीं. मनुष्याच्या कर्माप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतात. म्हणून मनुष्यानें आपलीं कर्में पवित्र ठेवण्यासाठीं सर्वकाळ झटाव. पवित्र आचरणासारखें श्रेष्ठ मंगल नाहीं. तथापि कांहीं ठळक मंगलें मी तुम्हांला सांगतों. तीं शिकून वाराणसीच्या राजाला पढवा –

"देव, पितर, सर्प, चतुष्पाद, द्विपाद वगैरे सर्व प्राण्यांवर जो मैत्रीची भावना करितो तो प्राणिमात्रापासून भय पावत नाहीं. आणि म्हणूनच मैत्रीची भावना हें प्राण्यांपासून सुखप्राप्ति होण्यासाठीं मंगलाचरण होय."

जो सर्वलोकांशीं नम्रपणें वागतो; स्त्री, पुरुष, लहान किंवा मोठा या सर्वांचीं दुर्भाषणें सहन करितो व कधींहि अपशब्द उच्चारीत नाहीं तोच खरा क्षमावान् होय. आणि त्याच्या आचरणाला क्षमामंगल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आपल्या ओळखीच्या गृहस्थांना जो समानभावानें वागवितो; विद्येने, धनानें किंवा जातीनें गर्विष्ठ होऊन त्यांचा अपमान करीत नाही आणि त्यांचें कल्याण करण्यास तत्पर असतो अशा मनुष्याला सहाय्यापासून सुख होतें. आणि अशा वर्तनाला शहाणे लोक सहाय्याविषयीं मंगलाचरण असें म्हणतात.

सत्पुरुषच ज्याचे मित्र असतात; त्यांच्यावर याचा पूर्ण विश्वास असून याजविषयीं त्यांचीहि पूज्यबुद्धि असते; जो मित्राचा द्रोह कधींहि करीत नाहीं आणि आपल्या भाग्याचे त्यांनाहि वाटेकरी करतो तोच मित्रांविषयीं मंगलाचरण करतो असें समजलें पाहिजे.

ज्याची भार्या समानवयस्क असून अत्यंत प्रेम करणारी असते व जिची बुद्धि सर्वदैव धार्मिक असते ती कुलीन घराण्यांतील असून शीलवती व पतिव्रता असते. आणि अशा भार्येच्या अनुरोधानें जो प्रपंच करितो त्यालाच गृहस्थाश्रमापासून सुख होतें. तोच गृहिणीमंगलाचें आचरण करितो असें समजलें पाहिजे.

ज्याचा पराक्रम, सदाचरण, सत्यप्रीति इत्यादी सदगुण राज्यकर्त्याला माहीत असतात व अशा गुणांनी जो राजाचें प्रेम संपादन करितो तो राजापासून सुख होण्यासाठीं मंगलाचरण करितो असें समजलें पाहिजे.

श्रद्धावान् होत्साता तो अन्नपानादिकाचें मोठ्या आनंदानें दान करितो व दुसऱ्यानें दिलेल्या धनाचें अनुमोदन करितो तो परलोकीं सुख मिळविण्यासाठीं मंगलाचरण करितो असें समजलें पाहिजे.

बहुश्रुत, सदाचरणसंपन्न, आर्यधर्मकोविद् अशा ऋषींची जो सेवा करितो व त्यांना प्रसन्न करून घेतो तो ऋषींपासून सुख मिळविण्यासाठीं मंगलाचरण करितो असें समजलें पाहिजे.

शिष्यहो, अशा तऱ्हेच्या मंगलांनीं खरें सुख प्राप्त होतें. सत्पुरुष अशाच मंगलांची तारीफ करितात आणि म्हणूनच शहाण्या माणसानें भलत्या सलत्या मंगलाच्या नादीं न लागतां अशींच मंगलें आचरावीं."

अनुक्रमणिका

रक्षित तापसाच्या शिष्यांनीं हीं मंगलें पाठ करून वाराणसीला येऊन राजाला शिकविलीं. हें ऐकून राजाला फार आनंद झाला व त्यांनें ती आपल्या राष्ट्रांत सर्व लोकांना जाहीर केलीं.

——***——

अनुक्रमणिका

१३२. पुत्रशोकाचें विनोदन करण्याची युक्ति. (४५४)

(घतजातक नं. ४५४)

प्राचीनकाळीं उत्तर देशांत कंसभोगराष्ट्रांत असितांजन राजधानींत मका (?हा) कंस नांवाचा राजा राज्य करीत असे. त्याला कंस आणि उपकंस या नांवाचे दोन पुत्र व देवगर्भा नांवाची एक कन्या होती. ती जन्मली त्या दिवशीं ज्योतिषशास्त्रकोविदांनीं इच्या उदरीं जन्मीं येणारा पुत्र कंसवंशाचा नाश करील असें भविष्य वर्तविलें. परंतु अत्यंत प्रेमामुळें राजानें आपल्या मुलीचा नाश केला नाहीं. पुढें इचे भाऊ वाटेल तें करोत असा विचार करून तो स्वस्थ राहिला.

त्याच्या मरणानंतर कंस राजा झाला व उपकंसाला युवराजपद मिळालें. त्यांनीं असा विचार केला कीं, जर आपल्या बहिणीला मारलें किंवा हाकून दिलें तर आपली लोकांत दुष्कीर्ती होईल. मात्र हिला विवाह केल्यावांचून नजरकैदेंत ठेवावें म्हणजे झालें. त्याप्रमाणें त्यांनीं एकाच खांबावर प्रासाद रचून तिला तेथें ठेविलें. तिच्या सेवेला नंदगोपा नांवाची एक दासी देण्यांत आली व त्या दासीचा नवरा अंधकविष्णु त्या प्रासादावर पहारा करण्यास पहारेकरी नेमिला गेला.

त्या काळीं उत्तरमथुरेंत महासागर नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या मरणानंतर त्याच्या सागर नांवाच्या वडील मुलाला गादी मिळाली व दुसरा मुलगा उपसागर युवराज झाला. परंतु उपसागरानें राजाचा मोठा अपराध केल्यामुळें त्याला राजधानींतून हाकून देण्यांत आलें. त्यानें व उपकंसानें एकाच आचार्यांच्या घरीं अध्ययन केलें होतें. तेव्हां तो आपल्या वडील भावाच्या राज्यांतून निघून असितांजन नगराला आला. उपकंसानें त्याला ताबडतोब ओळखलें व मोठ्या आदरानें आपल्या घरीं ठेवून घेऊन राजाची आणि त्याची भेट करवून दिली. आपल्या भावाच्या भिडेस्तव कंसराजानें उपसागराला मोठी पदवी देऊन त्याचा फार गौरव केला.

कांहीं काळानें राजाच्या दरबारीं जात असतां उपसागराची दृष्टी एकस्तंभप्रासादाच्या खिडकींत उभी असलेल्या कंसाच्या भगिनीकडे गेली. ही कोण व हिला अशा ठिकाणीं कोंडून ठेविण्याचें कारण काय इत्यादि गोष्टींची त्याला फार जिज्ञासा झाली व त्यानें थोडक्याच काळांत त्या सर्व गोष्टींचा खुलासा करून घेतला. नंदगोपेला आणि अंधकविष्णूला लांच देऊन त्यानें वश करून घेतलें व देवगर्भेची आणि आपली वारंवार गांठ पडेल अशी मोकळीक मिळविली.

पुढें गांधर्वविधीनें देवगर्भेला त्यानें वरिलें आणि कांहीं काळानें देवगर्भा गरोदर झाली. तिच्या बंधूंला ही गोष्ट समजली तेव्हां त्यांना फार राग आला. परंतु उपसागराला किंवा बहिणीला ठार मारण्यानें प्रजेंत असंतोष माजेल असें वाटून त्यांना तो गिळून टाकावा लागला. पण बहिणीच्या आणि उपसागराच्या संमतीनें त्यांनी असा ठराव केला कीं जर देवगर्भेला मुलगा झाला तर त्याचा वध करण्यासाठीं तिनें आपल्या भावाच्या हवाली करावा व मुलगी झाली तर तिचें पालनपोषण करावें.

मरणभयानें त्रस्त झालेल्या देवगर्भेला आणि उपसागराला कंसाचें म्हणणें मान्य करावें लागलें. आणि कंसानें दिलेली गोवर्धमान गांवाची जहागिर घेऊन तीं दोघेजणें तेथें राहिलीं. नवमास पूर्ण झाल्यावर देवगर्भेला मुलगी झाली. कंसोपकंसाला बहिणीला मुलगी झाली हें वर्तमान ऐकून फार आनंद झाला व

त्यांनीं तिला गोवर्धमान गांवाची जहागिर दिली. तेव्हां पासून देवगर्भा आणि तिचा पति उपसागर त्याच गांवीं राहूं लागलीं. देवगर्भेच्या या पहिल्या मुलीला अंजनादेवी असें नांव ठेवण्यांत आलें.

कांहीं काळानें देवगर्भा गर्भावती होऊन नवमास पूर्ण झाल्यावर पुत्र प्रसवली. आपले भाऊ आपल्या मुलाला ठार मारतील या भयानें त्याच दिवशीं जन्मलेल्या नंदगोपेच्या मुलीची आणि या मुलाची देवगर्भेनें अदलाबदल केली. या प्रमाणें नंदगोपेला दहा मुली व देवगर्भेला दहा मुलगे झाले. आणि सर्वांची कंसराजाला न कळत अदलाबदल करण्यांत आली.

देवगर्भेच्या दहा मुलांचीं अनुक्रमें वासुदेव, बलदेव, चंद्रदेव, सूर्यदेव, अग्निदेव, वरुणदेव, अर्जुन, प्रद्युम्न, घृतपंडित आणि अंकूर अशीं नांवें होतीं. ते अंधकविष्णु दास आणि नंदगोपा दासी यांचे पुत्र आहेत असें सर्व लोकांस वाटत होतें.

वयांत आल्यावर कुस्त्या खेळण्यांत व लुटालूट करण्यांत ते मोठे प्रवीण झाले. आसपासच्या गांवचे लोक त्यांना थरथरा कापूं लागले. हे दहा भाऊ आपल्या प्रजेला त्रास देतात हें वर्तमान कंसाच्या कानावर आलें. तेव्हां तो अत्यंत संतप्त झाला आणि अंधकविष्णूला बोलावून आणून म्हणाला, “तुझे मुलगे माझ्या राज्यांत धुमाकूळ घालीत आहेत याला जबाबदार कोण?”

बिचारा अंधकविष्णू राजाच्या दरडावणीला घाबरून जाऊन म्हणाला, “महाराज, आपण अभयदान देत असाल तर खरी गोष्ट काय ती सांगतों.”राजानें तुझ्या जिवाला धोका होणार नाहीं असें अभिवचन दिल्यावर त्यानें देवगर्भेच्या आणि आपल्या मुलांची कशी अदलाबदल करण्यांत आली ही सर्व गोष्ट राजाला सांगितली.

आपण उघड रीतीनें या उनाड जवानांशीं विरोध केला तर ते देवगर्भेचे पुत्र आहेत हें उघडकीला येईल व त्यामुळें आपली कांहीं प्रजा त्यांची तरफदारी करील या शंकेनें कंसानें त्यांना मारण्याची एक नवीन युक्ती काढली.

चाणूर आणि मुष्टिक हे दोघे असितांजन नगरांत प्रसिद्ध मल्ल होते. त्यांना बोलावून आणून राजानें असें सांगितलें कीं, मी एका उत्सवांत मल्लयुद्धासाठीं सर्व मल्लांना बोलावणार आहे. त्यांत वासुदेव, बलदेव हे देखील येतील. त्यांच्याशीं तुम्हीच मल्लयुद्धाला सुरुवात करा व जे डावपेंच अन्यायाचे समजले जातात अशा डावपेंचांनीं दोघांना ठार मारा. तुमच्या विरुद्ध आचरणाबद्दल क्षमा करणें माझ्या हातीं आहे. एवढेंच नव्हे तर मी तुम्हांला या कृत्याबद्दल मोठें बक्षिस देईन.

मल्लांना राजाज्ञा शिरसा वंद्य वाटली. ताबडतोब एक उत्सव जाहीर करण्यांत आला व रंगभूमी सज्ज करून तेथें या उत्सवांत अमक्या दिवशीं कुस्त्या होतील हें वर्तमान मेरी वाजवून प्रसिद्ध करण्यांत आलें. जेथें जेथें कुस्त्या होत असत तेथें तेथें वासुदेव, बलदेव वगैरे दहा भाऊ हजर असावयाचेच. त्याप्रमाणें या कुस्त्यांच्या दिवशीं ते तेथें आले.

रंगवाटा प्रथमतः चाणूर गर्जना करून उतरला व आपणाशीं मल्लयुद्ध करण्याला जो सज्ज असेल त्यानें पुढें व्हावें असें म्हणून तो प्रतिपक्षाशीं कुस्ती देण्यास सज्ज राहिला. बलदेवाला त्याच्या या वल्गनेचें हसूं

आलें. तो आपणाशींच म्हणाला, “असल्या नीच मल्लाला मी शिवूं देखील इच्छित नाहीं. याला हस्तस्पर्श न करितांच मारून टाकावें हें बरें.”असें म्हणून जवळच्या हस्तिशाळेंतील मोठे दोरखंड घेऊन त्यानें आखाड्यांत उडी टाकली, आणि चाणूराला त्या दोरखंडानें गुंडाळून मस्तकाभोवतीं चक्राकार फिरवून जोरानें जमिनीवर आदळलें व तो मेला असें पाहून त्याला रंगवाटांच्या बाहेर फेकून दिलें.

तें पाहून मुष्टिक पुढें सरसावला आणि बलदेवाच्या अंगावर धांवला. पण बलदेवानें त्याचीं हाडें नरम करून तो “मी मल्ल नाहीं, मी मल्ल नाहीं”असें मोठ्यानें ओरडत असतांच त्याला ठार मारिलें. मुष्टिकानें मरण्याच्या वेळीं अशी प्रार्थना केली कीं, मेल्यानंतर यक्ष होऊन बलदेवाला खाण्याचें आपणास सामर्थ्य यावें. त्याच्या इच्छेप्रमाणें मरणोत्तर तो कालमत्तिय नांवाच्या अरण्यांत यक्षयोनींत जन्मला.

दोन्ही मल्लांचीं अशी दुर्दशा झालेली पाहून कंसराजा क्रोधाविष्ट होऊन म्हणाला, “या दहाहि बंधूंना एकदम कैद करा.”इतकें बोलून राजा आसनावरून उठतो न उठतो तोंच वासुदेवानें आपलें चक्र फेकून त्याचा आणि त्याच्या भावाचा शिरच्छेद केला. नगरवासी लोक या त्यांच्या कृत्यानें गर्भगलित होऊन त्यांनाच शरण गेले. तेव्हां वासुदेवानें त्यांना अभयदान दिलें व आपल्या आईबापांला असितांजन नगरींत आणून राज्याची स्थापना केली.

पुढें या दाही बंधूंनीं सगळ्या जंबुद्धीपाचें राज्य काबीज करण्याचा निश्चय करून कालसेन राजाच्या अयोध्या राजधानीवर हल्ला केला व मोठ्या पराक्रमानें तें नगर आपल्या हस्तगत केलें. शेवटीं सर्व प्रदेशांत विजय संपादन करीत ते द्वारवतीला आले.

या नगरासंबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं त्याच्या एका बाजूला समुद्र व दुसऱ्या बाजूला पर्वत असे. आणि तेथें पुष्कळ यक्षांची वस्ती होती. कोणी शत्रू आल्याबरोबर यक्षांच्या प्रभावानें हें शहर एकदम उड्डान करून समुद्रांतील एका बेटावर जाऊन बसत असे. आणि शत्रू निघून गेल्यावर पुनः पूर्वस्थळीं येत असे.

हा प्रकार पाहून वासुदेवादिक दहाहि बंधू फार घोटाळ्यांत पडले आणि कृष्णद्वैपायन नांवाच्या ऋषीजवळ जाऊन द्वारवती आपल्या हस्तगत कशी होईल या विषयीं त्यांनीं सल्ला विचारला.

कृष्णद्वैपायन ऋषी म्हणाला, “या नगराच्या आसान्नप्रदेशांत गर्दभवेषधारी एक यक्ष रहात आहे. नगरावर हल्ला करण्यासाठीं परचक्र आल्याबरोबर तो मोठमोठ्यानें ओरडत असतो. त्यामुळें इतर यक्षांना सूचना मिळून ते नगर उचलून समुद्रामध्यें एका बेटावर नेऊन ठेवितात. तेव्हां प्रथमतः या गाढवाला गाठून त्याची प्रार्थना करा. तोच तुम्हाला नगरप्राप्तीचा मार्ग दाखवून देईल.”

ऋषीच्या आज्ञेप्रमाणें त्या गर्दभाची पुष्कळ विनवणी केली. परंतु तो म्हणाला, “तुम्ही जवळ आल्याबरोबर मोठ्यानें ओरडणें हा माझा धर्म आहे. त्यापासून विन्मुख होणें शक्य नाहीं. पण दुसऱ्या एका युक्तीनें तुम्हांला ही नगरी हस्तगत करून घेतां येईल. मोठा सैन्यभार बरोबर न आणतां तुम्ही कांहीं माणसें घेऊन या, व या नगरीच्या चारी द्वारांवर चार लोहस्तंभ गाडून त्यांला लोखंडी साखळीनें चार भक्कम नांगर बांधून टाका. ज्यावेळीं नगर उडावयास लागेल त्यावेळीं हे नांगर दाबून धरिले म्हणजे नगर स्थिर राहील, व तें उचलून नेणाऱ्या यक्षांचे श्रम व्यर्थ जातील.”

या गर्दभवेषधारी यक्षाच्या उपदेशाप्रमाणें वागून त्या दहा बंधूंनीं द्वारवती हस्तगत केली आणि तेथील राजास ठार मारून सर्व राज्य आपल्या कबजांत घेतलें. येथेंच त्यांनीं आपली राजधानी स्थापिली आणि सर्व राज्याचे दहा विभाग करून ते सुखानें कालक्रमण करूं लागले. परंतु त्यांची वडील बहीण अंजनादेवी इची त्यांना आठवण झाली नाहीं. पुढें ती जेव्हां त्यांच्या भेटीला आली तेव्हां तिलाहि एक भाग द्यावा असें ठरलें. परंतु अंकूर म्हणाला, “आपण काबीज केलेल्या राष्ट्रांचे दहाच्या ऐवजीं अकरा भाग करणें इष्ट नाहीं. मी माझा भाग अंजनादेवीला देतों आणि माझा निर्वाह व्यापारावर चालवितों. मात्र तुमच्या राज्यांत माझ्या मालावर जकात बसवूं नका. ही गोष्ट सर्वांना पसंत पडून अंकुराचा राज्यभाग अंजनादेवीला मिळाला व त्यानें द्वारवतींच मोठी पेढी स्थापन करून व्यापार चालविला.

याप्रमाणें वासुदेवादिक नव बंधू व दहावी अंजनादेवी द्वारवती नगरींत राज्य करीत असतां एके दिवशीं वासुदेवाचा एक प्रिय पुत्र एकाएकीं मरण पावला. त्या शोकानें वासुदेवानें बिछाना धरिला. खाणें पिणें देखील वर्ज केलें. व राज्यव्यवस्थेचा विचार तर दूरच राहिला. ही त्याची अवस्था पाहून बलदेवादिक बंधू फार चिंताग्रस्त झाले. परंतु घृतपंडित त्या सर्वांत हुषार आणि सूज्ञ होता. त्यानें वासुदेवाचा शोक नष्ट करण्याची एक नवी युक्ति शोधून काढिली.

स्वतः वेड्याचें सोंग पांघरून ‘ससा ससा’ असें तो ओरडत सुटला. तेव्हां दुसऱ्या एका बंधूनें जाऊन हें वृत्त वासुदेवाला कळविलें. त्या बिचाऱ्याचा पुत्रशोक तात्काळ निवला आणि त्याच्या जागीं हा नवा बंधुशोक उद्‌भवला. तो तसाच घृतपंडिताजवळ जाऊन त्याला म्हणाला, “बाबारे, ‘ससा ससा’ असें ओरडत कां फिरतोस? तुझा ससा कोणी नेला? तुला सोन्याचा, रुप्याचा किंवा जवाहिऱ्याचा अथवा अरण्यांतील सशांपैकीं कोणत्याहि प्रकारचा ससा पाहिजे असेल तर मी ताबडतोब आणून देतों. परंतु हें वेड सोडून दे आणि शुद्धीवर ये.”

घृतपंडित म्हणाला, “पृथ्वीवर वास करणाऱ्या किंवा कृत्रिम सशाची मी मुळींच अपेक्षा करीत नाहीं. परंतु चंद्रावर दिसत असलेल्या सशासाठीं मी ओरडत आहें. तो ससा आणवून दिला तरच माझा उन्माद नाहींसा होईल.”

वासुदेवाला भावाच्या वेडाबद्दल शंका राहिली नाहीं. तो मोठ्या दुःखित अंतःकरणानें म्हणाला, “जो अप्राप्य वस्तूची प्रार्थना करितो त्याचा नाश होतो. तूं चंद्रावरील ससा मागतां मागतांच मरून जाशील आणि जीव दिला तरी तो तुला मिळणार नाहीं.”

घृतपंडित म्हणाला, “दादा, हें तत्त्व जर तूं जाणत आहेस तर मेलेल्या पुत्राबद्दल इतका शोक घेऊन कां बसला आहेस? चंद्रावरील ससा निदान दिसतो आहे तरी तूं त्याला अप्राप्य म्हणतोस? तर मग तुझ्या मुलाच्या शरीराचें दहन केल्यावर त्याचा आत्मा कोणीकडे गेला याचा तुला पत्ता देखील लागत नाहीं. औषधांनीं, मंत्रांनीं किंवा अन्य उपायांनीं त्याला परत आणतां येत नाहीं. अशा त्या प्राण्याबद्दल शोक करणें अत्यंत वेडेपणा नव्हे काय?

घृतपंडिताच्या या उपदेशानें वासुदेव ताळ्यावर आला आणि पुत्रशोक सोडून देऊन तो पूर्ववत् सर्व राज्यकारभार पाहूं लागला.

अनुक्रमणिका

त्या काळीं मनुष्याचें आयुष्य २०, ००० वर्षें होतें. वासुदेवानें आणि त्याच्या बंधूंनीं पुष्कळ वर्षें जंबुद्वीपाचें राज्य केलें. त्यांना पुत्रपौत्र पुष्कळ झाले. त्यांच्या संततीपैकी कांहीं तरुणांना कृष्णद्वैपायनं ऋषीच्या दिव्य-ज्ञानाबद्दल शंका आली. तो खरोखरच दिव्यदृष्टी आहे किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं एका तरूण मनुष्याच्या पोटाला उशी बांधून त्याला गरोदर स्त्रीचा वेष देऊन कृष्णद्वैपायनाजवळ नेलें आणि ते म्हणाले, “गुरुमहाराज, या स्त्रीला मुलगा होणार कीं मुलगी होणार हें सांगा.”

कृष्णद्वैपायनानें वासुदेवादिक दशबंधूंचा वंश नष्ट होण्याची वेळ आली आहे व आपलेंहि आयुष्यं संपलें आहे असें जाणून उत्तर दिलें कीं, ‘ही गोष्ट तुम्ही मला विचारू नका. ’ परंतु राजकुमारांनीं फारच आग्रह केल्यावर तो म्हणाला, “याच्या उदरांतून सात दिवसांनीं खदिराचें पात्र निघेल आणि त्यापासून वासुदेवकुळाचा क्षय होईल. तथापि तुम्ही हें खदिरपात्र जाळून त्याची राख नदींत फेकून द्या.”

राजकुमारांला ऋषीच्या बोलण्याचा फार राग आला. ते म्हणाले, “दांभिक जटिला, पुरुष कधीं प्रसूत होत असतो काय?”नंतर त्यांनीं कृष्णद्वैपायनाला जवळच्या वृक्षावर फांशीं दिलें.

हें वर्तमान त्यांच्या वडिलांना समजल्याबरोबर ते अत्यंत भयभीत झाले आणि द्वैपायनानें सांगितल्याप्रमाणें सातव्या दिवशीं त्या तरुण मनुष्याच्या उदरांतून निघालेल्या खदिरपात्राची त्यांनी व्यवस्था केली. परंतु नदींत टाकलेल्या त्या खदिरपात्राच्या रक्षेपासून नदीच्या तोंडावर एरक नावाचें गवत उगवलें.

एके दिवशीं वासुदेववंशातील सर्वजण समुद्रस्नानासाठीं तेथें गेले असतां त्यांच्यांत कलह उत्पन्न झाला. जवळपास शस्त्र नसल्यामुळें एकानें त्यांतील एरक गवताचा टाक उपटला. तो त्याच्या हातीं येतांच मोठ्या गदेचें स्वरुप पावला. याप्रमाणें ज्यानें त्यानें त्या एरक गवताच्या सहाय्यानें रणकंदन माजविलें. याचा परिणाम असा झाला कीं, वासुदेव, बलदेव, अंजनादेवी आणि त्यांचा पुरोहित एवढे चौघेच काय ते पळ काढल्यामुळें बचावले. बाकी सर्वांचा संहार झाला.

वासुदेवादिक कालमत्तीय अरण्यांत पोंहोंचले. तेथें मुष्टिक यक्षानें त्यांस पाहून मल्लयुद्ध करण्याच्या मिषानें तो त्यांच्या अंगावर धावून आला. या वेळीं बलदेवाच्या अंगांत मूळची शक्ति नव्हती. तथापि तो मुष्टिक यक्षाशी मल्लयुद्ध करण्यास सज्ज झाला. मुष्टिक यक्षानें त्याला कोवळ्या मुळ्याप्रमाणें क्षणार्धांत खाऊन टाकलें.

वासुदेव पुरोहिताला आणि अंजनादेवीला बरोबर घेऊन तसाच पुढें निघाला. सर्व रात्र चालल्यामुळें तो अतीशय थकून गेला होता. सकाळच्या प्रहरीं एका झुडपाच्या खालीं विश्रांतीसाठीं पडून राहून त्यानें अंजनादेवीला आणि पुरोहिताला भोजनसामग्री मिळविण्यासाठीं गावांत पाठविलें.

इकडे एका व्याधानें त्या झुडपाच्या आड कांहीं पदार्थ हालत आहे व तो रानडुकर असावा अशा शंकेनें वासुदेवावर बाण सोडला. वासुदेव उठून पहातो तों त्या बाणानें पायांत भयंकर जखम केलेली त्याला दिसून आली. व्याध आपण एका मनुष्याचा अपराध केला असें पाहून भयचकित झाला व पळण्याच्या मार्गास लागला. पण वासुदेवानें त्यास जवळ बोलावून तूं कोण आहेस असा प्रश्न केला.

अनुक्रमणिका

तो म्हणाला, “महाराज, मी जरा नांवाचा व्याध आहे. जरा नांवाच्या व्याधानें विद्ध केला असतां तूं मरण पावशील असें भविष्य वर्तविण्यांत आले होतें.”

त्याचें स्मरण झाल्यामुळें वासुदेवाला जगण्याची आशा राहिली नाहीं. तथापि त्यानें व्याधाची विनवणी करून आपली जखम बांधवून घेतली वव्याधाला तेथून पाठवून दिलें. इतक्यांत अंजनादेवी आणि पुरोहित हीं दोघें तेथें आलीं. वासुदेवानें आपली जगण्याची आशा राहिली नाहीं असें सांगून व त्यांना उपजीविकेकरितां एक मंत्र देऊन तेथेंच प्राण सोडला. याप्रमाणें अंजनादेवीशिवाय वासुदेववंशांत कोणीएक शिल्लक राहिला नाहीं.

——***——

अनुक्रमणिका

१३३. मातृभक्ति. (४५५)

(मातिपोसकजातक नं. ४५५)

अनेक जन्मींच्या संसारांत संसरत असतां आमचा बोधिसत्त्व एकदां हत्तीच्या योनींतजन्माला येऊन वयांत आल्यावर मोठ्या गजसंघाचा धुरीण झाला होता. वृद्धापकाळामुळें त्याची आई अंध झाली व हत्तीच्या कळपाबरोबर तिला रानावनांत फिरणें अशक्य झालें. तिला एका सुरक्षित स्थळींठेवून बोधिसत्त्व इतर हत्तींबरोबर चांगलीं चांगलीं फळें वगैरे आहाराचे पदार्थ पाठवीत असे. परंतु ते रसलोलुप हत्ती वाटेंतच ती फळें खात असत व बिचाऱ्या वृद्ध हत्तीणीच्या वाट्याला पालापाचोळा वगैरे नीरस पदार्थच येत असत.

एकदां आईच्या समाचाराला गेला असतां बोधिसत्त्वाला आपल्या आईची दीनावस्था दिसून आली व त्याचें कारण समजून आल्यावर त्यानें असा निश्चय केला कीं, इतःपर गजसंघाचें नायकत्व सोडून देऊन आपल्या मातेच्या सेवेंत ती जिवंत असेतोंपर्यंत रहावयाचें. त्याचा हा बेत हस्तियूथाला पसंत पडला नाहीं. तथापि तो त्यानें अमलांत आणला.

एके दिवशीं एक वनचर त्या अरण्यांत वाट चुकून इतस्ततः भटकत फिरत असलेला बोधिसत्त्वाच्या पहाण्यांत आला. या अजस्त्र हत्तीला पाहिल्याबरोबर वनचर भयकंपित होऊन पळत सुटला. पण रस्ता बिकट असल्यामुळें त्याला दूर जाता येईना. त्याची अशी गाळण झालेली पाहून बोधिसत्त्व म्हणाला, "बा मनुष्या, माझ्यापासून तुला भय आहे अशी शंका मनांत आणून इतस्ततः पळूं नकोस. तुझ्यावर कांहीं आपत्ति आली असावी असें मला वाटतें. आणि जवळ येऊन तूं जर मला आपला वृत्तांत सांगशील तर कदाचित या आपत्तीतून तुझा मी उद्धार करूं शकेन."

वनचरक जवळ जाऊन साष्टांग प्रणिपात करून म्हणाला, "गजपुंगव, आज सात दिवस मार्ग चुकल्यामुळें मी या अरण्यांत भ्रमण करीत आहें."यांतून पार पाडून मला मनुष्यवसतींत नेऊन सोडाल तर मी आपला अत्यंत ऋणी होईन. त्या हस्तिनागानें वनचराला आपल्या पाठीवर बसवून अरण्यांतून पार पाडिले आणि वाराणशीला जाणाऱ्या मोठ्या सडकेवर नेऊन ठेविलें.

त्याच वेळीं वाराणशीच्या राजाचा मंगळहस्ती मरण पावला होता व तशा प्रकारचा दुसरा हत्ती मिळणें मुष्कील होतें. राजानें तसा हत्ती मिळवून देणाऱ्या मनुष्यास मोठें बक्षिस मिळेल असें सर्व शहरांत भेरी वाजवून जाहीर केलें होतें. द्रव्याच्या लालुचीनें त्या वनचरानें हत्ती पकडणाऱ्या राजाच्या माहुतांना बोधिसत्त्वाचें वसतिस्थान दाखवून दिलें.

त्यांनीं बोधिसत्त्वाला घेरून त्याच्यावर शस्त्रास्त्रांचा वर्षाव केला. आपणाला वेढणाऱ्या सर्व माणसांला तुडविण्याचें सामर्थ्य बोधिसत्त्वाच्या अंगीं असुनहि त्यानें आपल्या गंभीर शांतीचा भंग होवूं दिला नाहीं. तो आपल्या मनाशींच म्हणाला, "मी क्रोधोन्मत झालों तर या सर्वांचा संहार करण्यास विलंब लागणार नाहीं. पण तेणेंकरून मी शीलभ्रष्ट होईन. म्हणून सहनशीलपणानें त्यांचे प्रहार सोसावे हेंच चांगलें."मुख्य माहुतानें बोधिसत्त्वाचीं लक्षणें तेव्हांच ओळखिली व तो त्याच्या जवळ जाऊन त्याला मोठ्या प्रेमानें वाराणसीला घेऊन गेला.

अनुक्रमणिका

राजाच्या हत्तीशाळेंत बोधिसत्त्वाचा मान उत्तम प्रकारें राखण्यांत आला होता हें निराळें सांगावयास नकोच. परंतु त्यानें अन्नपाणी ग्रहण करण्याचें अगदींच वर्ज्य केलें. हे वर्तमान राजाला समजलें तेव्हां हस्तिशाळेंत जाऊन तो बोधिसत्त्वास म्हणाला “हे नागराज, अन्नपाणी वर्ज्य करून तूं आपल्या शरीराला ताप देऊं नकोस. येथें सुखानें राहून आमच्या राज्याचें पुष्कळसें हित तुला करितां येईल.”

हत्ती म्हणाला, “परंतु ती बिचारी अनाथ, आंधळी, एकाकी अरण्यांत काय करील? चंडोरण पर्वतावर मोठमोठाल्या खुंटांला आदळून तिची गति काय होईल?” राजा म्हणाला, “ही बाई कोण आहे?” “महाराज, ती माझी आई आहे.”हत्ती उत्तरला. हें त्या हत्तीचें मातृप्रेमपाहून राजा अत्यंत गहिंवरला आणि म्हणाला, “माहुतहो, या मातृभक्त गजाला ताबडतोब मुक्त करा व त्याच्या मूळच्या ठिकाणीं नेऊन सोडा.”

त्याप्रमाणें बोधिसत्त्वाला सोडण्यांत आल्यावर त्यानें सोंडेंत पाणी घेऊन तें आपल्या आईच्या पाठीवर शिंपडलें. तेव्हां ती म्हणाली, “अरे, हा मेघ देखील भलत्याच वेळीं वर्षाव करीत आहे. माझ्यापाठीं संतप्त पृष्ठभागावर पाणी शिंपडणाऱ्या माझ्या प्रियपुत्राची मला हा आठवण देत आहे.”तेव्हां बोधिसत्त्वानें आपण स्वतःच सेवेसाठीं हजर आहे असें सांगून आपल्या आईला अत्यंत मुदित केले. तिनें काशीराजाला मनःपूर्वक आशीर्वाद दिला.

त्या राजानें बोधिसत्त्वाच्या गुणांवर प्रसन्न होऊन तेथील पुष्करणीच्या जवळ एक गाव वसविला आणि त्याला व त्याच्या आईला रोज आहार मिळावा अशी व्यवस्था केली.

आई निवर्तल्यावर बोधिसत्त्व करंडक नांवाच्या आश्रमांत राहून तेथील ऋषीची सेवा करूं लागला. राजानें बोधिसत्त्वाची एक पाषाणप्रतिमा करवून तिचा मोठा गौरव केला आणि जंबुद्वीपातींल लोक प्रतिवर्षी त्या ठिकाणीं जाऊन गजोत्सव करूं लागले.

——***——

अनुक्रमणिका

१३४. पापभय. (४५९)

(पानेयजातक नं. ४५९)

पाच प्रत्येक बुद्ध हिमालयावरील नंदमूलक नांवाच्या दरींत रहात असत. ते भिक्षाटन करीत करीत एके दिवशीं वाराणशीला आले. राजवाड्यावरून जात असतांना त्यांना पाहून राजा फार प्रसन्न झाला व त्यानें मोठ्या सन्मानानें त्यांना राजवाड्यांत नेऊन जेऊं घातलें.

भोजनोत्तर राजानें त्यांना वैराग्य कां झालें असा प्रश्न केला. तेव्हां त्यांतील एकजण म्हणाला, “महाराज, मी याच राज्यांतील एका गावीं शेतकरी होतों. एके दिवशीं मी व माझे मित्र आपापलीं पाण्यानीं भरलेलीं भांडी घेऊन गांवापासून दूर अंतरावर असलेल्या आमच्या शेतांत गेलों. तेथें माझें पाणी लवकर संपेल अशा शंकेनें माझ्या मित्राचा डोळा चुकवून त्याच्या भांड्यांतील मी पाणी प्यालों. पण या माझ्या पापकर्माची मला फार लाज वाटली. व अशीं पापें पुनः न घडावीं म्हणून मी संन्यास ग्रहण केला.”

दुसऱ्या प्रत्येक बुद्धाला आत्मवृत्त निवेदन करण्याची राजानें विनंती केली. तेव्हां तो म्हणाला, “महाराज, मी व माझा पिता प्रवासाला जात असतां आम्हांस चोरांनीं गाठलें. या चोरांची वहिवाट अशी असे कीं, बापाला आणि मुलाला पकडलें असतां मुलाला ठेवून घेऊन ते बापाला पैसे आणण्यासाठीं पाठवीत असत. दोघा बंधूंना पकडलें असतां कनिष्ठाला ठेवून ज्येष्ठाला पैसे आणण्यासाठीं पाठवीत असत.

आम्ही जेव्हां या चोरांच्या हातीं लागलों तेव्हां पितापुत्रांचें नातें कबूल करावयाचें नाहीं असा निश्चय केला. चोरांनीं विचारिल्यावर आम्ही दोघांनीं साफ सांगितलें कीं, आमचा कांहींएक संबंध नाही. या जंगलातच काय ती आमची प्रथमतः गाठ पडली. त्या चोरांनीं आमच्याजवळ असलेलें सामान हिरावून घेऊन आम्हांस सोडून दिलें. परंतु त्या खोटें बोलण्याचा परिणाम माझ्या मनावर इतका झाला कीं, प्रपंचाचा त्याग करून मी मोकळा झालों. हेतू हा कीं, पुनः असलें पाप माझ्या हातून होऊं नये.”

राजाच्या विनंतीवरून तिसरा बोधिसत्त्व म्हणाला, “एके दिवशीं बाजारांत बसलों असतां माझें चित्त एका परस्त्रीवर गेलें. पुढें या पांपाचा मला अत्यंत पश्चाताप झाला व अशीं पापें माझ्या मनानें सुद्धां होऊं नयेत म्हणून मी प्रव्रज्या घेतली.”

चवथा प्रत्येक बुद्ध म्हणाला, “मी एका गावांत अधिकारी होतों. तेथील लोकांनीं यज्ञ करण्याविषयीं माझी परवानगी मागितली व लोकांना संतुष्ट करण्यासाठीं ती मी दिली. परंतु या यज्ञांत पुष्कळ प्राण्यांचा वध करण्यांत आला. आणि त्यामुळें माझ्या मनाला फार हुरहुर लागली. कांही अंशीं त्या प्राण्यांच्या घाताला मीच कारण झालों असें वाटून मी अधिकाराचाच नव्हे तर साऱ्या प्रपंचाचा त्याग केला आणि अशीं पापें पुनरपी माझ्याकडून होवूं नयेत म्हणून संन्याशी झालों.”

पांचवा प्रत्येक बुद्ध म्हणाला, महाराज, “माझ्या मित्राप्रमाणेंच मी देखील एका गावचा अधिकारी होतों. तेथील लोकांनीं मोठ्या उत्सवासाठी माझी परवानगी मागितली असतां ती मी विचार न करितां दिली. पुढें त्या लोकांनीं उत्सवांत मद्यप्राशन करून पुष्कळ दंगेधोपे केले. त्यांच्या मद्यपानाला अंशतः मीच

कारण झालों याचें मला फार वाईट वाटलें व पुनः असें पाप माझ्याकडून न व्हावें म्हणून मी संन्यास घेतला."

हें त्यांचें आत्मवृत्त ऐकून राजा संतुष्ट झाला आणि त्यांना चीवरादिक पदार्थ देऊन त्यानें रवाना केलें. परंतु या दिवसापासून राजाचें चित्त राज्यव्यवहारांत रमेनासें झालें. त्याच्या पट्टराणीनें त्याचें मन वळविण्याचा मोठा खटाटोप केला, पण व्यर्थ. राज्यसुखोपभोगाविषयीं राजा पूर्ण विरक्त झाला आणि आपल्या प्रधानमंडळाच्या स्वाधीन राज्यकारभार करून त्यानें संन्यास घेतला. असें सांगतात कीं, योगसाधनाच्यायोगें मरणोत्तर तो ब्रह्मलोकाला गेला.

——***——

अनुक्रमणिका

१३५. पश्चात्ताप करण्याची पाळी कां येते? (४६८)

(जनसंधजातक नं. ४६८)

बोधिसत्त्व एकदां जनसंध नांवाचा वाराणसीचा राजा झाला होता. तरूणपणीं तक्षशिलेला जाऊन त्यानें सर्व शास्त्रांचें अध्ययन केलें होतें, आणि राज्यकारभारांत नानाविध मनुष्यस्वभावाचा त्याला चांगला अनुभव आला होता.

एका उपोसथाच्या दिवशीं सर्व लोकांना राजांगणांत गोळा करून मनुष्याला पश्चाताप करण्याचा प्रसंग कां येतो या संबंधानें त्यानें उपदेश केला तो असा:—

"(१) तरुणपणीं प्रयत्नानें आणि सन्मार्गानें द्रव्यसंग्रह न केल्यास वृद्धपणीं पश्चात्ताप करण्याची पाळी येते. (२) आपणाला सर्व साधनें अनुकूल असतां आपण जर शिक्षण संपादन केलें नाहीं तर सतत पश्चात्ताप करण्याची पाळी आल्यावांचून रहाणार नाहीं. (३) पूर्वी मी खोट्या उठाठेवीकरणारा, चहाडखोर व शिवीगाळ करणारा होतों याबद्दल वृद्धपणीं पश्चात्ताप करण्याची पाळी येते. (४) तरूणपणीं पुष्कळ प्राण्यांचा घात केला, प्राणिमात्राला निर्दयतेनें वागविलें याबद्दल वृद्धपणीं वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं. (५) आपल्या स्त्रीला सोडून परस्त्रीवर नजर ठेविली याबद्दल भयंकर पश्चात्ताप करण्याचा प्रसंग आल्यावांचून रहात नाहीं. (६) घरांत अन्नवस्त्रादिकांचा पुष्कळ संचय असून देखील त्यांपैकीं अल्पहि दानधर्माकडे लावले नाहीं याबद्दल वृद्धपणीं मनाला तळमळ लागून रहाते. (७) माझ्या अंगीं सामर्थ्य असून तारुण्यांत वृद्ध आईबापांची मी हेळसांड केली ही गोष्ट वृद्धपणीं मनाला फार झोंबते. (८)ज्यानें सर्व प्रकारें माझ्या बरवेपणाची काळजी घेतली त्या माझ्या पित्याचा सदुपदेश मी ऐकला नाहीं आणि त्याचा अवमान केला याबद्दल फार पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येतो. (९) तारुण्यांत साधुसंतांचा आदरसत्कार करून त्यांचा धर्मोपदेश मी योग्यकाळीं श्रवण केला नाहीं याबद्दल मागाहून पश्चात्ताप करावा लागतो. (१०)तारुण्यांत तपश्चर्या करण्याचें अंगांत सामर्थ्य असून माझ्या हातून तपाचरण घडलें नाहीं याबद्दल वृद्धपणीं पश्चाताप करण्याची पाळी येते.

म्हणून सूज्ञ तरुणानें या दहा गोष्टींबद्दल पुढें पश्चाताप करण्याची पाळी येणार नाहीं अशा तऱ्हेची सावधगिरी ठेवावी व उत्साहानें सर्व सत्कर्मे आचरून आपणावर पश्चाताप करण्याची पाळी येऊं देऊं नये.

——***——

अनुक्रमणिका

१३६. मित्रामित्रांचीं लक्षणें. (४७३)

(मित्तामित्तजातक नं. ४७३)

एकदां बोधिसत्त्व वाराणसीच्या राजाचा प्रधान झाला होता. त्याला राजानें एके दिवशीं मित्रामित्रांचीं लक्षणें विचारिलीं असतां तो म्हणाला:— (१) पाहिल्याबरोबर प्रमुदित होत नाहीं; (२) अभिनंदन करीत नाही; (३) आस्थेनें आपणाकडे पहात नाहीं; (४) आपल्या मताविरुद्ध वर्तन करितो; (५) आपल्या शत्रूंचा सहवास धरितो व मित्रांची संगति धरत नाही;(६) आपली स्तुति करणाऱ्याला विरोध करितो; (७) आणि निंदा करणाऱ्याला उत्तेजन देतो; (८) आपलें स्वतःचें इंगीत कळूं देत नाहीं;(९) व आपलें इंगीत सांगितलें असतां तें गुप्त ठेवित नाही;(१०) आपल्या वर्तनाची निंदा करितो; (११) आपल्या शहाणपणाची टर उडवितो; (१२) आपली अभिवृद्धि ज्याला आवडत नाही; (१३) व हानि आवडते; (१४) घरीं कांहीं भोजनसमारंभ असला तर ज्याला आपली आठवण होत नाहीं; (१५) आणि आपणावर सतत प्रेम करीत नाहीं हा आपला अमित्र आहे असें समजावें. कांकीं, वर सांगितलेलीं हीं अमित्रांचीं लक्षणें होत.

आतां मित्रांचीं लक्षणें सांगतों:—

(१) आपलीं तीं तीं भाषणें स्मरतो; (२) पाहिल्याबरोबर आपलें अभिनंदन करतो; (३) आपणावर अत्यंत प्रेम करतो; (४) आणि सतत गोड शब्द बोलतो; (५) आपल्या मित्रांचीच मैत्री करतो; (६) व अमित्रांची करीत नाहीं; (७) निंदेचें निवारण करितो; (८) आणि स्तुति करणाराला उत्तेजन देतो; (९) स्वतःचें इंगीत सांगतो; (१०) व आपलें इंगीत सांगितलें असतां त्याचा स्फोट होवूं देत नाहीं; (११) आपल्या कृत्याची प्रशंसा करितो; (१२) प्रज्ञेची प्रशंसा करितो; (१३) आपल्या वृद्धीबद्दल ज्याला आनंद होतो; (१४) व हानीबद्दल दुःख होतें; (१५) भोजनसमारंभादिक प्रसंगीं आपली ज्याला आठवण झाल्यावांचून रहात नाहीं; (१६) जो आपणावर सतत अनुकंपा करितो; आपल्या लाभाविषयीं आस्था बाळगतो तो खरा मित्र होय. कां की, सूज्ञजनवरसांगितलेल्या १६ लक्षणांनीं मित्रांची पारख करितात.

——✻✻✻——

अनुक्रमणिका

१३७. गुरूचें प्रत्याख्यान. (४७४)

(अंबजातक नं. ४७४)

वाराणसीच्या राजाच्या पुरोहिताचें सर्व कुटुंब अहिवातक नांवाच्या रोगानें नाश पावलें. एकटा अल्पवयस्क मुलगा तेवढा घरांतून पळ काढल्यामुळेंबचावला. त्यानें तक्षशिलेला जाऊन वेद, वेदांग, शास्त्रें इत्यादिक सर्व ब्राम्हणविद्येंत नैपुण्य संपादन केलें. आपल्या गुरूची आज्ञा घेऊन तो देशाटन करण्यास निघाला व फिरत फिरत एका शहराजवळ धर्मशाळेंत येऊन उतरला. तेथें त्यानें एक मनुष्य कावडींतून आंबे घेऊन शहरांत विकावयासाठीं जात असलेला पाहिला. या ऋतूंत आंबें असणें शक्य नाहीं असें असतां या मनुष्यानें ते कोठून आणले असावे याबद्दल त्याला फार विस्मय वाटला. पण त्या मनुष्याला कांहीं एक कळूं न देतां त्यानें दुसऱ्या दिवसापासून त्याच्यावर पाळत ठेविली. तो मनुष्य दुसऱ्या दिवशीं अरण्यांत गेला तेव्हां त्याच्या मागोमाग हा तरूण ब्राम्हणहि दडत दडत गेला. त्या मनुष्यानें थोडें पाणी हातांत घेऊन व तोंडाने मंत्रोपचार करून तें एका अंब्याच्या झाडावर शिंपडलें. तात्काळ आंब्याला नवीन मोहोर फुटून पाव अर्ध्या घटकेच्या आंत उत्तम परिपक्व आंबे तयार होऊन मेघधारेप्रमाणें आंब्याच्या झाडावरून खालीं पडूं लागले. तेव्हां त्या माणसानें आपली कावड भरून घेतली व तो परत शहरांत आला. तरूण ब्राह्मणहि त्याच्या मागोमाग शहरांत आला. आंबे विकून झाल्यावर तो मनुष्य जवळच्या चांडालग्रामांत आपल्या घरीं गेला. हाहि त्याच्या मागोमाग त्या घरीं गेला. एवढें मंत्रसामर्थ्य असलेला मनुष्य जातींने चांडाल आहे याबद्दल या तरुणाला वाईट वाटलें. तथापि तो आपल्या मनाशींच म्हणाला, 'चांडाल झाला तरी काय झालें! अशी अमोलिक विद्या संपादन करण्यास आपला अभिमान आड येतां कामा नयें. अग्नि जरी कोणत्याहि काष्ठापासून उत्पन्न झालेला असला तरी तो वंद्यच आहे.'

हा चांडाल बोधिसत्त्व होता. त्याला जरी एवढा अमोलिक मंत्र अवगत झाला होता तरी त्याचा त्यानें दुरुपयोग केला नाहीं व आपली गरिबी आणि जात सोडली नाहीं. या तरूण ब्राम्हणाला आपल्या दाराशीं उभा असलेला पाहून तो आपल्या पत्नीला म्हणाला, "हा तरूण मनुष्य मंत्राच्या आशेनें मजपाशीं आला असला पाहिजे. परंतु त्याच्या मुखचर्येवरून तो मंत्र ग्रहण करण्याला समर्थ नाहीं व यदाकदाचित त्याला सर्व मंत्र नीट अवगत झाला तरी तो त्या सामर्थ्याचा दुरुपयोग करून आपली भंयकर हानि करून घेईल असें चिन्ह दिसतें."

तदनंतर त्या तरुण ब्राह्मणानें बोधिसत्त्वाला आपल्या येण्याचें कारण न सांगता केवळ शुश्रूषेनें गुरूची मर्जी संपादन करून मंत्र शिकावा असा बेत केला व त्या दिवसापासून तो त्या चांडाळाच्या सेवेंत तत्पर राहिला. विशेषतः चांडाळाच्या स्त्रीची त्यानें फार मर्जी संपादन केली. तिच्यासाठीं अरण्यांतून तो लाकडें घेऊन येत असे. स्वयंपाक करीत असे. वस्त्रें प्रावरणें धुऊन आणीत असे. घरांत पाणी भरत असे. याप्रमाणें बराच काल गेल्यावर हा तरूण मनुष्य तेथें येण्यापूर्वी चांडाळ स्त्री गरोदर होती ती पुत्र प्रसवली. आणि त्या मुलाचाहि सांभाळ ह्यालाच करावा लागला. हा तरूण मनुष्य आपली जात बाजूस सारून सर्वप्रकारें सेवा करण्यास तत्पर असतो हें पाहून बोधिसत्त्वाच्या बायकोला त्याची फार दया आली आणि ती बोधिसत्त्वाला म्हणाली, "याच्या अंगीं मंत्ररक्षणाचें सामर्थ्य असो वा नसो तुम्ही त्याची कींव करून त्याला एकदांचा आपला मंत्र शिकवा."

अनुक्रमणिका

एका रात्रीं आचार्यानें उशीला कांहींतरी आण असें सांगितलें असतां दुसरें कांहीं न मिळाल्यामुळें त्या तरुण ब्राम्हणानें आपल्या मांडीस उशीला दिलें व सर्व रात्र बसून काढली. हें त्याचें गुरुप्रेम पाहून बोधिसत्त्वानें त्याला आपला मंत्र शिकविला आणि बजावून सांगितलें कीं, सत्याचा अपलाप केल्यास हा मंत्र केव्हांच नष्ट होईल.

ब्राह्मणकुमारानें आपण गुरूच्या वचनाप्रमाणें निश्चयानें वागेन असें अभिवचन देऊन निरोप घेतला व तो फिरत फिरत वाराणसीजवळ आला. तेथें आपल्या मंत्रसामर्थ्यानें अकालीं एका जंगलांतील अंब्याला फळें उत्पन्न करून व तीं विकून तो आपला निर्वाह चालवित असे. राजाच्या उद्यानपालानें एके दिवशीं त्याजकडून फळें विकत घेऊन राजाला अर्पण केलीं. ते अकालिक आंबे पाहून राजा चकित झाला व उद्यानपालाला ते कोठून मिळाले याची त्यानें चौकशी केली. अमूक तमूक ब्राह्मणकुमाराकडून ते मिळाले हें समजल्यावर राजानें आपल्या दूताकडून त्याचा पत्ता काढून त्याला बोलावून नेलें आणि आम्रफलांची प्राप्ति कशी झाली इत्यादि प्रश्न विचारले. राजदर्शनानें हा तरुण ब्राह्मण जरा घाबरा झाला आणि आपला मंत्र उघडकीस येईल या भीतीनें घोटाळ्यांत पडला. शेवटीं राजानें अभिवचन दिल्यावर मंत्रसामर्थ्यानें आंबे तयार करतो ही गोष्ट त्यानें कबूल केली. तेव्हां राजा त्याला म्हणाला, "भो कुमार, तूं आजपासून माझ्याच आश्रयाला रहा व मला लागतील तेव्हां आंबे तयार करून दे."राजाच्या आदरसत्काराला भूलून जाऊन त्यानें राजाश्रय धरिला व तेव्हांपासून राजाच्या मनाला येईल त्यावेळीं फळें उत्पन्न करून तो राजाला देऊं लागला.

एका उत्सवप्रसंगीं राजानें सर्व नागरिकांनी तरुण ब्राह्मणाचें मंत्रसामर्थ्य पहाण्यासाठीं राजाच्या बागेंत जमावें अशी शहरांत दौंडी पिटून जाहीर केले. तरुण ब्राह्मणानें नेमलेल्या वेळीं सर्व लोकांसमक्ष अभिमंत्रण केलेलें पाणी एका अंब्याच्या झाडावर फेकून कांहीं पळांत उत्तम आंबे उत्पन्न केले. त्यावेळीं सर्व लोकांनीं'साधु, साधु' अशा शब्दांनीं त्याचा जयघोष केला. राजानें आपल्या उजव्या हाताला आसन देऊन त्याचा बहुमान केला आणि त्याला असा प्रश्न विचारिला कीं, हा मंत्र तूं कोणत्या आचार्यापासून ग्रहण केलास? एवढ्या मोठ्या पदावर आरूढ झाल्यामुळें तो तरुण ब्राह्मण आपल्या चांडाळ गुरूला विसरला. नव्हे, त्याला त्याचें नांव सांगण्याची अत्यंत लाज वाटूं लागली. तो म्हणाला, "महाराज, हा मंत्र मी तक्षशिलेंतील एका प्रसिद्ध ब्राह्मण आचार्यापासून शिकलों आहे."

हे शब्द त्याच्या तोंडांतून निघाले न निघाले तोंच मंत्राक्षराची स्मृति नष्ट होऊन मंत्र लुप्त झाला. मनांतल्या मनांत तो अत्यंत खिन्न झाला. तथापि मानाला भुलून गेल्यामुळें आपली भयंकर हानि त्यानें कोणाला उमगूं दिली नाहीं. काहीं दिवस राजानें केलेल्या बहुमानाचा यथेच्छ उपभोग घेतल्यावर खरी गोष्ट बाहेर पडण्याची वेळ आली. एके दिवशीं राजाला आंबे खाण्याची लहर लागल्याबरोबर तो याला घेऊन उद्यानांत गेला व एका अंब्याच्या झाडाखालीं बसून म्हणाला, "मित्रा, आज आंबे खाण्याची मला फार इच्छा झाली आहे. तेव्हां मंत्राचा प्रयोग करून या क्षणीं कांहीं आंबे तयार कर."

ब्राह्मणकुमारानें पुष्कळ खटपट केली, परंतु बिचाऱ्याला एक अक्षर देखील आठवेना. पण राजाला ही गोष्ट कळूं न देतां तो म्हणाला, "महाराज, आज नक्षत्रयोग नीट जुळत नाहीं व त्यामुळें आंबे तयार करिता येतनाहींत. पुनः योग्य मुहूर्त सांपडल्याबरोबर मी आंबे तयार करून आपणास अर्पण करीन."

राजानें यांत कांहीं लबाडी आहे हें तेव्हांच ताडलें आणि तो म्हणाला, “हे तरूण ब्राह्मणा, यापूर्वी पुष्कळ वेळां तूं आंबे तयार केलेस पण नक्षत्राची सबब कधींही पुढें केली नाहींस. तेव्हां आज यांत कांहींतरी लबाडी आहे हें स्पष्ट दिसत आहे.”

राजाला ठकविणें शक्य नाहीं असें जाणून ब्राह्मणकुमार म्हणाला, “महाराज, माझा मंत्रगुरू चांडाल असतां अभिमानाला वश होऊन मी सर्वलोकांसमक्ष खोटें बोललों व त्यामुळें माझा मंत्र अंतर्धान पावला.”

राजा म्हणाला, “एरंड, निंब वगैरे झाडांपासून जर कोणाला मध मिळाला तर त्यानें त्याच वृक्षाला श्रेष्ठत्व दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें कोणत्याहि जातीच्या मनुष्यापासून जर आपण विद्या शिकलों तर त्याला गुरू म्हणण्यास लाजतां कामा नये.”असें बोलून राजा आपल्या नोकराकडे वळून म्हणाला, “या नीच माणसाला धक्के मारून बाहेर हाकून द्या. उत्तमार्थाचा लाभ झाला असतां यानें गर्वानें फुगून जाऊन आणि खोटें बोलून तो आपल्या हातचा गमावला आहे. तेव्हां याला येथून घालवून देणें हेंच योग्य आहे.”

याप्रमाणें राजाकडून अर्धचंद्र मिळाल्यावर तो तरूण शोकानें अत्यंत संतप्त होऊन इतस्ततः भटकत फिरूं लागला. शेवटीं पुनरपि आपल्या चांडाळ गुरूला शरण जाऊन पुनः मंत्रप्राप्ति होत असल्यास पहावी अशा बेतानें तो गुरू रहात असलेल्या चांडाळग्रामाला आला.

त्याला पाहिल्याबरोबर बोधिसत्त्व आपल्या भार्येला म्हणाला, “अग पाहिलेंस काय, हा तरूण मनुष्य मंत्रभ्रष्ट होऊन पुनः परत येत आहे.”कुमारानें आचार्याला पाहिल्याबरोबर साष्टांग प्रणिपात केला. व कुशलादिक प्रश्न विचारण्यांत येऊन आचार्यानें एकाएकीं येण्याचें कारण काय असें विचारल्यावर तो म्हणाला, “समान भूमिभाग असें समजून कड्यावरून खालीं उडी टाकावी किंवा दोरीचा भास होऊन काळसर्पाच्या शेंपटीवर पाय द्यावा किंवा अंधानें जळती ज्योत कवटाळावी तद्वत् मी आपल्या आज्ञेचें उल्लंघन करून भयंकर अपराध केला आहे. तथापि या सर्व पापांची क्षमा करूनआपल्या पदरीं घ्यावें अशी माझी विनवणी आहे. केवळ अभिमानानें खोटें बोलल्यामुळें माझ्या मंत्राचा नाश झाला आहे व तो पुनः प्राप्त करून देणें हें आपल्यावाचून दुसऱ्या कोणालाहि शक्य नाहीं. वाराणसींतील नागरिकांसमोर आणि राजासमोर मी आपलें प्रत्याख्यान केलें याची मला क्षमा करा.”

बोधिसत्त्व म्हणाला, “धर्माला अनुसरून तुला मी मंत्र शिकविला. तूंहि धार्मिक बुद्धीनेंच त्याचें ग्रहण केलेंस. परंतु ज्या अर्थी सर्व राज्यसभेंत खोटें बोलून आणि गुरूचें प्रत्याख्यान करून तूं आपला अमोलिक मंत्र गमाविलास त्याअर्थी सद्धर्माला तूं मुकलास व अधार्मिक बनल्यामुळें पुनः मंत्रग्रहण करण्याला तूं अपात्र झाला आहेस. अशा तुला मंत्राचा उपदेश केला असतां मीहि निंद्य ठरेन म्हणून मजपासून कांहींएक अपेक्षा न करितां तूं येथून चालता हो.”

गुरूच्या या भाषणानें अत्यंत निराश होऊन तो ब्राह्मणकुमार मोठ्या अरण्यांत शिरला व तेथें अन्नपाणी वर्ज्य करून त्यानें देहत्याग केला.

——***——

अनुक्रमणिका

१३८. राजाशीं सलगी करूं नये. (४७६)

(जवनहंसजातक नं. ४७६)

शरदृतूमध्यें चित्रकूटपर्वतावरील कांहीं हंस वाराणसीला आले. त्या सुंदर प्राण्यांला पाहून वाराणसीचा राजा मोहित झाला आणि मोठ्या प्रेमानें त्याला त्यानें पुष्कळ गोड पदार्थ चारले.

पुढें वर्षाकाळ समीप आल्यावर पुनः ते चित्रकूटपर्वतावर जाण्यास निघाले. तेव्हां राजानें त्यांला वाराणसींतच रहाण्यास आग्रह केला. परंतु ते म्हणाले, "महाराज, आमच्या राजाची आम्हास रहाण्यास परवानगी नाहीं. व राजाज्ञेवाचून आम्हांला वर्षाकालीं बाहेर रहातां येत नाहीं."

हंसपक्ष्यांत देखील राजा असतो हें ऐकून राजाला अधिक जिज्ञासा उत्पन्न झाली आणि तो म्हणाला, "तुमच्या राजाचा कारभार कसा काय असतो?"

त्या जन्मीं बोधिसत्त्व चित्रकूटपर्वतावरील हंसांचें राज्यपद पावला होता. आणि आपल्या सर्व बळाचा उपयोग तो हंसजातीच्या कल्याणार्थ करीत असे. वाराणसीला आलेल्या त्या हंसांनीं आपल्या राजाचें अत्यंत सुरस शब्दांनीं इत्थंभूत वर्णन केलें. व त्याचा वाराणसीच्या राजावर असा परिणाम झाला कीं तो बोधिसत्त्वाच्या दर्शनाला फार उत्सुक झाला.

आपल्या राजाला एकदां येथें घेऊन यावें अशी त्यानें त्या हंसांची विनवणी केली. तेव्हां ते म्हणाले, "महाराज, आपला निरोप आमच्या राजेसाहेबांला सांगूं व थोडक्या दिवसांसाठीं तरी येथें येण्यासाठीं त्यांचें मन वळवूं."असें सांगून राजाचा निरोप घेऊन ते हंस चित्रकूटपर्वतावर गेले. व वाराणसी राजाचा निरोप त्यांनीं हंसराजाला कळविला.

त्यांच्या आग्रहास्तव वर्षाकाळ संपल्यावर बोधिसत्त्व त्यांपैकीं कांहींजणांना बरोबर घेऊन वाराणसीला राजोद्यानांत येऊन उतरला. हंसांनीं आपले हंसभूपति उद्यानांत आले आहेत अशी वाराणसी राजाला वर्दी दिली. तेव्हां मोठ्या लवाजम्यानिशी राजा उद्यानांत जाऊन बोधिसत्त्वाची भेट घेता झाला.

कुशलप्रश्नादिक झाल्यावर तो म्हणाला, "हे हंसराज, तुझे गुण ऐकूनच मी तुझ्यावर प्रसन्न झालों होतों. आतां तर प्रत्यक्ष तुझी भेट होऊन तुझ्याशीं संवाद करण्याची सुसंधि मला प्राप्त झाली आहे. आतां माझी तुला अशी विनंति आहे कीं, तूं सर्वकाल आमच्या या विख्यात नगरींत वास करावा. कां कीं, तुझ्यासारख्या गुणी प्राण्याला हेंच स्थान योग्य आहे."

हंसराजा म्हणाला, "महाराज, आपली ही गुणग्राहकता पाहून मला फार आनंद होतो. राज्यपदावर आरूढ झालेल्या व्यक्तींत अशी गुणग्राहकता असणें हें लोकांचें मोठें भाग्य होय. परंतु आपलें प्रेम कायमच टिकेल याचा नेम काय? एखादेदिवशीं मद्यप्राशनांत गुंग होऊन आपण असा हुकूम द्याल कीं, हंसराजाला मारून चांगलें पक्वान्न तयार करा."

अनुक्रमणिका

राजा म्हणाला, “मित्रा, जर माझा तुला विश्वास पटत नसेल तर तूं येथें असेपर्यंत मी मद्यपान करणार नाहीं अशी शपथ वहातो. परंतु तूं मला सोडून जाऊं नको.”

बोधिसत्त्व म्हणाला, “सिंहशृगालादिक पशूंचें हृद्‌गत ताबडतोब ओळखतां येतें. परंतु मनुष्याचें हद्‌गत जाणण्याचें काम अत्यंत कठीण आहे. त्यांतहि राज्यपदावर आरूढ झालेला मनुष्य कधीं बदलेल याचा नेम सांगतां येत नाहीं. म्हणून कृपा करून मला आपणाशी निकट संबंध ठेविण्याविषयीं आग्रह करूं नका.”

राजा म्हणाला, “तुझ्यासारख्या सूज्ञ प्राण्यानें मित्राच्या नम्र विनंतीचा अव्हेर करावा ही किती खेदाची गोष्ट आहे बरें! मी इतकें विनवलें असतां तुला माझी दया येऊं नये याचें मला आश्चर्य वाटतें.”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, याचें कारण असें आहे कीं, माझ्यापासून आपला कोणताही कार्यभाग खोळंबणार नाहीं. परंतु मी अत्यंत निकट असल्यानें मात्र आपण बराच वेळ माझ्याशी घालवाल व तेणेकरून प्रजाहितांत व्यत्यय आणाल.

बरें माझा तरी येथें राहिल्यामुळें विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं. अतिपरिचयानें लौकरच माझ्याहातून आपली अवज्ञा होण्यास प्रारंभ होईल व त्यायोगें मला पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येईल. म्हणून जोपर्यंत माझा व आपला प्रेमाचा संबंध आहे तोपर्यंतच येथून निघून जावें हें योग्य आहे. जर मी जगलों तर मधून मधून आमची भेट होईल व अतिपरिचय न घडल्यामुळें आमचें प्रेमहि कायम राहील.”

असें बोलून हंसराजा आपल्या परिवारासह तेथून उडून चित्रकूट पर्वतावर गेला. त्याच्या उपदेशानें वाराणसीचा राजाहि जागृत बुद्धीनें वागून प्रजाहिततत्पर झाला व राजावर विश्वास टाकूं नये या म्हणीला आपण अपवाद आहे असें त्यानें कृतीनें दाखविलें.

——***——

अनुक्रमणिका

१३९. योग्य व्यक्तीशींच याचना करावी. (४७८)

(दूतजातक नं. ४७८)

आमचा बोधिसत्व एका काळीं ब्राह्मणकुलांत जन्मला होता. तारुण्यांत तक्षशिलेला जाऊन वेद-वेदांग, शास्त्र इत्यादिकांचें त्यानें उत्तमप्रकारेंअध्ययन केलें. परंतु घरच्या दारिद्र्यामुळें समग्र गुरुदक्षिणा त्याला देतां आली नाहीं. सात मोहरा देणें बाकी राहिलें. तेव्हां गुरूची आज्ञा घेऊन गुरुदक्षिणा मिळविण्यासाठीं तो फिरत फिरत वाराणसीला आला.

त्याकाळचा वाराणसीचा राजा फारच द्रव्यलोभी होता. असें सांगतात कीं, प्रजेच्या हातीं त्यानें एक देखील सोन्याचें नाणें राहूं दिलें नाहीं. या निष्कांचन देशांत बोधिसत्त्वानें मोठ्या प्रयासानें सात मोहरा गोळा केल्या. परंतु गंगा उतरून वाराणसीला येत असतां होडी एकाएकी पालथी होऊन त्याच्या त्या मोहरा पाण्यांत पडल्या. बोधिसत्त्वानें आपला जीव मोठ्या प्रयासानें बचाविला व तो नदीच्या काठाला आला.

आतां त्याला अशी विवंचना झाली कीं, या निर्द्रव्य प्रदेशांत पुनःसात मोहरा मिळवाव्या कशा? इतक्यांत त्याला एक युक्ति सुचली व शहराजवळील नदीकाठीं वाळवंटांत तो तसाच उपोषित बसला. पुष्कळ नागरिकांनीं येऊन अन्नग्रहण करावें अशी त्याला विनंती केली. परंतु तो कांहीं बोलेना कीं चालेना. असा असा एक ब्राह्मणकुमार नदीकाठीं बसून उपोषणानें त्रागा करण्यास सिद्ध झाला आहे हें वर्तमान हां हां म्हणतां राजाच्या कानापर्यंत गेलें आणि राजानें गडबडून जाऊन आपल्या अमात्यांना त्याच्या चौकशीस पाठविलें.

त्यांनीं जाऊन बोधिसत्त्वाला नानाप्रकारें प्रश्न विचारिले. परंतु काहीं एक उत्तर न देतां तो तसाच बसून राहिला. हें वर्तमान अमात्यांनींराजाला कळविलें तेव्हां राजा चिंताक्रांत झाला व स्वतःच बोधिसत्त्वाच्या दर्शनाला गेला, आणि वंदन करून म्हणाला, “भो ब्राह्मणकुमार, तूं याठिकाणीं प्रायोपवेशन (मरण्याचा नेम) करून बसला आहेस व त्याचें कारण काय हें कोणाला सांगत नाहींस. तुझ्यावर आलेलें संकट असेंच कांहीं आहे कीं तें कोणालाच सांगतां न यावें?”

बोधिसत्त्व म्हणाला, “महाराज, जर आपल्यावर संकट आलें तर तें अशा मनुष्याला सांगावें कीं तो त्या संकटाचें निरसन करूं शकेल. परंतु जो मनुष्य भलत्याच मनुष्याला आपल्या दुःखाची कहाणी सांगतो त्याची फजीति होते, त्याचे शत्रू खूष होतात व मित्रांना त्याच्या या मूर्खपणापासूनखेद होतो. म्हणून योग्यकाळीं आपलें दुःख शहाण्या मनुष्यानें योग्य माणसालाच योग्य शब्दांनीं सांगावें.

आतां आपण माझ्या दुःखाचें निरसन करण्यास समर्थ आहां असे जाणून तें मी आपणास निवेदन करितों. गुरुदक्षिणा देण्यासाठीं मी मोठ्या कष्टानें सात मोहरा मिळविल्या परंतु होडी उलटल्यामुळें त्या गंगेंत पडल्या. आतां पुनः या अकिंचन राष्ट्रांत मोहरा कशा मिळतील व गुरूच्या ऋणांतून मी कसा मुक्त होईन या विवंचनेंत पडल्यामुळें माझा दुःखोद्वेग मला सहन होत नाहीं म्हणून मी प्रायोपवेशन व्रत स्वीकारलें आहे.

अनुक्रमणिका

आपल्या नगरवासी लोकांना किंवा सेवकाला माझें दुःख सांगून कांहीं फायदा झाला असता असें नाहीं. कां कीं, ते सर्व निष्कांचन आहेत हें मला ठाऊक आहे. ह्या राज्यांत जो कांहीं सुवर्णसंचय आहे तो आपल्या पाशींच आहे आणि म्हणून आपण या संकटसमयीं मला मदत करूं शकाल. यदाकदाचित् माझी याचना निष्फळ झाली तरी त्याचें मला वाईट वाटणार नाहीं. कां कीं, मी योग्य पुरुषापुढेंच हात पसरला आहे."

बोधिसत्त्वाच्या भाषणानें राजा प्रसन्न झाला व त्याला त्यानें एकदम चौदा मोहरा देण्याचा हुकूम केला. राजाला आपल्या द्रव्यलोभाबद्दलहि वाईट वाटलें व तेव्हांपासून आपले लोक संपत्तिमान् कसे होतील याची तो काळजी वाहूं लागला.

——***——

अनुक्रमणिका

१४०. एका राजाची कृतज्ञता. (४८३)

(सरभमिगजातक नं. ४८३)

एकाकाळीं वाराणसीचा तरुण राजा शिकारींत फार प्रवीण होता. आपल्या परिवाराला बरोबर घेऊन एके दिवशीं तो एका महारण्यांत शिकारीस गेला. तेथें आमचा बोधिसत्त्व शरभ मृगाच्या पोटीं जन्माला येऊन स्वेच्छ संचार करीत असे. राजा आपल्या समुदायाला म्हणाला, "आपण येथें एका जंगलाच्या भागाला वेढा देऊं व ज्याच्या जवळून मृग पळून जाईल त्याची सर्व मिळून फजीति करूं."

परंतु राजाच्या शिकारी लोकांनीं या प्रसंगीं धन्याचीच फजीति करण्याचा घाट घातला. त्यांनीं असा बेत केला कीं, सगळ्यांनीं मिळून एखाद्या मोठ्या झुडुपाला वेढी द्याव्या व मृग सांपडला असता त्याला राजा असेल त्याच बाजूनें पळवून लावावें.

कर्मधर्मसंयोगाने त्यानें वेढिलेल्या झुडपात आमचा बोधिसत्त्व सांपडला व जेथून अवकाश सांपडला तेथून तो वातवेगानें पळत सुटला. त्याचा वेग इतका होता कीं, राजानें मारलेल्या अनेक बाणांपैकीं एकानेंहि त्याच्या अंगाला स्पर्श केला नाहीं. अशा रीतीनें मृग आपल्या हातून निसटला हें पाहून राजा लज्जित झाला व आपल्या लोकांकडून होणारी फजीति टाळण्यासाठीं पायीच त्याच्या मागोमाग पळत सुटला.

बोधिसत्त्वाला अरण्यांतील सर्व बिकट स्थानें आणि मार्ग अवगत होते. तो नागमोडी गतीनें पळत सुटला व एका तृणाच्छादित भयंकर चिखलाच्या डबक्याजवळ येऊन त्याला वळसा घालून तसाच पुढें चालला. राजाला डबक्याची माहिती नसल्यामुळें तो त्यावर उगवलेल्या हिरव्या गवतावरून अतिवेगानें धावत असतां त्यांत रुतला. गळ्यापर्यंत देह चिखलांत बुडाल्यामुळें राजाला डबक्यांतून बाहेर येणें अशक्य होतें. आपले शिकारी लोकहि फार दूर राहिल्यामुळें मदतीला येतील ही आशा त्याला राहिली नाहीं. तेव्हां मरणाशिवाय दुसरी गति नाहीं असें वाटून तो अत्यंत हताश झाला.

बोधिसत्त्वानें राजाकडे मागें वळून पाहिलें तेव्हां त्याला राजाची विपन्नावस्था कळून आली व तो आपल्या मनाशींच म्हणाला, "हा राजा जरी मला मारण्याच्या बेतांत होता, जरी यानें माझें अकारण वैर केलें तरी अशा संकटसमयीं त्याला मदत करणें माझें कर्तव्य होय. हा जर जगला तर आपल्या प्रजेचें योग्य मार्गानें पालन करून पुष्कळ लोकांचें कल्याण करील."

असा विचार करून बोधिसत्त्व त्या डबक्याच्या काठीं आला आणि राजाला म्हणाला, "महाराज, तुम्ही माझ्यासारख्या निरपराधी प्राण्याला विनाकारण मारूं पहात होता व जणूं काय तुमच्या कर्माचें फळ म्हणूनच तुम्ही या डबक्यांत सांपडला. परंतु तुमची ही विपन्नावस्था पाहून माझ्यानेंपुढें जाववेना. तुम्ही माझें वैर केलेंत तें मी मैत्रीनें फेडीत आहे, त्याचा स्वीकार करा व मी माझें पुच्छ तुमच्या हातीं येईल असें करितों. त्याला धरून या कर्दमांतून बाहेर निघा."

राजा मृगपुच्छाच्या सहाय्यानें त्या कर्दमरूपी वैतरणीतून मोठ्या कष्टानें बाहेर पडला. बराच वेळ चिखल तुडवण्यांत घालविल्यामुळें तो फार श्रांत झाला होता व आपण कोणत्या दिशेनें आलों याचें देखील त्याला भान राहिलें नाहीं. तो क्षणभर निश्चेष्ट होऊन पडला व पुनः थोडा भानावर येऊन बोधिसत्त्वाला

म्हणाला, “भो मृगराज, तूं मोठा कारुणिक आहेस. तूं मला जर माझे लोक आहेत तें ठिकाण दाखवशील तर मला या पंकांतून उद्धरल्याचें सार्थक होईल. नपेक्षां या जंगलांत भटकतां भटकतां क्लांत होऊन मी मरण पावेन.”

बोधिसत्त्वानें त्याला आपल्या पाठीवर बसवून सन्याच्या जवळ आणून सोडिलें व सैन्याला कळूं न देतां तो पुनः जंगलांत शिरला. राजानेंहि घडलेली गोष्ट कोणाला कळूं दिली नाहीं. तथापि, राजधानींत सुखरूप पोहोंचल्यावर पहांटेला उठून तो नित्य बोधिसत्त्वाचें व त्याच्या करुणामय वर्तनाचें पद्यबंधनानें स्तवन करीत असे.

एके दिवशीं त्याचा पुरोहित कांहीं कामानिमित्त पहांटेला राजवाड्यांत आला होता व राजा आपल्या शयनमंदिरांतून बाहेर येण्याची तो वाट पहात उभा राहिला होता. इतक्यांत शरभमृगाच्या करुणामय कृत्याचें राजानें केलेलें स्तवन पुरोहिताच्या कानीं पडलें व राजा शयनमंदिरांतून बाहेर आल्यावर तो म्हणाला, “महाराज, प्रातःकालीं आपणावर उपकार करणाऱ्या शरभमृगाची आठवण झाली काय?”

राजा म्हणाला, “ही गोष्ट तुम्हास कशी समजली? अरण्यांत तुम्ही लपून घडलेला प्रकार पाहिला कीं काय? किंवा तुम्हाला एखादी देवता प्रसन्न असली पाहिजे, अथवा दुसऱ्याचें चित्त जाणण्याचें तुम्हास सामर्थ्य असलें पाहिजे.”

पुरोहित म्हणाला, “यापैकीं कांहीं नाहीं. आपण केलेलें मृगराजाचें स्तवन ऐकून घडलेल्या प्रकाराचें मला अनुमान करतां आलें.”

राजानें इत्थंभूत वर्तमान पुरोहिताला सांगितलें तेव्हां राजाच्या कृतज्ञतेची कसोटी पहाण्याविषयीं पुरोहिताचें मन अत्यंत उत्सुक झालें. त्याला इंद्र प्रसन्न होता अशी आख्यायिका आहे.

एके दिवशी राजाबरोबर तोहि शिकारीस गेला व इंद्राच्या सामर्थ्यानें त्यानें शरभमृगाला राजाच्या समोर उभे केलें आणि तो राजाला म्हणाला, “महाराज, ज्या मृगानें तुम्हाला दवडींत नेऊन पंकांत पाडलें तो हा मृग समोर उभा आहे. याच्यावर आपलें शरसंधान चालूं करा.”

राजा म्हणाला, “भो ब्राह्मण, हाच तो शरभमृग हें मी पुरें ओळखतों. परंतु ज्याअर्थीं त्यानें मला पंकांतून उद्धरलें त्याअर्थीं त्याच्यावर बाण टाकणें अत्यंत गैरशिस्त आहे असें मी समजतों.”

ब्राह्मण म्हणाला, “महाराज, हा मृग नसून असुर आहे आणि याला मारिलें असतां तूं स्वर्गास जाशील. पण जर अशा वेळीं आपलें कर्तव्य सोडून याच्यावर बाण सोडणार नाहींस तर पुत्रदारांसह तूं यमाच्या वैतरणीप्रत जाशील.”

हें ऐकून राजा म्हणाला, “मी आणि माझें कुटुंब एवढेंच नव्हें तर माझें सर्व राष्ट्र जरी वैतरणीत जाऊन पडलें तरी मला प्राणदान देणाऱ्या या मृगावर मी शरसंधान धरणार नाहीं. त्यानें मला पळवून नेलें हें म्हणणें बरोबर नाहीं. तो केवळ आपला जीव बचावण्यासाठीं पळाला व माझ्या अज्ञानामुळें मी जाऊन पंकांत

अनुक्रमणिका

रुतलों. पण त्यानें शत्रुभाव विसरून जाऊन माझा उद्धार केला ही गोष्ट विसरतां येण्यासारखी नाहीं. आणि जाणून बुजून मी कधींहि कृतघ्न होणार नाहीं."

तें ऐकून पुरोहित म्हणाला, "महाराज, तूं हें राज्य चिरकाल कर व पुत्रदारासह सदोदित तुझी अभिवृद्धि असो आणि याप्रमाणें सर्वदैव कृतज्ञताधर्म पालन करून व न्यायनीतींने राज्य चालवून सर्व अतिथींचा योग्य मान ठेवून मरणोत्तर स्वर्गवास संपादन कर."ब्राह्मणानें असा आशीर्वाद दिल्यावर इंद्रहि तेथें प्रगट झाला व त्यानें राजाची प्रशंसा करून त्याला आशीर्वाद दिला.

——***——

अनुक्रमणिका

१४१. एका पोपटाची देवघेव. (४८४)

(सालिकेदारजातक नं. ४८४)

आमचा बोधिसत्त्व मगधराष्ट्रांत एका सावरीच्या अरण्यांत एका जन्मीं पोपट होऊन रहात असे. त्याचा बाप सर्व पोपटांचा राजा होता. परंतु वृद्धपणामुळें त्यानें सर्व राज्यकारभार बोधिसत्त्वाच्या स्वाधीन केला. बोधिसत्त्वहि मोठ्या उत्साहानें सर्व कारभार चालवून लौकरच शुकसमुदायाला अत्यंत प्रिय झाला. तथापि राज्यमदानें तो आपल्या मातापितरांना विसरला नाहीं. शुकसंघाला घेऊन चरावयाला गेला असतां तेथून येताना दाण्यांनीं भरलेलीं कणसें बरोबर आणून वृद्ध मातापितरांचें, पिलांचें आणि अंध पंगु इत्यादिकांचें तो यथायोग्य पालन करीत असे.

एके दिवशीं तो आपल्या शुकगणाला बरोबर घेऊन मगध देशांत एका भाताच्या शेतांत येऊन उतरला व तेथें यथेच्छ दाणे खाऊन कांहीं कणसें बरोबर घेऊन पुनः शाल्मलीवनांत आला. हा प्रकार दोन तीन दिवस सारखा चालला होता. तें शेत एका कौशिकगोत्री ब्राम्हणाचें होतें, व त्यानें कांहीं दाणे देण्याच्या करारानें एक माणूस तें राखण्यासाठी ठेविला होता. त्या माणसानें पोपटांना आरडाओरडीनें दगड वगैरे फेकून पळविण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण यश आलें नाहीं. तेव्हां ब्राम्हण आपणाकडून शेताचें पीक वसूल करून घेईल या भयानें तो त्याच्या घरीं गेला.

त्याला पाहिल्याबरोबर ब्राम्हण म्हणाला, “कायरे बुवा?शेताचें सर्व कांहीं ठीक चाललें आहे?” तो म्हणाला, “इतर गोष्टींत सर्व बरें चाललें आहे. पण एकाच गोष्टीचें भय वाटत आहे. पुष्कळसे पोपट येऊन शेत खात आहेत आणि त्यांपैकीं सर्वांत सुंदर असा एक पोपट बरींच कणसें चोचींतून रोज पळवून नेत आहे.”

ब्राम्हण म्हणाला, “एवढी गोष्ट मला सांगण्याला कां आलास? पाश घालून त्यांपैकीं कांहीं पक्ष्यांला विशेषतः त्या सुंदर पक्ष्याला पकडून माझ्या जवळ घेऊन यावयाचें होतेंस की नाही!”

धन्याच्या या रागावण्यानें तो बिचारा गडी खजील झाला व दुसऱ्या दिवशीं त्यानें बोधिसत्त्वाच्या चरण्याच्या ठिकाणीं पाश मांडूनठेविला. कर्मधर्मसंयोगानें बोधिसत्त्व त्या जाळ्यांत सांपडला. इतर पक्ष्यांला त्यानें जवळ येऊं दिलें नाहीं. व दाणे खाऊन झाल्यावर त्यांना तेथून पळून जाण्याची इशारत दिली. त्या गड्यानें त्याला नेऊन ब्राह्मणाच्या हवाली केलें. तेव्हां कौशिकब्राह्मण म्हणाला, “बा शुका, माझ्या शेतांतले दाणे खातोस, एवढेंच नव्हे तर कणसेंहि पळवून नेतो तें कां? इतर पोपटांपेक्षां तुझें पोट तरी मोठें असलें पाहिजे किंवा मनुष्याप्रमाणें कोठेंतरी तूं धान्याचें कोठार केलें असलें पाहिजे. अथवा माझ्या वैरानें माझ्या कणसाची तूं विनाकारण नासाडी करीत आहेस असें म्हणावें लागेल.”

बोधिसत्त्व म्हणाला, “तुम्ही म्हणतां तसा मजकूर नाहीं. मी जीं कणसें नेत असतों त्यांनीं माझी सर्व देवघेव चालते. म्हणजे कांहीं मी कर्जादाखल देत असतों. कांहीं कर्ज फेडण्याकडे लागतात व कांहींचें मूल्य माझ्या तिजोरींत जातें.”

अनुक्रमणिका

पोपटाची ही देवघेव ऐकून कौशिक ब्राह्मण विस्मित झाला आणि म्हणाला, “ही सगळी देवघेव कोणत्या प्राण्यांशीं चालते व तिजोरी कशा प्रकारची आहे हें मला सांग.”

बोधिसत्त्व म्हणाला, “ज्यांना पंख फुटले नाहींत अशीं माझीं पिलें आहेत त्यांस मी कांहीं दाणे देत असतों व यालाच मी ऋण असें म्हणतों. कां कीं, माझ्या वृद्धापकाळीं माझे तरुण पुत्र हें ऋण फेडतील अशी मला आशा आहे. माझ्या वृद्ध आईबापांला जे मी दाणे देत असतों त्यालाच कर्जाची फेड असें म्हणतों. आणि जे अंध, पंगू वगैरे दुर्बल पोपट आहेत त्यांच्या निर्वाहार्थ शिल्लक राहिलेले दाणे मी लावीत असतों. त्यांची किंमत माझ्या पुण्यसंचयरूपी तिजोरींत जात असते. म्हणजे या कृत्यानें माझें सुकृतकर्म वाढत असतें. यालाच मी माझी तिजोरी असें म्हणतों.”

पोपटाची बुद्धिमत्ता पाहून ब्राह्मण अतिशय खूश झाला आणि म्हणाला, “माझ्या शेताचा अर्धा हिस्सा मी तुला देऊन टाकतों. त्याचा यथेच्छ उपभोग घे व वेळोवेळीं मला भेटत जाऊन चांगला उपदेश कर.”

पण बोधिसत्त्वानें शेतांपैकीं कांहीं बिघे स्वीकारले. व आपल्या अनुयायांना तेवढ्यावरच तृप्ति करण्याची आज्ञा केली. इतस्ततः नासाडी न झाल्यामुळें ब्राह्मणालाहि त्या शेतांत चांगलें पीक मिळालें.

——***——

अनुक्रमणिका

१४२. संगतीचें फळ. (५०३)

(सत्तीगुंबजातक नं. ५०३)

उत्तर–पांचाल देशांत पांचाल नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला शिकारीचा फार नाद होता. एके दिवशीं मृगाच्या मागें लागला असतां त्याचा रथ सेनेपासून फार दूर अंतरावर गेला. परंतु मृग कांहीं त्याला सांपडला नाहीं.

तेथें कांहीं झोपड्या त्याच्या दृष्टीस पडल्या. तो फार थकून गेल्यामुळें जवळच्या एका झाडाखालीं रथांतील आसन ठेवावयास लावून त्यावर राजा निद्रित झाला. सारथी त्याचे पाय दाबीत होता. पण राजाला नीज लागली असें पाहून तोहि झोंपी गेला. आपण एकाकी आहोंत या शंकेनें राजाला कांहीं नीट झोंप लागली नाहीं.

त्या झोपड्या चोरांच्या होत्या. सर्व चोर आपल्या उद्योगासाठीं गेले होते. त्यांचा स्वयंपाकी तेवढा झोपडींत होता. व त्यांनी बाळगलेला एक पोपटहि तेथें होता. राजाला निद्रिस्त पाहून तो स्वयंपाक्याला म्हणाला, “हा पहा येथें दुपारच्या वेळीं राजा निद्रिस्त झाला आहे, याला मारून याचे अलंकार काढून घेऊं, ऊठ लवकर. जोंपर्यंत तो जागा झाला नाहीं तोंपर्यंत त्याला व त्याच्या सारथ्याला मारून पाचोळ्यांत लपवून ठेवूं व त्याचीं वस्त्रें प्रावरणें आणि अलंकार आपण घेऊं.”

स्वयंपाकी म्हणाला, “भो मित्रा, उगाच बडबड काय चालविली आहेस? राजाच्या अंगावर हात टाकणें म्हणजे अग्नींत प्रवेश करण्यासारखें आहे.”तें ऐकून पोपटाला फार राग आला व तो म्हणाला, “आमच्या मालकासमोर तूं मोठ्या गप्पा ठोकीत होतास. इतकेंच नव्हे दारू पिऊन तूं आमच्या मालकिणीचाही उपमर्द केलास. पण आज तुझें सामर्थ्य कोणीकडे गेलें?”

राजा या संवादानें दचकून उठला व सारथ्याला म्हणाला, “बा सारथ्या, येथें हा पोपट विलक्षणपणें बोलतो आहे आणि अशा या अमंगल स्थलापासून दूर जाणें मला अत्यंत इष्ट वाटत आहेः ऊठ लवकर रथ तयार कर.”राजाच्या आज्ञेप्रमाणें सारथ्यानें रथ तयार करून क्षणार्धांत तोवायुवेगानें चालविला. तें पाहून पोपट मोठमोठ्यानें ओरडत सुटला. आमचीं माणसें गेलीं कोठें? हा राजा आमच्या हातीं आला असतांना त्याला लुबाडल्यावाचून आम्ही जिवंत जावूं देत आहोंत. कोण हा अपराध! आणि काय हा वेडेपणा!”

या प्रमाणें त्या पोपटाची आरडाओरड चालली असतांना व तो इकडून तिकडून उडत असतांना नदीच्या काठाकाठानें त्या डोंगराला वळसा देऊन सारथ्यानें दूर अंतरावर रथ आणला. तेथें पुनः त्याला कांहीं पर्णकुटिका दिसल्या. घोडे थकून गेल्यामुळें सारथ्यानें कांहीं वेळ रथ उभा केला.

इतक्यांत तेथील सुंदर पोपट(हाच आमचा बोधिसत्त्व होता.)मोठ्या आदरानें राजाला म्हणाला, “महाराज, या आश्रमांत तुमचें स्वागत असो. आमच्या पर्णकुटिकेंत प्रवेश करून जीं काहीं फलमूलें असतील त्यांचा स्वीकार करा. येथील ऋषिगण अरण्यांत कंदमूलादिक पदार्थ गोळा करण्यासाठीं गेले आहेत व मी दुर्बल पक्षी असल्यामुळें माझ्याकडून आपलें आदरातिथ्य यथासांग होणें शक्य नाहीं. म्हणून

आपणाला विनंती करितों कीं, हा आश्रम आपलाच आहे असें समजून येथें असलेल्या फलमूलांचा अंगिकार करा आणि आमच्या झऱ्याचें थंड पाणी पिऊन विश्रांति घ्या."

पोपटानें केलेल्या स्वागतानें राजा फारच संतुष्ट झाला आणि सारथ्याकडे वळून म्हणाला, "काय आश्चर्य आहे पहा! हा पोपट कितीतरी सभ्य आहे! किती धार्मिक आहे! आणि किती गोड बोलतो आहे! पण त्याच्याच जातीचा हा दुसरा राघु पहा. मारा, हाणा, बांधा, ठार करा असें ओरडत आमच्या मागें लागला आहे."

बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, आम्ही दोघे एकाच आईच्या उदरांत एकाच काळीं जन्मलेले भाऊ आहोंत. आमच्या बालपणीं आम्ही या जवळच्या पर्वतावर घरट्यांत रहात असतां भयंकर तुफान होऊन घरटें खालीं पडलें. आम्ही दोघे उडण्याचा प्रयत्न करीत असतां मी या बाजूला व तो त्या बाजूला जाऊन पडला. चोरांनीं त्याला सत्तीगुंभ असें नाव देऊन आपल्या झोंपड्यांत पाळलें. पुष्पक असें नाव ठेवून येथील ऋषिंनीं माझा सांभाळ केला.

यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, माझ्या भावाचा कांहीं अपराध नाहीं. किंवा माझा स्वतःचाहि हा विशेष गुण आहे असें नाहीं. केवळ सहवासाचें हें फळ होय.

चोरांच्या पर्णकुटिकेंतून मारामारी, खून, बांधणे, ठकविणें, लुटालूट इत्यादि गोष्टीच त्याच्या कानीं येत असल्यामुळें त्याच तो शिकत आहे. आणि इकडे सत्य, धार्मिकपणा, अहिंसा, संयम, दम, अतिथीचा सत्कार इत्यादि गोष्टी मी ऐकत आहें आणि पहात आहें. व अशा लोकांच्या सहवासांत मी वाढलेला आहे आणि म्हणून अशाच गोष्टी शिकत आहे.

महाराज, या गोष्टीपासून तुम्हीही बोध घेतला पाहिजे. तो असा कीं, संगतीनें मनुष्य बरा किंवा वाईट होत असतो. कुजलेले मासे दर्भांत गुंडाळले तर दर्भालाहि घाण येत असते. तींच सुवासिक फुलें पळसाच्या पानांत गुंडाळलीं तर पळसालाहि चांगला वास येतो. म्हणून तुमच्यासारख्या थोर पुरुषांनीं खलांचा संसर्ग होऊं न देतां सदोदित सज्जनांच्या संगतींत काल कंठावा."

हा संवाद चालला असतांना आश्रमांतील ऋषि कंदमूलादिक आपल्या चरितार्थाचे पदार्थ गोळा करून तेथें आले. राजानें मोठ्या आग्रहानें त्यांना आपल्या राजधानीला नेलें व तेथें एका रम्य उद्यानांत आश्रम बांधून त्यांची सर्वप्रकारें बरदास्त ठेविली. असें सांगतात कीं, या ऋषींच्या सहवासामुळें राजाच्या कुलांत सात पिढ्यापर्यंत सत्पुरुष जन्माला आले व त्यांनीं आपल्या प्रजेचें पुष्कळ कल्याण केलें.

——***——

अनुक्रमणिका

१४३. सुरेचे परिणाम, सुरापानाचा पूर्वेतिहासव परिणाम. (५१२)

(कुंभजातक नं. ५१२)

प्राचीनकाळीं काशीराष्ट्रांत सुर नावाचा एक वनचर रहात असे. अरण्यांतून नानाविध पदार्थ गोळा करून तो आपली उपजीविका करी. हिमालयाच्या पायथ्यावरील अरण्यांत एक मोठा वृक्ष होता. एक पुरुषउंचीवर त्या झाडाला तीन मोठाल्या शाखा फुटल्या होत्या. व त्यांच्यामध्यें एक मोठाल्या मातीच्या भांड्याएवढी पोकळ जागा होती. जवळपास आवळीचीं, हरड्याचीं वगैरे पुष्कळ झाडें होतीं व त्या वृक्षांवर रहाणारे पक्षी तेथें आणून तें खात असत. त्यांपैकीं कांहीं त्या वृक्षाच्या वळचणींत साठलेल्या पावसाच्या पाण्यांत पडून रहात. हिमालयावर आपोआप उगवलेल्या भाताच्या शेतांतून कणसें आणून पोपट येथें बसून खात असत व त्यांतील कांहीं तांदुळाचे दाणे त्या पाण्यांत पडत. उन्हाळा आल्यावर तें पाणी संतप्त होऊन त्यापासून एक प्रकारचा मादक पदार्थ तयार होत असे. आणि झाडावरील नानाविध पक्षी तो पिऊन कांहीवेळ बेफाम होऊन झाडाखालीं पडून रहात असत.

एके दिवशीं सुर अरण्यांत संचार करीत असतां त्या वृक्षापाशीं आला आणि त्यानें हा सर्व प्रकार पाहिला. प्रथमतः झाडाच्या वळचणींत साठलेलें पाणी विषारी असावें असा त्याला संशय आला. परंतु कांहीं वेळानें तें पिऊन निश्चेष्टित पडलेले पक्षी उठून नाचूं बागडूं लागले. व एकमेकांशीं भांडूं लागले. तें पाहून सुराला त्या पदार्थांत काय गुण आहे हें पहाण्याची उत्कट इच्छा झाली व त्यानें भीत भीत त्यांतील पेलाभर पाणी प्राशन केलें. त्याबरोबर त्याला एकप्रकारची मजेदार गुंगी आली व थोड्या वेळानें अर्धवट ताळ्यावर आल्यावर मांस खाण्याची फार इच्छा झाली. तेथें बेशुद्ध पडलेल्या पक्ष्यांपैकी कांहींना मारून व आपल्या चकमकीनें आग पाखडून त्या आगींत पक्ष्यांना भाजून त्यानें यथेच्छ खाल्लें. व तो नाचूं उडूं लागला.

त्याच अरण्यांत वरुण नावाचा एक तपस्वी रहात असे. सुराची आणि त्याची चांगली मैत्री होती. त्याला सुरानें घडलेला सर्व प्रकार सांगितला आणि द्रोणांतून त्या वळचणींतून थोडें पाणी नेऊन तें त्याला पाजलें व आपणहि प्याला. त्यानंतर दोघांनीं नाचून बागडून मोठा तमाशा केला. वरुण ऋषीच्या अग्निहोत्रांत भाजून तयार केलेलें मांस यथेच्छ खाल्लें. त्या दिवसापासून त्या दोघांनाहि झाडाच्या वळचणींतील पाण्याची इतकी गोडी लागली कीं त्यांनीं तें थोडक्याच दिवसांत आटवून टाकलें. आतां पुढें काय करावें अशी चिंता उपस्थित झाली. वरुण तापसी मोठा हुषार होता. त्यानें त्या झाडाच्या वळचणींत साचलेले पदार्थ नीट तपासून पाहिले व ते पदार्थ स्वतःगोळा करून उन्हाच्या ऐवजीं आगीची आच देऊन त्यांच्यापासून निष्पन्न होणारा मादक पदार्थ स्वतः तयार केला. या नवीन पदार्थांत पूर्वीच्या पदार्थाहून त्याला अधिक गुण आहे असें दिसून आलें आणि निरनिराळे प्रयोग करून त्यांनीं शोधून काढलेल्या या नवीन पेयांत बरीच सुधारणा केली.

इतकें सर्व झाल्यावर वरुण सुराला म्हणाला, “भो मित्रा, आम्ही मोठ्या प्रयत्नानें हें नवीन पेय शोधून काढलें आहे. तें जर लोकांना कळूं न देतां आमच्या बरोबरच नष्ट झालें तर त्यापासून जगाची किती हानि होईल बरें! क्षणभर मिळणाऱ्या ब्रह्मानंद सुखाला किती लोक मुकतील? तेव्हां आम्ही मोठमोठाल्या शहरांत जाऊन आमचा हा शोध तेथील नागरिकांना सांगूं व त्यापासून त्यांचें व आमचें अनंत कल्याण करूं.”

अनुक्रमणिका

सुरालाहि अरण्यवासाचा बराच कंटाळा आला होता. तेव्हां त्याला आपल्या मित्राचें म्हणणें फार पसंत पडलें. व ते दोघे एका हिमालयाच्या पायथ्यापासून जवळ अंतरावर असलेल्या शहरांत आले आणि वेळूच्या नळकांड्यांतून बरोबर आणलेलें पेय त्यांनीं तेथील राजाला नजर केलें.

राजानें त्यांनीं सांगितलेल्या प्रमाणानें त्याचा उपयोग केल्यावर तो क्षणभर ब्रह्मानंदांत तल्लीन झाला व त्याला या पेयाची फार चटक लागली. परंतु नळकांड्यांतून आणलेलें ते किती दिवस पुरणार! त्यांत सुराला आणि वरुणालाहि त्या पेयावाचून चैन पडत नसे. तेव्हां एक दोन दिवसांत सर्व पेय खलास झालें असल्यास नवल नाहीं.

परंतु राजाश्रम चांगला मिळाल्यामुळें सुराला आणि वरुणाला मोठा उत्साह आला व हा धंदा त्यांनीं मोठ्या प्रमाणांत सुरू करण्याचें आरंभिलें. राजाकडून मोठमोठालीं मातीचीं मडकीं मागविलीं व त्या पेयाच्या तयारीला लागणारें तांदळाचें पीठ, हरडे वगैरे पदार्थ राजाच्या कोठारांतून घेऊन त्यापासून निरनिराळ्या प्रकारची दारू तयार केली. प्रथमतः हें पेय सुरानें पाहिलें म्हणून त्याला सुरा हें नाव देण्यांत आलें आणि वरुणानें तें कशा उपायांनी बनवितां येईल याचा शोध लाविला म्हणून त्याला वारुणी असें म्हणूं लागले.

या सुरेचा किंवा वारुणीचा त्या शहरांतील लोकांवर थोडक्या कालांत विलक्षण परिणाम घडून आला. लोकांचीं धान्याचीं कोठारेंमुलाबाळांच्या उपयोगी पडण्याऐवजी वरुणतपस्व्याच्या भट्टींत जाऊं लागली. व तेथें उत्पन्न झालेल्या वारुणीनें सर्व लोक मदोन्मत होऊन आपला धंदा सोडून मारामारी, शिवीगाळ, अभद्र भाषण वगैरे करण्यांत गुंतून गेले. तात्पर्य, थोडक्या कालांत या सुसमृद्ध प्रदेशांत दुष्काळ भासूं लागला. जमीन सुपीक असून पीक येईनासें झालें व धान्य असलें तरी बायकापोरें उपाशी पडूं लागलीं. रावापासून रंकापर्यंत वरुणऋषीचे भक्त बनले व वारुणीदेवीच्या नादीं लागले.

परंतु येथील कांहीं वृद्ध माणसांचीं डोकीं या नवीन देवतेनें इतकीं घेरलीं नव्हतीं. विचाराचा थोडा अंश त्यांच्यांत अद्यापि शाबूद राहिला होता. आपल्या या दुर्दशेचें कारण काय? जें राष्ट्र थोड्या कालापूर्वी सुसंपन्न होतें तें एकाएकीं दरिद्री कसें झालें! ज्या आमची सभ्यपणानें वागण्यांत ख्याती होती तेच आम्ही अश्लील कसे बनलों! जे आम्ही आपल्या स्त्रियांना गृहदेवताप्रमाणें मान देत असूं तेच त्यांना मारहाण करूं लागलों या सर्वाचें कारण काय? असा विचार मधून मधून कां होईना त्यांच्या डोक्यांत उद्भवणें साहजिक होतें.

या लोकांनीं स्वतः वारुणीचें पान करणें सोडून दिलेंच आणि तिच्या विरुद्ध इतकी चळवळ चालविली कीं राजाच्या प्रधानापर्यंत वारुणीचा तिटकारा उत्पन्न झाला. इतकेंच नव्हे एके दिवशीं गावांतील पुष्कळ लोकांनीं वरुण ऋषीच्या वारुणीच्या कारखान्यावर हल्ला करून तो उध्वस्त करून टाकिला. वरुणाचार्य आणि त्याचा मित्र सुर यांनी जवळच्या गवताच्या गंजीत आपलीं शरीरें झाकून जीव बचाविले आणि त्या रात्रीं तेथून पलायन केलें.

वरुण म्हणाला, “भो मित्रा, हे लोक किती रानटी आहेत बरें! त्यांच्यासाठीं आम्ही नवीन पेय शोधून काढलें असतां त्यांनीं बंड करून आमच्या जिवावर उठावें यासारखें लांछनांस्पद दुसरें काय आहे. आतां परोपकाराची हाव सोडून देऊन चल आपण आपल्या आश्रमांत जाऊन राहूं.”

अनुक्रमणिका

सुर म्हणाला, “मित्रा, हे लोक इतके अडाणी आहेत कीं त्यांना अमृत जरी पाजलें तरी ते कृतघ्न होऊन उपकार करणाऱ्याच्या जिवावर उठतील. पण आमच्या काशीराष्ट्रांतील लोक अत्यंत सभ्य आहेत. तेथें जाऊन आपण हा धंदा सुरू करूं. तेणेकरून मी माझ्या देशाचा कार्यभाग केल्यासारखें होईल व या नवीन पेयाच्या रूपानें आमचें नांवहि चिरकाल राहील. त्याप्रमाणें त्यांनीं काशीला जाऊन तेथील राजाच्या मदतीनें आपला धंदा सुरूं केला. पण कांहीं कालानें तेथल्या लोकांनींहि यांच्याविरुद्ध बंड केलें.

अशा रीतींने दोन तीन शहरांत अनुभव मिळाल्यावर शेवटीं ते श्रावस्थीला आले. त्या वेळीं तेथें सर्वमित्र नावाचा राजा राज्य करीत होता. त्यानें राजधर्माला अनुसरून सुराला आणि वरुणाला आपल्या पदरीं आश्रय दिला. व भट्ट्यांला वगैरे लागणारें सर्व सामान त्यांना पुरविण्याविषयीं आपल्या भांडागारिकाला हुकूम केला.

आतां इंद्राला अशी चिंता उद्भवली कीं, जर सर्वमित्र राजा मद्यपानाच्या व्यसनांत सांपडला तर जंबुद्वीपांत एकहि राजा धार्मिक राहिला नाहीं असें म्हणावें लागेल. आणि धार्मिकतेचा लोप झाल्यामुळें स्वर्गांत येणाऱ्या प्राण्यांची संख्या फार कमी होईल. आणि त्यामुळें देवदानवांचें युद्ध जुंपलें असतां देवांची संख्या कमी असल्यामुळें दानवांचा जय होईल व देवांचा पराजय होईल.

अशा विवंचनेंत देवांचा इंद्र पडला असतां सर्वमित्राला मद्यपानापासून परावृत्त करण्याची त्याला एक युक्ति सुचली व ब्राह्मणवेषानें मातीचा घडा खांद्यावर घेऊन तो श्रावस्थीमध्यें प्रगट झाला. व राजाच्या प्रासादाजवळ अंतरिक्षांत उभा राहून ‘हा घडा विकत घ्या, हा घडा विकत घ्या’ असें मोठमोठ्यानें ओरडत सुटला. प्रासादावरून त्याला पाहून राजा म्हणाला, “अंतरिक्षांत संचार करणारा तूं योगी आहेस कीं देव आहेस? बरें; तुझ्या अंगीं मोठें सामर्थ्य आहे असें म्हणावें तर हा घडा विकण्याची तुला हाव कां? आम्ही तुझ्या या कृत्यानें गोंधळून गेलों आहों. तर तुझ्या आगमनाचें कारण सांगून व या कुंभांत कोणता पदार्थ आहे हें सांगून आमच्या शंकेचें निरसन कर.”

इंद्र म्हणाला, “माझ्या संबंधानें जें कांहीं सांगावयाचें आहे तें मी शेवटीं सांगेन. प्रथमतः या कुंभाचें वर्णन ऐका. यांत तेल, तूप, दही, दूध वगैरे पदार्थ नाहीं आहेत. पण यांत असा अपूर्व पदार्थ आहेकीं ज्याचें प्राशन केलें असतां मनुष्य रस्ता समजून कड्यावरून खालीं पडेल, शेणाच्या डबक्यांत पडेल किंवा गटारांत पडेल, तो अभक्ष्य पदार्थांचें भक्षण करील; खाण्यासाठीं माजलेल्या बैलासारखा इकडे तिकडे हिंडत फिरेल. नाचेल, उडेल, बागडेल, रस्त्यांतून खुशाल नागडा उघडा जाईल, भररस्त्यावर किंवा गटारांत प्रेतासारखा निजून राहील. जें बोलूं नये तें बोलेल. लोकांशीं भांडण उकरून काढील, असा पदार्थ या घड्यांत भरलेला आहे. ज्याच्या प्राशनानें या जंबुद्वीपाच्या इतर प्रांतांत पुष्कळ कुटुंबें धुळीला मिळालीं आहेत, कुटुंबांमध्यें शांती नष्ट झाली आहे, आईबाप इत्यादि वडील माणसाचा तरुणांकडून मान राखला जात नाहीं आणि ज्याच्या प्राशनानें पुष्कळ लोक घोर नरकांत पडलेले आहेत, असा पदार्थ या कुंभांत भरलेला आहे, जर आपणास जरूर असेल तर हा विकत घ्या.”

तें ऐकून राजा म्हणाला “हे ऋद्धिमान ब्राम्हण, असला हा भयंकर पदार्थ कोण विकत घेईल बरें. या तुझ्या पदार्थानें माझाच नाश होईल असें नाहीं तर माझ्या सर्व राष्ट्राचा देखील नाश होईल यांत शंका नाहीं. पण या तुझ्या पदार्थाचें नांव तरी काय?” इंद्र म्हणाला “महाराज, तुझ्या राज्यांत आलेल्या दोन नवीन माणसांनीं शोधून काढलेला हा पदार्थ आहे. त्यांच्याच नावावरून याला सुरा किंवा वारुणी म्हणतात. तुम्ही

सर्व प्रकारें मदत देऊन याच पदार्थांची पैदास करूं पहात आलां. व तेणें करून तुमच्या राष्ट्राला अधोगतीला नेऊं पहातां. आजपर्यंत सगळ्या जंबुद्वीपांत तुम्ही परम धार्मिक राजे आहां अशी ख्याती आहे. परंतु या सुरेचा प्याला ओठाला लागल्याबरोबर तुमची धार्मिकता तात्काळ नष्ट होणार आहे आणि म्हणूनच मी देवांचा राजा इंद्र ब्राम्हणवेषानें तुम्हांला या सुरादेवीपासून निवृत्त करण्यासाठीं येथें आलों आहे."एवढें बोलून इंद्र तेथेंच अंतर्धान पावला.

सुरेचे अनेक दोष ऐकून राजा संविग्न झाला आणि आपल्या अमात्यास म्हणाला "देवराजानें आम्हांस मोठ्याच संकटांतून बचावलें. आम्ही व्यसनाधीन झालों असतों तर सर्व राष्ट्रावर मोठाच प्रसंग ओढवला असता. पन्नास बाहेरचे शत्रू आपणावर चाल करून आलेले बरे परंतु व्यसनरूपी एक अंतर्गत शत्रू नको आहे. कां कीं, बाह्य शत्रू जें नुकसान करूं शकणार नाहींत तें हा एकटा करील.

आतां वरुणाला व सुराला आमच्या राज्यांतून घालवून देणें म्हणजे दुसऱ्या राज्यावर अकारण संकट आणणें होय. हे दोघे आजूबाजूच्या राष्ट्रांत शिरून तेथील राजाला वश करून घेतील व तेथें आपला धंदा सुरूं करतील तेव्हां त्यांना पकडून याचक्षणीं त्यांचा शिरच्छेद करा. इन्द्राच्या आगमनाचा त्यास सुगावा लागला तर ते पळ काढतील."

पण लोकांच्या सुदैवानें आणि स्वतःच्या दुर्दैवानें वरुण व सुर आत्मकृत पदार्थाचें सेवन करून स्वस्थ पडले होते. राजसेवकांनीं त्याना तशा स्थितींत पकडून ठार केलें व दारू गाळण्यासाठीं आणलेले पदार्थ पुनःराजाच्या कोठारांत पोचते केले.

——***——

अनुक्रमणिका

१४४. राजाचीं कर्तव्यें. (५१५)

(संभव जातक नं. ५१५)

प्राचीनकाळीं कुरुराष्ट्रांत इंद्रप्रस्थ राजधानींत धनंजय, कौरव्य नावाचा राजा राज्य करीत असे. सुचीरत नावाचा त्याचा पुरोहित होता. एके दिवशीं राजा त्याला म्हणाला, “राजधर्म कोणता हें मला संक्षेपानें सांग.”पुरोहित म्हणाला “महाराज, हा प्रश्न थोडक्यांत सोडवितां येण्यासारखा नाहीं. आमच्या सर्व राष्ट्रांत विदुर पंडिताला मात्र या प्रश्नाचें संक्षेपानें उत्तर देतां येईल.”राजा म्हणाला “असें आहे तर तुम्ही ताबडतोब विदुराजवळ जाऊन तो या प्रश्नाचें जें उत्तर देईल तें मला कळवा.”

राजाच्या इच्छेप्रमाणें पुरोहित ब्राह्मण विदुराजवळ गेला. आणि त्याला म्हणाला “पंडितश्रेष्ठ राजधर्माचें संक्षेपानें आपण कथन करावें अशी आमच्या महाराजांची इच्छा आहे.”

विदुर म्हणाला “हे ब्राह्मणश्रेष्ठ सध्यां गंगेच्या प्रवाहाला आळा घालण्याच्या प्रयत्नांत मी गुंतलों आहे. तेव्हां आपल्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मला पळाचा अवकाश नाहीं.” (गंगेचा प्रवाह वळविण्यांत गुंतलों आहे याचा अर्थ टीकाकारानें व्यापारांत गुंतलों आहे असा केलाआहे. परंतु हा अर्थ बरोबर नाहीं असें वाटतें. या अर्थी विदुराचें म्हणणें असें असावें कीं, गंगेच्या प्रवाहासारखा वहाणारा लोकप्रवाह मी नीतीच्या उपदेशानें वळवूं पहात आहे आणि या अशक्य कामांत गुंतल्यामुळें मला अशा लहान सहान प्रश्नांचीं उत्तरें देण्यास सवड नाहीं.)

ब्राह्मण म्हणाला, “जर तुम्ही या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं तर दुसरा कोण देईल बरें?” विदुर म्हणाला, “माझा वडील मुलगा भद्रकार याजपाशीं तुम्ही जा, तो या प्रश्नाचें समर्पक उत्तर देईल.”

तेव्हां ब्राह्मणानें त्याच्याजवळ जाऊन त्यालाहि हा प्रश्न विचारिला. तो म्हणाला, “पुरोहित महाराज, मी तुम्हांला एक गोष्ट सांगतों. एक मनुष्य जंगलांतून मांसानें भरलेली कावड घेऊन चालला होता. इतक्यांत त्याला एक घोरपड दिसली. जवळ असलेल्या मांसानें संतुष्ट न होतां तो मनुष्य कावड खालीं ठेवून त्या घोरपडीच्या मागें लागला. इकडे कांहीं चोर त्या रस्त्यानें जात होते. त्यांनीं ती कावड लांबविली. अर्थात् त्या मनुष्याचें ‘इदं च नास्ति न परं च लभ्यते’आतां ही गोष्ट सांगण्याचें कारण हेंच कीं, माझ्या हातांतील परोपकाराचीं कामें सोडून तुमच्या प्रश्नाची उठाठेव करण्यांत मी गुंतलों असतां माझीहि स्थिती त्या माणसासारखी होईल. म्हणून तुम्ही माझा वेळ घेतां माझा धाकटा भाऊ संजय याजकडे जाऊन आपल्या प्रश्नाचा खुलासा करून घ्या.”

ब्राह्मणानें संजयाला प्रश्न केल्यावर तो म्हणाला, “पुरोहित महाराज, रोज मृत्यू मला ग्रासीत आहे. तेव्हां आपल्या प्रश्नाचें उत्तर देण्यास अवकाश कोठला?”(येथें मृत्यू ग्रासित आहे याचा टीकाकारांनी भलताच अर्थ केला आहे. परंतु मला असें वाटतें कीं, संजयकुमार परधार्मिक असल्यामुळें त्याला मृत्यूचें अत्यंत भय वाटत असेल व तो सतत धर्माचरणांत काळ घालवित असेल. एवढ्यावरूनच त्यानें आपणास अवकाश नाहीं असें सांगितलें असावें.)

अनुक्रमणिका

पुरोहित ब्राह्मण फार कंटाळला आणि म्हणाला “अशी ही त्रिस्थळी यात्रा करूनदेखील आमच्या प्रश्नाचें योग्य उत्तर मिळत नाहीं. मग तुमच्या वडिलांनींच परस्पर मला मार्गाला लाविलें असतें तर काय वाईट झालें असतें.”हें ऐकून संजय म्हणाला “पुरोहित महाराज, असे निराशहोऊं नका. माझा धाकटा संभव ज्याला पुष्कळ फुरसत असते. सध्यां त्याचें वय लहान असल्यामुळें तो दिवसभर आपल्या बालमित्राबरोबर खेळत असतो. तेव्हां त्याजपाशी जाऊन तुम्ही या प्रश्नांचा खुलासा करवून घ्या.”

पुरोहितब्राह्मणाला प्रथमतः ही नुसती थट्टा असावी असें वाटलें परंतु अखेर एकदां संभवाला भेटून काय गंमत होते हें पहावें असा विचार करून तो त्याच्या शोधाला गेला. संभवपंडित आपल्या मित्रांसह शहराच्या बाहेर खेळण्यांत गुंतला होता. राजाच्या पुरोहिताचा थाट पाहून त्याचे सवंगडे चकित झाले व इतस्ततः पळू लागले पण संभवानें त्यांना धीर देऊन आपल्याजवळ ठेवून घेतलें. पुरोहित जवळ येऊन संभवाला म्हणाला, “संजयानें मला तुजपाशीं पाठविलें आहे. आमच्या राजाला राजधर्म कोणता याचें संक्षेपानें उत्तर पाहिजे आहे आणि तें तूं देऊं शकशील असें तुझ्या भावाचें म्हणणें आहे.”

संभव म्हणाला “पुरोहित महाराज तुम्ही आमच्या घरीं येऊन विन्मुख होऊन जाऊं नये एवढ्याचसाठीं मी या प्रश्नाचें उत्तर देतों. राजा मी सांगेन त्या राजधर्माप्रमाणें वागो न वागो त्याची मला क्षिती नाहीं. राजाचें पहिलें कर्तव्य म्हटलें म्हणजे त्यानें आजचें काम उद्यावर टाकणाऱ्या माणसाची सल्ला कधीहि घेतां कामा नये. आजचें काम आजच करणें यांतच खरें कल्याण आहे. जो मनुष्य आपले दोष दाखवून देईल, आपण नश्वर आहे याची आठवण देईल, आणि आपणाला कुमार्गाला लावणार नाहीं. अधर्मावर विश्वास ठेवणार नाहीं, व अनर्थकारक कर्में आचरणार नाहीं तोंच राज्यपदावर आरूढ होण्यास योग्य होय. कां कीं, शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें त्याची सदोदित अभिवृद्धि होत जाते आणि तेणेकरून तो आपल्या प्रजेस सुखी करतो.”

त्या लहान मुलाचा खुलासा ऐकून सुचीरत ब्राम्हण फारच संतुष्ट झाला आणि १०० मोहरा त्याला देऊन त्यानें त्याचा गौरव केला. त्यानें दिलेलें उत्तर नीट लिहून घेऊन पुरोहितब्राम्हणानें तें आपल्या राजाला सादर केलें. राजानें तदनुसार आपलें वर्तन ठेवून सर्व प्रजेकडून धन्यता मिळविली.

——⁕⁕⁕——

अनुक्रमणिका

१४५. गुह्याचा स्फोट करूं नये. (५१८)

(पंडुरजातक नं. ५१८)

वाराणसीहून पाचशें व्यापारी परदेशाशीं व्यापार करण्याच्या उद्देशानें नौकेंतून जात असतां वाटेंत भयंकर तुफान होऊन बहुतेक सर्व मत्स्यकच्छपादिकांच्या भक्ष्यस्थानीं पडले. एकटाच काय तो मोठ्या मुष्किलीनें बचावला. तो तुफानाच्या सपाट्यांत सापडून करंभीय नावाच्या बंदराला जाऊन लागला. वस्त्रप्रावरण समुद्रांत गेल्यामुळें तो दिगंबर रूपानेंच शहरांत भिक्षेला फिरूं लागला. लोकांनीं त्याला पाहून तो मोठा सत्पुरुष असावा अशा बुद्धीनें त्याचा फार गौरव केला. कांहीं श्रद्धाळू लोकतर त्याच्या भजनीं लागले.

तेव्हां त्यानें असा विचार केला कीं, “आतां पुनः भांडवल जमवून प्रपंच थाटण्याची खटपट करीत बसण्यापेक्षां लोकांकडून चांगला आदरसत्कार होत आहे हें काय वाईट.”पुढें लोकांनीं त्याच्यासाठीं वस्त्रें प्रावरणें आणलीं तरी तीं तो घेईना. हेतू एवढाच कीं, आपल्या प्रसिद्धींत विघ्नें येऊं नये. होतां होतां या साधूची कीर्ति आजूबाजूच्या सर्व प्रांतांत पसरली. दूरदूरचे लोक साधुमहाराजांच्या दर्शनाला येऊं लागले. त्यांच्या मठांत एवढी गर्दी होऊं लागली कीं, साधारण माणसाची तेथें दाद लागणें देखील संभवनीय नाहीं असें झालें.

तें पाहून करंभीय प्रांताजवळ नागभवनांत रहाणाऱ्या पंडर नांवाच्या नागराजालाहि या साधूच्या दर्शनाची उत्कट इच्छा झाली व मधून मधून वेष पालटून तो त्याच्या दर्शनाला येऊं लागला. येथील नागांना पहाण्यासाठीं गरुडाचा राजा फार प्रयत्न करीत असे. परंतु त्याच्या तडाख्यांत ते सांपडत नसत. उलट गरुडाचाच पराभव होत असे. तेव्हां नागाचें कांहीतरी वर्म असावें व साधल्यास तें आपणाला समजावें अशा बुद्धीनें सुपर्णराजा त्या प्रांतांत फिरत असतां नागराजाला वेष पालटून करंभीय नग्न तापसाच्या दर्शनाला जातांना त्यानें पाहिलें. गरुडानेंहि आपला वेष पालटला व तो नागराजाच्या मागोमाग साधूच्या दर्शनाला गेला. हा प्रकार बरेच दिवस चालला होता. शेवटीं गरुडानें साधूची मर्जी चांगली संपादन केली. आणि एके दिवशीं तो त्या तपस्व्याला म्हणाला, “साधुमहाराज, मी गरुडांचा राजा आहे. केवळ आपल्या सेवेसाठीं वेष पालटून येथें येत असतो. आतां आपणाला माझी एक विनंती आहे तेवढी सफल केल्यास मला मोठा वर मिळाल्यासारखें होईल.

या प्रांताजवळ एक मोठें नागभवन आहे. तेथल्या नागावर हल्ला करणें आम्हाला अद्यापि साधत नाहीं. नाग म्हटले म्हणजे गरुडाचें भक्ष्य-परंतु हे नाग आम्हाला मुळींच वश होत नाहींत आणि त्यांच्यावर हल्ला केल्यानें आमचाच पराजय होत असतो. यांत कांहींतरी वर्म असलें पाहिजे तेवढें आम्हांला शोधून द्याल तर आपले आमच्यावर अनंत उपकार होतील.”

तपस्वी म्हणाला “भो गरुडराज तुम्ही म्हणतां ती कामगिरी माझ्या हांतून कशी पार पडेल? माझ्या अंगी असें कांहीं योगबळ नाहीं कीं, जेणेकरून मला नागभवनांत प्रवेश करतां येईल. मग तेथें रहाणाऱ्या नागाचें वर्म मला कसें समजेल?”

गरुड म्हणाला “पण एवढ्यासाठीं आपणाला नागभवनांत जाण्याची मुळींच गरज नाहीं. तो सुंदर तरुण राजकुमार आपल्या जवळ येत असतो तोंच नागांचा राजा होय. त्याला विचारिलें असतां यातील वर्म काय आहे तें तो आपणास सांगेल.”तापसी म्हणाला “पण माझ्या भक्ताचें वर्म समजावून घेऊन तें त्याच्या शत्रूला– जरी तो माझा भक्त असला तरी त्यालाकळविणें योग्य आहे काय?” गरुड म्हणाला “हें जर काम सामान्य मनुष्याच असतें तर तें करण्यापासून लाभ कोणताच नव्हता. हानि झाली असती आणि आपण निंदेलाहि पात्र झाला असतां. परंतु गरुडाचें प्रेम संपादन करण्यांत नागाची इतराजी झाली तर त्यापासून आपलें कांहींच नुकसान होणार नाहीं. आणि आपणाला नागापेक्षां आम्ही शतपटीनें मदत करूं शकूं. आपला योगप्रभाव आहे ही गोष्ट आमच्या पराक्रमानें लोकांच्या निदर्शनास आणून देऊं. व तेणेकरून आपलें यश दिगंताला नेऊं.

त्या उदरंभरू साधूला सुपर्ण राजाचें हें म्हणणें पटलें आणि तो म्हणाला “नागराजाचें वर्म जाणण्याविषयीं माझ्याकडून होईल तेवढी खटपट करीन.”दुसऱ्या राजकुमारवेषानें आपल्या भेटीस आलेल्या पंडर नागराजाला तो साधू म्हणाला “तुम्ही मोठे बलाढ्य नागराजा असतां माझ्यासारख्या यःकश्चित् तपस्व्याच्या दर्शनाला कां येतां?” आपण नागराजा आहे हें तपस्व्यानें योगबलाने जाणलें असावें असें वाटून नागराजा म्हणाला “आमच्या सारख्याचें बुद्धिबळ आपल्या योगबळापुढें कुचकामाचें आहे. मनुष्यलोकीं जन्मून आपल्यासारखी योगसिद्धी मिळवावी यासाठीं आम्ही प्रार्थना करीत असतो आणि आपल्यासारख्या सत्पुरुषाची सेवा करीत असतो. आम्ही किती बलवान असलों तरी आमची योनि मनुष्य योनीहून हलकीच आहे व अशा हीन जातीपासून मुक्त होणें हें मोठें भाग्य आहे.”

तपस्वी म्हणाला “तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे. तथापि तुमचा पराक्रम ऐकून मी फारच चकित होऊन जातो. गरुड म्हटले म्हणजे नागाचें आणि नाग गरुडाचें खाजें. असें असतां तुम्ही व तुमच्या नागभवनांतील सर्व नाग गरुडांचा पराभव करिता तेव्हां तुमच्या अंगीं अलौकिक सामर्थ्य असलें पाहिजे.”पंडर नागराज म्हणाला “ही कांहीं सामर्थ्याची गोष्ट नाहीं. त्यांत एक लहानशी खुबी आहे एवढेंच काय तें.”तपस्वी म्हणाला “अशी खुबी तरी कोणती कीं जिच्यायोगें तुम्ही गरुडांचा पराजय करितां.”नागराजा म्हणाला “तुम्ही सत्पुरुष आहां व माझे गुरु आहां त्याअर्थी ही गोष्ट तुम्हाला सांगण्यांत कांहीं दोष नाहीं. तथापि माझी आपणास एवढीच विनंती आहे कीं ती षट्कर्णी होऊं देऊं नका. केवळ गरुडाच्या मूर्खपणामुळें आम्हाला त्यांचा पराजय करितां येतो. गरुड जवळ आले कीं, आम्ही मोठमोठाले पाषाण गिळून जड होऊन व फणा वर करून बसतो. ते फणेला धरून आम्हाला उचलूं पहातात. परंतु आमचें वजन फार झाल्यामुळें अत्यंत क्लांत होऊन खालीं पडतात आणि आमच्या हातीं सांपडतात. पण फणेला न धरितां त्यांनीं जरी आमच्या पुच्छाला धरून आम्हास वर उचललें तर आमच्या पोटांतील पाषाण आपोआप खालीं पडून आमचें वजन हलकें होईल व आम्हाला त्यांना वाटेल तिकडे उचलून नेतां येईल.”

तपस्वी म्हणाला, “वाहवा नागराज! वाहवा! आपल्यासारखा बुद्धिमान् नेता असल्यावर नागांचा वियज व्हावा ही मोठी आश्चर्याची गोष्टनाहीं. तदनंतर नागराजा तपस्व्याला वंदन करून त्याचा निरोप घेऊन नागभवनाला गेला.

त्याच्या मागोमाग गरुडांचा राजा साधूच्या दर्शनाला आला. साधुबोवांची मुद्रा प्रफुल्लित झालेली पाहून नागाचें वर्म त्याला समजलें असावें असें सहज अनुमान करितां आलें व त्याप्रमाणें तपस्व्यानें घडलेली इत्थंभूत गोष्ट सुपर्ण राजाला निवेदन केली. सुपर्णराजानें पहिला प्रयोग पंडरावरच करून पहावा असा

अनुक्रमणिका

निश्चय करून साधुमहाराजाचा घाईघाईनें निरोप घेऊन तो तसाच नागराजाच्या मागें लागला. नागराजा कृत्रिमवेष टाकून नागाच्या रूपानें नुकताच नागभवनांत प्रवेश करीत होता. तोंच सुपर्णराजानें त्याची शेपटी पकडली. नागराजानें मोठमोठाले पाषाण गिळले पण त्याचा उपयोग काय. त्याला वर उचलल्याबरोबर ते आपोआप खालीं पडले व शेपटी वर आणि तोंड खालीं अशा स्थितींत गरुडाच्या पंजांत पकडला गेलेला तो अंतरिक्षांत लोमकळत राहिला. तेव्हां मोठमोठ्यानें आक्रोश करून तो म्हणाला, “या अत्यंत नीच तपस्व्यावर भक्ति ठेवून मी या स्थितीला पोहोंचलों आहे. जे कोणी आपलें परमगुह्य दुसऱ्याला सांगेल त्याची स्थिती माझ्यासारखीच होणार आहे. हे सुपर्णराज, मी आतां तुलाच शरण येतो तूंच मला या संकटांतून पार पाड.”

गरुड म्हणाला, “पण आपलें गुह्य दुसऱ्याला सांगू नये ही गोष्ट तुला पूर्वींच समजावयास पाहिजे होती. आतां झालेली गोष्ट होऊन गेल्यावर मग शोक करण्यांत काय फायदा?” नागराजा म्हणाला, “मी आतां मुळींच शोक करीत नाहीं. माझ्या मूर्खपणाचें मला हें प्रायश्चित मिळालें आहे. तथापि मी जसा नागांचा राजा आहे तसा तूं सुपर्णांचा राजा आहेस आणि तुझ्यासारख्या थोर व्यक्तीशी याचना करण्यास मला मुळींच लाज वाटत नाहीं. आतां मला पुत्राप्रमाणें समजून जीवदान द्या.”

गरूड म्हणाला “शास्त्रांत तीन प्रकारचे पुत्र सांगितले आहेत. एक औरस, दुसरा शिष्य आणि तिसरा दत्तक. तेव्हां यांपैकीं दत्तकपुत्रांत तुझी गणना करून मी तुला जीवदान देतों.”असें म्हणून गरुडराजानें त्याला खालीं ठेविलें व सुखानें नागभवनास जाण्यास सांगितलें. आणखी निरोप देतेवेळीं गरुड त्याला म्हणाला. “झालेल्या गोष्टीपासून धडा शीकआणि जो आपला साधारण परिचित असेल त्यावर एकाएकीं विश्वास टाकूं नकोस.”नागराजा गरुडाला वंदन करून आपल्या नागभवनाला गेला.

कांहीं काळ लोटल्यावर गरुड त्याची परीक्षा पहाण्यासाठी नागभवनाला आला. सुपर्णराजाशीं सख्य झाल्यामुळें नागराज आपल्या भवनांत स्वैच्छ विहार करीत होता. गरुडानें जणूं काय आपण त्यावर झडप घालीत आहे असा आव आणला. तेव्हां नागराजा मोठमोठाले पाषाण गिळून व शेपटी दडवून मोठ्यानें फुत्कारे टाकीत फणा वर करून बसला. तें पाहून गरूड म्हणाला “मी तुझा मित्र झालों असतां तूं एवढी सावधगिरी कां आरंभिली आहेस?” नागराजा म्हणाला “सुपर्णराज, आपल्या उपदेशाला अनुसरून मी वागत आहे. प्रतिपक्षाचा विश्वास धरूं नये असा आपणच मला बोध केलात तेव्हां आपली झडप माझ्यावर पडून पुनः शरण येण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून ही माझी तयारी आहे.”

गरुडानें त्याला शाबासकी दिली आणि ते दोघे वेष पालटून त्या तपस्व्यापाशी आले. व पंडरक त्याला म्हणाला “तूं माझा विश्वासघात करून माझ्यावर अत्यंत बिकट प्रसंग कां आणलास?” तपस्वी म्हणाला “जरी तूं मला प्रिय आहेस तथापि सुपर्णराजाचें प्रेम संपादन केल्यानें विशेष कल्याण होईल असें वाटून तुझें गुह्य त्याला सांगितले.”त्याच्या डोक्याचे सात तुकडे होवोत असा नागराजानें श्राप दिला. तत्क्षणींच करंभीय तपस्व्यांचे शिर सप्तधा भिन्न झालें व तो तेथेंच मरण पावला.

——***——

अनुक्रमणिका

१४६. राजाचें पाप प्रजेस फळतें. (५२०)

(गंडविंदुजातक नं. ५२०)

प्राचीन काळीं कामपिल्य राष्ट्रांत उत्तरपांचाल नावाची मोठी राजधानी होती आणि तेथें पांचाल नांवाचा राजा राज्य करीत असे. लहानपणापासून राजाला योग्य दिशा न लागल्यामुळें तो मोठा चैनी झाला. सिंहासनारूढ झाल्यापासून राज्याचा कारभार पहाण्याचें सोडून देऊन तो अंतःपुरांत रममाण होऊन बसला. अशा निष्काळजी राजाभोवती तोंडपुजा मंडळींचा घोळका जमावा हें साहजिक आहे. अर्थात् निस्पृहपणें सल्ला देणाऱ्याप्रधानास रजा मिळून पुढें पुढें करणारे लोक अधिकारारूढ झाले. एक पुरोहित तेवढा मात्र साधारण बरा होता. पण राजकारणांत त्याचें अंग कितीसें असणार! राजाच्या निष्काळजी वर्तनाचा परिणाम लौकरच सर्व राष्ट्राला भोगावा लागला. शेतकऱ्यांना पेरलेल्या शेताचें पीक आपल्या पदरीं पडतें कीं नाहीं याची पंचाईत पडूं लागली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सर्व राष्ट्रांत बेबंदशाई माजून राहिली.

त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व नगराबाहेरील टेंभुरणीच्या झाडावर देवतारूपानें रहात असे. पांचालराजाच्या वडिलापासून या देवदेवतेची पूजा करण्याचा परिपाठ होता. पांचालानेंहि तो क्रम पुढें चालविला. एका उत्सवाच्या दिवशीं देवतेची पूजा करून राजा मोठ्या थाटानें आपल्या वाड्यांत आला. त्या रात्रीं बोधिसत्त्व राजाच्या शयनमंदिरांत प्रवेशला आणि आपल्या तेजानें तें मंदिर त्यानें चकाकून सोडलें. एकदम विलक्षण प्रकाश पडलेला पाहून राजा खडबडून जागा झाला आणि त्या देवतेची मूर्ति पाहून म्हणाला “या मंदिरांत लहानसहान प्राण्याला देखील प्रवेश होण्याचा संभव नाहीं त्यात तूं प्रवेश कसा केलास? आणि असें तेजःपुंज शरीर तुला कसें प्राप्त झालें? तूं कोण व येथें येण्याचें कारण काय?”

बोधिसत्त्व म्हणाला, “राजकुलांत ज्याची पूजा होत आहे तोच मी टेंभुरणीवरचा देव आहे. आजपर्यंत तुझे वडील व तूं माझी पूजा केलीस म्हणून तुझ्यावर येणाऱ्या भावी विपत्तीचें निरसन करावें हें माझें कर्तव्य आहे असें मीं समजतों. तुझ्या राज्याभिषेकापासून तूं आपल्या प्रजेची हेळसांड केली आहेस व तुझ्या निष्काळजीपणाचें फळ सर्व राष्ट्राला भोगावें लागत आहे. तुझें वर्तन जर सुधारलें नाहीं तर राज्यकुलावर मोठें संकट ओढवेल म्हणून तुला माझा असा उपदेश आहे कीं, तोंडपुजा लोकांचें न ऐकतां आपल्या प्रजेची स्थिती कशी आहें याचें स्वतः अवलोकन कर व अतःपर प्रजाहित साधण्यांत दक्ष हो असें म्हणून बोधिसत्त्व तेथेंच अंतर्धान पावला.

त्यारात्रीं राजाला नीज कशी ती आली नाहीं. आपल्या प्रमादाचा त्याला अतिशय पश्चाताप झाला व सर्व रात्र त्यानें बिछान्यावर तळमळत काढली.

दुसऱ्या दिवशीं पुरोहिताला बोलावून आणून वेष पालटून सर्व राज्यांत फिरण्याचा आपला निश्चय त्यानें त्याला कळविला. पुरोहितहि त्याजबरोबर जाण्यास सज्ञ झाला व कोणाला कळूं न देतां वेष पालटून ते दोघेहि बाहेर पडले. नगराबाहेर आल्यावर त्यांनी खेड्यापाड्यांतून फिरून तेथील लोकांची परिस्थिती सूक्ष्म रीतीनें अवलोकन करण्याचा क्रम आरंभिला. एका खेड्यांत एक म्हातारा आपल्या झोपडीच्या दरवाजापाशी बसून पायांत रुतलेला काटा काढीत होता. हे दोघे त्याच्याजवळ पोहोचले असतां त्यांच्या

अनुक्रमणिका

तोंडून हे उद्‌गार निघाले “या काट्यानें जें मला दुःख होत आहे तेंच दुःख पांचालराजाला संग्रामांत बाणानें विद्ध झाल्यानें होऊं द्या. तो संग्रामांत पडून मरण पावला ही आनंदाची वार्ता आम्हास कधीं ऐकू येईल!”

त्यावर वेष पालटलेला पुरोहित म्हणाला “रे म्हाताऱ्या तूं राजाला शिव्या कां देतोस? म्हातारपणानें तुझी दृष्टि अधूं झाली आहे व तेणेंकरून तुला नीट दिसत नाहीं म्हणून तुझ्या पायांत हा काटा रुतला. तेव्हां राजाला दोष न देतां दृष्टीलाच दोष दे.”

म्हातारा म्हणाला “बाबारे मी ब्रम्हदत्ताला शाप कां देतो याचें वर्म तुला माहित नाहीं. त्याच्या निष्काळजीपणामुळें दिवसां त्याचे जमीनमहसूल वसूल करणारे वगैरे कामदार आम्हास लुटीत आहेत व रात्री चोर लुटीत आहेत. आमच्या घरांत असलेले नसलेले सर्व कांही धन नष्ट झाल्यामुळें जीवित रक्षणाची देखील मारामार पडत आहे. आमच्या गावावर सरकारी कामदाराची धाड आली म्हणजे घराभोंवती कांटे घालून घर ओसाड आहे असें भासवून आम्ही जंगलांत पळून जातों व तें लोक निघून गेले म्हणजे पुनः कांटेरी कुंपण दूर काढून घरांत शिरण्यास रस्ता करितो. आज सकाळीं कामगार लोक आमच्या उरावर बसण्यास येणार होते. म्हणून पोराबाळाला घेऊन आम्ही जंगलांत पळून गेलों व हें कुंपण घालून ठेविलें. आतां मुलेंबाळें परत येत आहेत त्यांच्यासाठीं रस्ता साफ करीत होतों, इतक्यांत हा काटा माझ्या पायांत रुतला. यानें पांचालाच्या अव्यवस्थित राज्याची मला चांगलीच खूण पटविली. व मी त्याला शाप देऊ लागलों. आतां यांत माझ्या कांहीं अपराध आहे तर तुम्हीच सांगा.”

वेषपालटलेला राजा म्हणाला” अहो हा म्हातारा योग्य बोलत आहे. पांचाल राजाचाच हा सारा दोष आहे. राज्यव्यवस्था नीट असती तर घराभोंवतीं कांट्यांचीं कुंपणे घालून लोक पळून कां जाते?” पुरोहित म्हणाला “आपण आतां दुसरीकडे जाऊ व तेथील लोक कसे रहातात याची चौकशी करूं.”

जवळच्या गावांत एक म्हातारीबाई पांचाळराजाला शिव्या देत असलेली त्यांनीं पाहिली आणि पुरोहित तिला म्हणाला, “बाई, तूं राजाला शिव्या कां देतेस?” ती म्हणाली, “माझ्या या दोन पोरी अद्यापि अविवाहित राहिल्या आहेत. त्यांची उमर होऊन गेली आहे तथापि त्यांना नवरा मिळत नाहीं. मग राजाला शिव्या देऊं नये तर काय करावें?”

पुरोहित म्हणाला, “अग वेडे म्हातारी, तुझ्या मुलींना राजानें नवरे शोधित बसावें काय? मग माथेफिरूप्रमाणें राजाला शिव्यां कां देतेस?” म्हातारी म्हणाली, “बाबारे, मी कांहीं वेडी नाही; परंतु विचार करूनच राजाला मी दोष लावीत आहे. राजा अधार्मिक झाल्यामुळें लोकांची उपजीविका होणें कठीण झालें आहे. रात्रींचे चोर लुटत आहेंत आणि दिवसांराजाचे कामगार लुटत आहेत. अशा स्थितींत केवळ उदरनिर्वाह चालणें कठीण झालें आहे. मग विवाह कुटुंबाची जबाबदारी शिरावर कोण घेईल?

आतां तुम्हीच सांगा कीं मी राजाला माझ्या विपत्तीचा दोष लावते तो बरोबर आहे कीं नाहीं. त्या दोघांलाहि त्या म्हातारीचें म्हणणें पटलें व ते तेथून दुसरीकडे जाण्यास निघाले. वाटेंत एक शेतकरी आपल्या जखमी होऊन पडलेल्या बैलाकडे पाहून मोठ्यानें उद्‌गारला “हा माझा बैल फाळानें जसा जखमी झाला तसाच पांचाळ राजा युद्धात जखमी होऊन पडो.” तें ऐकून पुरोहित म्हणाला “मूर्खा राजाचा आणि तुझ्या बैलाचा संबंध काय? तुझ्या निष्काळजीपणामुळें बैल जखमी झाला आहे असें असतां राजाला शाप काय म्हणून देतोस.”

अनुक्रमणिका

शेतकरी म्हणाला "जिकडे तिकडे अंदाधुंदी चालली असल्यामुळें आम्हाला वेळेवर अन्न मिळेनासें झालें आहे. माझी बायको इतका वेळ आली नाहीं या विवंचनेनें मी तिला सामोरा गेलों. इतक्यांत बैलाच्यापायाला फाळ लागून जखम झाली. जर आमच्या गावाला अधिकाऱ्यांनीं आणि चोरांनीं पीडिलें नसतें तर आमचीं कामें वेळच्या वेळीं होऊन अपघात होण्याला जागाच राहिली नसती. आतां तुम्हीच सांगा कीं आमच्या राजाला शाप देतों तें योग्य आहेत कीं नाहींत." तें ऐकून पुरोहित ब्राह्मण निरुत्तर झाला आणि तो व राजा तेथून दुसऱ्या गांवीं गेले.

तेथें सकाळीं लौकर उठून गावांतल्या लोकांची स्थिती अवलोकन करीत फिरत असतां एक मनुष्य गाईचें दूध काढीत असलेला त्यांच्या पहाण्यांत आला. गाय जरा खोडसाळ होती. तिनें लाथ मारून दुधांचें भांडें पालथें पाडलें. तेव्हां तो मनुष्य म्हणाला "अशा रीतीनें आमचा पांचाळ राजा लढाईत कधीं पालथा पडेल?" तें ऐकून पुरोहित म्हणाला "बाबारे गाईनें तुझ्यावर लाथ झाडली. दुधाचें भांडें पालथें केलें. त्यांत राजाचा अपराध काय?" तो म्हणाला "भो ब्राम्हणा, खात्रीनें यांत पांचाळ राजाचाच अपराध आहे. रात्रीं चोरांनीं आणि दिवसा अधिकाऱ्यांनीं उपद्रव दिल्यामुळें आम्हाला पोट भरण्याची देखील मारामार पडूं लागली आहे. असें असतां गाय व्याली कीं अमुकच दुभतें अधिकाऱ्याकडे पाठविल्यावाचून आमची धडगत नाहीं. पूर्वीच्या काळीं खोडसाळ गाईला आम्ही हात देखील लावित नव्हतों. पण आतां अधिकाऱ्याची भर भरण्यासाठीं वासराला उपाशी मारून देखील गाईचें दूध काढून घेणें आम्हास भाग पडतें. मग खोडसाळ गाईना सक्तीनें दुभावें लागतें यांत आश्चर्य तें कसलें? पांचाळराजाचा अधिकाऱ्यावर नीट दाब असता तर आम्हाला ही विपत्ती भोगण्याचा प्रसंग आला असता काय? आतां तुम्हीच सांगा कीं, या भांड्याचा आणि पांचाळ राजाचा संबंध लागतो कीं नाहीं?"

राजाला आणि पुरोहिताला त्याचें म्हणणें बरोबर पटलें व ते तेथून दुसरीकडे गेले. तेथें राजाच्या शिपायांनीं एका गाईचें वासरूं मारून त्याचें चामडें काढून घेतलें होतें व ती गाय गवत खाल्ल्यावाचून आणि प्याल्यावाचून हंबरडे फोडित इकडून तिकडे धावत पळत होती. तिची ती अवस्था पाहून गुराखी पोरें राजाला शिव्या आसडून म्हणाले "आमच्या या गाईप्रमाणेंच राजा पुत्रशोकानें संतप्त होवो." तें ऐकून पुरोहित म्हणाला "मूर्ख बेट्यानो, गाय हंबरडे फोडित वासरांसाठीं ओरडत असली तर त्यालाराजानें काय करावें?" ते म्हणाले "ब्राह्मण महाराज हा सर्व आमच्या राजाचाच अपराध आहे. त्याचे अधिकारी इतके उन्मत्त झाले आहेत कीं त्यांनीं आजच सकाळीं या गाईच्या वासराला ठार केलें पण त्याना शिव्या देण्यापेक्ष्या राजालाच शिव्या देणें योग्य आहे. कां कीं, तो जर धार्मिक असता तर त्याचे कामगार लोक असे उच्छृंखल का झाले असते?"

पुरोहित ब्राह्मण निरुत्तर झाला व तो आणि राजा पुनः राजधानीला येण्यास निघाले. वाटेंत एक बेडुक कावळ्यांनीं अर्धवट खाल्लेला तळमळत पडला होता. तो या दोघांना पाहून म्हणाला"माझ्यावर जी विपत्ति आली आहे, तीच विपत्ति पांचाल राजावर येवो. युद्धामध्यें पतन पावून कोल्हे कुत्रे त्याचे असेच लचके तोडोत."तें ऐकून पुरोहित म्हणाला"बा मंडुका मनुष्येतर प्राण्याचें रक्षण करणें हें राजाचें कर्तव्य नव्हें. जर तुला कावळ्यानें त्रास दिला, तर तेणेकरून आमचा राजा अधार्मिक ठरत नाहीं." त्यावर बेडुक म्हणाला "आपण म्हणतां ही गोष्ट खरी आहे. परंतु जर पांचाळराजाच्या राज्यांत सुबत्ता असती तर कावळ्याला शहरांतील लोकांकडून बलिप्रधान मिळालें असतें आणि तेथेंच कावळ्याची तृप्ति झाल्यामुळें ते येथवर येऊन आमच्या नाशास प्रवृत्त झाले नसते. आमच्या राजाच्या गैरवर्तणुकीचेंच पाप माझ्यासारख्या गरीब प्राण्याला भोगावें लागत आहे आणि या गैरवागणुकीला जबाबदार तोच आहे."

अनुक्रमणिका

हें बेडकाचें भाषण ऐकून राजा पुरोहिताला म्हणाला, “माझ्या निष्काळजीपणाचा परिणाम येथवर पोहोंचेल याची मला कल्पना नव्हती. मनुष्यापासून बेडकासारख्या यःकश्चित प्राण्यापर्यंत माझ्या अव्यवस्थित राज्यकारभाराचे परिणाम भोगावे लागत आहेत. हें जर मला पूर्वीच ठाऊक असतें, तर माझ्या हातून प्रजेचें कितीतरी कल्याण झालें असतें. पण गेल्याचा शोक करून उपयोग नाहीं. आतांतरी अत्यंत सावधगिरीनें प्रजापालनांत मी दक्ष राहीन अशी मला आशा आहे.

भाग तिसरा समाप्त

——***——

अनुक्रमणिका

जातककथा संग्रह

जातककथा संग्रह कथासूची

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

——⁂——

शब्दसूची

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

राज्याभिषेक

राक्षस

रिकामटेकडेपणा

रोज महासमंत राजाचा पुत्र

रौप्य कार्षापण

वारुणीदेवी

वालुकाकांतार

वासुदेव

वासुदेव कुळ वा वंश

विद्वज्जनपरिश्रम

विद्वतेचे चीज

विद्वान्

विनाश

विरुद्ध दिक्पाल

विरुपाक्ष दिक्पाल

विश्वासघात

वीर्य

वीर्यपारमिता

वृक्षदेवता

वृद्धसेवा

वेद

वेदमंत्र

वेदविद्या

वेदांग

वेदाध्ययन

वेळुक नावाचे सापाचे पिल्लू

वैजयंत प्रासाद

वैदर्भ नामक मंत्र

वानर

वानरयोनी

वाराणसी नगर किंवा नगरी

वाराणसी नगरवासी लोक

वाराणसी राजा

शठ

शतपत्र पक्षी

शहाणा शत्रू

शरभमृग

शशपंडित

शाक्यमुनि गौतम

शाखमृग

शाठ्य

शालवन

शालवृक्ष

शाल्मलीवन

शास्त्र

शास्त्राध्ययन

शास्त्रीपंडित

शास्त्रे

शिल्प

शिवणीचा वृक्ष

शिष्य

शील

शीलपारमिता

शीलाची परीक्षा

शीलांचे नियम

शुचिपरिवार श्रेष्ठी (व्यापारी)

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

——***——

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - २००५

अनुक्रमणिका